म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्रे
सं. क्र. ७०६

REFBK-0000851

श्री

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ५० वें.

# स्वामी रामतीर्थ.

( चरित्र आणि सदुपदेश. )

भाग पहिला.

४९

" I come blazing light,
And the shadows must flee."

—Rama.

लेखकः—

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एल्एल्. बी.
श्रीयुत दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर, बी. ए.

REFBK-0000851

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव—मुंबई.

किंमत १-४-०. सर्व हक्क स्वाधीन. १९१३.

Printed by R. Y. Shedge at the N. S. Press, 23 Kolbhat Lane,
Kalbadevi Road, Bombay.

Published by K. R. Mitra, Proprietor of the Manoranjak
Grantha Prasarak Mandali, at 2 A., Charni Rd,
Girgaon, Bombay.

# अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

जीवनचरित्र. १

राष्ट्रीय धर्म. ४९

रामाचा संदेश—हिंदुस्थानापुढील प्रश्न. ५८

यज्ञाचें रहस्य. ७८

यशःप्राप्तीची गुरुकिल्ली. १०३

वेदान्त्याचें आचरण नैतिक असतें काय ? ११५

हिमालयाचें सौंदर्य. १२५

आत्मानुभूतीचा मार्ग. १३९

आत्मविकास. १५१

धर्माचें ध्येय. १६६

आत्मकृपा. १७९

टीका आणि विश्वव्यापि प्रेम. २००

उत्कर्षाचें रहस्य. २३०

हिंदुस्थानच्या सांप्रतच्या गरजा. २७२

हिंदुस्थानचा भविष्यत्काल. २७८

रोख धर्म. २८८

धर्म. ३१५

साधारणधर्मसभेकरितां सुचविलेलीं तत्त्वें. ३२२

वृहदारण्यकम्—पाश्चिमात्य क्लब, वेदान्त आणि मालमत्ता, सुधारक, गोष्टी, प्रेम, विश्रांति वगैरे. ३२४

चैतन्युक्त शांति. ३७५

व्यावहारिक ज्ञान अथवा योग. ३८५

कविता. ३९३

आरती. ३९७

गो…वीरामायण. ३९८


1 , केळ

अज्ञानां चैव यो ज्ञानं दद्याद्धर्मोपदेशतः ।
कृत्स्नां वा पृथिवीं दद्यात्तेन तुल्यंच तत्फलम् ॥
( म. भारत. )



महानुभाव श्रीस्वामी रामतीर्थ एम्. ए.

The Paragon Press, Calcutta.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

परमेश्वरकृपेनें 'स्वामी रामतीर्थ' (चरित्र आणि सदुपदेश) या ग्रंथाची द्वितीय आवृत्ति काढण्याचा सुप्रसंग आला आहे, हें कळविण्यास आह्मांला आनंद वाटतो. पहिल्या आवृत्तींत राहिलेले दोष तपासून ते या आवृत्तींत दुरुस्त केले आहेत, आणि जीवनचरित्रांत बराच फेरफार केला आहे; किंबहुना जीवनचरित्र फिरून नवीनच लिहिलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पहिल्या आवृत्तीच्या वेळीं, मद्रासच्या गणेश आणि कंपनीच्या पुस्तकाच्या आरंभीं प्रोफेसर पूरणसिंग यांनीं इंग्रजींत लिहिलेलें स्वामीजींचें त्रोटक चरित्र, आणि कानपुरचे पंडित हरिभजनप्रसाद चतुर्वेदी यांनीं हिंदी भाषेंत लिहिलेलें जीवनचरित्र, यांतील माहिती घेऊन आह्मीं मराठी जीवनचरित्र तयार केलें होतें. पंडित हरिभजनप्रसाद चतुर्वेदी यांनीं जीवनचरित्रांतील कांहीं माहिती, पंडित हरिशर्मा यांनीं 'सदुपदेश' नांवाच्या वर्तमानपत्रांत लिहिलेल्या लेखांवरून घेतली होती. त्यांतील कांहीं भाग विश्वसनीय नाहीं, असें कळल्यामुळें आह्मीं तो भाग द्वितीयावृत्तींत गाळिला आहे. प्रोफेसर पूरणसिंग स्वामीजींचें विस्तृत चरित्र लिहीत आहेत; तें प्रसिद्ध झाल्यावर वाचकांनां स्वामीजींचें खरेंखुरें स्वरूप (The Real Rama) समजणार आहे. त्या चरित्राची आह्मी वाट पहात आहों. दुसरें, वाचकांनां कळविण्यास आह्मांला आनंद वाटतो, कीं, नारायणस्वामी नामक स्वामीजींच्या शिष्यानें, स्वामीजींच्या अनेक पत्रांच्या आधारें व स्वतःच्या माहितीनें स्वामीजींचें जीवनचरित्र हिंदींत लिहिलें आहे, आणि तें दिल्लीचे लाला अमीरचंद यांनीं हिंदी 'रामवर्षा'च्या द्वितीय भागांत प्रसिद्ध केलें आहे. या चरित्रांत स्वामीजींची विद्यार्थिदशेंतील आणि इतर हकीगत आलेली आहे. हा भाग मनोरंजक आणि सर्वांनां—विशेषतः विद्यार्थ्यांनां—बोधप्रद असल्यामुळें आह्मीं तो या आवृत्तींत यथाशक्ति दिलेला आहे.

पहिल्या आवृत्तींतील चुका तपासण्याच्या कामीं आमचे मित्र श्रीयुत गोविंद [illegible] केळकर एम्.ए., एल्एल. बी. आणि श्रीयुत विठ्ठल कृष्ण कामत यांनीं आह्मांला

बरेंच साहाय्य केलें. तसेंच जीवनचरित्र लिहिण्याच्या कामीं, मद्रासची गणेश आणि कंपनी, प्रोफेसर पूरणसिंग, नारायणस्वामी, नारायणप्रसाद आरोरा, मित्रवर्य पंडित वासुदेवराव कुलकर्णी इत्यादिकांची आह्माला बरीच मदत झालेली आहे. या सर्वांचे आह्मी मनापासून आभार मानतों.

पहिल्या आवृत्तींत जाहीर केल्याप्रमाणें दिल्लीचे लाला अमीरचंद यांनीं स्वामीजींचे समग्र ग्रंथ, तीन व्हाल्युम, ( सात भाग ) प्रसिद्ध केले आहेत. चौथा व्हाल्युम ते लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. आह्मीहि स्वामीजींच्या व्याख्यानांचे पुढील भाग लवकरच लिहिणार आहों. दुसरा भाग तूर्त तयार असून तो छापत आहे. वाचकवृंदांनीं पूर्वीप्रमाणें आमच्या प्रयत्नाला प्रोत्साहन देऊन आमच्याकडून अधिकाधिक सेवा करून घ्यावी, अशी त्यांनां विनंति करून आणि परमेश्वराचें स्मरण करून ही अल्पशी प्रस्तावना पुरी करितों.

बेळगांव,
वर्षप्रतिपदा, शके १८३५. } नागेश वासुदेव गुणाजी.

---

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

" महाभाग वाचकजन । भाग्य तुमचें उदेलें पूर्ण ।
रामतीर्थांच्या मुखांतून । स्त्रवतसे ही ज्ञानगंगा ॥ १ ॥
प्राशन करा हें अमृत । नलगे शोधावा अन्य ग्रंथ ।
प्रपंच परमार्थ सुनिश्चित । साधिती येणें पूर्णपणें ॥ २ ॥"

—दिगंबरदास.

स्वामी रामतीर्थांचे कांहीं लेख प्रथम आह्मांला कांहीं वर्षांपूर्वी 'ब्रह्मवादिन्', 'ईस्ट ॲन्ड वेस्ट' वगैरे मासिकांतून वाचावयास मिळाले. आजकाल हिंदी मासिकांतून सुविचार आणि माहिती यांनीं परिप्लुत असे बरेच लेख येत असतात; परंतु स्वामी रामतीर्थांच्या लेखांत कांहीं निराळ्या प्रकारचे स्वतंत्र विचार आणि विलक्षण तेज हीं दिसून आलीं. स्वामी विवेकानंदांप्रमाणें वेदान्तासारखा गहन विषय विशद करण्याची हातोटी आणि कार्लाइल किंवा एमरसन यांच्याप्रमाणें भाषेचा खोंचदार सुबकपणा, यांच्या मिलाफानें कोण मोहित होऊन जाणार नाहीं? 'राष्ट्रीय धर्म', 'हिंदुस्थानापुढील प्रश्न' वगैरे लेखां[illegible]

आह्मांला अशी कांहीं चटक लाविली, कीं, स्वामी **रामतीर्थांचे** लेख मिळतील तिकडून आणून वाचावयाचे, हा एक आमचा आनंददायक व्यवसायच झाला. इतक्यांत मद्रासच्या गणेश कंपनीनें स्वामी **रामांच्या** लेखांचें सचरित्र पुस्तक प्रसिद्ध केलें. आह्मांला ती एक मेजवानीच वाटली. आणि एवढें सुग्रास भोजन एकटेंच सेवन करणें पाप आहे, असें वाटून त्या पुस्तकाच्या बऱ्याच प्रति आणवून त्या इंग्रजी जाणणाऱ्या इष्टमित्रांनां वांटल्या. पुढें स्वामींच्या एका शिष्याकडून, स्वामींचीं कांहीं हिंदी व्याख्यानें भेट ह्मणून आलीं; त्यांचें देखील आह्मीं '**इष्टैःसह भुज्यताम्**' या धर्माज्ञेप्रमाणें सेवन केलें. स्वामी **रामतीर्थांचें** उपदेशामृत अशा अकल्पित रीतीनें आपोआप मिळूं लागल्यावर '**राम जडला न सोडी। घडिघडि ओढी। काय सांगुं तुज गोडी।**' या गोमांतकांतील सुप्रसिद्ध कविवर्य व साधुवर्य श्रीकृष्ण बांदकरांच्या पदाची आठवण झाली, यांत नवल कोणतें? घटपटाच्या तर्कटांतून वेदान्ताला सोडवून व्यवहारांत त्याचा कसा उपयोग करावयाचा, ही उत्कर्षाची गुरुकिल्ली स्वामी **रामांनीं** सर्वांच्या हातांत देऊन टाकिली आहे. ती देशी भाषेच्या द्वारें स्वदेशबांधवांनां हस्तगत करितां यावी, ह्मणून हा अल्पसा प्रयत्न आहे.

स्वामींच्या हिंदी व्याख्यानांत फारशी शब्दांचा भरणा फार आहे. त्यामुळें तीं फार प्रौढ, पण इकडील लोकांनां दुर्बोध झालीं आहेत. या व्याख्यानांचें रूपांतर करण्यांत आह्मांला आमचे मित्र श्रीयुत लक्ष्मण व्यंकटेश मांजरेकर, बी. ए., एल्एल्. बी., आणि कानपुरचे नारायणप्रसाद आरोरा, बी.ए., यांचें बरेंच साहाय्य झालें. स्वामींच्या कविता फारच उच्च दर्जाच्या आहेत. त्यांचें रूपांतर करण्याची महत्त्वाकांक्षा धरणें हें आमच्या आवांक्यापलीकडील आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दांत अद्वितीय काव्य आहे. एकेका वाक्यांत अनेक तपांचा अनुभव सांठलेला आहे. हें सर्व मराठींत आणावयाचें, ह्मणजे '**तुझ्यासम कवी कधीं जन्मती**' अशीच स्वामी रामतीर्थांची प्रार्थना केली पाहिजे! सध्यां त्यांच्या कांहीं कवितांचें मराठींत रूपांतर करण्याचा वेडावांकडा प्रयत्न केला आहे. त्यांतल्या त्यांत आमच्या कांहीं कविमित्रांनीं प्रेमळपणानें बरीच मदत केल्यामुळें आमचें काम हलकें झालें, आणि अनेक कवितांचें भाषांतरहि आह्मांला शक्य होतें त्याहून अधिक सरस झालें आहे. इतर बऱ्याच कविता आमचे गोमांतकस्थ मित्र श्रीयुत रामचंद्र त्रिविक्रम नाईक वांदिवडेकर यांनीं आपल्या प्रेमळ आणि

रसाळ शब्दांनीं केल्या आहेत. त्याचप्रमाणें श्रीयुत रामचंद्र कृष्ण आणि विठ्ठल कृष्ण कामत या बंधुद्वयानें आपल्या सात्त्विक वृत्तीला अनुसरून कवितांचें भाषांतर करणें, पारिभाषिक शब्द सुचविणें, वगैरे अनेक प्रकारांनीं मदत केली आहे. आणि श्रीयुत यशवंत वासुदेव गुणाजी यांनीं मोठ्या आदरानें आणि प्रेमानें सच्चिदानंदबाबांचें काम केलें आहे. महाशय दत्तात्रेय कृष्ण दामले यांनीं कांहीं भाषांतरें तपासून कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या. या सर्वांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

भाषांतर तयार होऊन छापण्याच्या तयारीला लागणार, इतक्यांत '**मासिक-मनोरंजना**'मध्यें रामतीर्थांचें जीवनचरित्र आलें. तें वाचून मनांत कल्पना आली, कीं, **मनोरंजना**च्या वाचकवृंदांनांच रामतीर्थांचा उपदेश अधिक ग्राह्य होईल, आणि श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्रांसारख्या उत्साही प्रकाशकांकडून स्वामींच्या उपदेशाच्या अंतरंगाला साजेसें पुस्तकाचें बहिरंगहि मोहक होईल, अशी खात्री वाटून आह्मीं त्यांनां आमचा मानस कळविला, व त्यांनीं मोठ्या आदरानें प्रकाशनाचें काम स्वीकारलें, याबद्दल त्यांचेहि आभार मानले पाहिजेत.

स्वामी रामतीर्थांच्या या उपदेशामृतानें मतामतांचा गलबला नाहींसा होऊन लोक एकजुटीनें आणि सात्त्विक भावानें राष्ट्रोन्नतीच्या मार्गाला लागतील, अशी आशा आहे. इंग्रजी जाणणारांनीं स्वामींचे सर्व लेख मूळ इंग्रजींतून अवश्य वाचावे. दिल्ली येथील सद्गृहस्थ लाला अमीरचंद हे स्वामींचे परमशिष्य पूरणसिंग आणि नारायणस्वामी यांच्या मदतीनें स्वामींचे सर्व लेख, त्यांचीं सर्व व्याख्यानें व त्यांची महत्त्वाची रोजनिशी लवकरच प्रसिद्ध करणार आहेत, हें कळविण्यास आह्मांला आनंद वाटतो.

महाराष्ट्रवाचकवर्गाची ग्रंथरूपानें सेवा करण्याचा हा आमचा पहिला प्रयत्न सज्जन वाचकांनीं न्यून पूर्ण करून गुणग्राहक बुद्धीनें गोड करून घ्यावा, अशी त्यांनां प्रार्थना आहे. अशाच प्रकारचे अधिकाधिक प्रयत्न करण्याची शक्ति द्यावयास **तो सच्चिदानंद प्रभु** समर्थ आहे. त्याचें स्मरण करून विराम पावतों.

बेळगांव,
वर्षप्रतिपदा, शके १८३२.

३१९६७

ॐ राम ॐ

# स्वामी रामतीर्थांचें जीवनचरित्र.

" जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत झालें ॥ १ ॥"

—श्रीरामदास.

अहा सच्चिदानंद मी ब्रह्म साचा । साक्षि मनदेहगेहादिकांचा ! ॥ ध्रु० ॥
टाकिली म्यां स्वयें तनुहि वाऱ्यावरी । लीन करुनी वरी पंचभूतीं. ॥
मत्स्वरूपासि तो अंत ना पारही । खेद उद्वेग राहील कैंचा ? ॥ १ ॥
सर्वंही कर्ण जे सत्य माझेचि ते, । नेत्रवक्त्रेंहि तीं सकलिकांचीं; ॥
हस्तपादहि बरे सर्व माझे खरे, । चित्तमनबुद्धिसंघ न दुज्याचा. ॥ २ ॥
मृत्यु म्यां भक्षिला, भेद तो प्राशिला, । गोड किति हें पहा अन्न माझें!॥
भीति वा दुःख नच वेदना कांहिंही । पूर सर्वत्र येई सुखाचा. ॥ ३ ॥
तिमिर अज्ञान तें थरथरां कांपुनी । घेउनी धाक माझाचि मेलें ! ॥
रामतीर्थामृतें विश्व धालें खरें, । धन्य दिन आजि हा सोनियाचा !॥४॥

कोणत्याहि राष्ट्राची उन्नति व्हावयाची असली, ह्मणजे ती सर्व बाजूंनीं होत असते; परंतु खरी उन्नति व्हावयास प्रथम राष्ट्राचें चेतन्य जागृत झालें पाहिजे. राष्ट्रांतील सद्गुण, शील, सत्त्व यांची वाढ होण्यावरच राष्ट्रोन्नति अवलंबून असते. क्षुद्र स्वार्थ टाकून उच्च परार्थ आपलासा करण्यावरच राष्ट्राची थोरवी ठरत असते. ह्मणून या सात्त्विक मार्गानें राष्ट्रांतील चैतन्य जागृत करणारे महात्मे राष्ट्रपुरुष गणले जाऊन पूजार्ह ठरतात.

ईश्वरी नियमानुसार असे महात्मे वेळोवेळीं या भरतभूमींत निर्माण होत आहेत, ह्मणूनच हें अवाढव्य राष्ट्र कालचक्राच्या फेऱ्यांत चिरडून न जातां, अखिल मानवकोटीला आध्यात्मिक मार्ग दाखविण्याचें पवित्र कर्तव्य आजपर्यंत बजावीत आलें आहे. सांप्रतकाळीं पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा बसला असतां हें काम बरेंच कठिण झालें होतें. कारण, आधिभौतिक प्रगतीमध्यें

हिंदुस्थान इतकें मागें पडलें आहे, व पाश्चिमात्यांनीं सुखाच्या व ऐषआरामाच्या सोयी इतक्या वाढविल्या आहेत, कीं, संसार असार आहे, असें ह्मणणें ह्मणजे 'द्राक्षें आंबट आहेत,' असें ह्मणण्यासारखेंच होऊन बसलें आहे. पाश्चिमात्य शिक्षणानें हिंदी विचारांत जी क्रांति झाली, तिचें सार दोन वाक्यांत देतां येईल. (१)निसर्ग पादाक्रांत केल्यानें सुखवृद्धि होईल. (२) व्यक्तीच्या सुखाची वृद्धि हेंच प्रत्येकाचें प्राप्तव्य. या दोन कल्पनांच्या विरुद्ध मतें पाश्चिमात्य वाङ्मयांत नाहींत, असें नाहीं; पण वरील दोन कल्पनांचाच पगडा आपल्या लोकांवर विशेष बसला होता, व यामुळें पाश्चिमात्य समाजपद्धति व राज्यपद्धति इकडे सुरू करण्याचे प्रयत्न जारीनें सुरू झाले. परंतु पाश्चिमात्य संस्कृतीचा परिचय जसजसा वाढत चालला, तसतसें तेथील समाजपद्धति व शासनपद्धति या दोन्ही सदोष आहेत, एवढेंच नव्हे, तर अजून त्या बऱ्याच अंशीं बाल्यावस्थेंत आहेत, हें दिसून आलें, व त्यांच्या वाङ्मयांतील कांहीं समाजविध्वंसक क्रांतिकारक तत्त्वें पाहून तर पाश्चिमात्य समाजाला स्थिर पायाच नाहीं असें कळून चुकलें, व या ज्ञानाबरोबर आर्यसंस्कृतीसंबंधानें प्रचंड आत्मविश्वास उत्पन्न झाला. 'पाश्चिमात्यांचें नुसतें अनुकरण करणारे' ही वृत्ति सोडून देण्यांत आली, व सर्व जगाची तळमळ नाहींशी करणारी अद्भुत ज्ञानवल्लि आपल्यापाशीं आहे, असा एक प्रकारचा अभिमान वाढूं लागला, आणि वरील दोन कल्पनांच्याऐवजीं खालील प्रत्यय आला.

(१) निसर्गाला आपण पादाक्रांत करूं जातां निसर्गानेंच आपणाला पादाक्रांत करून दास बनविलें आहे; आणि खरें सुख बाह्य वस्तूंत नसून आपल्याच भावनेंत—आपल्याच अंतर्यामीं आहे. ( २ ) सुखवृद्धीचें खरें साधन ह्मणजे आपल्या व्यक्तित्वाचा अर्थात् अहंकाराचा नाश करून अंगीं विश्वात्मत्व आणणें, आत्म्याचा विकास करणें आणि आत्मानुभूतीचा आस्वाद घेणें, हेंच होय.

गेल्या शतकांत वरील कल्पनांचा प्रसार करणारे अनेक साधुसंत आपल्या देशांत होऊन गेले, परंतु आंग्लविद्याविमोहित लोकांच्या मनावर विलक्षण परिणाम करणारे आधुनिक साधु **रामकृष्ण** परमहंसच होत. यांची कीर्ति व बोधामृत हीं हिंदुस्थानांतच काय, पण विलायतेंतदेखील जाऊन पोहोंचलीं आहेत; व स्वामी विवेकानंदांनीं त्यांच्या तत्त्वांचें साम्राज्य अमेरिकेंतदेखील प्रस्थापित केलें आहे. यानंतर जपान, इजिप्त, अमेरिका इत्यादि देशांना आपल्या उज्ज्वल

कांतीनें व दिव्य प्रभावानें दिपवून सोडणारा तारा ह्मणजे आमचे परमहंस स्वामी **रामतीर्थ** होत. विश्वव्यापि प्रेमानें यांनां सर्व जग आपलेंचसें वाटत असे, व जगांतील ज्या ज्या भाग्यवान् प्राण्यांनां यांचा सहवास लाभला, त्या सर्वांनां हे स्वामी आपलेचसे वाटत असत. अशा अद्वितीय महात्म्याचें चरित्र व त्याची उपदेशसंजीवनी महाराष्ट्रवाचकांनां ग्राह्य व हितावह झालीच पाहिजे, या दृढ विश्वासानें प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे.

साधूंच्या चरित्रांत व वीरांच्या चरित्रांत मोठा फरक असतो. श्रुतिरम्य अशा रणवार्ता, घनघोर युद्धें, अतुल पराक्रम, अकल्पित सुटका, वगैरे चित्त-वेधक गोष्टींनीं वीरांचीं चरित्रें चटकदार होतात. साधूंच्या व कवींच्या चरित्रांत यांतील कांहींच भाग नसतो. कवींचें चरित्र ज्याप्रमाणें त्यांच्या कवितेंत, त्याप्रमाणें साधूंचें चरित्र त्यांच्या उदात्त विचारांत व उदात्ततर आचरणांत सांठविलेलें असतें. यामुळें ही अद्भुत रसाची उणीव कांहीं चरित्रकार 'चमत्कारां'नींच भरून काढतात; व हें व्यसन इतकें वाढलें आहे, कीं, जो चमत्कार करीत नाहीं, तो साधुच नव्हे, अशी लोकांची समजूत झाली आहे. व या समजुतीमुळेंच कित्येक लोक वामनपंडितांनां अनुभवी साधु ह्मणत नाहींत. एकाद्या साधूनें केलेल्या चमत्कारांची हकीगत वाचून फारतर त्याच्या-विषयींची आपली अंधश्रद्धा दृढ होईल; पण जगाला त्याचा संदेश काय होता, व मानवांच्या विचारांत कोणती क्रांति त्याला घडवून आणवावयाची होती, हें समजून घेणेंच खरें महत्त्वाचें असतें. साधूंच्या चरित्रांत त्यांच्याच उपदेशाचें प्रतिबिंबित चित्र पाहणें, हाच सच्चरित्राचा खरा उपयोग. असो.

**जन्म व शैशव.**

पंजाब प्रांतांत, गुजरनवाला जिल्ह्यांत मरालीवाला नांवाच्या गांवीं वाल्मि-कीचे अवतार ह्मणून प्रसिद्ध असलेले व हिंदी रामायणाचे कर्ते जे श्रीतुळसीदास, त्यांच्या कुळांत स्वामी **रामतीर्थ** यांचा जन्म विक्रमसंवत १९३०, कार्तिक शु॥ १, ता० २२ आक्टोबर १८७३ इसवी रोजीं झाला. श्रीतुळसीदासांचें कुल प्राचीन कालापासून फार पवित्र गणलें जात आहे. तथापि रामतीर्थांनीं जन्म घेऊन या कुलाची योग्यता आणि धन्यता अधिक वाढविली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या वडिलांचें नांव **हिरानंद**जी. हे स्वभावानें फार सरळ, साधे, पण थोडे निष्ठुर असत. रामतीर्थांचा जन्म झाल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यांची परम सुशील माता स्वर्गवासी झाली. त्यानंतर त्यांच्या वडिलांची प्रेमळ


बहीण, रामतीर्थांची आत, हिनें त्यांचें पालन केलें. मातेचें दूध न मिळाल्यामुळें रामतीर्थ लहानपणीं फार अशक्त असत; पण पुढें इच्छाशक्ति व आत्मबल यांत जसे ते प्रबल झाले, तसे शारीरिक स्वास्थ्य व सामर्थ्य यांतहि झाले.

स्वामीजींची आत फार धार्मिक वृत्तीची होती. दररोज कथापुराणें ऐकण्यास देवालयांत ती तीर्थरामाला बरोबर घेऊन जात असे. आतेच्या धार्मिक व प्रेमळ स्वभावाचा बालक तीर्थरामाच्या मनावर असा उत्तम परिणाम झाला, कीं, ते लहानपणांतच उदार आणि धार्मिक बनले. शंखाचा आवाज किंवा प्रणवध्वनि त्यांनां फार आवडूं लागला. स्वामीजींनीं स्वतः याविषयीं एकदां असें सांगितलें होतें, कीं, "बाल्यावस्थेंत शंखाचा आवाज किंवा प्रणवोच्चार यांचा 'रामा'च्या चित्तावर इतका कांहीं परिणाम होत असे, कीं, तो ऐकिल्याबरोबर 'रामा'चें रडणें एकदम थांबे व राम एकदम चूप होऊन जाई."

एका इंग्रजी व्याख्यानांत स्वामीजींनीं आपल्याविषयीं असेंहि सांगितलें आहे, कीं, "तीर्थरामाचे आजोबा ज्योतिषशास्त्रांत निपुण होते, बालक तीर्थराम जन्मल्यावर त्याचें जन्मलग्न पाहून ते रडले आणि हंसले. या विचित्र प्रकाराचें कारण विचारतां ते सांगूं लागले, कीं, मी रडलों, याचें कारण, हा मुलगा अशा वेळेवर जन्मला आहे, कीं, एक हा स्वतः तरी राहणार नाहीं, किंवा आपल्या मातेला तरी जगूं देणार नाहीं. आणि मी हंसलों, याचें कारण, हा बालक जीवंत राहिल्यास असा महात्मा आणि परोपकारी होईल, कीं, तो आमच्या सर्व कुलाचा उद्धार करील. आणि त्याची कीर्ति या देशांतच नव्हे, तर परदेशांत, परलोकांतदेखील फार लवकर पसरेल." ईश्वराची इच्छा अशी होती, किंवा भारतवर्षाचें भाग्यच असें होतें, कीं, एकदोन महिन्यांच्या आंतच रामाच्या परम सुशील मातेनें परलोकची वाट धरिली, आणि रामाला अद्वितीयत्वानें जीवंत राहूं दिलें. कांहीं कालपर्यंत गाईच्या दुधावर रामाचें पालनपोषण त्याच्या आतेनें स्वतः मोठ्या प्रेमानें व मेहनतीनें केलें.

**जन्मपत्रिका.** विक्रमसंवत् १९३०, शके १७९५, कार्तिक शु॥ १, प्रविष्टे ८, बुधवार २५।५५ स्वाति नक्षत्र, मीन लग्न, तदनुसार २२ आक्टोबर १८७३ इसवी या शुभ मुहूर्तावर गुसांई रामलालजीच्या हीरानंदजी नामक मुलाला पुत्ररत्न (बालक तीर्थराम) झालें. स्वाति नक्षत्रावर (चतुर्थचरणीं) जन्म झाल्यामुळें त्यांचें जन्मनाम ताराचंद असें ठेवण्यांत आलें होतें. त्यांची लग्नकुंडली खालीं दिल्याप्रमाणें आहे.

## लग्नकुंडली.




ही कुंडली ज्योतिषशास्त्रविशारद पंडित लाभचंदजी यांनां दाखविली होती. त्यांनीं तिजवरून खालीं दिलेलीं दहा फलें वर्तविलीं होतीं.

(१) अति विद्वान् होईल.

(२) २१।२२ व्या वर्षीं परमार्थाचा अधिक विचार ( उत्कर्ष ).

(३) इष्ट अद्भुत होईल, ओंकाराप्रमाणें.

(४) परदेशगमन ( विलायत वगैरे ठिकाणीं ).

(५) राजदरबारांत सत्कार व मान मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

(६) शरीर रोगग्रस्त आणि कांहीं इंद्रियांमध्यें न्यूनता.

(७) आयुष्याच्या उत्तरभागांत काम ( विषयवृत्ति ) पूर्ण नाहींसा होईल, अर्थात् कामरहित होईल.

(८) दोन पुत्र अवश्य झाले पाहिजेत.

(९) अल्पायुषी होईल, २८ ते ३५ वर्षें आयुष्य.

(१०) ब्राह्मण असेल, तर मृत्यु जलांत, क्षत्रिय असेल, तर इमारतीवरून पडून.

**शिक्षण.**

मरालीवाला गांवांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा पुष्कळ दिवसांपूर्वीं स्थापन झालेली होती. तीर्थरामाला अगदीं लहानपणीं या शाळेंत दाखल करण्यांत आलें. वयानें अगदीं लहान, पण शिकण्यांत हुषार आणि स्मरणशक्तींत तीव्र, अशा या बालकाला पाहून शाळेचे अध्यापक मौलवी महम्मद अलीजी त्याच्यावर फारच खूष झाले. शाळेंतील अभ्यासाच्या पुस्तकांखेरीज या शाळेंत फारसी भाषेंतील गुलिस्तान आणि बोस्तान हे ग्रंथ तीर्थरामजीनें तोंडपाठ केले होते. या शाळेंतील शेवटची

परीक्षा पास झाल्यावर तीर्थराम आपल्या वडिलांवरोबर पुढील अभ्यास करण्यासाठीं गुजरनवाला येथें गेले. मरालीवाल्याहून हा गांव ७ मैल आहे. येथें येऊन तीर्थराम मिड्ल् स्कुलांत ( दुय्यम शाळेंत ) प्रविष्ट झाले. यावेळीं त्यांचें वय सुमारें १० वर्षांचें असावें. इतक्या लहान वयांत पालकाशिवाय मुलाला एकटेंच राहूं देणें योग्य नव्हे, असा विचार करून त्यांच्या वडिलांनीं आपल्या एका परिचित **धन्ना भगत** नामक मित्राच्या घराशेजारीं एका लहानशा भाड्याच्या घरांत त्यांच्या देखरेखीखालीं तीर्थरामांनां ठेविलें.

**सत्संग.**

त्या गांवांत **धन्ना भगत** सज्जन आणि धर्मात्मा पुरुष आहे, असें सर्व लोक मानीत असत. त्यावेळीं **धन्ना भगत** रोज आपल्या घरीं **योगवासिष्ठां**तील कथा इतक्या प्रेमानें आणि तल्लीनतेनें सांगत असत, कीं, सर्व श्रोतृगण समाधिस्थ होऊन जात असे. अभ्यास करून रिकामा राहिलेला वेळ तीर्थराम या सत्पुरुषाच्या समागमांत घालवीत असत. आणि त्यांच्या कथा लक्ष्यपूर्वक ऐकत असत. **भगत**जींची प्रेमळ आणि मनोहर कथा, त्यांचा नित्य सहवास आणि उपदेश, या सर्वांचा तीर्थरामाच्या मनावर असा परिणाम झाला, कीं, कांहीं कालपर्यंत ते पूर्णपणें **भगतजीचे**च होऊन गेले, आणि तनुमनोधनेंकरून त्यांची सेवा करूं लागले, व त्यांनां इतका मान देऊं लागले, कीं, आपलें कोणतेंहि काम त्यांच्या आज्ञेशिवाय ते करीत नसत. **भगतजी**हि तीर्थरामाची श्रद्धा, भक्ति आणि सेवा ( प्रेम ) पाहून इतके प्रसन्न झाले, कीं, त्यांनां ते आपला प्राणच असें मानून त्यांच्यावर प्रेम करूं लागले.

**अध्ययनांत अडथळे व नेटाचे प्रयत्न.**

याप्रमाणें तीर्थरामांची एका बाजूनें धार्मिक उन्नति चालली असतां, ते दुसऱ्या बाजूनें आपल्या अभ्यासांतहि हुषार आणि पहिले राहूं लागले. शाळेंतील सर्व वर्गांत त्यांचा नंवर बहुधा सर्वांच्या वर असे. मिडल् स्कुलच्या आणि एन्ट्रन्स परीक्षेंत त्यांचा नंवर त्यांच्या शाळेंत पहिला आला. यानंतर पुढील अभ्यास तीर्थरामानें करूं नये, असें त्यांच्या वडिलांच्या मनांत आलें, आणि कोठेंतरी कारकुनाची नोकरी धरावी, असा ते त्यांनां दररोज आग्रह करूं लागले. इतक्या लहान वयांत, म्हणजे पंधराव्या वर्षी कारकुनाची नोकरी करण्यांत कांहीं फायदा नाहीं, आणि अशा नोकरीनें आपली कांहीं उन्नति होणार नाहीं, असा विचार करून तीर्थरामानें आपल्या वडिलांचें म्हणणें ऐकिलें नाहीं. यामुळें त्यांनां फार राग येऊन त्यांनीं तीर्थरामाला

घरांतून बाहेर हांकलून लाविलें आणि त्याच्यापुढील शिक्षणाकरितां एक कवडीहि देणार नाहीं, असा निश्चय केला. याप्रमाणें असहाय होत्साते केवळ ईश्वरावर भार ठेवून तीर्थराम घरांतून शांत चित्तानें बाहेर पडले व पुढें शिकण्याकरितां लाहोरास आले.

**कॉलेजांतील अध्ययन.**

एन्ट्रन्स परीक्षेंत सर्व शाळेंत पहिला नंबर आल्यामुळें तीर्थरामाला सर्वांत मोठी स्कॉलरशिप ( मासिक शिष्यवृत्ति ) मिळाली. तिच्या जोरावर त्यांनीं लाहोरच्या फोरमन ख्रिश्चन कालेजांत आपलें नांव दाखल करून एफ. ए. चा अभ्यास सुरू केला. उदर-निर्वाहार्थ आणि पुढें शिक्षणक्रमांत व्यत्यय येऊं नये, ह्मणून त्यांनीं एकदोन खासगी शिकवण्याहि धरिल्या. अशा स्थितींत ते एफ. ए. च्या परीक्षेंत पहिले आले आणि त्यांनां पूर्वींपेक्षां मोठी स्कॉलरशिप मिळूं लागली. त्यांनीं तिच्या जोरावर बी. ए. चा अभ्यास सुरू केला. या सुमाराला त्यांचे वडिल फार क्रोधाविष्ट होऊन त्यांनीं तीर्थरामाच्या पत्नीला लाहोरास आणिलें, व तिला त्यांच्यापाशीं सोडून आपण चालते झाले. तिच्याहि पालनपोषणाचा भार व जबाबदारी तीर्थरामावर पडल्यामुळें खर्चाचा बोजा अधिक वाढला. स्कॉलरशिपनें सर्व खर्च भागेना, ह्मणून त्यांनीं लाहोरचे बडे गृहस्थ रायबहादूर लाला मेलाराम यांच्या दोन सुशील मुलांनां शिकविण्याचें काम पतकरिलें. यावेळीं तीर्थरामाच्या मनाची स्थिति आणि त्यांची दिनचर्या कशी होती, हें धन्ना भगत यांनां त्यांनीं पाठविलेल्या पत्रांवरून चांगलें समजतें. त्यांपैकीं एक पत्र येथें देतों.

" ९ फेब्रुआरी १८९४, रात्रीं ११ वाजतां.

आपलें एक कृपापत्र आजच मिळालें; फार संतोष झाला. मी दररोज प्रातःकाळीं ५ वाजतां निजून उठतों व ७ वाजेपर्यंत अभ्यास करतों; नंतर स्नान करतों आणि पुढें व्यायाम ( कसरत ) करतों. त्यानंतर शिक्षकांकडे जातों. जातांना वाटेंत वाचीत असतों. तेथें एक तासपर्यंत रहातों; नंतर रोटी खाऊन त्यांच्याबरोबर गाडींतून कॉलेजला जातों. कॉलेजहून घरीं येतांना वाटेंत दूध पितों. घरीं कांहीं मिनिटें बसून नंतर नदीच्या बाजूला सहल करावयास जातों. तेथें जाऊन नदीकिनाऱ्यावर सुमारें अर्धा तास इकडे तिकडे फिरतों. तेथून परत येतांना वाटेंत शहरांतील हिरव्यागार बागांमध्यें

कांहीं वेळ फिरतों; तेथून घरीं येऊन वरच्या मजल्यावर चालत असतों. मी चालतांफिरतांना अभ्यास करीत असतोंच. इतक्यांत अंधार होतो. अंधार पडल्यावर पुनः कसरत करितों आणि दिवा पेटवून ७ वाजेपर्यंत वाचीत बसतों. नंतर रोटी खाण्यास जातों, आणि प्रेमजीकडेहि जातों. तेथून आल्यानंतर १०।१२ मिनिटें घरीं कसरत करितों. माझ्या अनुभवाला असें आलें आहे, कीं, आमचें जठर (पोट) जर आह्मीं उत्तम स्थितींत ठेविलें, तर पूर्ण आनंद किंवा सुख, चित्ताची एकाग्रता, परमेश्वराची आठवण, अंतःकरणाची पवित्रता इत्यादि गोष्टी सहज प्राप्त होतात, बुद्धि आणि धारणाशक्ति चांगल्या राहतात. पहिली गोष्ट, मीं खातों फार थोडें; आणि जें कांहीं खातों, तें चांगलें पचवितों.) *

राम."

**बी. ए. च्या वर्गांत प्रथम संस्कृत भाषेचा अभ्यास.**

यावेळीं तीर्थराम बी. ए. च्या वर्गांत होते. याहि क्लासांत नेहमीं त्यांचा पहिला नंबर असे. त्यांचे सहाध्यायी त्यांनां 'गोस्वामी तीर्थराम' अशी मोठ्या आदरानें हांक मारीत. अधिक परिचय झाल्यावर ते त्यांनां गुसांईंजी असें ह्मणूं लागले व गुसांईजी असेंच त्यांचें नांव पडलें. यावेळीं त्यांनां संस्कृतभाषेचा अधिक परिचय नव्हता; थोडी हिंदी भाषा ते जाणत असत. फारशी भाषेंत मात्र ते फार प्रवीण असत. यामुळें कॉलेजचे मौलवीसाहेब त्यांच्यावर फार फिदा असून नेहमीं त्यांची तारीफ करीत असत. मौलवीसाहेबांची ही नित्यस्तुति, आणि कॉलेजभर नांवाजलेली गुसांईजींची फारसी भाषेंतील प्रवीणता, या गोष्टींनीं संस्कृत भाषेची उन्नति व्हावी, असें इच्छिणाऱ्या आणि त्या भाषेंत निपुण असणाऱ्या कॉलेजच्या इतर कांहीं विद्यार्थ्यांनां फार दुःख झालें. यांपैकीं एका विद्यार्थ्याला तर स्वस्थ राहवेना. तो गुसांईजींपाशीं येऊन टोंचून बोलूं लागला, कीं, "पहा, आपण ब्राह्मण आणि श्रीतुलसीदासाच्या वंशांत उत्पन्न झालां. पण ही किती खेदाची गोष्ट आहे, कीं, आपल्या अस्सल कुलभाषेवर आपलें प्रेम नाहीं, आणि यावनी भाषेवरमात्र अहोरात्र परिश्रम करून आपण त्यांत नांव मिळविलें आहे! यावनी भाषेवर अधिक प्रेम ठेवणें आणि आपल्या मातृभाषेचें अधिक ज्ञान न संपादणें, हें ब्राह्मणाला मरणतुल्य नाहीं काय? आणि उत्तम कुलाच्या ब्राह्मणांमध्यें यावनी भाषेचा प्रचार आणि मातृभाषेचा अभाव झाला, तर ब्राह्मणकुलांचा

नाश लवकर नाहीं का होणार ? संस्कृताच्या अध्ययनासाठीं कांहीं वेळ खर्च न करणारे, पण सर्व आयुष्य आणि बल यावनी भाषेच्या अध्ययनासाठीं खर्च करणारे असे आपण कुलनाशक ब्राह्मण नाहीं का होणार ?" प्रियमित्राच्या या कठोर वचनांनीं गुसांईजींचें मन फार घायाळ झालें, आणि ते मोठ्या आवेशानें आपल्या त्या मित्राला ह्मणाले, कीं, "जर मी बी. ए. च्या परीक्षेंत फारसी भाषा घेईन आणि उद्यांपासून जर मी या क्लासांत संस्कृताचा अभ्यास सुरू करणार नाहीं, तर मी ब्राह्मणाचा पुत्र नव्हें ! बस्स, ठरलें. उद्यांपासून मी संस्कृताचा अभ्यास सुरू करणार आणि यंदा बी. ए. च्या परीक्षेंत फारसीच्याऐवजीं मी संस्कृत हीच दुसरी भाषा घेणार !" झालें. दुसऱ्या दिवशीं फारसी भाषा सोडून संस्कृत भाषा घेण्याचा अर्ज गुसांईजींनीं प्रिन्सिपॉलसाहेबांकडे दिला. ही खबर पसरतांच कॉलेजांत जिकडेतिकडे गडबड उडाली आणि मौलवीसाहेबांच्या मनाला फार दुःख झालें. त्यांनीं गुसांईजींची समजूत घालण्याचा पुष्कळ यत्न केला, पण गुसांईजींनीं त्यांचें कांहीं ऐकिलें नाहीं, व आपला पण खरा करून दाखविण्याचें ठरविलें. गुसांईजी संस्कृत शिकण्यास तयार झाले; पण कॉलेजचे पंडितमहाराज त्यांनां वर्गांत दाखल करून घेईनात. उलट त्यांनीं प्रिन्सिपॉलसाहेबांकडे अशी तक्रार केली, कीं, "या मुलानें ( गुसांईजीनें ) संस्कृत व्याकरणाचें एक अक्षरहि पाहिलें नाहीं, तो आरंभापासून फारसी भाषा शिकत आहे, तेव्हां अशा संस्कृताचा गंधहि नसलेल्या विद्यार्थ्याला मीं स्वतः कसा दाखल करून घेऊं? आणि असा विद्यार्थी बी. ए. च्या संस्कृतवर्गांत न घेणें हेंच इष्ट आहे. घेतल्यास शेवटीं माझी अपकीर्ति होईल." ही तक्रार ऐकून प्रिन्सिपॉलसाहेबांनीं आपलें कांहींच मत प्रगट न करितां या प्रश्नाचा निकाल पंडितजींवरच सोंपविला.

पंडितजींची तक्रार ऐकून गुसांईजी फार घोटाळ्यांत पडले. पंडितजी त्यांनां संस्कृतवर्गांत बसूं देईनात आणि आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें फारसी क्लासांत यापुढें जाण्यास त्यांचें मन तयार होईना. तेथें जाऊं लागतांच त्यांनां फार लाज वाटूं लागावी. यामुळें एकदोन आठवडे ते संस्कृत किंवा फारसी—कोणत्याच वर्गांत जाऊन बसले नाहींत. आपणाला टोंचून बोलणाऱ्या मित्राच्या घरीं जाऊन ते लक्ष्यपूर्वक संस्कृताचा अभ्यास करूं लागले. कांहीं दिवसपर्यंत आपला सारा वेळ ते संस्कृताच्या अध्ययनांत खर्च करूं लागले, आणि आपल्या

मित्रांकडून त्यावर्षीं बी. ए. च्या परीक्षेला असलेला रघुवंश, व कांहीं छोटीं व्याकरणाचीं पुस्तकें काळजीनें शिकूं लागले.

थोड्या दिवसांनीं रघुवंशाचा कांहीं भाग मुखोद्गत झाल्यावर ते पंडितजींकडे गेले आणि त्यांनीं तो भाग तोंडपाठ ह्मणून दाखविला. पंडितजी आश्चर्यचकित आणि विस्मित होऊन ह्मणूं लागले, कीं, "तुझी स्मरणशक्ति इतकी जबर असेल, ही कल्पना मला नव्हती. बाकीचीं मुलें आज कित्येक महिने खटपट करून शिकलीं आहेत, इतका भाग तूं थोड्याच दिवसांत मुखोद्गत केलास. शाबास, आतांच मी प्रिन्सिपॉलसाहेबांकडे जातों आणि तुझ्या विद्वत्तेची तारीफ करितों, आणि माझी चूक कबूल करून तुला संस्कृतवर्गांत दाखल करण्याची परवानगी घेऊन येतों." याप्रमाणें गुसांईजी संस्कृतवर्गांत प्रविष्ट झाले आणि नेटानें संस्कृताचा अभ्यास करूं लागले. दुसऱ्या विषयाकडे खर्च करण्याचा बराच वेळ ते आतां संस्कृताकडे लावूं लागले.

**बी. ए. ची परीक्षा नापास.**

त्यावर्षीं बी. ए. ची परीक्षा फारच कठिण झाली. विशेषतः इंग्रजीचा पेपर इतका कठिण होता, कीं, पुष्कळ चांगले विद्यार्थी पास होऊं शकले नाहींत. आपली प्रतिज्ञा खरी करण्याकरितां संस्कृतभाषेच्या तयारींत गुसांईजींनीं आपला बहुतेक वेळ खर्च केल्यामुळें त्यांनां दुसऱ्या विषयांची चांगली तयारी करितां आली नाहीं. यामुळें तेहि इंग्रजीमध्यें चार मार्कांनीं नापास झाले!

पंजाब विश्वविद्यालयाच्या कांहीं सभासदांनीं गुसांईजींचे सर्व विषयांतील मार्क मिळवून पाहिले, तों ते आश्चर्यचकित होऊन ह्मणूं लागले, कीं, "या विद्यार्थ्याला इंग्रजींत आणखी चार मार्क अधिक मिळते, तर तो सबंध पंजाबमध्यें पहिला आला असता!" परीक्षा नापास झाल्यामुळें गुसांईजींनां दुःख झालें होतें, आणि ही वरील खबर ऐकून त्यांनां त्या दुःखावर आणखी डाग दिल्यासारखें झालें. ज्यांनीं ज्यांनीं हें वर्तमान ऐकिलें, त्या सर्वांनां परम दुःख वाटलें. विश्वविद्यालयाच्या कांहीं सभासदांनांहि फार वाईट वाटून त्यांनीं पुष्कळ खटपट करून असा नियम पास करून घेतला, कीं, 'इतर विषयांत चांगले मार्क मिळून एकाद्या विषयांत जर कोणा विद्यार्थ्याला चारपांच मार्क कमी पडले, तर एकदम त्याला नापास करूं नये, आणि त्या विद्यार्थ्याविषयीं पुनः विचार व्हावा.' असा नियम पास झाल्यामुळें पुढें मुलांनां त्याचा फायदा झाला; पण त्यावर्षीं तसा कांहीं नियम नसल्यामुळें बरेच विद्यार्थी नापास झाले. याप्रमाणें गुसांईजींनां पुनः बी. ए. च्या वर्गांत रहावें लागलें.

आणि त्यांची स्कॉलरशिपहि गेली. यावेळीं त्यांच्या मनांत काय खळबळ उडाली असेल, त्याची कल्पना वाचकांनीं आपल्या मनाशींच करावी; त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. असो. पुढें संन्यास घेतल्यानंतर याविषयासंबंधीं गुसांईजींनीं स्वतः त्या अवस्थेचें वर्णन आपले शिष्य नारायणस्वामी यांच्यापाशीं खालीं दिल्याप्रमाणें केलें—

**शरणागतरक्षण.**

" बी. ए. ची परीक्षा नापास झाल्याची बातमी जेव्हां 'रामा'ला लागली, तेव्हां त्याच्या मनावर वज्रप्रहारच झाला. त्याचें मन फाटून गेलें. अश्रुधारा एकसारख्या जोरानें वाहूं लागल्या. जणूंकाय शोकाचा पर्वतच त्याजवर कोसळून पडला आहे ! वडील तर एक कवडीची मदत देत नव्हते. मदत तर सोडाच, उलट 'रामा'च्या अर्धांगीला तरुणपणांतच त्याच्यापाशीं लाहोरांत सोडून ते चालते झाले ! गृहस्थाश्रमाचा बोजा एफ. ए. च्या वर्गांत असल्यापासून 'रामा'वर पडला होता. स्कॉलरशिपमुळें तो बोजा सहन केला जात होता; पण बी. ए. च्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें ती स्कॉलरशिपहि बंद झाली. बाहेरून कोणाकडून मदत मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां 'रामा'च्या मनाचें धैर्य खचत चाललें. अशा व्याकुल अवस्थेमध्यें चित्ताला शांतिदायक कायत्या दोनच गोष्टी होत्या. (१) आपल्या स्वरूपाचें ध्यान, आणि (२) प्रियकर श्रीकृष्णाचें प्रेमभरित स्मरण. यावेळीं अंतःकरणांतून अश्रधारांबरोबर खालीं दिलेले श्लोक एकसारखे वर येत असत.

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ १ ॥
कुंदनके[१] हम डले[२] है जब चाहे तूं गला[३] ले
बावर[४] न हो तो, हमको ले, आज आजमा[५] ले
जैसी तेरी खुशी हो सब नाच तूं नचा[६] ले
सब छानबीन[७] करले हरतौर[८] दिल जमा[९] ले

---

१. सोन्याची. २. गट, लगड. ३. वितळून टाक. ४. विश्वास, निश्चय. ५. परीक्षा कर. ६. नाचवून घे. ७. परीक्षा, तपास. ८. हरएक तऱ्हेनें. ९. संतुष्ट हो.

राजी है हम उसीमें जिसमें तेरी रजा है
यहां यूं भी वाहवा है और वूं भी वाहवा है
या दिलसे अब खुश होकर कर हमको प्यार प्यारे
ख्वाह तेग खैंच जालिम टुकडे उडा हमारे
जीता रक्खे तू हमको या तनसे सिर उतारे
अब तो फकीर आशक कहते हैं यूं पुकारे
राजी है हम उसीमें जिसमें तेरी रजा है
यहां यूं भी वाहवा है और वूं भी वाहवा है

प्रत्येक दिवशीं राम देवाची प्रार्थना याप्रमाणें लिहून करीत असे, कीं,* "हे प्रभो, आतां राम तुमचा आणि तुह्मी रामाचे झालांत. रामाचें काम ह्मणजे आपलें **नित्यस्मरण** आणि आपल्या मर्जीनुरूप संतुष्ट राहणें हेंच होय, आणि आपलें काम ह्मणजे रामाला सर्व प्रकारची मदत करणें हें होय. रामाचें शरीर आतां त्याचें राहिलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर रामाचें सर्वस्व आपलें झालें, झालें, झालें ! ! ! आतां आपल्या मर्जीप्रमाणें त्याला तारा किंवा मारा."

याप्रमाणें राम ईश्वराच्या ध्यानांत लीन असतांना, ईश्वराच्या कृपालुत्वाचा साक्षात्कार दाखविणारें, त्याचे मावसे डॉक्टर रघुनाथदास, असिस्टंट सर्जन, यांचें त्यांनां खालीं लिहिल्याप्रमाणें पत्र आलें. "बेटा तीर्थराम, तूं घाबरूं नकोस ! धैर्याचा आश्रय कर. अध्ययन सोडून देऊं नकोस, कॉलेजांत पुनः

---

१. मर्जी. २. असें, हें. ३. तसें, तें. ४. मर्जीस येईल तर. ५. तलवार. ६. जुलमी. ७. शरीरापासून. ८. मस्तक. ९. प्रेमी. १०. तूंहि तसेंच ह्मण.

*मूळ हिंदी फारच जोरदार आणि हृदयंगम असल्यामुळें तें येथें देतों:—

"बस प्रभो ! अब राम तुह्मारा, और तुम रामके होलिये. रामका काम तो नित्य आपका स्मरण और आपकी मर्जीपर राजी रहना होगा, और आपका काम अब रामकी सर्व प्रकारकी सहायता करना होगा ! रामका शरीर उसका अपना नहीं रहा, बलकि सारा का सारा आपका होगया, होगया होगया ! ! ! अब चाहे रक्खो और चाहे मारो !"

ह्या सबंध प्रसंग वाचतांना सहृदय वाचकांच्या नेत्रांतून अश्रु आल्याशिवाय राहणार नाहींत, अशी आमची खात्री आहे.

दाखल हो. तुझ्या साहाय्यार्थ २०।२५ रुपये मी तुला दरमहा पाठवीत जाईन. एकंदोन खासगी शिकवण्याहि धर. पुढें शिकण्याची हिंमत व हौस सोडूं नको."*

याप्रमाणें आपल्या मावशाच्या आणि दुसऱ्या साहाय्यामुळें गुसांईजींनीं पुनः बी. ए. ची तयारी केली, आणि यावेळीं ते साऱ्या पंजाबांत पहिले आले, आणि पुढें एम्. ए. चा अभ्यास करण्यासाठीं त्यांनां एक मोठी फेलोशिप ( मासिक वेतन ) मिळाली. लगेच त्यांनीं आपलें नांव लाहोरच्या सरकारी कॉलेजांत दाखल केलें, आणि कांहीं कालपर्यंत फोरमन कॉलेजांत कांहीं वेतन न घेतां बी. ए. च्या वर्गाला ते गणित शिकवूं लागले. अशा रीतीनें परोपकार करीत असतां ते एम्. ए. च्या परीक्षेंत गणित विषयांत पहिले आले. यावेळीं त्यांचें वय सुमारें २२ वर्षांचें असावें.

**शारीरिक स्वास्थ्य व सामर्थ्य.**

वर वर्णन केलेली परिस्थिति, तिच्यामुळें झालेले मानसिक व शारीरिक क्लेश आणि त्रास, अतिशय नेटानें आणि कसून केलेला अभ्यास, या सर्वांचा गुसांईजींच्या शरीरावर बराच वाईट परिणाम झाला. एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यावर त्यांची शारीरिक स्थिति ( प्रकृति ) फारच बिघडली. अंगावरचें मांस नाहींसें होऊन सर्व हाडें दिसूं लागलीं. मान लांबट झाली, आवाज घोगरा झाला आणि त्यांनां नीट बोलतां येईना. एकंदरींत ते इतके अशक्त झाले, कीं, अशा अस्थिपंजरांत जीव कसा टिकाव धरून राहिला आहे, याचें सर्वांनां आश्चर्य वाटूं लागलें. अशी स्थिति प्राप्त झाल्यावर त्यांनीं ती सुधारण्याचें आणि शरीर सामर्थ्यवान् व बळकट करण्याचें मनांत आणिलें. त्यांनीं रोज व्यायाम सुरू केला आणि दुधाचा रतीब वाढविला. व्यायामाच्या नवीन नवीन पद्धति शोधून काढण्यांत त्यांनां फार मौज वाटे. मरणाच्या पूर्वी कांहीं मिनिटें ते व्यायाम घेत असतांना दृष्टीला पडले, असें सांगतात. जरी ते पंजाबी असत, तरी त्यांचें नेहमींचें अन्न म्हणजे भात आणि दूध हेंच असे. एका खेपेला ते पांच शेर दूध पिऊन टाकीत असत. हळुहळू त्यांची शरीर-प्रकृति सुधारत जाऊन शेवटीं ते फार सदृढ बनले. हिमालयाच्या पहाडांत रोज सुमारें ३०।४० मैल ते सहज चालून जात. कौपीन आणि बनात एवढ्या

*हे शब्द गरीब, होतकरू, आपत्तिग्रस्त अशा विद्यार्थ्यांनां अमृताहून मधुर लागतील, यांत शंका नाहीं.

सामुग्रीनें गंगोत्री, जम्नोत्री आणि बदरिनाथ हीं शिखरें ते चढून गेले. जम्नोत्रीहून गंगोत्रीस ते बर्फाच्या पर्वतांतून गेले. ते बर्फांत रहात असत आणि निर्जन भयंकर अशा गुहेंत एकटेच निजत असत. पावसाळ्यांत जोरदार प्रवाहांतून लोकांचीं गुरें त्यांनीं पैलतीराला पुष्कळदां नेल्यामुळें पहाडी लोक त्यांनां देव असें मानीत. मध्यरात्रीं आपलें आसन सोडून मृत्यु आणि भीति यांची पर्वा न करितां ते दाट जंगलांत हिंडत. अमेरिकेंत असतांना एकदां ते तेथील शिपायांबरोबर ४० मैलांच्या शर्यतींत गमतीनें धांवूं लागले आणि शर्यत जिंकणाऱ्या गड्याच्या आधीं दोन तास आले! सानफ्रान्सिसको येथें एकदां ते मोठ्या गडबडीनें ऐटींत जात असतां एका अमेरिकनानें त्यांनां हटकून विचारलें "काय राव! जणूं काय ही भूमि आपलीच आहे, अशा तोऱ्यांत आपण निघालांत?" "होय!" असें उत्तर देऊन ते पुढें चालले. सारांश, अशक्त, भितरा आणि कृश अशा या लाहोरच्या विद्यार्थ्याचें रूपांतर, निर्भय धीट, धाडसी, बळकट आणि तेजःपुंज अशा पहाडी मनुष्यांत झालें.

एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यावर गुसांईजी हे पंजाब विश्वविद्यालयातर्फें त्यावर्षीं विलायतेंत जाणार, अशी बातमी लाहोरांत पसरली. विलायतेंत जाऊन आपण काय करणार? असें जो तो गुसांईजींनां विचारूं लागला. "मी तेथें गेल्यास, अध्यापक किंवा उपदेशक होईन. सिव्हिल सर्व्हिस इत्यादि दुसऱ्या कोणत्याहि नोकरीविषयीं खटपट करणार नाहीं," असें त्यांनीं सर्वांनां उत्तर दिलें. सरकारी स्कॉलरशिप मिळवून व विलायतेस जाऊन गणित विषयांतील सर्वांत मोठी ह्मणजे रँगलरची परीक्षा द्यावी, असें त्यांच्या मनांत आलें होतें. पण असल्या लौकिक परीक्षा देऊन नुसते आंकडे मोडणारे रँगलर होण्यापेक्षां ते एक अलौकिक पुरुष व्हावे, असा ईश्वरी संकेत असल्यामुळेंच कीं काय, त्यांची पात्रता असूनहि स्कॉलरशिप त्यांनां न मिळतां ती दुसऱ्या एका मुसलमान विद्यार्थ्याला मिळाली.

**अध्यापन.**

गुसांईजींच्या मनांतील शिकविण्याची इच्छा येथेंच पूर्ण झाली. कांहीं कालपर्यंत ते स्यालकोटमध्यें हायस्कुलचे हेडमास्तर होते, आणि त्यानंतर सरकारी कॉलेजमध्यें प्रोफेसराचें काम त्यांनीं कांहीं दिवस केलें. पुढें त्यांच्या चित्ताची धार्मिक अवस्था आणि उदारता इतकी वाढली, कीं, सहासहा तास व्यवहारांत घालणें त्यांनां फार कठिण व असह्य वाटूं लागलें. तेव्हां त्यांनीं ओरिएन्टल कॉलेजांत एकदोन तास गणित आणि वेदान्त शिकविण्याची

नोकरी ( प्रोफेसरी ) स्वीकारिली. पण जेव्हां दोन तासहि व्यवहारांत घालणें कठिण जाऊं लागलें व चित्त परमार्थाकडे पूर्णपणें वेधलें, तेव्हां ह्मणजे सन १९०० च्या जुलईच्या सुमाराला तीहि नोकरी त्यांनीं सोडून दिली.

**कृष्णभक्ति.**

एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यावर कांहीं कालपर्यंत गुसांईजी श्रीकृष्णाचे परम भक्त होते. वेदान्तावर जरी त्यांचें प्रेम होतें, तरी त्यांचें मन श्रीकृष्णांच्या अनन्यभक्तींत बुडून गेलें होतें. त्यांनां कृष्णगीता आणि कृष्णलीला यांची फार आवड असे. कॉलेजच्या ग्रीष्मऋतूच्या तीन महिन्यांच्या सुटींत ते मथुरावृंदावन येथें जात, आणि सारी सुटी रासलीला पाहण्यांत घालवीत. कृष्णलीला पाहून त्यांच्या मनांत गुदगुल्या होत. या तीव्र भक्तीचा परिणाम असा झाला, कीं, त्यांनां केव्हांकेव्हां श्रीकृष्णांचें साक्षात् दर्शन होत असे. गुसांईजींनीं एकदां नारायणस्वामींनां असें सांगितलें, कीं, "आज आमचे प्रियकर गोपालकृष्ण यांनीं मी स्नान करीत असतां खूब दर्शन दिलें व अगदीं जवळ येऊन दृढालिंगन देऊन लगेच हातावर हात मारून गुप्त झाले." असा प्रसंग त्यांच्यांवर वारंवार येत असे. त्यांनीं आपलें सर्वस्व कृष्णार्पण केलें होतें; प्रत्येक कामना आणि प्रत्येक आशा श्रीकृष्णांच्या इच्छेवर व आज्ञेवर सोंपविली होती.

या कृष्णभक्तीच्या कालांत गुसांईजींनां लाहोरच्या सनातनधर्मसभेचे मंत्री ( सेक्रेटरी ) नेमण्यांत आलें. धर्मसभेच्या व्यासपीठावर श्रीकृष्णांविषयीं व्याख्यान देतेवेळीं, त्यांच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुपात होऊन त्यांचे कपडे प्रेमाश्रूंनीं भिजून जात; आणि त्यांच्या भक्तीचा जोर इतका कांहीं विलक्षण होता, कीं, सर्व श्रोतृवृंदांच्या हृदयांतहि कृष्णभक्ति पूर्ण भरून जात असे. अमृतसर येथें सनातनधर्मसभेच्या वार्षिक उत्सवांत गुसांईजींच्या भक्तिपूर्ण उपदेशानें आपल्या मनावर झालेला परिणाम नारायणस्वामी असा सांगतात, कीं, "गुसांईजींच्या कृष्णगीता आणि कृष्णलीला यांवरील व्याख्यानांनीं माझ्या मनावर जो कांहीं परिणाम झाला, तो अवर्णनीय आहे ! त्यावेळीं, श्रीकृष्णांचें आचरण प्रशंसनीय नाहीं, असें मी समजत होतों. त्यांची रासलीला आपणाला आवडत नव्हती. गीतेवर विशेष श्रद्धा नव्हती. अशी स्थिति असून गुसांईजींचीं प्रेमभरित व्याख्यानें ऐकतांच, गीता वाचावी, व कृष्णलीलांचा लक्ष्यार्थ समजून घ्यावा, असें मला वाटूं लागलें." या तीव्र भक्तीच्या कालांत गुसांईजींच्या

मनाची स्थिति कशी होती, हें त्यांनीं दिवाळीच्या दिवशीं आपल्या वडिलांनां पाठविलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें.

"लाहोर, २५ आक्टोबर सन १८९७.

महाराज,

चरणवंदना. आपलें कृपापत्र पोहोंचलें. अत्यंत आनंद झाला. आपल्या मुलाचें, रामतीर्थांचें शरीर विकलें गेलें, विकलें गेलें! आतां 'रामा'ला त्याचें माझें, असा भेद राहिला नाहीं. आज दिवाळीच्या दिवशीं माझें शरीर देऊन टाकिलें व महाराजांनां–भगवानांनां जिंकून घेतलें. आतां तुह्माला जें कांहीं पाहिजे, तें माझ्या मालकापासून मागून घ्या. ते तत्काळ तुह्माला देतील. एकदां निश्चय करून मागून तरी पहा. आज १९।२० दिवस झाले; माझें सर्व काम ते मोठ्या दक्षतेनें स्वतः करीत आहेत. मग आपलें कां नाहीं करणार? घाबरणें ठीक नाहीं. त्यांची ज्याप्रमाणें आज्ञा होईल, त्याप्रमाणें अंमलबजावणी होत जाईल. महाराज (भगवान्) हे आह्मां गोसाव्यांचें धन आहेत. आपलें खरें धन सोडून संसारांतील खोट्या कवड्यांच्या मागें लागणें, हें आह्मांला योग्य नाहीं, आणि त्या कवड्या मिळाल्या नाहींत, ह्मणून शोक करणें, हें तर फारच लज्जास्पद आहे. आपला अस्सल माल किंवा दौलत यांची मजा एकदां अनुभवूनतरी पहा!"

**द्वारकाधीश श्रीशंकराचार्य यांचा सहवास व अनुग्रह.**

याप्रमाणें गुसांईजींनीं आपला आत्मा परमेश्वराला अर्पण केल्यावर लगेच कांहीं दिवसांनीं द्वारकामठाचे स्वामी श्रीशंकराचार्य दैवयोगानें लाहोरास आले. ते ब्रह्मसूत्रें, उपनिषदें आणि वेदान्त इत्यादिकांत अति निपुण होते. त्यांची विद्वत्ता व स्वरूपनिष्ठा सर्वांनां महशूर होती. धर्मसभेचे मंत्री या नात्यानें त्यांची सेवा करण्याचा बराचसा भाग गुसांईजींच्या वांट्याला आला होता, आणि तो त्यांनीं प्रेमानें व प्रसन्नचित्तानें पार पाडला. गुसांईजींनीं केलेली सेवा पाहून वृद्ध शंकराचार्य इतके खूष झाले, कीं, गुसांईजींनां आपल्याबरोबर कांहीं दिवस ठेवून घ्यावें, असें त्यांनां वाटून ते एके दिवशीं हर्षानें असें ह्मणाले, कीं, "माझ्या या देशभर सर्व संचारामध्यें गुसांईजींसारखा भक्त व ब्रह्मविद्याजिज्ञासु अद्यापपर्यंत मला कोणीच भेटला नाहीं. आणि जर ते कांहीं कालपर्यंत आमच्याबरोबर राहतील, तर आह्माला फार आनंद होईल व तेहि निजानंदांत रंगून जातील."

हें आनंदाचें वर्तमान गुसांईजींनां समजलें, तेव्हां त्यांनीं ताबडतोब श्रीशंकराचार्यांबरोबर निघण्याची तयारी केली. कॉलेजची सुटी झालीच होती, आणि आणखी कांहीं अधिक दिवसांची रजा घेऊन ते श्रीशंकराचार्यांबरोबर निघाले. त्यांच्या काश्मीरच्या यात्रेंत गुसांईजी त्यांच्या मंत्र्याचें काम करूं लागले, आणि मोठ्या प्रेमानें मार्गांत त्यांची सेवाहि करूं लागले. या सेवेचा आणि सत्समागमाचा त्यांनां असा फायदा झाला, कीं, श्रीशंकराचार्यांपासून ब्रह्मसूत्रें आणि उपनिषदें यांवरील भाष्य त्यांनां उत्तम रीतीनें ऐकावयास आणि शिकावयास सांपडलें. श्रीशंकराचार्य हे त्यावेळीं सर्व हिंदुस्थानांत वेदान्त व संस्कृतभाषा यांमध्यें अद्वितीय आहेत अशी त्यांची ख्याति होती. गुसांईजींचें अंतःकरण शुद्ध असून प्रेम आणि श्रद्धा यांनीं युक्त होतें. त्यामुळें श्रीशंकराचार्यांच्या स्वानुभवपूर्ण उपदेशाचा आणि उपनिषत्कथांचा असा कांहीं परिणाम झाला, कीं, वेदान्तानें गुसांईजींच्या मनावर पूर्णपणें आपला पगडा बसविला आणि त्यांच्या प्रेमाचा गुलाबी रंग ज्ञानाच्या लाल रंगांत परिणत होऊं लागला. ज्ञानाची लाली चढूं लागतांच आपलें चित्त श्रीशंकराचार्यांनां अर्पण करून त्यांनां पूर्ण श्रद्धेनें आणि भक्तीनें परमगुरु असें मानून ते त्यांच्या आज्ञेनुसार वागूं लागले. अशा अवस्थेंत परत लाहोरास येतेवेळीं त्यांनां असा उपदेश मिळाला, कीं, "पहा, ही ज्ञानाची लाली आणि मस्ती आतां कमी होऊं देऊं नका, दिवसेंदिवस यांची वाढ करीत जा, आणि लालीचा रंग इतका चढूंद्या, कीं, तो फुटुन आंत बाहेर स्पष्ट दिसूं लागावा. ( अर्थात् संन्यासावस्था प्राप्त व्हावी. ) ही अंतिमावस्था पूर्ण प्राप्त होईपर्यंत अभ्यास सोडूं नये."

**आत्मसाक्षात्कार.**

हा उपदेश घेऊन गुसांईजी परत लाहोरास आल्यानंतर ते अहोरात्र वेदान्ताचें श्रवणमनन करूं लागले. नेहमीं त्यांच्या हातांत उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें असत. आतां मथुरावृंदावन येथें जाण्याऐवजीं ते हृषीकेश व हरिद्वार येथें एकान्तवासाकरितां जाऊं लागले. दिवसेंदिवस त्यांचें चित्त व्यवहारापासून निवृत्त होऊं लागलें. दरवर्षी ग्रीष्मऋतूच्या सुट्टींत आत्मानुभव प्राप्त करून घेण्यासाठीं हृषीकेश व तपोवन येथें ते राहूं लागले. दोनदां जाऊन आत्मसाक्षात्कार न होतां परत आल्यावर तिसऱ्या खेपेला दृढ निश्चयानें असा पण करून ते तपोवनास निघाले, कीं, आतां आत्मसाक्षात्कार घेतल्यावांचून लाहोरास परत येणें होणार नाहीं. तेथें मरण तरी येईल, किंवा उपनिषदांचें सार ( ब्रह्मानंद )

याचा अनुभव तरी येईल. याप्रमाणें निश्चय करून लाहोराहून हरिद्वारास आल्यावर एका आठवड्याच्या आंतच त्यांनीं आपला तीन महिन्यांचा पगार साधुसंत व गरीब यांच्या भोजनांत खर्च केला, व अशाप्रकारें निष्किंचन होऊन, नंगें शिर, नंगे पाय, हातांत उपनिषदें, या स्थितींत आत्मसाक्षात्कार घेण्याच्या दृढ निश्चयानें ते हृषीकेशास आले. तेथें एकदोन दिवस राहून, तेथून १० मैलांवर असलेल्या तपोवनामधील ब्रह्मपुरीच्या मंदिरासमीप आले, व गंगातटाकीं आसन घालून त्यांनीं असा संकल्प केला, कीं,

द्वारीं तुझ्या देवा घेतलें धरणें। येथून उठणें कैसें होय।
दरशन तुझें तरी एक होवो। ना तरी हा जावो प्राण माझा॥

आपल्या या निश्चयाचें वर्णन गुसांईजींनीं स्वतः असें केलें आहे, कीं,—

"बस्स, आतां एक सिंहासन, नाहींतर स्मशान! नागरिकांनो, आतां तुमचा लडका परत येणार नाहीं. विद्यार्थ्यांनो, आतां तुमचा गुरु परत येणार नाहीं. घरच्या आप्तांनो, तुमचा संबंध कुठपर्यंत टिकणार? बकऱ्याची मान कुठपर्यंत सुरक्षित राहील? सर्व संबंध नाहींसे होणार आणि तुमच्या सर्व उमेदींवर एकदम पाणी पडणार, किंवा सर्व जग 'रामा'च्या आनंदाच्या लहरींत बुडून जाणार. नाहींतर 'रामा'चें शरीर गंगेच्या लाटांच्या स्वाधीन होईल, शरीराचा नाश होईल. मेल्यावर प्रत्येकाचीं हाडें गंगेंत पडतातच. मला जर आत्मसाक्षात्कार झाला नाहीं, आणि देहभावनेचा एक बिंदु जरी शिल्लक उरला, तर माझीं हाडें व मांस जीवंतपणींच माशांनां मिळतील. रामाच्या चरणावर गंगा वाहूं लागली नाहीं, तर रामाचें शरीर गंगेवर जरूर वाहील!'

या भीष्मप्रतिज्ञेनंतर आपल्या अंतरावस्थेचें वर्णन पुढें गुसांईजींनीं असें केलें आहे:—

"नेत्र एकसारखा जलाचा वर्षाव करीत आहेत. थंड आणि लांब (दीर्घ) श्वास सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणें (पाण्याच्या) वर्षावाला मदत करीत आहेत. आंत झड लागली आहे आणि बाहेरहि जोराचा पर्जन्य पडत आहे. 'हे देवा,' असें मोठ्यानें रडून ओरडून ह्मणण्याबरोबरच, खालीं दिलेलें पद अंतःकरणापासून ह्मटलें गेलें:—

गंगा तेथों[1] सद बलहारी[2] जाऊं (टेक)
हाड चाम सब वारके फैंकू, यही फूल पताशा लाऊं॥ १॥

१. शेकडोंवेळां. २. बलिदान; अर्पण.

मन तेरे बंदरनको देदूं, बुद्धि धारामे बहाऊं ॥ २ ॥
चित्त तेरी मच्छली जब चावे, अहं गिरगुहा मे दबाऊं ॥ ३ ॥
पापपुण्य सबही सुलगाकार, यह तेरी जोति जगाऊं ॥ ४ ॥
तुझमें पडूं तो तूं बनजाऊं, ऐसी डुबकी लगाऊं ॥ ५ ॥
पण्डे जलथल पवन दशोंदिक्, अपने रूप बनाऊं ॥ ६ ॥
रमण करूं सतधारामें, नहीं तो नाम न राम धराऊं ॥ ७ ॥"

पुढें असें वर्णन आहे. "संध्याकाळचा समय. एका छोट्या पहाडावर ाला आहे. काय विलक्षण अवस्था ही! हा खेद किंवा शोक नव्हे. नककांतावाल्याचा—प्रापंचिकाचा हर्ष नव्हे. याला जागृदवस्था किंवा ै म्हणतां येत नाहीं. कदाचित् ही निशा (मस्ती, आनंद) असेल! दुनियेचा (प्राकृत) आनंद कांहीं नव्हे. किती रसपरिपूर्ण अवस्था ही!" सुमाराला त्यांनीं घरीं परत यावें, अशा मजकुराचें एक पत्र रामांच्या लें. लगेच त्यांनीं तें गंगेंत टाकून दिलें. त्यांचें मन पूर्ण विरक्त झाल्या- ण आतां कार्यसिद्धि झाल्यावांचून परत येणार नाहीं, अशा अर्थाचें त्र त्यांनीं लिहून पाठविलें. पुढें ज्या वेळीं आणि ज्या स्थळीं त्यांनां आत्म- साक्ष ार झाला, त्याचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे:—

अपरोक्षानुभूति. (आत्मसाक्षात्कार).

*"दाट अरण्य, नदीकिनारा, जंगली फुलांनां मोहोर आलेला. एकान्त स्थान. कांहीं उपनिषदें वाचून संपलेलीं आहेत. + + + + हे वाणी, या आनंदाचें वर्णन करण्याची ताकद तुझ्यामध्यें आहे काय? मी धन्य आहें, मी धन्य आहें! आवरणांमधून ज्या प्रियकराचे कधीं हात, कधीं पाय, व्हां डोळे, केव्हां कान, मोठ्या मुष्किलीनें दृष्टीला पडत असत, त्या प्रियकराचें ाज मला मनमुराद दर्शन आणि आलिंगन घडलें. मी नग्न, तोहि नग्न, छाती तीवर आहे. हे हाडाचामड्याच्या हृदया, तूं मधून उठून जा. हे भेददृष्टि, दूर ... दूर पळून जा. मीच प्रियकर आणि प्रियकर तो मीच!

---

१. किनारा. २. जाळून ३. ज्योति, वात. ४. बुडी. ५. पवित्र प्रवाहांत.

*१८९८ सप्टेंबर. संवत् १९५५, भाद्रपद पौर्णिमेच्या १।२ दिवस पूर्वींचा, हृषी- च्या तपोवनांत ब्रह्मपुरीच्या मंदिरासमीपचा हा वृत्तान्त आहे—नारायणस्वामी.

"हा विवाह आहे किंवा मृत्यु आहे? अश्रु कां बरें एकसारखे वर्षाव करीत आहेत? ही विवाहसमयाची झडी ( अश्रुधारा ) आहे, कीं, मरणसमयींचा शोक आहे? सर्वांत अखेरचा संस्कारहि झाला. वासनाहि मरून गेल्या. प्रकाशापुढें अंधकार जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें दुःख आणि दारिद्य हीं उडून गेलीं. चांगल्या वाईट कर्मांची बेडीहि तुटून गेली.

ठोठावी द्वार वाटे कुणि तरि निकरें, नाद जो कानिं आला,
बोले मी ' कोण रे तें ' ? परि न मज कुणीं दीधलें उत्तराला;
पाहें मी अंतरीं जों निरखुनि, तंव तें प्रेम हांसोनि बोले,
तें तूंची, ना दुजें; ज्या इतर गणुनियां चित्त उद्विग्न झालें.

"पूर्वी अवगत नसलेल्या तुर्यावस्थेंमधून उन्का* पक्ष्याप्रमाणें मीच स्वतः बाहेर निघालों. ज्याला पूर्वी मी 'तो' असें (तृतीयपुरुषीं) ह्मणत असें, तो आतां मीच (प्रथमपुरुषीं) बनलों. आतां तृतीयपुरुष गेला. ॐ हम्, ॐ हम्, मीच आहें, तूं नाहींस. आतां यापुढें सर्व वर्णन रद्द आहे. ॐ! ॐ! ॐ!!!

"अश्रूंची झडी आहे, कीं, दर्शनसुखाचा पर्जन्य ( वर्षासमय ) आहे? हे मस्तका, तुझें अस्तित्व आज सफल झालें. नेत्रांनों, तुह्मीहि धन्य झालां. कानांनों, तुमचा पुरुषार्थहि पूर्ण झाला. हें लग्न, हें ऐक्य धन्य आहे. व हा शब्दहि आज धन्य झाला! * * *

" अहंकाराची आणि बुद्धीची बाहुली जळून गेली. हे नेत्रांनों, तुमच्या काळ्या मेघाचा ( अश्रूंचा ) वर्षाव धन्य आहे. हे मस्त नयनांनों, तुमचा वर्षाव धन्य आहे!"

**अमरनाथची यात्रा.**

या आत्मानुभवानंतर गुसांईजी लाहोरास परत आल्यावर त्यांच्या मुखावर एका अलौकिक तेजाची छटा दिसूं लागली. त्यांनां पहातांच वासना गळून पडूं लागल्या, निर्जीव मनहि त्यांनां पाहून जीवंत आणि मस्त होऊं लागलें. त्यांनां भेटण्यास पुष्कळ लोक येऊं लागले. भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली. प्रपंचांत आतां त्यांचें मन रमेना. त्यांचा पगार येतांच एकदोन दिवसांत खर्च होऊन तिसरे दिवशीं कांहीं शिल्लक उरत नसे. अशा अवस्थेंत आतां

* याला इंग्रजींत Phœnix असें ह्मणतात. हा एक काल्पनिक पक्षी असून आपल्या राखेपासून पुनः जीवंत होतो, अशी आख्यायिका आहे. हा पक्षी अमरत्व चिन्ह आहे, असें मानतात.

१८९९ च्या ग्रीष्मऋतूच्या सुटींत ते अमरनाथच्या यात्रेसाठीं काश्मीरास गेले. श्रीनगरापासून काश्मीरापर्यंत सर्व रस्ता ते एका वस्त्रानेंच चालून गेले. अमरनाथमंदिराच्या गुहेंत कांहीं तास त्यांनीं नग्न काढिले. तेथून ते तेथस परत आल्यावेळीं ते निजानंद आणि शांति यांनीं इतके परिपूर्ण दिसले, कीं, त्याचें वर्णन करितां येत नाहीं. याचवेळेला नारायणस्वामींनां त्यांच्या समागमांत राहून त्यांच्या उपदेशानें आपल्या सर्व शंकांचें निरसन करून घेण्याची संधि सांपडली, आणि त्यांनां आपलें सर्वस्व अर्पण करून नारायणस्वामी त्यांचे शिष्य बनले.

**अलफ नामक उर्दू वर्तमानपत्र.**

यानंतर गुसांईजी थोडेसे आजारी पडले. त्यांतून बरे झाल्यावर उर्दू भाषेंत अलफ नांवाचें वर्तमानपत्र काढण्याचें ठरविलें. नारायणस्वामींनीं आपली सरकारी नोकरी सोडिली व ते या पत्राचे संपादक झाले. लाहोरचे एक भक्त लाला हरलालसाहेब कायस्थ यांनीं त्याला पैशाची मदत केली. या वर्तमानपत्रासाठीं एका छापखान्याचीहि व्यवस्था करण्यांत आली, व तोहि नारायणस्वामींच्या ताब्यांत देण्यांत आला. याप्रमाणें १९०० जानेवारीपासून 'अलफ' वर्तमानपत्र सुरू झालें. यांतील सर्व लेख गुसांईजींच्या हातचे असत. वाचकांवर झालेल्या त्या लेखांच्या परिणामाचें वर्णन करणें अशक्य आहे. पण स्वतः गुसांईजींच्या मनावर त्यांचा असा परिणाम झाला, कीं, तीनचार अंक छापून निघाले नाहींत, तोंच त्यांनीं आपली नोकरी सोडून परिवारासहित जंगलाची वाट धरिली. नारायणस्वामीहि लेखांची नकल करण्यासाठीं त्यांची सेवा करून सत्समागमाचा लाभ घेण्याकरितां त्यांच्याबरोबर गेले.

घरापासून स्टेशनपर्यंत व स्टेशनावरहि अपूर्व देखावा दृष्टीला पडला. ना जोडा, ना फेटा, अर्धें धोतर नेसलेलें व बाकीचें अर्धें खांद्यावरून पांघरलेलें, अशा स्थितींत वेड्या किंवा मस्त पुरुषाप्रमाणें गुसांईजी बाजारांतून चालले, आणि वैराग्य व त्याग यांविषयीं पदें म्हणत भक्तमंडळी भजन करीत पुढें चालली. सर्वांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. गुसांईजींच्या गळ्यांत पुष्पहार घातलेला असून वाटेंतहि ठिकठिकाणीं लोकांनीं त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली. स्टेशनच्या प्लॅटफार्मावर पुष्कळ मंडळी जमली, आणि तेथेंहि मोठ्या प्रेमानें अर्धातास भजन कीर्तन चाललें. गाडींत बसण्याच्या वेळीं सर्वांनां हुंदका आला आणि गुसांईजींच्या तर्फें नारायणस्वामींनीं खालीं दिलेलें भजन पंचम स्वरांत म्हटलें.

अल्वदा मेरी रयाँजी[2] ! अल्वदा
अल्वदा ऐ प्यारी रावी[3] ! अ
अल्वदा ऐ एहलेखान[4] !
अल्वदा मासूमे[5] नादां[6] !
अल्वदा ऐ दोस्तो दु अल्वदा
अल्वदा ऐ र्ण ! अल्वदा
अल्वदा बो तंदरीस[10] ! अल्वदा
ा ऐ खुबसो[11] तकदीस[12] ! अल्वदा
वदा ऐ दिल ! खुदा[13] ! ले अल्वदा
अल्वदा राम ! अल्वदा ऐ अल्वदा !

ाईजी, त्यांची अर्धांगी आणि मुलें*, नारायणस्वामी आणि यांशिवाय बरीच मंडळी निघाली होती. पण हरिद्वारच्या पुढें गेल्यावर बाकीची मंडळी मागें फिरूं लागली. शेवटीं, गुसांईजी आणि त्यांची मंडळी, नारायणस्वा आणि गुरुदास नांवाचे एक सद्गृहस्थ इतकेच लोक टिहरी गढवाल येथें आ टिहरीपासून दोन मैलांवर असलेल्या गंगेच्या तटावरील मुरलीधर शेटजींच्या सुंदर बागेंत गुसांईजी सुमारें एक वर्ष एकान्तवासांत राहिले. त्यांच्या अर्धांगीला, अंगांत नीट नसल्यामुळें तीन महिन्यांनंतर परत घरीं यावें लागलें. शेवटीं नारायणस्वामी आणि तूलाराम गुसांईजींबरोबर शेवटपर्यंत राहिले.

याप्रमाणें एकांतवास सेवन केल्यानें गुसांईजींचें चित्त पूर्ण निरासक्त आणि निजानंदांत मग्न झाल्यावर श्रीशंकराचार्यांच्या आज्ञेनुसार मुरलीधरशेटजींच्या बागेंत गंगातटाकीं, १९०१ सालीं, संवत् १९५७ पौष महिन्यांत त्यांनीं विद्वत्संन्यास घेतला. श्रीशंकराचार्य 'तीर्थ' संन्यासी असल्यामुळें गुसांईजींचें संन्यासनांव **रामतीर्थ** असें प्रसिद्ध झालें. पूर्वी गृहस्थाश्रमीं त्यांचें नांव याच्या उलट म्हणजे **तीर्थराम** असें होतें.

**संन्यास.**

---

१. नमस्कार. २. गणित. ३. इतिहास. ४. घरचे आप्तलोक. ५. बच्चे. ६. भोळे. ७. मित्र. ८. शत्रु. ९. ग्रंथ. १०. शिक्षा, उपदेश. ११. अपवित्र ( पाप ). १२. पवित्र ( पुण्य ). १३. ईश्वर.

*यावेळीं त्यांनां दोन मुलगे व एक मुलगी अशीं तीन अपत्यें होतीं. वडील पुत्राचें नांव मदनमोहन व धाकट्याचें नांव ब्रह्मानंद.

संन्यास घेतल्यावर पुढें सहा महिने ते तेथेंच एकांतवासांत राहिले, आणि नंतर १९०१ च्या जुलई महिन्यांत त्यांनीं उत्तरखंडाच्या यात्रेला प्रारंभ केला. ते प्रथम जमनोत्रीस गेले. तेथें एक महिना राहून नंतर तेथून १५।१६ मैल वर जाऊन वानरपुच्छ नामक सुमेरुपर्वताची यात्रा त्यांनीं केली. तेथून खालीं उतरून छायामार्गानें गंगोत्रीस ते २।३ दिवसांत आले. तेथें एक महिनाभर राहून बुढेकेदार व त्रिजुगीनारायण या रस्त्यांनीं ते बडेकेदारनाथ आणि बदरीनारायणपर्यंत आले. पुढें १९०१ च्या दिसेंबरांत आलमोराच्या वाटेनें ते खालीं उतरले. धर्ममहोत्सवाच्या प्रसंगीं त्यांनां अध्यक्ष निवडल्यामुळें ते मथुरेस आले व तेथें त्यांचीं व्याख्यानें लोकांनीं थंडी, वारा, रात्र इत्यादिकांनां न जुमानतां मोठ्या आवडीनें आणि उत्सुकतेनें ऐकिलीं. तंबू किंवा मंडप यांतील जागा पुरेनाशी झाल्यामुळें यमुनेच्या वाळवंटावर त्यांनां व्याख्यानें द्यावीं लागलीं. यानंतर ते आग्रा, लखनौ इत्यादि शहरांत उपदेश करीत फिरत राहिले. त्यांनीं नारायणस्वामींनांहि संन्यास देऊन सिंध प्रांतांत उपदेश करण्यासाठीं पाठविलें. पुनः चार महिन्यांनीं त्यांनां परत बोलाविलें. पुनः टिहरीमध्यें स्वामींची सेवा करण्याची आणि त्यांच्या समागमांत राहण्याची संधि नारायणस्वामींनां मिळाली. याच दिवसांत टिहरीच्या महाराजांची आणि स्वामींची भेट झाली.

**परदेशगमन.** १९०२ च्या जुलईच्या सुमाराला जपानांत एक मोठा धर्ममहोत्सव होणार आहे, अशी वातमी अनेक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. ती वाचून टिहरीच्या महाराजांनीं अशी इच्छा प्रदर्शित केली, कीं, स्वामी रामतीर्थांसारख्या विद्वान् आणि निजानंदांत रंगलेल्या महात्म्यांनीं तेथें जावें. स्वामींनीं तें कबूल केलें. स्वामी रामतीर्थ आणि नारायणस्वामी सन १९०२ च्या आगष्ट महिन्यांत कलकत्त्यास कुमसेन आगबोटींत बसले, आणि आक्टोबरच्या आरंभीं जपानास पोहोंचले. टोकियोस गेल्यावर धर्ममहोत्सवाची वातमी निवळ गप्प आहे, असें त्यांनां समजलें. तेथें थोडे दिवस राहून कॉलेजांत त्यांनीं एकदोन व्याख्यानें दिलीं, व ते तेथून अमेरिकेस गेले. तेथून त्यांनीं नारायणस्वामींनां यूरोप व आफ्रिका येथें जाण्याची, आणि आपण परत हिंदुस्थानांत येईतोंपर्यंत परदेशीं वेदान्ताचा प्रसार करीत राहण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणें नारायणस्वामी यूरोप, आफ्रिका, लंका, ब्रह्मदेश आणि चीन इत्यादि देशांत फिरत राहिले, व स्वामी अमेरिकेंत वेदान्ताचा

प्रसार करीत राहिले. त्यावेळीं तेथें वेदांताच्या बऱ्याच संस्था स्थापन झाल्या. स्वामी अमेरिकेंत असतांना तेथील संस्थानांचे अध्यक्ष त्यांचें दर्शन घेण्याकरितां दोनदां मुद्दाम आले होते. 'स्वामींनां कांहीं पाहिजे आहे काय ?' अशी त्यांनीं पृच्छा करितांच स्वामींनीं जें उत्तर दिलें, त्यावरून स्वामींचा त्याग कसा होता, हें स्पष्ट दिसतें. स्वामींनीं सांगितलें " 'रामा'ला कोणत्याच वस्तूची इच्छा नाहीं, मग तो मागणार काय ? सर्व दुनियेची दौलत आणि सर्व बादशाहांची बादशाहत 'रामा'ची आहे. 'राम' बादशहा तर बेपर्वा आहे, आणि सर्व बादशहांचा बादशहा आहे. याचना करण्याकरितां काय 'रामा'नें संन्यास घेतला आहे ? नाहीं !" स्वामी नेहमीं ह्मणत असतः—

*असति जे जगिं या पृथिवीपति,
मम पटावरचीं मुहरींच तीं !
डाव मी सहज टाकित जे पहा,
संधिविग्रह इथें दिसती अहा !

अमेरिकेंतील लोक रामावर इतके मोहित झाले होते, कीं, तेथें लोकांच्या आत्मिक क्षुधेच्या शांत्यर्थ रामाला दिवसांतून सहा सहा व्याख्यानें द्यावीं लागत. तेथील बरेचजण रामाच्या उपदेशाचे खरे भोक्ते झाले. इतकेंच नव्हे, तर रामाला तेथें बरेच लोक पैगंबर किंवा परमेश्वराचा अवतार मानूं लागले, व हरघडी रामाचें स्मरण करूं लागले. रामाची तसबीर अद्यापि कित्येक घरीं उच्चस्थानीं लटकलेली आढळून येईल. क्यालिफोर्नियांतील त्यांच्या व्याख्यानांसंबंधीं तेथील एका पत्रांत पुढील आशयाचें वर्णन आढळतें:— "हिंदुस्थानांत हिमालय पर्वतावर अतर्क्य ज्ञानवान् योगी आहेत, असें आह्मी आजपर्यंत ऐकत होतों; पण आज त्यांपैकीं एक प्रत्यक्ष आह्मांपुढें आहे. या स्वामींचें अगाध ज्ञान पाहून असें मनांत येतें, कीं, नव्या जगांतील ज्ञानाची किंवा सुधारणेची दिशा चुकीची असावी; कारण, या ज्ञानवृद्धींत एकहि रामतीर्थ निर्माण झाला नाहीं व पुढेंहि होण्याचीं चिन्हें अद्यापि दिसत नाहींत."

अमेरिकेंत दिलेल्या एकंदर व्याख्यानांतील सार पुढें दिल्याप्रमाणें होतें:—

( १ ) मनुष्यप्राणि हा प्रतिईश्वर आहे.

---

*बादशाह दुनियांके हैं मुहरे मेरी शतरंजके ।
दिल लगी की चाल है सब रंग सुलह व जंगके ॥

( २ ) सर्व जगताशीं ज्याचें तादात्म्य झालें आहे, त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व जग चाललेंच पाहिजे.

( ३ ) कायेनें अविश्रांत उद्योग करणें व मन शांत आणि प्रेममय करणें, हीच या जन्मांतील मुक्ति होय.

( ४ ) सर्वांशीं आपलें ऐक्य आहे, असा पूर्ण साक्षात्कार झाला, ह्मणजे चित्ताची समता प्राप्त होते.

( ५ ) रसायनशास्त्राचा जसा आपण अभ्यास करितों, तसा जगांतील सर्व धर्मग्रंथांचा आपण अभ्यास करावा, व प्रत्यक्ष अनुभव, हेंच एक शेवटचें मुख्य प्रमाण मानावें.

सुमारें दोन वर्षांच्या अवधींत स्वामींनीं अमेरिकेंत काय कार्य केलें, व अमेरिकन लोकांवर त्याचा काय परिणाम झाला, हें सर्व तपशीलवार सांगणें अशक्य आहे !

आगबोटींतून प्रवास करीत असतां बोटींतील अमेरिकन लोकांनां स्वामी अमेरिकनच आहेत, असें वाटे. अमेरिकेंत जाण्यापूर्वी जपानांत असतांना ज्या जपान्यांनां स्वामींच्या भेटीचा व संभाषणाचा लाभ मिळाला, ते नंतर ह्मणत, कीं, स्वामी अद्यापि आमच्या खोलींतच आहेत, असें आह्मांला वाटतें. त्यांचा उच्च व धवल भालप्रदेश आणि भगवा पोषाख पाहून आह्मांला आमच्या आवडत्या हिममय फूजिमा ज्वालामुखीपर्वताची आठवण होते. जपानांत असतां टोकिओ इंपीरियल युनिव्हर्सिटीच्या संस्कृत पाठशाळेचे प्रोफ़ेसर ताकाकुसु यांनीं 'पूर्णत्व पावलेले खरे हिंदी तत्त्ववेत्ते असे आपण काय ते हेच पाहिले,' असे स्वामींविषयीं उद्गार काढले. स्वामी इजिप्तमध्यें गेले, त्यावेळीं तेथील मुसलमान लोकांनीं त्यांचें उत्तम रीतीनें स्वागत केलें. त्या लोकांकरितां तेथील एका मशिदींत फारशी भाषेंत त्यांनीं एक व्याख्यान दिलें व तें त्या लोकांनां फार आवडलें.

अमेरिकेंत असतांना, तेथें एका गृहस्थानें स्वामींनां पुसलें, कीं, "रुपयांवांचून तुमचें कसें चालेल?" स्वामींनीं उत्तर दिलें, कीं, " 'रामा'ला कोणत्याहि वस्तूची गरज नाहीं. बरें, एकाद्या वस्तूची आवश्यकता असलीच, तर ती वस्तु आपोआप प्राप्त होते. कारण 'राम' सर्व दुनियेवर प्रेम करितो. अर्थात्, सारी दुनिया 'रामा'-वर प्रेम करिते. मग राम वाटल्यास अमेरिकेंत राहो, अगर हिंदुस्थानांत राहो, सर्व जग हें रामाचें घर आहे!"

१९०४ च्या अखेरीला स्वामी अमेरिकेहून हिंदुस्थानाला परत येण्यास निघाले. ते १९०५ सालीं येथें आले. आपल्यावरोबर त्यांनीं दोन कल्पना आणल्याः—( १ ) संसारयात्रेंत प्रत्येक हालचालींत व प्रत्येक शाखेंत चोख व्यवस्था पाहिजे. ( २ ) आणि सर्वांनीं मिळून एकजुटीनें काम केलें पाहिजे. संयुक्तप्रांतांतील पुष्कळ व्याख्यानांत त्यांनीं या दोन मुद्यांवर विशेष विवरण केलें. अमेरिकेंत व जपानांत शिकण्याकरितां जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी, ह्मणून स्वामींनीं बरीच खटपट केली, व या कामांत त्यांनां बरेंच यश आलें. अमेरिकेंत 'स्वामी राम सोसायटी' नांवाची संस्था स्थापन झाली असून तिचा हिंदी विद्यार्थ्यांनां बराच उपयोग होतो.

**नूतनसंस्था-स्थापन.**

याप्रमाणें यात्रा आटोपून स्वामी १९०५ सालीं परत आपल्या मातृभूमीस आले. हिंदुस्थानांत ते परत आल्यानंतर मथुरेस त्यांच्या कांहीं शिष्यांनीं व भक्तांनीं 'स्वामींनीं एक नवीन संस्था स्थापन करावी,' अशी सूचना केली. स्वामींनीं ही गोष्ट करण्याचें साफ नाकारिलें. हिंदुस्थानांतील कार्यकारी सर्व संस्था आपल्याच आहेत, आणि त्या संस्थांमधूनच आपण काम करूं, असें स्वामींनीं उत्तर दिलें. त्यावेळीं स्वामींनीं आनंदाच्या भरांत डोळे मिटले व सर्वांनां आलिंगन देण्याकरितांच जणूंकाय आपले बाहु पसरले. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले व ते वहात असतां स्वामींनीं खालीं दिलेले शब्द उच्चारिलेः—

"ख्रिश्चन, हिंदु, पारशी, आर्यसमाजी, शीख, मुसलमान, किंबहुना माझ्या प्रियकर इष्टदेवतेच्या–भरतभूमीच्या–अन्नामिठापासून ज्यांचीं हाडें, स्नायु, रक्त व मेंदु तयार झालीं आहेत, अशीं सर्व माणसें माझे बंधुच होत; नव्हे, ते माझा आत्माच होत! त्यांनां सांगा, कीं, मी त्यांचा आहें. मी सर्वांचा स्वीकार करितों. मी कोणालाहि वगळीत नाहीं. मी प्रेम आहें, प्रकाशकिरणांप्रमाणें प्रेम हें सर्व वस्तूंनां तेजोमय दीप्तीनें वेष्टिणारें आहे. खरोखर मी प्रेमाचा सागर व प्रेमाचें वैभव आहें. माझें प्रेम सर्वांवर सारखें आहे. जो कोणी या प्रेमसागरांत बुडी मारील, तो निःसंशय प्रेममय होईल. फार काय, जर कोणी शत्रुत्वाच्या भावानें येईल, तर त्यालाहि मी प्रेमानेंच मिठी मारीन. माझ्या प्रेमाचा ओघ असा अमोघ आहे, कीं, त्यांत शत्रुत्व पार बुडून जाईल!" यावरून स्वामींचें विश्वव्यापी प्रेम व निश्चल आत्मीय शांति, यांची उत्तम साक्ष पटते.

यानंतर कांहीं महिने स्वामी भरतखंडांत फिरले, आणि १९०५ नवंबरमध्यें नारायणस्वामींनां उत्तराखंडास येण्याची त्यांनीं आज्ञा केली. तपोवनापासून १५।१६ मैल असलेल्या व्यासाश्रमांत ते चारपांच महिने राहिले. भिक्षेची सर्व व्यवस्था काळीकंबळीवाले रामनाथजी यांनीं उत्तम ठेविली होती. या थोड्या कालांत स्वामींनीं पातंजलभाष्य, निरुक्त आणि सामवेद यांचें पठण केलें. पुढें टिहरीस येऊन तेथून ५० मैलांवर असलेल्या १२०००।१३००० फूट उंचीवरच्या वसिष्ठाश्रमांत ते राहण्यास गेले. त्यावेळीं टिहरीच्या महाराजांनीं सर्व सोय केली. रामनाथजींनीं आपल्याकडचा एक स्वयंपाकी दिला. वसिष्ठाश्रमांत भिक्षेची चांगली सोय नसल्यामुळें स्वामीजी व स्वयंपाकी दोघेहि आजारी पडले. ही बातमी ऐकून नारायणस्वामी तेथें गेले, तों स्वामीजी फार कृश आणि अशक्त झालेले आहेत, असें त्यांनां आढळून आलें. तेथील हवापाणी आणि भिक्षेचें अन्न फार वाईट असल्यामुळें त्यांनीं ती जागा सोडिली, व तेथून ६।७ मैलांवर दुसऱ्या ठिकाणीं ते राहूं लागले. तेथेंहि भिक्षा चांगली न मिळाल्यामुळें स्वामीजी अधिक कृश आणि अशक्त होत चालले. यानंतर आहार बंद करून दुधावरच ते निर्वाह करूं लागले.

**हिमगिरीवर आरोहण.**

पूरणसिंह, पंडित जगतराम आणि पंडित हरिशर्मा ही मंडळी स्वामींनां वसिष्ठाश्रमांत भेटण्यास आली होती. यावेळीं स्वामींनीं आहार बंद केला होता. अन्न सोडण्याचें खरें कारण माहीत नसल्यामुळें मंडळींनीं स्वामींनां फार आग्रह केला, तेव्हां स्वामी पुनः थोडेंथोडें अन्न सेवन करूं लागले. तेव्हां पुनः त्यांची प्रकृति बिघडत चालली. हें पाहून अन्न सोडण्याचें खरें कारण त्यांनां समजून आलें, व त्यांनीं पुनः या बाबतींत त्यांनां आग्रह केला नाहीं. नारायणस्वामी सहासात मैल दूर राहत असत; त्यांनांहि यावेळीं वसिष्ठाश्रमांत बोलावण्यांत आलें. पंडितजी हरिशर्मा, वाटेंतच आपण परततों, असें सांगत होते; पण पूरणजींच्या आग्रहानें व मदतीनें वसिष्ठाश्रमांत कसेबसे एक दिवस उशीरां पोहोंचले. जंगलांत राहणें त्यांनां आवडेना; त्यांनीं आपली घरची कर्मकथा सांगण्यास सुरुवात केली. शेवटीं स्वामींचा निरोप घेऊन ते लवकरच परतले. बाकी मंडळी एक महिनाभर तेथें राहिली, आणि शेवटीं जेव्हां मंडळीनें पाहिलें, कीं, तेथें वाईट अन्नापासून प्रकृति घडिघडी बिघडते, तेव्हां त्यांनीं स्वामींनां दुसऱ्या टिहरीसारख्या चांगल्या ठिकाणीं रहावें, अशी विनंति केली.

स्वामींनीं ती मान्य करून पुस्तकांची पेटी प्रथम खालीं पाठविण्याची व्यवस्था करण्यास नारायणस्वामींनां सांगितलें. पूरणजींची सुटी संपत आल्यामुळें ते व त्यांचे साथीदार लाहोरास परत निघाले. त्यांनां पोंचविण्यासाठीं स्वामी एक मैलभर आले. वाटेंत ते हळूच ह्मणाले, कीं, "आतां राम लवकरच गुंग ( मौनी ) होईल, आतां तुह्मींहि राम व्हावें. रामाचा पत्रव्यवहार व बोलणें भेटणें बहुतकरून अगदीं बंद होईल." हें ऐकतांच पूरणजी एकसारखे रडूं लागले. तें पाहून स्वामी धांवून दूर गेले आणि दिसेनातसे झाले. यावर पूरणजींनां अधिकच रडूं कोसळलें, व कांहीं वेळ रडण्याचा वेग त्यांनां आवरेना. बऱ्याच वेळानें ते शांत होऊन आपला मार्ग आक्रमूं लागले.

पुस्तकांची पेटी खालीं आणण्याची व्यवस्था करून नारायणस्वामी वसिष्ठाश्रमांत आले. कांहीं दिवसांनीं पुनः स्वामींच्या मनांत असें आलें, कीं, दोघांनीं टिहरीजवळच थोड्या अंतरावर निरनिराळ्या पर्णकुटिकांत रहावें. ५।६ मैलांवर मालिदेवल गांवाच्या जवळ एका खुल्या मैदानांत गंगातटाकीं स्वामींनीं आपणाला राहण्याची जागा पसंत केली, व त्यांच्याकरितां एक पर्णकुटिका बांधविण्यास सुरुवात झाली. तेथून तीन मैलांवर असलेली बमरोगी नांवाची गुहा नारायणस्वामींनीं स्वतःकरितां निवडली. तेथें रहाण्यास जात असतां नारायणस्वामींबरोबर स्वामीजी एक मैलभर गेले, आणि वाटेंत सांगूं लागले, कीं, "हें पहा बेटा, राम आतां लवकरच गुंग ( मौनी ) होईल. त्याचें शरीर कृश आणि दुर्बल झालें आहे, हें तुह्मी पाहतांच; दिवसेंदिवस तें कमजोर होत चाललें आहे, आणि चित्तवृत्तीहि दुनियेपासून इतकी निवृत्त होत चालली आहे, कीं, कोणत्याहि कामाला हात लावावा असें, वाटत नाहीं. रामाची लेखणी थोड्या दिवसांनीं बंद होईल, शरीरहि लवकरच जड, मूक आणि आळशी होईल; ह्मणजे लिहणें, वाचणें, बोलणें हें सर्व बंद होईल. आतां रामाचें शरीर खालच्या प्रदेशांत जाणार नाहीं, आतां त्याला गंगातट सुटणार नाहीं. जेथें जेथें रामाला आमंत्रण येईल, तेथें तेथें तुह्माला जावें लागेल, याकरितां हे प्यार! जा गुहेंत, खूब एकान्त सेवन कर, दररोज अस्सल रामांत—निजस्वरूपांत राहून राम बन; आणि वेदान्ताची सच्ची मूर्ति होऊन बाहेर पड. कोणत्याहि प्रकारचा शोक करूं नको, किंवा कसलीहि भीति बाळगूं नको. नेहमीं आपणामध्यें व आपणाजवळ राम आहे, रामाचें तनुमनोधन आपणच आहों, असें समज." हा हृदयद्रावक उपदेश ऐकतांना नारायणस्वामींच्या नेत्रांतून

अश्रु वाहूं लागले. नंतर स्वामींचा निरोप घ्यावा, ह्मणून ते स्वामीच्या पायांवर पडले. स्वामींच्या डोळ्यांतूनहि अश्रु आले व त्यांनीं नारायणस्वामींनां वर उठवून आलिंगन दिलें आणि पुनः सांगितलें, कीं, “ बेटा, घाबरूं नको, गुहेंत एकान्तांत राहून खूब अभ्यास कर, आत्मचिंतनांत रहा, स्वरूपस्थिति साध्य कर, लिहिला जाणारा लेख पूर्ण होतांच राम तुला बोलावील. मालिदेवलची कुटिका तयार झाल्यावर राम तेथें राहील, आठ आठ दिवसांनीं तूंहि तेथें बेशक येऊन रहा. रामाच्या देहापासून दूर रहावें लागतें, ह्मणून वाईट वाटून घेऊं नको. रामाच्या देहाच्या सेवेचा शोक करूं नको. रामाचें शरीर आतां बहुतेक जडवत् होणार आहे. आपल्या खऱ्या उन्नतीचा तूं आतां विचार कर. कोणाचें साहाय्य घेऊं नको, आपल्या पायांवर उभा राहाण्यास शीक, सर्व प्रकारांनीं वेदान्ताची मूर्ति—अस्सल वेदान्त हो. ”

**जलसमाधि.**

नारायणस्वामी वमरोगी गुहेंत येऊन केवळ पांच दिवस झाले नाहींत, तोंच स्वामींकडून एक दूत येऊन सांगूं लागला, कीं, ‘ ज़मून खुद मस्ती व तमस्सके अरूज ’ हा रामाचा लेख लवकरच पुरा होणार आहे. त्याकरितां येत्या रविवारीं आपण अवश्य यावें, आणि त्याची चांगली नक्कल करावी, ह्मणजे तो ‘जमानां’त किंवा दुसऱ्या पत्रांत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविण्यांत येईल. या संदेशाप्रमाणें नारायणस्वामी रविवारीं स्वामींकडे निघणार होते, पण एक दिवस आधीं ह्मणजे शनिवारीं संध्याकाळीं टिहरीच्या महाराजांच्या चपराशानें येऊन असें सांगितलें, कीं, ‘स्वामीजींचें शरीर गंगेंत वाहून गेलें आहे आणि हें कळविण्यासाठीं लोकांनीं मला आपल्याकडे पाठविलें आहे.’ हें ऐकतांच नारायणस्वामी टिहरीकडे धांवले आणि रात्रौ आठ वाजण्याच्या सुमारास तेथें पोहोंचले. सर्व लोक रुदन व शोक करीत होते. स्वामींचा स्वयंपाकी भोलादत्त भेटल्यावर त्यानें खालीं दिलेली हकीगत सांगितली:—

“ स्वामीजी आणि मी दोघे मिळून गंगास्नानाला गेलों होतों. मी लवकर स्नान करून गंगातटावर आलों. स्वामी व्यायाम करून नंतर गंगेंत स्नानार्थ घुसले. जोरानें वाहणाऱ्या ठिकाणीं जाऊन ते स्नान करूं लागले. पाणी स्वामींच्या गळ्याखालीं होतें. प्रथम एक बुडी मारून नंतर त्या तीव्र वेगाच्या ठिकाणींच बराच वेळ उभें राहून ते अंग चोळूं लागले. नंतर दुसरी बुडी मारतांना त्यांच्या पायांखालचा एक मोठा दगड घसरला आणि स्वामीजी एकदम खोल

पाण्यांत गेले. तेथें त्यांना उभें राहातां येईना, पाण्याचा तीव्र वेग त्यांना वाहून नेऊं लागला. तेव्हां पुढें ते एका मोठ्या भोंवऱ्यांत सांपडले. २।४ मनुष्यांची मदत मिळावी, ह्मणून मी इकडेतिकडे धांवत जाऊन ओरडूं लागलों. पण दुर्दैवानें त्या बागेंत तेव्हां कोणीहि नव्हता. त्यावेळीं टिहरीचे महाराज गंगोत्रीहून परत आले होते, त्यांचें स्वागत करण्यासाठीं सर्व लोक बाग सोडून टिहरीच्या बरेच बाहेर गेले होते. याकरितां पुष्कळ हांका मारिल्या, तरी कोणीहि मनुष्य सांपडला नाहीं. मी घाबरून जेव्हां इकडेतिकडे धांवत ओरडूं लागलों, तेव्हां भोंवऱ्यामधून स्वामींनीं असें ओरडून सांगितलें, कीं, "प्यारे! घाबरूं नको, मी निसटण्याचा यत्न करीत आहें, लवकरच तुझ्यापाशीं येतों." १०।१५ मिनिटें बाहेर येण्याचा स्वामींनीं प्रयत्न केला, पण ते भोवऱ्यांतून बाहेर निघेनात. बाहेर निसटण्याचे प्रयत्न सफल होत नाहींत, असें पाहून स्वामींनीं त्या भोंवऱ्याच्या आंत मोठ्या जोरानें बुडी मारिली; त्याबरोबर ते भोंवऱ्यापासून वीस पावलें (३० फूट) अंतरावर बाहेर निघून मध्यप्रवाहावर आले. त्यांचें शरीर आधींच कृश व दुर्बल झालेलें होतें, आणि त्यांत बाहेर निसटण्याच्या प्रयत्नामध्यें भोंवऱ्यानें त्यांचें सारें बळ खर्च केल्यामुळें प्रवाहाच्या मध्यावर येतांच त्यांचा दम तुटून गेला आणि तोंडांत पाणी जाऊं लागलें. हाहि तट नाहीं व पलीकडचाहि तट नाहीं, प्रवाहाच्या जोरानें ते खालीं वाहत चालले. शरीर परवश झाल्यावर स्वामींनीं एकदोनदां प्रणवोच्चार केला, आणि खालीं वाहून जात असतां त्यांनीं हातपाय जवळ आणिले (आणि आसन घातलें). शेवटीं सुमारें २०० गजांच्या अंतरावर पर्वताच्या एका गुहेंत त्यांचें शरीर दडपलें गेलें. इतक्यांत तोफांचा आवाज कानीं पडला. टिहरीच्या महाराजांच्या स्वागतार्थ तोफांची सलामी त्यावेळीं सुरू झाली. दोन्ही कार्यें तोफांच्या सलामीनें साधिलीं. याप्रमाणें स्वामींच्या शरीराचें तिरोधान झालें."

हा शोचनीय वृत्तान्त ऐकतांच नारायणस्वामींचें हृदय फाटून गेलें. ही सर्व हकीगत त्यांच्या गैरहजीरींत घडलेली होती. नानाप्रकारचे कुतर्क, शंका त्यांच्या मनांत येऊन दुःख देऊं लागल्या. त्यांच्या मनांत असें येऊं लागलें, कीं, रामाच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या शरीराचा त्याग होणार नाहीं; रामाची इच्छा आणि आज्ञा प्रबल व अनुल्लंघनीय आणि पाण्याचा वेग तर जड. राम सर्वदा ह्मणे, कीं, 'मीच मृत्यु आहें, मला तो कसा येणार? रामाचा संकल्प पुरा

झाल्यावर तो येईल. पण आतां घडलेला प्रकार तर अगदीं उलट दिसत आहे.' स्वामीजींच्या निवासस्थानाकडे जातांच नारायणस्वामी अश्रूंनीं भिजून गेले. आंत जाऊन पेटींतील लेख वगैरे पाहण्यास त्यांचें मन धजेना. गांवांत जावें, तर सर्वत्र शोकचर्चा चाललेली होती, आणि ती ऐकणाराचें मनहि शोकातुर होऊन जात असे. याप्रमाणें नारायणस्वामींची स्थिति वेड्याप्रमाणें होऊन ते गंगातटाकीं जंगलांत फिरूं लागले. स्वामींच्या कांहीं वचनांच्या उलट प्रतीति आल्यामुळें जितकें त्यांनां दुःख झालें, तितकें त्यांच्या जलसमाधी-पासून झालें नाहीं. कारण, संन्यास घेतल्यावर स्वामीजींनीं पुष्कळदां सांगितलें आणि लिहलें होतें, कीं, "रामाच्या इच्छेविरुद्ध त्याच्या शरीराला कधींहि मृत्यु यावयाचा नाहीं."

याप्रमाणें नारायणस्वामी शोकग्रस्त होऊन वेड्याप्रमाणें फिरत असतां पूरणजी तेथें आले आणि तेहि सांगूं लागले, कीं, "रामांची अशा प्रकारची जलसमाधि त्यांच्या कांहीं वाक्यांनां आणि लेखांनां खोटें करूं पहात आहे, त्यामुळें त्यांच्या दुसऱ्या वाक्यांवर भरंवसा ठेवण्यास मन धजत नाहीं." याप्रमाणें व दुसरें कांहीं भाषण झाल्यावर, नारायणस्वामींनीं स्वामींचीं पुस्तकें व कागदपत्र पाहिले नाहींत, आणि ज्या लेखाची नक्कल करण्यासाठीं त्यांनां बोलाविलें होतें, तो लेखहि पाहिला नाहीं, असें पुरणजींनां कळून आलें. ते दोघे मिळून त्या रात्रींच रामाच्या आश्रमांत गेले आणि दुसरे दिवशीं उजेडल्यावर सर्व कागदपत्र लक्ष्यपूर्वक चाळून पाहूं लागले. कांहीं खुले कागद पाहून झाल्यावर नारायणस्वामींनां ज्याची नक्कल करण्यासाठीं बोलाविलें होतें, तो लेख हातांत आला. तो त्यांनीं वाचण्यास आरंभ केला. पानां[illegible] अंकहि घातलेले नव्हते. एकदोन पानें उलटल्यावर दुसरें एक सुटें पान त्यांच्या हातीं आलें. त्यावर खालीं दिलेला उर्दु भाषेंत लिहिलेला लेख होताः—

"ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र, गंगा, भारत! हे मृत्यो, माझा हा एक देह बेशक घेऊन जा. मला त्याची पर्वा नाहीं. मला दुसरे देह कांहीं कमी नाहींत. चंद्राच्या शुद्ध किरणांचें रौप्यमय शरीर धारण करून मी मोठ्या चैनीनें फिरेन. पहाडीं नदीनिर्झरांच्या वेषानें मी गीत गात फिरेन. समुद्राच्या लाटांच्या पोषाखानें मी नाचत फिरेन. आनंदयुक्त मंद किंवा चंड शीतल वायु मीच आहें. माझीं हीं सर्व रूपें बदलणारीं आहेत. या रूपानें मी पहाडांतून खालीं आलों, मृतांनां उठविलें, निजलेल्यांनां जागें केलें, कित्येकांच्या सुंदर तोंडांवरील

बुरखे काढले आणि कित्येक दुःखितांचे अश्रु पुसले; गुलाबांनां हंसविलें आणि बुलबुलांनां गावयाला लाविलें; त्यांनां स्पर्श केला, यांनां स्पर्श केला, येथें गेलों, तेंथें गेलों, बरोबर मीं कांहीं ठेविलें नाहीं, आणि कोणाच्या हातीं मी सांपडलों नाहीं. ”

शेवटच्या ओळीखालीं एक मोठी, लांब रेघ ओढलेली होती.

ह्या लेख वाचून त्या दोघांचे संशय, कुतर्क पार मावळले, आणि मन थाऱ्यावर आलें; आणि रामाच्या शरीराचा अंत झाला आहे हेंहि ते विसरले. पेटी खोलून सर्व पुस्तकें, लेख, कागदपत्रें ते पाहूं लागले. इंग्रजींत लिहिलेले लेख व उपदेश एकत्र करून सात भागांत वाटण्यांत आले.*

आपल्या लेखणीनें मृत्यूला आमंत्रण केलेला लेख खुल्या कार्टींत स्वामींच्या मेजावर होता. हा लेख केव्हां आणि कोणीं मेजावर ठेविला ? असें स्वयंपाक्यास विचारितां त्यानें सांगितलें, कीं, “स्नान करण्यापूर्वीं कांहीं तास स्वामीजी या कागदावर कांहींसें लिहीत होते. जेव्हां हा कागद स्वामींच्या हातांत होता, तेव्हां त्यांचें मुख लाल, मस्त ( आनंदी ) आणि चकाकत होतें. डोळ्यांतून मोत्यांप्रमाणें अश्रु पडत होते. हा लेख लिहीत असतांना शरीर बिलकूल हालत नव्हतें, त्यावेळीं ते इतके ध्यानयुक्त होते, कीं, त्यांनां दुनियेची बिलकुल खबर नव्हती. मी कितीतरीवेळ त्यांचेजवळ उभा राहिलों, पण त्यांनीं माझ्याकडे पाहिलेंसुद्धां नाहीं. अकरा वाजावयास आल्यावर भिक्षा तयार आहे, म्हणून वर्दी देण्यासाठीं मी पुनः आलों. त्यावेळीं ते अगदीं समाधिस्थ होते. लेखणी आणि कागद हातांतून सुटून पडलेले होते. मीं हलक्या आवाजानें म्हटलें, कीं, ‘भगवन्, भिक्षा तयार आहे.’ मला कांहींच जबाब मिळाला नाहीं. कांहीं वेळ गेल्यावर मी फिरून जोरानें सांगितलें, कीं, ‘महाराज, भिक्षा आपली वाट पहात आहे.’ या खेपेस आवाज ऐकून स्वामींनीं डोळे उघडून मला विचारलें, कीं ‘बेटा, काय म्हणतोस ?’ मीं प्रार्थना केली, कीं, ‘महाराज, भिक्षा तयार आहे, आपली आज्ञा व्हावी. स्नानाकरितां पाणी वर आणूं, कीं, आपण गंगातटाकीं जाऊन स्नान करणार ?’ ते हांसून बोलले, कीं, ‘तूं आतांपावेतों कांहीं खाल्लें आहेस किंवा नाहीं ?’ मीं उत्तर दिलें—‘मीं कांहीं खाल्लें

* हे सातहि भाग तीन व्हाल्यूमम्सध्यें दिल्लीचे लाला अमीरचंद यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

नाहीं, मी आज गंगास्नान करून नंतर खाईन.' माझें उत्तर ऐकून स्वामी हंसून *आश्चर्यानें ह्मणाले 'बेटा, आज तुझ्या स्नानाचें कारण काय? गंगास्नान करून नंतर तूं आज कां भोजन करणार आहेस?' मीं सांगितलें 'महाराज, आज मोठी पर्वणी आहे. प्रथम आज दिवाळी आहे; दुसरें, आज संक्रान्त; तिसरें, आज अमावास्या आहे. यासाठीं मी आज स्नानोत्तर भोजन करणार.' व्यायाम करतेवेळीं स्वामीजींच्या पायांला थोडीशी जखम झालेली होती, याकरितां दोनचार दिवस गंगाजल वर आणवून ते स्नान करीत. माझें उत्तर ऐकून, वर पाणी आणवून स्नान करणें त्यांनां उचित वाटलें नाहीं. ते ह्मणाले 'अच्छा प्यारे, आज रामहि गंगातटावर जाऊन स्नान करील. चल, आम्ही दोघे मिळून जाऊं.' याप्रमाणें आह्मी दोघे मिळून गंगा-स्नानाला [illegible] स्वामीजी तटावर जातांच व्यायाम करूं लागले आणि मी कपडे काढून त्यांच्या [illegible] लागलों. स्नान करून मी तटावर येऊन बसलों आणि स्वामीजी स्नाना[illegible] जीवाचा दि[illegible] उतरले आणि वर सांगितल्याप्रमाणें भोवऱ्यांत सांपडून राहून [illegible] होऊन [illegible] अंतः

[illegible] वें हकीगतीवरून असें दिसतें, कीं, लेख लिहितेवेळीं नां [illegible] त्या [illegible] ते दुर्बल, शिथिल आणि असमर्थ झालें असल्यामुळें स्वामीजींचें [illegible] आला असावा, आणि त्यांनीं मृत्यूला पाचारण करून त्यांनां त्याचा के[illegible] आ[illegible] जाण्यास सांगितलें असावें. आणि त्यांचें मन आपल्या आपलें शरीर घेऊन [illegible] मग्न, तृप्त, मस्त आणि लीन होऊन गेलें होतें, कीं, आनंदस्वरूपांत इत[illegible] करणें त्यांनां विषम व हानिकारक वाटूं लागलें असावें. पुनः शरीराचें रक्षण [illegible] आपलें शरीर उडवून टाकण्यास आज्ञा केली. ज्याप्रमाणें म्हणून त्यांनीं मृत्यूला [illegible] श्रीशंकराचार्यांनीं आपलें शरीर हिमालयांत जाऊन बर्फांत फेंकून दिलें, त्याप्रमाणें स्वामीजींनीं आपलें शरीर गंगेस अर्पण केलें असावें. पण पाण्यांत शरीराच्या बचावासाठीं स्वामीजींनीं बराच वेळ यत्न केला, या गोष्टीनें वरील विधान चांगलेंसें सिद्ध होत नाहीं. वाचकांनीं पाहिजे तें अनुमान काढावें, असें नारायणस्वामी स्वामीजींच्या हिंदी जीवनचरित्रांत लिहितात. असो.

---

* टिहरीच्या पहाडावर ब्राह्मणलोक रोज गंगास्नान करीत नाहीत. थंडीच्या दिवसांत तर कित्येक दिवसांनंतर—महिन्यांनंतर—पर्वणीच्या वेळींच गंगास्नान करितात. याकरितां स्वयंपाक[illegible]याची स्नानाची वार्ता ऐकून स्वामींनां आश्चर्य वाटलें.

याप्रमाणें स्वामीजींचा उपकारक देह दिवाळीच्या दिवशीं, १७ आक्टोबर १९०६, संवत् १९६३ कार्तिक अमावास्या दुपारीं, टिहरीच्या महाराजांच्या सिमलासू बागेच्या खालीं भृगुगंगेंत वाहून गेला आणि सर्वांनां कायमचा अंतरला!

एक आठवड्यानंतर स्वामीजींचा देह फुलून पाण्यांतून बाहेर आला. तो जेव्हां किनाऱ्यास लागला, तेव्हां तो समाधिस्थच होता, असें दिसत होतें. दोन्ही हात छातीवर, एक दुसऱ्यावर ठेविलेला आणि मांडी घातलेली, असा दृष्टीला पडला. मान सरळ होती. प्रणवोच्चार करतेवेळीं तोंड जसें उघडावें, तसें तोंड उघडलेलें होतें. तो प्रणवोच्चार जणूंकाय अद्यापि चाललाच आहे! आठ दिवसपर्यंत त्यांचा देह जलचरांपासून सुरक्षित होता, हें पाहून सर्वांनां आश्चर्य वाटलें व स्वामींच्या शिष्यमंडळींनीं आपलें सुदैव मानिलें. बाहेर आल्यावर तो पवित्र देह एका पेटींत घालून संन्यासविधीप्रमाणें गंगेंत सो! ? अ[illegible]ा आणि गंगेनें आपल्या प्रियकराला आपल्यामध्यें कायमचें मिळवून [illegible]ीं तास [illegible]

[illegible]मींच्या हातांत [illegible]

स्वामीजींवर अत्यंत प्रेम करणाऱ्या टिहरीच्या [illegible]ाकत होतें. [illegible]जेव्हां हें वर्तमान समजलें, तेव्हां त्यांनीं दीपावलीचा उत्सव [illegible]ना शरीर [illegible] पुढें स्वामीजींचा देह पेटींत घालून गंगेंत सोडण्याच्या वेळीं [illegible]ां दुनिये[illegible] [illegible]सुटी दिली. याप्रमाणें जेथेंजेथें हा शोकसमाचार समजला, [illegible]राहिलों सभा होऊन दुःख प्रदर्शित करण्यांत आलें! [illegible]र भि[illegible]

स्वामी ब्रह्मरूपीं लीन होऊन गेल्याबद्दल आह्मीं दुःखी अथवा खेद तरी कां करावा? आपण स्वतःच्या प[illegible]ायांवर उभें राहिलें पाहिजे, व 'रामा'चा सदुपदेश प्रत्येक[illegible] रोमरोमांत धारण करून सर्व दुनिया हालवून सोड[illegible]याची शक्ति अंगीं आणिली पाहिजे. ज्यांचें स्वामींवर यत्किंचित्‌हि प्रेम असेल,

**स्वामींचें अंतर्यामीं दर्शन.**

त्यांनीं रामासारखें होऊन त्यांच्या देहान्तामुळें झालेलें भरतखंडाचें नुकसान भरून काढावें, हें त्यांनां उचित आहे. जीवंत असतां[illegible]नाहि स्वामींची अशी इच्छा होती, कीं, लोकांनीं आपलें दर्शन स्वतःमध्यें ह्म[illegible]णजे अंतर्यामीं घ्यावें. आतांहि त्यांची तशीच इच्छा आहे. आणि जर लो[illegible]क अंतर्यामी रामाला पाहण्यास शिकतील, तर ठिकठिकाणीं त्यांनां त्यांचें दर्शन घडण्याजोगें आहे. स्वामी अमेरिकेहून परत आल्यानंतर त्यांनां भेटण्या[illegible]ची त्यांच्या वडिलांची इच्छा होती. याकरितां त्यांनीं पूरणजीकडून 'भेटण्[illegible]याची इच्छा आहे, कुठें

येऊन भेटावें ?' अशी तार दिली. स्वामींनीं जबाब पाठविला, कीं, 'He must see me within himself—त्यांनीं स्वतःमध्यें मला पहावें.' पित्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या आंत-अंतर्यामीं आपलें दर्शन घ्यावें, अशी स्वामींची इच्छा होती.

**स्वामींचा सहवास.**

स्वामी रामतीर्थ यांच्या परलोकवासानें भरतभूमींतील एक अत्यंत तेजस्वी रत्न दृष्टीआड झालें आहे. अखिल जगाला मार्गदर्शक होण्याजोग्या भरतखंडांतील सर्व प्राचीन साधुसंतांचें तेज या पुण्यपुरुषांत जणुं एकवटून चमकत होतें. यांच्यासारखे प्रतिभासंपन्न, आत्मसाक्षात्कारी प्रभूचे प्रेषित अद्यापि भरतभूमींत उत्पन्न होतात, हें पाहून भरतभूमीच्या उदयाविषयींची आशा दुणावते. स्वामींची भेट घेणें ह्मणजे नूतन जीवनकला प्राप्त करून घेण्यासारखें होतें. त्यांच्या सहवासांत कोणाच्याहि क्षुद्र मनोवृत्ति एकदम विरून जाऊन जीवाचा दिव्य ईश्वरी तत्वांत संचार होत असे, नवीन विचारांचा उदय [illegible]न [illegible] अंतःकरणांत नवीन मनोवृत्ति उचंबळूं लागत, सहानुभूति किंवा दया[illegible] होत असे, उदात्त व पुण्यकारक विचारांचा शीतल वायु वाहूं लागून [illegible]ा ताप कमी होत असे, आणि स्वर्गीय सौख्य, चिरंतन शांति आणि अवर्ण[illegible]ख आनंद यांचा लाभ होत असे. हृदयांतील ईश्वरविषयक शंका, तर्क, वितर्क, नानातऱ्हेचीं मतें यांनां कायमची रजा मिळे आणि या सर्वांचें रूपांतर, आपल्या आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं अचल श्रद्धा आणि दृढ विश्वास यांत होत असे.

**उल्हासी मुद्रा.**

स्वामी सदा हंसतमुख असत. कोणत्याहि गोष्टीनें या त्यांच्या वृत्तींत फरक पडत नसे. अमेरिकेंतील ग्रेट पॅसिफिक रेलरोड कंपनीच्या मॅनेजरानें स्वामींनां स्टेशनावर पाहिलें, तेव्हां 'यांचें हास्य अत्यंत मोहक आणि हृदयाकर्षक आहे,' असें ह्मणून स्वामींनां गाडीचें दार स्वतः उघडून दिलें. सेन्ट लुई येथील प्रदर्शनाच्या वेळीं झालेल्या सर्व धार्मिक व्याख्यानांसंबंधीं लिहितांना तेथील पत्रांनीं "स्वामी हे सभेचे मुख्य दीप होत !" असें ह्मणून त्यांच्या तेजोविशेषाचें कौतुक केलें होतें. स्वामी नेहमीं प्रसन्नचित्त असत. संभाषणामध्यें कोणीं कांहीं

प्रश्न केले, किंवा कांहीं शंका प्रदर्शित केल्या, तर उत्तरादाखल ते कांहीं मिनिटें खदखदां हंसत. जणूंकाय आपली उत्साही आणि प्रसन्न मुद्रा, आपली सुभग आत्मप्रतीति हींच मनुष्यविषयक व ईश्वरविषयक सर्व प्रश्नांनां पुरेशीं उत्तरें आहेत! रामाचें खदखदां हंसणें हें विजेप्रमाणें प्रश्नकर्त्यांचें अंतःकरणद्वार उघडीत असे, आणि त्यांत आपला प्रकाश भरून टाकीत असे. जर कोणी विरुद्ध मताचा शत्रु ह्मणून समोर आला, तर तो मित्र होऊन जात असे, आणि जे प्रतिस्पर्धी ह्मणून वादविवादाला येत, ते भक्त होऊन स्तुति करण्याकरितां रहात असत. १९०२ फेब्रुआरीमध्यें स्वामी फैजाबाद येथें असतांना तेथील एक वडे मौलवीसाहेब कांहीं एका मुद्द्यावर स्वामींशीं वादविवाद करण्याकरितां—नव्हे लढण्याकरितांच—आले होते; पण जेव्हां दोनचारदां दोघांची नजर एकमेकांकडे गेली, तेव्हां मौलवीसाहेबांची लढण्याची तब्बेत कोठें गेली कोण जाणे! मौलवीसाहेबांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले आणि हात जोडून ते ह्मणाले, कीं, "हे राम! मी तुला याप्रमाणें पूर्वीं जाणत नव्हतों! आतां माझा गुन्हा माफ कर." याप्रमाणें बोलून ते कांहीं वेळ तेथेंच नमले आणि स्वामींचीं प्रेमपूर्ण वचनें ऐकून आनंदित होत्साते परत घरीं गेले.

**रामबादशहा.**

स्वामींचें उपदेशामृत ऐकून लोक रोमांचित होत असत. लोक त्यांनां 'रामबादशहा' असें ह्मणत. कारण, त्यांनीं आपल्या नेहमींच्या आनंदी आणि प्रसन्न वृत्तीनें पृथ्वीवरील राजांचें वैभव तुच्छ केलें होतें. एकदां स्वामींनीं लिहिलें होतें "मी राम बादशहा आहें आणि तुमचें अंतःकरण हेंच माझें सिंहासन होय. मीं जेव्हां वेद शिकविले, कुरुक्षेत्र, मक्का आणि जरुसलेम येथें धर्मोपदेश केला, त्या वेळीं लोकांनां त्याचा नीट अर्थ समजला नाहीं. मीं आतां पुनः आपलें काम सुरू केलें आहे. माझा शब्द तोच तुमचा शब्द आहे. 'तत्त्वमसि'— जें कांहीं तुह्मी पहातां, तें सर्व तुह्मीच आहां. वस्तुतः तुह्मी स्वतंत्र आहां. हें तुमचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचें या पृथ्वीवरील कोणाहि राजाला सामर्थ्य नाहीं. 'सत्य त्रिकालाबाधित असतें,' हा सिद्धान्त आहे. घाबरून मूर्च्छित होऊं नका. माझें मस्तक तुमचेंच मस्तक आहे. मर्जीस येईल, तर तें तोडा; पण त्यामुळें एकाच्या जागीं हजारों मस्तकें उत्पन्न होतील, हें लक्ष्यांत ठेवा!"

**स्वामींची भक्ति.**

हल्लींच्या आणि भावी मानवजातीच्या विश्वसंवेदनेंत आपणांला पूर्णपणें लीन करून घेण्याची या नरपुंगवाची उत्कट इच्छा होती. हा त्यांचा प्रयत्न त्यांनीं केलेल्या कांहीं इंग्रजी कवितांत दिसून येतो. स्वामींच्या अल्पायुष्यामधील ही मोठीच कामगिरी होय. पूर्ण साक्षात्कार करून घेण्याकरितां अहोरात्र त्यांची खटपट चालू असे. जेथेंजेथें त्यांची दृष्टि जाई, तेथेंतेथें त्यांना ईश्वर दिसे. ते उत्तम ज्ञानी भक्त होते. त्यांचें मन व बुद्धि हीं सुसंस्कृत झालीं होतीं. त्यांच्यामध्यें सर्वश्रेष्ठ मनोवृत्तींचा पूर्ण विकास झाला होता. रावीनदीच्या कांठीं मनाची एकाग्रता, ध्यान किंवा योग यांचें साधन करण्यांत त्यांनीं बऱ्याच रात्री काढिल्या होत्या. कित्येक रात्रीं प्रेमाश्रूंच्या पूरानें त्यांच्या बिछान्याची चादर अगदीं भिजून जात असे. सनातनधर्मसभेंत ' कृष्ण ' अगर ' भक्ति ' या विषयांवर पूर्ववयांत व्याख्यान देतांना त्यांचें हृदय इतकें उचंबळून येत असे, कीं, त्यांच्या ओंठांतून बाहेर पडणारे शब्द जणूं प्रेमाश्रूंनीं भिजून चिंब होऊन येत, असें ह्मणतात. आध्यात्मिक उन्नतीच्या या अवस्थेमध्यें आपले डोळे चांगले उघडे असतांना व बाकीचीं इंद्रियें चांगलीं शाबूत असतांना घनःश्याम गोपाळकृष्ण हे कालीय-सर्पाच्या मस्तकावर नाचत असलेले आपल्या दृष्टीस पडत, असें ते सांगत. ' मनाच्या एकाग्रतेची ही एक विशेष अवस्था असते, आणि यांत मानसिक कल्पनेच्या अगर भावनेच्या मूर्तस्वरूपाशिवाय दुसरें कांहीं नसतें,' असा याचा खुलासा स्वामींनीं पुढें एकदां केला होता.

**स्वामींचें वैराग्य.**

स्वामी जन्मतःच विरक्त असत. घरच्या अत्यंत गरिबीमुळें स्वामींचें विद्यार्थिदशेंतील आयुष्य खडतर तपश्चर्येप्रमाणेंच गेलें, असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्यांना बरींच दुःखें सोसावीं लागलीं व अतोनात श्रम करावे लागले. कित्येकदांतर कांहीं दिवस त्यांना अन्नावांचून काढावे लागले. पोटांत भरपूर अन्न नसतांना मध्यरात्रीपर्यंत ते अभ्यास करीत, आणि पुष्कळदां गणिताचीं उदाहरणें सोडविण्यांत ते इतके गुंग होऊन जात, कीं, रात्रीचे तास केव्हां निघून जात व पहांट केव्हां होई, हें त्यांना समजत नसे. पुढें कंठावयाच्या आयुष्याची पूर्वतयारी त्यांनीं विद्यार्थिदशेंत न समजतां केली होती. विद्यार्थिदशा संपून प्रोफेसर होण्यापूर्वींच त्यांची श्रद्धा आणि तदनुरूप इच्छाशक्ति हीं बरींच

वाढलीं होतीं, आणि संशय नाहींसे होऊन त्यांचे धर्मविषयक विचार दृढ होऊन त्यांनां बराच आत्मविश्वास-याला ते समतोलाची बेपर्वा असें ह्मणत-प्राप्त झाला होता. गणिताच्या अभ्यासानें त्यांची बुद्धि फार सूक्ष्म झाल्यामुळें कोणत्याहि गोष्टीचें चांगलें निरीक्षण करून, त्यांतील मर्म समजून घेऊन त्यांवर त्या विषयांतील अचुक व सर्वव्यापी सिद्धान्त बांधण्याइतकी ती कार्यक्षम झाली होती.

**स्वामींचें ज्ञान.**

गणित हा स्वामींचा विशेष आवडता विषय होता. त्यांनीं त्या विषयांतील कोणतेंहि पुस्तक वाचावयाचें शिल्लक ठेविलें नाहीं. या त्यांच्या चांगल्या अभ्यासामुळें दुसऱ्या कोणत्याहि विषयाचा अभ्यास करणें त्यांनां जड जात नसे. त्यांनां आरंभीं सृष्टिशास्त्राचा नाद होता. त्यावेळीं त्यांनीं आपण होऊन रसायनशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचा स्वतंत्र रीतीनें चांगला अभ्यास केला. तसेंच तत्त्वज्ञानाचा व उत्क्रांतिशास्त्राचा त्यांनीं विशेष अभ्यास केला. पौरस्त्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचें परिशीलन आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं चांगलें केलें. श्रीशंकराचार्य, कणाद, कपिल, गौतम, पतंजली, जैमिनि, व्यास, श्रीकृष्ण, त्याप्रमाणेंच कँट, हेगेल, गटे, फिक्थ, स्पायनोझा, कॉम्ट, स्पेन्सर, डार्विन, टिंडाल, हक्सले, स्टार जॉर्डन आणि प्रोफेसर जेम्स यांचे ग्रंथ त्यांनीं वाचले होते. फारशी, इंग्रजी, हिंदी, उर्दू आणि संस्कृत या भाषा त्यांनां उत्तम येत असत. १९०६ मध्यें त्यांनीं चारी वेदांचा अभ्यास पुरा केला. वेदांतील प्रत्येक मंत्र त्यांनां मुखोद्गत असे आणि मंत्रांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ शब्दशास्त्रवेत्त्याप्रमाणें ते बिनचुक सांगत. तत्त्वज्ञान, इंग्रजी, फारशी व संस्कृत वाङ्मय यांत त्यांनीं पूर्णत्व मिळविलें होतें. चारी वेद, सहा शास्त्रें आणि सर्व उपनिषदें त्यांच्या जिव्हाग्रीं असत. भाषण करतांकरतां केव्हांकेव्हां वेदाच्या संहितेंतील मंत्र, केव्हां मिराबाईचीं गीतें, केव्हां तुळसीदासाचे दोहरे, केव्हां सूरदासाचीं वाक्यें, केव्हां गुरु नानक अगर गुरु गोविंदसिंह यांचें वैराग्यपूर्ण भजन, केव्हां शम्स तबरेज, मौलाना रूम, हाफिज, सादी यांच्या ग्रंथांतील उतारे वारंवार त्यांच्या मुखांतून येत असत. कुराणाचाहि त्यांनीं उत्तम रीतीनें अभ्यास केला होता. बुद्धाचे ग्रंथ शिकण्याकरितां पालीभाषेचाहि अभ्यास त्यांनीं केला होता. जर्मनभाषेंत त्यांनां बोलतां येत असे. अमेरिकेंत असतांना अवघ्या दोन वर्षांत-दुसरीं सार्वजनिक कामें

असूनहि—बहुतेक अमेरिकन वाङ्मय त्यांनीं वाचून टाकिलें. त्यांना विद्येचा फार शोक होता. शेवटपर्यंत एकसारखा त्यांचा अभ्यास चाललेला होता. याप्रमाणें तेहतीस वर्षांच्या अवधींत स्वामी रामतीर्थ हे अगाध ज्ञानाचें भांडार होऊन गेले. त्यांची बुद्धि विशाल होती आणि आपल्या आयुष्यांतील एकहि पळ त्यांनीं वायां दवडिलें नाहीं. यामुळें अवघ्या तेहतीस वर्षांत त्यांना इतकें ज्ञान संपादन करितां आलें. त्यांच्या अकालीं वियोगामुळें भारतवासीयांना त्यांच्या या ज्ञानाचा पूर्ण फायदा घेतां आला नाहीं, याबद्दल अत्यंत वाईट वाटतें.

**स्वामींचें आत्मतत्त्व.**

स्वामींनीं जरी भरतखंडांत जन्म घेतला होता, तरी सर्व देश, सर्व जाति, सर्व धर्म यांतील मनुष्यें, इतकेंच नव्हे, तर सर्व जीवजंतु आणि सृष्टिमात्र यांवर स्वामी प्रेम करीत असत. त्यांच्या शरीरापासून सर्वांना सुख व उपकार पोहोंचत असे. दुसऱ्या कोणालाहि कोणत्याहि तऱ्हेनें यत्किंचित् दुःख देणें त्यांना खपत नसे. त्यांना कोणी शत्रु नव्हता; कारण, ते सर्वांचे मित्र असत. ते एक अजातशत्रु धर्मराजच होते. अत्यंत पापी, दुःखदायी आणि कठोर अशा प्राण्यांवरसुद्धां ते दया आणि प्रेम करीत. आणि या प्रेमभावानें ते सर्वांना वश करून घेत. आनंद आणि शांति यांची ते केवळ मूर्ति होते. अत्यंत दुःखी आणि उदास लोकांना एका पळांत ते शांतिप्राप्ति करून देत. कोणाचीहि त्यांच्याशीं मुलाखत झाली, कीं, आपलीं गुप्त रहस्यें आणि पापें यांना सांगावीं, असें त्याला वाटे. त्यांना पहातांच प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत यांच्यापासून आपणाला साहाय्य किंवा सुखसमाधान मिळणार, अशी आशा उत्पन्न होत असे, आणि त्यांच्या थोड्याशा सुसंगतीनें ती आशा तृप्त होऊन प्रत्येकाला मोठा आनंद होत असे. त्यांच्या दृष्टींत एक अद्भुत अमृतशक्ति होती. निर्जीव, रुक्ष अंतःकरणामध्येंदेखील नवीन जीवनशक्ति आणि उत्साह ते उत्पन्न करीत. एकवार ज्यानें स्वामींची गांठ घेतली, त्याला स्वामींना सोडून जाणें ह्मणजे जीवावर येत असे. स्वामी उपदेश करतांकरतां प्रेमांत मग्न होऊन जात आणि त्यांच्या मुखांतून सुभाषितें व पद्यें नदीप्रवाहाप्रमाणें आपोआप बाहेर येत. ज्यांना ज्यांना स्वामींच्या साध्या, पण तेजस्वी मूर्तीचें दर्शन घेण्याचा आणि त्यांच्या मुखांतील प्रेमपूर्ण वाक्यें ऐकण्याचा सुयोग प्राप्त झाला, त्यांचा अनुभव वर लिहल्याप्रमाणें आहे.

स्वामींचें प्रेम.

स्वामींचें प्रेम त्यांच्या शांतीइतकेंच स्वर्गीय होतें. अत्यंत नीच लोकांविषयीं देखील ते अतिशय आदर बाळगीत. पुस्तकें, लेखण्या, पेन्सिली, चाकू, करवतें इत्यादि वस्तूंशीं त्या जणूं जीवंत आहेत, असें समजून ते भाषण करीत. त्या वस्तूंवर प्रेम करीत असतां आणि त्यांशीं प्रेमानें बोलत असतां स्वामींनां कैकजणांनीं पाहिलें आहे. त्यांच्या भाषणांनीं व विचारांनीं प्रत्येकाची उन्नतीच होत असे. उच्चनीच, सजीव-निर्जीव असा भेद त्यांच्या ठायीं नव्हता. जें जें ह्मणून निर्माण झालें आहे, तें तें सर्व दिसतें तसें नसून ईश्वरस्वरूपच होय, असें ते मानीत. कोणी जरी भेटला, तरी त्याच्या अंतःकरणभूमिकेवर स्वामी स्वतःचें अंतकरण नेत आणि त्याच्याशीं आपलें पूर्ण तादात्म्य करीत आणि अशा रीतीनें प्रथम त्याचें हृदय काबीज करून नंतर कांहीं अप्रत्यक्ष सूचनांनीं त्याचें मन वळवून ते त्याची सत्याकडे प्रवृत्ति करीत असत. आपल्या अत्यंत आवडीच्या अशा कांहीं फारशी व उर्दु कविता स्वामी आपल्या उच्च व गोड स्वरांत ह्मणूं लागले, कीं, त्यांच्या हृदयांत आनंदाचें भरतें येई आणि त्या भरांत त्यांच्या सुंदर गालांवरून अश्रूंची धार एकसारखी वाहूं लागे. त्या कविता इतक्या कांहीं प्रेमानें व कळकळीनें ते ह्मणत असत, कीं, ऐकणारांपैकीं प्रत्येकाला राम त्या कवितेंत पूर्ण मग्न होऊन गेला आहे, हें सहज कळून येई. केव्हां केव्हां व्याख्यान देतांदेतांच ॐ ॐ असें मोठ्यानें ह्मणून स्वामींनीं डोलूं लागावें, आणि व्याख्यान वगैरे सर्व कांहीं विसरून जावें. हा प्रकार वेळोवेळीं इतका कांहीं घडत असे, कीं, राम हे देहभानावर क्वचित्‌च असतात, असें त्यांचे कांहीं अमेरिकन मित्र ह्मणत.

देहाचा विसर.

स्वामी नेहमीं ब्रह्मानंदांत निमग्न असत. ज्याचे आध्यात्मिक विचार इतके उच्च आहेत, आणि या विचारांतच जो अहोरात्र असतो, आणि ज्याला देहभान नाहीं, असा पुरुष नश्वर देहबंधनांत फार दिवस राहणार नाहीं, असें भविष्य तीनचार वर्षांपूर्वी अमेरिकेंतील मानसशास्त्रवेत्त्यांनीं वर्तविलें होतें. स्वामींनां आपल्या देहाचा विसर पडला होता, देहाची आठवण त्यांनां क्वचित् अंधुकशी होत असे. ख्रिस्ताच्या शरीराप्रमाणें आपलें शरीर दिव्य जीवनाचें एक साधन आहे, असें ते ह्मणत. मनुष्याची जीवितयात्रा ह्मणजे उंच उडण्यापूर्वी गरुडपक्ष्याच्या पंखाची फडफड होय. त्या फडफडीचा शेवट जसा कलुषित वातावरणांतून

निघून उच्च व शुद्ध वातावरणांत संचार करण्यांत होतो, त्याचप्रमाणें जीवितां-तील प्रत्येक क्रियेचें पर्यवसान देहभाव जाऊन सर्वात्मभाव उत्पन्न करण्यांत व्हावें व इंच मानवी जीविताचें साफल्य होय, असें स्वामींनीं अमेरिकेंत एका व्याख्यानांत सांगितलें होतें.

रामाच्या दृष्टींत अशी कांहीं जादू होती, कीं, तिच्या प्रभावानें रामाविषयीं प्रेक्ष-कांचें सर्व प्रेम एकदम बाहेर ओढलें जात असे. त्यांच्या स्पर्शांत अशी कांहीं शक्ति होती, कीं, तिच्यायोगें रुक्ष अंतःकरणांत देखील कवीची स्फूर्ति उत्पन्न होई आणि जीव दिव्य आनंदानें गच्च भरून जाई. मोठमोठ्या साधुसंतांचा व महात्म्यांचा असाच प्रभाव सांगतात. असा एकादा महात्मा एकाद्या शुष्क वृक्षवाटिकेंत गेला असतां तेथें सर्व लतावृक्षांनां नवीन पालवी फुटून पुष्पेंफळें येतात, सर्व वनराजी एकदम हिरवीगार होते, आणि कोरडे ठणठणीत झरे स्वच्छ पाण्यानें भरून जाऊन आनंदानें नाचूं लागतात, असें पुराणांतरीं सांगितलें आहे.

**'हें विश्वचि माझें घर। ऐशी जयाचि मति स्थिर। किंबहुना चराचर। आपणचि झाला॥'** या श्रीज्ञानोबारायांच्या उक्तीप्रमाणें स्वामी हे स्वतः सारें विश्वच बनून गेले होते. त्यांच्या प्रकाशरूपी शहराच्या आळींत बुद्धदेव भिक्षापात्र हातीं घेऊन फिरत असत, आणि ख्रिस्तमहाराज सत्योपदेश करीत असत. रामाच्या मनोरूपी वातावरणांतून कोणीहि महापुरुष नाहींसा होत नसे. त्यांचें मन ह्मणजे सनातन, शाश्वत प्राणांचें आगरच होतें. गतप्राण झालेल्यांनांहि तेथें पुनरुत्थान मिळे. त्यांच्या त्या स्वच्छ मनोरूपी क्षितिजावर सत्यरूपी सूर्याचा प्रकाश चांगला पडे. क्वचित् कोणीं एकाद्यानें अंगीं खरा मोठेपणा, सामर्थ्य किंवा अलौकिक बुद्धिमत्ता नसून ते गुण आपल्या अंगीं आहेत, असा जर आव आणला, तर रामाच्या तेजापुढें ते उसने गुण अगदीं फिके पडून त्या माणसाची वास्तविक योग्यता असेल तेवढीच दिसून येई. श्रुति, स्मृति, पदें व गाणीं, विचार आणि वस्तु, तत्त्वज्ञान आणि धर्म यांविषयींचे प्रश्न, राजकारण आणि समाज यांचे प्रश्न, रामाच्या मनाच्या दिव्य प्रकाशांत रेंटून भरत आणि रामाच्या मनाच्या प्रतिमेचें स्वरूप धारण करून ते विशेष खुलून बाहेर येत. वातावरण, परिस्थिति, आणि समाज यांचा योग्य परिणाम होऊन चेहरा बदलतो, हवापाण्याचा परिणाम होऊन चेहऱ्यांत फेरबदल होतो; तसें, एकादी कल्पना, एकादा प्रश्न, अगर एकादा सर्वसाधारण

विचार यांनां रामाचा स्पर्श झाला, कीं, त्यांवर रामाच्या अंतरात्म्याचा गूढ परिणाम होऊन ती कल्पना अगर प्रश्न किंवा विचार नवीन स्वरूप धारण करी, असें दिसे. ब्रह्मचर्य या विषयावर एकदां स्वामी बोलले, तेव्हां तो विषय त्यांनीं अशा खुबीनें प्रतिपादन केला, कीं, एकाद्या पर्वताच्या मागून बालरवि उदयाला येण्याच्या वेळची शोभा पाहून जसा आनंद होतो, तसा श्रोत्यांनां स्वामींच्या प्रतिपादनशैलीनें आनंद झाला. स्वामींचे यज्ञ, प्रेम, धर्म, आत्मानुभूति, आत्मविकास, टीका आणि विश्वव्यापी प्रेम इत्यादि विषयांवरील लेख नीट वाचल्यास, दुसऱ्या कोणींहि हे विषय पूर्वी असे प्रतिपादन केलेले नाहींत, अशी खात्री होईल. स्वदेशाभिमान आणि त्याविषयींचीं तत्त्वें यांचीतर स्वामींनीं जणूंकाय नवीनच आवृत्ति काढिली आहे, असें वाटतें ! स्वामी कोणालाहि कधीं चंद्रसूर्यांच्या प्रकाशानें पहात नसत; फार काय, चंद्रसूर्यांनांहि त्यांच्या प्रकाशानें ते कधीं पहात नसत. सर्व वस्तु ते आपल्या आत्मप्रकाशानें पहात असत, आणि ह्मणूनच स्वतःच्या बाहेर असें त्यांनां कांहींच दिसत नव्हतें. सूर्यांचे आरक्त किरण आपले स्नायु होत, असें स्वामी उघड सांगत. जेव्हां एकादी वस्तु त्यांच्या दृष्टीसमोर येई, तेव्हां तिला ते प्रथम ईश्वरीतत्त्वानें आच्छादीत, आणि ह्मणून ईश्वराव्यतिरिक्त दुसरें त्यांनां कांहीं दिसत नव्हतें. विश्वाशीं त्यांचा एक विलक्षण गूढ संबंध जडलेला होता. त्यांचें हास्य ह्मणजे पावसाळ्यामधील सूर्यप्रकाशासारखें आल्हादकारक वाटत असे, आणि त्यांचें रुदन ह्मणजे उन्हाळ्याच्या ऐन दुपारीं पडणाऱ्या पर्जन्यासारखें शीतल भासत असे. मेघ त्यांच्या मस्तकावर छत्र धारण करीत. छत्रीची त्यांनां केव्हांहि आवश्यकता भासली नाहीं. हिमालयाच्या दाट जंगलांत ते रहात असत आणि मनुष्याचें वारेंसुद्धां नाहीं, अशा दऱ्याखोऱ्यांतून, पक्षी जसे अंतराळांत सहज उडत असतात, त्याप्रमाणें स्वैर संचार करीत असत.

जगांतील उत्तम ग्रंथकर्ते, धर्मप्रणेते कवि आणि ज्ञानी यांचें निरीक्षण करण्याची त्यांनां एकदां लहर लागली होती. ते जेव्हां एकाद्या निःपक्षपाती न्यायाधीशाप्रमाणें आपलें मत देत, तेव्हां गर्व, अभिमान किंवा दांभिकपणा यांची छायाहि त्यांनां स्पर्श करीत नसे. संभाषणामध्यें वेदांपासून तों हल्लींच्या नूतन ग्रंथकर्त्यांच्या वाक्यापर्यंत जर त्यांनां एकादा विचार किंवा कल्पना चांगली वाटली, तर ती आपल्या विचारांची परिपोषक आहे आणि आपण

जें सत्य अनुभविलें आहे, त्याचें ती निदर्शक आहे, असें ते सिद्ध करून दाखवीत. ते उत्तम पंडित, शास्त्रज्ञ आणि आत्मानुभवी सिद्धपुरुष होते. त्यांचें मन जसें सुसंस्कृत झालें होतें, तशीच त्यांची आध्यात्मिक उन्नतीहि अत्यंत वरिष्ठ दर्जाची होती. लाहोरसारखें गच्च भरलेलें शहर त्यांच्या विस्तृत आत्म्याला संतुष्ट करण्यास असमर्थ होतें. फुरसत मिळे, तेव्हां ते हिमालयाच्या पहाडांत व जंगलांत जाऊन उपनिषदें आणि जुन्या आर्यब्रह्मविद्येचीं तत्त्वें यांवर मनन करीत आपला वेळ घालवीत असत.

हृषीकेशाजवळ ब्रह्मपुरीच्या अरण्यांत स्वामींनां इच्छितार्थ—आत्मलाभ—प्राप्त होऊन ते कृतकृत्य झाले. याच अरण्यामध्यें "**भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥**" यांत वर्णन केल्याप्रमाणें स्वामींची स्थिति झाली. **जेव्हां विश्वात्म्याशीं आपलें तादात्म्य होतें, तेव्हां सर्व विश्व आपलें शरीर बनतें,** असा जो सिद्धान्त स्वामींनीं अनुभवानें स्थापन केला, त्या सिद्धान्ताला परिपोषक अशा सर्व गोष्टींची जुळवाजुळव स्वामींनीं याच अरण्यांत केली.

स्वामींची भक्ति, वैराग्य, ज्ञान, आणि आत्मतत्त्व हीं पाहिलीं असतां महाराष्ट्र कविवर्य व साधुवर्य वामनपंडित यांच्या खालीं दिलेल्या ओव्यांची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

भक्ति, वैराग्य, तिसरें ज्ञान । इतुकींचि मोक्षाचीं साधनें ।
परि या तिहींसी जीवन । आत्मतत्त्व ॥ ७३ ॥
नव्हे तें ज्ञान, नव्हे ती भक्ति । अथवा नव्हे ती विरक्ती, ।
जोंवरी नाहीं अभिव्यक्ति । आत्मतत्त्वाची ॥ ७४ ॥
सर्वदा वेदान्ताचें श्रवण, । तथापि न कळे आपण कोण ! ।
अधिक वाढलें मीपण । आत्मत्व न कळतां ॥ ७५ ॥
टाकूनि जाती सकळ । तरी मनीं विषयाची हळहळ ।
जों न कळे सुखाचें मूळ । विषयवासना तंव न तुटे ॥ ७६ ॥
समुद्रांत बुडविजे मासा, । तो कर्दमातें नाठवी जैसा, ।
नाठवी विषयाच्या विलासा । आत्मसुखें जो तृप्त ॥ ७९ ॥
सेवितां एकाचि अमृता । तृप्ति, आरोग्य, अमरता ।
कळतां एक आत्मा तत्त्वतां । ज्ञान, भक्ति, वैराग्य ॥ ८० ॥

# स्वामी रामतीर्थ.

**अन्न भक्षितां ग्रासोग्रासीं । अधिक संतोष मानसीं ।**
**तैसीं आत्मत्वाच्या अभ्यासीं । ज्ञान, भक्ति, वैराग्य ॥ ८१ ॥**
**एक आत्मा कळल्यावरी । स्वयें आपण चराचरीं ।**
**आणीक जाणावयाची उरी । उरेचिना ॥ ८२ ॥**

—निगमसार अ. १.

स्वामी राम हे उत्तमोत्तम कवि होते. त्यांना पर्वतावरील झऱ्याच्या गाण्याची संगति पुरेशी होती. वृक्षांच्या छायेखालीं पक्षी त्यांनां विश्वाचीं गुह्यें सांगत. ब्रह्मांडाचें संगीत त्यांनां ऐकूं येई. सृष्टीच्या नानाविध सौंदर्यामध्यें आणि शांततेमध्यें त्यांनां ब्रह्मांडनायक श्रीकृष्णदेवाचेंच जणूं दर्शन होई ! समुद्राच्या प्रचंड लाटांमध्यें, जंगलांतील हालणाऱ्या वृक्षांमध्यें, भयंकर अरण्यांमध्यें आणि रानांमध्यें त्यांनां विश्वसौंदर्य ( ईश्वरी शोभा ) दिसे. **उत्तम शील किंवा सद्वर्तन ह्मणजे निसर्गाच्या अंतरात्म्याशीं तादात्म्य पावणें होय,** असें त्यांचें मत होतें. निसर्गाशीं मनुष्यानें एकरूप होऊन जावें ह्मणजे झालें; दुसरें कांहीं करण्याची जरूरी नाहीं. **अशा मनुष्यापाशीं मानवजातीचे आणि नीतिशास्त्राचे सर्व हितसंबंध सुरक्षित राहतात.** अशा रीतीनेंच ह्मणजे निसर्गाशीं तादात्म्य पावल्यानेंच उत्तम मनुष्यें पैदा होतात. ज्ञानाच्या किंवा विद्येच्या ( विश्वविद्यालयाच्या ) चक्रांतून चांगलीं माणसें पैदा होत नाहींत. मनुष्य निसर्गाशीं असलेलें आपलें खरें ऐक्य ओळखूं दे, ह्मणजे तो आपल्या सत्तारूपी स्थिरभूमीवर अचल आणि अजिंक्य असा उभा राहील. "मला इजा करणारा असा दुसरा बाह्य खडक नाहीं." आत्मप्रत्यय किंवा आत्मसाक्षात्कार करून घेऊन त्यांत वास करणें हाच धर्म* होय. विश्वाचें नियमन करणारी सत्ता, चराचर विश्वाच्या प्रत्येक स्नायूमध्यें असलेली गूढ सत्ता ही आपलाच आत्मा आहे, असा साक्षात्कार घेणें ह्मणजे मनुष्यमात्राच्या आटोक्यांत आहे तेवढी सर्व जयसिद्धि मिळविण्याच्या राजमार्गाला लागणें होय. स्वामींनां जें कांहीं यश एकसारखें मिळत गेलें, त्यांतील गुह्य तरी हेंच. व्यावहारिक वेदान्ताच्या–ब्रह्मविद्येच्या–निस्सीम भक्तांखेरीज दुसऱ्या कोणालाहि शुद्ध अंतःकरणें, निर्मळ तेजस्वी मुखें, आणि

* सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म । —दासबोध.

उल्लसित सुखभाव हीं लाभावयाचीं नाहींत. 'माझी ब्रह्मविद्या ह्मणजे एकादें वादग्रस्त अथवा दुराग्रही मत नसून आयुष्यांतील सनातन अनुभवापासून महात्म्यांनीं काढिलेले सिद्धान्त होत,' असें स्वामी ह्मणत.

स्वामींनीं निसर्गातील सर्व उत्तम काव्यांचा आस्वाद घेतला होता. पहाडांतील रम्य शोभा आणि थंडगार बर्फ यांशिवाय दुसऱ्या कशानेंहि त्यांच्या मनाची तळमळ शांत होत नसे. घराच्या छपराखालीं त्यांनां बरें वाटत नसे. अर्धोन्मीलित नेत्रांनीं नगाधिराजाकडे ओझरतें पहातपहात हिमालयाच्या अरण्यांत फिरतांना स्वामींची तब्येत फारच खुषींत असे.

स्वामी हे चालू शतकांतील वेदान्ताचे एक अत्युत्तम प्रसारक होते. हिंदु धर्मग्रंथांमध्यें जें जें कांहीं लिहलेलें आहे, त्याचें स्वामी प्रत्यक्ष उदाहरण होते. विश्वाशीं तादात्म्य पावून गेलेल्या सर्व उदार हिंदु साधुसंतांचें तेज स्वामींमध्यें होतें. बुद्धाच्या धर्माचे हे उत्तम उपदेशक होते. पूर्ण नीतिमत्ता, पूर्ण अलिप्तता (ब्रह्मचर्य,) सदाचार, अध्यात्मविद्येंतील तत्त्वानुसार मनुष्याची वागणूक यांविषयीं स्वामी नेहमीं उपदेश करीत. उच्च परोपकार तर त्यांच्या अंगवळणीं पडला होता. गरीब हिंदी लोकांची स्थिति सुधारण्याकरितां ते अहोरात्र एकसारखे खपत असत. ते नेहमीं सांगत असत, कीं, "रोग एकच आहे आणि उपायहि पण एकच आहे. ईश्वरी नियमाबरहुकूम वागल्यानें राष्ट्रांचा रोग नाहींसा होऊन तीं मुक्त होतात. यानेंच व्यक्तिहि देव किंवा साधुसंत यांपेक्षां श्रेष्ठ होतात. ईश्वरी तत्त्वामध्यें रहा ह्मणजे सर्व कांहीं यथास्थित जुळेल. या सत्यावर विश्वास ठेवाल, तर तुह्मी तराल; याविरुद्ध उठाल, तर तुह्मांला आपत्ति घेरतील." आपल्या श्रमांबद्दल मोबदला किंवा पारितोषिक मिळावें, अशी स्वामींनीं कधींहि इच्छा धरिली नाहीं. अमेरिकेहून परत येतांना, तेथें मिळालेल्या मानपत्रांचें, व तेथें केलेल्या कामगिरीचा गौरवानें उल्लेख केलेल्या सर्व कागदपत्रांचें भेंडोळें त्यांनीं महासागरांत फेंकून दिलें! आपल्या मातृभूमीकरितां त्यांनीं अमेरिकेंत काय कामगिरी केली, हें तेथें जाऊन पाहिल्यानें नीट कळून येणार आहे.

असे महात्मे फार दिवस लोकांनां लाभत नाहींत, हें लोकांचें दुर्दैव होय. श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानदेव आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखे महात्मे स्वामी रामतीर्थांप्रमाणें यौवनदशेंतच ब्रह्मीभूत झाले. मर्त्य लोकांनां ते फार दिवस लाभूं नयेत, असा ईश्वरी संकेतच दिसतो. ज्यांचा आपणाला फार उपयोग होईल,

अशी ज्यांच्याबद्दल लोकांना आशा लागून राहते, ते अल्पायु व्हावे, असा जणूंकाय सृष्टीचा नियमच आहे. मनुष्यमात्रानें स्वावलंबी बनावें, स्वतःच्या कल्याणाकरितां त्यानें दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहूं नये, असा परमेश्वराचा उद्देश दिसतो. ह्मणून, तो सर्व कामगिरी पुरी करून घेण्याकरितां नव्हे, तर विद्युत्प्रकाशाप्रमाणें नुसता मार्ग दाखविण्याकरितां असे पुरुष पाठवून देतो. मनुष्यांनां ते उपदेशाच्या रूपानें कांहीं सूचना देतात आणि आपण निघून जातात. त्या त्या कालीं जरूर असलेली तेवढीच संघटनात्मक कामगिरी साधण्याकरितां त्यांचा जन्म असतो. सर्व लोकांचें प्रेम त्यांच्याकडे विलक्षण रीतीनें ओढलें जातें, आणि लोक त्यांच्यावर जेव्हां सर्व भार टाकून राहूं लागतात, तेव्हां ते एकदम त्यांनां सोडून जातात. आणि असें झालें, ह्मणजे प्रथम लोक आश्चर्यचकित होऊन घोटाळ्यांत पडलेसे दिसतात, हें खरें; पण शेवटीं त्यांनां आपल्या पायांवरच उभें रहाणें भाग पडतें. शिवाय, सर्वांनां हें ठाऊक आहे, कीं, मात्रेच्या एकदोन वळशांनीं मोठमोठे रोग नाहींसे होतात; पण तीच मात्रा जर आपण पाव अर्धा शेर घेतली, तर रतीभर मात्रेपासून होणारा सुपरिणाम त्यापासून न होतां उलट अपायच होईल. त्याप्रमाणें महर्षि व महात्मे यांचा थोडासा जीवनक्रम जरी आह्मीं अंमलांत आणला, तरी आमचें कोटकल्याण होईल, यांत शंका नाहीं.

सर्व धर्मसंस्थापक एकाच ईश्वराच्या निरनिराळ्या विभूति असल्यामुळें त्यांनीं शिकविलेलीं तत्त्वें परस्परविरुद्ध असणें संभवनीय नाहीं. यामुळें हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या धर्माधर्मांत तंटेबखेडे होण्याचें कारणच उरत नाहीं, असें स्वामींचें मत असे. व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या शक्तीचा सदुपयोग होऊन त्यांकडून चांगली कामगिरी व्हावी, याला उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे स्वामींनीं प्रेमाविषयीं केलेला उपदेश अथवा भक्तिमार्ग आचरणांत आणणें हा होय. स्वामींचा स्वभाव ह्मणजे शास्त्रें व धर्म यांत असलेल्या उत्तम तत्त्वांचा अप्रतिम संयोग असून तो मनुष्यमात्रांनीं आपलें आचरण कसें ठेवावें, याविषयींचा उत्तम कित्ता होय. सार्वजनिक काम ह्मणजे मतें, अज्ञान आणि दास्य यांपासून लोकांची सुटका करणें होय, असें स्वामींचें मत असे. स्वामी स्वतः स्वातंत्र्य अथवा मुक्ति यांची केवळ मूर्तिच होते.

**उपदेशाचें सार.**

स्वामी रामतीर्थ हे एकाच कल्पनेचे पुरुष होते. त्यांच्या व्याख्यानांत, लेखांत एकच मोठी कल्पना प्राधान्यत्वेंकरून सर्वत्र आढळून येते. ती कल्पना कोणती ? देहात्मभावनेचा—अहंकाराचा त्याग आणि आपला आत्मा विश्वाचा आत्मा आहे, अशी जाणीव किंवा साक्षात्कार. अहंकार समूळ नाहींसा केल्याशिवाय, अहंकाराचा त्याग केल्याशिवाय परमार्थांतच नव्हे, तर दुसऱ्या कोणत्याहि कार्यांत उत्तम यश येत नाहीं, असा उपदेश स्वामींनीं स्वानुभवानें आणि कळकळीनें केला आहे. तसेंच ‘ वेदान्त ’ हा शब्द त्यांनीं ठिकठिकाणीं वापरला आहे. वेदान्त—व्यावहारिक वेदान्त—म्हणजे काय, याची नीट कल्पना यावी, ह्मणून स्वामींनीं एक लहानशी इंग्रजी कविता केली आहे, आणि त्या कवितेंत त्यांनीं आपल्या सर्व उपदेशाचें सार आणिलें आहे. ती कविता अशी:—

Pushing marching labour and no
stagnant Indolence
Enjoyment of work as against
tedious drudgery;
Peace of mind aud no canker
of Suspicion,
Organisation and no disaggregation;
Appropriate reform and no Conser-
vative Custom,
Solid real feeling as against
flowery talk,
The Poetry of facts as against
speculative fiction,
The logic of events as against autho—
rity of departed authors,
Living realization and no mere dead quotations
Constitute Practical Vedanta. *

या कवितेचें सार खालील फटक्यांत देण्याचा प्रयत्न केला आहे:—

[ **चाल**—‘असार जीवित केवळ माया रडगाणें हें गाऊं नका०’ ]

डबक्यापरि आळशी रहाणें टाकुनि उद्यम मार्ग धरा,
त्रस्तमनानें कष्ट न करितां कर्माचरणीं प्रेम करा.

संशय आहे रोग भयंकर, द्या टाकोनी शांति वरा;
रजःकणांपरि विभक्त कां व्हा ? संघशक्तिचा मार्ग बरा.
जरठ रूढिला दूर सारुनी करा संस्कृतिहि नवी नवी,
पुष्पितवाचा पुरे अतां हो ! कळकळ कांहीं खरी हवी !
मनोराज्य तें येइ न कामा, चाखा सत्यांतिल काव्य;
'बाबावाक्यं' प्रमाण नच तें, ध्या युक्तीला जें ग्राह्य.

अमुक बोले असें असें,
अमुक ग्रंथीं तेंचि असे,
मृत वचनांचें असें पिसें
लावुनि घेतां तुह्मी कसें ?

व्युत्पत्तीच्या सिंधूपेक्षां अनुभवबिंदुच बरा बरा !
सत्य शुद्ध **वेदान्त** हाचि हो ! वदे **रामतीर्था**चि गिरा.

अशा प्रकारच्या या समर्थ, मुक्त, महात्म्याच्या दिव्य उपदेशामृताच्या पानानें वाचकांच्या मनांला शांतिसुख लाभो, अशी विश्वनियंत्या प्रभूपाशीं प्रार्थना करून, स्वामींचें हें यथामति लिहलेलें, मधुर आणि अनुकरणीय जीवनचरित्र येथें पुरें करितों.

# स्वामी रामतीर्थ.

## * NATIONAL DHARMA.

## राष्ट्रीय धर्म.†

धर्म किती तरि पंथ किती तरी
मार्ग तसेची असती भारी ।
परी कुणासिच मर्म कळेना ।
अनेक पंथें भ्रमती भारी ॥
वाण असे परि दुःखित जगता ।
एका भूतदयेचिच सारी ॥

सूर्यास्ताची वेळ. दीर्घ उसासे टाकून खालील पद्य ह्मटलें जात आहे, आणि अश्रुपूर्ण नेत्रांनीं लिहिलें जात आहे:—

दृष्टांत एक दिवशीं मजला जहाला,
तो कैक वेळ दिसतो मम लोचनांला;
तो सत्य वा अनृत, हें मजला कळेना,
'ह्या स्वास्थ्य ना !' जन असें वदताति नाना. १

अस्तास जात असतां तमराशिहारी
ये पूर नेत्रसलिलां, हृदया विदारी;
दृष्टांत तो पुनरपी मम लोचना ये,
नेत्रांपुढें जननि हिंदचि शोभताहे ! २

* हें स्वामींनीं अमेरिकेंत असतांना लिहिलें आहे.

† 'जगतः स्थितिकारणं साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुर्यः स धर्मः' अशी आचार्यांनीं धर्माची व्याख्या दिली आहे.

वार्धक्य तें हळुहळू दिवसास भेटे,
संध्यासमीर विरमे, बहु खिन्न वाटे;
उर्मी तशा उठति सागरिं सावकाश,
अस्तप्रभाजनित शोभवि त्यां प्रकाश. ३

आकाश, मेघ, उदधी दिसती सुतप्त,
आरक्त अर्ककिरणें जणुं होति दीप्त;
अस्तास जाय नच जों रमणीयता कीं,
निःशब्द राहुनि उभा स्थिर मी विलोकीं. ४

झालें मला स्मरण दुःखद त्या दिनांचें;
तारुण्य बालपण मन्मनिं येत साचें;
अस्तासि तो प्रखररश्मिहि जाय जेव्हां,
दुःखें विदीर्ण मम मानस होय तेव्हां. ५

मन्मानसीं उगवला मग भूतकाळ,
येती गतासु मम सन्निध तैं विशाल;
प्रेतां तदीय क्षणिं पातलि चेतना ती,
तच्छब्द मंगल स्वासम भासताती. ६

वृद्धार्क ते मजपरीच विलोकिताती,
वृत्तांत हा घडुनियां बहु दीन जाती;
नाना प्रदेश फिरलों, श्रमलोंहि मोहें,
ना स्वास्थ्य कांहिं मजशीं परि वाटताहे. ७

अद्यापि अस्त जइं पावत तेजराशी
ये पूर नेत्रसलिलां, सुखशांति नाशी;
दृष्टांत तो पुनरपी मम लोचना ये,
नेत्रांपुढें जननि हिंदचि शोभताहे. ८

हे अस्तास जाणाऱ्या सूर्या ! हिंदुस्थानांत तुझा उदय व्हावयाचा आहे. त्या प्रभावशाली ( तेजोमय ) देशाला * 'रामा'चा एवढा संदेश कृपा करून

* स्वामी रामतीर्थ स्वतःविषयीं उल्लेख करतांना बहुधा 'राम'हाच शब्द वापरतात.

# राष्ट्रीय धर्म.

पोहोंचविशील काय ? माझे हे प्रेमाचे अश्रुबिंदु हिंदुस्थानच्या शेतांतील प्रभातकालचे शक्तिदायक हिमबिंदु होवोत ! एखादा शैव जसा शिवाची, वैष्णव विष्णूची, ख्रिस्ती ख्रिस्ताची आणि मुसलमान महंमदाची जाज्वल अंतःकरणानें भक्ति करतो, त्याप्रमाणें शैव, वैष्णव, ख्रिश्चन, मुसलमान, पारशी, शीख, संन्यासी, अंत्यज अथवा हिंदमातेचीं इतर मुलें या सर्व रूपांनीं मी हिंदमातेला पहातों व भजतों. हे हिंदमाते ! माझे गंगाजी ! माझे काली देवी ! माझ्या इष्ट देवा ! माझ्या शालिग्रामा ! तुझ्या सर्व स्वरूपांची मी पूजा करितों. हिंदुस्थानांतील मृत्तिका भक्षण करण्यांत ज्या देवाला मोठें प्रेम वाटत होतें, तो देव ( श्रीकृष्ण ) भक्तीविषयीं सांगतांना ह्मणतोः—

*क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥

—गीता, अ. १२. ५.

सख्या कृष्णा ! बरें आहे. एक ह्मातारा नंदी, एक मोडकेंसें खाटलें, एक जुना परशु, भस्म, सर्पगण, नरोटी ( कपाल ) एवढेंच ज्याचें प्रापंचिक ऐश्वर्य आहे, अशा दिव्य स्वरूपाची अर्चा करणें हाच माझा उपासनामार्ग होवो. †महिम्नस्तोत्रांत वर्णन केलेला हा **महादेव** काय ? नव्हे ! **गरीब, उपासमार काढणारा हिंदी शेतकरी या रूपाचा साक्षात् नारायण हीच माझी उपास्यदेवता होय** ! असा हा माझा धर्म आहे आणि कोणाहि हिंदवासीयाचा हाच धर्म, हाच सर्व साधारण पंथ,

* अव्यक्ताच्या ठिकाणीं मन लावून भक्ति करणारांनां ( निर्गुणभक्तांनां ) फारच क्लेश होतात; कारण, देहासक्ति असणारांनां अव्यक्त गति मिळणें मोठें कठिण आहे.

† महोक्षः खट्वांगं परशुरजिनं भस्म फणिनः
कपालं चेतीयत्तव वरद तंत्रोपकरणम् ।

—महिम्नस्तोत्र, ८.

हाच व्यावहारिक वेदांत, व हाच भक्तिमार्ग असणें योग्य आहे. नुसती मिळमिळित सहानुभूति किंवा परमतसहिष्णुता यांनीं भागावयाचें नाहीं. राष्ट्रीयत्वाची जोमदार कल्पना फैलावण्यास हिंदमातेच्या प्रत्येक पुत्रानें झटून मदत केली पाहिजे. अर्भकांनां बालपणांतून गेल्याशिवाय तारुण्य प्राप्त होत नाहीं. आपल्या शरीरांतील रोमरोमांमधून सर्व राष्ट्राचें तादात्म्य स्फुरण पावल्याशिवाय सर्वरूप ईश्वराशीं असलेलें आपलें ऐक्य कोणालाहि अनुभवितां येणार नाहीं. प्रत्येक भरतपुत्रामध्यें भरतमाता वसत आहे, हें ओळखून प्रत्येक भारतीयानें अखिल भरतवर्षाच्या सेवेस तत्पर असलें पाहिजे. हिंदुस्थानामध्यें प्रत्येक ग्राम, ग्रावा, नदी, नग, पशु, पक्षी यांनां देवता मानून त्यांची पूजा करितात. भरतभूमीच्या या अनेक अंशावताराच्या पूजनापासून पूर्णांश अवताराच्या पूजनाची स्फूर्ति होण्याचा व अखिल हिंदमातेस देवता कल्पून तिची अर्चा करण्याचा समय प्राप्त झाला नाहीं काय? जर दुर्गेच्या मृण्मय प्रतिमेमध्येंसुद्धां प्राणप्रतिष्ठेनें आपण हिंदुलोक चैतन्य उत्पन्न करतों, तर साक्षात् दुर्गेची प्रतिमाभूत जी हिंदमाता तिच्यामध्यें चैतन्य, तेज व प्रतिभा आपण आणावयास नको काय? **हृदयें एकवटूंद्या, ह्मणजे शिरें व बाहू आपोआप एकवटतील.** सर्वांचें एक दिल झालें ह्मणजे परस्परांस परस्परांच्या बुद्धीचें व हातांचें साहाय्य मिळेल.

**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ।**

—गीता, अ. १७.३.

प्रत्येक पुरुष आपल्या श्रद्धेचा घडलेला ( बनलेला ) असतो. ज्याची जशी श्रद्धा तसा ( तत्स्वरूपच ) तो होतो, असें जगद्गुरु व वीरमणि श्रीकृष्ण ह्मणतात.

हिंदुस्थानांतील माझ्या लाडक्या कर्मठांनों! तुह्मी आपलीं सर्व शास्त्रें योग्य रीतीनें आचरणांत आणा. 'जातींचे कडक निर्बंध ढिले करा, राष्ट्रीय बंधुत्वापुढें तीव्र जातिभेदांनां कमी लेखा,' असें राष्ट्रधर्म तुह्मांला सांगतो आहे. ज्या हिंदुस्थानानें एके काळीं जगांतील सर्व निराश्रितांनां मुक्तद्वार ठेविलें होतें, व इतक्या निरनिराळ्या लोकांनां व देशांनां आश्रय दिला होता,

त्याच हिंदुस्थानाला स्वतःच्या लेंकरांनां आतां भाकरीचा एक तुकडाच देखील देण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं, हें तुह्मांला दिसत नाहीं काय ? प्रत्येकाला आपल्या योग्यतेप्रमाणें आपलें स्थान मिळविण्यास पूर्ण मुभा असूंद्या. डोकें वाटेल तेवढें वर काढा, परंतु पाय मात्र नेहमीं एकाच '**सर्वसाधारण भूमिकेवर**' असले पाहिजेत, हें लक्ष्यांत ठेवा! दुसरा अशक्त किंवा राजी असला तरी आपले पाय त्याच्या डोक्यावर अथवा खांद्यावर ठेवूं नका!

तरुण भावी सुधारकांनों! हिंदुस्थानच्या पुरातन चाली व धर्म यांची निंदा करूं नका. दुहीचें आणखी एक तत्व घुसडल्यानें हिंदुस्थानच्या लोकांत एकी होणें शक्य नाहीं. हिंदुस्थानच्या आधिभौतिक अवनतीबद्दल धर्म आणि सात्विकपणा यांनां दोष लावितां येणार नाहीं. बाग लुटली गेली, याचें कारण कांटेरी वई आणि निवडुंगाचें कुंपण तिला नव्हतें, हें होय. तें कुंपण व वई करा, पण सुधारणेच्या नांवाखालीं बागेच्या मध्यभागीं विलसत असलेलीं फुलझाडें व फळझाडें उपटून टाकण्याइतके अविचारी होऊं नका! हे उपयुक्त कांट्याकुंपणांनों! तुह्मीं तारक तत्वें आहांत, हिंदुस्थानाला तुमची गरज आहे.

शूद्रांच्या श्रमाची, सेवाधर्माची महती गातांना तमोगुणाला सत्व आणि रज या गुणांहून मी अधिक लेखित नाहीं. माझें एवढेंच ह्मणणें आहे, कीं, **हिंदुस्थानांत आपण तमोगुणाच्या विरुद्ध इतकी ओरड केली आहे, कीं, त्याचा प्रतिकार करण्यामध्येंच आपण त्याची आपल्यामध्यें भयंकर वाढ केली आहे.** आतां तरी आपण तमोगुणाचा **उपयोग** करण्यास शिकूं या, आणि त्याला उज्ज्वल करूं या. जर आपण गलिच्छ खत उपयोगांत न आणतां टाकून दिलें, तर बगीचे कसे तयार होतील ?

तमोगुण हा दगडी कोळसा आहे. त्याच्याशिवाय रजोगुणरूपी अग्नि आणि वाफ, आणि सत्वगुणरूपी प्रकाश, हीं उत्पन्न व्हावयाचीं नाहींत. कोणत्याहि देशांत चळवळीनें उत्पन्न होणारा रजोगुणाचा अग्नि, व सत्वगुणाचा प्रकाश यांचा जोर व शक्ति हीं पाया ज्या प्रमाणानें

हसतो त्याच प्रमाणांत असतात, हें विधान आधुनिक मस्तिष्करचनाशास्त्रांतील (phrenology) सिद्धांतांशीं तंतोतंत जुळतें. त्या शास्त्रांत सांगितलें आहे, कीं, नैतिक किंवा बौद्धिक इंद्रियांचा कितीहि विकास झाला असला, तरी तेजस्वीपणाला आणि शीलाच्या जोमदारपणाला मनुष्याच्या तामसिक वृत्तींचा भक्कम आधार असल्याशिवाय त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. आणि ह्मणूनच हिंदुलोक **महादेवाला** तमोगुणाचा स्वामी ह्मणतात.

हिंदुस्थानच्या इतिहासांत एका मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं आमचा जन्म झाला आहे ह्मणून तर देशाची सेवा करण्याचे प्रसंग आपणांस विपुल आहेत. याकरितां आह्मीं ईश्वराचे उपकारच मानिले पाहिजेत. आमच्या वांट्यास आलेलें कार्य लोकोत्तर, कवींनां देखील स्फूर्ति उत्पन्न करणारें, आणी क्रांतिकारक आहे. अशी एक ह्मण आहे, कीं, जे चांगले झोंपतात ते ताजेतवाने होऊन हुशारीनें उठतात. हिंदुस्थानाला लागलेली निद्रा फार गाढ होती आणि त्यामुळें हिंदुस्थानाची जागृतिहि पण तशीच लोकोत्तर व्हावयाची आहे. हिंदुलोकांमध्यें जें आपल्याला उत्पन्न करावयाचें आहे; तें हेंचः—

**दोषैकदृष्टि टाकून गुणग्राहकता वाढविणें. बंधुभाव ( प्रेम ), घटनात्मक कार्य करण्याची प्रवृत्ति, एकोप्यानें काम करण्याची संवय व श्रमाचा मानमरातब वाढविणें.**

अरेरे ! एका पंथानें दुसऱ्या पंथावर टीका करण्यांत देशांतील किती तरी अनंत शक्तीचा बेपर्वाईनें अपव्यय येला जात आहे ! यापुढें आपण आपणांमध्यें कोणत्या बाबतींत साधर्म्य आहे हें पाहिलें पाहिजे आणि त्यावरच जोर दिला पाहिजे. कांहीं लोक आर्यसमाजानेंच वळले जातात, परंतु सनातनधर्माचा त्यांच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. कोणाकोणाला ब्रह्मसमाज बरा वाटतो, तर कित्येकांनां वैष्णवी पंथ आवडतो. माझ्या पंथानें मला जो धीर व आनंद मिळतो त्याची पर्वा न करणाऱ्या मनुष्यांस दोष देण्यास मला कोणचा हक्क आहे ? त्यांनां सर्वांनां येऊंद्या, मग ते राहोत किंवा ‘ज्या’ लोकांनगाऱ्या गोष्टी मी घडूं देतों. मी कांहीं

त्यांत हात घालित नाहीं. सर्वांच्या सहानुभूतींचा मक्ता आपल्यालाच मिळावा ह्मणून तुह्मीं अगर मीं काय ह्मणून प्रयत्न करावे ? माझा हक्क सेवा करण्याचा—प्रेम करणारे अगर द्वेष करणारे कोणी असल्यास त्या सर्वांची सेवा करण्याचा—आहे. जीं मुलें अशक्त आणि दुर्गुणी असतात तींच मातेला अधिक प्रिय असतात. ज्यांचा तुमच्याशीं मतभेद आहे ते सर्वच चुकलेले आहेत काय ? तसें असेल तर देशाला तेहि हवे आहेत. एकाच उजव्या ( उजु—सरळ ) पायावर उड्या मारित चालणाऱ्या मनुष्याची स्थिति खरोखर शोचनीय होय. खरें शिक्षण ह्मणजे ईश्वराच्या दृष्टीनें ( दिव्यदृष्टीनें ) सर्व वस्तूंकडे पाहण्यास शिकणें, हें होय.

***माझ्या दोषांवरी नको देऊं दृष्टी । असे समदृष्टि नाम तुझें ॥**
**इच्छामात्रें मज पावन कराया । समर्थ सखया अससी तूं ॥ १ ॥**
**रथ्योदक जें कां मळीन बहुत । किंवा नीर होत यमुनेचें ॥**
**गंगेसी मिळतां पवित्र समान । होतसे न न्यून तयांमाजी ॥ २ ॥**
**लोहमयी मूर्ति असो कीं देवांची । किंवा खाटिकाची सुरी असो ॥**
**सुवर्णचि होती परिस लागतां । क्षण न लगतां सम दोन्ही ॥ ३ ॥**
**तैसे देवा नको पाहूं दोष माझे । पावन नाम तुझें समदृष्टी ॥**
**इच्छामात्रें मज पावन कराया । समर्थ सखया अससी तूं ॥ ४ ॥**

आमच्या व्यक्तिविषयक व स्थानिक धर्माला राष्ट्रीय धर्मापेक्षां अधिक महत्त्व देतां कामा नये. सर्व गोष्टी योग्य प्रमाणांत ठेविल्यानें सुख व कल्याण लाभतें.

राष्ट्रहित साधण्याकरितां कोणचेंहि कर्म केल्यानें विश्वांतील शक्ति अथवा देवदेवता यांची पूजा केल्याप्रमाणें होते. हिंददेवतप्रीत्यर्थ अशा प्रकारचा यज्ञ प्रत्येकानें केला पाहिजे. अशाच प्रकारच्या यज्ञाला गीतेंतील पुढें दिलेला श्लोक हल्लींच्या काळीं लागतोः—

*भगिनी निवेदिताबाईनीं आपल्या 'वेब् आफ इंडियन लाईफ' नामक सुंदर पुस्तकांत, सुरदासाचा वरील उतारा इंग्रजी कवितारूपानें घेतला आहे, त्याचें हें मराठी रूपांतर आहे.

*"यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।
भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥"

—गीता, अ. ३. १३.

ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची असल्यास संन्यस्तवृत्ति बाळगा ह्मणजे स्वार्थाचा पूर्ण त्याग करून आपलें क्षुद्र व्यक्तित्व हिंदमातेच्या विराट् स्वरूपामध्यें पूर्णपणें लीन करा. आनंद किंवा ईश्वर यांचा लाभ करून घ्यावयाचा असल्यास राष्ट्राच्या प्रगतीला आपल्या सर्व वृत्ति वाहणाऱ्या ब्राह्मणांची वृत्ति धरा. आनंदाचा लाभ करून घ्यावयाचा असल्यास प्रत्येक क्षणीं स्वदेशाकरितां आपले प्राण वेंचण्यास तयार असणारी क्षत्रिय-वृत्ति बाळगिली पाहिजे. ईश्वराच्या प्राप्त्यर्थ, राष्ट्राचा वहिवाटदार ह्मणून आपली सर्व संपत्ति बाळगणारी खरी वैश्यवृत्ति धारण केली पाहिजे. इहलोकीं अगर परलोकीं आनंद किंवा राम—आनंदघन राम—याच्या साक्षात्काराचा अनुभव हवा असेल, आणि जर तुमच्या मनांतील अमूर्त धर्मकल्पनेस मूर्त आणि दृश्य स्वरूप द्यावयाचें असेल, तर एके काळीं पुण्यवान् शूद्रांना नेमून दिलेल्या शारीरिक कष्टांमध्यें तुह्मीं आपल्या हातापायांच्या योगानें हा संन्यासी बाणा, आणि ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांच्या वीरवृत्ती उत्पन्न केल्या पाहिजेत. **संन्यासी वृत्तीचा अंत्यजाच्या हातांशीं संयोग झाला पाहिजे.** आज हाच काय तो एक मार्ग आहे. उठा, जागे व्हा !

परकी देश देखील आपल्या उदाहरणांनीं सर्व जगांतील ब्रह्मभूमि जी हिंदुस्थान तिला आज हा धर्म शिकवितात. जेव्हां एका जपानी तरुणाला त्यानें पुत्रधर्मासाठीं मातेच्या सेवेस रहावें ( गृहधर्म ) ह्मणून सैन्यांत नांव दाखल करण्यास परवानगी मिळाली नाहीं, तेव्हां त्याच्या आईनें आत्महत्या केली, आणि अशा रीतीनें उच्च ह्मणजे राष्ट्रीय धर्माकरितां कमी ह्मणजे गृहधर्माचा त्याग केला.

---

* यज्ञामध्यें हविर्भाग देऊन राहिलेलें अन्न जे सज्जन खातात ते सर्व पापांपासून मुक्त होतात; परंतु जे पापी लोक आपल्याच पोटासाठीं अन्न शिजवितात ते प्रत्यक्ष पापच खात असतात.

# राष्ट्रीय धर्म.

अतुल प्रतापी **गुरु गोविंदसिंगांनीं** राष्ट्रीय धर्माकरितां व्यक्तिविषयक, प्रापंचिक आणि सामाजिक धर्मांचा जो त्याग केला, त्याची बरोबरी करणारीं दुसरीं कोणतीं शूर कृत्यें सांपडतील ?

लोकांनां सत्तेची हांव असते. जेव्हां तुमचें व्यक्तित्व सर्व राष्ट्राच्या व्यक्तित्वाशीं तादात्म्य पावतें, तेव्हां अशी कोणती प्रचंड अमर्याद शक्ति आहे, कीं, जी तुमच्या हातीं येणार नाहीं ?

सरते शेवटीं महम्मद पैगंबराच्या सुंदर शब्दांनीं मला या शक्तीचें उदाहरण देऊंद्या.

"सूर्य जर माझ्या उजव्या हातावर आणि चंद्र माझ्या डाव्या हातावर येऊन बसला, आणि ते दोघेहि मला मागें फिरण्यास सांगूं लागले, तरी मी त्यांचें ऐकणार नाहीं !"

# RAMA'S MESSAGE TO THE YOUNG MEN OF INDIA.

## THE PROBLEM OF INDIA.

# 'स्वामी रामतीर्थांचा हिंदी तरुणांस संदेश.'*

## हिंदुस्थानापुढील प्रश्न.

एकी, एकी ! प्रत्येकाला एकीची वाण भासत आहे. या देशांतील लाखों शक्ति परस्परांस नाहींशा करित आहेत. फलद्रूप शक्ति (Resultant force ) कांहींच निष्पन्न होत नाहीं. कोट्यवधि डोकीं व हात वहात चालले आहेत, पण कोठें ? कोणाला ठाऊक ! हजारों पंथ आणि सांप्रदाय आपापल्या लहरीप्रमाणें आपल्या आवडत्या दिशेनें राष्ट्रनौका वल्हवित आहेत. व्यवस्थित चालविणें मुळींच नाहीं ! वल्हीं आहेत तेथेंच असूंद्यात, आपली जागा सोडूं नका, जागचे देखील हालूं नका, मात्र एकाच दिशेनें वल्हवा. अशा तऱ्हेचा एकोपा, वैचित्र्यांमध्यें ऐक्य, यानेंच खास खास प्रगति होते. याप्रमाणें आपापल्या जाग्यावर राहून **तालावर गाणें गात पुढें चला**. राष्ट्राच्या हितास हें अवश्य आहे. प्रत्येक घटकाचें हित पूर्णाच्या ( समष्टीच्या ) हितांत असतें.

अशा तऱ्हेचें वक्तृत्व करणें फार सोपें आहे; परंतु आजपर्यंत इतकीं वर्षें हिंदुस्थानामध्यें प्रेम आणि ऐक्य हीं अभावरूपानेंच कां महशूर आहेत ? याचीं मुख्य कारणें:—

(१) **व्यावहारिक ज्ञानाचें दारिद्र्य**, आणि (२) **लोकसंख्येचा अतिरेक**, हीं आहेत.

---

* लाहोर येथील छात्रसमूहासमोर झालेलें व्याख्यान.

यांचा आतां आपण क्रमानें विचार करूं.

( अ ) व्यावहारिक ज्ञानाचें दारिद्र्य. हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य होण्यापूर्वी खोरासानच्या आलबेरुनीनें या देशांत प्रवास केला होता. तो मोठा ज्ञानसंपन्न, तत्त्वज्ञ आणि बहुश्रुत पंडित होता. संस्कृत भाषा आणि आमचीं धर्मशास्त्रें यांचा त्यानें प्लेटो आणि आरिस्टाटल यांच्या ग्रंथां-इतकाच मोठ्या आस्थेनें अभ्यास केला होता. त्याला हिंदुस्थान जसें दिसलें, तसें त्यानें त्याचें सविस्तर वर्णन करून ठेविलें आहे. हिंदूंचें तत्वज्ञान, काव्य, ज्योतिष यांविषयीं त्यानें बराच आदर व्यक्त केला आहे. आपल्याला भेटलेल्या पंडितांपैकीं कांहींच्या ज्ञानाची त्यानें बरीच वाखाणणी केली आहे, परंतु स्त्रिया आणि सामान्य जनसमूह यांची शारीरिक आणि मानसिक स्थिति अत्यंत शोचनीय होती, असें त्यानें लिहिलें आहे. त्यांनां—नैतिक आणि धार्मिक बाबतींत देखील सर्व तऱ्हेनें गांजलेले, अनाथ आणि पतित, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतींमध्यें विभागलेले, धड नीट विचार देखील करतां न येणारे, व्यसनांनीं शरीरें कमकुवत करून घेतलेले, आणि महंमद गिझनीच्या बरोबर दरवर्षी चाल करून येणाऱ्या मुसलमानांपुढें शिस्तीच्या अभावीं रजःकणाप्रमाणें उडून जाणारे कळपचे कळप—असें त्यानें ह्मटलें आहे. यानंतर बाबरानें देखील येथील लोकांविषयीं असा उल्लेख केला आहे, कीं, हिंदुस्थानांतील लोकांनां हरएक बाबतींत चातुर्य आणि कल्पकता हीं कांहींच नाहींत. वस्तुतः त्यांनां उद्योगधंद्याचा गंधहि नाहीं. ललितकला नाहींत, शिल्पज्ञान नाहीं, बगीचे नाहींत, कालवे नाहींत, बंदुकीची दारूहि नाहीं. मोकळेपणानें एकमेकांत यांनां मिसळतां देखील येत नाहीं, ह्मणून बाबरानें त्यांचा धिक्कार केला आहे. दृष्टिदोष व अतिशयोक्ति यांचा भाग असल्यास तो वगळून देखील वरील विधानें सत्य आहेत, असें आपणांस मोठ्या कष्टानें कबूल करावें लागेल. हिंदू लोकांमध्यें दिसून येणाऱ्या व्यावहारिक ज्ञानाचा अभाव हेंच हिंदुस्थानच्या अवनतीचें कारण होय.

ह्या परकी इतिहासकारांचें ह्मणणें युक्तिवादानें खोडून काढणें 'रामा'ला इतरांप्रमाणें सोपें आहे, परंतु उपयोग काय? त्यांनीं खरी वस्तुस्थिति आणि

वास्तविक गोष्टी लिहून ठेविल्या आहेत. स्वतःसिद्ध प्रमाण मी कसें नाकबूल करूं ? वर सुचविलेल्या व्यावहारिक ज्ञानाच्या अभावामध्यें शारीरिक श्रमाचा तिरस्कार, जात आणि पंथ यांवर निसर्गाच्या विरुद्ध उभारलेले भेद आणि पोटभेद, परदेशगमनाचा वीट, बालविवाह आणि स्त्रियांवर लादलेलें मानसिक आणि शारीरिक गाढ तिमिर, इत्यादि सामाजिक दोषांचा अंतर्भाव होतो. ही सामाजिक अवनति दूर करणें मोठें दुष्कर काम आहे. बर्कनें ह्मटलेलें एक सुंदर वाक्य आहे, कीं, 'सुधारणेचें व आपलें जर पटावयाचें असेल, तर तिला आपल्यापासून दूरच ठेविली पाहिजे!' रूढीच्या पंकांतून सुटका होणें मोठ्या प्रयासाचें काम आहे. कारण, रूढीचीं बंधनें तोडणाऱ्या कर्तृत्ववान् पुरुषांवर समाजाच्या टीकेचा भडिमार होतो आणि तेहि मग समाजावर भरपूर तोंडसुख घेण्यास मागेंपुढें पहात नाहींत; आणि या योगानें अप्रीति, बेबनाव आणि दुही माजते. तेव्हां ही बेकी टाळण्याकरितां आहे हीच स्थिति चालूं द्या, **यद्भावि तद् भवतु** असें ह्मणून आपलें काम भलें कीं आपण भले, अशी शेखी मिरविणें योग्य होईल काय? स्वतःस मोक्ष मिळवावा, मग समाजाचें कांहीं का होईना! अरेरे! ही गोष्ट शक्य असती, तर काय मौज होती! बुडणारा समाज तुह्मांला कधींहि मोकळें सोडणार नाहीं! जर समाज बुडाला तर तुह्मांला त्याबरोबर बुडालें पाहिजे आणि जर समाज वर आला तर त्याबरोबर तुह्मांला वर आलें पाहिजे. सदोष समाजामध्यें एखादी व्यक्ति दोषरहित आणि पूर्ण होऊं शकेल, असें मानणें ह्मणजे शुद्ध वेडपणा आहे! तसें मानणें ह्मणजे हाताला देखील शरीरापासून वेगळें होऊन पूर्ण शक्ति मिळवितां येईल, असें ह्मणण्यासारखें आहे.

वेदांताशीं अगदीं विसंगत असणारी ही कल्पना हिंदुस्थानामध्यें लोकांनीं बरींच वर्षें उराशीं बाळगून ठेविली आहे; आणि त्या योगानें समाज अगदीं विदीर्ण होऊन गेला आहे. होतकरू तरुणांनों! हिंदुस्थानचा भविष्यत्काल तुमचा आहे आणि तुह्मी त्याबद्दल जबाबदार आहां. बहुमताच्या जादूला भित्रे लोकच फशीं पडतात. खरा महानुभाव लोकांचे विचार व अंतःकरणें यांवर सत्ता चालवितो; मग बाहेरील नांवाचा राजा

कोणीहि असो. बी. ए., किंवा एम्. ए., च्या पदव्या शास्त्राच्या विश्वविद्यालयाकडून मिळतात; पण 'धाड' अथवा 'शूर' ही पदवी तुम्ही तुम्हींच मिळवावयाची आहे. बोला, कोणची स्थिति तुम्हांला पसंत आहे? नीच गुलामाची किंवा जीवित्वाच्या स्वामीची? जोमदार आणि शुद्ध चरित्र हेंच इतिहासाच्या उन्नतीचें साधन आहे. **न्यूटनच्या** गतीच्या द्वितीय सिद्धांताप्रमाणें, जें कांहीं अन्य पदार्थावर प्रेरिलें असतां कांहीं विकार (परिणाम) घडवून आणतें, त्याला शक्ति ह्मणतात. शतकानुशतकें या देशांत निसर्गाच्या विरुद्ध असलेले द्वेषभाव व त्यांहून अनिष्ट अनास्था, हे रूढीच्या आणि भोळसटपणाच्या मार्गानें एकसारखे चालले आहेत. यापुढें कुचकामाची झालेली ही गति बदलणारी चैतन्यमय शक्ति सच्छील व सुसंस्कृत तरुणांनों! तुम्हींच झालें पाहिजे. या जुन्या शिथिलतेचा निरोध करा, जरूर असेल तेथें गतीचा ओघ वळवा, अवश्य असेल तेथें गतीचा जोर वाढवा, योग्य असेल तेथें हा लोट बदला; काम करा, उद्योग करा, पुढें चला. वर्तमानकाळच्या परिस्थित्यनुरूप भूतकाळ बदलून जुळवून घ्या आणि निर्भयपणें तुमचा शुद्ध आणि बलवान् वर्तमानकाल भविष्यत् कालाच्या शर्यतीमध्यें निर्धास्तपणें लोटा. आमच्या पूर्वजांनीं ठेविलेल्या मिळकतीशिवाय आमचें चालावयाचें नाहीं. जो समाज ती टाकून देतो, तो बाह्य कारणांनीं, संकटांनीं, नाश पावतो. त्याचप्रमाणें त्या मिळकतीच्या अतिरेकानें आमचें चालावयाचें नाहीं. ज्या समाजामध्यें पूर्वजांच्या मिळकतीचें प्रस्थ फार माजलेलें असतें, तो समाज अंतर्गत कारणांनीं नष्ट होतो. तुमच्या सदाचरणानें समाजामध्यें कलह आणि दुही उत्पन्न होणें शक्य आहे काय? तुह्मांला असें वाटतें तरी काय? **एकटेच जरी असलां, तरी नेट धरा, माघार घेऊं नका!** याचें नांव पौरुष. प्रवाह तुमच्या बरोबर आहे. भरती तुह्मांला अनुकूल आहे. त्यांनां खुशाल भूतकाल घेऊन बसूंद्या. **जर तुह्मी सत्पथापासून ढळलां नाहीं, तर सर्व भविष्यत्-काल तुमचाच आहे.** आतां राष्ट्रविषयीं ह्मणाल, तर ज्यांत सत्यनिष्ठा नाहीं अशी एकी राष्ट्राचा उद्धार करूं शकेल काय? लोकांनां अज्ञानांधकारांत ठेवून त्यांची एकी बनवूं शकाल काय? सर्वांनीं प्रमाद व भोळसरपणा

वास्तवि-.स्य करण्याची शपथ वाहिल्यानें राष्ट्रैक्य साधेल काय? समजा, नाक खलाशी एकाच दिशेनें वल्हवित आहेत; पण ती दिशा मात्र उलटी, ...क्रांतीविरुद्ध व सत्यविन्मुख अशी असली तर हें वल्हवणें इष्ट आहे काय? अशी नौका खात्रीनें खडकावर आपटून तिचा चुराडा उडणार! आणि हें जितकें लवकर होईल तितकें उत्तमच! देवलोकींच ऐक्य संभवनीय आहे. सत्य आणि पावित्र्य या तत्वांनींच ऐक्य शक्य आहे. राष्ट्रैक्येच्छुहो! प्रथम तुह्मीं राष्ट्राला असंख्य अमानुष प्रमादांपासून मुक्त केलें पाहिजे. आणि जर मानवजातीच्या कल्याणाकरितां, सत्याकरितां आणि प्रगतीकरितां केव्हां केव्हां जनसमूहाला त्रास होत आहे आणि केव्हां केव्हां पुढाऱ्यांचा छल होत आहे अशी स्थिति प्राप्त झाली, तर त्यावरून हेंच सिद्ध होतें, कीं, देशांतील शुद्ध चैतन्य कायम आहे आणि श्वासोच्छ्वासाची क्रिया खालींवर अशी बरोबर होत आहे.

दिव्य सदाचारामध्यें दुःखाचा लेश नसतो. तो सदाचार ह्मणजे प्रेम आणि ज्ञान सर्व बाजूंनीं पसरविणारी सर्वोत्तम शांतिच होय. ज्या समाजामध्यें ज्ञानाचा प्रकाश त्रासदायक वाटतो, तेथें दुःखरहित शांति आणि उदयोन्मुख प्रकाश हीं दोन्ही एकत्र वास कशीं करतील? जर तुमच्या कार्याचा धर्मच असा असला, कीं, तुह्मांला आदर्शरूप राहतां येत नाहीं, तर निदान सरळ, खरेपणानें वागा; ह्याचीच अधिक वाण आणि आवश्यकता आहे. **देशाची वळकटी कोत्या विचाराच्या मोठ्या लोकांनीं वाढत नाहीं; तर उदात्त विचाराच्या साध्या लोकांनीं वाढते.** शांति हवी होय? जनावराचें जाड्य शांतिदायक असतें; तसेंच उदास स्मशानभूमि देखील शांतिदायक आहे. आह्मांला जीवंतपणाची शांति पाहिजे, मृतांची नको! लोक अज्ञानांधकारांत ठेंचळत असतां आपला प्रकाश दडवून ठेवणें, हें आपल्याजवळ प्रकाश नसण्याहून अधिक वाईट आहे. आणि जो मनुष्य स्वतःस माहीत असलेलें उपयुक्त ज्ञान ऐन वेळीं सांगत नाहीं, तो आपला पहारा सोडून देणाऱ्या शिपायाप्रमाणें गुन्हेगार ठरतो.

(**ब.**) आतां आपण लोकसंख्येच्या प्रश्नाकडे वळूं. **माल्थस** आणि इतर अर्थशास्त्रवेत्यांनीं या विषयासंबंधीं जें कांहीं लिहिलें आहे, त्याचा ऊहापोह

करण्याची आज येथें जरूरी नाहीं. माल्थसचें ह्मणणें ह्मणजे प्राणिशास्त्राच्या (Biology) सिद्धांतांचा पुनरुच्चार होय. याच मुद्यावर निसर्गशास्त्रवेत्त्यांचें (Naturalists) काय ह्मणणें आहे तें आपण पाहूं. हक्सलेनें एखादी वसाहत अथवा एखादा समाज याला अरण्यांतील एका उपवनाची उपमा दिली आहे. सामाजिक उन्नतीचा क्रम, किंवा तो ह्मणतो त्याप्रमाणें नैतिक क्रम, बागकामासारखा असतो; परंतु हे दोन्ही क्रम, स्वच्छंद, स्वैर अशा निसर्गक्रमाच्या ( सृष्टिक्रमाच्या ) विरुद्ध आहेत. सृष्टिक्रमामध्यें अविरत आणि तीव्र जीवनार्थकलह असतो; उद्यानक्रम अथवा नैतिकक्रम यांमध्यें त्या कलहास फांटा दिलेला असतो, त्या कलहाचें मूळ कारणच नाहींसें केलेलें असतें. ह्या सर्व क्रमांचें अभिन्नत्व सिद्ध करण्याकरितां हेनरी ड्रूमंडनें बरीच धडपड केली आहे; पण इतकें वाग्जाल करूनहि डार्विन आणि हक्सले यांच्या सिद्धांताच्या पुढें तो एक तसुभरहि जात नाहीं; आणि खरोखर डोकें शाबूत असलेला कोणीहि मनुष्य नाकबूल करणार नाहीं, कीं, जर बागवानानें बेणून झुडपांची उत्पत्ति एकसारखी कमी केली नाहीं, तर पुन्हा सृष्टिक्रम प्रस्थापित होऊन तो शांति आणि समृद्धि यांनां हद्दपार करून त्या जागीं विरोध आणि कलह सुरू करून भयंकर संहार करील. त्याचप्रमाणें एखाद्या समाजामध्यें वाढीची किंवा प्रसाराची परमावधि झाली असतां, फाजील लोकसंख्येची सोय लावण्याची व्यवस्था केली नाहीं, तर पुन्हा भयंकर कलह सुरू होईल, शांति नष्ट होईल, नैतिकक्रमाचा कोंडमारा होऊन नीतितत्वांचा नाश होईल आणि ईश्वराच्या आज्ञा फोल होतील. अशा संधीलाच राष्ट्राची अवनति आणि नाश यांनां निःसंशय प्रारंभ होतो. रोम, ग्रीस किंवा इतर कोणत्याहि देशाच्या अवनतीच्या किंवा नाशाच्या मुळाशीं हाच लोकसंख्येचा प्रश्न होता. हिंदुस्थानावर हा लोकसंख्येच्या वाढीचा आणीबाणीचा प्रसंग पूर्वींच येऊन ठेपला आहे; परंतु तो टाळण्याची आपण कांहींच तरतूद केली नाहीं. पृथ्वीतलावर दारिद्र्य आणि लोकसंख्या यांनीं पूर्ण व्यापलेला हिंदुस्थानासारखा कोणताहि देश नाहीं. हिंदुस्थानांतील एखादें सर्वसाधारण कुटुंब राष्ट्राच्या स्थितीचें सूचक चित्र आहे. उत्पन्न थोडें आणि दरवर्षी खावयास काळ अशा संततीची वाढ,

एवढेंच नव्हे, तर निरर्थक आणि निर्दय समारंभांमध्यें अवास्तव खर्च! हीच स्थिति सार्वत्रिक आहे. जेव्हां एकदोघांला पुरेशी वैरण असते आणि खाणारे मात्र कळपचे कळप असतात, तेव्हां गोठ्यांतील गुरांनां देखील एकमेकांशीं मरे तोंपर्यंत लढलें पाहिजे. कलहाचें बीज नाहींसें न करतां लोकांनां शांतीचा उपदेश करणें, ह्मणजे उपदेशाची थट्टा करण्यासारखें आहे. माझे देशबांधव अंतःकरणानें गरीब आणि शांतताप्रिय आहेत; त्यांचें मन अनुकूल आहे; परंतु परिस्थितीनेंच जर त्यांच्यावर मानसिक दौर्बल्य लादलें, तर मत्सर आणि आप्पलपोटेपणा केल्यावांचून त्यांचें कसें भागणार? जोंपर्यंत लोकसंख्येचा हा प्रश्न आपण सोडविला नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रैक्य आणि अन्योन्यप्रेमभाव यांविषयींची सर्व बडबड मनोराज्यच होईल! आह्मांला या **यक्षप्रश्नां**चें कोडें उलगडलें पाहिजे. नाहीं तर मरून गेलें पाहिजे. प्राणिशास्त्राच्या तत्वाप्रमाणें आपल्या संगतीच्या प्राण्यांला दुःख आणि हाल सोसावे लागतात; अशा परिस्थितींत सहानुभूति आणि निस्पृहता ( निःस्वार्थ ) यांची वाढ होणें अशक्य आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळें वाढणारें अशा तऱ्हेचें दारिद्र्य तुमच्या सभोंवतीं असतांना, हिंदवासीयांनों! प्रेम आणि सहानुभूति यांची जोपासना करणें हें जवळजवळ अशक्यच आहे. पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास करणारांनां हें अवगत आहे, कीं, जोंपर्यंत कोणत्याहि जड पदार्थांतील घटक परमाणू परस्परांशीं योग्य अंतरावर राहून एकमेकांच्या गतींच्या आड न येतां आपल्या नियमित चलनवलनक्रिया करितात, तोंपर्यंत त्या पदार्थांची अंतःस्थिरता ( Equilibrium ) टिकून त्याचें स्वरूप कायम राहतें. आतां हिंदराष्ट्राच्या शरीराची काय वाट? त्यांतील घटकव्यक्तींनां परस्परांशीं घर्षण केल्याशिवाय आपल्या नियमित चलनवलनक्रिया करितां येतात काय? मोकळेपणानें आपली नैसर्गिक गति चालविण्यास त्यांनां वाव आहे काय? जर एकाचें पोट भरण्यास दहांनां उपाशीं मरावें लागत आहे, तर राष्ट्रीय अंतःस्थिरता कायम राखण्यास कांहीं तरी तांतडीच्या उपायांचा अवलंब केला पाहिजे. असें केलें नाहीं, तर हिंदुस्थानचा दुसरा एकच तरणोपाय ह्मटला ह्मणजे निर्घृण सृष्टिक्रमाच्या पाहुणचाराच्या तावडींत सांपडणें हा होय! आणि

आमच्यासारखी निकराची स्थिति जेथें आली असेल तेथें सांथ (प्लेग), दुष्काळ, संहारकारक लढाया आणि भूकंप हाच सृष्टिक्रमाचा पाहुणचार होय, असें महर्षिव्रसिष्ठजींनीं सांगून ठेविलें आहे.

अरिष्टांविषयीं एवढें पुरे. आतां यावर उपाय काय?

## उपाय बहुविध आहेत.

(१) हिंदुस्थानच्या बाहेर पाऊल टाकलें असतां स्वर्गाचें द्वार बंद होतें, ही दुष्ट कल्पना या देशांतून पार कायमची निघून गेली पाहिजे, आणि ज्यांचा या देशांत उदरनिर्वाह होत नाहीं त्यांनींहि त्या कल्पनेबरोबरच देश सोडून गेलें पाहिजे. चला, चालते व्हा, देशांतर करा. कूपमंडूक होण्यांत तुह्मांला काय सुख आहे? येथें राहून तुह्मी या रम्य हिंदुस्थानाची स्वतःलाच गुदमरून टाकणारी अंधारकोठडी बनवून टाकित आहां, हें तुमच्या लक्ष्यांत येणार तरी कधीं?

(२) हिंदुस्थानामध्यें पूर्वी असा एक काळ होऊन गेला, कीं, तेव्हां येथील आर्य वसाहतवाल्यांनां विपुल संतति असणें ह्मणजे एक मोठें भाग्यच असे; पण ते दिवस आतां गेले. आतां परिस्थिति बदलली आहे आणि लोकसंख्येच्या प्रचंड वाढीकडे पहातां मोठें कुटुंब असणें हें सांप्रत एक प्रकारचें दुर्दैवच होऊन बसलें आहे. मरणानंतर स्वर्गप्राप्ति पुत्र असण्यावर अवलंबून आहे, अशो पोरकट कल्पनेला अजून चिकटून राहणाऱ्या अविचारी मनुष्याला जरा डोळे उघडून पाहूंद्या, ह्मणजे त्याला असें कळून येईल, कीं, सांप्रतकाळीं संततीची वृद्धि करून आपल्या मरणापूर्वींच आपण आपलें घर नरक बनवून टाकित आहों! भोगैश्वर्य इच्छिणाऱ्या लोकांची निंदा करण्याकरितां श्रीकृष्णांनीं गीतेंत, दुसऱ्या अध्यायांत ४२ ते ४५ श्लोक सांगितले, त्या वेळीं '**अपुत्रस्य गतिर्नास्ति**' हा अर्जुनाचा मुद्दा भगवंतांचे डोळ्यांसमोर होता. हे श्लोक तुह्मीं वाचून त्यांतील स्वतंत्र बाण्याचे विचार ग्रहण करणें तुह्मांला योग्य आहे.

> **'करावें लग्न झ्व्यासें, प्रजोत्पादनही तसें,**
> **राहावें गाढ अज्ञानीं, मरावें दास्यकर्दमीं!'**

एवढें हें जें घातुक तत्व आजपर्यंत आमच्यावर अंमल चालवित आहे, त्याला देशांतून पिटाळून लाविलें पाहिजे. आपण आपल्या खालावलेल्या स्थितीबद्दल केव्हां केव्हां मुसलमान राजांनां दोष देतों, केव्हां केव्हां ब्रिटिश सरकाराला दोष देतों; एखादे वेळीं आपण हिंदुस्थानच्या धर्मांनां जबाबदार धरितों, तर दुसरे वेळीं शिक्षणपद्धतीला नांवें ठेवितों. कांहीं अंशीं ही आपली टीका बरोबर असूं शकेल; परंतु जगांतील अत्यंत पवित्र संबंध, ज्यापासूनच हिंदुस्थानांतील सर्व लोक उत्पन्न झाले आहेत आणि ज्या योगानेंच ते आज ज्या स्थितींत आहेत ती त्यांनां प्राप्त झाली आहे असा संबंध —विवाहसंबंध—कलुषित करणाऱ्या अपवित्रतेच्या माथींच हा सर्व दोष मारिला पाहिजे. अतिशय महत्त्वाची आणि अतिशय पवित्र अशी ही संस्था अतिशय निष्काळजीपणानें, अत्यंत अविहित रीतीनें आणि पूर्ण निर्लज्जपणानें पाळण्यांत येत आहे. पत्रिका पाहिल्या, मुहूर्त काढले, मंगलाष्टकें म्हटलीं, स्तोत्रें गाइलीं आणि असंख्य पवित्र संस्कार केले, तरी देखील हिंदुस्थानांतील लग्नें कुमुहूर्तावर, अमंगल व अपवित्र अशींच होतात. आपल्या अनुकूल स्थानबलाच्या जोरावर विवाहित होणारें कोमल, अपरिपक्क जोडपें पाहून आकाशांतील कोणतेहि ग्रह आपल्या मंगल स्थानांत राहण्यास धजणार नाहींत! असा हा अमानुष—पशूंनांहि नीच वाटणारा प्रसंग पाहतांच ते ग्रह चळचळ कांपतात आणि स्वस्थानापासून च्युत होतात! आपल्या पायांवर उभें राहतां येत नाहीं अशा जोडप्याच्या अधर्म्य (Profane) लग्नाला धार्मिक स्वरूप देऊन तें पवित्र करण्याचें काम वैदिक मंत्र करित नाहींत; एवढेंच नव्हे, तर त्यांचें सर्व सामर्थ्य नष्ट होतें व तेव्हांपासून ते कायमचे फोल आणि कुचकामाचे होतात. देशामध्यें अयोग्य, कर्तृत्वहीन, निरुपयोगी, परोपजीवी प्राणी उत्पन्न करण्याकरितां निर्धनाचा विवाह लावणाऱ्या विधीच्या अधर्म्य दर्पापुढें कोणतीं सुमनें आपलें माधुर्य कायम ठेवूं शकतील?

तरुणांनों! हा सर्व प्रकार बंद पाडा, बंद पाडा. हिंदुस्थानच्या भविष्यत् कालाबद्दल जबाबदार असणाऱ्या तरुणांनों, तो बंद पाडा. आपल्या

नीतीसाठीं, हिंदुस्थानच्या नांवासाठीं, आपल्या स्वतःसाठीं आणि स्वतःच्या वंशजांसाठीं कृपा करून सारासारविचाररहित, अवेळीं व अंधपणानें केले जाणारे विवाह बंद पाडा. त्यायोगें प्रजा पावन होईल, आणि लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न कांहीं अंशीं सुटेल.

या सूचना सृष्टिक्रमाविरुद्ध आहेत असें तुह्मांला वाटतें काय? या सूचना तुह्मीं पाळल्याच पाहिजेत, नाहीं तर तुह्मांला क्षीण करून टाकणारा दुष्काळ व खितपत पडून येणारें मरण, याच शिक्षा भोगाव्या लागतील, यांत तिळमात्र अतिशयोक्ति नाहीं. निष्ठुर वस्तुस्थिति आणि भ्यासुर सत्य हीं वरील शब्दांत गच्च भरलेलीं आहेत. शिशुविवाह आणि बालवैधव्य ह्या गोष्टी जगांत पूर्ण निसर्गविरुद्ध नाहींत काय? पृथ्वीवरील कोणत्याहि सुधारलेल्या समाजास विचारा. तुमच्यामध्यें जर कांहीं माणुसपणाचा व भूतदयेचा लवलेश उरला असला, तर या अमानुष आणि निसर्गविरुद्ध चालींनां आळा घातल्याशिवाय तुमच्यानें स्वस्थ तरी कसें बसवेल? वैधव्य ग्रास झालेलीं अर्भकें नकळत आपले कोमल हात साहाय्यार्थ पुढें पसरत आहेत! धडधडीत तुमच्या डोळ्यांसमोर रूढिरूपी अग्नीनें चेतविलेल्या चितेवर जीवंत सती अंशाअंशानें दग्ध होत आहेत! तुमच्याकडून साहाय्य होईल अशा अपेक्षेनें त्यांच्या निष्पाप अश्रुपूर्ण नयनांतून प्रत्यक्ष ईश्वरच तुह्मांकडे पहात आहे! त्या रुदन करणाऱ्या भवानीची किती दिवस तुह्मी उपेक्षा करणार? तिच्या या आक्रंदनाकडे यापुढें जरा दुर्लक्ष्य करा, कीं, ती सूड उगविणारी व उग्र अशी **चंडिकादेवी**( Nemesis )बनलीच असें समजा! तिला पाहून धरणी देखील चळचळां कांपते. लोक "शांतता शांतता" ह्मणून ओरडतात. जोंपर्यंत देशामध्यें आह्मीं होऊन बोलाविलेली ही **चंडिकादेवी** वास करित आहे, तोंपर्यंत देशाला शांतता कशी मिळणार? यूरोपामध्यें मनुष्य जितक्या कमी दर्जाचा तितका तो अधिक लवकर लग्न करून घेतो; तथापि तिकडील अतिशय हलक्या दर्जाचे लोक देखील हिंदुलोकांइतकें लहानपणीं कोणीहि, लग्न करून घेत नाहींत. उच्च दर्जाचे लोक तर तीस वर्षांचे आधीं क्वचितच लग्न करून घेतात. त्यांची कल्पना अशी आहे, कीं, मुलें थोडींच व्हावीं, पण तीं चांगलीं, सुदृढ निपजावीं.

हर्बर्ट स्पेन्सरनें आपल्या 'प्राणिशास्त्राचीं मूलतत्वें' या पुस्तकामध्यें असें ह्मटलें आहे, कीं, मानसिक शक्तीच्या वाढीबरोबर प्रजोत्पादनशक्ति कमी झालीच पाहिजे. सर्व प्राण्यांस साधारण अशा प्रजोत्पादनशक्तीकडे लक्ष्य देण्याइतके मागसलेले आपण किती दिवस राहणार? ब्रह्मचर्याच्या महत्त्वाची एकसारखी स्तुति करणारीं आमचीं शास्त्रें असें सांगतात, कीं, **पावित्र्यावांचून** आध्यात्मिक अथवा शारीरिक बल प्राप्त होणार नाहीं. विषयवासना व विषयोपभोग यांमधील वीर्यरूपी मानवीशक्तीचा निरोध केला असतां तिचें ओजस् ह्मणजे अक्षय्य आध्यात्मिक तेज यामध्यें रूपांतर होतें.

तुह्मीं कामवासनेवर ताबा मिळविला पाहिजे. जो मूर्ख ही पशुवृत्ति आपल्या ताब्यांत ठेवूं शकत नाहीं आणि जगांतील अतिशय महत्त्वाचा संबंध –संभोगसंबंध (Sex relation) याचा उपमर्द करितो, त्याला हें माहीत नाहीं, कीं, तो अक्षरशः आपल्या रक्ताचाच—प्रत्यक्ष प्राणच अशा आपल्या वीर्याचाच–अपव्यय करित आहे. या दिव्यशक्तीचा अयोग्य उपयोग करणें हें सर्व पापाचें मूळ आहे. अस्थानीं पडलेली संपत्ति ह्मणजेच कचरा होय. कामवासनांनां 'पशुवृत्ति' असें जें विशेषण लावलें आहे, त्यावरून त्यांचें नीचत्व व्यक्त होतें. पशु, बेसुमार प्रजोत्पादनामध्यें मूर्ख आणि नीच असतात खरे. त्यांच्यामधील अति वाढ आणि त्यामुळें उत्पन्न झालेला दारुण जीवनकलह यांनींच त्यांच्या वर्तनास बट्टा लाविला आहे. तरी पण फक्त सुखलालसेनेंच पाहिजे तेव्हां विषयोपभोग घेण्याचा गुन्हा त्यांच्या हातून कधींहि घडत नाहीं. मनुष्य हा पशूंहून श्रेष्ठ गणला जातो. कारण, त्याच्या वासना विवेकाच्या आधीन असतात. मग जे मनुष्य बेसुमार प्रजोत्पादनामध्यें पशूंची बरोबरी करितात व अनावश्यक आणि गलिच्छ विषयोपभोगामध्यें पशूंहूनहि अधिक मग्न होतात, त्या मनुष्यांनां कोणती नीच स्थिति येणार नाहीं आणि त्यांवर कोणती आपत्ति ओढवणार नाहीं?

**पावित्र्य!** पावित्र्य! तरवारीच्या धारेवर तुह्मांला पावित्र्य संपादिलें पाहिजे. पावित्र्य राखा, नाहीं तर ठार झालांच ह्मणून समजा! जर तुह्मी

पावित्र्य संपादणार नाहीं, तर निर्घृण उत्क्रांतिचक्र तुह्मांला पार चिरडून टाकील. आजकाल तर पावित्र्य ह्याच तुमचा तरणोपाय आहे. ज्याप्रमाणें रानटी लोकांमधील अगदीं जवळच्या नातलगांमध्यें शरीरसंबंध उत्क्रांतिक्रमानें बंद केला, त्याचप्रमाणें हिंदवासीयांनों! जर तुह्मांला आज जगावयाचें असेल, तर तुह्मांला आपलें आचरण व आपलीं मनें स्वच्छ व पवित्र ठेविलींच पाहिजेत. एवढें जर तुह्मांमध्यें कमी पडलें, तर तुह्मीं जीवंत राहणेंच अशक्य आहे. हें काम कठिण असो वा सोपें असो, तुह्मीं तें साधलेंच पाहिजे. आपल्या देशाकरितां, आपल्या धर्माकरितां, आपल्या देहाकरितां व आपल्या मनाकरितां, या लोकाकरितां किंवा परलोकाकरितां तुह्मांला **पूर्ण पवित्र** राहिलें पाहिजे. **पावित्र्यावांचून शौर्य नाहीं, पावित्र्यावांचून ऐक्य नाहीं व पावित्र्यावांचून शांति नाहीं!**

बाह्य ( शारीरिक ) किंवा अंतर्गत ( आध्यात्मिक ) बल पवित्रतेशिवाय दुसऱ्या कशानेंहि मिळणार नाहीं. टेनिसनचा सर गॅलाहेड ह्मणतोः—

**न च मीं अनुभविलें स्त्रीमुखपंकजचुंबनासि केव्हांही,**
**प्रमदाकरकमलातें मम पाणिभ्रमर स्पर्शला नाहीं!**

आणि ह्मणूनच

**अद्भुत मम शक्ति असे, निःसंशय कीं दहांसि मी भारी!**
**कारण, माझे अंतरिं निर्मलता ही सदैव वास करी.**

**मेघनादाचा** ( इंद्रजिताचा ) पराभव, ज्याच्या मनामध्यें पूर्ण बारा वर्षें विषयेच्छेचा प्रवेश झाला नाहीं अशा मनुष्याखेरीज कोणाच्यानेंहि होणें अशक्य होतें; आणि **लक्ष्मणजी** असे ( बारा वर्षें पूर्ण ब्रह्मचर्य व्रत पाळलेले ) होते. ब्रह्मचर्याच्या जोरावरच **भीष्म** इच्छामरणी झाले. ह्या ब्रह्मचर्याच्या वज्रकौपीनत्वामुळेंच वज्रदेही **मारुतिरायास** अमर्याद बल प्राप्त झालें. कोठें कोठें इंग्रजी वर्तमानपत्रांनीं 'अविवाहित स्थिति दीर्घायुष्यास अपायकारक आहे, अशा प्रकारच्या ब्रह्मचर्याविषयीं खोटसाळ कल्पना पसरल्या आहेत. पारिस आणि एडीनबरो येथील खानेसुमारीच्या विशिष्ट रिपोर्टांवरून हें मत त्यांनीं ठरविलें आहे. त्यांच्या इतक्या या श्रमावरून एवढेंच

सिद्ध होतें, कीं, त्या देशामध्यें अशक्त, गरीब, रोगी किंवा अन्य कारणांनीं मृत्युपंथास लागलेल्या लोकांचा विवाह होण्याचा क्वचितच संभव असतो. या रिपोर्टावरून अविवाहित स्थितीनें अकालीं मृत्यु येतो असें सिद्ध करणें, ह्मणजे कार्यकारणाचा विपर्यास करणें होय. सर **ऐझाक न्यूटन, हर्बर्ट स्पेन्सर**, इम्यानुएल, **क्यांट**, कवि **ग्रे, स्वेडनबर्ग** इत्यादिकांच्या दीर्घ व यशस्वी जीवनक्रमाच्या उदाहरणांवरून त्यांच्या देशामध्यें देखील अविवाहित स्थितीचा दीर्घायुष्याशीं विरोध नाहीं, हें चांगलें दिसून येतें.

परवां एका गृहस्थानें एक गुलाबाचें फूल तोडून तें आपल्या नाकास लाविलें. तो वास घेतो न घेतो तोंच एक मधमाशी त्याच्या नाकाच्या टेंभीस सडकून डसली, त्यामुळें त्याला असह्य वेदना झाल्या. विषयोपभोगाच्या प्रत्येक गुलाबामध्यें विखारी मधमाशी असतेच, ही गोष्ट विसरूं नका. **विषयोपभोगाला एकदा बळी पडल्यानंतर तज्जन्य आध्यात्मिक मृत्यु कोणालाहि टाळतां यावयाचा नाहीं.** हा कठोर ईश्वरी नियम असा आहे. आपणास तो मोडतां यावयाचा नाहीं. वनिताविलासाच्या विषमय वारुणीचा आस्वाद घेतांच, **सॅमसनचें** ( वायबलांतील भीमसेन ) सर्व अतुल सामर्थ्य पार नाहींसें झालें. **नेपोलियनाचा** विनिपात होण्याच्या पूर्वरात्रीं तो प्रेमवश होऊन क्षुद्र विलासांत मग्न झाला होता. ज्या ठिकाणीं हिंदूंचें सर्व वैभव लयाला गेलें, त्या समरांगणीं जात असतां **पृथ्वीराजाच्या** कमरेचा शेला त्याच्या राणीनें आवळला होता. क्षत्रिय कुलाचा जेथें निःपात झाला त्या कुरुक्षेत्रावर ज्या दिवशीं अतुल प्रतापी **अभिमन्यु** पडला होता त्याच्या पूर्वरात्रीं तो कोणत्या मोहाला बळी पडला, हें लक्ष्यांत आणा. विषयोपभोगाच्या जो स्वाधीन झाला त्याला जय मिळण्याचा कांहीं संभव नाहीं. **विषयाच्या मोहाला जो वळत नाहीं तो निःसंशय सर्व जगाला वळवील!** कामवासना आणि क्षुद्र उपभोग टाकून देऊन त्या जागीं शुद्ध, उज्वल आनंदाचे व्यासंग आले पाहिजेत. कोणत्याहि सत्याचा बोध झाला असतां जो परम आनंद व हर्षातिरेक होतो तो कोणत्याहि क्षुद्रवासनेपासून प्राप्त होत नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्रामध्यें उष्णतेची यांत्रिक तुल्यशक्ति ( Mechanical Equivalent of heat ) या

विषयीं सांगितलें आहे; ज्यूलची **तुल्यशक्ति** (Joule's Equivalent) या नांवानें ही प्रसिद्ध आहे. विषयवासनांची देखील आध्यात्मिक तुल्यशक्ति (मोबदला) असते. नीच शक्तीचें नैतिक शक्तीमध्यें रूपांतर करा, क्षुद्र मनोविकार जाळून त्यांची दिव्य ज्योत ( भक्तिभाव ) पाजळा, आणि जेथें जाल तेथें सामर्थ्य आणि शांति यांचा प्रसार करित साक्षात् आनंदरूपानें विहार करा.

**शिक्षण**—अमेरिका व इंग्लंड येथील शाळेंतील शिक्षण न मिळालेले लोक आपल्या इकडील विश्वविद्यालयांत शिकणाऱ्या साधारण विद्यार्थ्यांहून अधिक हुशार असतात, हें कसें ? तर त्यांच्या शिक्षणाचें मुख्य साधन स्वस्त दैनिक वर्तमानपत्रें होय. इंग्लंड, जपान आणि अमेरिका येथें लोकांमध्यें विश्वविद्यालयापेक्षां वर्तमानपत्रें ज्ञान अधिक पसरतात. आमच्या देशामध्यें कांहीं थोड्या शिक्षणाचा प्रसार केल्याबद्दल सरकारचे आणि इतर संस्थांचे आह्मी आभारी आहों; परंतु खरें पाहूं गेलें असतां हें शिक्षण ह्मणजे कांहींच नाहीं. आमच्या सामान्य जनसमूहांतील अज्ञान आणि स्त्रियांची भयंकर अवनत स्थिति, यांचा दोष आमच्याकडेच येतो. नीच कृत्यें आणि अकृत्यें ( अकर्म ) करण्यामध्यें ज्या शक्तीचा भयंकर अपव्यय होत आहे, त्या शक्तीचा उपयोग करून स्त्रियांची उन्नति करा, सामान्य-जनांनां शिक्षण द्या, आत्मोन्नति साधा आणि राष्ट्रोद्धार करा. हें सर्व साधण्याचा अत्यंत सुलभ आणि सरळ मार्ग ह्मटला ह्मणजे देशी वर्तमानपत्रांची स्थिति सुधारणें, हें होय. स्त्रिया आणि सामान्यजनसमूह यांनां समजण्याजोग्या भाषेंत खरोखर उपयुक्त अशीं नवीन वर्तमानपत्रें काढा, अथवा असलेलीं सुधारा. मला वाटतें, या दिशेनें एकदोन प्रयत्न झाले आहेत; परंतु त्यांनां यश आलें नाहीं. याचें कारण, बहुतेक प्रबुद्ध विद्यार्थ्यांनां देशी भाषेंत लिहिलेलें असें कांहींहि हातांत घेण्याची लाज वाटते. आपल्या जन्मभाषेचा अभिमान बाळगण्यास तुह्मीं शिकलें पाहिजे. 'यंग मेन्स इंडियन असोशिएशन' एखादें देशीभाषेंत वर्तमानपत्र काढूंद्या. भाषा सरळ आणि सोपी हिंदी असावी. शक्य तितके संस्कृत आणि फारशी शब्द टाळा. आपल्याला सराव नाहीं अशा भाषापद्धतीमध्यें लिहिण्याचा मोह टाकून द्या. जसा विचार

येईल तसें स्वाभाविक रीतीनें लिहा. कोणाचेंहि अनुकरण करूं नका. कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं लहानलहान लेख द्यावेत. तुमच्या वाचनामध्यें ज्या कांहीं चित्ताकर्षक कल्पना आणि उदात्त विचार आढळतील ते तुमच्या जन्मभाषेंत व्यक्त करण्याचा मधूनमधून प्रयत्न करा. लोकांनां वाटेल, कीं, यापासून तुमच्याहून वाचकांचाच अधिक फायदा आहे; परंतु खरोखर पाहातां त्यांत तुमचाच अधिक फायदा आहे. या कामीं बारीकसारीक गोष्टींनां तुह्मीं कंटाळूं नये. पहिल्या अंकांत हिंदी वर्ण आणि सोपे सोपे शब्द असूंद्यात आणि मग हल्लीं देशांतील शिक्षणाचे व ज्ञानाचे आद्यगुरु ( Pioneers ) असलेले विश्वविद्यालयीन विद्यार्थी हे लिहितां वाचतां न येणाऱ्या आपल्या आयाबहिणी, बायकामुली आणि इतर नातेवाईक स्त्रिया यांनां लिहिणेंवाचणें शिकविण्याची कामगिरी हातीं घेऊंद्यात. सार्वजनिक शाळा सुरू होई तोंपर्यंत वाट पाहूं नका. ही पवित्र कामगिरी तुमच्यावर येऊन पडली आहे. जर हिंदुस्थान जगावयाचें असेल तर स्त्रीशिक्षणाचा जोरानें फैलाव झाला पाहिजे. मग हें काम तुमच्याच हातानें कां सुरू होऊं नये ? तुमच्या प्रांतामध्यें कोणीहि स्त्री अथवा कोणीहि गरीब मनुष्य अक्षरशत्रु राहणार नाहीं, एवढी खबरदारी घ्या. देशावरील हा अज्ञानाचा कलंक धुऊन टाका. आपल्या आळींतील महारिणीभंगिणींनां शिकविण्याची तुह्मांला लाज किंवा भीति वाटते काय ? वाटत असेल तर धिक्कार असो तुमच्या रीतिभातींला आणि नीतिमत्तेला ! गोरगरीबांमध्यें त्यांनां मातृप्रेमानें शिक्षण देण्याकरितां मिसळा. किती सात्विक आणि पवित्र काम हें ! 'यंग मेन्स इंडियन असोशिएशन'च्या पत्रामध्यें हळुहळू पदार्थविज्ञानशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, ज्योतिषशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र इत्यादि शास्त्रांतील मूलतत्त्वें ग्रथित केलेले सोपे धडे, शक्य तितक्या सुलभ आणि मनोरंजक भाषेंत द्यावे आणि हळुहळू भाषासुद्धां प्रौढ करित जावी. या पत्राची लिपी हिंदीच असावी अशी 'रामा'ची शिफारस आहे. कारण, हिंदी लवकरच राष्ट्रीय भाषा होण्याचा रंग दिसत आहे.

**अन्न**–अन्नाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. पाकशास्त्राचीं मूलतत्त्वें योग्य रीतीनें पाळलीं असतां तुमच्या मनाचा जोम व शारीरिक सामर्थ्य हीं बरींचशीं वाढतील. जर तुह्मांला शक्तीचें मुख्य उगमस्थान–अन्न–याविषयीं सम्यक् ज्ञान असेल, तरच निरर्थक होणारी शारीरिक झीज आणि शक्तीचा शोचनीय अपव्यय हीं बहुतेक भरून काढतां येतील. 'काय खावें' व 'कसें खावें' ह्याचा शास्त्रीय दृष्टीनें तुह्मी स्वतः अभ्यास करा, आणि आह्मां सर्वांनां अन्न देणाऱ्या स्त्रियांनां हें यथार्थ भोजनशास्त्र शिकवा. हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गानें सर्वांनां आधारभूत असा हा आहारविषयक प्रश्न अद्याप सोडविला नाहीं, ही शोचनीय गोष्ट आहे; आणि आधुनिक शास्त्रें शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनां देखील या विषयाची कांहीं विशेष माहिती नसते आणि त्यांनांहि औषधें, निकोटीन ( तंबाखूंतील विषारी द्रव्य ) आणि इतर मादक पदार्थ यांचाच आश्रय करावा लागतो, ही तर अत्यंत लज्जास्पद गोष्ट होय.

स्त्रिया आणि गरीबलोक यांनां शिक्षण देण्याचें मुख्य कर्तव्य तुमच्या-पुढें आहे, आणि हें चांगल्या रीतीनें बजावित असतां अखेरीस तुमची उन्नति झालीच पाहिजे; परंतु हेंहि पण विसरूं नका, कीं, सुधारलेल्या देशांतून कृषिकर्मविद्या आणि इतर उद्योगधंदे यांची उपयुक्त माहिती मिळवून ती हिंदुस्थानभर पसरण्याचें अधिक निकडीचें व अधिक महत्त्वाचें कर्तव्य तुमच्यापुढें आहे.

**धर्म**–प्रापंचिक, सामाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्यें हेंच तुमचें कर्मकांड होय. कोणतेंहि नांवाजण्याजोगें कर्म अंधारांत करतां यावयाचें नाहीं. कृष्णकृत्येंच अंधारांत करितां येतात. श्रद्धेची आणि दिव्य ज्ञानाची ज्योत हृदयांत पाजळत ठेविल्याशिवाय तुह्मांला कांहींहि साध्य व्हावयाचें नाहीं; किंबहुना, एकहि पाऊल पुढें टाकतां यावयाचें नाहीं. या ज्या सर्व योजना व सूचना तुमच्या कानींकपाळीं ओरडल्या जात आहेत, त्या सर्व तुमच्या जीविताचें फक्त बाह्यांग होत; परंतु चैतन्यावांचून शरीर टिकणार नाहीं. **खरी श्रद्धा व दिव्य ज्ञान हींच सर्व यशस्वी चळवळीचें चैतन्य होत.** जडवाद, स्याद्वाद (संशयवाद) निरीश्वरवाद, नास्तिकवाद आणि अज्ञेयवाद यांच्या पुरस्कर्त्यांनां जें यश मिळत आहे,

त्यांतील देखील बीज त्यांच्यामधील त्यांनां न कळत असलेली धार्मिकवृत्ति हेंच होय. कांहीं उदाहरणांमध्यें धर्माभिमानी ह्मणून मिरविणाऱ्या लोकांपेक्षां ह्या लोकांनीं धर्म आपल्या आचरणांत अधिक उतरविला आहे. समजा, येथें एक रबराचा कारखाना आहे; त्याच्या योगानें हजारों बेकार लोकांनां रोजगार मिळत आहे; राष्ट्रीय व्यापार सुरू होत आहे; देशांतील भांडवल वाढत आहे; गरीब मजुरांनां उत्तेजन मिळत आहे आणि आगबोटीवाल्यांनां, रेल्वेंतील लोकांनां, टपालखात्याला वगैरे भरपूर काम व वेतन मिळत आहे; परंतु ह्या रबर तयार करण्याच्या कृतींतील एखादें रासायनिक समीकरण अथवा एखादी अदृश्य अंतर्विकृति यांची मदत नसती, तर वरील सर्व विस्ताराचें—( धंद्याचें )—काय झालें असतें. त्याचप्रमाणें स्वतःमधील अंतर्विकृति, अंतःकरणाची उपरति, मनाची पुनर्घटना, आध्यात्मिक समीकरण, आपल्या जीवाची परमात्म्यामध्यें क्रांति, यांची शोभा व तेज प्राप्त करून घेतल्यावांचून तुमच्या व्यक्तिविषयक, प्रापंचिक, सामाजिक आणि राजकीय अंगीकृत कार्यांची कधींहि भरभराट होणार नाहीं. कारलाईल ह्मणतो “ श्रद्धा बलवती आणि चैतन्यदायिनी आहे. कोणत्याहि राष्ट्रामध्यें ज्या मानानें आत्मश्रद्धा असते, त्या मानानें त्या राष्ट्राचा इतिहास फलद्रूप आणि उन्नतिकारक होतो. पहा ते आरब लोक. तो एकटा महम्मद आणि तें एकच शतक,–काळ्या कुळकुळीत, क्षुल्लक अशा वालुकामय प्रदेशामध्यें ही एकच ठिणगी नाहीं का पडली? परंतु काय चमत्कार! त्या वाळूचीच ज्वालाग्राही दारू बनली आणि दिल्लीपासून ग्रेनेडपर्यंत[1] तिची गगनचुंबित ज्वाला भडकली. ” अल्ला हो अकबर! ईश्वराव्यतिरिक्त कांहीं नाहीं.

जें जें कांहीं खरोखर श्रेष्ठ आहे, तें तें आमच्या अंतःकरणांतील अनिर्वचनीय गूढ भागांतूनच उगम पावतें. जो कोणी आत्मस्वरूपांत रहात नाहीं, अथवा अंशतः त्यांत राहावयास मिळून पूर्णपणें त्यांत राहावयास मिळणें ह्याच प्राप्तव्यासाठीं जो खटपट करित नाहीं, असा मनुष्य कोठेंहि असो,

१ युरोपच्या पश्चिम टोंकाचें स्पेनमधील एक शहर.

कोणत्याहि ऐश्वर्यामध्यें व डामडौलामध्यें राहो, तो शून्य अथवा मृतच होय!

हर्बर्ट स्पेन्सर देखील आपल्या शेवटच्या ग्रंथांत—हा ग्रंथ ह्मणजे त्या राजहंसाचें शेवटचें गाणेंच ( His dying swan song ) ह्मणतां येईल —हक्स्लेनें पारपॉइज ( Porpoise ) नांवाच्या माशाच्या मेंदूवर केलेल्या प्रयोगाचा उल्लेख करतांना ह्मणतो "मनोवृत्ति आमच्या विचारसंज्ञेचें सत्त्व आहे आणि ज्याला आपण बुद्धि ह्मणतों ती फक्त संज्ञेचा बाह्य आकार होय. साधारण व्यवहारामध्यें मनाविषयीं बोलतांना, मनाच्या ज्या भागाकडे आपण दुर्लक्ष्य करितों तोच—मनोवृत्ति—त्याचा मुख्य भाग आहे. मनोवृत्ति स्वामिनी आहे, बुद्धि ही दासी आहे." मनोवृत्ति—ज्यांना आपण व्यवहारी भाषेंत 'हृदय' किंवा 'अंतःकरण' ह्मणतों—ह्या श्रद्धा अथवा धर्म यांचें वसतिस्थान होत. मनोवृत्तींपासून सर्व कर्मांची प्रवृत्ति होते आणि तेथूनच तीं कर्मे करण्यास लागणाऱ्या शक्तीचा पुरवठा होतो. स्पेन्सर पुढें ह्मणतो " जोंपर्यंत धनी ( हृदय ) सुधारला नाहीं, तोंपर्यंत सेवकाला ( मेंदूला ) सुधारण्यानें कांहींहि फलनिष्पत्ति व्हावयाची नाहीं !"

ह्या अज्ञेयवादी महारथीचा सिद्धांत हल्लींच्या काळांतील मानसशास्त्रवेत्त्यांमधील अग्रणीच्या ( प्रोफेसर जेम्सच्या ) सिद्धांताशीं किती तरी तंतोतंत जुळतो! प्रोफेसर जेम्स ह्मणतो "धार्मिक अनुभव ( साक्षात्कार ) प्रत्यक्ष इंद्रियजन्य ज्ञानाप्रमाणें खात्री करून देणारे असतात आणि तर्कशास्त्रानें प्रस्थापित केलेल्या सिद्धांतांहून बहुशः अधिक विश्वसनीय असतात."

आपल्या स्वभावाच्या शाब्दिक स्थितीहून गूढ स्थितीमध्यें वास करणें, आपल्या जीवित्वाच्या गुह्याचा ठाव पाहणें, आपल्यामध्यें असलेल्या तत्वाचा —आणि तेंच तत्व विश्वांत भरून आहे—अनुभव घेणें, किंबहुना तद्रूपच होऊन जाणें 'तत्त्वमसि' या दिव्य तत्वाचें सचेतन आणि मूर्त स्वरूप होणें,

**हेंचि तें जीवित असे, अमृतत्वहि हेंचि तें,**
**यथार्थ जगणें हेंचि शक्तिरूपें प्रवर्तणें.** १

**दृष्टिपातेंचि जी फोडी, पाषाणस्तंभ, शक्ति ती,**
**संपन्न शक्तिनें जे ह्या, तेचि ऐसे लिनादिती.** २

चालतां दे मला मार्ग, विश्व तें दूर होउनी,
स्वयंप्रकाश मी येतों, छायेतें पळणें दुरी. १

सांभाळा नगराजांनों, मार्गीं माझ्या न या तुम्ही,
येतां गर्वें पहा आजी चूर्ण होऊनि जाल कीं. २

सेनानींनों, नृपाळांनों, खेळणीं माझि कीं तुम्ही,
ज्वलदग्नि पहा येतो, बालांनों मार्ग द्या त्वरें. ३

रथातें बांधिला माझ्या दैवदेवसमूह हा,
तडिदुल्हाटयंत्रानें सर्वांतें कळवा तुह्मी. ४

सांडा हा मोह मायेचा, उठा जागृत व्हा त्वरें,
मिळवा मोक्ष स्वातंत्र्य मुक्तिरूपी स्वतंत्रता. ५

अलोट सामर्थ्य हें जसें ह्या ज्ञानाचें एक अंग आहे, तसेंच अखंड शांति हें त्याचें दुसरें अंग होय.

अखंड शांतिची जेथें होत वृष्टि अखंडचि,
किंवा तें स्रवतें सांद्र पर्जन्यासम अमृत.
मंद सुंदर ही वृष्टी होतसे किति मंजुळ ! १

चिदाकाशीं मदैश्वर्य-मेघ हे फिरती सुखें,
ब्रह्मांडाचींच रत्नें कीं गळतात तयांतुनी.
मंद सुंदर ही वृष्टी होतसे किति मंजुळ ! २

माझिया नियमाचे हे वायू नियत वाहती,
पहा हीं गळती राष्ट्रें कैशीं पुष्पदलांसम.
मंद सुंदर ही वृष्टी होतसे किति मंजुळ ! ३

निसर्गनियमाचे हे मम निश्वास वाहती,
सुगंधयुत सौंदर्यें चारुता निज दाविती;
हालती डोलती कांहीं वस्तू वृक्षकरासम,
कांहीं त्या पडती खालीं गळूनी हिमबिंदुवत्.
मंद सुंदर ही वृष्टी होतसे किति मंजुळ ! ४

# हिंदुस्थानापुढील प्रश्न.

मत्प्रकाश मनोहारी शुभ्र निर्मल अर्णव,
हेलावे शांतिसौख्यानें क्षीरसागर हा अति;
स्वच्छंदें उठती ऊर्मी, मंदत्वें चालती अति,
त्यांतूनि उडती रम्य ब्रह्मांडांचे तुषार हे;
तुषारासम वृष्टी मी नक्षत्रांची करीतसें.
मंद सुंदर ही वृष्टी होतसे किति मंजुळ !

# THE SPIRIT OF YAJNA.

## यज्ञाचें रहस्य.

ब्रह्मदेवाची पवित्र यज्ञभूमि जें पुष्करक्षेत्र तेथें रहात असतां 'राष्ट्रैक्य घडवून आणण्यासाठीं आपले पुरातन यज्ञयागादि विधि पुन्हा सुरू करणें इष्ट आहे किंवा कसें?' याविषयीं आपलें मत द्यावें ह्मणून (रामतीर्थस्वामींनां) एक पत्र आलें होतें. त्या पत्रामुळें खालील उद्गार निघाले.

**श्रेष्ठ सद्गुणातें नाम नसे स्पष्ट । लाज वाटे श्रेष्ठ पावित्र्याची ॥**
**सत्य ज्ञान परी न वाटे निर्भय । स्वयंभू सौजन्य विलौकिक ॥**
**अविकृत ऐसा विकार जो चांग । नसे त्यासी भंग कदा काळीं ॥**
**अतिचंड ध्वनी पडत न कानीं । परम स्थूला जनीं, रूप नसे ॥ १ ॥**

सूर्य जर मुंबईइलाख्यांतील आम्रवृक्षांनां ह्मणूं लागला, कीं 'हिमालय पर्वतावरील गंधतरूंनां व भूर्जवृक्षांनां मी प्रकाश व उष्णता हीं दिलीं आहेत, त्या अर्थी तुह्मांला आतां त्या वस्तु मी देणार नाहीं; माझा प्रभाव व कृपा जी मीं त्या वृक्षांनां दाखविलेली आहे त्यांवरच तुह्मीं संतुष्ट राहून वाढलें पाहिजे,' तर ते आम्रवृक्ष थोड्याच कालांत नाहींसे होतील. बागेंतील फळझाडांवर पडलेल्या सूर्यप्रकाशानें शेतांतील भुईकमळें उगवणार नाहींत, आणि बुद्ध, ख्रिस्त आणि महमंद यांनां झालेल्या साक्षात्कारानें शेक्सपियर, न्यूटन आणि स्पेन्सर यांनां शांति मिळावयाची नाहीं. तेव्हां आपले प्रश्न आपणच सोडविले पाहिजेत आणि पुरातन कालीं होऊन गेलेले ऋषि व मंत्रद्रष्टे यांच्या दृष्टीनें पहाण्याचें सोडून आपल्या स्वतःच्या दृष्टीनें पहावयास लागलें पाहिजे.

## यज्ञाचें रहस्य.

प्रत्येक स्मृति आज असें सांगते, कीं, "पूर्वी आमचें मत असें असें होतें. पण तुह्मांला आज त्याविषयीं काय वाटतें?" प्रत्येक संस्था ह्मणजे आपण आपला मुखवटा उठवलेलें एक नाणेंच होय. कांहीं कालानें त्यावरील ठसा झिजून जाऊन तें ओळखितां येत नाहीं. याकरितां कालांतरानें तें पुन्हा टांकसाळींत गेलें पाहिजे. सृष्टीमध्यें आपण नेहमीं असें पाहतों, कीं, मीठ, खडीसागर, तुरटी, मोरचूत, हिरा इत्यादि पदार्थांचे चमत्कारिक आकारांचे पैलुदार खडे (Crystals) बनतात. कांहीं कालानें ते फुटून किंवा वितळून त्यांचा तो आकार नाहींसा होतो, आणि कालांतरानें त्यांनां फिरून नवीन आकार येतो. त्याचप्रमाणें एखादी कल्पना परिपक्व दशेस आली ह्मणजे तिचा संस्थारूपी एक विवक्षित खडा (Crystal) बनतो व त्या कल्पनेचें कार्य संपल्यानंतर ती संस्था मोडते व त्या कल्पनेचें रूपांतर होऊन परिस्थित्यनुरूप तिचा नवीन खडा (संस्था) बनतो. आपलें स्वत्व कायम राखून योग्य फेरबदल करित असणें, हीच जीवनाची गुरुकिल्ली होय.

ज्यांची भविष्यकालची महत्त्वकांक्षा ह्मणजे आपली पूर्वस्थिति पुन्हा आणणें ही आहे, आणि ज्यांनीं भूतकालच आपल्या डोळ्यांसमोर ठेविलेला असतो, अशा लोकांहून अधिक अनुकंपनीय कोणीहि नसेल! पुढील विवेचनांतील प्रत्येक मुद्द्याला गीता, मनुस्मृति आणि श्रुति यांचा आधार देतां येईल; परंतु असें करणें मुद्दाम टाळलें आहे. कारण, उलटपक्षीयां-कडूनहि तसेच विरुद्ध आधार दाखविण्यांत येतील आणि मग शब्दवाद माजून मुख्य मुद्दा बाजूस राहण्याची भीति आहे; आणि पुन्हा, वस्तुस्थितीच्या अभ्यासापेक्षां ग्रंथाच्या अध्ययनास अधिक महत्त्व देणें ही जी शिक्षणाची चुकीची पद्धत आहे, तिला उत्तेजन देण्याचें पाप पदरीं येईल.

महामति शंकराचार्यांची मोठी चूक ही झाली, कीं, त्यांनीं आपला (अनुभवाचा) प्रकाश झांकून ठेविला. त्यांनां स्वानुभवावरून—आणि प्रत्यक्षाहून, स्वानुभवाहून अधिक विश्वसनीय असें कोणतें प्रमाण आहे?—जें सत्य तत्त्व समजलें होतें, तें ग्रंथांतून काढून शास्त्रवचनांचा काथ्याकूट आणि दूरान्वय करण्याची काय गरज होती? त्यांच्यामागून इतर

मोठे लोक (रामानुज, मध्व इत्यादि) आले व त्यांनीं तेच बिचारे शब्द घेतले आणि त्याच वचनांतून आपणास पाहिजे तो अर्थ काढिला. या सदिच्छेनें केलेल्या प्रयत्नापासून सत्याची प्रगति होण्याचें बाजूस राहून उलट त्याची गति कुंठित झाली. स्पष्ट शब्दांनीं सांगावयाचें असल्यास, हिंदुस्थानच्या सांप्रतच्या अवनतीचें कारण आह्मीं सृष्टिक्रमाविरुद्ध आमच्या जीवंत आत्मदेवाला मृत पुस्तकपिशाचांचा गुलाम बनविला आहे, हें होय. श्रुतिमातेची अशी कांहीं दुर्दशा झाली आहे, कीं, एक पुत्र तिचे कुरळ केश एकीकडे ओढतो, दुसरा दुसरीकडे ओढतो तर तिसरा तिची वेणी घट्ट धरून आपल्या एका विवक्षित निराळ्याच बाजूला खेंचतो! एवंच, प्रत्येक जण श्रुतीच्या नांवाखालीं आपलें वाटेल तें मत दडपून देत आहे आणि या सर्वांचा परिणाम सत्यशीलता भ्रष्ट व्हावी, असा होत आहे. आर्यावर्ताचे प्राचीन ऋषिजन व आचार्य हो! तुमच्या वंशजांनां आपल्या गरजा, आपली परिस्थिति या संबंधाचे महत्त्वाचे प्रश्न, सांप्रत प्रचारांत नसलेल्या अशा भाषेच्या व्याकरणनियमांनीं सोडविण्याची पाळी यावी ना!

बाबांनों! कायदे व संस्था मनुष्याकरितां आहेत, मनुष्य हा कायदे व संस्था यांच्याकरितां नाहीं! कोणी ह्मणतात, कीं, भाष्याच्या योगानें भूत व भविष्य यांमध्यें परंपरा राखिली जाते, त्यांचा मिलाफ होतो. किती सुंदर व स्वाभाविक कल्पना ही! सध्याच जुन्या गोधडीला आह्मीं पुरेशीं ठिगळें लाविलेलीं नाहींत काय? सत्याला तडजोडीच्या ठिगळाची अपेक्षा नाहीं. अखिल जगाला सूर्याभोंवतीं फिरूं द्या. सूर्याला जगाभोंवतीं फिरण्याचें कारण नाहीं. भूत व भविष्य यांचा मिलाफ करावयाचा ह्मणून शास्त्रांतील आधुनिक शोध हे भाष्य अथवा टीका ह्मणून बायबलावर किंवा दुसऱ्या धर्मग्रंथावर लटकावितां येतील काय? ईश्वरप्रणीत धर्मग्रंथांनां स्वतःच बोलूं द्या. एखाद्या निःपक्षपाती न्यायाधीशाचा बाह्यतः आव आणणारा, परंतु आंतून वकिली डावपेंच लढविणारा असा एखादा भाष्यकार अथवा स्वयंमन्य प्रेषित येऊन ईश्वराच्या मनांतील अर्थ सांगे तोंपर्यंत लोकांनां संदिग्ध भाषा वापरून अज्ञानाच्या आडमार्गांत इतस्ततः हजारों वर्षें भटकावयास न लावण्याइतकी सभ्यता ईश्वरामध्यें खचित

आहे. आधारानें सत्याची स्थापना होणें शक्य आहे काय? सूर्यास पाहण्याकरितां दिवटीची जरूरी आहे काय? ख्रिस्त, महंमद, बुद्ध, झोरास्टर आणि वेद या सर्वांनीं येऊन पुरावा दिला ह्मणून गणितशास्त्राच्या एखाद्या सिद्धांताची किंमत अधिक होते काय? रसायनशास्त्राचीं तत्वें तर आह्मी प्रयोग करूनच समजून घेतों. फक्त विश्वासावर तीं डोक्यांत कोंबणें ह्मणजे बुद्धीचा खून करण्याचें पाप आपले माथीं घेणें होय. एखादा विशिष्ट वृत्तांत (गोष्ट) आणि त्रिकालाबाधित सत्य, हीं एकच नव्हेत! एखादी विशिष्ट गोष्ट दुसऱ्याच्या सांगण्यावरून खरी मानतां येईल; परंतु सत्य हें स्वतः अनुभवूनच पाहिलें पाहिजे. वेदान्त वादविवादानें किंवा प्रमाणानें सिद्ध करून देण्याची जरूरी आहे काय? वेदान्ताचे सिद्धान्त योग्य रूपानें मांडणें हेंच वेदान्ताचें बिनतोड प्रमाण आहे. सौंदर्य मोहक वाटण्यास बाह्य शिफारशीची गरज नाहीं. **'न हि कस्तूरीकामोदः शपथेन प्रकाश्यते.'**

मोहक भाषणें केलीं असतां, अज्ञानांत घोरत पडलेल्या लोकांनां त..च ठेवण्यासाठीं 'अंगाई' गीतें गाईलीं असतां, जनसमूहाच्या छंदानुरोधानें वागलें असतां आणि अज्ञान जनतेची खुशामत करित गेलें असतां, अगणित भगतमंडळें (अनुयायी) मिळविणें फारसें कठीण नाहीं. सत्य हेंच शाश्वत आहे आणि हें सर्व चराचर दृश्य मिथ्या आहे. या केवळ दृश्य पसाऱ्याला भुलून जो सत्याचा बळी देतो त्याला धिक्कार असो! सत्याला त्याच्या मर्जीप्रमाणें पुढें येऊंद्या. सत्यरूप सूर्याला आपण कसें उदय पावावें हें चांगलें समजतें. कुलपी गोळ्याच्या आवाजानें सर्व लोकांनां दीर्घ निद्रेंतून हालवून जागें करण्यासाठीं सत्याला मेघगर्जना करित राहूंद्या. मी सत्य आहें. **आकाराची** (देहाची) प्रतिष्ठा वाढविण्याकरितां मी ..त करण्यास कधींहि तयार होणार नाहीं.

आतां यज्ञाच्या प्रश्नाकडे वळूं. आपण त्याचा स्वतंत्र रीतीनें, निःपक्षपातानें आणि निरनिराळ्या दृष्टीनें विचार करूं.

सर्वसाधारण कल्पनेप्रमाणें हवनविधि हा यज्ञांतील एक अति महत्त्वाचा व आवश्यक भाग समजला जातो. हवनाच्या आधुनिक पुर-

स्कर्त्यांच्या तोंडीं नेहमीं असा मुद्दा असतो, कीं, 'हवनानें हवा शुद्ध होते व त्यापासून सुगंध पसरतात.' ही ओढूनताणून आणलेली कल्पना आहे. इतर उत्तेजक पदार्थांप्रमाणें सुगंध क्षणभर उत्साह आणतात; परंतु लगेच प्रतिक्रियारूपानें शरीरास अधिक थकवा येतो. उत्तेजक पदार्थ, शक्तीच्या सांठ्यामधून कांहीं शक्ति कर्जाऊ घेतात; परंतु हें कर्ज चक्रवाढव्याजाचें असतें आणि तें परतहि मिळत नसतें; परंतु खरें पाहिलें असतां हवनापासून सुगंधि द्रव्यें थोडींच निघतात. त्यांतील बराच मोठा भाग कार्बानिक ॲसिड गॅस–कर्बिकाम्ल–असतो, आणि हा पदार्थ तर अत्यंत हानिकारक आहे.

एके काळीं हिंदुस्थानामध्यें मनुष्यवस्तीपेक्षां जंगलेंच अधिक होतीं. तेव्हां घृत आणि इतर हायड्रोकार्बोनेट्स (पिष्टमय द्रव्यें) जाळल्यानें वनस्पतींचें अन्न—कर्बिकाम्ल–उत्पन्न होऊन वनस्पतिवर्गाचें पोषण होत असे; परंतु आज ती स्थिति पालटली आहे. वास्तविक आतां जंगलें उरलींच नाहींत व लोकसंख्या तर अतोनात वाढली आहे. याचा परिणाम असा झाला आहे, कीं, हवेमध्यें कर्बिकाम्ल मनस्वी वाढलेला आहे, आणि त्यामुळें लोक आळशी बनले आहेत. आजकाल हिंदुस्थानाला ऑक्सिजन–प्राणवायु–व ओझोन–तीव्र प्राणवायु–यांची गरज आहे; कर्बिकाम्ल वायूची नाहीं.

येथें एवढें लक्ष्यांत असूंद्या, कीं, हवन करणें व लोकांना जेऊं घालणें ह्या दोहोंची हवेवरील रासायनिक क्रिया सारखीच आहे. तेव्हां अमूल्य घृताचा कृत्रिम अग्निमुखामध्यें अपव्यय करण्याऐवजीं, उपासमार काढणाऱ्या परंतु साक्षात् नारायणरूपी लाखों गरीब लोकांच्या अस्थि व मांस खाऊन टाकणाऱ्या जठराग्नीला जाड्याभरड्या भाकरीचे शिळे तुकडे तरी कां अर्पण करित नाहीं? असल्या हवनाची हिंदुस्थानास आज अधिक गरज आहे.

पुन्हा असें पहा, कीं, हजारों लोकांना एक दिवस अन्नदान केलें तर त्यापासून काय फायदा आहे? सारासार विचार न करतां केलेल्या दानानें

संभावित भिकाऱ्यांची मात्र संख्या वाढते. **हिंदुस्थानांत हें सर्व दैन्य आणि दारिद्र्य कशानें वाढलें आहे? तर देश, काल व सत्पात्र न पाहतां केलेल्या दानामुळें.** एका फ्रेंच ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, "लोकांचें दुःख निवारण करण्याकरितां ह्मणून केलेल्या दानधर्मानेंच अर्धेंअधिक दुःख नवीन उत्पन्न होतें व त्या दानधर्माला स्वतः निर्माण केलेल्या दुःखाचें निम्यानेंहि निवारण करितां येत नाहीं." दानधर्माची किंमत अंतःकरणांतील हेतूवरून ठरवावयाची नसून परिणामावरून ठरविली पाहिजे. एखाद्या खरखरमुंड्या आळशी भिकाऱ्याला पैसा दिला असतां परलोकाची आपण कांहीं तरतूद करून ठेविली ह्मणून दुबळ्या मनाचा दाता हवेंतर आपलें समाधान मानून घेवो. तें कसेंहि असो, एवढी गोष्ट निर्विवाद आहे, कीं, आज आपल्या राष्ट्राचा नाश करण्याची त्यानें या लोकीं कांहीं अंशीं तरतूद करून ठेविली आहे खास!

तेव्हां आमच्यापुढें मुख्य प्रश्न हा आहे, कीं, योग्य तऱ्हेचा यज्ञ आह्मीं केला पाहिजे; अर्थात्, दीन व अनाथ यांची सेवा व संरक्षण केलें पाहिजे; आणि तें अशा रीतीनें, कीं, मूळ उद्देश फसतां कामा नये. **सर्व दानांत विद्यादान हें श्रेष्ठ आहे.** एखाद्याला तुह्मीं एक दिवस जेऊं घातलें तरी त्याला दुसऱ्या दिवशीं भूक ही लागणारच; पण तीच त्याला एखादी कला शिकवा, ह्मणजे तुह्मीं त्याची जन्माची पोटापाण्याची सोय लाविली, असें होईल. आणि ती विद्या, धंदा अगर कला अशी असावी, कीं, तीमुळें त्याच्या जन्माचें सार्थक व्हावें. संभावित भिकारी राहण्यापेक्षां जोडे करण्यासारखा एखादा उपयुक्त धंदा करणें अधिक श्रेयस्कर आहे.

हिंदुस्थानांतील प्रत्येक रहिवाशाची अशी भावना झाली पाहिजे, कीं, संपत्ति, ज्ञान, सत्ता अथवा योग्यता इत्यादि गोष्टींत आपल्याहून कमी असलेले लोक, आपल्या मदतीची अपेक्षा असलेलीं अशीं आपलीं मुलेंच होत; आणि फलाची आशा न धरितां आत्म्याचें अन्न—ज्ञान, प्रेम आणि उत्तेजन —हें देऊन त्यांची सेवा करण्याचा मातृपदाचा हक्क उपभोगण्याचें महत्सुख प्रत्येकानें मिळविलें पाहिजे. **मोठा निष्काम यज्ञ हाच होय!**

पुढें एखाद्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील कर्मकांडाचा सविस्तर इतिहास देतां येईल. हिंदुस्थानांत पुरातनकालीं जेव्हां समाज कृत्रिम बनला नव्हता, जेव्हां हिंदवासीयांनां अन्न, वस्त्र, घरदार इत्यादिकांच्या रीतिभातीं-विषयीं विशेष दक्ष रहावें लागत नसे, आणि ज्या काळीं आज जशीं काश्मीरच्या रानांत विपुल फलझाडें आहेत तशीं सर्व ठिकाणीं होतीं, आणि जेव्हां अमेरिकेच्या मुळच्या रहिवाशांप्रमाणें येथील लोकांनां वस्त्राची विशेष जरूरी नव्हती, त्या वेळीं, लोकांच्या कोंडलेल्या शारीरिक व मानसिक शक्तींस कोणचाहि इतर मार्ग खुला नसल्यामुळें ती सर्व शक्ति देवतांशीं व्यवहार करण्यांत ह्मणजे सर्व प्रकारचे यज्ञ करण्यांत व्यक्त होऊं लागली. आणि प्रथमतः हे सर्व यज्ञ ह्मणजे देवतांशीं चोख रोखठोक व्यवहार असत. त्यांमध्यें याचना, लांगूलचालन इत्यादि भिक्षांदेहीचे प्रकार नसत. त्या वेळच्या लोकांनां माहीत असलेल्या सृष्टींतील–शक्तींशीं–देवतांशीं बरोबरीच्या नात्यानें केलेला हा एक व्यापार असे. पंचमहाभूतें देवता कल्पून त्यांच्यांशीं मांडलेली ही एक दुकानदारीच ह्मणतां येईल. त्यांत कांहीं हल्लींचा मारवाडीवाणा नसे; परंतु ह्यामध्यें देवघेवीची व परस्परांच्या फायद्याची वणिग्वृत्ति खात्रीनें होती.

हे सर्व यज्ञ एका '**जर तर**' वर अवलंबून असत. **जर** पाऊस पाहिजे **तर** अमुक यज्ञ करा; **जर** संतति पाहिजे **तर** तमुक यज्ञ करा; **जर** जय पाहिजे **तर** दुसराच यज्ञ करा; **जर** धन पाहिजे **तर** तिसराच एखादा यज्ञ करा, इत्यादि इत्यादि. याप्रमाणें स्वतःच्या कामनेवर (इच्छे-वर) अवलंबून असल्यामुळें हे सर्व यज्ञ प्रथमतः आवश्यक नसून ऐच्छिक असत; परंतु हळुहळू तो एक प्रघात व शिष्टाचारच होऊन पुढें स्वतः स्वतःवर लादलेलें असें तें एक **नित्यकर्मच** (obligation) होऊन बसलें.

हिंदुस्थानच्या इतिहासांत पुढें पुढें यज्ञाच्या जागीं पौराणिक कर्मकांड आणून बसविलेलें दिसतें. भारतीय युद्धानें महत्त्वाचे फेरफार झालेले आढळून येतात. त्या धार्मिक आणि राजकीय क्रांतीमुळें राष्ट्राची सर्व घटना, सर्व व्यवस्था पार बदलून गेली. पौराणिक देवांसंबंधीं लोकांची असलेली भावना बदलली; व्यावहारिक गरजा अतोनात वाढल्या;

एका यज्ञाकरितां महिन्यांचे महिने, वर्षांचीं वर्षें लोकांनां दवडतां येईनात; आणि यामुळेंच पुरातन यज्ञांचे जागीं पौराणिक कर्मकांड कां येऊन बसलें, याची उपपत्ति लागते. धर्माची यत्किंचित्‌हि हानि न होतां आमच्या कर्मकांडांत अवश्य तो फेरफार करतां येतो, याला हा एक बळकट आधार आहे.

'रामा'चें हेंहि ह्मणणें लक्ष्यांत असूंद्या, कीं, स्मृति (कायदे), रूढि, आचार, विधि, संस्कार–कर्मकांड–बदलत गेले आहेत; एवढेंच नव्हे, तर एकाच देशांत निरनिराळ्या भागांत ते भिन्न भिन्न आहेत. कोणत्याहि समाजाचा जीवंतपणा हा त्यांतील वारंवार होणारी पालट, वाढ व उचित स्थित्यंतर यांवर अवलंबून आहे. '*बदला नाहीं तर मरा!' असें सृष्टीचें निक्षून सांगणें आहे.

आधुनिक उत्क्रांतिवाद्यांपैकीं एक सुप्रसिद्ध गृहस्थ प्रेसिडेंट डाक्टर डेव्हिड स्टार जॉर्डन ह्मणतो, कीं "सामाजिक उत्क्रांतीविषयीं बोलत असतां आपण हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे, कीं, समाजाची कोणतीहि पूर्णावस्था अपूर्णच भासणार. कारण, परिणत दशेस पोंचलेला समाज गत्यात्मक (Dynamic) असतो. स्थित्यात्मक (Static) समाजाची वाढ खुंटलेली असते. वनस्पति, प्राणी समाज इत्यादि जे सेंद्रिय पदार्थ (Organism) पूर्ण परिणत झालेले दिसतात, त्यांमध्येंच मोठीं व्यंगें आढळून येतात." परिस्थितीशीं पूर्णपणें जुळवून घ्यावयाचें असल्यास ही जुळवाजुळव वारंवार करित असलें पाहिजे; कारण परिस्थिति नेहमीं बदलत असते. मनुष्यप्राणी आणि जग याविषयींच्या आमच्या ज्ञानावरून पाहिलें असतां, 'कलह आणि रूपांतर नाहींसें होऊन सर्वजण सुखी व सुरक्षित होतील असे स्थिर (स्थित्यात्मक) मनोराज्यांतील सोन्याचे दिवस येतील' असें ह्मणण्यास कांहींच आधार नाहीं.

याकरितां आह्मीं आमचें कर्मकांड बदलून परिस्थितीशीं जुळवून घेतलें पाहिजे. आमच्या गरजा वेदकालीन ऋषींच्या गरजांहून भिन्न आहेत.

* Change or perish is the grim watchword of Nature.

ज्या 'जर तर' ( Ifs ) वर सर्व कर्मकांड अवलंबून होतें, ते 'जर तर' ( कामना ) आतां बदललें आहेत. 'जर तुह्मांला गुरें पाहिजेत तर इंद्राला हविष्यान्न द्या,' 'जर तुह्मांला अधिक संतति पाहिजे तर प्रजापतीला तोषवा' इत्यादि प्रश्न आज आमचेपुढें नाहींत. आजचें कर्मकांड खालील पालटलेल्या स्वरूपाचें झालें पाहिजे. 'दिवसेंदिवस उद्योगधंदे वाढत व सुधारत चाललेल्या या शतकामध्यें जर तुह्मांला जीवंत रहावयाचें असेल, राष्ट्रीय क्षयानें हळुहळू झिजून मरावयाचें नसेल, तर विद्युद्रूपी मातरिश्वा काबीज करा, बाष्परूपी वरुणाला आपला अंकित बनवा, कृषिशास्त्राच्या कुबेराशीं स्नेह संपादा.' हें ज्ञान तुह्मांला अवगत करून देणारे शास्त्रज्ञ अगर शिल्पज्ञ हेच या नूतन देवांची ओळख करून देणारे पुरोहित होत.

पाखंडी भाषा वापरण्याचा 'रामा' वर आरोप करण्याचा प्रयत्न करूं नका. इहलोकीं प्रत्येक गोष्ट रूपांतर पावत आहे. देशाचें स्वरूप बहुतेक बदललें आहे. राजसत्ता बदलली, भाषा बदलली, लोकांचा वर्णहि बदलला. असें असतां, वेदकालीन देवांनीं मात्र स्वर्गातील आपल्या पाळण्यामध्यें झोंके घेत बाळपणांतच कां राहावें? त्यांनीं कालगतीप्रमाणें कां वाढूं नये? व खालीं येऊन आह्मांमध्यें मोकळेपणानें कां मिसळूं नये? तसेंच आह्मां मानवांशीं सलगीनें कां वागूं नये?

प्रियकर देशबांधवांनो! सूर्य, चंद्र, भू, जल, तेज, समीर, विद्युत्, मेघगर्जना या सर्वांमध्यें जो '**एकं सत्**' **ईश्वर** प्राचीन ऋषींनीं पाहिला होता तो तुह्मी पाहूं नका, असें 'राम' तुह्मांला कधींहि सांगणार नाहीं! ईश्वराला सृष्टीमध्यें प्रकृतिरूपानें पहा. पण याहूनहि जरा सूक्ष्म पाहिलें पाहिजे. प्रयोगशाला आणि शास्त्राध्ययनशाला या ठिकाणींहि ईश्वरास पहा. रासायनिक प्रयोगाचें मेज यज्ञाग्निइतकेंच पवित्र माना. पुरातन यज्ञयागीय अग्नीचा तुह्मांला पुनरुद्धार आतां करतां यावयाचा नाहीं; परंतु तें पुरातनकालचें प्रेम, आदर, भक्ति ह्यांचा तुह्मांला उद्धार करितां येईल, आणि तो तसा करून जीं आज तुमचीं कर्तव्यकर्में होऊन बसलीं आहेत अशा कर्मांवर त्याचा प्रकाश पडूं द्या. *अगाझिज ह्मणतो "सृष्टीचें निरीक्षण

* अगाझिज (१८०७–१८७३) हा मूळचा स्वित्झर्लंडचा असून मोठा सृष्टिशास्त्रज्ञ होता. हा अमेरिकेंत उपदेशकाचें काम करित असे.

करणें ह्मणजे ईश्वराच्या विचारांचा पुन्हा विचार करणें नव्हूरणें सर्वांच्या तुमच्या सर्व कर्मांमध्यें पावित्र्य, शुचिर्भूतता हीं पसरलीं पोंच इतर ज्या अर्थी आतां मला यज्ञाग्नि पेटवितां येत नाहीं, त्या अर्थी मी लोहार. अग्नीला यज्ञाग्निइतकाच पवित्र करणार. शेतकऱ्याच्या कुदळीला इंद्राचा रथ बनविण्यास 'रामा'ची दृष्टि लागते. ही ईश्वरी दृष्टि मिळविणें यांतचें यज्ञाचें खरें गुह्य आहे.

आपली सध्याची राष्ट्रीय स्थिति काय आहे हें न जाणण्यामध्यें तुह्मी आपलें पुढील आयुष्य, पुढील जीवित विसरत आहां. असे भयंकर नास्तिक बनूं नका. तुमचें मुख्य कर्तव्य तुमच्या पुढील जीविताविषयीं आहे. तुह्मी अशा रीतीनें वागा, कीं, तुमचें आदर्शमय जीवित---आपणांस पुढें जसें व्हावें असें वाटतें ती स्थिति-(After Self) शक्य व सुलभ व्हावें. अशा रीतीनें वागा, कीं, पन्नास वर्षांनीं तुमची तुह्मांला लाज वाटूं नये. अशा रीतीनें वागा, कीं, तुमच्या वंशजांनां आपला सर्वस्वी घात झाला, असें वाटूं नये.

धार्मिक हिंदुलोकांनों! तुमची सदसद्विवेकबुद्धि जागृत करा. तुह्मांला कर्मकांडरूपी दोन धन्यांची सेवा करण्याचें कारण नाहीं. गतकालाची आठवण ह्मणून किंवा तुमच्या पूर्वजांनीं आपली खूण ह्मणून दिलेलीं जीर्ण व निरुपयोगी वस्त्रें नेहमीं लागणाऱ्या आवश्यक वस्त्रांबरोबर वापरण्याची गरज नाहीं. मनुष्य आणि राष्ट्रें ज्या दोषानें दिवाळखोर बनतात, तो दोष हा, कीं, आपला मुख्य उद्दिष्टमार्ग सोडून ते आडवाटेनें क्षुल्लक कामें करण्यास धावतात. निश्चयी मनुष्य क्षुल्लक गोष्टी करण्याचें साफ नाकारतो.

यज्ञाचा अर्थ देवांनां बलिदान करणें होय. वेदान्तामध्यें आणि पुष्कळदा वैदिकभाषेमध्यें 'देव' याचा अर्थ काय आहे? देव ह्मणजे दीप्ति आणि आयुष्य देणारी शक्ति. त्याचप्रमाणें देवता (अनेकवचन) याचा अर्थ त्या ईश्वरीशक्तीचीं निरनिराळीं स्वरूपें—मग ती ईश्वरी शक्ति बाह्यशक्ति असो वा अंतर्गत इंद्रियशक्ति असो. 'अधिदैवत' शब्दाची 'आध्यात्मिक' शब्दाशीं तुलना करून पहातां 'देवता' हा शब्द समष्टीरूपशक्तिवाचक आहे,

ज्या 'जर र येतें. 'चक्षुः' हा शब्द एखाद्या व्यक्तीच्या दृष्टीचा (काम आहे; परंतु चक्षुर्देवता ह्मणजे सर्व प्राण्यांमधील पाहण्याची आदित्य हविषी शक्ति होय, आणि या विश्वाचा नेत्र जो सूर्य तो या शक्तीचें चिन्ह इ symbol) आहे. हस्तेंद्रिय ह्मणजे एका मनुष्याच्या हातांतील शक्ति; रतु हस्तेंद्रियाची देवता ह्मणजे सर्व हातांनां हालविणारी शक्ति होय. या समष्टीरूपशक्तीला 'इंद्र' असें ह्मणतात. त्याचप्रमाणें जेव्हां आपण इतर इंद्रियांच्या देवतांविषयीं बोलतों, तेव्हां त्याला कांहीं अर्थ असल्यास तो हाच असला पाहिजे.

आतां यज्ञामध्यें देवतांनां बलि देणें याचा सयुक्तिक अर्थ काय होतो? 'आपल्या व्यक्तिविषयक इंद्रियशक्ति त्याच्या त्याच्या समष्टीरूप शक्तिदेवतांनां अर्पण करणें, आपले शेजारीपाजारी देखील आपणच आहोंत हें अनुभवून आपल्या व्यक्तित्वाचें सर्वांतरात्म्यांत ऐक्य करणें, आणि आपली इच्छा ईश्वराच्या इच्छेमध्यें लीन करणें,' असा अर्थ होय. उदाहरणार्थ, आदित्याला बलिदान देणें ह्मणजे असा निश्चय करणें, कीं, आपल्या गैरवर्तनानें कोणाच्याहि दृष्टीस त्रास होऊं नये; आपल्याकडे पाहणाऱ्या सर्वांनां प्रेम, स्मित, आशीर्वाद मिळावे. सर्व नेत्रांमध्यें ईश्वरास पाहणें हेंच आदित्यास बलिदान होय.

इंद्रास बलिदान ह्मणजे देशांतील सर्व हातांच्या हिताकरितां श्रम करणें होय. योग्य अन्न योग्य प्रकारानें घेतलें असतां तें प्रत्येकास पोषक होतें. हात आणि बाहु यांच्या स्नायूंनां त्यांचें अन्न–श्रम अगर व्यायाम–मिळालें असतां ते पुष्ट होऊन वाढतात. तेव्हां इंद्रास हवि देणें ह्मणजे रोजगार शोधणाऱ्या लाखों गरीब हातांनां धंदा लावून देणें हें होय. अर्थात्, इंद्रास हवि मिळाल्यानें देशामध्यें समृद्धि असलीच पाहिजे. सर्व हातांनां रोजगार मिळाला ह्मणजे बिचारें दारिद्र्य कोठें राहील? इंग्लंडांत बहुशः शेतकी मुळींच नाहीं; तरी तो देश समृद्ध आहे. कां? तर हस्तदेवता इंद्राला तेथें कलाकौशल्य आणि उद्योगधंदे या अन्नावर अजीर्ण होण्याइतकें चारण्यांत येत आहे. सर्वांचें हित साधण्याकरितां सर्व हातांनीं मिळून काम करणें; हा इंद्रार्थ यज्ञ होय. विश्वहित साधण्याकरितां सर्व डोक्यांनीं

मिळून काम करणें, हा बृहस्पतीचा यज्ञ. सर्वांचीं अंतःकरणें सर्वांच्या हिताकरितां एकवटणें, ह्मणजे हृदयदेवता चंद्राचा यज्ञ होय. असेंच इतर देवतांविषयीं समजावें.

सारांश, देवतांचा यज्ञ ह्मणजे आपले हात सर्व हातांनां—संपूर्ण राष्ट्राला—अर्पण करणें, आपले नेत्र सर्व नेत्रांनां—संपूर्ण समाजाला—अर्पण करणें, आपलें मन सर्वांच्या मनाला अर्पण करणें, आपले हितसंबंध देशाच्या हितसंबंधांमध्यें लीन करणें, होय. निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास '**तत्त्वमसि**' (तें तूं आहेस) हें तत्व व्यवहारांत आणणें होय. क्रुसावर चढविल्यानंतर ज्याप्रमाणें ख्रिस्ताचें दिव्य स्वरूपांत पुनरुत्थान झालें, त्याप्रमाणें देहात्मत्वाचा वध केल्यानंतर आपलेंहि विश्वात्मरूपांत पुनरुत्थान होतें. यालाच वेदान्त ह्मणतात.

**घेईं माझा जीव, असो तो अर्पण । सर्व भावें पूर्ण, विभो! तुज. ॥ १ ॥**
**घेईं हृदय माझें, [illegible] तें संपूर्ण । तुझ्याशीं संलग्न, प्रेमास्पदा ! ॥ २ ॥**
**घेईं माझी दृष्टी, [illegible]क्षो देवा ! । गुंगो ती सदैवा तुझ्याशींच. ॥ ३ ॥**
**घेईं [illegible] हस्त, श्रम[illegible] ते भारी । तव कार्यांतरीं, सत्यरूपा ! ॥ ४ ॥**
**सुंदर ते नेत्र असती पवित्र । दाविती जे चित्र अंतरीचें. ॥ ५ ॥**
**सुंदर ते ओष्ठ वदति अंतरनिष्ठ । मधुर शब्द स्पष्ट पक्ष्यांसम. ॥ ६ ॥**
**सुंदर ते हस्त जे कां कार्यरत । सत्य उत्कंठित शौर्यपर. ॥ ७ ॥**
**मी न जन्में, वाढें, किंवा कधीं मरें; । प्रकृति देहद्वारें वर्ततसे. ॥ ८ ॥**
**करी आणि भोगी अहंकारचि तो, । अलिप्तचि मी तों अविकारी. ॥ ९ ॥**
**प्रणयस्वरूप, वृत्तिलयसाक्षी, । अलक्ष्यत्वें लक्षी, रामतीर्थ. ॥ १० ॥**

यांतील 'विभु' ह्या शब्दानें, आकाशांत वसणारा, ढगांमध्यें थंडीनें कुडकुडणारा अदृश्य बागुलबोवा घ्यावयाचा नसून, त्याचा अर्थ सर्व ह्मणजे मानवजात असा आहे.

हा यज्ञ प्रत्येकानें केलाच पाहिजे, व तो सर्वांचा विश्वधर्म झालाच पाहिजे. बा हिंदुस्थाना! हा धर्म स्वीकार, नाहीं तर जा मरून. याशिवाय तुला गत्यंतर नाहीं!

'राम' तुह्मांला असें सांगतो, कीं, यज्ञाच्या वेळीं देव दृश्य रूपानें येतात असें जें तुमच्या शास्त्रांत सांगितलें आहे तें शब्दशः खरें आहे;

परंतु यावरून **सामुदायिक ध्यानशक्तीचा** प्रभाव सिद्ध होतो. मानसशास्त्राच्या आधुनिक शोधांवरून असें सिद्ध झालें आहे, कीं, कोणच्याहि काळीं ध्यानशक्तीचा प्रभाव त्या प्रसंगीं हजर असलेल्या एकमनाच्या व्यक्तिसंख्येच्या वर्गाप्रमाणें वाढतो. हा **सत्संगा**चा महिमा होय. जर एकट्या 'रामा'ला वाटेल त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देतां येतें, तर एकाच मनाचे लाखों लोक तोच मंत्र ह्मणत असतां आणि त्याच स्वरूपाचें ध्यान करित असतां त्यांनां देव दृश्य ( मूर्त ) झाल्याविना कसे राहतील?

पण यावरून काय दिसून येतें? यावरून हेंच दिसतें, कीं, तुह्मी ह्मणजे तुमचा आत्मा, सर्वात्मा हाच सर्व देवतांचा पिता अगर जनक होय; परंतु हेंच देव आणि देवता—**केवळ तुमच्या मनाच्या कल्पना**—तुमच्या दृश्य, मिथ्या, संकुचित, एकदेशीय अहंपणावर अंमल चालवितात. तुमच्या नशिबाचे स्वामी तुह्मीच आहांत. भीति व नरक यांत लोळत पडणारे नीच दास रहा, अथवा जन्मसिद्ध हक्काच्या वैभवाचा मुकुट धारण करा! तुह्मांला आवडेल तें करा. आपल्या ये [illegible] आप[illegible]माणें निवडणूक करा.

मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें असतां कोणचाहि विचार अगर कल्पना मनांत ठसविण्यास अनुरूप चिन्हांचा किती अपूर्व उपयोग होतो, हें 'रामा'स माहीत आहे. स्वात्मार्पण करण्याच्या पूर्ण निश्चयानें गढून गेलेल्या मनुष्यानें, जणूं काय विश्वहस्तांनीं आपलें पाणिग्रहण करावें ह्मणून जर आपले हात पुढें केले, अथवा अंतःकरण अनन्यभक्तियुक्त व सद्गदित होऊन सर्व तनु रोमांचित झाली असतां जर त्यानें आपला अल्पात्मा विश्वात्म्यामध्यें लीन करण्याचें निदर्शक ह्मणून बाह्यतः अग्नीमध्यें आज्य ओतलें, आणि आपल्या मनांतील निश्चय व्यक्त करण्याकरितां मंत्र ह्मणून त्याची स्वाहाकारानें परिसमाप्ति केली, तर ह्या स्वात्मार्पणाच्या पवित्र कृत्यांवर वरील चिन्हांचा अगर मुद्रांचा किती गंभीर व उदात्त शिक्कामोर्तब बसतो बरें! परंतु हाय रे देवा! जेथें सर्व कांहीं शिक्कामोर्तबच असतें, अंतःकरणाचा कांहींच भाव अगर निश्चय नसतो, तेथें अशा सोंगापासून काय

निष्पन्न होणार आहे? आणि जेथें कोणतीच भावना अगर कल्पना यांचा संपर्क नसतां केवळ बाह्य अर्थशून्य विधि अगर चिन्हें आमच्यावर लादण्यांत येतात, तेव्हां तीं चिन्हें ह्मणजे गतप्राण झालेल्या शरीराप्रमाणें होत. अशा शवाचें तत्काळ दहन करून टाका. त्याची आणखी जोपासना करूं नका; तसें करणें भयंकर व विघातक आहे. सजीव अशा नूतन चिन्हांचा अथवा विधींचा स्वीकार करा.

कोणी ह्मणतात, कीं, नदीला आपल्या जुन्या पात्रांतून वाहणें सोपें जातें, ह्मणून जीर्ण संस्थांमध्यें नवीन चैतन्य घालण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. 'राम' ह्मणतो, ही गोष्ट निसर्गाच्या विरुद्ध आहे. एखादें पात्र एकदा टाकून दिल्यानंतर त्यांतूनच पुन्हा वहात असलेली एक तरी नदी मला दाखवा, किंवा एकदा प्राण निघून गेल्यानंतर त्या शरीरामध्यें नूतन चैतन्यानें प्रवेश केला आहे असें एक तरी उदाहरण सांगा. जुन्या शिशांत नवीन मद्य घालून भागावयाचें नाहीं. ('जुने डोळे नवे तमाशे' असें करून चालावयाचें नाहीं.) उंसांतून एकदा रस निघून गेला ह्मणजे तो रस पुन्हा त्या चिपाडांत तसाच भरणें शक्य नाहीं. तीं चिपाडें जाळूनच टाकिलीं पाहिजेत. 'पदार्थ आणि त्यांची रचना यांचीं स्वरूपें आणि परस्पर संबंध बदलत असतात. एकदा टाकून दिलेल्या स्वरूपांचा व संबंधांचा ते केव्हांहि पुन्हा आश्रय करित नाहींत.' आपण या सर्व आहुतींच्या जीर्णविधींची ज्ञानाग्नीमध्यें आहुती देऊन टाकूं. देशकालास अनुरूप अशा रूपांमध्यें आपण खऱ्या यज्ञाच्या तत्वाचा स्वीकार करूं. कांहीं लोक असे आहेत, कीं, त्यांच्या मतें देशाभिमान ह्मणजे प्राचीन गतवैभवाचें सतत स्मरणच करित बसणें हें होय. नवीन परिस्थितीमध्यें आपलें जुनें घर पाठीवर घेऊन जाणाऱ्या या गोगलगायीच ह्मटल्या पाहिजेत. किंवा हे लोक ह्मणजे जुन्या व निरुपयोगी झालेल्या खातेकीर्दींच्या वह्या चाळित बसणारे दिवाळखोर पेढीवालेच होत. आतां विचार करण्यांत वेळ घालवूं नका. हिंदुस्थान एके वेळीं मोठें होऊन गेलें खरें. आपला सर्व जोम एकत्र करा. तो अमर्याद आहे. खरी कळकळ वाटूंद्या, ह्मणजे हिंदुस्थान पुनः मोठें होईल!

# स्वामी रामतीर्थ.

इतिहास आणि स्वानुभव यांवरून असें सिद्ध होतें, कीं, जेव्हां लोक एकत्र जमतात व त्यांच्या दृष्टि व त्यांचे हात जुळतात, त्या वेळीं अंतः-करणांचें ऐक्य होण्याची एक मोठी अमोल संधि अनेकदा येते; कळत, नकळत एकमेकांच्या भावनांची व विचारांची अदलाबदल होते आणि अशा रीतीनें सर्व लोक, मनोवृत्ति, विचार व आत्मिक तेज यांच्या एका समान भूमिकेवर येऊं लागतात. याप्रमाणें परस्परांत प्रेम आणि ऐक्य उत्पन्न होतें. आडदांड, लढाऊ अरबलोकांनां दिवसांतून निदान पांच वेळां तरी ईश्वरासन्निध (निमाज पढण्याकरितां) आणण्यांत **महम्मदाचें** चातुर्य दिसून येतें. कारण, अशा रीतीनें पूर्ण अनवस्थेमधून त्याला एक संघटित राष्ट्र बनवितां आलें.

यज्ञ, तीर्थें, मेळे, मंदिरें, न्यायमंदिरें, भोजनालयें, विवाहसमारंभ, स्मशानयात्रा, सभा, समाज वार्षिकोत्सव, अलीकडील परिषदा, राष्ट्रीय सभेच्या बैठका, हे सर्व हिंदुस्थानांत लोक एकत्र जमण्याचे प्रसंग आहेत. तसेंच पाश्चात्य देशांत ख्रिस्ती देवालयें, हॉटेलें, प्रदर्शनें, फांशीचे प्रसंग, विश्वविद्यालयें, सार्वजनिक व्याख्यानें, क्लब आणि राजकीय संमेलनें यांच्या योगानें लोक एकत्र जमतात. ज्या संस्थांमध्यें प्रेमळ सात्त्विकभाव आढळतो त्याच संस्था विशेषेंकरून ऐक्यवर्धक असतात आणि तेथेंच त्या ऐक्याला प्रेमरूपी जलाचें सेचन मिळून तें वृद्धिंगत होतें. जेथें अंतःकरणें एक होतात तेथेंच चिरस्थायी ऐक्य उत्पन्न होतें. नुसते देह जवळ आल्यानें कांहीं उत्साहजनक निष्पत्ति होत नाहीं. उलट मत्सर वगैरे मात्र वाढतात. ओढूनताणून बाह्यतः ऐक्य करण्याची खटपट नको आहे. अंतःकरणाचें जींत ऐक्य (मिश्रण) होऊं शकत नाहीं अशी मैत्री स्फोटक पदार्थांच्या मिश्रणापेक्षां अधिक भयंकर आहे! पाय हालवून देह जवळ आणल्यानें नेहमीं मनें जवळ येतात असें नाहीं. आपले मित्र व आपले अनुयायी हे नेहमीं सन्निध असण्याची आपल्याला इच्छा किंवा आवश्यकता असते असें नाहीं. सर्व **चैतन्याचें उत्पत्तिस्थान** असलेल्या **शाश्वत झऱ्याच्या (आत्म्याच्या)** आह्मी जितके सन्निध असूं, तितके मित्र आपल्याला अधिक मिळतील. मोळझाड (Willow) पाण्याजवळ राहून आपलीं मुळें

त्याच बाजूला पाठवितें, ह्मणजे त्याच्याभोंवतीं इतर पुष्कळ मोळझाडें आपोआप उगवतात. त्याचप्रमाणें आपण देखील त्या **शाश्वत झऱ्याच्या** सन्निध राहूंया. ह्मणजे आपल्याहि सभोंवतीं समानशील पुष्कळ लोक उत्पन्न होतील. मात्र प्रथम तुह्मी या **सत्याच्या झऱ्याच्या** सन्निध उभें राहिलें पाहिजे.

दुर्बिणींतील सर्व भिंगांचें नाभिगत अंतर योग्य प्रमाणांत ठेविलें ह्मणजे तीं भिंगें मिळून चांगलें काम करूं लागतात. सूर्याची ग्रहमाला सुरळीत चालत आहे, याचें कारण त्यांतील ग्रहांच्या कक्षेंतील अंतर प्रमाणबद्ध असतें. कांहीं मित्रांशीं आपला परिचय जरा निकट किंवा जरा दूर केल्यानें आपलें जुळेनासें होतें. मित्रत्वाच्या ग्रहमालेमध्यें प्रेमाचा सुरळीतपणा राखण्यास परस्परांतील आध्यात्मिक अंतर योग्य प्रमाणांत ठेवणें अवश्य आहे. पुष्कळदा असें होतें, कीं, अतिपरिचय अथवा अति अलगपणा यांपासून आपणांला अद्दल घडल्यामुळें लोक प्रत्येकाविषयीं साशंक होऊं लागतात. लोकांमधील योग्यतेच्या अंतरांतील **वैचित्र्य** ओळखल्यानेंच प्रेम, सुसंगतता आणि ऐक्य हीं साधितां व राखितां येतात.

राष्ट्रीय उत्सव अशा रीतीनें सुधारले पाहिजेत, कीं, सर्व वर्गांच्या लोकांनां एकत्र जमण्यास संधि मिळाली पाहिजे आणि धार्मिक वृत्तींतील समानशीलत्वानें आपले समानधर्मी शोधून त्यांच्याशीं ऐक्य करितां आलें पाहिजे. तसेंच, स्वाभाविक सृष्टिनियमांप्रमाणें परस्परांतील योग्य अंतर बसवितां आलें पाहिजे. राष्ट्रीय हेमंतोत्सव दक्षिण हिंदुस्थानच्या सुखदायक प्रदेशांत भरवावा. राष्ट्रीय ग्रीष्मोत्सव उत्तरेकडील पर्वतांच्या भव्य प्रदेशांत व वसंतोत्सव वंगदेशांत भरवावा. आणि वर्षाऋतूंतील संमेलन पश्चिम हिंदुस्थानांत भरवावें. हे उत्सव विवक्षित धर्म किंवा पंथ यांचे न राहतां राष्ट्रीय होऊन सर्व वर्गांच्या प्रतिनिधींनीं ते चालविले पाहिजेत. तेथें कलाकौशल्य आणि उद्योगधंदे यांचें प्रदर्शन, सर्व तऱ्हेचीं दुकानें, पदार्थसंग्रहालयें, ग्रंथसंग्रहालयें, प्रयोगशाळा, क्रीडाभुवनें, खुल्या मैदानांतील व्याख्यानें, सोशल क्लब (सामाजिक संस्था), परिषदा आणि कांग्रेस, राष्ट्रीय नाटकगृहें इत्यादिकांच्या योगानें निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या

धर्मांचे व पंथांचे लोक एकत्र येऊंद्यात. त्या ठिकाणीं आयुष्यांतील दोन्ही बाजू—गांभीर्य व विनोद—व्यक्त झाल्या पाहिजेत. तेथें प्राचीन भरतवर्षाच्या चालीप्रमाणें भगिनी बंधूबरोबर, पत्नी पतीबरोबर आणि हल्लीं मुंबई इलाख्यांत असलेल्या चालीप्रमाणें मुलांनां आपल्या आयांबरोबर हिंडूंफिरूंद्या, आणि तेथें सर्व वर्गांच्या, पंथांच्या व धर्मांच्या वक्त्यांनां आपलें प्रेमभरित वक्तृत्व व्यक्त करण्याकरितां पूर्ण मुभा असलेलें एक सर्वसाधारण व्यासपीठ असूंद्या.

राष्ट्रीय वाङ्मय उत्पन्न करणें, वाढविणें आणि त्याचा प्रसार करणें, आणि हल्लीं अस्तित्वांत असलेल्या देशभाषांमध्यें ऐक्य आणणें, हें राष्ट्रैक्य साधण्याचें दुसरें साधन आहे.

निरनिराळ्या ठिकाणीं **प्रणवमंदिरें** स्थापन करावीं आणि सर्व धर्मांच्या लोकांनीं तेथें येऊन वाचन, ध्यान, मौनी प्रार्थना इत्यादि गोष्टी कराव्या. सर्वांनीं परस्परांकडे प्रेमदृष्टीनें पहावें, एकमेकांशीं भाषण मात्र करतां कामा नये.

*‘ रामा ’च्या पद्धतीप्रमाणें तरुण लोकांनीं मोकळ्या हवेंत शारीरिक व्यायाम घेत असावा आणि त्या पद्धतीमध्यें प्रत्येक शारीरिक चलन हें एका आध्यात्मिक भावनेचें उत्तम सूचक असें एक चिन्ह ( मुद्रा ) झालें

* मासल्याकरितां ‘ छाती विस्तृत करण्याचा व्यायाम ’ सांगतों:—

व्यायाम सुरू:—

१ खांद्यांशीं समांतर, आपल्यासमोर पुढें दोन्ही हातांचे तळवे एकमेकांस लागतील असे आणावे.

२. हात खांद्यांपासून सरळ असे मागें सहज जातील तेवढे जोरानें आणावे.

३. पूर्वीसारखे बाहू आपल्यासमोर आणावे. याप्रमाणें कांहीं वेळ करावें.

हा व्यायाम करित असतां खालील भावना मनांत धरावी:—

(१) यांत सांगितलेलें चलन करतांना सर्व लोक माझेच आहेत, मित्र आहेत, त्यांनीं मजपाशीं यावें, मी त्यांनां प्रेमानें आलिंगन देणार आहें, सर्वांनीं यावें.

(२) यांत सांगितलेलें चलन करतांना, लोक आले, मी त्यांनां प्रेमानें आलिंगन देत आहें.

चुकून कांहीं लोक राहिले असतील तर त्यांनांहि संधि देण्यास पुनः हा व्यायाम कांहीं वेळ करावा.

—भाषांतरकर्ते.

पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें आहुति टाकल्यानें मनोभावनेवर शिक्का-मोर्तब बसविण्याचें जें कार्य होतें तेंच कार्य या शारीरिक व्यायामानें होतें.

स्नानसमयीं अनुरूप व पावन करणारीं स्तोत्रें पण ह्मणावीं. मात्र तीं आपणांस न समजणाऱ्या भाषेंत नसावीं.

तरुणमंडळीनें हवामानाप्रमाणें तरूंच्या छायेखालीं किंवा आकाशाच्या छताखालीं, नदीतटाकीं, हिरव्यागार गवतावर सहभोजन करावें. प्रत्येक घांसाबरोबर मनानें आणि वाचेनें ॐ ॐ असा प्रणवघोष चालवावा. जळजळणारे शब्द आणि चैतन्ययुक्त विचार यांनीं परिप्लुत असलेलीं राष्ट्रगीतें एकत्र ह्मणणें, हा राष्ट्रैक्य साधण्याचा महत्त्वाचा भाग आहे.

हवनाकरितां कृत्रिम अग्नि पेटविण्यापेक्षां आपल्या अहंकाराची आहुति देण्याकरितां प्रभातकालच्या अगर सायंकालच्या सूर्यबिंबाच्या तेजाचा सात्विक तरुणांनीं होमाग्नि सिद्ध करावा.

**उठा वेगें सुभक्तांनों अविश्रांत पुढें चला,**
**करा स्वहृदया स्नात रक्तबालार्कमंडळीं.**

त्या तेजःसागरामध्यें तुह्मी बुडी मारा, तेजोमय होऊन बाहेर निघा, आणि सर्व जगाला आपल्या दिव्य प्रकाशानें आच्छादित करा. याचें नांव **हवन.**

जनतेमध्यें आणि विशेषतः बायकामुलांमध्यें (आणि ह्मणून पुढील पिढीमध्यें) प्रेम आणि ऐक्य उत्पन्न करण्याचा एक उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे **नगरकीर्तनें** करणें, गायननर्तन करित मिरवणुकी काढणें, अथवा सत्याचा जयजयकार करित उत्तम सीन (तमाशे) व देखावे दाखवित रस्त्यांतून हिंडणें हा होय.

देशामध्यें ऐक्य घडवून आणण्याचा रामबाण उपाय ह्मटला ह्मणजे सत्याकरितां राष्ट्राच्या पुढाऱ्यांची निर्दयपणें छळणूक आणि त्यांनां येणारें **धर्मवीराचें** मरण हा होय; परंतु हें *जीवनतुल्य मरण—नव्हे निरपेक्षतेचें मरणतुल्य जीवन—एकाच काय तर सर्व राष्ट्रांचें ऐक्य शेवटीं घडवून आणतें.

---

* But it is the living *Death*, nay the *dying Life* of unselfishness that eventually unifies not only one but all nations.

एखादा महात्मा ईश्वराशीं तन्मय होऊंद्या ह्मणजे त्याचे हातून संपूर्ण राष्ट्राची एकी होईल.

जेथें राष्ट्रांतील तरुणांनां लष्करी शिक्षणाची दीक्षा दिली जाते, तेथेंच धैर्य, सत्यशीलता, स्वार्थत्यागाचा बाणा इत्यादि सद्गुणांची जोपासना होते.

स्त्रिया, मुलें आणि मजुरांचा वर्ग यांच्या शिक्षणाची उपेक्षा करणें ह्मणजे आपणांस पोसणाऱ्या फांद्याच कापून टाकण्यासारखें आहे. इतकेंच नव्हे, तर राष्ट्रवृक्षाच्या प्रत्यक्ष मुळांवरच घाव घालणें होय.

विसाव्या शतकांतील ऋषींच्या वंशजांनों! तुह्मांला जर श्रुतीचा उपदेश समजेल तर स्मृतीनें तुह्मांवर लादलेले वर्ण आणि पंथ यांचें चेंगरून टाकणारें कवच तुह्मांला फोडून टाकावें लागेल. तुह्मी जर आपल्या खऱ्या आत्म्यास ओळखण्यास तयार नसाल, श्रुतीची जर तुह्मांला गुमान नसेल, आणि असें असूनहि प्राचीनकालीं हिंवाळ्याकरितां केलेले कपडे जर आजच्या भर उन्हाळ्यांत आह्मी वापरूं असा आग्रह धराल, तर तुह्मांला तुमच्या पूर्वजांची शपथ आहे, तुमची स्थिति तूर्त काय आहे हें मेहरबानीनें लक्ष्यांत आणा. मनुष्यदेह केवळ कालानेंच बद्ध नसून देशानेंहि पण बद्ध आहे. कालाच्या दृष्टीनें पाहतां तुह्मी हिमालयांतील ऋषींचे थेट वंशज असाल; परंतु स्थलाच्या दृष्टीनें, शास्त्रें आणि कला करतलामलकवत् करणारे युरोपियन व अमेरिकन लोक यांच्यांशीं असलेला समकालीन अस्तित्वाचा संबंध तुह्मांला नाकारितां येणार नाहीं. प्राचीन उपनिषदांचें ज्ञान आनुवंशिक संस्कारानें तुमच्यांत येऊंद्या. तें मिळवा, घ्या; पण लौकिक गोष्टींमध्यें जपान आणि अमेरिका यांचें व्यावहारिक ज्ञान संपादून तें आपलेंसें करण्यानेंच तुह्मांला जगतां येईल. ओकवृक्षाचें कोमल रोपटें जर सभोंवतालच्या जमीन, हवा, पाणी, प्रकाश यांतील पोषक तत्वांचा स्वीकार करून पचनीं पाडण्याचें नाकारील, व आपल्या ‘ अॅकार्न ’ ( ओक–) बीजाच्या प्रभावाची फुशारकी मारित राहील, तर तें लवकरच मरून जाईल! तुह्मांला आपलें राष्ट्रीय व्यक्तित्व टाकून देण्यास सांगण्याची कल्पना देखील ‘रामा’च्या डोक्यांत येणार नाहीं; परंतु ‘राम’ तुह्मांला फरमावितो,

कीं, तुह्मीं वाढलें पाहिजे, वर्तमान आणि भूतकाल ह्या दोहोंचा ग्रीक प्राणी व तुह्मीं वाढलें पाहिजे, आणि ज्याप्रमाणें ते तुमची ब्रह्मविद्या आपलेंसें करीत आहेत त्याप्रमाणें तुह्मीं त्यांचें भौतिकशास्त्र आपलेंसें केलें पाहिजे.

इतिहास व अर्थशास्त्र असें सांगतात, कीं, झाडाच्या वाढीप्रमाणें राष्ट्राच्या वाढ समयानुसार कलम करण्यावर—देशांतर करण्यावर अवलंबून आहे. उपासमार काढणाऱ्या बेकार गरीब हिंदी मनुष्यांनां कमी वस्ती असलेल्या जगाच्या दुसऱ्या भागांत काम करून तेथेंच पोट भरण्यास आह्मीं पाठवून दिलें असतां ते जगतील, आणि त्यांच्या द्वारें हिंदुस्थान देशाचीं पाळेंमुळें दूरदूरच्या प्रदेशांत पसरतील. या योगानें हिंदुस्थानचें आलस्य नाहींसें होईल व अशा रीतीनें देशावरील ओझें कमी होईल, आणि पिळून काढणारा हवेंतील कर्बिकाम्ल कमी होईल. तुह्मीं हें काम खुषीनें केल्यास तुमच्या विजयरथाचीं चाकें देव ओढतील. नाहीं तर आपल्या मार्गांत आड येणाऱ्या सर्वांचा एकसारखा चुराडा करीत ईश्वरी नियमांचीं निर्घृण चक्रें तुमच्यावरून जातील. आणि ज्या अर्थीं या नाशापासून तुह्मीं आपलें रक्षण करीत नाहीं, त्या अर्थीं तुह्मीं स्वतःलाच दोष लावून घ्यावा. ईश्वराला तुमच्यावर दया करण्याकरितांच,—मग तुह्मांला कांहींहि वाटो,—प्लेग, दुष्काळ यांच्या योगानें ही छाटाछाटी करावी लागते. 'जर एकादा मनुष्य आपल्या बुद्धीचा उपयोग सृष्टीच्या नियमानुसार करील, तर तो जगेल; आणि अशा मनुष्याला स्वतः केलेल्या प्रयत्नानें, सृष्टीच्या निवडणुकीची ( Natural Selection ) जागा पटकाविल्यानें, जीवनकलहापासून मुक्तता प्राप्त होते.'

येथें कांहीं लोक असें ह्मणतात, कीं, "गरीब बेकारी लोकांनांच हद्दपार कां करितां?" वेड्यांनां ज्याप्रमाणें हास्पिटलांत तंगवस्त्रानें जखडून टाकतात, त्याप्रमाणें लोकांनां घरांत अडकवून टाकलें पाहिजे, अशा कल्पनेनें हा आक्षेप घेण्यांत येतो. ज्या खोलींत तुह्मी जन्मलां त्या खोलीच्या बाहेर काय ह्मणून पडतां? घर सोडून रस्त्यावर तरी कां येतां? तुह्मीं जेवढीं भूलोकचीं लेंकरें आहांत तेवढींच स्वर्गलोकचींहि पण आहांत. तुह्मी स्वर्गलोकचीं मुलें आहांत, नव्हे तुह्मी स्वर्गच आहांत. तुह्मी जाल तिकडे तुमचें घर आहे. एकाच जागेला तुह्मी बांधून घेऊं नका.

एखाद्याला देखील आज सर्व जगास वगळून अलग राहतां येणार नाहीं. राष्ट्र असा एक काल होता, कीं, त्या वेळीं हिंदुस्थान निराळा, निराळा व मिसरहि निराळा. याप्रमाणें स्थिति होती, पण आज वीज यांच्या साहाय्यानें देशकालाचीं बंधनें नाहींशीं झालीं आहेत. समुद्र हा एक पूर्वींप्रमाणें अटक ( प्रतिबंध ) न राहतां दळणवळणाचा राजमार्ग झालेला आहे. पूर्वींचे देश हे आज 'जग' नांवाच्या लहानशा प्रदेशांतील शहरें बनले आहेत व ( पूर्वींचीं ) शहरें रस्ते बनलीं आहेत, तेव्हां आतां स्वगृहाविषयींची कल्पना विस्तृत करण्याचा समय येऊन ठेपला आहे. सृष्टीच्या व ईश्वराच्या लेंकरांनों ! सर्व देश सारखेच तुमचे आहेत; सर्व मानवजात तुमचीं बहीणभावंडें होत. हिंदी राष्ट्राच्या गळ्यांत लाखों भिकाऱ्यांची जी धोंड बांधिली आहे, तींत आणखी भर घालण्याऐवजीं, समाजाचा एक उपयुक्त घटक होऊन जेथें चरितार्थ उत्तम चालेल तेथें खुशाल जा. देवाची आणि मानवजातीची तुह्मांला शपथ आहे. जा ! चला !

हिंदुस्थानच्या दुःखाचें निवारण करणें हा कांहीं लोकांनां राष्ट्रीय प्रश्न वाटत असेल; पण 'रामा'स हा प्रश्न अंतरराष्ट्रीय ( सर्व राष्ट्रांचा ) वाटतो. कोणाच्या मतें हा प्रश्न देशाभिमानाचा असेल; 'रामा'स तो मानवजातीचा वाटतो. माझीं पोरें माझ्या डोळ्यांदेखत मरण्यापेक्षां माझ्यापासून दूरवर राहून जगूंद्यात. डोळ्यांत प्रेमाश्रूंचे लोट येऊन 'राम' तुह्मांला निरोप देत आहे. चला !

परदेशामध्यें स्वतःचा उदरनिर्वाह करून कांहीं जास्त कमाई झाल्यास परत स्वदेशीं या. ज्याप्रमाणें जपानी तरुणांनीं पाश्चिमात्यांचें व्यावहारिक ज्ञान स्वदेशांत आणिलें, त्याप्रमाणें तुह्मीं परदेशीं मिळविलेला आपला ज्ञानाचा सांठा आपल्या देशास अर्पण करून त्याला सुखी करा. परदेशीं जर तुमचा चरितार्थ जेमतेमच होऊं लागला, तर तेथेंच रहा; आणि जर हिंदमातेच्या वक्षस्थलावर तुह्मी निरुद्योगी जड होऊन राहणार असाल तर एकदम अरबी समुद्रांत उडी ठोका आणि तेथील अरबी पाहुणचार घेत रहा; परंतु हिंदुस्थानांत पुन्हां पाय ठेवूं नका ! स्वदेशाभिमान आणि स्वदेशप्रीति तुह्मांला हेंच करण्यास सांगत आहे.

# यज्ञाचें रहस्य.

'रामा'ला मनुष्य जितके आवडतात तितकेच इतर सर्व प्राणी व दगडहि आवडतात; आणि माकडेंहि देवतांइतकींच लाडकीं आहेत. परंतु जें आहे तें आहे. जो खोटें बोलतो तो दैवहतक होय. जॉन बुलच्या (इंग्लंडच्या) तडाक्यांतून सुटण्याचा जो थोडासा मार्ग आयर्लंडला सांपडला, तो हा कीं, गरीब विचाऱ्या आयरिश लोकांच्या हजारों झुंडींनीं देशांतर करून अमेरिकेंत जाऊन वस्ती केली.

हिंदुस्थानांतील आळशी लोकांनीं माझ्या लाडक्या अमेरिकेंत अगर अन्य देशांत जाऊन गर्दी करावी, अशी 'रामा'ची इच्छा नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे, कीं, तुमचें परदेशगमन त्यांच्याहि फायद्याचें आहे. जीं झाडें एका ठिकाणीं गर्दी करून वाढतात तीं फार क्षीण आणि कमजोर असतात. तेंच, त्यांतील एकादें झाड मूळच्या रानांतून काढून दुसरीकडे दूर कोठें तरी नेऊन लावा, ह्मणजे त्याचा एक प्रचंड वृक्ष होईल. परदेशीं गेलांत ह्मणजे तुह्मी जेथें जाऊन रहाल त्या देशांत तुह्मी भूषणच व्हाल. अमेरिकेंतील धनाढ्य लोकांची अशीच स्थिति होती. त्यांतील बहुतेक मूळचे यूरोपांतून देशांतर केलेले गरीब लोक होते. लोकांनीं देशांतर केल्यानें समाजस्थिति सुधारत गेलेली आहे, असें सर्व राष्ट्रांचा इतिहास सिद्ध करतो.

यज्ञासंबंधानें आणखी दोनच शब्द सांगतों. यज्ञाचा केव्हां केव्हां 'त्याग' असा अर्थ करितात. 'त्याग' या उदात्त शब्दाचा अर्थ क्रियाशून्य अजगरवृत्ति, अथवा आत्मघातकी दौर्बल्य, असा मात्र करूं नये. किंवा निष्ठुर, शरीरक्लेशकारक वैराग्य, असाहि समजतां नये. ईश्वराचें पवित्र देवालय —तुमचा मानवी देह—कांहींच प्रतिकार केल्यावांचून मांसभक्षक क्रूर लांडग्यांनां खाऊं देणें, हा कांहीं त्याग नव्हे! स्वतःला अन्यायाच्या आणि अघोर पातकाच्या तावडींत देण्याचा तुह्मांला काय अधिकार पोहोंचतो? सर्व निंद्य कर्मांचा दास बनलेल्या (जारकर्मी) मनुष्यास एकाद्या स्त्रीनें आपली पवित्र तनु अर्पण करणें, हा कांहीं धर्म्य 'त्याग' नव्हे! त्याग ह्मणजे आपलें सर्वस्व सत्यास (सत्यस्वरूपास) अर्पण करणें. हा आपला देह, ही सर्व मालमत्ता ईश्वराची आहे. तुह्मी तुमच्या पहाऱ्यावर रहा. ईश्वराच्या या पवित्र ठेवीशीं अन्याय आणि पाप यांनां ढवळाढवळ

करूं देऊं नका. पहिल्यानें सत्याहून आपण कोणी भिन्न आहों, असें समजून अलग रहावयाचें, आणि नंतर धर्माच्या नांवाखालीं त्याग करावयाचा. यांमध्यें जी वस्तु आपली नव्हे तिचा अपहार केल्यासारखा होतो. ही निवळ नागवणूक आहे ! जी वस्तु आपली नव्हे, ती दान करणें –हलवायाच्या दुकानावर तुळशीपत्र ठेवणें, हें पाप नव्हे काय ? सत्यरवीप्रमाणें तळपा, सत्यरूपच व्हा, हाच काय तो धर्म्य त्याग. पण जरा थांबा. याला आपल्याला त्याग ह्मणतां येईल का ? हें ईश्वरी ऐश्वर्य नव्हे काय ? 'देवपण' आणि 'त्याग' हे समानार्थी आहेत. विद्या आणि विनय हीं त्याचीं बाह्य चिन्हें होत.

वैदिक कालामध्यें देखील अहंकारामध्यें रुतलेल्या कर्मकांडानें मुक्ति मिळत नसे. मुक्ति ही नेहमीं ज्ञानापासून मिळते. त्याचप्रमाणें कर्तव्याच्या ओझ्याखालीं दडपून गेलेला, गडबडीनें धावत सुटलेला, सुधारलेल्या आप्पलपोटेपणाचा दास बनलेला मनुष्य आधुनिक कर्मकांडाच्या योगानें पाप आणि दुःख यांपासून मुक्त होणार नाहीं. जगांतील सर्व संपत्ति तो मिळवील; परंतु आपला आत्मा हा सर्वांचा आत्मा आहे हें ज्ञान झाल्याशिवाय त्याला शांति मिळणार नाहीं. जगाच्या सर्व स्थित्यंतरांमध्यें आणि घडामोडींमध्यें एक तत्व दिसून येतें, आणि तें 'आत्मप्रतीति' हें होय. आणि जोंपर्यंत एकाद्या मनुष्याचें जीवित कृत्रिमपणा, बाह्याचार आणि दृश्य यांमध्येंच रुजलेलें असतें, तोंपर्यंत प्रत्येक उलथापालथीनें, फेरबदलानें फक्त पाचोळ्याचा नवीन थर वर येतो, जमीन ( सद्वस्तु ) तर कांहींच दिसत नाहीं. जोंपर्यंत सर्व आपणच आहों असें आरोग्य अंगीं बाणलें नाहीं, तोंपर्यंत सुधारणेचा सर्व भपका ह्मणजे दुःखकारक देहाभिमानाचा व्रण झांकणारी मलमपट्टीच होय. वेदांतील हें ज्ञानकांड हाच खरा वेद होय, आणि यालाच षड्दर्शनकारांनीं, जैन व बुद्ध ग्रंथकारांनीं 'श्रुति' असें ह्मटलें आहे. हिंदुलोकांनो ! याच श्रुतीचा आश्रय करा. आजच्या प्रसंगाच्या गरजा पाहून त्याप्रमाणें स्मृति आणि कर्मकांड बदला. याच्या योगानें तुह्मी आपलें हिंदु ह्मणून नुसतें अस्तित्व राखूं शकाल, एवढेंच नव्हे, तर तुमची वाढ होईल व तुह्मी सर्व जगाचे

गुरु अगर मार्गदर्शक व्हाल. आणि अशा रीतीनें, दुसऱ्यांस बाहेर वगळल्यामुळें सांठवलेल्या पाण्याप्रमाणें आलेली जाड्यता नाहींशी होईल आणि सर्वांचा अंतर्भाव करणारी नवीनता अंगीं येईल. आत्मज्ञानावांचून कार्य करणाऱ्या मनुष्याची स्थिति अंधेऱ्या खोलींतील मनुष्याप्रमाणें होते. भिंतीवर डोकें आपटतें, टेबलावर आदळून गुडघे फुटतात, खुर्चीवरून तोंडघशीं पडावें लागतें, आणि सर्व तऱ्हेचे टक्केटोणपे खावे लागतात. प्रकाशांत काम करणाऱ्या मनुष्यास असा त्रास सोसावा लागत नाहीं. ज्ञानहीन मनुष्य घोड्याचें शेंपूट धरून सारी वाट लाथा खात जातो, ज्ञानवान् मनुष्य घोड्याच्या पाठीवर स्वार होऊन सुखानें आणि आनंदानें मिरवितो. आत्मज्ञानी मनुष्यास कोणतेंहि कर्म, कर्म असें वाटत नाहीं. स्थितप्रज्ञ मनुष्यास कोणतेंहि पर्वतप्राय काम वसंतवातानें कुसुमगंध उचलण्याइतकें सुकर होतें. शंकराचार्य ह्मणतात "आत्मज्ञानी मनुष्य कांहींच कर्म करित नाहीं." होय. त्यांच्या दृष्टीनें हें बरोबर आहे. कारण, असें कोणतेंहि काम नाहीं, कीं, जें त्याला कष्टप्रद वाटतें. सर्वच कांहीं त्याला लीला, क्रीडा, मौज, आनंद असें वाटतें. त्याला कर्तव्य असें कांहींच उरत नाहीं. तो परिस्थितीचा राजा बनतो. तो कधीं कष्टी होत नाहीं, कधीं उतावळा होत नाहीं, त्याच्या सर्व गोष्टी होऊन गेलेल्या असतात; तो कृतकृत्य झालेला असतो. तो उद्वेग पावत नाहीं, त्याला दुःख होत नाहीं. तो सदा धीर व उल्लसित, सर्व कर्मांच्या दगदगींपासून मुक्त, असा असतो.

परंतु अशा मनुष्याला आळशी, निरुद्योगी ह्मणतां येईल काय? मग तुह्मी सृष्टीलाहि आळशी व सूर्यालाहि सुस्त ह्मणाल. नैष्कर्म्याचा असामान्य पुरस्कर्ता शंकराचार्य यांचेकडे पहा. सबंध इतिहासामध्यें इतक्या थोड्या कालांत एका व्यक्तीच्या हातून इतकें काम झालेलें एक तरी उदाहरण दाखवा! शेंकडों ग्रंथ रचले, संस्था (मठ) स्थापिल्या, राजेलोकांनां स्वमतानुयायी केलें, आसेतुहिमाचल सर्व भरतखंडामध्यें मोठमोठ्या महासभा भरविल्या. ज्याप्रमाणें तारकांपासून प्रकाश आणि पुष्पांपासून सुगंध चोहोंबाजूंनीं पसरतो, त्याप्रमाणें या महाकार्याचा प्रचंड ओघ त्यांच्यापासून सहज निघाला.

# स्वामी रामतीर्थ.

येथें मनूनें सांगितल्याप्रमाणें आत्मयज्ञीयाला स्वराज्य–स्वानंदसाम्राज्य ( The Native throne of inner glory ) प्राप्त करून देणाऱ्या ब्रह्मयज्ञाविषयीं उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. तुमचें सर्व ममत्व, आसक्ति, 'माझें माझें, तुझें तुझें' ह्या कल्पना, कामना, बेत, राग, द्वेष, मनोविकार, मर्जी, इतराजी, शिष्टाचार, देह, आप्त, मन, सर्व नातेंगोतें, येणेंदेणें, न्याय, अन्याय, सर्व प्रश्न, नाम, रूप, हक्क आणि मोह, इत्यादि सर्वांची ज्ञानाग्नीमध्यें आहुति द्या, त्यांचा त्याग करा, तें सर्व टाकून द्या; या सर्वांचा धूप करा आणि 'तत्त्वमसि'च्या ज्वलत्कुंडामध्यें त्या पेटत असतां त्यांच्या सुगंधाचा आस्वाद घ्या.

आपलें ब्रह्मात्मत्व जाणून मोह आणि दौर्बल्य यांचा त्याग करा, यांनां पुरून उरा, यांनां जिंका. स्वात्मनिष्ठ मनुष्याला जगानें बाजूस होऊन वाट दिली पाहिजे. जगाचे तुह्मी प्रभु व्हा, नाहीं तर जगच तुमच्यावर प्रभुत्व गाजवील. संशयखोरपणा किंवा अंधश्रद्धा बाळगणाराला गति ( मोक्ष ) नाहीं. असलेच लोक शपथ वाहतात. कारण, त्यांचें स्वतःच्या अस्तित्वाविषयींचें (अहमस्मि) विधान फोल असतें. आपल्या ब्रह्मात्मतेचा संशय तुह्मांला आहे काय ? हृदयांत संशयास जागा देण्यापेक्षां तिकडे बंदुकीच्या गोळीस जागा देणें चांगलें ! तुमचें हृदय तुह्मांला दगा देतें काय ? तें उपटून काढा आणि द्या फेंकून. उल्लसितवृत्तीनें सत्यसागरांत प्रवेश करा. घाबरतां काय ?

**भीतां कुणासि ? देवातें ? मौर्ख्य हें ! मानवासि कां ?**<br>
**दौर्बल्य हृदयाचें तें ! भूतांसी ? भिववा तयां !**<br>
**स्वतासि ? जाणा आत्मत्वा, देव मीच असें वदा;**<br>
**उक्ति ही रामतीर्थांची धैर्यदात्री मनीं धरा.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
नोंद

# THE SECRET OF SUCCESS.

## *यशःप्राप्तीची गुरुकिल्ली.

ये रे ये रे माझ्या, पांखरा चिमण्या ।
मजसी कहाण्या सांग तुझ्या. ॥ १ ॥

सांग मज कैसा, आनंदांत सदा ।
राहसी ? न कदा दुःख तूतें. ॥ २ ॥

सुस्वर गायन करूनियां ह्मणे ।
मंजुळस्वरानें पक्षीराजः— ॥ ३ ॥

"कारण तयाचें मूळीं नसे गूढ ।
मजसी आवड निसर्गाची. ॥ ४ ॥

आवडती मज सूर्यांचे किरण ।
तेंवि हरितपर्ण, लतावृक्ष. ॥ ५ ॥

मंद शीत वात दिव्य द्युति सृष्टी ।
लाभोनियां कष्टी कैसें व्हावें ? ॥ ६ ॥

सर्व सृष्टि माझ्या सेवेसी तत्पर ।
जरि मी सुस्वर गान करीं. ॥ ७ ॥

स्वकर्मे मी करीं समाधानचित्तें, ।
सृष्टि मज देते सर्व कांहीं. ॥ ८ ॥

तादात्म्य जहालें माझें निसर्गाशीं ।
ह्मणोनियां दासी सृष्टि माझी." ॥ ९ ॥

* हें व्याख्यान जपानमध्यें दिलें होतें.

बांधव हो! हिंदुस्थानापेक्षां जपानानेंच जो विषय अधिक दक्षतेनें आपलासा केला आहे, त्या विषयावर एका हिंदवासीयानें येऊन व्याख्यान द्यावें, हें जरा विचित्र दिसत नाहीं काय? विचित्र असेल; परंतु अनेक कारणांनीं मी तुह्मांपुढें गुरु या नात्यानें उभा राहिलों आहें.

एकादी कल्पना चातुर्यानें कृतींत उतरविणें निराळें आणि त्यांतील मूलभूत रहस्याचें आकलन करणें हें निराळें. कांहीं सामान्य तत्वानुसार वागल्यानें एकादें राष्ट्र आज भरभराटींत असेल; परंतु जर तीं तत्वें राष्ट्राच्या मनानें स्पष्टपणें जाणलीं नसतील, आणि जर त्यांनां यथार्थ उपपत्तीचा पूर्ण आधार नसेल, तर तें राष्ट्र लयाला जाण्याचा बराच संभव आहे. अचूक रीतीनें एकादी रासायनिक क्रिया करणारा मजूर कांहीं रसायनशास्त्रवेत्ता होत नाहीं; कारण, त्याच्या कृतीला उपपत्तीचा दुजोरा नसतो. एकादें एंजिन बरोबर चालविणारा फायरमन कांहीं इंजिनीयर नव्हे. कारण, त्याचें काम नुसतें यांत्रिक (Mechanical) असतें. आपल्या वाचनांत आलें असेल, कीं, एक डाक्टर जखम झालेल्या भागावर एक कापडाची पट्टी आठवडाभर बांधून रोज एका तरवारीनें त्याला स्पर्श करून जखमा बऱ्या करीत असे. जखमा बऱ्या होत याचें कारण पट्टी बांधल्यानें जखमी भाग उघडा रहात नसे; परंतु तरवारीच्या स्पर्शाच्या गुणानेंच जखम बरी होते असें तो मानीत असे आणि रोगीदेखील तसेंच समजत असत. या वेडगळ उपपत्तीनें जेथें नुसत्या पट्टी बांधण्याहून अधिक उपचाराची आवश्यकता असे, अशा प्रसंगीं एकसारखें त्याला अपयशच येऊं लागलें. ह्मणून **यथार्थ कृति आणि यथार्थ उपपत्ति यांची सांगड असणें अत्यावश्यक आहे.** दुसरें कारण, जपान हा **माझा** देशसा मला वाटतो आणि येथील लोक मला माझे देशबांधवच वाटतात. मी असें सप्रमाण सिद्ध करूं शकेन, कीं, तुमचे पूर्वज हिंदुस्थानांतून आले; तुमचे पूर्वज ते माझे पूर्वज आहेत. ह्मणून येथें मी एकाद्या परक्याप्रमाणें न येतां बंधुभावानें तुह्मांला भेटावयास आलों आहें; आणि दुसऱ्या एका बाजूनें गुरुपणाचाहि हक्क मला पोहोंचतो. माझ्या जन्मापासून स्वभावानें, वृत्तीनें, संवयीनें आणि आवडीनिवडीनें मी जपानीच आहें. एवढी प्रस्तावना करून मी आतां विषयाकडे वळतों.

# यशःप्राप्तीची गुरुकिल्ली.

उत्कर्षाचें गुह्य आतां कोणास गूढ राहिलें नाहीं. या विषयावर प्रत्येकाला कांहीं सांगावयाचें असतेंच आणि कदाचित् तुह्मीं त्याचीं सामान्य तत्वें ऐकिलींहि असतील; परंतु विषयाच्या महत्त्वामुळें तीं मनांत बिंवण्यास त्याचें कितीहि जोरानें प्रतिपादन केलें, तरी तें योग्यच होणार आहे.

## यशःप्राप्तीचें पहिलें साधन—उद्योग.

प्रथमारंभीं आपण सभोंवतालच्या सृष्टीस हा प्रश्न विचारूं. सृष्टींतील सर्व जलप्रवाहरूपी पुस्तकें आणि सर्व शिलारूपी व्याख्यानें असंदिग्ध भाषेनें 'सतत, अखंड उद्योग करावा,' असाच उपदेश करीत आहेत! प्रकाश आपणास दृष्टि देतो. प्रकाश सर्व प्राण्यांनां चैतन्य देतो. तेव्हां प्रकाश या प्रश्नावर काय प्रकाश पाडतो, हें आपण पाहूं. उदाहरणार्थ, आपण नेहमींचा प्रकाश ह्मणजे एकादा दिवा घेऊं. दिव्याची प्रभा आणि ज्योत यांमधील गुह्य ह्मणजे आपली तेलवात खर्च करण्यास तो दिवा मागें पुढें पहात नाहीं, हें होय. तेलवात अगर (क्षुद्र) अहंकार जळून जात आहे ह्मणून त्यापासून तेज उत्पन्न होत आहे. दिवा तुह्मांला सांगतो, कीं, मख्खी ती यांत आहे! आपलें अंग चोरा, कीं, तुह्मी तत्काळ विझून गेलांच ह्मणून समजा! जर तुह्मी आपल्या देहाचें सुख आणि आराम पाहूं लागाल, जर विषयोपभोग आणि चैन यांमध्यें आपला वेळ दवडूं लागाल, तर तुह्मांला जगण्याची आशाच नको! दुसऱ्या शब्दांनीं बोलावयाचें ह्मटल्यास, निरुद्योगानें तुह्मांला मरण प्राप्त होईल आणि उद्योगानेंच मात्र तुह्मांला जगतां येईल. एकादें सांठलेलें डवकें आणि एकादा वाहता झरा पहा. खुळखुळ वाहणाऱ्या नदीचें स्फटिकाप्रमाणें स्वच्छ पाणी नेहमीं ताजें, प्रसन्न, पिण्यास योग्य आणि पाहण्यास सुभग असतें, परंतु तेंच सांठवलेल्या डवक्याचें पाणी किती किसळवाणें, दुर्गंधियुक्त, घाणेरडें, गलिच्छ व कुजकें असतें बरें? जर तुह्मांला यश पाहिजे असेल तर नदीचा मार्ग —सतत गति (उद्योग) स्वीकारा. जो मनुष्य आपली तेलवात संपून जाऊं नये ह्मणून राखून ठेवतो, आणि अशा रीतीनें तिचा दुरुपयोग करतो, त्यानें कशाचीहि आशा करूं नये! निरंतर पुढें जात असणें, आपल्यामध्यें इतरांस सतत मिळवून घेणें, परिस्थित्यनुरूप फिरणें आणि

अखंड उद्योग करणें, हा जो नदीचा मार्ग त्याचें अवलंबन करा. 'उद्योग! उद्योग! अविरत उद्योग!' हेंच उत्कर्षाचें आद्य तत्व होय.

*उत्तमाहूनि उत्तमतर। होत जावें निरंतर।
पुढें जावें सुदूर। आपुल्याच॥ १॥

या तत्वानुसार जर तुह्मी वागाल, तर तुह्मांला दिसून येईल, कीं, क्षुद्र आणि नीच होणें ह्मणजे अवनतीस जाणें हें जितकें सोपें आहे, तितकेंच मोठें होणें ह्मणजे उन्नतीस जाणें, हेंहि सोपें आहे.

## दुसरें साधन—स्वार्थत्याग.

शुभ्र वस्तु प्रत्येकास आवडतात. त्या तशा कां आवडतात याचें कारण आपण पाहूं. गौरकायांच्या उत्कर्षाचें कारण आपण ठरवूं. काळ्या पदार्थांचा सर्वत्र द्वेष करण्यांत येतो, त्यांची उपेक्षा करण्यांत येते, त्यांचा त्याग करण्यांत येतो. ही वस्तुस्थिति लक्ष्यांत घेऊन आपण तिचें निदान ठरवूं. पदार्थविज्ञानशास्त्र वर्णदर्शनाचें (रंग दिसण्याचें) तत्व आह्मांला सांगतें. तांबडा रंग तांबडा नसतो, हिरवा रंग हिरवा नसतो, काळा रंग काळा नसतो; सर्व कांहीं दिसतें तें तसें नसतें. तांबड्या गुलाबाला त्यानें तांबड्या रंगाचें परावर्तन केल्यानें, तो रंग परत टाकल्यानें, त्याचा मोहक रंग प्राप्त होतो. सूर्यकिरणांतील इतर रंग त्या गुलाबानें पार शोषून घेतले, तरी त्याला ते रंग आहेत असें कोणी ह्मणत नाहीं. झाडाचें हिरवें पान प्रकाशांतील इतर सर्व रंग शोषून ज्या हिरव्या रंगाचा तें त्याग करितें, टाकून देतें, त्याच रंगानें तें हिरवें गार आणि टवटवीत दिसतें. काळ्या पदार्थांमध्यें सर्व रंग शोषून घेण्याचा व कोणताहि रंग परावृत्त न करण्याचा धर्म असतो. त्यामध्यें स्वार्थत्यागाचा आणि दानधर्माचा लेशहि नसतो. एकादेखील किरणाचा ते त्याग करित नाहींत. ते जें घेतात त्यांतील एक अंशदेखील ते परत देत नाहींत. त्यांचा हा गुण तुह्मांला असें शिकवितो, कीं, जो मनुष्य आपल्या मिळकतीपैकीं कांहींहि भाग आपल्या बांधवांस देण्याचें नाकारितो, तो कोळशासारखा काळाकुट्ट दिसेल. **दान करणें हाच मिळविण्याचा मार्ग होय!** जें जें कांहीं आपणांस मिळेल

* From good te better daily self-surpassed!

तें इतरांनां देऊन टाकावयाचें, त्याचा पूर्ण संन्यास—त्याग करावयाचा, हें शुभ्र दिसण्याचें गुह्य आहे. शुभ्र वस्तूंचा हा गुण आपल्या अंगीं आणा, ह्मणजे तुह्मीं यशस्वी झालेंच पाहिजे! मी गौरकाय कोणास ह्मणतों? युरोपियनांनां? नुसते युरोपियनच नव्हे, तर पांढरा आरसा, शुभ्र मोतीं, पांढरा कबूतर, धवल हिम, हे सर्व पावित्र्य आणि सत्यशीलता यांचीं चिन्हें, तुमचे गुरु होत. ह्मणून स्वार्थत्यागाचा धडा गिरवा आणि जें कांहीं तुह्मांला मिळेल तें दुसऱ्यांनां देऊन टाका. आप्पलपोटेपणानें सर्व शोषण करण्याची वृत्ति सोडून द्या, ह्मणजे तुह्मीं शुभ्र–सत्वसंपन्न (ह्मणजे दुसऱ्या अर्थीं सामर्थ्यवान्) झालांच ह्मणून समजा. अंकुर फुटून मोठा वृक्ष होण्यास बीजानें प्रथम आपण स्वतः नाहींसें झालें पाहिजे. पूर्ण स्वार्थत्यागाचा अंतिम परिणाम फलद्रूपता हाच होय. ज्ञानाचा प्रकाश आपण दुसऱ्यास जितका अधिक देऊं तितका आपणास तो अधिक मिळतो. '**दुणावे कीं देतां किमपि न सरे लेशहि कदा**' ह्याची सर्व शिक्षक व गुरु साक्ष देतील.

## तिसरें साधन—अहंपणाचा विसर.

विद्यार्थ्यांनां हें ठाऊक आहे, कीं, ते जेव्हां आपल्या वाङ्मयचर्चाविषयक संस्थांमध्यें बोलत असतात, तेव्हां 'मी व्याख्यान देत आहें' ही भावना मनांत येतांच त्यांचें सर्व भाषण बिघडून जातें. उद्योगामध्यें आपलें व्यक्तित्व विसरून जा, आणि त्यामध्यें पूर्ण गढून जा, ह्मणजे तुह्मांला यश खात्रीनें येईल. जर तुह्मी विचार करीत असलां, तर विचारमय होऊन जा, ह्मणजे यश मिळेल. जर तुह्मी उद्योग करीत असलां तर उद्योगरूप होऊन जा, ह्मणजे त्याच मार्गानें तुह्मांला फलप्राप्ति होईल.

***बंधमुक्त मीं होइन केव्हां। जेव्हां होई मीपण नष्ट॥**

नोकरी मिळावी ह्मणून अकबर बादशहाच्या दरबारीं गेलेल्या दोन रजपूतांची गोष्ट मी तुह्मांला सांगतों. "तुह्मांला काय येतें?" ह्मणून बादशहानें त्यांनां विचारलें. ते ह्मणाले "आह्मीं वीर आहों." अकबरानें त्यांनां आपलें ह्मणणें खरें करून दाखविण्यास सांगितलें. दोघांनींहि म्यानांतून

* When shall I be free?
When 'I' shall cease to be.

तरवारी उपसल्या. त्या तरवारी दरबारांत वीजेप्रमाणें चमकल्या. तें तरवारीवरील तेज त्यांच्या हृदयांतील शौर्याचें द्योतक होतें. क्षणांत त्या चमकणाऱ्या तरवारी एकमेकांच्या शरीरास भिडल्या. प्रत्येकानें आपल्या तरवारीचें अग्र दुसऱ्याच्या छातीवर धरिलें आणि शांतपणें प्रत्येकानें दुसऱ्याच्या तरवारीवर धावून आपल्या शौर्याची प्रतीति दाखविली. त्यांचे देह खालीं पडले, त्यांचे आत्मे एकमेकांत मिळून गेले, आणि ते वीर होते हें निःसंशय ठरलें. सांप्रतच्या सुधारलेल्या काळीं भयंकर वाटणाऱ्या या गोष्टीकडे लक्ष्य देण्यास मी तुह्मांला सांगत नाहीं; त्यांतील केवळ बोधाकडे तुह्मीं लक्ष्य द्यावें. त्यांतील बोध हा, कीं, आपल्या क्षुद्र मीपणाचा त्याग करा, कर्तव्याचरणामध्यें मीपण विसरून जा, ह्मणजे विजय हा तुमचाच; अन्यथा व्हावयाचें नाहीं ! यश मिळण्यापूर्वीं आपल्या उद्योगामध्यें यशाची कामना नाहींशी झाली पाहिजे, असें नाहीं का आतां मला ह्मणतां यावयाचें ?

## चवथें साधन—विश्वव्यापक प्रेम.

प्रेम हें उत्कर्षाचें चवथें साधन आहे. दुसऱ्यांवर प्रीति करा, आणि त्यांची प्रीति संपादा, हेंच अंतिम साध्य आहे. हातास जर जगावयाचें असेल तर त्यानें शरीराच्या सर्व अवयवांवर प्रीति केली पाहिजे. जर तो वेगळा होईल आणि ह्मणेल, कीं, मीं मिळविलेल्या वस्तूंचा फायदा सर्व शरीरानें काय ह्मणून घ्यावा ? तर हातास मृत्यूखेरीज दुसरें गत्यंतर नाहीं ! कारण, आपल्या आप्पलपोटेपणामध्यें सुसंगत व्हावयाचें असेल तर हातानें आपल्या लेखणीच्या किंवा तरवारीच्या श्रमानें मिळविलेलें अन्नपाणी तोंडांत न घालतां सर्व पौष्टिक अन्न हातांत टोंचून घ्यावें आणि अशा रीतीनें स्वकष्टार्जिताचा भाग इतर अवयवांस देऊं नये. ही गोष्ट खरी आहे, कीं, हें टोंचणें किंवा मधमाशीचें अथवा डांसाचें डसणें, ह्यांच्या योगानें हात लठ्ठ होईल; परंतु या लठ्ठपणामुळें उपायापेक्षां अपायच अधिक होईल. सुजणें ह्मणजे वाढणें नव्हे, आणि दुखावलेला हात आपल्या आप्पलपोटेपणामुळें मरून जाईल. पूर्णाच्या ह्मणजे समुदायाच्या—समष्टीच्या हिताहून आपलें एकट्या स्वतःचें—व्यक्तीचें हित वेगळें न समजतां सर्व इंद्रियांचा आत्मा

तोच आपला आत्मा आहे हें ऐक्य व्यवहारांत आणणें, हाच काय तो हातांच्या उत्कर्षाचा मार्ग आहे.*

प्रेमाचें बाह्य आविष्करण हेंच परस्पर साहाय्य (Co-operation) होय. संघशक्तीचें महत्त्व तुह्मीं पुष्कळदा ऐकिलें आहे. तेव्हां यावर अधिक विवरण करण्याची गरज नाहीं. परस्परांस केलेलें साहाय्य अंतःप्रेमामुळें उत्पन्न झालें पाहिजे. प्रेमरूप व्हा, ह्मणजे तुमची सिद्धि झालीच.† आपल्या गिऱ्हाईकाचें हित तेंच आपलें हित असें न मानणाऱ्या दुकानदारास कधींहि यश यावयाचें नाहीं. आपली भरभराट व्हावयाची असेल तर आपल्या गिऱ्हाइकांवर त्यानें प्रेम केलें पाहिजे, अंतःकरणपूर्वक त्यांचें हित पाहिलें पाहिजे.

## पांचवें साधन—उल्हास अगर प्रसन्नता.

उल्हसित वृत्ति ही उत्कर्षाची दुसरी एक महत्त्वाची बाजू आहे. बांधव हो! तुह्मी जात्याच आनंदी आहां. तुमच्या टवटवीत चेहऱ्यावरील सुहास्य पाहून मला आनंद होतो. तुह्मी हंसणारीं फुलेंच आहां. मानव जातीचे सुहास्ययुक्त कळेच तुह्मी आहां. तुह्मी मूर्तिमंत उल्हास आहां. तेव्हां मला तुह्मांला हेंच सांगावयाचें आहे, कीं, तुमचा हा स्वभाव शेवटपर्यंत कायम ठेवा. आतां हा स्वभाव कसा राखितां येईल, हें आपण पाहूं.

आपल्या श्रमाच्या मोबदल्याची काळजी करूं नका. भविष्यकाळ मनांत आणूं नका. कांहीं किंतु मनांत आणूं नका. जयापजयाचा विचारहि मनांत आणूं नका. कर्माकरितां कर्म करा. कर्म हेंच कर्माचें फल होय. भूतकालानें दुःखी न होतां आणि भविष्यकाळाची काळजी न बाळगतां सांप्रतच्या वर्तमानकाळामध्यें कर्म करा, उद्योग करा. ह्या वृत्तीनें तुह्मी सर्व काळीं सर्व स्थितींत उल्हसित रहाल. बीज फलद्रूप व्हावयास लागणारे वारा, पाणी, जमीन इत्यादि पदार्थ त्या बीजाकडे एका अबाधित आकर्षणाच्या

---

* संतांसि जें ब्रह्म सुखानुभूती । दासांसि तें दैवत सर्वभूतीं ॥—पंडित.

† इतर उत्कर्ष व यशःप्राप्तीची काय कथा? प्रेमानें अष्टमहासिद्धींचा स्वामी भगवान् नहि अगदीं आपल्या हातांतला होतो. प्रेमसूत्रदोरी । नेतो तिकडे जातो हरी

—तुकाराम.

नियमानुसार ओढले गेलेच पाहिजेत. त्याचप्रमाणें उल्हसित आणि उद्यो मनुष्याला प्रकृति सर्व प्रकारची मदत करिते. अधिक प्रकाश ( ज्ञा) मिळविण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे सध्या जो प्रकाश, जें ज्ञान आपणा- जवळ आहे त्याचा योग्य उपयोग करणें, हा होय. एकाद्या घेऱ्या रात्रीं तुह्मांला वीस फूट जावयाचें असलें, आणि जर तुमच्या हातांतील दिवा साऱ्या दहाच फुटांवर प्रकाश पाडित असला, तर सर्व ार्गावर उजेड नाहीं असें मनांत आणूं नका; परंतु प्रकाशित मार्ग आधीं ाक्रमा, ह्मणजे उरलेला दहा फूट मार्ग आपोआप प्रकाशित होईल. य रीतीनें तुह्मांला कोणतीहि जागा अंधकारमय दिसणार नाहीं. त्याचप्रमाणें कोणाहि खऱ्याखुऱ्या काम करणारास या एका त्रिकालाबाधित नियमा त्याच्या मार्गामध्यें कोणतेंहि विघ्न येत नाहीं. मग फलाकडे किंवा पणामाकडे लक्ष्य देऊन अस्वस्थ होऊन आपला उल्हास कां नाहींसा करावा? एकाद्या सरोवरामध्यें अकस्मात् पडलें असतां ज्यांनां पोहतां येत ाहीं ते जर आपली समता राखून स्वस्थ पडतील, तर त्यांचा बचाव होईल मनुष्याचें विशिष्टगुरुत्व पाण्याहून कमी असल्यामुळें तो पाण्याच्या पृष्ठभागावर आपोआप तरंगत राहतो; परंतु साधारण लोकांचें प्रसंगा धान जाऊन सुटण्याचे धडपडींतच ते बुडतात. त्याचप्रमाणें पुष्कळदा भ ष्यत्कालाच्या उत्कर्षाची तळमळ पूर्णपणें फसून अपयश येतें.

भविष्यत्कालाशीं चिकटून रहाणाऱ्या आणि यशःप्राप्तीसा हपापणाऱ्या विचाराचें स्वरूप काय आहे, हें आपण पाहूं. तें असें आहे. एकादा मनुष्य आपलीच छाया धरावयास जातो. कल्पांतापर्यंत त्याला असे धावूं द्या, परंतु त्याला ती कधींच धरितां यावयाची नाहीं; परंतु तेंच त्याला आपल्या छायेकडे पाठ फिरवूं द्या आणि सूर्याभिमुख होऊं द्या अ णे मग पहा! तीच छाया त्याच्या मागून धावूं लागते. तुह्मी उत्कर्षाक पाठ करतांच, फलाचा विचार करण्याचें सोडून देतांच, आपल्या सांप्र च्या कर्तव्यांत आपली सर्व शक्ति सांठवितांच, यश तुमच्यामागें कु ाप्रमाणें आलेंच ह्मणून समजा! ह्मणून सांगतों, कीं, यशाच्या मागें ला नका. उत्कर्ष हें आपलें अंतिम समजूं नका, ह्मणजेच उत्कर्ष तुह्मां शोधित येईल.

कोर्टांत न्यायाधीशाला पक्षकार, वकील आणि शिपाई इत्यादिकांनां बोलावून आपलें कोर्ट तयार करा ह्मणून सांगावें लागत नाहीं; परंतु न्यायाधीशाला आपल्या अंतःकरणांतील न्यायासनावर बसूं द्या, ह्मणजे सर्व देखावा तुह्मांपुढें आपण होऊन सज्ज होईल. तेव्हां माझ्या प्रिय मित्रांनों! मोठ्या उल्लसित वृत्तीनें आपलें कार्य हातीं घ्या, ह्मणजे उत्कर्षाला लागणारें सर्व कांहीं तुमच्या पायापाशीं येऊन पडेल.

## सहावें साधन—निर्भयता.

आतां, याच्यापुढील मुद्दा. या मुद्याचें नीट मनन करून तुह्मीं त्याचा अनुभव घ्यावा, असें माझें आग्रहाचें सांगणें आहे. तो मुद्दा ह्मणजे निर्भयता हा होय. नुसत्या एका नेत्रकटाक्षानें सिंह माणसाळतां येतात. शत्रु-देखील एका प्रेमवीक्षणानें शांत करतां येतात, आणि निर्भयतेच्या एका तडाक्यानें जयश्री प्राप्त करून घेतां येते. हिमालयाच्या गर्द दरीमधून मी हिंडलोंफिरलों आहें. वाघ, अस्वल, लांडगे आणि इतर विषारी प्राणी मला भेटले आहेत; परंतु मला त्यांपासून कधींहि उपसर्ग पोहोंचला नाहीं. या जंगली जनावरांकडे टक लावून पाहिलें, मा... ...ी दृष्टादृष्ट झाली, कीं, त्या क्रूर श्वापदांची भिऊन अगदीं गाळण होऊन जाइ... ...ंकर समजले जाणारे प्राणी निमूटपणें चालते होत असत. तेव्हां हें असें आहे. भय सोडून द्या ह्मणजे कोणीहि तुमच्या वाटेस जाणार नाहीं.

तुह्मीं कदाचित् पाहिलें असेल, कीं, एकादें मांजर दृष्टीस पडतांच कबूतर आपले डोळे मिटतें. कदाचित् त्याला वाटत असेल, कीं, आपणास मांजर दिसत नाहीं ह्मणून मांजरासहि आपण दिसत नाहीं! परंतु होतें काय? मांजर त्या कबूतरावर झडप घालतें आणि त्याला तोंडांत टाकून मट्ट करितें. निर्भयतेनें वाघदेखील माणसाळतां येतो आणि भित्र्याला म... ...देखील खाऊन टाकतें!

...ज्याचा हात थरथरत असेल त्याला एका पात्रांतील प्रवाही पदार्थ ...सऱ्या पात्रांत बिनचूक रीतीनें ओततां येत नाहीं, हें तुह्मीं पाहिलेंच असेल. तो खात्रीनें खालीं सांडल्याशिवाय रहावयाचा नाहीं; परंतु निश्चल व स्थिर ... ...खील खालीं न सांडतां अतिशय मौल्यवान

अवाही पदार्थदेखील सहज वापरतां येतात. येथदेखील प्रकृति जणूं काय आपल्या अलौकिक मूक व्याख्यानानें तोच (निर्भयतेचा) धडा शिकवीत आहे.

एकदा एका जहाजावर एक पंजाबी शिपाई एका दुर्धर रोगानें अंथरुणास खिळून पडला होता. तेव्हां डाक्टरानें त्याला जहाजावरून समुद्रांत फेंकून देण्याचा हुकुम फर्मावला. अहो, हे डाक्टर पुष्कळदा लोकांचा जीव घेतात. शिपायाला तो हुकम समजला. साधारण प्राण्यांमध्येंदेखील जीवावर बेतलें ह्मणजे निर्भयतेचें वारें शिरतें. मोठ्या त्वेषानें तो खाडकन् उभा राहिला आणि अगदीं निर्भयपणानें तडक त्या डाक्टराकडे गेला व त्याच्यावर आपलें पिस्तुल रोखून ह्मणाला "काय ! मी आजारी आहें ? मला आजारी ह्मणतां ? तुह्माला आतां गोळी घालून ठार करितों !" झालें. डाक्टरानें एकदम त्याला निरोगी असल्याबद्दलचा दाखला दिला. निराशा ही दुर्बलता आहे. ती टाकून द्या. निर्भयतेपासून सर्व शक्ति प्राप्त होते. माझे शब्द लक्ष्यांत ठेवा. "निर्भयता. निर्भय व्हा."

## सातवें साधन—स्वावलंबन.

उत्कर्षाचें अंतिम साधन—शेवटचें ह्मणून कमी प्रतीचें समजूं नका—नव्हे, मुख्य तत्व अगर संपूर्ण यशःप्राप्तीची गुरुकिल्ली ह्मणजे स्वावलंबन—स्वातंत्र्य हें होय. तुमचें सर्व तत्वज्ञान एका शब्दांत सांगा असें कोणीं मला विचारलें, तर मी सांगेन, कीं, '**स्वावलंबन.**' 'आत्मज्ञान.' सर्वजन हो ऐका, स्वतःस जाणा.* जे आपल्या पायावर उभे राहतात त्यांनां ईश्वर मदत करतोच, हें अक्षरशः खरें आहे. तुह्मांला मदत करण्यास ईश्वर बांधला गेला आहे, हें सिद्ध करून देतां येईल. तुह्मांला असा प्रत्यय आणून देतां येईल, कीं, तुमचा आत्मा हाच सर्वव्यापी व सर्वशक्तिमान् ईश्वर आहे. हें एक तत्व आहे, हें एक सत्य आहे. अनुभवानें याची प्रतीती पहावी. खरोखर स्वतःवर अवलंबून रहा ह्मणजे तुह्मांला कोणतीहि गोष्ट निःसंशय प्राप्त करून घेतां येईल. तुह्मांला अशक्य किंवा असाध्य असें कांहींच उरणार नाहीं.



* आत्मानं विजानीयात्. उपा॰.

अरण्यांतील राजा किंवा अरण्याचा स्वामी आहे. सिंह धीट, आणि सर्व संकटास तोंड देणारा असा असतो. कारण, ठावान् असतो. ग्रीक लोकांनीं जेव्हां प्रथम हत्ती पाहिले, तेव्हां 'चालणारे पर्वत' असें नांव दिलें; परंतु ह्या हत्तींना ची नेहमीं भीति असते. ते नेहमीं कळप करून राहतात आणि निजतात तेव्हां आपल्यापैकीं कांहींजणांला ते पहाऱ्यावर त्यांपैकीं कोणाचाहि स्वतःवर किंवा स्वतःच्या कर्तृत्वावर ो. ते स्वतःला शक्तिहीन समजतात आणि ह्मणूनच सृष्टि-माप्रमाणें ते अशक्त झालेच पाहिजेत. सिंहाचा साहसी धडाका त्यांनां भिववून सोडतो आणि हत्तींचा कळपचा कळप भेदरून जातो; परंतु वस्तुतः एकेका हत्तीला—या चालत्या पर्वताला—आपल्या पायाखालीं अनेक सिंह चिरडून टाकण्याची शक्ति असते.

कोणा दोघां बंधूंविषयीं अशी एक बोधप्रद गोष्ट सांगतात, कीं, त्या दोघांच्या वांट्यास सारखी संपत्ति आली होती; परंतु कांहीं वर्षांनीं एक अगदीं भिकेस लागला व दुसऱ्याची संपत्ति दसपट वाढली. लक्षाधीश झालेल्या भावाला 'हें असें कसें?' ह्मणून विचारतां तो ह्मणाला 'माझा भाऊ नेहमीं 'जा जा' असें ह्मणत असे व मी नेहमीं 'या या' असें ह्मणत असें. याचा अर्थ असा, कीं, तो आपल्या नोकरांस 'जा जा, असुक कर तमुक कर,' ह्मणून हुकूम सोडी व आपण स्वतः परांच्या बिछान्यावर लोळत पडे. आणि दुसरा नेहमीं उद्योगी असून स्वतः काम करी आणि 'या या, हें काम करूं,' ह्मणून तो आपल्या नोकरांस मदतीस बोलावीत असे. एक स्वतःच्या कर्तबगारी अवलंबून होता ह्मणून त्याचे सेवक व संपत्ति वाढली. दुसरा आप नोकरांस 'जा जा' ह्मणून सांगे; तदनुसार त्याचे नोकरचाकर गेले आणि त्याच्या 'जा जा' या हुकुमा-प्रमाणें त्याची संपत्तिहि पण गेली आणि तो अकिंचन बनला. 'राम' ह्मणतो या या आणि माझ्या सुखाचे व यशाचे वांटेकरी व्हा. मित्र हो व देशबांधव हो! हें असें आहे. मनुष्य आपल्या भाग्याचा स्वामी आहे. जपानच्या लोकांनीं मला माझे विचार त्यांच्यापुढें मांडण्याची

आणखी संधि दिली, तर मला असें दाखवितां येईल, कीं, दंतकथा व कल्पित गोष्टी यांवर विश्वास ठेवून आपल्याहून भिन्न (बाह्य) पदार्थांवर अवलंबून राहण्याचें कोणतेंहि सयुक्तिक कारण नाहीं. 'एखादा गुलाम देखील तो स्वतंत्र आहे ह्मणूनच गुलाम होऊं शकतो' आपल्या स्वातंत्र्यानेंच आपण भरभराटतों, आपल्या स्वेच्छेनेंच आपण दुःख भोगतों; आणि आपण दुसऱ्याचे दास बनतों तेहि आपल्याच इच्छेनें. ग आह्मीं कुरकुर आणि धुसफूस कां करावी? आपल्या स्वातंत्र्याचा आपल्या स्वाधीनतेचा फायदा घेऊन, शारीरिक आणि सामाजिक ... पण कां मिळवूं नये?

'सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता। परो ददातीति कुबुद्धिरेषा॥'

कैक शतकांपूर्वीं बुद्धाच्या अनुयायांनीं जो धर्म योणला होता तोच धर्म वस्तुतः **रामानें** जपानाला आणला आहे. सांप्रतच्या युगाच्या गरजांला जुळण्याकरितां निराळ्या दृष्टीनें त्याविचार केला पाहिजे. पाश्चात्य शास्त्रें व पाश्चात्य तत्वज्ञान यांच्या शानें त्याची उजळणी केली पाहिजे. माझ्या धर्माचीं मूलतत्त्वें सुप्रजर्मन कवि गेटीच्या खालील शब्दांनीं थोडक्यांत सांगतों.

I tell you what's man's supreme vocation
Before me was no world, 'tis *my* creation;
'Twas I who raised the sun from out the s
The moon began her changeful course witb

**कर्तव्य जें नराचें दिव्य असें तें तुह्मांसि कथितों**
**मत्पूर्वीं हें नव्हतें विश्व, तयाचा असेंच मी स्वा**
**मत्कृत सृष्टी सारी, उदधींतुनि सूर्य काढिला मीं**
**माझ्यापासुनि चंद्रा भ्रमणगति प्राप्त जाहली स**

एकदा याचा अनुभव घ्या ह्मणजे या क्षणीं तुह्मी मुक्तआहांत ... याचा एकदा अनुभव घ्या ह्मणजे सर्व कालीं तुमचा उत्कर्ष ठेविलेला आहे. या तत्त्वाचा अनुभव घ्या ह्मणजे घाणेरडी अंधारकोठडीदेखील तेथल्या तेथें सुंदर नंदनवन होऊन जाईल.

र
य।
को
असा

# IS VEDANTIST A MORAL BEING?

## *वेदान्त्याचें आचरण नैतिक असतें काय?

तुह्मांला परमेश्वर करून टाकण्याचा वेदान्ताचा उद्देश आहे. वेदान्ताला तुमची जाणीव उन्नत करावयाची आहे, वरच्या पायरीवर न्यावयाची आहे. वेदान्ताची अशी खात्री आहे, कीं, चित्तशुद्धीनेंच अथवा चित्तवृत्ति पालटल्यानेंच अहंप्रत्ययाचा विकास होऊन परमात्मप्रत्यय येतो. तुह्मांमधून पशुवृत्तींचा लवलेश पूर्ण नाहींसा करण्याची वेदान्ताची इच्छा आहे. वेदान्ती होण्याला एकाद्या सुधारकासारखा किंवा नीत्युपदेशकासारखा अर्धाकच्चा प्रयत्न करून भागत नाहीं. एका हातांत आपल्या देहात्मत्वाचा वलि घेऊन तुह्मांला आपला आत्मा मुक्त करून घ्यावयाचा आहे. वेदान्त ह्मणतो, तुमचें सर्व पाप तुमच्या देहांत आहे; तुह्मी स्वतः शुद्ध, निष्कलंक आहांत. देहमंदिरामध्यें तुमचा शुद्ध आत्मा वास करीत असतो. आयुष्याच्या उत्क्रमणांतील निरनिराळ्या उपाधींनीं तुह्मांला कर्दमांत बुडविलें आहे. तो धुऊन टाका ह्मणजे तुमचा उत्तमवर्ण आत्मा आपल्या दिव्य तेजानें झळकूं लागेल. आयुष्य हें कर्दमयुक्त सरोवरांत उगवणाऱ्या कमलाप्रमाणें आहे. या जीवितकमलाचें ध्यान करा. वेदान्ताची नीति ह्मणजे तुमचे अंतर्बाह्य कोश स्वच्छ धुऊन काढून तुह्मांला धवल करणें, ही होय. देहाची स्वच्छता व अंतर्देहाची—ह्मणजे मन आणि हृदयरूपी मानसिक आणि भावनात्मक मनुष्याचें आवरण याची—निर्मलता साधली पाहिजे. तुमच्या शुद्ध आणि ईश्वरी जाणिवेखेरीज इतर कर अपवित्र विचार मनांत येऊं देऊं नका. आपल्या मनःप्रदेशांत विचाराला बिलकुल थारा देऊं नका. सर्वकाल सावध राहा

* स्वामींनीं लिहिलेलें एक पत्र.

कानांनीं खऱ्या दिव्य, शुद्ध, उज्वल व उदात्त अशा स्वतःच्या जाणिवेच्या तत्त्वाखेरीज—दुसरें कांहींहि ऐकतां कामा नये. घाणीपासून तुह्मी ज्याप्रमाणें दूर जातां, त्याप्रमाणें अभद्र भाषण करणारे आणि अशुद्ध विचार बाहेर ओकणारे यांची संगति टाळा. आपण आल्यावरोबर लोकांमध्यें पालट होत नाहीं, तोंपर्यंत वाईट लोकांची संगत टाळा. जेथें आपलें जमत नाहीं, अशा जागीं व अशा समाजांत जाऊन आपलें स्वास्थ्य गमावूं नका व घोटाळ्यांत पडूं नका. त्यापेक्षां एकटें असलेलें बरें. आपल्या मुख्य **तत्त्वाला** इतके चिकटून रहा, कीं, शुद्ध जाणीव. पूर्ण पावित्र्य, प्रेमाचे विचार, शुभेच्छा, शांति, नैसर्गिक विद्युल्ल येणारे निष्पाप विचार आणि ईश्वरी स्फूर्तीचा प्रवाह यांव्यतिरि कांहींहि तुमच्या मनांत येऊं नये आणि मनांतून व्यक्त होऊं सक्त नजर ठेवा. मनांत कोणताहि विचार आला असतां त. या अंतश्चक्षूनें न्याहाळून पहा; आणि तो परका आहे किंवा आप च विचारांच्या कुटुंबापैकीं एक आहे, हें ठरवा. **विचारांना देखील त्यांचीं सूक्ष्म शरीरें असतात.** वेदान्त तर असें सांगतो, कीं, आपलें चित्त शुद्ध करा. ईश्वराव्यतिरिक्त कांहीं बोलूं नका. ईश्वराहून अन्य कांहीं पाहूं नका. आंतून बाहेरून शुद्धतेनें तुह्मांला अगदीं वेष्टून टाकिलें पाहिजे. आपलें चित्त ईश्वरी तेजामध्यें स्थापित करून आपण उत्पन्न केलेलें तेज ह्मणजे ईश्वरी भक्ति तिनें तुमचें हृदय व्यापून जाऊं दे. तुमच्या अंतःकरण-मंदिरांत त्याचा प्रकाश पडूं द्या. तुमच्या वृत्ति, तुमचे मनोविकार, वासना, इच्छा आणि भावना यांचें नियमन करा. वेदान्ताचें एक विरोधाभासात्मक विधान आहे. तें हें, कीं, स्वार्थी व्हा; परंतु एक अट आहे, कीं, तुमच्या स्वार्थास कांहीं मर्यादा असतां कामा नये. मित्रा ! याचा नीट विचार कर. स्वार्थ ह्मणजे काय? आपलें स्वतःचें संरक्षण व स्वतःचा फायदा याविषयींची शुभवासना. वेदान्त गर्जना करतो, कीं, हे मानवा ! हें सर्व विश्व तुझा देह आहे. याकरितां या विश्वाचें संरक्षण आणि हित याविषयीं काळजी बाळग. विश्वबंधुत्वापेक्षां एक वरची पायरी वेदान्त शिकवितो. विश्वात्मत्व, श्वात्मैक्य याचा अनुभव घ्या. हें जेव्हां अंगीं बाणतें आणि याचा

जेव्हां थोडा तरी प्रत्यय येतो तेव्हां मनुष्य देशभक्त, जगाचा कनवाळू अथवा **बुद्ध** होतोच होतो. फरक फक्त वरील अनुभवाच्या कमजास्त प्रमाणावर आहे.

स्वतःचें वाईट तुह्मी चिंताल तरी कसें? कदापि नाहीं! स्वार्थबुद्धि ही इतकी प्रबल नैसर्गिक वृत्ति आहे, कीं, जेथें स्वार्थ असतो येथें प्रेम अत्युत्कट असतें. **वर्डस्वर्थ** ह्मणतो—"आपल्या मालकीच्या वस्तूएवढें दुसरें आपल्याला कांहीं आवडत नाहीं (Nothing pleases so much 'as the thing that can be called mine')."

पतीस आपली कांता आवडते, ती इतकी, कीं, तिला वांचविण्याकरितां तो आपल्या देहाचा तृणवत् त्याग करण्यास तयार असतो. येथें प्रेम कांतेवर नसून, आपला सूक्ष्म आत्मा—ती माझी आहे ही कल्पना—याकरितां ती प्रिय आहे. याचप्रमाणें सर्व पदार्थांविषयीं समजावें. 'मी किंवा माझें' ही जी सर्वांच्या बुडाशीं भावना असते तिजकरितां सर्व वस्तु प्रिय होतात.* ह्मणून सर्वांत प्रिय गोष्ट ह्मणजे आपला आत्मा आहे. याप्रमाणें वेदान्ततत्वानुरूप वागून जेव्हां तुह्मी विश्वाशीं असलेला आपला यथार्थ आणि अंतिम संबंध ओळखून वागाल तेव्हां सर्व विश्व तुह्मांला अत्यंत प्रियकर व आनंददायक होईल.

आपलें रक्त नुसत्या आपल्या धमन्यांतून व शिरांतून वहात नसून तें झरे, झाडें, दगड, गारगोट्या, सूर्य आणि तारे या सर्वांमध्यें वहात आहे, अशी भावना धरा. वेदान्त ह्मणतो, कीं, असें झालें ह्मणजे सर्प देखील तुमचीं भूषणें होतील. तुमच्यामध्यें स्फुरणारें चैतन्यच त्या सर्पांमध्यें आहे. भिऊन जाऊं नका. "हे मूसा (मानवा) घाबरूं नको. ज्याला स्पर्श करण्यास तूं भीत आहेस तो सर्प विषारी नाहीं; तो पूर्णपणें अमृतमय आहे. हात पुढें कर आणि त्याला गच्च धर. तो 'अनहलक'चा ह्मणजे 'अहं ब्रह्मास्मि'चा सर्प आहे. त्याला उचलून आकाशाकडे धर. ह्मणजे अमृताचा वर्षाव होईल. त्यानें खडक फोड ह्मणजे तेथून अमृताचा

* या ठिकाणीं आमच्या **वामनपंडिताच्या** 'परम आवडि आपुलि आपणा' या श्लोकाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

कारंजा उडूं लागेल. अटलांटिक महासागरावर त्याला घर ह्मणजे तो (सागर) द्विधा होऊन तुला वाट मोकळी करून देईल."

**घेई माझा जीव, असो तो अर्पण । सर्व भावें पूर्ण विभो तुज ॥**
**घेई अंतःकरण, असो तें संपूर्ण । तुझ्याशीं संलग्न प्रेमास्पदा ॥**
**घेई माझी दृष्टी विश्वचक्षो नाथा । जडो ती सर्वथा तुझ्या रूपीं ॥**
**घेई माझे हस्त श्रमोत ते भारी । तव कार्यांतरीं सत्यरूपा ॥**

सर्व वस्तु ईश्वरी आहेत अशी भावना धरा. सर्व वस्तूंची स्थिति, शांति आणि प्रतिष्ठा तुमच्या प्रेमामध्यें आणि प्रकाशामध्यें आहे.

अशी वृत्ति मनामध्यें बाणली ह्मणजे तुमच्या अंगीं भूतदया पूर्णपणें वागूं लागेल. प्रेम ही अर्थात् तुमची वृत्ति आहे आणि कोणतीहि नीति प्रेमाहून श्रेष्ठ नाहीं. सर्व नीतीचा उगम प्रेमांतून आहे.

ज्याला नीतीचें शास्त्र ह्मणतात तें तुह्मीं अज्ञानी लोकांकरितां रचिलें आहे. तें तुह्मांकरितां नाहीं. एकाद्या झऱ्यांतून निघणारा पाण्याचा प्रवाह रूक्ष जमीन आणि तृषाक्रांत लोक यांनां उपयोगी आहे. परंतु त्या झऱ्याला त्याचा काय उपयोग आहे? अर्थात्, त्या झऱ्यानें आपण समृद्धिकारक जीवनास जन्म दिल्याचें पारमार्थिक सुख वाटल्यास अनुभवावें. तुमची गोष्ट तशीच आहे. तुमच्याशीं वादविवाद करणारे हे नीत्युपदेशक पोरकट आहेत. मूर्खांचें सोंग घेणारे ते ईश्वर आहेत. आपल्या राजपदाचा त्याग करून ते नीतीच्या घरीं भीक मागत हिंडतात.

'वेदान्त्याचें आचरण नैतिक असतें काय?' हा उद्धत व अवास्तविक प्रश्न कोणीं तरी तुझ्या डोक्यांत भरून दिला आहे. 'वेदान्त्यांत ईश्वरी तत्व नसेल तर तो कांहींच नाहीं.' तो भक्तिरसानें, प्रेमानें ओतप्रोत भरून गेलेला असतो. तो भक्तिरस असा, कीं, ज्याच्यापुढें 'मी तूं' हा द्वैतभावच रहात नाहीं. आपण जे नीतीचे नियम घालून दिलेले असतात ते हा द्वैतभाव सुव्यवस्थित रीतीनें चालण्याकरितां असतात. शुद्ध ज्ञान आणि शुद्ध भक्ति यांमध्यें मन गढून गेल्यानें जेथें आपल्या प्रियकर **आत्मारामा**-खेरीज इतर विचारांला थाराच नाहीं, तेथें चांगलें वाईट इत्यादि द्वंद्वांचा

विचार तरी येणें कसें संभवेल ! मग तुह्मीं स्वतःचें गीत गातां—**ईश्वराचें** गीत गाऊं लागतां. नंतर ईश्वराच्या सौंदर्याचें वर्णन करूं लागतां. मग तुह्मांला सर्व हातांमध्यें **ईश्वराचा** हात, सर्व नेत्रांमध्यें **ईश्वराची** दृष्टि, सर्व मनामध्यें **ईश्वराचें** चित्त, सर्व प्रेमामध्यें **ईश्वराची** भक्ति, सर्व सद्गुणांमध्यें **ईश्वरी** सद्गुण आणि सर्व ठिकाणीं **ईश्वराचा** वास आहे, असा प्रत्यय येईल.

नीति ह्मणजे मनामध्यें उत्तम विचार–विश्वव्यापी विचार आणणें आणि ज्यांचें सर्व जगानें अनुकरण करावें असें आपल्या अंतर्भावनेस—सदसद्विवेकबुद्धीस वाटतें अशीं **कृत्यें** करणें, हें होय. पावित्र्य, सौंदर्य आणि प्रेम यांहून अधिक विश्वव्यापी विचार कोणते ! सर्व जगाचें कल्याण होवो व सर्व जगाला शांति मिळो असें चिंतिणें, सर्व जग आपलें आप्त आहे असें मनांत वाटणें, असंख्य रूपें धारण करणाऱ्या ईश्वराविषयीं उत्कट भक्तीनें प्रेरित होणें, याहून अधिक विश्वव्यापी काय आहे ?

याहून अधिक नैतिक कांहीं नाहीं. प्रकाश पाडा आणि दुसऱ्यास प्रकाशवयास लावा. तुमच्या प्रकाशरूपी कारणाचें नीति हें कार्य आहे. सद्गुण हा तुमच्या ज्ञानाचा परिणाम ( कार्य ) आहे; त्याचें कारण नव्हे. कारणापेक्षां कार्याची विशेष काळजी बाळगूं नका. अखिल वस्तुजाताच्या **मध्यबिंदूस** हस्तगत करा ह्मणजे त्याभोंवतीं तुह्मांला सहज वर्तुळ काढितां येईल.

जर्मन तत्ववेत्ता **क्यांट** ह्मणतो 'सर्वकाळ अशा रीतीनें वागा, कीं, तुमच्या इच्छेचा मुख्य हेतु जगांतील सर्व सज्ञान प्राण्यांनां सार्वत्रिक नियम व्हावा.' ( Act always so that the immediate motive of thy will may become a Universal Rule for all intelligent beings. ) नीति ती हीच. आणि व्यावहारिक वेदांत ह्मणजे तुमचे उद्देश, तुमच्या इच्छा आणि तुमच्या कल्पना उदात्त करण्याचें कारण, आणि व्यक्तित्वाच्या लहानशा वर्तुळापासून सर्वात्मत्वाच्या अनंत वर्तुळाकडे जाण्याचें शास्त्र होय. आपलीं बंधनें

पवित्र आहे! सर्व वस्तूंचा आत्मा रमणीय आहे. नीतीचा उगम तेथूनच आहे. चंद्रिकेच्या प्रकाशामध्यें एकाद्या नदीतटाकीं उभे रहा आणि तो आश्चर्यकारक आणि अद्भुत देखावा पहात रहा, ह्मणजे तुमचें मन किती उदात्त होतें तें पहा. त्याच्या योगानें तुह्मांमध्यें उत्तम चैतन्य भरतें. सृष्टीच्या प्रशांत देखाव्यांचा मनावर व अंतःकरणावर होणारा उत्तम परिणाम कोणाहि विचारी नीत्युपदेशकाला नाकबूल करितां यावयाचा नाहीं. तुह्मांला अतिशय दुःख झालें, काळजीनें तुमचें मन अस्वस्थ झालें, ता‍धार काळ चंद्राकडे पहात रहा, ह्मणजे तुह्मांला आल्हादकारक ‍र मनांत होईल. गंगेंत स्नान करा, ह्मणजे तुह्मांला सूर्यकिरणां‍. वाईट गोष्टींची, चढविल्यासारखें वाटूं लागेल. मध्यरात्रीं आ‍ला खपत नाहीं. वेदान्ती आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागा, ह्मणजे तुम‍
अद्भुत कल्पना उद्भवेल. यावरून असें दिस‍ लुबाडतो अशी नुसती आर्जव, शांति, उत्साहयुक्त उद्योग, मनमिळाऊ नाहींसा व्हावयाचा नाहीं; दयालुता, पराक्रम, गांभीर्य, भलेपणा, सुसंगतता, ‍लीं असतात त्याप्रमाणें करितां वाहिलेलें जीवित इत्यादि सर्व सद्गुण आणि स‍'
मनुष्यामध्यें येणारे इतर अज्ञात आणि अनिर्दिष्ट स‍याच्या एवढ्यां सूक्ष्म सूचित होतात. पर्वतांचें ऐश्वर्य, नद्यांची निर्मलता, पर नंगे न जाना तूम मूढता, सूर्याचें तेज, चंद्राची शांति, पक्ष्यांचीं गीतें ‍जायगा.' (चांदण्या हीं सर्व निसर्गाचीं रूपें तिच्याशीं एकतान असले तुमच्या अंगावर पडून होतात. वेदान्त हा तुह्मांला प्राणमय सूक्ष्म निसर्गच
पाहण्यापेक्षां तुह्मांला पाहणें अधिक महत्त्वाचें होतें. ‍र्शी वादविवाद करणाऱ्या **निसर्गदेवतेशीं तुमचें ऐक्य झालें ह्मणजे** नीतीच्या या उच्च **उत्पादक होतां यांत तिळमात्र संदेह बाळगूं** ‍ल्पना देखील मनांत सिद्ध करण्याकरितां प्रमाणाकडे भीक मागत हिंडूं **‍मंगलच** बोला, **मंगल** दोन ओळी ह्मणा. **त्यांमध्यें अनुमिति प्रमा**
**अंतर्भूत होतात. इमरसन** ह्मणतो 'विश्वांतून ‍णि साधूला सर्व कांहीं सांपडतात.' आपण धनी आहों या भावनेनें प्रत्येका‍यदेशीर वाटतात, सर्व शांति, ऐश्वर्य आणि गौरव यांच्या अधिपतीप्रमाणें चे अवतार वाटतात."

याचकवृत्ति केव्हांहि धारण करूं नका. आपल्या मनांतील विचार व्यक्त करण्यास जर शब्दांची कमतरता पडली तर तो विचार तुह्मांमध्यें पूर्ण भरून गेला पाहिजे आणि तुमचे डोळे, तुमचे गाल, तुमच्या भ्रुकुटि व तुमचें भाल यांनींच तुमच्या वाचेचें काम केलें पाहिजे.

आपलें आचरण नीतियुक्त होईल किंवा नाहीं या विवंचनेनें त्रास करून घेऊं नका. तुमच्या प्रगतीमध्यें अडथळा आणणाऱ्या शब्दांच्या स्पृहणोवाला भिऊं नका. प्रकाशाप्रमाणें नीतीचा आपल्यामधून प्रसार देशांप्रमाणें'चा अर्थ स्पष्ट केला पाहिजे. सर्व व्याख्या झुगारून द्या. तेव्हां तो नीतिवरु-ज्यांनीं चाखला नाहीं अशा मूर्खांनीं त्या व्याख्या कोटीपुरतीच लागू केली तर ते ह्मणजे काय आहे हें त्यांनां ठाऊक नाहीं. हित साधण्याकरितां जर [illegible]णि अंतःकरण यांच्या द्वारा होणारी याचें [illegible] करूं लाग[illegible]री तत्वाचा प्रवाह हेंच सर्व कांहीं आहे. त्याचा अधःपतन होईल.

सोडून दुःखग्र[illegible] निसर्गदर्शनाप्रमाणें तुमच्या दर्शनानें तुमच्[illegible] तेव्हां त्याची उ[illegible]करण्याकरितां नीतिशास्त्रज्ञांनां जन्म घ्यावा लागेल. अनीति ह्मणजे [illegible]वीन तत्वें उत्पन्न होतील.

आपल्या अनुयायांनां शिक्षा करण्याकरितां पुढें इच्छा, कीं, जि[illegible] नव्हे. येथें (वेदान्तांत) मनुष्य बांधला जात आपली व्यक्तिरू[illegible] गरुडपक्ष्याप्रमाणें आकाशांत भरारी मारावयास भक्तीमध्यें बुडून [illegible]प्रमाणें स्वच्छंदानें हिंडूं देतो. प्रवाहाप्रमाणें तो पलीकडे आणि अ[illegible], तो गातो, तो आलाप घेतो, तो प्रेम करितो. पहा, चंद्रप्रकाश[illegible]शीं त्याच्या मनांत विरोध नसतो. सर्व कांहीं त्याला कुमारिकेप्रमाणें स्व[illegible] दुर्गुण असा त्याच्या दृष्टींतच नसतो. **जेथें मन शुद्ध** सांगत नाहीं; पर्व[illegible] **कांहीं शुद्ध दिसतें** (Good mind, good find). कलरव करणारे [illegible]रमय होईल, केशराला दुर्गंधि येईल, भ्रमर किंवा नीत्युपदेश न करत[illegible] किड्याप्रमाणें रेशमाचें जाळें (कोश) गुरफटून मोठमोठे नैतिक वा[illegible] वेदान्त्यापासून कुविचार, कृष्णकल्पना, दोषैकदृष्टि सांपडतो आणि वा[illegible] याच्याच नाहींत. हें सर्व जग त्याला ईश्वराच्या देवता तुमच्या डोळ[illegible]

घटीयंत्रा ( घड्याळा ) सारखें वाटतें. त्यांतील प्रत्येक स्क्रू त्याला पवित्र वाटतो. तो सर्वांचा विचार करितो. सुधारक या नात्यानें पहातां तो मोठा भयंकर क्रांति करणारा आहे. ज्याप्रमाणें ख्रिस्तानें सुधारक होऊन आपल्या अनुयायांनां बाप्तिस्मा देऊन त्यांना नवीन जन्म दिला, त्याप्रमाणें इतर सर्वांनां तो अन्वर्थक **'द्विज'** केल्यावांचून स्वस्थ राहणार नाहीं; परंतु वेदान्ती स्वतःला ईश्वरी स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय दुसऱ्यांनां सुधारण्याचें काम हातीं घेणारच नाहीं. नीत्युपदेशक या नात्यानें पहातां त्याचा निर्धार विलक्षण असतो. पूर्ण पावित्र्य हेंच त्याचें ब्रीद. वाईट विचार मनांत देखील आणणें हें त्याच्या नीतिशास्त्रांत अक्षम्य आहे. वाईट गोष्टींची, वाईट कृत्यांची आठवण करणें हें देखील त्याला खपत नाहीं. वेदान्ती नीतिशास्त्रवेत्ता **भगवान् बुद्ध** ह्मणतोः—

" दुसरा माझा द्वेष करितो, दुसरा मला लुबाडतो अशी नुसती कल्पना देखील ज्याच्या मनांत येते, त्याचा द्वेष नाहींसा व्हावयाचा नाहीं; आणि ज्याप्रमाणें घोड्यामागें गाडीचीं चाकें लागलेलीं असतात त्याप्रमाणें दुःख हें त्याच्या मागचें कधींहि सुटावयाचें नाहीं. "

हे देवांनों ! विचार करा. वेदान्ती नीति पावित्र्याच्या एवढ्या सूक्ष्म व उज्ज्वल स्थितीला तुह्मांस नेऊन पोंचवितें. ' बम पर नंगे न जाना तूम शाबे महताब में चांदनी पड जायेगे मैला बदन होजायगा.' ( चांदण्या रात्रीं छपरावर उघडे जाऊं नका. नाहीं तर चांदणें तुमच्या अंगावर पडून तुमचें अंग मलिन होईल. )

तुझी मानसिक स्थिति इतकी सूक्ष्म आहे. तुझ्याशीं वादविवाद करणाऱ्या नीतिशास्त्रवेत्त्याला अनुभवावांचून **बुद्ध**देवाच्या नीतीच्या या उच्च ध्येयापर्यंत पोंचतां येईल काय? ह्मणून वाईटाची कल्पना देखील मनांत आणूं नको असें वेदान्त त्याला सांगतो. सर्वकाळ **मंगलच** बोला, **मंगल** विचार करा आणि **मंगल** भावना धरा.

**इमरसन** ह्मणतो " कवीला, तत्वज्ञाला आणि साधूला सर्व कांहीं पवित्र व प्रियकर भासतें, घडणाऱ्या सर्व गोष्टी फायदेशीर वाटतात, सर्व दिवस सुमुहूर्तच वाटतात आणि सर्व लोक ईश्वराचे अवतार वाटतात. "

'माझ्या आत्म्याच्या कायद्याखेरीज इतर कोणताहि कायदा मला पवित्र नाहीं.'

'माझें जीवित जीविताकरितांच आहे, लोकांनां दाखविण्याकरितां नाहीं.'

निसर्गाशीं धन्याप्रमाणें बोला.

मनाच्या मौनमंदिरामध्यें निसर्ग आणि मानवकोटि यांचें अभीष्ट चिंता. हीं तुमचीं मुलें आहेत. मंगल गीतें गाऊन त्यांनां उगी करा. निर्भय व्हा. सर्व संशय झाडून टाका. तुह्मी ईश्वर आहां. नीतिशास्त्राच्या सर्व तत्वांपेक्षां ही कल्पना अधिक व्यापक आहे.

बुद्धदेव ह्मणतातः 'या देहरूपी गृहाच्या कर्त्याला तूं पाहिलें आहेस, आतां पुनः तूं हें घर बांधूं नको. तुझे सर्व वेळ मोडून गेले, आधारस्तंभ भग्न झाला आणि मनास सनातन निर्वाण प्राप्त होऊन सर्व वासनांचा क्षय झाला आहे.'

निज रे निज बाळा। स्वच्छंदें। अंतरिंच्या आनंदें। निज रे निज बाळा॥ध्रु०
गद्‌गद कंठें तूं। रडूं नको। अश्रुबिंदु ढाळुं नको॥
टाकुनि भय, घेईं। विश्रांति; । सुरमुनि तुजला स्तविती॥निज रे० ॥ १ ॥

धन बल तनुकांति। वर दाता। अखिल जगा चालविता॥
आत्मा विमल तुझा। विमल मना। चैतन्योद्गमस्थाना॥ निज रे० ॥ २ ॥

विरोधकलहांचें। कारण तूं। होशी मंगलहेतु॥
निद्रा विश्रांति। उभयांचें। जागृत गृह तूं साचें॥ निज रे० ॥ ३ ॥

अगाध ज्ञानाचें। तूं मूळ। क्रियावंत तूं प्रबळ॥
साक्षी वृत्तींचा। सुनिर्मळ। कांहिं न करिं तळमळ॥ निज रे० ॥४॥

परि तूं त्यागीं बा। समुळेंसीं। सत्वरि तमोगुणासी॥
बंधन तोचि करी। जीवासी। फिरवि लक्ष चौऱ्यांशीं॥ निज रे०॥५॥

विश्वात्मैक्याचा। कोणाहि। प्रत्यय न मिळे पाहीं॥
स्वामी राम ह्मणे। केव्हांहि। सत्वशुद्धिविण कांहीं॥ निज रे० ॥६॥

# HIMALAYAN SCENES.

## हिमालयाचें सौंदर्य.

पवित्र गंगेस 'रामा'चा विरह सहन होईना. शेवटीं तिनें एक महिन्याच्या वियोगानंतर त्याला आपल्याकडे ओढून आणिलें. 'रामा'ची भेट झाल्याबरोबर आपली सर्व शालीनता विसरून ती आनंदाचे अश्रु ढाळूं लागली. गंगोत्रीकडील त्या प्रिय गंगेचें मुग्ध सौंदर्य आणि लीलानृत्य यांचें कोण वर्णन करूं शकेल? शुभ्र पर्वत आणि निर्मल व निष्पाप देवदार वृक्ष या तिच्या संवगड्यांची सरलता फार प्रशंसनीय आहे. हे देवदार वृक्ष उंचपणामध्यें फारशी कवींनीं वर्णिलेल्या नायिकेशीं स्पर्धा करितात; आणि त्यांचे सुगंधयुक्त निःश्वास तर आपणास उत्तेजित, उल्लसित आणि उन्नत करितात. 'पाषाणामध्यें देव निद्रित असतो; वनस्पतीं-मध्यें तो श्वासोच्छ्वास करूं लागतो, प्राण्यामध्यें तो चलनवलन करितो व मनुष्यामध्यें तो जाणीवरूपानें प्रगट होतो,' हें या स्थानीं कितीतरी उत्तम प्रकारें दिसून येतें बरें!

जम्नोत्री सोडल्यापासून यात्रेकरू दहा दिवसांनीं गंगोत्रीस पोंचतात; परंतु 'रामा'ला जम्नोत्री सोडल्यापासून गंगोत्रीस पोहोंचण्यास तीनच दिवस लागले. सपाट प्रदेशांत राहणाऱ्या लोकांनीं कधींहि न आक्रमिलेल्या मार्गानें 'राम' आला. या रस्त्याला पहाडी लोक 'छायामार्ग' ह्मणतात. डोंगरांच्या निर्जन गुहांमध्यें आह्मांला एकसारख्या तीन रात्री काढाव्या लागल्या. वाटेमध्यें एकादी झोंपडी अगर खेडेगांव देखील आह्मांला आढळलें नाहीं. ह्या सबंध प्रवासामध्यें आह्मांला एक देखील द्विपाद प्राणी दृग्गोचर झाला नाहीं.

या मार्गाला 'छायामार्ग' ह्मणण्याचें कारण असें आहे, कीं, बारा महिने त्यावर छाया असते. काय! वृक्षाची छाया असें मी ह्मणालों? छे, मुळींच नाहीं. इतक्या प्रचंड उंचीवर व असल्या गार हवेमध्यें येण्याचें वृक्षांनां काय प्रयोजन आहे? रस्ता तर बहुतेक मेघांनींच आच्छादित असतो. जम्नोत्री आणि गंगोत्रीजवळील खेड्यांतील गुराखी गुरें राखतांना दोनतीन महिने अरण्यांत काढितात. एके वेळीं गंगा आणि यमुना या दोन भगिनींच्या उगमांच्यामध्यें असलेल्या वानरपुच्छ आणि हनुमानमुख नांवाच्या हिमाच्छादित शिखराजवळ त्यांची परस्परांस भेट झाली, आणि अशा रीतीनें हा मार्ग सांपडला. पुष्कळ तऱ्हतऱ्हेचीं फुलें सर्व मार्गावर पसरलेलीं असल्यामुळें तो मार्ग प्रत्यक्ष सुवर्णपटाच्छादित भूमीप्रमाणें दिसत होता. पिंवळीं, निळीं आणि जांभळीं फुलें तर येथें विपुल सांपडतात. असंख्य भुईकमळें, नीलकुसुमें, शेवंती, मोगरी, तऱ्हतऱ्हेचीं सुवर्णपुष्पें, गुगुळधूप, ममिरा, मिठातेलिया, सालंमिश्री आणि इतर चित्रविचित्र पानें असलेल्या वनस्पति, केशर, इतरासु आणि इतर सुवासिक रोप, भेरगड्डा आणि पुष्पकोशांमध्यें सुंदर हिमकण असलेले ब्रह्मकनवाळ इत्यादि हीं सर्व या पर्वतांनां शोभा आणून त्यांचें तीं नंदनवनच बनवितात.

**नयनानंदा वर्णी, प्रेमाची होशि अंतिमा खाणी,**
**तव शब्दरहित वाणी जगतांतिल सर्व जाणती प्राणी. १**
**तव वाणि रूपमंदिरिं सांठविलें गुह्य सर्व विभवाचें,**
**तव कार्य दिव्य आहे; व्यक्त करायासि जें न ये वाचे. २**
**योजी विश्वंभरचि प्रेमभरें सत्य बा तुझी वाणी,**
**निर्मल पूर्णानंद व्यक्त करायासि, हें मनीं आणीं. ३**

"गोलचंदका जोबन फूट फूट बहिर निकल रहा है." (सर्व बाजूंनीं सौंदर्य फुटून फुटून बाहेर पडत आहे.) मंद वायु सर्वांचें—विशेषतः उज्वल रंगाच्या फुलांचें चुंबन घेत इतस्ततः विहार करित आहेत. वातलहरीवरील सुगंधाच्या ऊर्मि 'रामा'ला सुस्वर गायनासारख्या वाटल्या. वाऱ्यानें वाहून आणलेले मृदु व मधुर सुगंध येथें वाटेल तेवढे मिळतात.

# हिमालयाचें सौंदर्य.

प्रणयिजनांच्या परस्पर भेटीच्या वेळच्या सुस्मिताप्रमाणें ते मधुर असतात आणि वियोगाच्या वेळच्या अश्रूप्रमाणें ते मृदु असतात. या महाकाय पर्वताच्या शिखरावर हीं रमणीय शेतें कशीं नकशीदार गालिचाप्रमाणें पसरलेलीं आहेत. का हीं देवाची नृत्यभूमि किंवा भोजनमंदिरें आहेत? या मोहक प्रदेशामध्यें झुळझुळ वाहणारे झरे आणि कड्यावरून धो धो पडणाऱ्या नद्या यांचीहि वाण नाहीं. येथें कांहीं कांहीं शिखरांवर दृष्टीला पूर्ण स्वातंत्र्य मिळतें. चोहों बाजूंनीं तिची गति अप्रतिहत चालते. तिच्या आड येण्यास टेंकड्या नाहींत व तिच्या मार्गांत अंधुकता आणण्यास रुष्ट मेघहि नाहींत. कांहीं कांहीं उच्च शिखरें आकाश फाडून मेघमंडळाला विदीर्ण करण्याच्या भरांत जणूं काय आपली वाढ थांबविण्याचें विसरून अंतराळांत गडप होत आहेत, असें भासतें.

या विशाल आणि उद्धत पर्वताच्या भयानक सौंदर्याचें वर्णन करतांना प्रभातकाळच्या रत्नसदृश हिमबिंदूंच्या चंचल लावण्याकडेहि आपण दुर्लक्ष्य करतां कामा नये. कारण, त्यानें आमच्या मार्गाची शोभा आणि मोहकता कांहीं थोडीथोडकी वाढविली नाहीं. हा कमलपत्रावरील चिमुकला व क्षणभंगुर असा हिमबिंदु मानवी मनाची चंचलता किती उत्तम रीतीनें सुचवीत आहे बरें! चिमुकला आणि क्षणभंगुर खराच, पण तो किती स्वच्छ, प्रसन्न व तेजःपुंज असून आपल्या हृदयामध्यें सर्व प्रकाशांचा उगम अशा सच्छील रवीचें (Sun of righteousness) प्रतिबिंब पाडित आहे! हे मानवा! तूं तो अणुतुल्य बिंदु आहेस किंवा अनंत असा सूर्य आहेस! तूं निःसंशय प्रकाशांचा प्रकाश आहेस, क्षुद्र बिंदु नाहींस. सर्व वेद आणि 'राम' तुला असें निक्षून सांगतात, कीं, तुझाच देदीप्यमान प्रकाश या सर्व मोहक प्रदेशाला जीवन आणि कांति देत आहे, हें तूं विसरूं नको. वर खालीं सर्व बाजूंला तुझीच तेजोमय सत्ता विलसत आहे. जिला परिमाण बांधूं शकत नाहीं (which does not respect quantity) व जी पूर्ण व अंश यांतून सारखीच व्यक्त होते, अशी शक्ति तूं आहेस. उषेला तिचें सुहास्य आणि गुलाबाला त्याच्या गालावरील लाली हीं देणारा तूंच आहेस.

मध्यरात्रिच्या ताऱ्यांमध्यें प्रकाश दिसतो सुरम्यसा,
अथवा प्रातःकाळीं चमके हिमबिंदुंमधीं सुंदरता. १
अथवा उज्वलरूपें भासे सुरम्य मनुजा तुज जें जें,
तें तें आहे रूप तुझेंचि प्रतिबिंबित या जगामध्यें. २
तारागणयुत रजनिकांत तो चंद्र तुझाची सत्य पहा,
हिमबिंदूंच्या प्रभातसमयीं सूर्यास्ताच्या समयीं वा. ३
जें जें सुंदर उज्वल भासे, तें तें घडलें तव हस्तें,
द्युति तव विश्वामाजी विलसे, सर्व बोलती तुज ऐसें:— ४

'दूर कासया तूं भ्रमसी ।
वसे ईश हा येथेंची' ॥

गोपिकांचें लोणी गुपचुप यथेच्छ भक्षण केल्यावर थो ऊसें अवशिष्ट लोणी वांसरांच्या व बकऱ्यांच्या नाकांला फांसण्याची क ला गोपालकृष्णाला (गोलचंदाला) उत्तम साधली होती. त्या बिचाऱ्या प्राण्यांनां याबद्दल गोपींकडून भरपूर मार व शिव्या मिळत अ त, आणि आमचे हे छोटेखानी संभावित चोर पार सुटून जात असत. सर्व आत्म्यांचा आत्मा स्वेच्छेनें (लीलेनें) सर्व घडवून आणीत अहे, वस्तुतः हा जादुगार 'राम'च सर्व खेळ करीत आहे; परंतु त्याची जबाबदारी मात्र आपल्या मायेच्या योगानें तो खोट्या अहंकारावर ला त आहे. त्या गोरस खाणाऱ्या कृष्णाला संभावित ह्मण अगर द्वाड ह्मण, वाचका! तोच तूं आहेस. त्याला जादुगार ह्मण अगर गारुडी ह्म स 'राम' हा तुझाच आत्मा आहे. जें कांहीं आहे तें तुझ्यांत अ थास्वि कांहीं तूं चालवीत आहेस, जडदेहाच्या द्वीपामध्यें तूं कोंडलेला ासि बा कर्तृत्वाचा अभिमान बाळगणारा अहंकार हा कदापि तुझा आत्म ... न महान् सागर आहेस.

सति (बाह्य वस्तूंवर रमलेल्या नेत्रांकरितां)

'रामा'ची सध्यांचीकार दरीमधील झोंपडीमध्यें आहे. सभोंवतीं डोंगरांतील एका तळें हिरवेंगार गवत पसरलें आहे आणि समोर नैसर्गिक निरंजन

गंगेचा सुरम्य देखावा दृग्गोचर होत आहे. **नारायण** आणि **तूलाराम** दुसरीकडे आहेत. येथें रामभूति ( वृक्ष अगर वनस्पतिविशेष ) विपुल उत्पन्न होते. चिमण्या आणि इतर पक्षी दिवसभर मनमुराद शब्द करितात. हृल्लसन्‍रिलेली आणि तकवा आणणारी असून गंगेचें गायन आणि पक्षिसमूहांचें कूजित यांनीं तर एकसारखा स्वर्गीय उत्सवच करून सोडला आहे. येथें गंगेचें पात्र विस्तीर्ण आहे; जणूं काय ती एका मोठ्या मैदानांतूनच वाहत आहे. परंतु प्रवाह मात्र जोराचा आहे. तथापि पुष्कळदां त्यांतून 'राम' पैलतीरीं गेलेला आहे. केदार आणि बद्री यांनीं मोठ्या प्रेमानें अनेकदां 'राम'बादशहाला आमंत्रण केलें आहे; परंतु विरहाच्या नुसत्या कल्पनेनेंच लाडक्या गंगेला दुःख होतें, आणि तिचा मुखचंद्रमा सुकून जातो. तिला नाखुष करणें 'रामा'च्या जीवावर येतें आणि तिनें वांकडें तोंड केलेलें त्याच्यानें पाहवत नाहीं.

## सुमेरु—दर्शन.

जम्नोत्रीच्या गुहेंत राहत असतां 'रामा'चें रोजचें अन्न ह्मणजे चोवीस तासांतून एकदां मर्चा ( एक प्रकारचें धान्य ) व बटाटे खाणें हें होतें. यानें अजीर्ण झालें. लागोपाठ तीन दिवस रोज सात सात रेच झाले. आजारीपणाच्या चवथ्या दिवशीं भल्या पहांटे उष्णोदकाच्या झऱ्यामध्यें स्नान करून 'राम' सुमेरूस जावयास निघाला. अंगावर एका कौपीन-खेरीज कांहीं वस्त्र नव्हतें. ना जोडा, ना फेटा, ना छत्री. गरम कपडे घातलेले पांच धट्टेकट्टे पहाडी लोक त्याच्याबरोबर होते. नारायण आणि तूलाराम यांनां खालीं घरसाळीला पाठविलें.

सुरुवातीला लहानगी यमुना तीनचारदां ओलांडावी लागली. नंतर ४५ यार्ड उंच, दीड फर्लांग लांब अशा एका बर्फाच्या प्रचंड धोंडीनें यमुना-पात्राची दरी बुजवून टाकिली होती. दोन थेट उभ्या भिंतींप्रमाणें दोहों बाजूंनीं सुळक्यासारखे दोन पर्वत दिमाखानें उभे होते. 'राम' बादशहास पुढें जाण्यास अडथळा करण्याचा यांनीं कट केला आहे काय? बेहत्तर आहे. **वज्रप्राय दृढनिश्चयापुढें सर्व प्रतिबंध पार नाहींसे झालेच पाहिजेत!** आह्मीं पश्चिमबाजूच्या पर्वताची भिंत चढूं लागलों. मधून मधून

आह्मांला पाऊल ठेवण्यास कांहींच आधार मिळेना, आणि मग आह्मांला सुवासिक पण कांटेरी गुलाबाच्या फांद्या धरून आणि आमच्या पायांचीं बोटें व आंगठे 'चा' नांवाच्या मऊ जंगली गवतामध्यें अडकवून घेऊन शरीराचा तोल सांभाळावा लागत असे. मध्यें मध्यें तर मृत्यूनें आह्मांला गांठलेंच होतें. तळास, यमुनेच्या दरींनां गच्च भरून टाकणारें गार वर्फ असलेलें एक खोल विवर, आमच्यापैकीं एकाद्याचा पाय जरा निसटला तर त्याला यथायोग्य पाहुणचार देण्यास जणूं थडग्याप्रमाणें तयार टपून बसलें होतें. खालून यमुनेचा शब्द मंद आवाज करणाऱ्या ढोलक्याच्या शोकगीताप्रमाणें अद्याप आमच्या कानीं पडत होता. याप्रमाणें पाऊण तास आह्मांला जणूं काय मृत्यूच्या जबड्यांतूनच जावें लागलें. विलक्षण स्थिति तर खरीच. कारण, एका बाजूला मृत्यु मी ह्मणून समोर उभा आणि दुसऱ्या बाजूनें सर्व शीणभाग हरण करून तकवा आणणारी सुगंधयुक्त हवा. अशा या भयंकर द्राविडी प्राणायामाच्या साहसानें, आह्मी एकदाचे त्या प्रचंड बर्फाच्या धोंडीच्या पार निघून गेलों. येथें यमुना मागें पडली. ही सर्व मंडळी नंतर एका उंच पर्वतावर चढली. तेथें रस्ता, पाऊलवाट, किंवा कांहींच नव्हतें. नंतर तिकडे आह्मांला एक घनदाट अरण्य लागलें, त्यांतील झाडांचें लांकूडसुद्धां दिसेना. 'रामा'च्या देहाला बरेच ओरखडे आले. या ओक व भूर्जवृक्षाच्या वनांतून एक तासभर धडपड केल्यावर लहानलहान झुडपें असलेल्या उघड्या मैदानावर आह्मी आलों. हवा बदलली होती किंवा ती तिकडील मधुर सुवासानें गच्च भरून गेली होती. या चढणानें त्या पहाडी लोकांनां धाप लागली. रामालाहि तो चांगलासा व्यायाम वाटला, शंभर फुटांस ऐशीं फूट अथवा त्याहूनहि अधिक अशीं चढणें चढावीं लागलीं. जमीन बहुतेक निसरडी होती. परंतु सर्व बाजूंनीं असलेल्या भव्य वृक्षांमधील रांगा, मोहक पुष्पसमूह आणि बहारीची पालवी, यांनीं मार्गांतील त्रासाचा विसर पाडिला. युरोपियन बागवान, सरकारी बागा सुशोभित करण्याकरितां येथूनच फुलांचें बीं नेतात आणि इंग्रजी बोलणारे अडाणी हिंदी तरुण यांनां विलायती फुलें ह्मणतात; परंतु या फुलांची अशी एक मजा

आहे, कीं, तीं दुसरीकडे नेऊन लाविलीं असतां त्यांचा रंग तसाच राहतो खरा, पण वास मात्र अगदीं नाहींसा होतो.

युरोपियन शिक्षणानें फुगून गेलेले तरुण, युरोपियन प्रोफेसरांनीं लिहिलेल्या ग्रंथांमधून वेदान्ताचा दूरचा 'प्रतिध्वनि' वाचतात आणि त्यांनां पाश्चिमात्य वाटणाऱ्या त्या विचारांचे आणि कल्पनांचे ते चहाते बनतात; परंतु त्या बिचाऱ्यांनां हें ठाऊक नसतें, कीं, त्यांनां इतकीं आवडणारीं तीं विचारकुसुमें आपल्याच जन्मभूमींतून नेऊन तिकडे लाविलीं आहेत. मात्र विशेष फरक हाच, कीं, युरोपियन प्रोफेसरांच्या हातामध्यें या दिव्य फुलांचा 'त्याग'रूपी सुगंध नाहींसा होतो. युरोपियनांनीं प्रतिपादलेल्या वेदान्तामध्यें तत्वज्ञानाचा बाह्य रंग आणि आकार मात्र असतो; परंतु त्यांत 'विज्ञाना'चा सुगंध नसतो.

"अक्सगुल्में रंग है, गुल्का वा लेकीन बूं नहीं."

असो. पण 'रामा'च्या नादुरुस्त प्रकृतीचें काय झालें? त्या दिवशीं तो खडखडीत बरा झाला. आजार नाहीं, थकवा नाहीं, किंवा दुसरी कांहींच तक्रार राहिली नाहीं. त्या पहाडी लोकांपैकीं कोणीहि त्याच्यापुढें जाऊं शकला नाहीं. आह्मी वरवर चढत चाललों आणि मग आमच्यापैकीं, प्रत्येकाला क्षुधा लागली. एवढ्या वेळांत आह्मी जेथें मेघ पर्जन्यवृष्टि करूं शकत नाहींत, परंतु जेथें यथेच्छ बर्फ मात्र पडतें, अशा प्रदेशीं आलों. या उंच, गार व रुक्ष पर्वतांवर वनस्पतींचा संपर्क देखील नव्हता. आह्मी येऊन पोंचण्यापूर्वी नुकताच बर्फाचा नवीन थर पडलेला होता.

'रामा'स बसावयास एका मोठ्या शिळेवर एक तांबडें ब्ल्यांकेट (बनात) गालिचाप्रमाणें पसरलें. आदल्या रात्रीं शिजविलेले बटाटे त्याला खावयास दिले. बरोबरीच्या सोबत्यांनीं त्या साध्या शिळ्या अन्नाचा मोठ्या कृतज्ञतेनें स्वीकार केला. बर्फाच्या चकचकीत, खुसखुशीत तुकड्यांनीं पाण्याचें काम भागविलें. ही 'रामा'ला थोडीशी चैन पण वाटली. आहार आटपल्यावर पुन्हां आह्मी चालूं लागलों. धिमेपणानें पुढें वर जात जात आह्मी आमचा मार्ग सुधरूं लागलों. आमच्यांतील एक तरुण मनुष्य दमून खालीं बसला. त्याचे पाय त्याला पुढें नेईनात आणि त्याचा

दमहि पण छाटेना, आणि आपणास भोंवळ येते असें तो ह्मणूं लागला. तेव्हां आह्मीं त्याला तेथेंच सोडून दिलें. जरासे पुढें गेलों तोंच दुसराहि बेशुद्ध होऊन पडला. तो आपलें डोकें अतिशय फिरतें ह्मणाला. त्या वेळे-पुरता त्यालाहि तिकडे एकटाच सोडला, व आह्मी बाकीचे पुढें चाललों. कांहीं वेळानंतर तिसरा सोबती मागें पडला. त्याचा घुणाच फुटला. तेव्हां आपल्याबरोबर दोघांनां घेऊन राम पुढें जाऊं लागला. तीन मोठे जंगली हरीण मोठ्या ऐटींत आमच्या समोरून गेलेले आह्मीं पाहिले. चौथा सोबती किंचित् मागें रेंगाळूं लागला आणि सरतेशेवटीं बर्फाच्छादित दगडावर पडला. आसपास पातळ पाणी कोठें दिसत नव्हतें, परंतु तो मनुष्य जेथें निजला होता त्याच्या खालीं एक खोल गुडगुड असा आवाज ऐकूं येत होता. वर सांगितलेली तांबडी बनात, एक दुर्बिण, हिरवा चष्मा, आणि एक कुऱ्हाड एवढें घेऊन एक ब्राह्मण मात्र रामाबरोबर चालूं लागला. श्वासोच्छ्वास करण्यास हवा अगदीं विरळ होत चालली, आणि आश्चर्य हें, कीं, येथें दोन गरुडपक्षी आमच्या डोक्यावरून उडून गेले. निळसर काळ्या रंगाच्या शिळ्या बर्फाची एक कंटाळवाणी चढण आह्मांला चढून जावी लागली. पाय ठेवण्यास आधार मिळण्यासाठीं सोबती बर्फा-मध्यें पांवटे खणूं लागला; परंतु तो पुराणा बर्फ इतका घट्ट होता, कीं, त्या बिचाऱ्याची कुऱ्हाड मोडली आणि तत्क्षणीं तेथल्या तेथें आह्मांला एका बर्फाच्या सरीनें गांठलें. ह्या बर्फ पडण्यानें आमच्या अहितापेक्षां हितच करण्याचा ईश्वराचा उद्देश आहे असें आश्वासन देऊन 'रामानें' त्याला धीर दिला, आणि शेवटीं तसेंच झालें. कारण, आह्मांला भीति वाटणारें तें बर्फ पडल्यामुळें आमचें चालणें सुकर झालें. अणकुचीदार डोंगरी काठ्यांच्या साहाय्यानें आह्मी ती चढण चढून गेलों. आणि मग काय विचारतां! डोळ्यांनां दिपविणाऱ्या बर्फाचे मैलचे मैल रुंद असे सपाट विस्तीर्ण प्रदेश एकसारखे लागून गेले होते. सर्व बाजूंनीं रुप्यासारखी शुभ्र व झगझगीत जमीन चकाकूं लागली होती. अहाहा! तेव्हांचा आनंद काय सांगावा! हा दैदीप्यमान भास्वत् दिव्य अद्भुत असा क्षीरसागरच नव्हे काय? 'रामा'चा अद्भुत आनंद गगनांत मावेना. या वेळीं खांद्यावर बनात टाकून पायांत गोणपाटाचे जोडे घालून राम बर्फावरून सूं भरधांव पळत सुटला!

या वेळीं त्याचेबरोबर कोणी उरला नाहीं. ( अखेरके तें हांस अखिल किसीधारा. ) चांगले तीन मैल या बर्फावरून तो मोठ्या वेगानें गेला. केव्हां केव्हां पाय रुतत असत आणि बऱ्याच कष्टाशिवाय बाहेर निघत नसत. सरतेशेवटीं एका बर्फाच्या ढिगाऱ्यावर ती तांबडी बनात पसरली. जगाच्या दगदगीपासून व किरकिरीपासून मुक्त आणि जनसमूहाच्या कलहापासून व क्षोभापासून फार दूर–अलिप्त–एकटेच 'राम' तेथें अधिष्ठित झाले. शांतता येथें मूर्तिमंत वसत आहे. येथें पूर्ण–शांतीचें अखंड साम्राज्यच आहे. घनघोर अनाहतध्वनीशिवाय दुसरा कोणताच ध्वनि ऐकूं येत नव्हता. किती शांत व धन्य एकांत हा !

मेघपटल विरल होत चाललें. पातळ ढगांमधून आलेले सूर्यकिरण त्या जागेवर पडले, आणि त्या योगें, एकदम तो रजतासारखा शुभ्र प्रदेश तप्त सुवर्णासारखा दिसूं लागला ! सुमेरु अथवा हेमाद्रि हें नांव त्याला अगदीं यथार्थ आहे.

हे प्रापंचिक जन हो ! तुह्मी पक्कें समजा, कीं, तरुण युवतीच्या गालांवरील आरक्त छटा, दिव्य रत्नें, अथवा सुंदर अलंकार आणि प्रासाद ह्यांमध्यें सुमेरूच्या कल्पनातीत रमणीयतेचा आणि मोहकतेचा यत्किंचित् अंशहि मिळणार नाहीं ! आणि जेव्हां तुह्मी आपलें आत्मस्वरूप जाणाल, तेव्हां असे असंख्य सुमेरु तुह्मांला आपल्यामध्यें दिसूं लागतील, सर्व सृष्टि तुमची अंकित होईल; ढगापासून तों मातीच्या ढेंकळापर्यंत, नील नभापासून तों हरित धरित्रीपर्यंत, आणि यांत अंतर्भूत असलेल्या गरुडा-पासून तों घुंगुरट्यापर्यंत सर्व प्राणी तुमच्या सेवेस तत्पर राहतील. देव तुमची आज्ञा मोडण्यास धजणार नाहींत !

हे नभा ! तूं आतां निरभ्र हो. हिंदुस्थानावर पसरलेल्या अज्ञान–मेघांनों ! व्हा दूर ! याउपर या पवित्र भूमीवर तुह्मीं संचार करतां कामा नये. हिमाचलाच्या बर्फांनों ! तुमचा स्वामी तुह्मांला असें फर्मावीत आहे, कीं, तुह्मी आपलें पावित्र्य व आपली सत्यनिष्ठा ( ज्ञाननिष्ठा ) कायम ठेवा. द्वैतानें कलुषित झालेलीं उदकें खालील क्षेत्रांवर–मैदानांवर–केव्हांहि पाठवूं नका.

अस्तु. मेघ विदीर्ण झाले. सर्व बर्फांनीं भगवा रंग धारण केला. पर्वतांनीं संन्यास धारण केला काय? 'रामा'च्या सेवकगणाचा पोषाक त्यांनीं चढविला आहे खरा. काय पण हा देखावा! पर्वतांवरील बर्फ 'रामा'चे निरोप पोंचविण्याकरितां मोठ्या आतुरतेनें त्याच्या मुखाकडे पहात आहेत.

**अहाहा! अहाहा! किती मौज आहे!**
**कसा गोल हा सृष्टिचा शोभताहे!**
**परी गुह्य याचें असे कीं अचिंत्य,**
**विमूढा कवींनां कळेना तदन्त! १**
**कळे तें परी बोलण्या ये न वाचे,**
**महद्गुह्य या सृष्टिच्या अंतरींचें;**
**तवात्मा निसर्गाचिये अंतराशीं**
**स्फुरों दे; तदा ऊकले गुह्यराशी. २**

एक अमेरिकन साधु ह्मणतोः—सृष्टि ही एका कल्पनेचें रूपांतर (अवतार) आहे, आणि ज्याप्रमाणें बर्फाचें पाणी व बाफ होतें त्याप्रमाणें पुन्हां हें दृश्य कल्पनारूप होतें. सृष्टि ही मनाचें स्थूलरूप आहे; परंतु हें चंचल स्थूलरूप विरल होत होत पुन्हां कल्पनेंत विसर्जन पावतें आणि ह्मणूनच सेंद्रिय किंवा निरिंद्रिय सृष्टपदार्थांचा आपल्या मनावर कांहीं परिणाम होतो आणि त्यांचा भाव जाणला जातो. अशा वेळीं बद्ध, संकुचित आणि देहधारी मनुष्य विदेही मनुष्याशीं बोलत असतो.

प्रश्न—जगत् हें जर माझी कल्पनाच (मनाचें अथवा कल्पनेचें (स्थूल-रूप) आहे तर माझ्या इच्छेबरोबर बाह्य पदार्थ कां बदलत नाहींत?

उत्तर—गौडपादाचार्य सांगतातः—स्वप्नसृष्टीमध्यें एक कल्पनाच, एका पक्षीं बाह्य जड पदार्थ आणि दुसऱ्या पक्षीं अंतःकरणांतील वृत्ति, इच्छा इत्यादि अशा रीतीनें द्विधा होते. आणि अशा स्थितीमध्यें मनांतील विचार आपल्या स्वाधीन, चंचल व जडपदार्थांशीं तुलना करून पाहतां, मिथ्या असतात आणि बाह्य पदार्थांनां मात्र स्वतंत्र, शाश्वत आणि सापेक्षतेनें स्वतःसिद्धपणा आहेसा वाटतो.

परंतु वस्तुस्थिति पाहतां जागृत मनुष्याच्या दृष्टीनें या स्वप्नाचें सत्य आणि असत्य, बाह्य आणि आंतर असे दोन्ही भाग कल्पनामयच आहेत;

आणि त्या देखील आपल्या कल्पना आपणच उत्पन्न केलेल्या आहेत. आणि पुन्हां जागृदवस्थेमध्यें मनुष्यांनां स्थूल, प्रत्यक्ष जड पदार्थ व अप्रत्यक्ष कल्पना असा स्पष्ट भेद करतां येतो; पण स्वात्मानुभवी पुरुषाला सर्व स्थूल पदार्थ त्याचप्रमाणें चंचल वृत्ति हीं दोन्हीं वस्तुतः स्वप्नवत् मिथ्याच आहेत. मात्र जोंपर्यंत ते पदार्थ भासमान आहेत तोंपर्यंत ते ह्मणजे आपल्याच कल्पना आहेत, अशी त्याची भावना असते आणि जरी आपल्या इच्छेप्रमाणें बदलतां येत नसले तरी ते आपल्याच कल्पना आहेत. तुमच्या बुद्धीला तुमच्या केंसांची वाढ किंवा तुमच्या चेहऱ्यावरील प्रफुल्लता यांचें कारण सांगतां यावयाचें नाहीं; तरी तुह्मी ( केंस व चेहरा ) यांनां आपलेच असें समजतां. त्याचप्रमाणें जीवन्मुक्तानें आपला आत्माच सर्वांचा आत्मा आहे असें ओळखून प्रत्येक पदार्थ आपलाच आहे असें मानलें पाहिजे. तो पूर्ण प्रेममूर्ति असतो. त्याची ‘ एकमेवाद्वितीयं ’ अशी ब्रह्मभावना सिद्ध होत चालली ह्मणजे दृश्य आणि काल्पनिक हे भासमान भेदहि आपोआप मावळतात.

## माया.

कोलीत वाटोळें फिरविणें ( अलातचक्र ) हिंदुस्थानच्या कांहीं भागांत प्रचारांत आहे. ती चकाकणारी ज्वाला एकदां प्रकाशाच्या रुंद वर्तुळाप्रमाणें दिसते, एकदां अग्नीच्या एकसारख्या एका रेषेप्रमाणें दिसते, पुन्हां लंब वर्तुळाकार होते, वर जाते, खालीं येते, याप्रमाणें तिचे निरनिराळे मौजेचे देखावे दिसतात. हे सर्व आकार त्या ज्वाले ( ज्योती ) मध्यें मूळचे असतात काय? ते त्या कोलितांतून येतात का ते बाहेरून आपोआप तयार होतात? जेव्हां कोलीत फिरत नसतें तेव्हां ते आकार त्या त्या कोलितांत शिरतात, का दुसरीकडे कोठें निघून जातात? या सर्व प्रश्नांनां नकारार्थी उत्तर द्यावें लागतें. कोलीत फिरत असतां, सरळ किंवा वांकड्या ओळी उत्पन्न करितें. फिरणें बंद झालें असतां ह्या आकारांचा मागमूस देखील त्या कोलितांत राहत नाहीं. कोलीत जोरानें फिरत असतां देखील त्या रेषा जरी प्रत्यक्ष दिसत असल्या तरी त्या कांहीं सत्य नव्हेत.

त्याचप्रमाणें स्वतंत्र जाणीव (शुद्ध ज्ञप्ति) स्थिर असलेल्या कोलितां-प्रमाणें नामरूपाच्या (दृश्य जगताच्या) संपर्कापासून अलिप्त असते. आणि जेव्हां नामरूपादि नानात्व भासमान होतें तेव्हां देखील तो आभास फिरणाऱ्या कोलिताच्या आकाराप्रमाणें मायिक असतो. ज्ञप्ति ही सर्वकाल त्यांच्यापासून अलिप्त व अविकृत असते. ही अखंड ज्योति सर्व दृश्य-जातामध्यें विद्यमान असते; पण ह्या ज्योतीमध्यें दृश्यजात केव्हांच असत नाहीं. याचप्रमाणें सर्व नामरूपामध्यें 'राम' व्यक्त आहे; परंतु 'रामा' मध्यें मात्र दिसणारीं नामरूपें केवळ नश्वर अथवा मायिक आहेत. ज्याप्रमाणें फिरणाऱ्या कोलितापासून उत्पन्न होणाऱ्या भासमान आकारांचें अस्तित्व त्याच्या परिभ्रमणावर अवलंबून असतें, त्याप्रमाणें जगाच्या अस्तित्वास कारणभूत अशा नानाविधि नामरूपांचें भासमान अस्तित्व मायाशक्तीवर अवलंबून आहे.

शक्तीला कांहीं स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व नसतें. ती व्यक्त किंवा अव्यक्तहि असूं शकेल; पण तिला वेगळें राहतां येणार नाहीं. व्यक्तीमधील मायाशक्ति त्याच्या जाणीवेच्या चलनामध्यें अथवा स्फूर्तीमध्यें—मनामध्यें दिसून येते. संकल्पविकल्पात्मक मन आणि दृश्य जगत् हीं एकाच वस्तूची पाठ आणि पोट आहेत. संकल्पशून्य अगर स्थिर असें मन ह्मणजेच शुद्ध ज्ञप्ति—केवळ ब्रह्म होय. वासना व आसक्तिरूप मनाचा मळ काढून टाकला असतां मनाची चंचलता नाहींशी होते व तें स्थिर होऊं लागतें. पूर्ण स्थिरता प्राप्त झाली ह्मणजे मन ब्रह्मस्वरूप होतें. या साक्षात्कारानें—अपरोक्षानु-भवानें मायेचा नाश होतो व हें जग नंदनवनच होऊन जातें; व आपलें गेलेलें स्वानंदसाम्राज्य तत्काळ परत मिळतें आणि सर्वत्र आनंदीआनंद स्फुरूं लागतो. द्वैतभाव समूळ नष्ट झाल्यावर सर्व भय व चिंता हीं अखंड सच्चिदानंदस्वरूपांत लिप्त होतात.

"ब्रह्मानंदाब्धींत जयाचें चित्तलवण मुरलें ।
तयाला भय कैचें उरलें ? ॥"

"आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन"

# हिमालयाचें सौंदर्य.

रामाच्या समोर एका तरुणानें सुगंधाचा उपभोग घेण्यासाठीं एक गुलाबाचें फूल तोडिलें आणि तो तें आपल्या नाकाजवळ नेतो न नेतो तोंच एक मधमाशी त्याच्या नाकाच्या टेंभीला सडकून डसली. तेव्हां तो मनुष्य त्या वेदनेनें ओरडूं लागला, आणि त्याच्या हातांतील तें फूल खालीं गळलें. प्रत्येक गुलाबाच्या पाकळीमध्यें मधमाशी लपून बसलेली असते काय? होय. खरोखर प्रत्येक विषयोपभोगरूप गुलाब, त्यामध्यें दुःखरूपी गुप्त मधमाशी असल्यावांचून नसावयाचाच. **अनावर वासनांनां दुःखरूपी शिक्षा मिळणें अपरिहार्य आहे.**

भयंकर विस्मरणशील लोकांनों! आपल्या आत्मस्वरूपाला विसरूं नका. सुबक गुलाबाचें फूल खुडण्याचें तुह्मांला कांहीं कारण नाहीं. जेथें जेथें प्रफुल्लित गुलाब आहे, तेथें तेथें तुह्मी आहांच. गुलाबाचें मोहक रूप व रमणीय सुगंध हीं तुमचींच आहेत. राजाविषयीं ह्मणाल, तर त्याचें वैभव तुमचेंच आहे. सौंदर्याविषयीं ह्मणाल, तर त्यांतील रमणीयतासुद्धां तुमचीच आहे. आतां उरल्या, स्वर्णरत्नादि वस्तु. त्यांची उज्ज्वळ प्रभा पण तुमचीच आहे. मग पोकळ वासना मनांत कां आणतां? स्वतःचें सर्वात्म्याशीं असलेलें ऐक्य ओळखा. ईश्वराशीं आपला असलेला अभेद अनुभवा. एकाच वेळीं सहस्रावधि गोपिकांशीं हातांत हात घालून रासक्रीडा करणारा भगवान् श्रीकृष्ण तुह्मीच आहां. सागरांत वा राजमंदिरांत, वनांत किंवा उपवनांत, रणभूमीवर किंवा अंतःपुरांत सदासर्वकाळ सारख्या स्वरूपानें तुह्मी आहां.

दैन्य आणि दौर्बल्य यांचें रडगाणें गाणारे लोक हो! 'राम' अत्युच्च पर्वताच्या शिखरावरून गर्जना करून सांगतो, कीं, तुह्मी सर्व शक्तिमान् प्रभु आहां. तुह्मी प्रत्यक्ष 'राम' आहां. स्वतःला स्वतःच्या कल्पनेमध्यें बद्ध करून घेऊं नका. उठा, जागे व्हा. तुमची निद्रा आणि हें जगद्रूपी स्वप्न हीं झाडून टाका. सर्व ठिकाणीं असणारें सर्वव्यापी तत्व तुमच्याहून अभिन्न असतां, तुह्मी दैन्य आणि दुःख यांमध्यें कां लोळतां? उठा आणि आत्मप्रतीति करून घ्या ह्मणजे सर्व दुःखें आपोआप नाहींशीं होतील. सर्व सुखाचा ठेवा, सर्व आनंदाचा अंतरात्मा तुह्मीच आहां. तुह्मांला कशाचीच बाधा होणार नाहीं. 'रामा'करितां तरी आपला आत्मा ओळखा, आतां विलंब कां करितां?

तो यथार्थरूपानें जाणा. तुह्मी रात्रंदिवस वाढत्या उल्हासानें आणि अविश्रांत श्रमानें सुखाच्या मागें एकसारखे लागलां नाहीं आहां काय ? आणि या कामीं अपयशहि नेहमीं ठेविल्यासारखेंच नाहीं काय ? असे मूर्ख बनूं नका. इंद्रियविषयांमध्यें सौख्य शोधूं नका. इंद्रियांनां फशीं पडलेल्या लोकांनों ! तुमचा हा सुखाचा निष्फळ बाह्य शोध सोडून द्या. शाश्वताचा सागर तुमच्यामध्येंच आहे. स्वर्गांचें राज्यहि तुमच्यामध्येंच आहे. तुह्मी अमृताचें अमृत आहां. जगताचा व चित्ताचा परमात्मस्वरूपांत लय करा. तुह्मी आपला क्षुद्र अहंकार टाकून देऊन पवित्र वेड लावून घ्या. बाबांनों ! या नश्वर देहाच्या 'क्वारंटाईन'ची इतकी चिंता कां वाहतां ? या अनात्म्याचें काय होईल या विचारास आपल्या मनांत यत्किंचित्‌हि थारा देऊं नका. मी व माझेपणा हा गोवा दूर करा. जे डोळे ईश्वरास पाहत नाहींत ते फुटून जावोत ! वासनारूपी रोगाला थारा देणाऱ्या अंतःकरणाला धिक्कार असो ! **आपल्या अश्रूंनीं नास्तिकपणा धुऊन टाका.** आपल्या खऱ्या स्थानाला अधिष्ठानाला चिकटून रहा, मग निंदा किंवा स्तुति यांचा संचार तेथें होणार नाहीं. सुखदुःखांची तेथें बाधा होणार नाहीं. ईश्वराला आपल्या नौकेंत घ्या आणि बाकी सर्व खुशाल सोडून द्या. तीर जाऊं द्या, अहंकार जाऊं द्या, शीड जाऊं द्या, या क्षणभंगुर नरदेहनौकेचें अहंकाररूपी शीड भक्तिरूप वायु परमात्मस्वरूप सागरावर घेऊन जाऊं द्या. या भक्तिरसाच्या मदांत बुडालेला मनुष्य सुखी होय. या ईश्वरी वेडामध्यें धुंद झालेला मनुष्य धन्य होय. जगाला मुकून जो शुद्ध आत्मानंदामध्यें पूर्ण निमग्न असतो तो पूज्य होय.

**भूत भविष्य वर्तमान । तूंचि असशी संपूर्ण ।**
**पिता माता तूंचि होशी । नरनारी तूं असशी ॥**
**जगद्बीजा तुला स्वस्ति । स्वस्ति सृष्टीच्या मध्याशीं ।**
**संख्येमाजी तूंचि एक । कर्ता कार्य तूंचि देख ।**
**ज्ञान आणि ज्ञानदाता । तूंचि असशी तत्वतां ।**
**तव स्वरूपीं अव्यक्त । आणि होय जें का व्यक्त ।**
**होसी तूंच हें उभय । मग कैचें उरे भय ॥ १ ॥**

# THE WAY TO REALIZATION OF SELF.

## आत्मानुभूतीचा मार्ग.

[वाचकांस सूचनाः—आत्म्यासंबंधीं प्रत्येक वाक्य व प्रत्येक शब्द यांचें एकचित्तानें मनन करून त्यांचें इतकें ध्यान करावें, कीं, मन आत्म्यामध्यें पूर्णपणें गढून जावें, लीन व्हावें. प्रणवाचें ध्यान करतांना नवशिक्यांनीं आपली सर्व शक्ति सूर्यकमलांत[1] ( solar plexus ) सांठवावी.]

वेदान्तांत सांगितलेल्या ध्यानांतील मुख्य मुद्दा हा आहे, कीं, आपला आत्मा हा **सूर्यांचा सूर्य, प्रकाशांचा प्रकाश** आहे हें अनुभविलें पाहिजे. ह्या स्थितीमध्यें स्वतःस आणा, देह व मन यांपासून आपण भिन्न आहों अशा विवेकानें मायामोह निरसून आपण **प्रकाशाचे प्रकाश** आहों, **सूर्यांचे सूर्य** आहों ही भावना दृढ करा, ह्मणजे एकदम सर्व विश्व तुह्मांपुढें एकाद्या चित्रपटाप्रमाणें स्पष्ट दिसूं लागेल; अथवा मेघाप्रमाणें तें वितळून नाहींसें होईल. प्रत्येक वस्तु तुह्मांपुढें मोठ्या अदबीनें शरण येईल.

साधल्यास, मोठ्या पहांटेस उठून सूर्य क्षितिजावर येण्यापूर्वींच पूर्वाभिमुख व्हा. त्या बालरवीच्या अरुणप्रभेकडे पहात रहा. ह्मणजे तो उज्ज्वल व नयनानंदकारी देखावा तुमचें मन प्रसन्न करील, आणि त्याला थोडेंबहुत उन्नत करील. जेव्हां मन प्रसन्न अथवा उन्नत होतें तेव्हां त्याला प्रचंड भराऱ्या मारावयास लावणें किंवा आनंदपर्वताच्या उच्च शिखरावर आरूढ व्हावयास लावणें, सोपें जातें.

---

१ हें योग्यांचें हृत्पद्म ह्मणजे अनाहतचक्र असावें.

इटीदांडूचा खेळ खेळतांना आपण मध्यें जाड व दोहों टोंकांस निमुळती अशी एक गिल्ली (इटी) जमिनीवर ठेवितों. अर्थात्, दोन्ही टोंकें जमिनीच्या वर राहतात. नंतर आपण एका दांडूनें तिच्या एका टोंकास मारितों ह्मणजे गिल्ली थोडीशी वर ( उंच ) उडते व त्यासरशीं आपण तिला दांडूनें असा कांहीं जोराचा टोला लगावितों, कीं, ती आकाशांत बरीच उंच भिर्रकन् जाते. ह्यामध्यें दोन मोष्टी करावयाच्या असतात. प्रथम गिल्ली थोडीशी जर उडवावयाची, नंतर तिला आकाशांत उंच उडवून द्यावयाची. मनाला जर ईश्वरी साक्षात्कार करून घ्यावयाचा असेल तर प्रथम तें थोडेसें उन्नत केलें पाहिजे आणि त्यानंतर दुसरी क्रिया ह्मटली ह्मणजे आध्यात्मिक वातावरणांत त्याला उंच फेंकून दिलें पाहिजे.

उल्हासकारक हवा, सुंदर सृष्टिदेखावे आणि रमणीय प्रदेश यांनीं पुष्कळदां मनाला प्रथमची उन्नतावस्था प्राप्त होते आणि त्यानंतर वरवर जात जात सरतेशेवटीं देहभान विसरून केवळ ईश्वररूप होणें मनाला सुलभ जातें. मनाला प्रथम थोडीशी उचल द्यावयास, त्यामध्यें थोडीशी प्रसन्नता आणण्यास, अनुकूल काल व देश यांपासून मिळणाऱ्या स्वाभाविक उत्साहाचा फायदा आह्मीं घेतला पाहिजे. प्रभातसमय, पक्ष्यांचें मधुर गायन, सुगंध वात, प्राचीप्रभेमधील मोहक आणि सुंदर रंग, यांनीं मनाला प्रथमचें उन्नयन मिळतें.

आतां मनाला स्वर्गीय किंवा दैवी प्रदेशामध्यें कसें न्यावयाचें ? ईश्वराच्या पायापर्यंत आत्म्यास कशी भरारी मारावयास लावावयाची ? उदयकालच्या किंवा अस्तकालच्या सूर्याचा प्रकाश जेव्हां अर्धोन्मीलित नेत्रांच्या पापण्यांमधून डोळ्यांवर पडतो, तेव्हां आपण ॐ या प्रणवमंत्राचें गायन करूं लागतों. अशा वेळीं आपण हृदयांतील भक्तिपूर्ण वाचेनेंच तो मंत्र गात असतों.

प्रणवाचा अर्थ निरनिराळ्या लोकांकरितां निरनिराळा आहे. प्रत्येकानें आपापल्या आध्यात्मिक प्रगतीच्या पायरीप्रमाणें आपल्याला जुळेल असा त्याचा अर्थ केला पाहिजे. कांहीं लोक ॐ याचा अर्थ सूर्याचा सूर्य असा घेतात आणि स्त्रिया ज्याप्रमाणें आरशांत पहातात त्याप्रमाणें ते प्रभात-

बिंबाकडे पहातात. हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतांत स्त्रियांच्या आंगठ्यावर आरसे असतात. सोन्याच्या मोठमोठ्या वाटोळ्या चौकटींत बसविलेले आरसे त्यांचेपाशीं असतात. खरोखर स्त्रियांनां आरशाइतकी कोणतीहि वस्तु प्रिय नसेल. जेव्हां एकादी स्त्री आरशांत पाहते, तेव्हां तिला आपलें मुखकमल जणूं काय आपल्यासमोर आहे, असें वाटतें; परंतु तिची अशी खात्री असते, कीं, आपलें मुखकमल आपलेपाशींच आहे. तिला आपल्याहून भिन्न असें कांहीं दिसतें, परंतु तें आपणचं आहों याची तिला खात्री असते. त्याचप्रमाणें एकादा वेदान्ती सूर्याकडे तो आपल्याकडून निराळा असलेला असा पाहतो; परंतु त्याची अशी खात्री असते, आणि त्याच्या असें प्रत्ययास येतें, कीं, खरा सूर्य ह्मणजे आपला आत्माच होय. बाह्य आणि जड सूर्य हा आपलें प्रतिबिंब, आपली छाया आहे.

चंद्राचा ज्याप्रमाणें सूर्याशीं संबंध आहे, तसाच सूर्याचा आपल्याशीं आहे असें वेदान्ती समजतो. बाह्यतः ( दिसतांना ) चंद्र स्वयंप्रकाशित आहेसा वाटतो; परंतु वस्तुतः ( खरोखर ) शास्त्रीयदृष्ट्या पाहतां चंद्राचा सर्व प्रकाश सूर्यापासूनच उसना आणलेला असतो. त्याप्रमाणें वेदान्त्याची अशी पुरी खात्री झालेली असते, कीं, सर्व प्रकाश आपलाच आहे असें भासविणाऱ्या सूर्याचा प्रकाश खरोखर मजकडूनच घेतलेला असतो; त्याचें तें वैभव आणि तेज माझेंच आहे.

खरोखर पृथ्वी फिरते, परंतु आपणास वाटतें, कीं, सूर्य फिरतो. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला ह्मणजे खरें काय तें समजूं लागतें. मग आपण फसले जात नाहीं. आपली खात्री पटते, कीं, सूर्य फिरत नसून पृथ्वीच्या गतीचा सूर्यावर अवस्त्वारोप ( मिथ्या आरोप ) करण्यांत येतो. त्याचप्रमाणें जेव्हां एकादा वेदान्ती उदयोन्मुख रविमंडलाकडे पाहतो, तेव्हां तो जाणून असतो, कीं, प्रकाशमान सूर्याची प्रभा, शोभा आणि शक्ति यांचा उगम सर्व लोक चुकीनें सूर्याकडे लावितात. वस्तुतः तीं माझीं आहेत, माझींच आहेत.

ह्या जड सृष्टींतील सूर्य, प्रकाशाचा ह्मणजे ज्ञानाचा द्योतक आहे. सूर्य हा शक्तीचें द्योतक आहे. तो सर्व ग्रहांनां आपल्याभोवतीं फिरावयास लावितो.

तो अस्तित्वाचें—जीवनाचें चिन्ह आहे. कारण, सर्व प्राण्यांचें जीवित सूर्यापासून किंवा सूर्यावर अवलंबून आहे. सूर्य हा सौंदर्याचें निदर्शक आहे. पृथ्वी आणि इतर सर्व कांहीं पदार्थ तो आपल्याकडे आकर्षून घेतो. इतका तो लखलखीत, विराजमान आहे. तेव्हां सूर्य ज्ञान, प्रकाश, जीवन, शक्ति, सत्ता, सौंदर्य, मोहकता हीं दर्शवितो. आणि हे सर्व गुणधर्म आपलेच आहेत असें वेदान्ती जाणतो. हीं सर्व लक्षणें माझींच आहेत, नव्हे मीच आहेत, असें वेदान्ती अनुभवीत असतो. ज्याप्रमाणें एकाद्या युवतीला आपलें मुखकमल दर्पणामध्यें आपणाहून निराळें दिसतें त्याप्रमाणें ही सर्व शक्ति, हा सर्व प्रकाश, हें सर्व चैतन्य इत्यादि सर्व लक्षणें माझ्याहून भिन्न दिसतात. खरोखर पाहूं गेलें असतां प्रकाश, चैतन्य, ज्ञान, शक्ति, रमणीयता आणि सर्व कांहीं वस्तुतः मीच आहें.

ही कल्पना बाणण्यास आणि मायामोह दूर होऊन आत्मप्रत्यय येण्यास नवशिक्याला प्रणवमंत्राचा बराच उपयोग होतो. प्रणवोच्चार करित असतां वेदान्त्याच्या दृष्टीनें त्याचा अर्थ असा असतो, कीं:—

**मी प्रकाशांचा प्रकाश आहें, मी सूर्य आहें, खरा सूर्य मी आहें. दिसणारा सूर्य माझें नुसतें चिन्ह आहे. मी सूर्य आहें, माझ्या भोंवतीं सर्व ग्रह आणि पदार्थ भ्रमण करीत असतात. आकाशांतील आणि मानवी सर्व प्राणी, माझ्याकरितांच फिरतात आणि सर्व कांहीं माझ्याकरितांच करतात. मी स्थावर सनातन आहें. भूतकाळीं, वर्तमानकाळीं आणि सदैव मी तोच आहें. हा सर्व भूगोल, हें सर्व विश्व माझ्यासमोर व्यक्त होत आहे. आपले सर्व भाग मला दाखविण्याकरितां, आपलें सर्वस्व व्यक्त करण्याकरितां सर्व कांहीं गरगर फिरत आहे. आपले सर्व भाग मला दिसावे म्हणून पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरत आहे. विश्व सर्व गोष्टी मजकरितां करितें. सूर्य माझ्याकरितांच प्रकाशतो. चंद्र माझ्याकरितांच माझ्यासमोर प्रकाशतो.** माझ्या आज्ञेप्रमाणें, माझ्या साक्षित्वामुळें जगांतील सर्व व्यवहार घडतात. ज्याप्रमाणें सूर्याच्या नुसत्या साक्षित्वानें झाडें वाढतात, प्राण्यांचे स्नायु चलन पावतात आणि मनुष्य विचार

करितात, त्याचप्रमाणें माझ्या साक्षित्वामुळें सर्वांनां जागृति किंवा चैतन्य प्राप्त होतें. माझ्या–आत्म्याच्या–खऱ्या देवाच्या साक्षित्वानें सर्व कांहीं घडत आहे. मर्त्य व स्वर्ग लोकांतील सर्व पदार्थ, सर्व प्रकारच्या वस्तु, सर्व प्राणी, त्यांचे आत्मे व त्यांचे देव हे सर्व मजमुळेंच उत्पन्न झाले आहेत. सूर्यांचा सूर्य जो मी, त्या माझ्यामध्यें ते सर्व वसले आहेत. सूर्यांचा सूर्य जो मी त्या माझ्यामध्यें ते सर्व आहेत.

सर्व प्रकाशांचा **प्रकाश** मी आहें. स्वप्नांमध्यें आपणांस जे पदार्थ दिसतात ते कांहीं दिव्याच्या उजेडानें किंवा चंद्रसूर्यांच्या प्रकाशानें दिसत नाहींत, तरी पण ते आपणांस दिसतात. प्रकाशावांचून ते आपणांस दिसणें शक्य नाहीं, हेंहि आपण जाणतों. तेव्हां कोणच्या प्रकाशानें तें आपणांस दिसतात बरें ? ते माझ्याच आत्मप्रकाशानें दिसतात. माझ्या प्रकाशानें स्वप्नांतील वस्तु प्रगट होतात. जर स्वप्नामध्यें मला एकादा हिरा दिसला, तर तो माझ्याच प्रकाशानें दिसतो. त्या हिऱ्याचें तेज देखील माझ्या प्रकाशसागरांतील एक नुसता तरंग आहे. जर स्वप्नामध्यें मला चंद्र दिसला तर तो चंद्र आणि त्याची ज्योत्स्ना हीं दोन्ही माझ्या ( चित्प्रकाशाच्या ) वैभवाच्या लहरी होत. जर स्वप्नामध्यें मला सूर्य दिसला, तर तो सूर्य आणि त्याचा प्रकाश हीं माझ्या प्रभावसागरांतील एक नुसता आवर्त ( भोवरा ) होत. जागृदवस्थेमध्यें देखील असेंच आहे. सूर्य, चंद्र, तारे आणि सर्व कांहीं माझ्या प्रकाशोदधीच्या वीचि होत. मी प्रकाशांचा **प्रकाश** आहें. मी सर्व विश्वाचा **प्रकाश** आहें. माझ्या अस्तित्वरूपी समुद्रामध्यें सूर्य, तारे, देव वगैरे सर्व पदार्थ, वलय किंवा वीचि याप्रमाणें राहतात.

> **"...............उदधींतुनि सूर्य काढिला मींच ।**
> **भ्रमणगती चंद्रातें मजपासुनि प्राप्त जाहली साच ॥"**

मी राजांचा **राजा** आहें. जगांतील सर्व भूपालांच्या रूपानें मीच दृश्यमान होत आहें. विविध उद्यानांमध्यें सुंदर पुष्पांच्या रूपानें मीच प्रगट होत असतों. सुंदर स्त्रियांच्या मनोहारी वदनांनीं मीच स्मित करितों. सर्व वीरांच्या स्नायूंनां मीच चलन देतों. सर्व विश्व माझ्यामध्येंच वास

करितें. सर्व ठिकाणीं माझीच इच्छा परिपूर्ण होत आहे. सर्व ठिकाणीं माझेंच साम्राज्य चालत आहे. मी सर्वत्र व्यक्त आहें. क्षुद्र जंतूंपासून तों महान् सूर्यापर्यंत सर्व प्राण्यांनां मीच पोसतों. सर्व प्राण्यांनां त्यांचें भक्ष्य मीच देतों. पृथ्वीला सूर्याभोंवतीं मींच फिरावयास लाविलें. सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी मी सर्वत्र होतों.

दुष्ट विचार आणि ऐहिक वासना ह्या मिथ्या देह आणि मिथ्या मन यासंबंधींच असतात; त्या तमोरूप आहेत. माझ्यासमोर येण्याचा त्यांनां कांहीं हक्क नाहीं. सर्व विश्व आणि हें सर्व जड आकाश ज्यांमध्यें तरंगत राहिलें असें चिदाकाश—महादाकाश (Supreme Ether) मी आहें. प्रकाशाप्रमाणें प्रत्येक परमाणु, प्रत्येक पदार्थ यांमध्यें मी व्यापून आहें. नीच आणि उच्च मीच आहें. मजमध्यें नीच उच्च असें कांहीं नाहीं. जेथें जेथें मानवी दृष्टि पोंचते तेथें तेथें मी आहें. प्रेक्षक मीच आहें, सूत्रधार मीच आहें, आणि नटहि मीच आहें. येशूमध्यें मीच प्रगट झालों, महम्मदाच्या द्वारा मीच व्यक्त झालों, जगांतील सर्व विख्यात विभूति ह्या मीच होत आणि त्याचप्रमाणें अतिशय नीच खल आणि पतित मीच आहें. मी **सर्व** आहें. मी **सर्व** आहें. तुमचा जो कांहीं वासनेचा विषय आहे तो मीच आहें. अहाहा! मी किती सुंदर आहें! सौदामनीमध्यें मी चमकतों, घनगर्जितामध्यें मीच निनाद करितों, पर्णसमूहामध्यें मी नृत्य करितों, पवनामध्यें मी सीत्कार करितों, क्षुब्ध समुद्रामध्यें मी तांडव करितों. शत्रु, मित्र मीच आहें. मला शत्रु, मित्र कोणी नाहींत. ऐहिक संपत्ति अथवा क्षणभंगुर कीर्ति याविषयींच्या विचार-वासनांनों! तुह्मी चालत्या व्हा. देहाची कांहींहि अवस्था होवो, मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं; सर्व देह माझेच आहेत. मीच **फ्रां**कलिन होतों, **न्यूटन** मीच झालों, लॉर्ड **के**लव्हीन मीच आहें. धनुर्धारी **राम** आणि प्रियकर **गोपाळकृष्ण** मीच आहें. **कयांट**च्या मेंदूमध्यें मींच काम केलें. **बुद्धदेव** आणि विख्यात **शं**कराचार्य यांच्या हृदयांतील स्फूर्ति मींच उत्पन्न केली. **शे**क्सपीयर आणि **प्ले**टोसारख्यांनां मीच ज्ञान देतों. सर्वांचा उगम जो मी त्या मजकडे ते सर्व येतात आणि तेजानें परिपूर्ण होऊन जगांत विलसूं लागतात. मनुष्याला या ऐहिक महत्त्वाकांक्षा बांधून खालीं

ओढतात. रमणीय प्रदेशांनों आणि गुलाबाच्या उपवनांनों! दूर व्हा. तुह्मी सर्व मजमध्यें आहां, तुमच्यापैकीं कोणामध्यें देखील मी मावूं शकणार नाहीं. हें विश्व व सर्व कांहीं मजमध्यें आहे. कोणत्या वस्तूमध्यें मी सांठविला जाणार? मी कशानें मर्यादित होईन? जगानें? जग तर मजमध्येंच आहे. विश्वानें? विश्व देखील मजमध्येंच आहे. तरी पण प्रत्येकामध्यें व सर्वांमध्यें मी आहेंच. मी सर्वांच्या मनामध्यें आणि विचारांमध्यें आहें. प्रियकराच्या सोत्कंठ हृदयामध्यें मी आहें आणि मानिनीच्या आनंदयुक्त नयनांमध्यें मी आहें. प्रत्येकाच्या व सर्वांच्या रोमरोमामध्यें मी स्फुरण पावत आहें. मी तुह्मांमध्यें आहें, मी तुह्मांमध्यें आहें—छे, मी तूं हा भेदच येथें रहात नाहीं! **मी मी आहें!** .

य एकोऽवर्णो बहुधाशक्तियोगाद्वर्णाननेकान्निहितार्थो दधाति ।
विचैति चान्ते विश्वमादौ स देवः स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥१॥

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदापस्तत्प्रजापतिः ॥ २ ॥

त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी ।
त्वं जीर्णो दंडेन वंचसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥ ३ ॥

नीलः पतंगो हरितो लोहिताक्षस्तडिद्गर्भ ऋतवः समुद्राः ।
अनादिमत्वं विभुत्वेन वर्तसे यतो जातानि भुवनानि विश्वा ॥ ४ ॥

श्वेताश्वतरोपनिषत्, अध्याय ४.

अणुरेणु मीच किरणीं, भानू मी, सर्ववस्तु शास्ता मी,
प्रातःशोभा, सायंवायूही सर्वतापहारक मी. १

वृक्षांच्या पर्णांचें सरसरणें आणि जलधि भरती ही,
जाळें, व्याधहि मीच, प्रमुदित, दुःखी, निबद्ध, खग तोही. २

दर्पण, मी प्रतिबिंब, ध्वनि मुळिंचा मी प्रतिध्वनिहि जैसा,
कामुक आतुरता मी कामिनि साशंक हेतुही तैसा. ३

योद्धा मी शस्त्रहि मी युद्धहि मी जय पराजयोही मी,
समरीं मृत वीरांच्या मातेचे अश्रुपूर तेही मी.

मी उन्माद, द्राक्षारसही मी, ती सुरा सुरायंत्र,
अतिथीहि पाहुणा मी, यजमानहि मी प्रवासि मधुपात्र. ५

मुरलीचा निःश्वासस्वरही मी चित्त सत्य मनुजाचें,
कांति सुवर्णाची मी तेज हिऱ्याचें, प्रवाळ मोत्याचें. ६

उपवनभागीं शोभे जी रुचिरा आम्रमंजरी तीही,
मीच असें तत्कवि पिक मीच तयाचेंहि गान मी पाहीं. ७

बहुमूल्य काश्मिरी मी पाषाण, स्फटिक, गारगोटी मी,
ठिणग्या मी, दीपहि मी, पतंग झेंपावती तया, ते मी. ८

सदसत् सर्वहि जगिं मी, कर्ता, हेतु, क्रियाहि मी सारी,
मोहहि मी, मोहासी बळी पडे तोहि पुरुष निर्धारी. ९

पापी, पातक, शिक्षा, क्षांति, दया, वर्तमान, भूतहि मी,
भविष्य, उत्कर्षहि मी, अपकर्षहि आदि अंत निगुतीं मी. १०

संसारचक्र मी, हें वन, उपवन, वृक्ष वेलि, पाषाण,
मन्मांस मृत्तिका, नगचारि शिवा मत्त्वचा असे जाण. ११

गोमाशीप्रति तीक्ष्ण, भ्रमरीशीं स्नेह सौख्यदायक मी,
सुंदर सुरभिकुसुमही मत्प्रेमाचा विकास तो नामी. १२

मन्मानसीं वृत्ति जशा उदेती
सर्वत्र वाहे जल त्याच रीती;
भानुस्वरूपें नभिं लोंबताहे
जें तें जणूं मत्प्रिय पुष्प आहे. १

## आत्मानुभूतीचा मार्ग.

विद्युल्लतांतर्गत मी प्रकाशी,
स्पर्शे न मृत्यू मज आत्मयासी;
जन्मासि मी येें न कधीं खरा हो,
विवेक हा नित्य मनीं धरा हो. २

अखंड चित्सौख्यसमुद्रवीचि
निःश्वास माझे जणुं, तेहि मीचि;
श्वासेंचि माझ्या कुसुमें सुगंधी
होती, धरा नित्य अशीच बुद्धि. ३

मन्नेत्ररश्म्युद्भव तो रवीचा
प्रकाश हा सर्व जगांत साचा;
सूर्यास्तकाळीं नभ शोभताहे
कपोल ते रम्य मदीय पाहे. ४

प्रेमाकर्षण शक्तिनें ममचि ते तारे नभीं राहती,
नाड्या स्नायुशिरा मदीय सरिता किंवा झरे वाहती;
वेली, वृक्ष सुरम्य पर्णयुत जे ते केश माझे बरे,
माझी शक्ति किती प्रचंडचि पहा अस्थी गिरी ते खरे. १

आहानंद आनंद झाला ।
स्वस्वरुपाचा अनुभव आला ॥ ध्रु० ॥

सर्वजगत् मम कांता प्रिय ती
कांत तिचा मी स्वामी निगुतीं ॥ १ ॥

अथवा विश्वचि हें मी सारें
पतिपत्नी हा भेद नको रे ॥ २ ॥

ग्रहताऱ्यांनों! भ्रमा फिरा हो
अपुलीं गात्रें मज दावा हो. ॥ ३ ॥

सर्व बाजुंनीं मज पाहूं दे
चैतन्यामाधिं नाचा मोदें ॥ ४ ॥

भूजल तारे भानू तैसे
फिरती सगळे भासे ऐसें ॥ ५ ॥

परि ती माया सत्य पहातां
जातो फिरतो मीच तत्वतां ॥ ६ ॥

गतिस्थितिहि ना विश्रांतीही 'मम' तव' ऐसें नाहीं,
दुजें मजविना कांहिं नसे या जगतीं सत्यचि पाहीं. १

भूवरि विचरे नभीं फिरे जें चकमक झगमग करि तें,
नेत्रा दिसतें मना भासतें मीचि एक सर्वहि तें. २

शक्ति कुणा न च मज वर्णाया शब्दापरता मी हो,
नक्षत्रांनों! मी तुमचेंही जीवन पूर्ण पहा हो. ३

खुणावितां मज कुठें यावया? वदा ऐकुं द्या मजला,
भरलोंसें मी सर्वांठायीं भेदभाव तो हरला. ४

जलनिधिराया! खडपासन्निध अपटी अपुल्या लाटा,
मत्पादिंही तूं जगता! येईं त्यजुनी सर्वहि ताठा. ५

## अभंग.

सूर्य नक्षत्रांनों। आणि वादळांनों।
यावें भूकंपांनों युद्धांनों हो ॥ १ ॥

स्वागतही तुह्मां। करितों मी बरें।
बळ वेंचा सारें। आपुलालें ॥ २ ॥

मजवरी शक्ति। आपुली चालवा।
पाहूं द्या प्रभावा। तुमचिया ॥ ३ ॥

तोफा शतघ्नी त्या । माझींच खेळणीं ।
उल्कापात झणीं । बाण माझे ॥ ४ ॥

अग्निनारायणा! । जाळिशील काय? ।
वदें रे निर्भय- । पणें मज ॥ ५ ॥

मजपासूनियां । ज्वाळा जी निघाली ।
भीति एवढाली । काय तिची ॥ ६ ॥

लखलखित तीक्ष्ण । खड्ग आणि ज्वाळा ।
तोफेचा तो गोळा । अस्वतंत्र ॥ ७ ॥

खड्ग गोलकांनों । माझीच ती शक्ति ।
प्रेरित निश्चितीं । तुह्मांसी जी ॥ ८ ॥

प्राशितां हा ऐसा । रामतीर्थबिंदु ।
ज्ञानधैर्य सिंधु । उचंबळे ॥ ९ ॥

अहा! सच्चिदानंद मी ब्रह्म साचा । साक्षि मनदेहगेहादिकांचा ॥ ध्रु० ॥
टाकिली म्यां स्वयें तनुहि वाऱ्यावरी । लीन करुनी बरी पंचभूतीं ॥
मत्स्वरूपासि तो अंत ना पारही । खेद उद्वेग राहील कैंचा? अहा० ॥ १ ॥

सर्व ही कर्ण जे सत्य माझेचि ते । नेत्रवक्त्रेंहि तीं सकलिकांचीं ॥
हस्तपादहि बरे सर्व माझे खरे । चित्तमनबुद्धिसंघ न दुज्याचा ॥अहा०॥२॥

मृत्यु म्यां भक्षिला, भेद तो प्राशिला । गोड किति हें पहा अन्न माझें ॥
भीति वा दुःख नच वेदना कांहिंही । पूर सर्वत्र येई सुखाचा ॥अहा० ॥३॥

तिमिर, अज्ञान तें थरथरा कांपुनी । वेउनी धाक माझाचि मेलें ॥
रामतीर्थामृतें विश्व धालें खरें, । धन्य दिन आजि हा सोनियाचा॥अहा०॥४॥

१. तत्व काय तें एकच आहे. बाकी सर्व व्यर्थ आहे. तें तत्व ह्मणजे मीच.

२. तें तत्व सर्वव्यापी, सर्वशक्तिमान् आणि सर्वज्ञ आहे.

३. कोणतीहि उपाधि मला बांधूं शकत नाहीं. कोणत्याहि कर्तव्यानें मी बद्ध होत नाहीं.

४. मी स्वतंत्र आहें. मी मुक्त आहें.

५. मी निष्पाप, निष्कलंक, साक्षात् **शुद्धताच** आहें.

६. या नश्वर जगांतील सर्व दुःखें आणि पापें भस्म करून टाकणारा मी **अग्निनारायण** आहें.


७. दिव्य आकाशरूपानें सर्व ठिकाणीं सत्ता चालविणारी शक्ति जो पूर्णावतार **श्रीकृष्ण** त्याचें देखील स्वरूप मला धारण करितां येईल.

प्राणी, जलचर, पाषाण, फुलें, मनुष्यें, देव, गंधर्व आणि दिशा या सर्वांच्या हृदयांमध्यें मी आहें.

पर्जन्यबिंदु खुशाल गर्जना करो, कीं, 'मीच समुद्र आहें, मीच समुद्र आहें.'

मनुष्याला मुक्तकंठानें आनंदोद्गारसहित गर्जना करूं द्या, कीं, 'मी ईश्वर आहें ( अहं ब्रह्मास्मि. )'

मी आदि तत्व आहें. इतर सर्व कांहीं माझें स्वप्न आहे.




आत्मविकास.

# EXPANSION OF SELF.

## *आत्मविकास.

कुलीन स्त्रिया व सभ्यगृहस्थ यांच्या रूपानें असलेल्या माझ्या आत्म्यांनों!

आज आपण 'आत्मविकासा'संबंधीं दोन गोष्टी ऐकण्याकरितां जमलों आहों. किंवा आजच्या विषयाला जीविताच्या निरनिराळ्या पायऱ्या किंवा आध्यात्मिक उन्नतीच्या भूमिका, किंवा स्वार्थ शुद्ध (व उज्वल) करण्याच्या पायऱ्या, असेंहि ह्मणतां येईल. कदाचित् आजचा सिद्धान्त कित्येकांनां विलक्षण वाटेल. आपल्यासमोर असलेल्या आकृतीमध्यें एक सरळ रेषा व कांहीं वर्तुळें आहेत. याचा उपयोग काय, असें आपण विचाराल. आत्म्याच्या विकासाशीं या वर्तुळांचा काय संबंध आहे, असें कांहीं लोक आपल्या मनांत ह्मणत असतील. हीं कांहीं वर्तुळें नाहींत. तीं वांकडींतिकडीं आहेत. त्यांस लंबवर्तुळें ह्मणतां येईल. ह्या वर्तुळांनीं ज्या दर्जाचीं जीवितें दाखवावयाचीं आहेत तीं जीवितें खरोखर वर्तुळें नाहींत! तीं वांकडींतिकडीं असल्यामुळें आमचीं वर्तुळें देखील वांकडींतिकडीं काढणें योग्य आहे. त्यांतील चुका आणि अपुरेपणा यांनींच तीं आपलें निदर्शन योग्य रीतीनें दाखवितात.

जीवित ह्मणजे काय आहे व त्याच्या पायऱ्या कशा आहेत याचें विवेचन करण्यापूर्वीं या वर्तुळांसंबंधानें प्रथम दोन शब्द आपणांस सांगावयाचे आहेत. या आकृतींत एक अत्यंत लहान वर्तुल आहे. हें लहानशा टिपक्याप्रमाणें दिसतें. तें याहून बारीक असावयास पाहिजे होतें; परंतु

* अमेरिकेंत ॲक्याडेमी आफ् साएन्सच्या दिवाणखान्यांत झालेलें व्याख्यान.

तसें केलें असतां तें दिसणार नाहीं या भीतीनें तें दिसण्याजोगें मोठें काढलें आहे. या वर्तुळाभोंवतीं दुसरें एक वर्तुळ आहे. हें पहिल्या लहानग्या वर्तुळापेक्षां मोठें आहे; आणि त्याच्याबाहेर तिसरें, त्याच्याबाहेर चौथें आहे.. या वर्तुळामध्यें हा एक विशेष आहे, कीं, तीं वर्तुळें वाढून जसजशीं मोठीं होतात तसतसें त्यांचा मध्यबिंदु सर्व वर्तुळांनां साधारण असलेल्या स्पर्शरेषेंतील अ बिंदूपासून दूर दूर जातो. मध्यबिंदु दूर दूर जातो व त्रिज्या लांब होते आणि वर्तुळ वाढतें. जर वर्तुळाचा मध्यबिंदु प्रथम बिंदु अ याच्या जवळ जवळ आणला, व शेवटीं प्रथम बिंदूशीं मिळविला, तर त्या वर्तुळाचा बिंदुच होतो. अशा रीतीनें एकाद्या वर्तुळाचा मध्यबिंदु जेव्हां प्रथम बिंदु जवळ जवळ येतो, तेव्हां बिंदु ही त्या वर्तुळाची अंतिम स्थिति होते; आणि जेव्हां मध्यबिंदूपासून दूर दूर जातो तेव्हां त्रिज्या वाढत वाढत जाऊन शेवटीं ती अमर्याद होते आणि मध्यबिंदु अनंत अंतरावर जातो. अशा वेळीं वर्तुळाची सरळ रेषा होते. अशा रीतीनें ज्या वर्तुळाचा मध्यबिंदु अनंत अंतरावर दूर जातो किंवा ज्याची त्रिज्या अनंत होते त्या वर्तुळाची अंतिम स्थिति सरळ रेषा ही होय.

येथें आपणास दुसरी अशी एक गोष्ट दिसून येते, कीं, वर्तुळ जेवढें मोठें असेल तेवढें तें (त्याचा परिघ) स्पर्शरेषेंच्या जवळ जवळ येतें. आणि वर्तुळ जेवढें वाढतें तेवढा त्याचा बांक कमी होत जातो. उदाहरणार्थ, आपणास असें दिसून येतें, कीं, क मध्यबिंदु असलेल्या आंतल्या वर्तुळापेक्षां ड मध्यबिंदु असलेलें बाहेरचें वर्तुळ सरळ रेषेशीं अधिक जवळ जवळ येत आहे. त्याचप्रमाणें क मध्यबिंदु असलेलें वर्तुळ त्याच्या पोटांतील ब मध्यबिंदूच्या वर्तुळाहून अधिक सरळ आहे आणि यामुळेंच पृथ्वी जरी खरोखरी गोल आहे तरी तिचा कोणताहि भाग पाहिला असतां आपणांस ती सपाट दिसते. कारण, पृथ्वीच्या परिघाचे भाग आपल्या डोळ्याच्या मानानें फार मोठे आहेत. वर्तुळाविषयीं एवढें बस आहे.

**जीवित.** जीविताचें मुख्य लक्षण काय आहे? सजीवता ही निर्जीवतेपासून कशानें भिन्न आहे? गतीनें, सामर्थ्यानें, चलनवलनशक्तीनें. लोकांचा

साधारण समज असा आहे. या व्याख्येमध्यें शास्त्रांतील जीविताच्या व्याख्येचा देखील समावेश होतो. जीवंत मनुष्याला हालतां येतें, चालतां येतें, सर्व कांहीं करतां येतें. मृत 'ममीला*' जीवंत मनुष्याच्या या सर्व क्रिया करतां येत नाहींत. मेलेल्या प्राण्याला हालतां येत नाहीं. जीवंत प्राणी चालतो, धावतो, सर्व कांहीं करतो. मेलेल्या झाडाला वाढतां नाहीं. तें गतिहीन व सामर्थ्यहीन असतें. जीवंत झाड वाढतें व व्यक्त करितें.

पुन्हां आपणास असें दिसून येतें, कीं, स्थूलमानानें जीवाचे किंवा प्राण्याचे चार वर्ग केले आहेत, अथवा जग चार मुख्य कोटींमध्यें विभागलेलें आहे. १ खनिजवर्ग, २ उद्भिज्ज (वनस्पति) वर्ग, ३ प्राणिवर्ग, ४ मनुष्यवर्ग. यांमध्यें इतर प्राण्यांपेक्षां मनुष्यामध्यें अधिक शक्ति, अधिक गति आणि उच्च प्रतीचें चलनवलन हीं दिसून येतात. मानवेतर प्राणी नुसते चालतात, धावतात किंवा डोंगरावर चढतात. मनुष्य या सर्व गोष्टी करून आणखी इतर पुष्कळ गोष्टी करितो. दुर्बिणीच्या साहाय्यानें ताऱ्यापर्यंत त्याची मजल जाते. इतर प्राण्यांनां हें करतां येत नाहीं. मनुष्य इतर प्राण्यांनां आपल्या काबूंत ठेवितो. वाफ आणि विद्युत् यांच्या साहाय्यानें दिक् आणि काल तो नाहींसा करतो. इतर प्राण्यांनां अवगत नसलेली तीव्र गति तो मिळवूं शकतो. जगाच्या कोणत्याहि भागाला एका क्षणांत त्याला निरोप पाठवितां येतो. मनुष्याची शक्ति व मनुष्याचें या जगांतील सामर्थ्य एवढें आहे. सामर्थ्य व्यक्त करण्यामध्यें इतर प्राणी मनुष्याच्या मागें पडतात आणि ह्मणून जीविताच्या दर्जामध्यें मनुष्याहून इतर प्राणी कमी प्रतीचे ठरतात.

आतां वनस्पतिवर्ग आणि प्राणिवर्ग यांची तुलना करा. वनस्पति देखील वाढतात, त्यांनां गति आहे; परंतु त्यांची गति एकाच दिशेंत आहे. त्यांनां एकाच दिशेनें वर जातां येतें. त्यांनां एका जागेवरून दुसऱ्या जागेकडे जातां येत नाहीं. त्या एकाच जागेला बांधल्या आहेत. सर्व बाजूंनीं आपल्या फांद्या त्या पसरतात व त्यांचीं पाळेंमुळें फार खोलवर जातात.

---

* इजिप्तमध्यें मीठमसाला घालून पुरून ठेवलेल्या प्रेताला 'ममी' ( Mummy ) असें ह्मणतात.

परंतु वनस्पतींनीं व्यक्त केलेली शक्ति प्राण्याच्या शक्तीहून कमी योग्यतेची आहे, आणि ह्मणून जीविताच्या दर्जामध्यें प्राण्याहून वनस्पति कमी प्रतीची आहे. खनिजवर्गामध्यें जीव नाहीं. खरोखर प्राणिशास्त्रवेत्त्यांच्या मताप्रमाणें आपण जीविताची व्याख्या केली तर खनिजवर्गांनां जीव मुळींच नाहीं; परंतु जर जीविताचा दर्जा आपण शक्तीच्या व्यक्तीकरणावरून ठरविणार असलों, तर खनिजपदार्थ देखील एक प्रकारची शक्ति व्यक्त करितात. त्यांच्यामध्येंहि फेरफार होत असतो. त्यांनां देखील फेरफार अवश्य आहे, ह्मणून त्यांच्यामध्यें देखील जीविताचा थोडासा अंश आहे; परंतु त्यांची जीवकळा अगदीं सूक्ष्म आणि कमी प्रतीची आहे. कारण, त्यांचेकडून व्यक्त होत असलेल्या शक्ति व गति अगदीं सामान्य व सूक्ष्म आहेत. यावरून हें स्पष्ट होतें, कीं, गतीनें जाणल्या जाणाऱ्या जीविताचा दर्जा, गति किंवा शक्ति यांच्या निरनिराळ्या प्रकाराप्रमाणें ठरविला जातो.

निसर्गाची अशी योजना आहे, कीं, नवें असें या जगांत कांहीं असावयाचें नाहीं. आपणांस असें दिसून येतें, कीं, दिसण्यांत जरी कितीहि वैचित्र्य किंवा विविधता दिसून आली तरी सृष्टि किंवा विश्व अकिंचन आहे. प्रियकरांच्या नेत्रांतून अश्रु गळतांना जो (प्रेमाकर्षणाचा) नियम लागू पडतो, त्याच नियमानुसार सूर्य आणि तारे यांचें परिभ्रमण होतें. हाताच्या बोटावर मोजण्याइतके साधे नियम सूक्ष्म अणूपासून तों अतिशय दूर असलेल्या ताऱ्यापर्यंत सर्व ठिकाणीं लागू पडतात. निसर्गाची वारंवार पुनरावृत्ति होत असते. या विश्वाला एकाद्या स्क्रूची किंवा शंखाकृतीची उपमा देतां येईल. कारण, त्याचे सर्व पेंच एकसारखेच असतात. किंवा विश्वाची एकाद्या कांद्याशीं तुलना करितां येईल. त्याचा एक पापुद्रा अगर पदर काढा, तुह्मांला तसलाच दुसरा पापुद्रा त्याच्या आंत सांपडेल. तो सोलून काढा, पुन्हां त्याच तऱ्हेचा पदर लागेल. त्याचप्रमाणें जें एका वर्षांत घडतें तेंच लहान प्रमाणावर एका दिवसांत घडून येतें. सकाळच्या वेळेला वसंतसमय ह्मणतां येईल; दोन प्रहरच्या वेळेला उन्हाळा ह्मणतां येईल; संध्याकाळाला वर्षाकाळाची उपमा जुळते आणि रात्र हिंवाळा

समजतां येईल. याप्रमाणें एका चोवीस तासांत आपणास थोडक्यांत सबंध वर्ष दिसून येतें. मनुष्य देखील मानवी स्वरूप धारण करण्यापूर्वीं गर्भावस्थेमध्यें विलक्षण तऱ्हेनें पूर्वीं धारण केलेल्या अनेक प्राण्यांच्या रूपांची पुनरावृत्ति करीत असतो. गर्भाशयामध्यें गर्भाला मानवी आकार प्राप्त होण्यापूर्वीं मासा, कुत्रा, माकड इत्यादि सर्वांचीं रूपें त्याला धारण करावीं लागतात. तेव्हां उत्क्रांतीच्या या योजनेप्रमाणें, या सर्व जगाचें नियमन करणाऱ्या कायद्या-प्रमाणें मनुष्याच्या देहामध्यें खनिज, वनस्पति, प्राणी इत्यादि वर्ग आहेत किंवा नाहींत हें आपणांस पहावयाचें आहे.

मनुष्यदेहधारी पण वास्तविक खनिज जातीचे असे लोक नाहींत काय? तसेंच मानवी रूप धारण करणारे पण वनस्पतिवर्गाच्या अवस्थेमध्यें असलेले लोक नाहींत काय? त्याचप्रमाणें प्राणिवर्गाच्या स्थितीमध्यें असलेले मनुष्यदेहधारी लोक नाहींत काय? मनुष्यरूपानें असणारे व खरोखर मनुष्य असलेले व त्याचप्रमाणें, मनुष्यरूपानें असणारे परंतु खरे देवच असेहि लोक आहेत किंवा नाहींत हें आपण पाहूं.

**खनिज लोक.** प्रथम आपण नैतिक आणि आध्यात्मिक खनिज लोक घेऊं. खनिजवर्गामध्यें बाह्यतः कांहीं गति दिसत नाहीं, कांहींहि चलन-वलन शक्ति बाहेर दिसून येत नाहीं; तरी त्यामध्यें एक तऱ्हेची शक्ति, एक तऱ्हेचें चलनवलन, एक प्रकारची गति असतेच. कारण, आपण पहातों, कीं, खनिजांमध्यें फेरफार होत असतो. त्यांचें पृथक्करण होऊन त्यांमध्यें विकृति होते. त्यांचे खडे बनतात व ते वाढतात. आपली पृथ्वी समुद्राशीं तुलना करून पहातां स्थिर भासते; परंतु ही घन पृथ्वी देखील वर जाते, खालीं येते, तीमध्यें लाटा येतात आणि ती बदलते. एवंच, खनिजांमध्यें देखील अदृश्य कां असेना, पण कांहीं गति आहे.

तेव्हां खनिजाप्रमाणें गति असलेले असे कोण मनुष्य आहेत? किंवा लहान मुलांच्या भोंवऱ्याप्रमाणें गति असलेले लोक कोण आहेत? भोंवरा गरगर फिरतो आणि तो जोरांत आला ह्मणजे मुलें आनंदानें टाळ्या पिटून ह्मणतात, कीं 'तो उभा आहे, तो स्तब्ध (स्थिर) आहे, तो हालत नाहीं.'

भोंवऱ्याच्या ह्या गतीस स्वमध्यगत ( आपल्या भोंवतीं फिरणारी ) गति ह्मणतात. येथें गति असते, भ्रमणगति असते; परंतु या परिभ्रमणाचा मध्य स्वतःमध्यें असल्यामुळें गति जरी प्रचंड झाली तरी बाहेर कोणतीच गति दिसून येत नाहीं. खनिजांमधील जीविताची गति भोंवऱ्याच्या गतीसारखीच असते, आणि ती आपण आकृतींत सूक्ष्म वर्तुळ किंवा बिंदु वर्तुळ यानें दाखवूं.

या जगामध्यें प्रत्येक गति वर्तुळाकार आहे. कोणतीहि गति सरळ रेषेमध्यें नाहीं. सर्व शास्त्रें हेंच सिद्ध करतात. आणि याकरितां गति दाखविण्यासाठीं आपण वर्तुळांचा उपयोग करूं. गणितशास्त्रामध्यें गति रेषांनीं दाखविल्या जातात. येथें वर्तुळाकार रेषाच सोयीच्या आहेत.

तेव्हां भोंवऱ्याप्रमाणें गति असलेल्या गतीचें वर्तुळ बिंदुच आहे. ज्याचें आयुष्य नुसत्या खनिजाप्रमाणें आहे असे लोक कोण आहेत? थोडा विचार करा. अर्थात्, हे लोक ह्मणजे ज्यांच्या सर्व क्रिया एका लहानशा बिंदूच्या (अहंकाराच्या, मीपणाच्या) भोंवतीं असतात, किंवा या साडे तीन हात देहरूपी क्वारंटाईनाभोंवतीं असतात, ते होत. हे लोक अत्यंत आप्पलपोटे होत. या लोकांचीं सर्व कर्में विषयोपभोगाकरितांच असतात. हे लोक निरनिराळ्या रीतीनें सर्व तऱ्हेचीं कामें करितात; परंतु त्याचा उद्देश मात्र नीच अथवा क्षुद्र सुखाचें सेवन, हा असतो. आपलीं वायकापोरें उपाशीं मेलीं तरी हे लोक काळजी करीत नाहींत. आपले शेजारी पाजारी जगले किंवा मेले याची त्यांनां मुळींच खातर नसते. कांहीं होवो, यांची स्वतःची खाण्यापिण्याची चैन चालली पाहिजे, आपल्या नीच वासना यांनां तृप्त केल्या पाहिजेत. यांच्या पापमूलक वासना, कुटुंबाचें अगर जातीचें नुकसान होत असलें तरी तृप्त झाल्या पाहिजेत. यांच्या कामवासना तृप्त झाल्या ह्मणजे वायकापोरांनां उपासमार काढावा लागला तरी यांनां त्याची क्षिति नाहीं. यांच्या सर्व कर्मांचें केंद्र ह्मणजे यांचा क्षुद्र देह होय. यांची गति अगर उत्साह ह्मणजे मृतगति, मृतोत्साह होय. हें मनुष्यांमधील खनिज जीवित होय. जगाच्या इतिहासांत

मनुष्यदेहधारी मोठे मौल्यवान् खनिज आपणास आढळतात. हिरे देखील खनिजच असतात. माणिक, मोतीं व इतर सर्व तऱ्हेचें जवाहिर हीं त्याच कोटींतील होत.

रोमच्या इतिहासांत एके काळीं, नेरो, टायबेरियस आणि इतर सीझर होऊन गेले. त्यांचें नांव उच्चारणें ह्मणजे तुमचे कान विटाळण्यासारखें आहे. मोठमोठे राजे, सम्राट्, बादशाहा होऊन गेले, ते मोठे मौल्यवान् खनिज खरे; परंतु नुसते खनिजच, मनुष्य नव्हेत! या बादशहांनां तुह्मी काय ह्मणाल? त्या वेळीं अवगत असलेल्या सर्व जगाचे बादशहा असून ते आपल्या राज्याचें काडीइतकें देखील हित पहात नसत. आपले आप्त इष्ट किंवा मित्र यांविषयीं कल्पना देखील त्यांच्या मनाला शिवत नसे. त्यांनां फक्त आपल्या पशुतुल्य विषयवासनाच पूर्ण करावयाच्या असत. मग त्यांच्या राज्ञीचें, प्रजेचें किंवा मित्रांचें कांहींहि होवो! तुह्मीं त्यांच्याविषयीं व त्यांनीं केलेल्या अनन्वित कृत्यांविषयीं ऐकिलें असेलच. त्यांच्यापैकीं एक तर सारा दिवस सुग्रास पक्वान्नें खाण्याच्या व्यसनास बळी पडला. एकादें मिष्ट पक्वान्न खाऊं लागला ह्मणजे तो ओकारी येईपर्यंत खात असे व नंतर औषधानें सर्व कांहीं वांति होऊन गेलें ह्मणजे तो पुन्हां पक्वान्नें झोडावयास लागे. एका दिवसांत हा प्रकार अनेकदां चाले. एकानें तर मोठा वणवा पहाण्याची हौस तृप्त करण्याकरितां त्या वेळच्या सर्व जगाची राजधानीच जाळून टाकिली! याला तुह्मी काय ह्मणाल? हे मोठे मौल्यवान् हिरे खरे, परंतु मनुष्य नव्हत! मनुष्यकोटींतील हे खनिज होत!

**उद्भिज्ज मनुष्यें.** मनुष्यरूपी उद्भिज्जाकडे आतां आपण वळूं. पूर्ण आप्पलपोट्या खनिज मनुष्यापेक्षां यांचें वर्तुळ जरा मोठें आहे. शर्यतीच्या घोड्याच्या गतीशीं यांच्या गतीची तुलना करतां येईल. शर्यतींतील घोड्याचें वर्तुल भोंवऱ्याच्या वर्तुळापेक्षां मोठें असतें. हीं उद्भिज्ज मनुष्यें कोण? लोक दुसऱ्या प्रत्येकाचा तोटा करून स्वतः सुख भोगण्याचें इच्छित नाहींत. ते आपल्या संगतीच्या माणसांचें देखील कांहीं हित पहातात. हे लोक आपल्या बायकामुलांभोंवतीं घिरट्या घालतात. यांचें कौटुंबिक वर्तुळ

असतें. खनिज मनुष्यांहून हे किती तरी पटीनें श्रेष्ठ आहेत. कारण, ते आपल्या देहाचें हितच न पहातां आपल्या बायकापोरांचीहि काळजी घेतात. या दुसऱ्या वर्तुळांत पुष्कळ लहान वर्तुळें आहेत, त्याचप्रमाणें हे लोक देखील बऱ्याच व्यक्तींचें कल्याण करितात. पण यांनां निःस्वार्थी ह्मणतां येईल काय? नाहीं, नाहीं. यांच्या बाबतींत त्यांचा आत्मा जरासा विकास पावलेला असतो. खनिज लोकांचा आत्मा त्यांच्या देहापुरताच होता, यांचा (उद्भिज्ज लोकांचा) आत्मा कुटुंबाकरितां आहे. हा देखील स्वार्थच. पण तो थोडासा उच्च तऱ्हेचा स्वार्थ. हे लोक त्यांच्या मानानें चांगले आहेत, परंतु त्यांच्या या दुसऱ्या वर्तुळाकडे पहा. तें आंतील सर्व पदार्थांशीं अंतर्वृत्त ( concave ) आहे. अंतर्वृत्ति किंवा अंतर्गोलपणा ह्मणजे काय? अंतर्गोलपणा ह्मणजे प्रेमकरानें परिवेष्टणें किंवा आलिंगन देणें आहे. हात पसरून वर्तुळ तयार केलें असतां अंतर्गोलपणा तयार होतो. हें दुसरें वर्तुळ आपल्या कुटुंबांतील सर्व व्यक्तींशीं अंतर्वृत्त असतें, आंतील सर्व पदार्थांशीं तें वांकलेलें असतें; परंतु बाह्य सर्व विश्वाशीं तें पाठमोरें असतें. एका कुटुंबाच्या हिताचा दुसऱ्या कुटुंबाशीं विरोध आला असतां या उद्भिज्ज मनुष्यांचा आप्पलपोटेपणा दिसून येतो आणि तेथें दोन्ही कुटुंबांतील व्यक्तींचा तंटा सुरू होतो.

**पशुवर्ग**—आतां आपण तिसरें वर्तुळ घेऊं. या वर्तुळाचीं मनुष्यें पशुलोक होत. हे लोक ह्मणजे 'मनुष्यरूपेण मृगाश्चरंति.' हें तिसरें वर्तुळ मागच्या दोहोंहून मोठें आहे व त्याला बरसातीच्या वाऱ्याच्या वर्तुळाची उपमा देतां येईल. या लोकांचें ममत्व, त्यांचा देह व त्यांचें कुटुंब यांहून उच्च वस्तूंवर जडलेलें असतें. आपली जात, आपला पक्ष किंवा आपलें राज्य यांच्याशीं या लोकांचें ऐक्य झालें असतें, व यांनां पक्षाभिमानी असें ह्मणतात. हे लोक फार चांगले असतात. उद्भिज्ज लोकांपेक्षां हे किती तरी पटीनें उपयोगी असतात. यांचा परिभ्रमणाचा परिघ मोठा असतो. हे लोक आह्मांला हवे आहेत. कारण, त्यांचा अनेक कुटुंबें आणि व्यक्ति यांनां उपयोग होतो. हे लोक एक व्यक्ती, एक घर किंवा एक कुटुंब एवढ्यांच्याच

उपयोगी न पडतां आपल्या सर्व ज्ञातीशीं (पक्षाशीं) अंतर्वृत्त राहून तिला मदत करितात. ह्मणून यांचा फार उपयोग होतो. यांनां देखील स्वार्थीच ह्मणावयाचें काय? होय, ते देखील स्वार्थीच होत. कारण, इतर ज्ञातींचा किंवा पक्षांचा तोटा करून देखील स्वतःचा (ज्याच्याशीं त्यांचें ऐक्य झालें आहे त्या पक्षाचा) फायदा करून घेण्याची ते इच्छा करितात. यांच्यांतील व्यंगें किंवा दोष तुह्मांला पहावयाचे असल्यास, आपल्या वर्तुळाच्या बाहेर असलेल्या बिंदूशीं (व्यक्तींशीं) असलेली त्यांची वर्तणूक पहा. आपल्या वर्तुळाच्या बाहेर असलेल्या लोकांशीं त्यांनीं पाठ फिरविलेली असते. एकदां त्यांचा पक्षाभिमान बळकट झाला ह्मणजे जे त्यांचें मत मान्य करीत नाहींत त्यांचें दुर्दैवच ओढवलें, असें ह्मटलें पाहिजे. असे दोन पक्ष एकत्र आले ह्मणजे ते परस्परांशीं बाह्य असल्यामुळें त्यांची मोठीच जुंपते. आतां असें पहा, कीं, ते कांहींजणांचें कल्याण करितात खरें, परंतु इतर पक्षांशीं विरोध करून ते इतरांचें अधिक नसलें तरी तितकेंच अनहित करितात. या बाजूनें एक सबंध पक्ष व त्या बाजूनें दुसरा एक सबंध पक्ष असे भांडूं लागले ह्मणजे केवढा तरी असंतोष उत्पन्न होतो. तरी पण उद्भिज्ज लोकांपेक्षां हे लोक किती तरी चांगले आहेत.

सृष्टिनियम असा आहे कीं, **तुह्मांला एका स्थितींमध्येंच स्थिर राहतां येत नाहीं. तुह्मी नेहमीं पुढें पुढें गेलें पाहिजे.** अवश होऊन फेरफार अथवा प्रगति करण्यास कंटाळूं नका. खनिजकोटींतील मनुष्यापेक्षां उद्भिज्जकोटींतील मनुष्य श्रेष्ठ, उद्भिज्ज कोटींतील मनुष्यापेक्षां पशुकोटींतील मनुष्य श्रेष्ठ. जर एकादा मनुष्य उत्क्रांतीच्या मार्गाला लागला असतां पशुकोटीच्या मनुष्याच्या स्थितींत आला तर तें चांगलेंच आहे; परंतु पुढें प्रगति न करतां एकाच पक्षाला किंवा क्रीडला (पंथाला) आपलें स्वातंत्र्य विकून एकाच जागीं थांबण्याचें जेव्हां तो मनांत आणतो, तेव्हांच सर्व कांहीं चुकतें व सर्व घोटाळा होतो. त्या स्थितींतून जाणें प्रत्येकास स्वाभाविक किंवा नैसर्गिक आहे; परंतु त्या स्थितीला चिकटून राहणें किंवा तीच स्थिति चिरकाल ठेवण्याचा प्रयत्न करणें यानेंच सर्व बिघडतें.

बायबलांत अशी एक गोष्ट सांगितली आहे, कीं, अनाचारी सोडोम आणि गोमोरा या लोकांचें शहर जाळून खाक करण्यापूर्वीं ईश्वरानें आपला भक्त **लॉट** यास सपरिवार तेथून निघून जाण्यास सांगितलें होतें. मात्र त्यांना अशी ताकीद केली होती, कीं, त्यांनीं वळून परत त्या शहराकडे पहातां कामा नये. **लॉट**ची बायको तें शहर सोडून निघाली खरी, पण तिचें मन तिला मागेंच ओढित होतें. तिच्या मनांत त्या शहरांतच राहावयाचें होतें. तिचें अंतःकरण तेथेंच खिळून राहिलें होतें. तिनें मागें पाहिलें तोंच तेथल्या तेथें ती मिठाचा एक खांब बनली. जे लोक प्रगतीच्या मार्गावर असतां जुनें स्थान सोडून देखील पुढें जाऊं इच्छीत नाहींत त्यांची हीच स्थिति होते. एकाद्या स्थितीमध्यें असणें चांगलें खरें, परंतु स्वतःस नामरूपास विकून घेऊन प्रगति करण्याचें नाकारतांच ते स्वतःस मिठाचा खांब बनवितात. सर्व वाढ खुंटते व पक्षांधता येते. वाढ खुंटली व पक्षांधता आली ह्मणजे सर्व दुःखें धावून येतात. हे पशुकोटींतील लोक चांगले खरे परंतु त्यांनीं तेथेंच न राहतां पुढें गेलें पाहिजे.

**चंद्रमनुष्य**—आतां आह्मीं चौथें वर्तुळ घेऊं. येथें मनुष्यरूपी मनुष्यच आहे. याच्या वर्तुळाला चंद्रभ्रमणाची उपमा देतां येईल. चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतो व त्याचें वर्तुळ साधारणपणें लंबवर्तुळच असतें. असा हा चंद्र-मनुष्य कोण? त्याच्या वर्तुळाचा परिघ फार मोठा असतो. तो कदाचित् सुखी असेल. आपल्या राष्ट्राशीं किंवा एकाद्या विशिष्ट मानवजातीशीं त्याचें तादात्म्य झालें असतें. तुह्मी पाहिजे तर त्याला स्वदेशाभिमानी ह्मणा. त्याचें वर्तुळ मोठें विस्तृत असतें. ज्यांच्या हिताकरितां आपण झटतों त्यांचा पक्ष, त्यांची जात, त्यांचा वर्ण, त्यांची क्रीड यांकडे न पहातां आपल्या देशामध्यें राहणाऱ्या आपल्या सर्व बांधवांच्या हिताकरितां तो झटत असतो. हे लोक आह्मांला हवेच आहेत. हे लोक चांगले असतात. हेच खरे मनुष्य. मात्र ते मनुष्यच! तुह्मांला हें ठाऊक आहे, कीं, चंद्र समुद्रामध्यें बरेच फेरफार करितो. भरती ओहटी तोच उत्पन्न करितो. शिवाय वेड्यांवर देखील चंद्राचा परिणाम होतो असें ह्मणतात. हे लोक चांगले खरे;

परंतु जेव्हां ते पुढें न जातां याच स्थितीला चिकटून बसतात, आणि स्वदेशाभिमानरूपी आप्पलपोटेपणा कायम करितात, तेव्हां त्याचा परिणाम काय होतो ? यानें मोठमोठ्या क्रांत्या होऊन अनर्थ ओढवतात व खुळेपणाचें बंड माजतें. यांच्या योगानें एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्राशीं युद्ध जुंपतें, रक्तपात होतो आणि हजारों प्राणी, नव्हे कैक वेळां लाखों प्राणी कापाकापी सुरू करितात, व या सुंदर पृथ्वीचें सुहास्य वदन रुधिरमय करून टाकतात ! ज्यांच्याशीं ते अंतर्वृत्त आहेत, ज्यांनां त्यांनीं प्रेमानें आलिंगिलें आहे, त्यांचें हे लोक कोटकल्याण करितात खरें, परंतु ज्यांच्याशीं ते बहिर्वृत्त ( Convex ) आहेत त्यांच्याशीं यांचें वर्तन कसें असतें तें पहा. वाशिंग्टन अमेरिकन लोकांनां पूज्य वाटतो; परंतु तेंच इंग्लिशलोकांचें त्याच्याविषयींचें मत विचारा ! तसेंच स्वतःच्या मायभूमीपुरते इंग्लंडमधील देशाभिमानी लोक फार चांगले आहेत; परंतु त्यांच्या देशाभिमानामुळें ज्या लोकांचें रक्तशोषण चाललें आहे त्यांच्या दृष्टीनेंहि पहा.

**मुक्त मनुष्य.** सरतेशेवटीं आपण पांचव्या वर्तुळाला येऊन पोहोंचलों. येथें त्याचा मध्यबिंदु अनंत अंतरावर गेला आहे. त्याच्या वर्तुळाची त्रिज्या अनंत झाली आहे, आणि त्या वर्तुळाचें काय झालें ? त्रिज्या जेव्हां अनंत होते तेव्हां वर्तुळाची सरळ रेषा बनते, वांकडेपणा सर्व नाहींसा होतो आणि सर्व ठिकाणीं ती सरळ सारखी जाते. ती कोणत्याहि भागाशीं अंतर्वृत्त किंवा बहिर्वृत्त नसते. कारण, तिचा बांकच नाहींसा झालेला असतो. हे देवलोक होत, व त्यांचें वर्तुळ ह्मणजे सूर्याच्या गतीच्या वर्तुळा-सारखें होय. सूर्य एका सरळ रेषेंत जात असतो. त्याच्या वर्तुळाची त्रिज्या अनंत आहे, हें आपल्याला माहीत आहेच. सूर्य पूर्ण प्रभावशाली आहे. हें एक असें वर्तुळ आहे, कीं, त्याचा मध्यबिंदु सर्व ठिकाणीं आहे, परंतु त्याचा परिघ कोठेंच नाहीं. हें ईश्वरी वर्तुळ होय व हे लोक मुक्त होत. सर्व दुःखांपासून, सर्व भयांपासून, सर्व वासनांपासून, सर्व स्वार्थांपासून हे मुक्त आहेत. यांनां स्वार्थी ह्मणतां येईल काय ? येथपर्यंत स्वार्थ होता; परंतु या सरळ रेषेंत स्वार्थ आहे काय ? सरळ रेषा **सरळ** असते. तीमध्यें बद्ध करणारा ( दास करून सोडणारा ) असा बिंदु कोणताच नाहीं. ती दिशेला

भेदून जाते. ज्याच्या भोंवतीं फिरतां येईल असा कोणताहि स्वार्थी बिंदु तिच्याजवळ नाहीं. येथें स्वार्थ पूर्णपणें नाश पावलेला असतो अथवा येथें आत्म्याचा लाभ होतो, असें ह्मणतां येईल. आतां पहा, कीं, आपण या बिंदुरूपी वर्तुळापासून–पूर्ण आप्पलपोटेपणापासून–निघालों आणि तो बिंदु वाढत वाढत सरतेशेवटीं त्याची सरळ रेषा बनली आणि ती ह्मणजे देवलोक. जाति, वर्ण, पंथ, देश इत्यादि गोष्टींवर अवलंबून न राहतां सबंध विश्व या लोकांचें घर बनतें. हे विश्वकुटुंबी असतात. तुह्मी इंग्रज असा, अमेरिकन असा, मुसलमान असा, बौद्ध किंवा हिंदु असा; कोणी जरी असलां तरी तुह्मी 'राम'च आहांत. 'रामा'ला तुह्मी परमात्माच आहांत. येथें स्वार्थ विलक्षण रीतीनें वाढलेला असतो. हा एक विचित्र स्वार्थ आहे. हें सबंध विश्व मीच आहें. अशा मनुष्याचा आत्मा सबंध विश्व आहे. हें सर्व विश्व, त्यांतील क्षुद्र जंतु, खनिज वस्तु, उद्भिज्ज पदार्थ या सर्वांचा आत्मा त्याचा आत्मा होतो.

अशा एका जीवन्मुक्ताजवळ एक शिष्य आला व त्याच्याकडे त्यानें एक वर्षभर अध्ययन केलें. वर्षानंतर शिष्य परत जावयास निघाला. जातेवेळीं त्यानें येऊन गुरुजींच्या पायांवर मस्तक ठेविलें. गुरुजींनीं स्मितवदन करून त्याला उठविलें व ते ह्मणाले "बाळ, तुझें अध्ययन अद्याप पुरें झालें नाहीं; तुला अझून पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत; आणखी थोडे दिवस येथेंच रहा."

तेव्हां शिष्य आणखी कांहीं दिवस गुरुजींच्या पवित्र सान्निध्यास राहिला, व दिवसेंदिवस त्याची वृत्ति पालटत गेली. त्याच्या अंतःकरणांत जीवब्रह्मैक्य बाणलें. तो ईश्वरमय झाला. पुढें तो गुरुजींला सोडून निघाला व आपण शिष्य आहों का गुरु आहों, हेंच त्याला समजेना. सर्व विश्व आपला आत्मा आहे, असें त्याला वाटूं लागलें. सर्व विश्व ज्याचा आत्मा झाला तो कोठें जाऊं शकेल ? प्रत्येक परमाणूमध्यें जर आत्मा भरून राहिला आहे तर तो कोठें जाईल ? जाणें येणें ही कल्पना त्याला निरर्थक वाटते. जेथें तुह्मी नसतां तेथें दुसऱ्या ठिकाणाहून तुह्मांला जातां येईल. त्या शिष्याला आत्मप्रत्यय आला व सर्वांठायीं त्याला ईश्वर दिसूं लागला. तेव्हां जाण्यायेण्याची

कल्पना तरी त्याच्या मनांत कशी येईल ? त्याला आत्मज्ञान झालें. देह अन्य ठिकाणीं जाणें ह्मणजे आपण आपल्यामध्येंच जाण्यासारखें त्याला वाटलें. तो आत्मनिष्ठ झाला. त्याला जाणेंयेणें उरलें नाहीं. तेव्हां गुरूला समाधान झालें. गुरूनें अशा रीतीनें त्याची परीक्षा पाहिली आणि तें बावनकशी सुवर्ण आहे असें त्याला दिसून आलें. शिष्यानें गुरूचे आभार देखील मानिले नाहींत. कारण, ऐक्याची कल्पना त्याच्यामध्यें इतकी बाणली होती, कीं, कृतज्ञताबुद्धीच्या पलीकडे तो गेला होता. तेव्हां गुरुजींनां दिसून आलें, कीं, आपला उपदेश याच्या अंगीं ठसला. याचें नांव गुरु. कारण, जर तुह्मी त्याला मान देऊं लागलां तर तो ह्मणतो, कीं, 'आपला अपमान झाला. मी या देहांत कोंडलों गेलों नाहीं. हा नुसता देह ह्मणजे मी नव्हें, सर्व विश्व मी आहें. ह्मणून तुह्मी स्वतःमध्येंच मला मान द्या !' असा पुरुष तुह्मांला कांहींहि मोलानें द्यावयाचा नाहीं. शरीराचा मान किंवा अपमान हीं त्याला कांहींच वाटत नाहींत. कीर्ति आणि अपकीर्ति या दोन्ही त्याला कांहींच नाहींत.

एकदां एक राजा एका संन्याशाजवळ आला आणि त्यानें त्याला साष्टांग दंडवत घातलें. संन्याशानें, हा इतका आदर दाखविण्याचें राजास कारण विचारिलें. राजा ह्मणाला "भगवन्! आपण संन्यासी आहां, आपण आपलें राज्य टाकून देऊन हा आश्रम स्वीकारिला आहे, आपण महान् त्यागी आहां, ह्मणून मी आपणास ईश्वरच समजतों. आपण मला वंदनीय आहां."

हिंदुस्थानांत लोक संपत्तीला फारसा मान देत नाहींत. तेथें मनुष्याच्या त्यागाच्या मानानें त्याला मान मिळतो. तेथें प्रतिष्ठेचें मान अमेरिकेहून निराळें आहे. सर्वशक्तिमान् *डॉलरापेक्षां सर्व शक्तिमान् प्रभूवरच लोकांचा अधिक विश्वास आहे. ह्मणूनच तो राजा त्या संन्याशाचा इतका सन्मान करीत होता.

संन्याशानें उत्तर दिलें "याकरितां जर तुह्मी माझा सन्मान करीत असलां तर मीं तुमचे पाय धुतले पाहिजेत, मीं तुह्मांला साष्टांग नमस्कार केला पाहिजे. कारण, हे राजन्, जगांतील सर्व संन्याशांहून आपण अधिक त्यागी आहांत."

---

*एक डॉलर ह्मणजे तीन रुपये दोन आणे किंमतीचें अमेरिकन नाणें.

यतीचें भाषण तर मोठें विलक्षण दिसतें ! असें होईल तरी कसें ? संन्याशानें आपल्या विधानाचा असा खुलासा केला, कीं, "समजा, एका मनुष्याचा एक भव्य राजवाडा आहे. तो आपलया वाड्यांतील केरकचरा काढून टाकतो, त्या केरकचऱ्याचा त्याग करतो, अशा मनुष्याला संन्यासी ह्मणतां येईल काय ?"

राजानें उत्तर दिलें "नाहीं. तो संन्यासी होणार नाहीं."

संन्यासी पुढें बोलूं लागला "समजा, दुसरा एक मनुष्य केरकचरा जपून ठेवतो आणि आपलें घर, भव्य राजवाडा देऊन टाकतो, त्याला तुह्मी काय ह्मणाल ?"

राजा बोलला "जो केरकचरा ठेवून राजवाडा दान करतो तो संन्यासी होय."

संन्यासी ह्मणाला "राजा, मग तूं खात्रीनें संन्यासी आहेस ! कारण, आपला आत्मा केवळ ईश्वर—मूर्तिमंत भव्य मंदिर—जें आपलें खरें निवासस्थान—प्रत्यक्ष नंदनवन—स्वर्गाचा स्वर्ग—त्याचा तूं त्याग केला आहेस आणि त्या राजमंदिराचा केरकचरा ह्मणजे आपला देह व तत्संबंधीं क्षुद्र स्वार्थ हें तूं वाळगून ठेविलें आहेस. मीं कशाचा त्याग केला नाहीं. मी तर ईश्वराचा ईश्वर आहें, सर्व विश्वाचा स्वामी आहें !"

कधीं कधीं या सिद्धपुरुषांनां, मुक्त आत्म्यांनां लोक वेडगळ समजतात परंतु या ब्रह्मानंदांत मग्न होऊन त्यांनां जो सौख्यसर्वस्वाचा ठेवा मिळतो, त्याचा जगांतील सर्व संपत्तीशीं विनिमय करावयास ते तयार आहेत काय, असें त्यानां विचारा. छे, हें कधींहि होणार नाहीं ! या लोकांनां श्रीमंत लोकांच्या याचकवृत्तीची मोठी कींव वाटते. कारण, ते विषयसुखाच्या व इंद्रियांच्या द्वारीं भीक मागत हिंडत असतात. सुख आपल्यामध्येंच आहे. तें तुह्मांला स्वतःमध्येंच मिळेल. सुखाचा सर्व ठेवा तुह्मांमध्येंच आहे. मग भिकाऱ्यासारखें दीनपणानें क्षुद्र कस्पटाप्रमाणें कां वागतां ? चला या, आत्मप्रत्यय करून घ्या, सर्व शक्तिमान् ईश्वराचा साक्षात्कार करून घ्या, आणि आनंदभरित होत्साते पुढील गीत गाऊं लागाः—

## आत्मविकास.

रविरश्मींतिल रेणु मी असें तेवीं भानू मीच,
मंद रवें मी अणुतें सांगें 'थांब सख्या येथेंच !' १

सदा भ्रमावें भानुमंडळा ! नियत तुझें हें कृत्य,
संध्यानिल वा हास्य उषेचें मीच असें कीं सत्य. २

मृदु पर्णांचा नाद, गर्जना भीषण ही जलधीची,
प्रणयगोष्टि मी कामिजनाच्या उत्कंठा युवतीची. ३

वीरघात जें करी खड्ग तें आणि तो हत वीर,
तेंवि मीच कीं तन्मातेच्या नयनांतिल तें नीर. ४

कोमल कुसुमें तत्कवि पिक हीं गान तयाचें मीच,
चकमक, ठिणगी दिवा पांखरूं तेंही सगळें मीच. ५

द्राक्षासव वा द्राक्षें तेवीं सुगंधयुत कस्तूरी,
मीच होतसें पथिक पाहुणा गृहस्थ वा शेजारी. ६

तव आत्म्याचें वैभव उज्वल अनुपम होय पहा रे !
त्याच्यापुढती सम्राटांचें तेज फिकें हो सारें ! ७

ऐसा तूं नवलाचा स्वर्गेचि असती सखया ! सत्य !
सत्यरूप तूं ज्ञानरूप तूं आनंदहि तूं नित्य ! ८

# EXPANSION OF SELF.

## ( Second Lecture. )

## *धर्माचें ध्येय.

माझ्या दुसऱ्या स्वरूपांनों ! माझ्या आत्म्यांनों ![1]

धर्माचें उद्दिष्ट काय आहे ? तें साधण्याचे हिंदुलोकांचे कोणते मार्ग आहेत ? भारतीयांच्या मतें प्रत्येक मनुष्य ईश्वर आहे. अमूल्य रत्न, सर्व सुखाचा ठेवा, सर्व आनंदाचा उगम असा ईश्वर आपल्यामध्येंच आहे. प्रत्येक मनुष्य ईश्वर आहे आणि सर्व कांहीं आपल्यामध्येंच आहे. असें जर आहे, तर लोक दुःखें कां भोगतात ? ते दुःखें भोगतात याचें कारण तो अखंड आनंद किंवा तें अमूल्य रत्न त्यांच्यामध्यें नाहीं हें नसून, आनंदाची ग्रंथि कशी उकलावी किंवा त्या रत्नाची मंजूषिका कशी उघडावी, याचें त्यांनां अज्ञान असणें हेंच होय. अथवा लोकांनां आपल्या आत्मस्वरूपांत प्रवेश कसा करावा, किंवा आत्मानुभव कसा घ्यावा, हें ठाऊक नसतें, हें होय. सर्व धर्म ह्मणजे आत्मस्वरूप व्यक्त करणें व त्यावरील पटल दूर करणें, याविषयींचे प्रयत्न होत. आह्मीं आमच्याच हातांनीं, आमच्याच कर्मांनीं स्वतःमधील त्या रत्नासमोर एक पडदा ठेविला आहे; आणि अशा रीतीनें आह्मीं आपणास हीन दीन करून घेतलें आहे.

---

* हरमेटिक ब्रदरहुड हॉलमध्यें झालेलें व्याख्यान.

१ अशा शब्दांनीं संबोधण्याची स्वामींची रीत फार अनुकरणीय होय. वेदान्ततत्वांचें घडोघडी स्मरण अशा प्रकारांनीं होतें. या संबोधनांत व्याख्यानाचें सार असतें असें म्हटलें तरी चालेल. खासगी पत्रव्यवहारामध्येंसुद्धां अशींच संबोधनें ( To my Dear Self, I remain Your Own Self, ) स्वामी नेहमीं वापरीत असत.

इमरसननें ह्मटल्याप्रमाणें "प्रत्येक मनुष्य ह्मणजे मूर्खाची भूमिका धारण करणारा ईश्वरच होय ! *"

सर्व पंथ ह्मणजे आपल्या नेत्रांस आवृत करणारें पटल काढून अगर फाडून टाकण्याचे प्रयत्न होत. कांहीं पंथांनां हें नेत्रपटल इतर पंथांहून अधिक विरल करतां आलें आहे; परंतु प्रत्येक पंथामध्यें सत्यज्ञान झालेले लोक आढळतात. आणि जेथें जेथें सत्यज्ञान आहे, तेथें तें पटल घन असो किंवा विरल असो, तें बाजूस सारलें जातें आणि मग तत्वदर्शन होतें. पुढील उदाहरणानें हें अधिक स्पष्ट करितां येईल. हा पहा समोर एक पडदा आहे. ( येथें स्वामींनीं एक घडी केलेला हातरुमाल डोळ्यासमोर धरिला. ) तो डोळ्यासमोर धरिला आहे. तो बाजूस सारून आपणास पाहतां येईल; परंतु तो पुन्हां डोळ्यासमोर येतो. आतां तोच पडदा जरा पातळ केला आहे ( येथें स्वामींनीं कांहीं घड्या कमी केल्या ) आणि तो पडदा अतिशय पातळ झाल्यावर देखील तो आपणास बाजूस सारतां येईल; परंतु तो पुन्हां आपल्या डोळ्यांसमोर येतो; तो डोळ्यांनां कायमचा सोडीत नाहीं. आपण त्याला अधिक विरल करूं. येथें देखील तो बाजूस सारतां येतो पण तो नाहींसा होत नाहीं. आपण जेव्हां तो अतिशय विरल करितों, तेव्हां जरी तो बाजूस केला नाहीं तरी तो आपल्या अवलोकनशक्तीच्या आड येत नाहीं. आपल्याला त्यांतून पहातां येतें आणि सध्यांप्रमाणें मधून मधून तो आपणास बाजूसहि सारतां येतो. जेव्हां तो पडदा अत्यंत विरल होतो तेव्हां तो साधारणपणें पडदाच नव्हे असें ह्मणतां येईल आणि तो असूनहि आपणास ईश्वरदर्शन घडतें आणि आनंदाचा अनुभव घ्यावयास सांपडतो. नव्हे, आपण ईश्वरच होतों. येथें जगांतील कोणत्याहि वस्तूला आमचा आनंद कमी किंवा नाहींसा करतां येणार नाहीं, कांहींहि आमच्या आड येणार नाहीं, आणि हाच इतर पंथांहून वेदान्ताचा विशेष फायदा आहे. कारण, वेदान्त हा मायेचें पटल

* 'Every man is God acting a fool.'

अत्यंत विरल करितो आणि ज्ञान्याला प्रपंचामध्यें देखील आनंदाचा अनुभव आणून देतो.

सर्व धार्मिक पंथांच्या अनुयायांनां, जोंपर्यंत परमात्म्याशीं त्यांचें तादात्म्य असतें तोंपर्यंत नेत्रासमोरील घन किंवा विरल पटल उचलतां ( बाजूस सारतां ) येतें, आणि ईश्वराशीं ऐक्य अनुभवितां येतें. वेदान्त्याला देखील हें करितां येतें. त्यालाहि समाधिसुखांत निमग्न होतां येतें; परंतु त्याला सहजस्थितीमध्यें देखील स्वर्गीय आनंदाचा अनुभव घेतां येतो. हें घन-पटलाच्या पंथांस मात्र साधत नाहीं.

हिंदुस्थानांतील सर्व पंथांप्रमाणें जगांतील सर्व पंथ देखील तीन मुख्य विभागांखालीं आणतां येतील. या तीन विभागांनां आह्मी गीर्वाण भाषेमध्यें **'तस्यैवाहम्,' 'तवैवाहम्,' 'त्वमेवाहम्'** असें ह्मणतों. पहिल्याचा अर्थ **'मी त्याचा** आहें' असा होतो. या पंथाचें पटल अतिशय घन असतें. धर्मपंथाची दुसरी पायरी **'तवैवाहम्'** ही आहे व त्याचा अर्थ **'मी तुझा** आहें' असा आहे. या दोहोंतील फरक आपल्या लक्ष्यांत आलाच असेल. आध्यात्मिक मार्गाच्या पहिल्या पायरीवरील भक्त किंवा साधक ईश्वर कोठें तरी दूर अदृश्य आहे असें मानून तृतीय पुरुषामध्यें ईश्वरास संबोधतो आणि **'मी त्याचा** आहें' असें ह्मणतो. धार्मिक वृत्तीचा हा आरंभ आहे. प्रत्येक आध्यात्मिक शिशूला हा मातेच्या दुग्धाप्रमाणें आहे. या दुग्धाचें प्राशन केल्यावांचून कोणाचीहि धर्मामध्यें प्रगति व्हावयाची नाहीं. **'मी त्याचा** आहें' एवढेंच पूर्णपणें बाणलें, पहांटे उठल्यावरोबर माझा **स्वामी**च मला उठवीत आहे असें वाटूं लागलें, आपले उद्योगधंदे करतांना देखील आपला प्रेमळ **स्वामी** ( ईश्वर ) हें आपणास करावयास लावीत आहे अशी भावना धरिली, सर्व ईश्वराचेंच आहे असें गणलें, आणि आपलें घर, आपले बंधुजन, आपले मित्र हे सर्व ईश्वराचे आहेत, व हे सर्व ईश्वरानें आपणास दिले आहेत असें मानलें, तरी केवढी मौज होईल? अहाहा! सर्व जग प्रत्यक्ष स्वर्गच नाहीं का बनणार? व सर्व विश्व नंदनवनच नाहीं का होणार? मात्र मनुष्याची ती भावना खरीखुरी असली पाहिजे. त्याला अंतःकरणापासून असें वाटलें पाहिजे,

कीं, मजभोंवतालचें सर्व कांहीं व माझा देह देखील माझ्या **धन्याचा** ह्मणजे ईश्वराचा आहे. एवढी कल्पना जरी पूर्णपणें बाणली, तरी तीपासून अद्वितीय आनंद, अनिर्वचनीय सुख आणि अखंड शांति प्राप्त होते. अनुभवांतीं ही स्थिति मधुर आहे खरी; परंतु पंथ या दृष्टीनें पहातां हा नुसता आरंभ होय.

आतां याच्याशीं दुसऱ्या आध्यात्मिक पायरीची ह्मणजे ‘ **तवैवाहम्** ’ या पंथाची तुलना करा. प्रत्येक क्षणीं **‘तूं’** मला हवा आहेस, मी **‘तुझा’** आहें. पहिली स्थिति मधुर होती, परंतु ही मधुरतर आहे. पहिली स्थिति मोठी प्रियकर व रमणीय होती, पण ही त्याहून अधिक प्रियकर व रमणीय आहे. यांतील भेद लक्ष्यांत आणा. हा भेद नेत्रासमोरील पटल विरल करण्यानें दर्शवितां येईल. ‘ मी **तुझा** आहें ’ या वाक्यामध्यें ईश्वर तृतीय पुरुषानें संबोधिला जात नाहीं. ईश्वर कोठें तरी पडद्याआड दूर नसून आतां तो आपल्यासमोर आला आहे. तो पूर्णपणें आपल्या सन्निध आहे. तो अधिकाधिक जवळ येतो व आपणास त्याची अधिक ओळख होते. पंथ या दृष्टीनें ही स्थिति पूर्वींच्या पंथाहून उच्च आहे; परंतु पुष्कळदां असें होतें, कीं, लोक ईश्वर आपल्यासन्निध असल्याप्रमाणें त्याच्याशीं मोठ्या सलगीनें बोलतात; ‘ परंतु त्यांची श्रद्धा कांहीं तशीच नसे.’

आध्यात्मिक मार्गाच्या पहिल्या स्थितीशीं खऱ्या श्रद्धेचा संयोग झाला असतां नेत्रपटल, तें कितीहि घन असलें तरी, कांहीं वेळ तरी दूर होतें. अंतःकरणापासून, शरीराच्या रोमरोमांमधून ‘ मी ईश्वराचा आहें, मी **त्याचा** आहें ’ अशी जेव्हां कल्पना बाणते, तेव्हां त्या योगानें उत्पन्न झालेले भाव, निष्ठा, उत्साह, जोम इत्यादिकांच्या योगानें डोळ्यासमोरील पडदा नाहींसा होतो; आणि तो ईश्वरी स्वरूपामध्यें मग्न होऊन जातो. त्या वेळेपुरता तो ईश्वरच बनतो. केव्हां केव्हां ‘ मी **तुझा** आहें ’ या उ तत्वावर मनुष्याची खरी श्रद्धा नसते ह्मणून त्याला ईश्वरी साक्षात्व सुख अनुभवितां येत नाहीं; परंतु दृढभाव आणि श्रद्धा यांचा स्थितीप्रमाणें दुसऱ्या स्थितीशीं संयोग होणें शक्य आहे.

तिसऱ्या पंथाचें नांव '**त्वमेवाहम्**' असें असून त्याचा अर्थ 'मी **तूंच** आहें,' हा आहे. येथें आपण ईश्वराच्या किती सन्निध येतों पहा ! पहिल्या स्थितींत मी '**त्याचा**' आहें, अर्थात् ईश्वर कुठें तरी दूर आहे; दुसऱ्या स्थितींत मी '**तुझा**' आहें. अर्थात् ईश्वर आतां आपल्या समोरासमोर आहे, तो अगदीं सन्निध येतो; परंतु आध्यात्मिक प्रगतीच्या अंतिम स्थितीमध्यें दोघे एकच होतात. भज्य आणि भक्त हे भक्तीमध्यें लीन होतात. याप्रमाणें वेदान्ताचा अनुभव येतो. पतंग दिव्याच्या जवळ जवळ आला आणि आपला देह जाळून घेऊन स्वतः प्रकाशच बनला. 'उपनिषद्' याचा शब्दार्थ असा आहे, कीं, प्रकाशांचा जो **प्रकाश**, त्याच्या इतकें जवळ ( उप ) जावयाचें, कीं, निश्चयेंकरून ( नि ) भेदभावाचा पतंग नाश पावला पाहिजे ( षद् ). ईश्वराचा खरा भक्त ईश्वराशीं मिळून जातो आणि नकळत सहज स्फूर्तीनें 'मी **तो** आहें, मी **तो** आहें, मी **तो** आहें, मी **तूं** आहें, **तूं** आणि मी एकच आहों, मी ईश्वर आहें, मी ईश्वर आहें, मी ईश्वराहून लवमात्र कमी नाहीं !' असे शब्द त्याच्या तोंडावाटे बाहेर पडतात. आध्यात्मिक उन्नतीची ही शेवटची पायरी होय. हीच श्रेष्ठ भक्ति होय. यालाच वेदान्त ह्मणतात. वेदान्त ह्मणजे वेदाचा—ज्ञानाचा अंत, शेवट. येथें सर्व ज्ञानाची परिसमाप्ति होते. येथें उद्दिष्ट प्राप्त होतें. या पंथामध्यें देखील, जें पटल अतिशय विरल असल्यामुळें, त्यांतून आपल्याला खरें तत्व पाहतां येतें. कांहीं लोकांची दृढ श्रद्धा किंवा अनन्यभक्ति नसल्यामुळें ते पूर्ण साक्षात्कार अनुभविण्याकरितां पडदा दूर सारीत नाहींत; आणि कांहीं लोक 'आपण ईश्वर आहों' हा सिद्धान्त प्रथम बुद्धीनें ग्रहण करून पुढें तो भावनेनें इतका कांहीं अनुभवितात, कीं, नेत्रपटल नाहींसें करून ते प्रत्यक्ष दिव्य सुख अनुभवितात, प्रत्यक्ष स्वर्गच होतात. ईंनां जीवन्मुक्त ह्मणतात.

तरी ंथ **अधिक उज्ज्वल करणें किंवा पटल विरल करणें हें काम** व सर्व **ाख्यानें होतें. आणि पटल अगदीं दूर सारण्याचें काम** खरीखुरी अरिते. तिन्ही पंथांचें आपण वर्णन केलें. आतां निरनिराळ्या

पंथांतील लोकांनां मधून मधून हें पटल कितपत दूर सारतां येईल, हें पाहूं. कांहीं हिंदु गोष्टींचा आपण दृष्टांत घेऊं.

एक तरुणी प्रेमपाशांत बद्ध झाली होती. ती प्रेममय बनली होती. एकदां ती आजारी पडली आणि डाक्टरांनां बोलावण्यांत आलें. डाक्टरांनीं अभिप्राय दिला, कीं, तिला बरी करण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे तिचें थोडें रक्त काढलें पाहिजे. त्यांनीं शस्त्रानें तिचा हात थोडासा कापला, परंतु तिच्या शरीरांतून रक्तच येईना. आश्चर्य हें, कीं, त्याच वेळीं तिच्या प्रियकराच्या अंगातून भळ भळ रक्त वाहूं लागलें! केवढें अद्भुत ऐक्य हें! तुह्मी ही दंतकथा किंवा खोटी गोष्ट ह्मणाल. परंतु ती खरी असणें शक्य आहे. ज्यांनीं प्रेमाचा अनुभव घेतला आहे, मग तें प्रेम कमी दर्जाचें कां असेना, ते आपणासहि असाच अनुभव पुष्कळदां आल्याचें सांगतात. ती तरुणी स्वतःस विसरून जाऊन आपल्या प्रियकराशीं ऐक्य पावली होती, आणि तिचा प्रियकर देखील तिच्या प्रेमांत मग्न झाला होता.

**अशा प्रकारचें ऐक्य ईश्वराशीं झालें ह्मणजे त्याला धर्म असें ह्मणतात.** माझा देह ईश्वराचा होवो आणि ईश्वराचा आत्मा माझा आत्मा होवो.

योगवासिष्ठामध्यें सांगितलें आहे, कीं, एका स्त्रीला अग्नीमध्यें टाकिलें, परंतु अग्नीनें तिला जाळलें नाहीं. तिच्या पतीला अग्नीमध्यें टाकिलें पण त्यालाहि अग्नीनें जाळलें नाहीं. हें कसें? त्यांनां नदींत टाकिलें परंतु नदीनें त्यांनां वाहून नेलें नाहीं. त्यांनां पर्वतशिखरावरून लोटून दिलें, परंतु त्यांचें एक हाड देखील मोडलें नाहीं. हें कसें? त्या वेळीं त्यांनां कांहींच कारण सांगतां येईना. त्यांनां देहभान नव्हतें. तीं अशा स्थितीमध्यें होतीं, कीं, त्यांनां प्रश्नच ऐकूं येत नव्हता. बऱ्याच वेळानें त्यांनां कारण विचारतां उभयतांनीं सांगितलें, कीं, आपणास (प्रत्येकाला) आपलें प्रेमपात्र सर्वस्व झालें होतें. त्या स्त्रीला अग्नि हा अग्नि न वाटतां तो आपला प्रियकरच वाटला, आणि त्या पुरुषाला तोच अग्नि आपल्या प्रियेसारखा वाटला. पाण्यानें आपला पाणीपणा टाकून त्यांनां तें प्रेमपात्रच झालें, दगड त्यांनां दगड उरले नव्हते, देह त्यांनां देह राहिला

नव्हता, त्यांनां सर्व कांहीं प्रेममय झालें होतें, मग प्रेमपात्राकडून त्यांनां उपसर्ग कसा पोंचेल ?

आमच्या पुराणामध्यें प्रल्हादाची अशीच गोष्ट आहे. त्याच्या बापाच्या मनांतून त्याला भगवद्भक्तीपासून परावृत्त करावयाचें होतें. आपल्या मुलानें आपल्यासारखें प्रापंचिक रहावें अशी त्याची इच्छा होती; परंतु बापाचा उपदेश, धमकावणें वगैरे सर्व फुकट गेलें. त्यांचा त्याच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. आपल्या मुलाला भगवद्भक्तीपासून परावृत्त करण्यासाठीं हिरण्यकश्यपूनें त्याला अग्नींत टाकिलें, परंतु अग्नीनें त्याला जाळलें नाहीं. राजानें त्या कुमाराला जलप्रवाहांत लोटलें, परंतु पाण्यानें त्या मुलाला वरच तरंगत ठेविलें. अग्नि, जल आणि इतर भूतें देखील निरुपद्रवी बनलीं. त्याला त्याचें यथार्थ ज्ञान झालें होतें. प्रल्हादानें मायामोहांतून स्वतःस मुक्त करून यथार्थ ज्ञान मिळविलें होतें. त्याला सर्व कांहीं प्रेममय—ईश्वरमय झालें होतें. धमकावण्या, रागें भरणें, चापणें, शस्त्र आणि अग्नि हीं त्याला प्रेममय स्वर्गच झालीं. तेव्हां त्याला उपद्रव कसा होईल ?

पूर्वीं एकदां एक संन्यासी हिमालयाच्या घोर अरण्यामध्यें गंगातटाकीं बसला होता. तो 'शिवोऽहम्, शिवोऽहम्' ( मी ईश्वर आहें ) असें ह्मणत बसला असतां पैलतीरावरील दुसरे संन्यासी त्याच्याकडे पहात होते. इतक्यांत तेथें एक वाघ आला, व येतांक्षणींच त्यानें त्या संन्याशाला पंजांत धरिलें. वाघाच्या जबड्यांत सांपडला असतांहि त्या संन्याशाचा पूर्वींप्रमाणें 'शिवोऽहम्, शिवोऽहम्' असा निर्भयपणें जप चालला होता. वाघानें त्याचे हातपाय खाऊन टाकिले तरी त्याचें 'शिवोऽहम्, 'शिवोऽहम्' सारखें चाललें होतें. त्याचें आपल्याला काय वाटतें ? 'मी ईश्वर आहें, मी ईश्वर आहें' असें तो जें ह्मणत होता याचें आपल्याला काय वाटतें ? याला आपण संशयवाद ह्मणाल काय ? छे, केव्हांहि नाहीं. अंतिम साक्षात्कार किंवा अनुभव तो हाच ! प्रियकरांनां देखील, प्रेमाच्या एवढ्या उच्च पदाला ते पोंचले असतां आपल्या प्रेमपात्रांशीं आपण एक आहों असा अनुभव येत नाहीं काय ? माता देखील आपल्या मुलाला आपलाच मांसाचा गोळा असें ह्मणत नाहीं

काय ? मातेला आपलें मूल आपलाच आत्मा असें वाटत नाहीं काय ? मुलाचें हित तेंच आईचें हित नव्हे काय ? खरोखर, दोघांचे हितसंबंध एकच आहेत.

ईश्वराला आलिंगन देणें, ईश्वराचा स्वीकार करणें, ईश्वराचें पाणिग्रहण करणें, ईश्वराशीं लग्न लावणें आणि त्याच्याशीं इतकें ऐक्य पावणें, कीं, तेथें द्वैतभावाचा एक लेशहि राहूं नये. 'प्रभो ! तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व घडूं दे !' अशी प्रार्थना करण्यापेक्षां ' माझ्या इच्छेप्रमाणेंच घडत आहे, माझी इच्छा सफल होत आहे,' असें आनंदानें ह्मणा.

प्राचीनकालीं हिंदु घरांत बहुतेक पणत्याच वापरीत असत. त्या वेळीं हल्लींप्रमाणें विजेचे दिवे किंवा गॅसचे दिवे नव्हते. एका घरांत दिवा लागला, कीं, शेजारचे लोक त्या घरांत जाऊन आपल्या पणत्या पेटवून आणीत. एके दिवशीं श्रीकृष्णावर पूर्णपणें प्रेम जडलेली अशी एक कुमारिका, पणती पेटविण्याचें मिष करून नंदाच्या घरीं आली. वस्तुतः तिच्या मनांतून श्रीकृष्णांच्या मुखप्रकाशांत पतंगाप्रमाणें लीन होऊन जाण्याचें होतें, ह्मणून इतरांचीं घरें सोडून ती नंदाच्याच घरीं आली. खरोखर तिला कृष्णदर्शन घ्यावयाचें होतें. तिनें आपल्या आईला दिवा लावून आणण्याची नुसती सबब सांगितली होती. तिनें आपल्या पणतींतील वात पेटणाऱ्या दिव्याच्या वातीला लावावयास पाहिजे होती; परंतु तिची दृष्टि दिव्याकडे नसून सांवळ्या कन्हय्याच्या मुखचंद्रम्याकडे लागली होती. ती इतक्या एकाग्रतेनें श्रीकृष्णाकडे पहात होती, कीं, हातांतील पणतीची वात दिव्यास न लागतां तिचीं बोटेंच जळूं लागलीं, पण तिच्या तें लक्ष्यांत देखील आलें नाहीं. बराच वेळ गेला तरी ती घरीं गेलीच नाहीं. तिची आई वाट पाहून कंटाळली आणि तेथें येऊन पहाते, तों आपल्या मुलीचा हात दिव्यावर जळत आहे आणि मुलीला त्याचें भान देखील नाहीं; तिचीं बोटें जळून करपून गेलीं आहेत आणि त्यांतील हाडांचा कोळसा झाला आहे. त्या आईच्या पोटांत धस्स झालें आणि मोठ्यानें किंकाळी फोडून ती ह्मणाली " बाळे ! हें करते आहेस तरी काय ?"

तेव्हां ती कुमारिका शुद्धीवर आली. किंवा खरें पहातां तिची शुद्धि ( एकाग्रता ) नाहींशी झाली, असेंच ह्मटलें पाहिजे.*

अशा ईश्वरी प्रेमामध्यें, अशा पूर्ण प्रेमरूप अवस्थेमध्यें प्रियकर आणि प्रिया ( देव आणि भक्त ) हीं एकच होऊन जातात. " मी **तोच** आहें, मी **तूंच** आहें, " ही तिसरी स्थिति व याच्या पलीकडेहि एक स्थिति आहे. तीमध्यें हे शब्द देखील उमटत नाहींत.

वरील गोष्टीमध्यें अंतिम भक्ति दिसून येते. खालील गोष्टींमध्यें मधल्या किंवा दुसऱ्या स्थितीचें ' मी **तुझा** आहें'—याचें स्पष्टीकरण आहे. एका गुरूजवळ धर्म शिकण्याकरितां दोन शिष्य आले. गुरूजी ह्मणाले " तुमची आधीं परीक्षा घेतल्याशिवाय तुह्मांला कांहीं मला शिकवितां यावयाचें नाहीं." नंतर त्यांनीं प्रत्येकाला एकेक कबूतर दिलें आणि " जेथें तुह्मांला कोणी पाहणार नाहीं अशा ठिकाणीं जाऊन तीं मारा," असें सांगितलें. त्यांपैकीं एकजण भररस्त्यावर गेला आणि रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांकडे पाठ करून त्यानें डोक्यावरून उपरणें घेतलें आणि कबूतर हातांत घेऊन त्याची मान मुरगळली. तेथून थेट तो गुरूजवळ येऊन ह्मणाला " स्वामीजी, स्वामीजी ! हें पहा आपल्या आज्ञेप्रमाणें केलें." गुरुजींनीं विचारलें "तुला कोणी पहात नसतांना या कबूतराचा जीव घेतलास ना ?" शिष्य ह्मणाला "होय!" गुरूजी ह्मणाले "बरें आहे, आतां तुझा सोबती काय करून येतो, तें पाहूं."

दुसरा शिष्य एका घोर निर्जन अरण्यांत गेला आणि त्या कबुतराची मुंडी मुरगळणार इतक्यांत त्या कबुतराचे सुंदर चमकणारे डोळे त्याच्याकडे पाहूं लागले. त्याची आणि कबुतराची दृष्टादृष्ट झाली, आणि कबुतराची मान मोडतां मोडतां तो एकदम दचकला. कारण, त्याला एकदम अशी कल्पना आली, कीं, आपल्या गुरूनें ठेविलेली अट मोठी कठीण आहे. या कबुतराच्या डोळ्यांत देखील आपणास पाहणारा **साक्षी** आहेच. अरेरे ! मी कांहीं एकटा नाहीं. जेथें मला कोणी पाहणार नाहीं अशा जागीं

---

* गोपीच्या या अलौकिक प्रेमाविषयीं कबीर सांगतातः—

**क्या कहते हो कबीर कबीर, जावे यमुना तीर ।**
**एकेक गोपीके प्रेममें, बह गये कोट कबीर ॥**

ी नाहीं. मला कुणी पहात आहेच. आतां काय करावें ? कुठें जावें ? तो पुढें पुढें गेला आणि दुसऱ्या अरण्यांत शिरला. तेथें गेल्यानंतर कबुतर मारणार, तों तें कबुतर त्याच्याकडे पाहूं लागलें. पुन्हां त्यांचे डोळे एकमेकांस भिडले. **साक्षी** तर या कबुतरामध्यें आहे.

पुनः पुन्हां त्यानें कबुतर मारण्याचा यत्न केला, परंतु त्याला गुरुजींच्या शर्तीप्रमाणें करतां येईना. शेवटीं निराश होऊन मोठ्या कष्टानें तो गुरुजींपाशीं आला आणि त्यांच्या पायापाशीं जिवंत कबूतर ठेवून एकसारखा रडूं लागला आणि त्यानें विनंति केली, कीं, "स्वामीजी ! मला आतां हें सोसवत नाहीं, कसेंहि करून मला ईश्वरी ज्ञान द्याच. ही परीक्षा मोठी कठीण आहे. मी यांतून पार पडत नाहीं. मज दीनावर दया करा आणि मला ईश्वरी ज्ञान द्या. मला तें हवें आहे, मला त्याची जरूरी आहे."

गुरुजींनीं शिष्यास उचलून पोटाशीं धरिलें आणि त्याला कुरवाळून मोठ्या प्रेमानें ह्मटलें "माझ्या लाडक्या ! तूं मारावयास नेलेल्या पक्ष्याच्या डोळ्यांमध्यें जसा **साक्षी** पाहिलास, तसाच कोठेंहि असलास अथवा गेलास व कोणतेंहि पाप करण्याचा तुला मोह पडला, तरी, तेथें **ईश्वर** आहे हें ध्यानांत आण. जिच्यावर तुझी आसक्ति जडली असेल त्या स्त्रीच्या देहामध्यें व नेत्रांमध्यें तोच **साक्षी** पहा. तिच्या डोळ्यांमधून देखील आपलाच **स्वामी** आपल्याकडे पहात आहे हें लक्ष्यांत आण. माझा **धनी** मला पहात आहे, सर्वकाळ आपण त्या **प्रभूच्या** दृष्टीखालीं आहों, अशा भावनेनें तूं वाग."

नेपल्समधील एका भव्य पदार्थसंग्रहालयाच्या छपरावर एक सुंदर देवतेचा मुखवटा आहे. त्या पदार्थसंग्रहालयाच्या कोणत्याहि भागाला तुह्मी गेलां तरी तो मुखवटा आपल्याकडेसच पाहत आहेसा तुह्मांला दिसतो. तळमजल्याकडे जा किंवा सर्वांत वरच्या मजल्यावर चला, त्या सुंदर मुखवट्याचे पाणीदार चमकणारे डोळे थेट तुह्मांकडेच पाहतात. आध्यात्मिक प्रगतीच्या दुसऱ्या पायरीवर असलेले लोक जर खऱ्या भावनेनें वागले, तर ते नेहमीं ईश्वराच्या दृष्टीखालीं असतात. ते कोठेंहि जावोत, घरांतील अंतःपुरांत असोत किंवा वनांतील निर्जन गुहेमध्यें असोत,

ईश्वराच्या नजरेखालीं आपण आहों, ईश्वर आपणास पहातो, त्याच्या प्रकाशावर आपलें जीवित अवलंबून आहे, आणि त्याच्या कृपेनें आपण वाढतों असें त्यांनां दिसून येतें.

आतां आपण आध्यात्मिक प्रगतीच्या "मी **त्याचा** आहें, मी **प्रभूचा** आहें," या प्रथम पायरीकडे वळूं. ही अगदीं प्राथमिक पायरी दिसते खरी, परंतु एवढीच अनुभवास आणणें किती तरी कठीण आहे आणि जर कोणी खऱ्या भावानें, खऱ्या भक्तीनें आपल्या कल्पनेप्रमाणें वागूं लागला, ती कल्पना (वृत्ति) त्याच्या रोमरोमांमधून जर स्फुरूं लागली, शरीरांतल्या रक्तांतील प्रत्येक विंदूमध्यें जर ती भासूं लागली, जर तो त्या कल्पनेमध्यें गढून गेला, तर या प्राथमिक स्थितीमध्यें देखील तो या जगांत मोठा सिद्ध पुरुष होईल.

एक मोठा साधु लहानपणीं गरीबांनां दानधर्म करण्याच्या कामावर होता. एके दिवशीं कांहीं भिक्षुक, 'तेरा शेर' आटा आपणांस देण्याचा त्याच्या धन्याचा हुकूम घेऊन त्याच्याकडे आले. त्यानें पहिल्यानें एक शेर दिला. नंतर दुसरा, तिसरा, असें करीत करीत तो तेरांपर्यंत आला. धान्य देतांना तो प्रत्येक वेळां मोठ्यानें मोजीत असे. 'तेरा' याचा अर्थ हिंदीमध्यें 'तुझा' असाहि होतो. 'मी **तुझा** आहें, मी **तुझा** आहें, मी **ईश्वराचा** आहें, मी **त्याचा** एक अंश आहें, मी **त्याचाच** आहें !'

जेव्हां त्यानें बारा शेर मोजून घातले आणि तेराव्याची खेप आली आणि जेव्हां त्यानें 'तेरा' ह्मणून तेरावा शेर घातला, तेव्हां त्याच्या मनामध्यें असे कांहीं पवित्र संस्कार जागृत झाले, कीं, त्यानें खरोखरच आपला देह व सर्वस्व ईश्वरास अर्पण केलें. त्याला या जगाचें सर्व भान नाहींसें झालें. तो ठिकाणावर नव्हता. छे छे, तो आपल्यामध्येंच रममाण झाला होता आणि अशा स्थितीमध्यें तोंडानें '**तेरा तेरा**' ह्मणत लोकांस शेरामागून शेर आटा देऊं लागला व सरते शेवटीं त्याला तेथेंच समाधि लागली.

यावरून आपणास असें दिसून येतें, कीं, प्रथम भूमिकेवरील लोक जर आपल्या शब्दाप्रमाणें आचरण करूं लागतील, जर ते खरोखर आस्थे-

ईक होतील, जर त्यांनां धर्म ह्मणजे थट्टा वाटत नसेल, जर त्यांनां वाच्या डोळ्यांत धूळ टाकून देवाला दिलेलीं वचनें मोडावयाचीं नसतील, तर हे लोक देखील अत्युच्च स्थितीला जाऊं शकतील. देवळामध्यें अगर चर्चमध्यें 'मी **तुझा** आहें' असें एकदां ह्मटल्यानंतर त्यांनां त्याप्रमाणें वाटत राहिलें पाहिजे व त्यांनीं त्याप्रमाणें वागलें पाहिजे. त्यांनां तशी भावना धरूं द्या, हाच खरा धर्म.

जगांतील निरनिराळे पंथ 'मी **त्याचा** आहें, मी **तुझा** आहें, मी **तूंच** आहें' या तीन सदरांखालीं आणतां येतात. पंथ या दृष्टीनें 'मी **तुझा** आहें' हा दुसरा पंथ 'मी **त्याचा** आहें' या पहिल्या पंथाहून उच्च आहे; आणि 'मी **तूंच** आहें' हा पंथ सर्वांहून उत्तम आहे. या तीन्हींपैकीं कोणत्याहि पंथामध्यें आपल्याला धार्मिक वृत्ति उत्पन्न करितां येईल.

हिंदुलोकांचें मत असें आहे, कीं, जर कोणीं या पहिल्या पायरीमध्यें धार्मिक वृत्ति साध्य केली, तर या जन्मांत किंवा दुसऱ्या जन्मीं त्याला उत्तम गति प्राप्त होईल. पहिल्यानें तो दुसऱ्या पायरीवर जाईल, आणि दुसऱ्या पायरीमध्यें पुन्हा धार्मिक वृत्ति अंगीं आणून त्या जन्मीं अगर दुसऱ्या जन्मीं सर्वोत्तम स्थितीला जाऊन पोहोंचेल आणि ती ह्मणजे "**तो** मी आहें, मी **तूंच** आहें" ही होय. ही स्थिति प्राप्त झाली ह्मणजे जन्म-मरण चुकतें, मनुष्य मुक्त होतो, मनुष्य ईश्वर होतो, आणि त्याला आपलें अंतिम साध्य प्राप्त होतें.

**तृप्त जाहल्या सर्व वासना । मोद होतसे अमित मन्मना ॥**
**चुंबिती फुलां मंदवात जे । तेथ मी रमें तृप्त मानसें ॥ १ ॥**

**इंद्रचापही वस्त्र हो मम । भूत्य जाहलें तेज निरुपम ॥**
**कांत मी तसा युवति मीच कीं । पीडिं मीच त्यां कामसायकीं ॥ २ ॥**

**कुसुमहास्य वा बाष्पमौक्तिकें । भानुकर तसे हैम मी निकें ॥**
**चारुबिंब हा चंद्र उज्ज्वल । मीच होतसें अब्धिचें जल ॥ ३ ॥**

तरल पर्ण वा वृक्ष मी तसें । मीच मृदुलता, भृंग मी असें ॥
जन्म मृत्यु मच्छ्वसनवायु ते । शुभ अनिष्ट मद्रुधिरिं वाहतें ॥ ४ ॥

कार्य मज नसे जाउं मी कुठें ? । मदिय व्याप्तिनें विश्व हें अटे ॥
भ्रांति वा त्रुटी मन्मनीं नसे । काल शक्ति मी अग्नि होतसें ॥ ५ ।

भ्रांति भीतिनें बद्ध मी नसें । सकळ सृष्टिचें मूळ मी असें ॥
सर्वव्यापि मी, सर्वसाक्षि मी । सर्वदां असें ज्ञानरूप मी ॥ ६ ॥

सर्व काळ तो आजची असे । सर्व देश तो येथची वसे ॥
कूट प्रश्न ते सर्व सूटले । गूढ तें असे आजि उकललें ॥ ७ ॥

मज न बांधिती स्वार्थि बंध ते । मदिय शासना विश्व पाळतें ॥
शत्रुमित्रही देवद्विज तसे । येति मजकडे शांत मानसें ॥ ८ ॥

अरिमित्रांचा प्रभु मी सुहृद् सखा मज नसेचि आकार,
शरणागत मज येती सृष्टींतिल अखिल वस्तु साकार. १

## आत्मकृपा.

'श्रेयस् आणि प्रेयस् हीं निरनिराळीं आहेत' असें श्रुतीचें वाक्य आहे. कर्तव्य एक उपदेश करितें पण गरज अथवा लालसा (प्राण्याला) दुसरीकडे खेंचते. श्रेय–कर्तव्य सांगतें, कीं, 'देऊन टाक, त्याग कर'. पण प्रेय (गरज, लालसा) ह्मणते ' घे, घेऊन ठेव; हा आपला हक्क आहे, अधिकार आहे. ' जगामध्यें आपल्या हक्कावर जोर देणें हें सार्वत्रिक व सोपें आहे; परंतु आपला धर्म पाळणें किंवा त्याच्यावर जोर देणें हें दुर्मिळ व कठीण आहे. वस्तुस्थितीचा नीट विचार केला तर झाडाच्या बीजाचा फलाशीं जो संबंध आहे, तोच संबंध धर्म आणि वासना (सुख) यांमध्यें आहे. मोठी आश्चर्याची गोष्ट आहे, कीं, सर्व लोक फळ खाण्याची इच्छा करितात; परंतु बीज पेरणें व त्याचें पोषण करणें याविषयीं मेहनत करण्यास मात्र सर्व कंटाळतात. पण तत्व असें आहे, कीं, **आपण जर आपल्या कर्तव्यावर जोर देत गेलों, तर आपले हक्क व अधिकार आपोआप आपल्याकडे चालत येतात.** ईश्वरी नियमच असा आहे, कीं, जर आपण आपल्या हक्कांवरच जोर देत गेलों, तर कमनशीबानें आपल्याला दुसऱ्याचें तोंड पाहत बसण्याची पाळी येते व आपले हक्कहि नाहींसे होतात.

कर्तव्य किंवा धर्म चार प्रकारचा आहे. पहिलें कर्तव्य ईश्वरसंबंधीं, दुसरें मनुष्यमात्रासंबंधीं, तिसरें देशसेवेचें आणि चवथें स्वतःविषयीं.

या चाऱ्ही कर्तव्यांचा शेवटीं एका कर्तव्यांत अंतर्भाव होतो. तें कोणतें, तर स्वतःचें स्वतःसंबंधीचें होय. जे लोक आपलें स्वतःचें ऋण पूर्णपणें फेडतात त्यांचीं बाकीचीं तीन्हीं ऋणें आपोआप फिटतात. असें सांगितलें आहे, कीं, कृपा तीन प्रकारची आहे. १ ईश्वरकृपा, २ गुरुकृपा आणि ३ आत्मकृपा. ज्याच्यावर गुरुकृपा होते, त्याच्यावर ईश्वरकृपा होते आणि ज्याच्यावर आत्मकृपा होते त्यालाच गुरुकृपा लाभते. विचार करा, कीं, एकादा विद्यार्थी शाळेंत शिकत आहे, पण तो आपलें कर्तव्य पूर्णपणें बजावीत नाहीं, तर त्याच्यावर गुरुकृपा होणार नाहीं. तेंच जर तो आपला धडा उत्तम पाठ करील, तर गुरुकृपा त्याच्यावर आपोआप होईल आणि गुरुकृपा झाली ह्मणजे ईश्वरकृपाहि होईल.

ज्यानें प्रथम आत्मसेवा केली नाहीं, त्याला देशसेवा करतां यावयाची नाहीं. ज्याला स्वतःचा हक्क देखील साधतां येत नाहीं, तो देशाची सेवा काय माती करणार? जर एकाद्यानें शास्त्राचें अध्ययन केलें नाहीं, एकादी कला अवगत करून घेतली नाहीं, कोणत्याहि गोष्टींत प्रावीण्य संपादिलें नाहीं, कोणत्याहि कारागिरीमध्यें किंवा धंद्यामध्यें चांगला प्रवेश करून घेतला नाहीं, आणि सर्व देशाचा पुढारी होण्याची मात्र शेखी मिरविली, तर खरें सांगा, कीं, अशाच्या हातून काय होणार आहे? ही गोष्ट अर्थात् खरी आहे, कीं, ज्याच्या अंगीं खरेपणा आहे, त्यानें कोणत्याहि गोष्टींत प्रावीण्य मिळविलें नसलें, तरी तो कांहीं ना कांहीं देशसेवा करूं शकेल. कोळसा जाळून, लांकडें तोडून, अथवा जहाजें बांधून देशसेवा होते. जळून कोळशाला व तोडलें जाऊन लांकडाला जर देशाची सेवा करतां येते, तर शास्त्र न पढलेला किंवा कला न शिकलेला मनुष्य आपल्या खरेपणाच्या व कळकळीच्या जोरावर देशसेवा कां करूं शकणार नाहीं? मात्र त्याच्या सेवेची, फक्त कोळसा आणि लांकडें यांच्या सेवेशीं तुलना करितां येईल; परंतु प्रामाणिक मनुष्य अगोदर कलाहीन तरी कसा ह्मणतां येईल? प्रामाणिकपणा हेंच एक प्रावीण्य आहे. एकाद्या मनुष्यानें ज्या मानानें स्वतःचें स्वतःशीं कर्तव्य बजाविलें असेल, आणि ज्या मानानें बाळपणची आध्यात्मिक किंवा बौद्धिक स्थिति ( योग्यता ) वाढविली असेल,

(उदाहरणार्थ एम्. ए. किंवा शास्त्री या दर्जाची योग्यता मिळविली असेल,) त्या मानानें तो आपल्या समाजाची गाडी उन्नतीच्या मार्गावर पुढें ओढून नेईल. अशा मनुष्यानें आपल्या सुधारणेची जरी शेखी मिरविली नाहीं, किंवा आपल्या देशसेवेचा डांगोरा पिटविला नाहीं, तरी लोक त्याला नुसतें पाहूनच किंवा त्याची आठवण करूनच उत्साहयुक्त होतात, आणि त्यांनां वाटूं लागतें, कीं, आपणहि एम्. ए. पास होऊं किंवा आपणहि योग्यता मिळवूं. असा मनुष्य आपल्या आचरणानें लोकांनां उपदेश करीत असतो व देशाचें सामर्थ्य वाढवीत असतो.

**दुष्कर्मीं जरि बुद्धिमान असला, लोकां भली बुद्धि दे,**
**त्याचें सद्वच ऐकुनी परि कदा दुष्टां न साधुत्व ये;**
**चित्तीं वा हृदयीं पवित्रच असे जो, तो जरी ना वदे**
**त्याचें पाहुनि सच्चरित्र, अवघे सच्छील होती स्वयें. १**

जगावर आपण उपकार करावा अशी सर ऐझॅक न्यूटन याच्या मनांत कल्पना देखील नव्हती. पण ज्याप्रमाणें पतंग दिव्यावर धावून जातात, त्याप्रमाणें तो ज्ञानाच्या पाठीस लागला होता. न्यूटननें आपलें स्वतःचें कर्तव्य योग्य रीतीनें करून आत्मकृपा मिळविली आणि अशानेंच तो जगाचा कल्याणकर्ता ठरला. जर एकाद्या मनुष्यानें सपाट जमिनीवर उभें राहून सभोंवार दृष्टि फेंकिली तर थोड्या अंतरापर्यंत तो पाहूं शकतो व त्याचा आवाज थोड्याच लोकांनां ऐकूं जातो. पण जर तो एखाद्या उंच मनोऱ्या-वर किंवा पहाडाच्या शिखरावर जाऊन पोहोंचला, तर त्याचा आवाज चोहों बाजूंनीं बराच दूरवर ऐकूं येतो. एकदां 'रामा'बरोबर कांहीं लोक गंगोत्रीच्या पहाडावर आले होते. रस्ता चुकून आडवाटेंतील कांटेरी झाडांझुडपांनीं त्यांचें शरीर बरेंच ओरबडलें गेलें. सोबत्यांपैकीं एकाद्यानें हांक मारिली तर त्याचा आवाज दुसऱ्यापर्यंत पोहोंचत नव्हता. शेवटीं मोठ्या प्रयासानें 'राम' जेव्हां शिखरावर पोहोंचला तेव्हां त्यानें हांक मारिली. त्याबरोबर सर्वजण आले. जोंपर्यंत आपण खालीं पडलेले आहों, तोंपर्यंत आपली हांक कोणास ऐकूं जाणार नाहीं. पण तेंच आपण उच्चस्थानीं जाऊन हांक मारिली तर एकूनएक सर्वांनां ती ऐकूं जाईल.

हें समोरीचें मेज हलवावयाचें असल्यास दुरून किंवा मधून हात घालून जोर केल्यानें तें हलावयाचें नाहीं; परंतु जवळच्या जवळ हात घालून तें सहज ओढतां येतें. मनुष्याचा जगाशीं संबंध याच प्रकारचा आहे.

'मनूचे वंशज (मानव) एकमेकांचे अवयव आहेत. कारण, सर्वांच्या उत्पत्तीचें मूलकारण एकच आहे.'

सर्व जगाला हालवून सोडण्याची जर तुमची इच्छा असेल तर जगाचा सर्वांत मोठा व जवळचा भाग, जो आपला आत्मा, त्याला प्रथम हालवून जागें करा. जर तुह्मीं आपल्या आत्म्यास हालविलें तर सर्व दुनिया हालून जाईल. दुनिया जर नाहीं हालली तर मी जबाबदार! ज्या मानानें आपण आपल्याला हालवितों त्या मानानें आपल्याला जग हालवितां येतें. कांहीं लोक सुधारणा करण्याच्या कामीं अहोरात्र हजारों यत्न करीत असतात; पण कांहींच निष्पन्न होत नाहीं. दुसरे कांहीं लोक असे असतात, कीं, त्यांच्या जिवंतपणीं किंवा निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ किंवा त्यांच्या नांवानें लोक आपण होऊन पाठशाला स्थापितात, संस्था उभारतात आणि शेंकडों सुधारणा अमलांत आणतात. उदाहरणार्थः— **बुद्ध**, **शंकराचार्य**, **नानक**, स्वामी दयानंद. याचें कारण काय? कारण हेंच, कीं, वर सांगितलेल्या महात्म्यांनीं स्वतःची सुधारणा केली होती.

ग्रीसदेशामध्यें **आर्किमिडीज** नांवाचा एक मोठा गणितशास्त्रज्ञ होऊन गेला. त्याची अशी प्रतिज्ञा होती, कीं, थोड्याशा शक्तीनें मी सबंध पृथ्वीला हालवूं शकेन. मात्र अट एवढीच, कीं; मला पृथ्वीबाहेर उभें राहण्यास स्थिर जागा, आणि साहाय्याला एक लांबसा दांडा (Lever) मिळाला पाहिजे. पण त्या विचाऱ्याला असें स्थिर स्थान मिळालें नाहीं. बाबांनों! ज्यावर उभें राहून सर्व पृथ्वी हालवितां येईल असें स्थान ह्मणजे आपला आत्माच होय! तेथें जाऊन स्वस्वरूपीं स्थित होऊन जी हालचाल किंवा चळवळ आपण करूं ती सर्व जगाला हालवून सोडील.

एकाद्या जागेची हवा सूर्याच्या उष्णतेनें पातळ होऊन वर जाते तेव्हां तिची जागा भरून काढण्यास चोहों बाजूंची हवा आपोआप तेथें धावून येते आणि केव्हां केव्हां अशानें वादळ देखील होतें. याचप्रमाणें जेव्हां

एकादा मनुष्य ईश्वरी उष्णतेनें तापून उन्नत होतो तेव्हां त्याची इच्छा असो वा नसो, तो सर्व तऱ्हेच्या लोकांची चार पावलें प्रगति होण्याचें कारण होतो. असा तो मोठा अद्भुत सुधारक होतो.

आपण आपल्याशीं असलेलें कर्तव्य बजाविलें असत। आपलें ईश्वराशीं असलेलें कर्तव्य बजाविलें जातें. मुसलमानांमध्यें अशी एक दंतकथा आहे, कीं, एक मनुष्य देवाचा शोध करीत होता. परमेश्वराच्या शोधार्थ मोठ्या प्रेमानें चाऱ्हीकडे तो धावत होता. हेतु हा, कीं, ईश्वरकृपेनें कोणी पूर्ण ज्ञानी आपणास मिळावा, ह्मणजे त्याच्या दर्शनानेंच अंतःकरणाची तळमळ शांत होईल आणि मनाला आराम पडेल. असा शोध करीत असतां नाउमेद होऊन तो एका जंगलांत जाऊन पडला आणि त्यानें निश्चय केला, कीं, आतां आपण कांहीं खावयाचें प्यावयाचें नाहीं, आतां जीवच द्यावयाचा.

**द्वारीं तुझ्या देवा । घेतलें धरणें । येथूनी ऊठणें । कैसें होय ॥ १ ॥**
**दरशन तुझें । तरी एक होवो । नातरी हा जावो । प्राण माझा ॥ २ ॥**

जुनैद नांवाचा त्या काळचा एक प्रख्यात पूर्ण ज्ञानी त्या दिवशीं आपल्या घोड्याला पाणी पाजण्याकरितां दिजला नदीवर चालला होता. घोडा अडूं लागला. दिजला नदीकडे जाईना. घोडा अडलेला आणि मागें जात असलेला पाहून जुनैदनें जाणलें, कीं, यांत कांहीं तरी हेतु असावा. सरतेशेवटीं घोड्याशीं चाललेली धडपड सोडून देऊन त्यानें ह्मटलें, कीं, "जातोस तिकडे चल, चारी बाजूंला माझ्याच परमेश्वराचा मुलुख आहे, सर्व देश माझाच आहे." घोडा दौडत त्या जंगलामध्यें ज्या ठिकाणीं तो विचारा ईश्वराला शोधणारा खरा मनुष्य भक्तीनें धुंद झालेला व विरहानें पोळलेला आणि परमेश्वराचीच भूकतहान लागून पडलेला होता, त्याच ठिकाणीं नेमका आला. जुनैदनें घोड्यावरून उतरून त्या इसमाजवळ येऊन त्याला त्याचा वृत्तांत विचारला, आणि या थोड्याशा सत्संगतीनें तो मुमुक्षु आनंदभरित झाला. जेव्हां जुनैद परत जाऊं लागला तेव्हां त्या इसमाला ह्मणाला, कीं, जर तुला एकाद्या वेळीं अडचण उत्पन्न होऊन सद्गुरूची गरज लागली तर बगदादमध्यें ये; माझें नांव जुनैद आहे. कोणाला तरी विचार".

ईश्वरभक्तीनें धुंद झालेल्या त्या इसमानें उत्तर दिलें, कीं, " काय, मी आपण होऊन आपल्याकडे आलों होतों ? आतां मला त्यांतील मर्म समजून चुकलें. मला आतां येण्याचें कांहींच कारण उरलें नाहीं. जर येण्याची जरूरीच लागली तर आजच्याप्रमाणें ईश्वरी इच्छेनें आपण किंवा दुसरे कोणी मानगुट धरून खेंचून इकडे आणले जातील. ' प्रेमामध्यें जर आकर्षणशक्ति असेल तर ( गुरु ) आपोआप खेंचून आणला जाईल. माझ्यावर रुसून ते ताठ बसले तरी मला त्यांची पर्वा नाहीं. "

आध्यात्मिक प्रेमाच्या किमयेची धन्य आहे !

" तूं त्याच्यामागें रिकामा कां फिरतोस ! स्वस्थ बैस. जर ईश्वर असला तर तो आपण होऊन येईल. "

" प्रियकराच्या मनांत प्रेम प्रथम उत्पन्न होतें. दिवा पेटल्याशिवाय पतंग त्यावर कोठून लुब्ध होणार !"

" हे गनी, तूं काबा (तीर्था) भोंवतीं किती फेऱ्या घालशील ? आपल्या भोंवतीं फीर. कारण, या मार्गावर आपल्या आत्म्याहून अधिक चांगला मार्गदर्शक कोणी नाहीं. "

आत्मकृपेचें बल असें आहे. हें माझ्या नशिबींच नाहीं, देवाची मर्जी, आजकाल गुरुच मिळत नाहीं, संगत चांगली नाहीं, दुनिया मोठी खराब आहे, वगैरे उद्गार आपल्या मनाच्या नीचपणाचे निदर्शक आहेत.

" प्रतिस्पर्धी अथवा शेजारी यांनां, ते टोंचून बोलतात ह्मणून मीं दोष काय ह्मणून द्यावा ? तुझ्याच हृदयांत मजविषयीं प्रीति नाहीं, तेव्हां सबबी हजारों आहेत. "

ध्रुव, प्रल्हाद आणि अभिमन्यु वगैरे लहान लहान मुलांनीं देखील परमेश्वराचा धांवा करून भगवद्दर्शन कसें करून घेतलें, याविषयीं पुष्कळ गोष्टी आपण ऐकिल्या असतील. नामदेव नांवाच्या एका लहान मुलानें आपला बाप विठोबाची पूजा करीत असतां पाहिलें आणि त्याच्याहि मनांत आलें, कीं, आपण देखील पूजा करावी आणि तो हळुहळू 'विठ्ठल विठ्ठल' असा जप करूं लागला. त्याच्या मतें ती शालिग्रामशीलेची प्रतिमा हा खराच विठोबा (देव) आहे. जेव्हां जेव्हां त्याला संधि मिळे, तेव्हां तेव्हां

त्या शालिग्रामशीलेच्या मूर्तीजवळ येऊन तो मोठ्या प्रेमानें ह्मणे, "भला सांपडलास, विठोबा !" परंतु त्याला त्याचा बाप विठोबास स्नान घालून त्याची पूजा करूं देत नसे. एके दिवशीं त्याच्या बापाला परगांवीं जावें लागलें आणि इकडे बोक्याच्या वांव्याला शिंकें तुटलें. मुलगा बापाला ह्मणाला "तुह्मी तर गांवीं चालला. तुमच्यामागें विठोबाची पूजा मी करीन."

बाप ह्मणाला "तसें कां होईना; पण सकाळीं तोंड धुण्यापूर्वीच तूं खावयास मागतोस, तुझ्यासारखा रडवा पोर देवाची पूजा काय करणार ? पूजा करावयाची हौस असेल तर प्रथम देवास जेऊं घालून मग आपण जेवावें." असें सांगून बाप निघून गेला.

रात्रीं त्या प्रेमळ मुलाला झोंप देखील आली नाहीं. मुलगा मध्यें उठून उठून आईस विचारी, कीं, पहांट केव्हां होईल ? विठोबाची पूजा केव्हां करीन ! उजाडतांच तो मुलगा नदीवर स्नानाकरितां गेला. स्नानानंतर त्याच्या आईनें देव्हाऱ्यांतून देव खालीं काढून दिले. मुलानें देवाची मूर्ति घेऊन कलशपात्रांत बुडवून काढिली व पुन्हां देव्हाऱ्यांत बसवून आईला ह्मणूं लागला, कीं, "लवकर दूध आण, विठोबा अंघोळ करून बसले आहेत, त्यांनां भूक लागली आहे."

आईनें आणलेला दुधाचा प्याला मुलानें देवापुढें ठेवून त्याला तो सांगूं लागला, कीं, "महाराज दूध प्या."

देव दूध प्याला नाहीं. मुलानें डोळे मिटून ओंठानें हळुहळू पुटपुटण्यास सुरुवात केली; आणि 'राम राम विठ्ठल विठ्ठल' असें तो बडबडूं लागला. विचार हा, कीं, माझ्या या भक्तीनें तरी देव प्रसन्न होऊन अवश्य दूध पिईल. मधून मधून हळूच डोळे उघडून, देव दूध पितो कीं नाहीं हें तो पाही. बराच वेळ 'राम राम विठ्ठल विठ्ठल' असा त्यानें जप केला, तरी देव कांहीं दूध प्याला नाहीं. शेवटीं त्रासून बिचारा नामदेव तहानभुकेनें आणि रात्रीच्या थकव्यानें निराश होऊन रडूं लागला. श्वास दीर्घ येऊं लागला. रोमांच उभे राहिले. गळा भरून आला. हुंदक्यांवर हुंदके येऊं लागले. ओंठ सुकून गेले. "हाय ! अरे विठोबा ! आज तुझें हृदय असें पाषाणाचें कसें बनलें आहे ?

काय मी पोर आहें ह्मणून दूध घेत नाहींस ? अशा माझ्यासारख्या गरीब भोळ्याशीं देखील रुसवा करतोस काय ? अरेरे ! या तुझ्या चांदीच्या शरीरांत दगडाचें अंतःकरण कोठून आलें ?"

बिचारा मुलगा रडून रडून शेवटीं स्तब्ध झाला. डोळ्यांतून अश्रूंचे प्रवाह वाहूं लागले व अखेरीस त्याला मूर्च्छा आली. लोकांनीं त्याच्या तोंडावर पाणी शिंपडलें. जेव्हां त्याला शुद्धि आली तेव्हां लोकांनीं त्याला समजविण्याचा प्रयत्न केला, कीं, आतां तूं पी, देव कांहीं पीत नाहीं. तो फक्त वासनेचा (भावाचा) भुकेला आहे.

परमेश्वरालाहि फसवावें, ही अक्कल त्या पोरामध्यें अद्याप आली नव्हती. विठोबाला ठकवावयास तो शिकला नव्हता. पोर खरा होता. सत्याचा, प्रामाणिकपणाचा पुतळा होता. शेवटीं हट्ट घेऊन तो रडूं लागला, कीं, जर विठोबा दूध पीत नाहीं तर आपणाला खाण्यापिण्याची अथवा जगण्याची पर्वा नाहीं. '**नायमात्मा बलहीनेन लभ्यः**'। आत्मलाभ दुर्बळ मनाला केव्हांहि होत नाहीं. छोट्याशा नामदेवा! तुझ्यांत केवढा तरी जोर आहे, केवढें आत्मबळ आहे ! या लहान मुलानें वरील निश्चय करून लागलीच एक लांबशी सुरी आणली व ती आपल्या गळ्यावर ठेविली आणि तो ह्मणाला "विठोबा ! पी, नाहीं तर मी नाहीं !"

सुरी आतां गळ्यावर चालणार इतक्यांत काय पहातां ! विठोबा एकदम मूर्तिमान् प्रगट झाले आणि दूध पिऊं लागले !

आपण ह्मणाल, कीं, ही गप्प आहे. 'राम' विचारतो, कीं, आपला विश्वास गेला कुठें ? अमेरिकेंत असतांना 'रामा'नें पाठशाला व दवाखानें यांमध्यें आपल्या स्वतःच्या डोळ्यानें असे चमत्कार पाहिले आहेत, कीं, (विश्वासाच्या) भावनेच्या जोरावर समोरचें मेज घोडा आहे असें दाखवितां येतें. मानसशास्त्राच्या प्रयोगांनीं अशा तऱ्हेचे चमत्कार पूर्णपणें सिद्ध केले आहेत. असें असतां निष्पाप व पूर्णभक्त नामदेव आपल्या भावनेच्या जोरावर परमेश्वराला मूर्तिमंत कां करूं शकणार नाहीं? परमेश्वर तर सर्वव्यापी आहे. परंतु आत्मकृपा—पूर्ण भावना—अशी चीज आहे, कीं, तिच्या सामर्थ्यानें परमेश्वर सातव्या नव्हे चवदाव्या भुवनांत असो,

आकाशांत असो किंवा नंदनवनांत असो, स्वर्गांत असो किंवा वैकुंठांत असो, गोलोकांत किंवा त्याहून पलीकडे असो, वाटेल तेथें असो, तेथून तो खेचून आणतां येतो.

" आपलें अंतःकरण हातांत गच्च धरून आपोआप तूं येशील, आणि अंतःकरणाच्या अनुरागाचा कांहीं विलक्षण प्रभाव आहे हें तुला कबूल करावें लागेल. "

**अशक्य उकलावया असलि ग्रंथि कोठें असे !**
**करी मनुज उद्यमा तरि असाध्य तें कायसें ?**

" एवढासा किडा, पण तो दगडामध्यें घर करतो. तर मनुष्य प्रियकराच्या (ईश्वराच्या) मनामध्यें काय घर करणार नाहीं ?"

" हे धन्य मानवा ! तुझ्यामध्यें असें कांहीं ऐश्वर्य आणि अपरंपार सामर्थ्य आहे, कीं, योग्य रीतीनें प्रगट केलें असतां, तें सर्व देश, विश्व आणि **विश्वनाथ** यांनां प्रसन्न करील. हे प्रथमवासंतिका ! तूं स्वतःमध्यें रममाण हो. हें स्वतःचें ऋण फेडल्यास तुझें बाकीचें सर्व ऋण फिटेल, क्षुद्र जंतूपासून आकाशांतील प्राण्यापर्यंत सर्व खुष होऊन जातील."

"तूं आनंद आहेस, तूं पूर्ण आहेस, तूं सौख्याची खाण आहेस. मग सुखी होण्याकरितां तूं विषयांचें ओझें उगीच कां स्वतःवर लादून घेतोस?"

## आपलें कर्तव्य बजावण्याचें साधन.

एक मुलगा स्कॉटलंड देशांत अनाथालयांत पाळलेला होता. चार मुलांप्रमाणें तो हट्टी, खेळाडू आणि द्वाड होता. एके दिवशीं तो तेथून पळाला आणि रस्त्यांतील खेड्यांमध्यें भीक मागून पोट भरीत लंदन शहरीं येऊन पोहोंचला, आणि तेथील सर्वांत श्रीमंत लार्ड मेअरच्या (शेरीफच्या) बागेमध्यें भटकूं लागला. (लार्ड मेअर बहुधा इतके श्रीमंत असतात, कीं, सरदार व राजे देखील जरूरीच्या वेळीं त्यांच्याकडून कर्ज काढितात.) हा गरीब पोर बागेमध्यें हिंडत असतां त्याच्या दृष्टीस एक मांजर पडलें. तेव्हां तो त्या मांजराबरोबर खेळूं लागला आणि त्याच्याशीं तोंडानें कांहीं तरी बोलूं लागला. त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याचें शेंपूट ओढूं लागला आणि पोरस्वभावाप्रमाणें त्या मांजराला त्रास देऊं लागला. जवळच एक

गजराचें घड्याळ वाजत होतें. मुलगा मांजरास विचारतो "हें वेडें घड्याळ कां बहकत सुटलें आहे? सांग!" (वेडें अशासाठीं, कीं, घड्याळें साधारण रीतीनें चार आठ, फार झालें तर बारा वाजून थांबतात; पण हें गजराचें घड्याळ खुळ्यासारखें वाजतच राहिलें होतें, थांबण्याचा त्याचा बेत दिसेना.)

बिचाऱ्या मांजराला घड्याळाचा आवाज काय समजणार? मुलानें मांजराच्या वतीनें आपणच उत्तर दिलें, कीं, "टन् टन् टन् टन् विटंगटन् विटंगटन्. (त्या मुलाचें नांव विटंगटन् असें होतें.) टन् टन् टन् विटंगटन् विटंगटन् लार्ड मेअर आफ लंदन्."

अनाथालयांतून पळून आलेला एवढासा पोर, पण त्यानें आपली इच्छा कोठवर नेली याचा जरा विचार करा! घड्याळाच्या आवाजामध्यें देखील आपण लार्ड मेअर होणार, हें गीत तो ऐकत राहिला आहे! वाहवा! "टन् टन् टन् विटंगटन् विटंगटन् लार्ड मेअर आफ लंदन्!"

इतक्यांत लार्ड मेअरसाहेब हवा खात खात त्या जागीं येऊन पोहोंचले. त्यांनीं मुलाला विचारलें "अरे तूं कोण आणि काय बहकतो आहेस?"

पोरानें थोड्या मस्तीनें व थोड्या आनंदानें जबाब दिला "लार्ड मेअर आफ लंदन्, लार्ड मेअर आफ लंदन्."

पोरावर काय रागावणार? उलट त्याचें स्वतंत्र बाण्याचें वर्तन पाहून लार्ड मेअर मनांत खुष झाले. **स्वतंत्रता कोणास आवडत नाहीं?** लार्ड मेअरनीं विचारलें "तुझी शाळेंत जाण्याची इच्छा आहे?"

मुलानें उत्तर दिलें "मास्तर मारत नसले तर!"

त्या मुलाला शाळेंत घालण्यांत आलें. शाळेमध्यें वाढतां वाढतां हळुहळू शिकून पुढें कालेजांतील सर्व परीक्षा क्रमाक्रमानें पास होऊन शेवटीं तो ग्रॅजूएट झाला. इतक्यांत लार्ड मेअरचा मरणकाळ समीप आला. त्यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. आपल्या अपार संपत्तीचा मोठासा भाग त्याला देऊन लार्ड मेअर परलोकवासी झाले. हा मुलगा आपली संपत्ति वाढवीत वाढवीत एके दिवशीं स्वतः लार्ड मेअर आफ लंदन् झाला. लार्ड मेअरच्या यादीमध्यें याचें नांव आपणांस सांपडेल. हें जग आणि आपला त्याच्याशीं

संबंध ह्मणजे आपली हिंमत व आपल्या मनाचा भाव यांचें प्रत्युत्तर आहे. विटंगटन्‌ची हिम्मत बालपणीं फार मोठी होती व मनांतील भाव उच्च व खरे होते. त्याप्रमाणें त्याला फळहि कां मिळूं नये ? इच्छेप्रमाणें फल मिळतें. जसें मनांत असेल तसें मिळेल. **जसें मनांत पेराल, त्याप्रमाणें पीक घ्याल.**

चीन देशांमध्यें एक अतिशय गरीब विद्यार्थी होता. रात्रीं अभ्यासा-करितां त्या बिचाऱ्याला तेल देखील मिळत नसे. बरेचसे काजवे एकत्र करून एका पातळ मलमलीच्या कपड्यांत बांधून तो पुस्तकावर ठेवी आणि त्याच्या उजेडानें अभ्यास करी. कोणीं एकानें त्याला विचारलें, कीं, "एवढी मेहनत कां घेतोस ? का चीन देशाचा वजीर होणार आहेस ?"

त्या मुलानें उत्तर दिलें "सामर्थ्य आणि ज्ञान यांचा स्वामी ईश्वर–त्याचा कायदा जर खरा असेल तर एक दिवस मी खरोखर वजीर देखील होईन !"

चीनदेशाच्या इतिहासांत पहा ! असा एक दिवस आला, कीं, हाच मुलगा मुख्य प्रधान बनला !

'तजकिरा आबहयात' नांवाच्या ग्रंथांत प्रोफेसर आजादनें एक विलक्षण गोष्ट लिहिली आहे. एके दिवशीं एका शाहिरानें लखनौमधील नबाब व त्याचे मानकरी यांनां आपल्या पोवाड्यानें खुष केलें. यामुळें नबाबसाहेब आपल्या महालांत उशीरानें पोहोंचले. उशीर होण्याचें कारण बेगमसाहेबांनीं विचारिलें. नबाबसाहेबांनीं सांगितलें "मोठे अद्भुत चुटके आणि पोवाडे ऐकत आह्मी बसलों होतों."

आपणालाहि गाणें ऐकवावें अशी बेगमसाहेबांनीं विनंति केली.

दुसरे दिवशीं पडदा तयार करून त्या शाहिराला बोलाविलें. बेगम-साहेब बऱ्याच खुष झाल्या आणि त्यांनीं आज्ञा केली, कीं, महालामध्यें याला एक रहावयास खोली द्यावी. शाहिरानें जाणलें, कीं, जर आपण महालांत राहिलों तर आपल्याला बेगमांचें दर्शन घडेल आणि हें तर नबा-बसाहेबांनां पसंत पडणार नाहीं.

नबाबसाहेब विचारांत पडलेले पाहून शाहिरानें बोलणें सुरू केलें, कीं, सर्व बाबतींत मी चांगला आहें, परंतु एका बाबतींत मात्र उणीव आहे. मला दिसत मात्र बिलकुल नाहीं. डोळ्यानें मी अंधू आहें.

शाहिराची ही युक्ति नेमकी लागू पडली. काम छान वठलें. नबाव-साहेबांच्या मनांतील अंदेशा दूर झाला आणि त्यांनीं शाहिराला महालांत राहावयास एक खोली देण्याचा हुकूम केला. परंतु या लबाड शाहिरानें आपण आंधळे आहों ही थाप दिली होती. त्याच्या मनांत अशी वाईट बुद्धि आली होती, कीं, या बहाण्यानें आपणास बेगमांनां बिनधोक पहावयास मिळेल. परंतु **फसवेगिरी सरतेशेवटीं आपल्यावांचून दुसऱ्या कोणासहि फसवीत नाहीं** आणि **वाईट कामामध्यें यश मिळविणें ह्मणजे विषयुक्त मदिराच सेवन करणें होय.**

एके दिवशीं शाहिरास बहिर्दिशेस जावयाचें होतें. एका दासीजवळ त्यानें पाण्याचा लोटा मागितला. दासी ह्मणाली “खोलींत लोटा नाहीं, आणूं कोठून?” (अशा पाहुण्यांपासून नोकरलोकांनां बराच त्रास पोहोंचतो, ही नेहमींचीच गोष्ट आहे.)

शाहिराला घाई लागली होती, त्याच्यानें राहवेना. बेसावधपणानें तो एकदम ह्मणाला “दिसत नाहीं का तुला, तेथें लोटा पडला आहे तो?”

सत्य किती वेळ लपून राहील? हें ऐकतांच दासी बेगमसाहेबांपाशीं धावत गेली आणि ह्मणाली “हा मेला आंधळा नाहीं, याला दिसतं! मुद्दाम होऊन त्यानं आंधळ्याचं सोंग घेतलं आहे!”

त्याच दिवशीं त्याला महालांतून हांकून लावण्यांत आलें आणि दुसरे दिवशीं तो खराच आंधळा बनला! कसें रोक ठोक बक्षीस मिळालें! **जसें बोलाल किंवा मनांत आणाल तसें तुह्मांला व्हावें लागेल.**

“जर तुझ्या मनामध्यें गुलाब येईल तर तुझें मन प्रसन्न होईल, आणि जर तुझ्या मनामध्यें चळवळ्या बुलबुल येईल तर तुझें मन अस्वस्थ होईल;”

“जर तुह्मांला संकटाची धास्ती वाटत असेल तर संकटें तुह्मांवर येतीलच; आणि जर तुह्मी सर्वांची काळजी करण्याचें पत्करलें तर तुह्मी सर्वरूप व्हाल.”

लहानपणीं पुष्कळांनीं आणि तें ऐकलें असेल, कीं, कांहीं मुलें डोळे झांकून आंधळीं बनून उलटीं चालतात. हें पाहून त्यांच्या आया त्यांनां मारतात आणि रागें भरून सांगतात, कीं, "मनांत शुभेच्छा धरा, आंधळ्याचं सोंग घेतलं असतां तुह्मी आंधळे होऊन जाणार नाहीं ?"

"**कृष्ण कृष्ण मै करती थी, तो मै ही कृष्ण हो गई**" असें जें ह्मटलें आहे, तें अगदीं खरें आहे.

आतां आपण पाहिलें, कीं, मनुष्य आंधळा ह्मटल्यानें आंधळा, प्रधानकीचें ध्यान केलें असतां प्रधान, लार्ड मेअरचा ध्यास केला असतां लार्ड मेअर होऊन जातो; परंतु स्वतः आपणास साहाय्य करण्याकरितां किंवा आपलें कर्तव्य करण्याकरितां आमच्या अंगीं विचाराची पवित्रता, मोठी हिंमत, शुभ संस्कार, पवित्रभाव आणि 'सर्व कांहीं मला करतां येईल' असा आत्मविश्वास, अमर्याद महत्त्वाकांक्षा आणि धैर्य हे गुण असले पाहिजेत.

"माझ्या मस्तकावर संकटांचे शेंकडों डोंगर जरी ठेवले तरी माझ्या भिंवईच्या कोपऱ्याला कपाळावरची आंठीसुद्धां दिसणार नाहीं !"

"कदाचित् ध्रुव नक्षत्र आपल्या जागेपासून ढळल्यास ढळेल, वाऱ्याच्या आघातासरशीं हिमालय देखील ढांसळून पडेल, समुद्रहि काजव्याच्या शेंपटानें जळून जाईल आणि सूर्य देखील क्षितिजाच्या वर येतां येतां कोसळून पडेल, परंतु तेजस्वी मनुष्याचें सामर्थ्य कमी होणार नाहीं आणि चुकून देखील त्याच्या चेहऱ्यावर चिंतेची छाया येणार नाहीं !"

मोठी हिम्मत आणि उदात्त विचार याचा अर्थ असा समजावयाचा नाहीं, कीं, आपण मोठे तिस्मारखान आहों व दुसरे ह्मणजे कांहींच नाहींत. सद्गुणी व श्रेष्ठ व्हावयाचें असल्यास दुसऱ्यांचे सद्गुण व मोठेपण मनांत वागविलें पाहिजे. भगवान् बुद्ध ह्मणत असत कीं, '**कोणी मनुष्य जशी भावना धरील तसा तो होईल.**' त्यांच्यापाशीं दोन गृहस्थ आले. एकानें विचारलें, कीं, "महाराज, माझ्या सोबत्याला पुढील जन्मीं कोणती गति प्राप्त होईल ? हा तर नेहमीं मनामध्यें कुत्र्याचा विचार बाळगीत असतो आणि कुत्र्याप्रमाणें कर्म करीत असतो; पुढल्या जन्मीं हा कुत्रा नाहीं का होणार ?"

दुसरा पहिल्याविषयीं ह्मणतो, कीं, "ह्ली· काम्सोबती सर्वतोपरी बोका आहे· पुढल्या जन्मीं हा बोका नाहीं का होणार ?"

महात्मा बुद्ध ह्मणाले "बाबांनों ! जसे तुमचे संस्कार असतील त्याप्रमाणें तुह्मांला फळ मिळेल. मात्र तुह्मी हा सिद्धांत उलटा लावीत आहां· तो तुला बोका ह्मणतो, तूं त्याला कुत्रा ह्मणतोस. परंतु विचार करा, कीं, जो गृहस्थ आपल्या सोबत्याला कुत्रा लेखतो त्यानें आपल्या मनानें कुत्र्याचा स्वभाव पसंत केला आहे· तो स्वतःच असल्या विचारानें कुत्र्याचे संस्कार धारण करीत चालला आहे· आणि जेव्हां तो मनुष्य मरेल तेव्हां त्याच्या अंतःकरणांत कुत्रा राहिल्यामुळें तो अवश्यमेव कुत्रा होईल. त्याचप्रमाणें जो आपल्या मित्राला बोका समजतो, तो स्वतःच बोका होईल· "

या सिद्धांताचा नीट विचार करा. **जे दोष आपण दुसऱ्यास लावतों ते खात्रीनें आपल्या अंगीं येतात.** 'राम' सांगतो, कीं, जर आपलें हित आपणास साधावयाचें असेल, तर आत्मकृपेला हें हवें आहे, कीं, आपण दुसऱ्याचे दोष काढण्याचें सोडून देऊन आपण आपल्या मनोभूमींत प्रामाणिकपणा आणि सद्गुण यांखेरीज इतर कोणतेहि विचार येऊं देऊं नयेत· ज्याप्रमाणें एकाद्या घुमटामध्यें आपलाच आवाज घुमून परत येतो, त्याचप्रमाणें या आकाशरूपी घुमटाखालीं आपलेच विचार परत येऊन आपल्यावरच परिणाम करितात व आपणास आपली योग्यता कळवितात·

" जर माझें कोणी ऐकणार असेल, तर आकाशाखालीं (या जगामध्यें) वाईटाचा विचार केव्हांहि मनांत आणूं नका ! कारण, या आकाशाच्या घुमटामध्यें जसें बोलावें तसा ध्वनि ऐकूं येतो."

स्वतःचे विचार चांगले ठेवा· जगाला नाहक, उद्धट आणि वेडेंवांकडें ह्मणावयाचें ह्मणजे लहान मुलाप्रमाणें घुमटाला दोष लावण्यासारखें आहे. जर सर्व कांहीं, तुमच्या हातांत नसलेल्या नशीबानें होतें, तर शास्त्रांनीं विधिनिषेधात्मक वाक्यांनां जागाच दिली नसती. जर शास्त्राला हें समजलें असतें, कीं, तुमच्या हातांत कांहीं नाहीं, सर्व कांहीं नशीबच आहे,

तर शास्त्रानें "हें कर, आणि तें करूं नको," असें कां ह्मटलें असतें? आणि कोणत्या न्यायानें तुमच्यावर जबाबदारी लादली असती?

"नदीमध्यें तूं मला एका फळीला बांधून ठेविलें आहेस; आणि पुन्हा बजावतोस, कीं, खबरदार अस्तनी भिजविशील तर!"

तुमच्यामध्यें अशी शक्ति आहे, कीं, वाटेल तें तुह्मी करूं शकाल. आणि खरें पुसाल तर 'राम' सांगतो, कीं, "ईश्वरानें या जगाला निर्माण केलें आहे असें मीं मानिलें; परंतु खरें पाहतां मी सर्वांचा उत्पादक आहें. माझ्या 'कुन' (होऊं दे) या शब्दानें ईश्वर निर्माण झाला."

**पौरुषादृश्यते सिद्धिः पौरुषाद्धीमतां क्रमः।**
**दैवमाश्वासनामात्रं दुःखपेलवबुद्धिषु॥**

पौरुषानेंच सिद्धि प्राप्त होते, पराक्रमानेंच बुद्धिमान् लोकांचा व्यवहार चालतो; दुःखानें मृदु झालेल्या मनाला आश्वासन देण्यापुरतेंच दैव आहे.

**'जो स्वतःला मदत करण्यास तयार आहे त्याला मदत करण्यास परमेश्वर एका पायावर तयार असतो,'** हा एक ईश्वरी नियम आहे. जेव्हां मनुष्य पूर्ण अधिकारी होतो, तेव्हां त्याचे हक्क आपोआप त्याला शोधीत येतात, असा कधींहि न चुकणारा ईश्वरी नियम आहे. जर येथें विस्तव पेटत आहे, तर ऑक्सिजन वायु तिकडे खेंचून आणला जाईल. इंग्रजीमध्यें एक ह्मण आहे, कीं, 'पहिल्यानें लायक व्हा आणि मग इच्छा करा—First deserve and then desire.' 'राम' ह्मणतो 'तुह्मी लायक व्हा ह्मणजे इच्छा न करतांहि तुमच्या सर्व कामना पूर्ण होतील.'

"आपला स्वीकार होईल या उमेदीनें शेंकडों मतलब माझ्यासमोर हात जोडून उभे आहेत."

भिंतींत बसविण्यास योग्य असा दगड रस्त्यांत कसा असूं शकेल? जर तुह्मी पूर्ण अधिकारी झालां, तर तुमच्या योग्यतेची जागा आहे आणि

तुह्मी आहां! जागा शोधण्याच्या कामीं उगाच वेळ व्यर्थ दवडूं नका. आपण योग्य होण्याची काळजी बाळगा.

" वासनेच्या पायांत फोड तर होऊं द्या, मग कांटा आपोआप येऊन ग्रंथिभेद करील."

सूर्याकडे तोंड करून आपण चालूं लागलों तर छाया आपले मागून धावत येते, आणि जर छायेला धरण्याकरितां आपण धावूं लागलों तर छाया पुढें पुढें पळते.

" जेव्हां मी इच्छा करीत होतों, तेव्हां सर्व जग मजपासून दूर पळून जात असे. आतां जेव्हां मला सर्वांचा वीट आला आहे, तेव्हां तें आपोआप धावत माझ्यामागें येत आहे.

" मी सर्व वासनांच्या पलीकडे गेलों, तेव्हां माझें इष्ट मला लाधलें. या वासनांचाच मध्यें आडपडदा होता."

भिकाऱ्याला कोणीहि दूर दूर करितो आणि मोठ्या मनाच्या मनुष्याकडे सर्व वस्तु स्वतः पायां पडत येतात.

" आकाश, सूर्य आणि चंद्र यांच्यावर तूं इतका कां मोहून गेला आहेस? त्यांनां गरज असेल तर शंभरदा तुमचे पाय धुऊन ते तीर्थ पितील."

जपानमध्यें तीनतीनशें चारचारशें वर्षांचे गंधतरु आणि देवदारवृक्ष फक्त एक वीत उंच असलेले मीं पाहिले आहेत. आपण लक्ष्यांत आणा, कीं, देवदार वृक्ष किती उंच वाढतात ते. या झाडांची गगनमंडळापर्यंत होणारी वाढ कशी खुंटवितात याची जेव्हां मीं चौकशी केली तेव्हां लोकांनीं सांगितलें, कीं, आह्मीं या झाडांचीं पानें किंवा फांद्या बिलकूल तोडीत नाहीं; मात्र त्यांचीं मुळें कापीत राहतों, त्यांनां खालीं वाढूं देत नाहीं. आणि नियम असा आहे, कीं, मुळें खालीं वाढलीं नाहींत, तर झाड वर वाढणार नाहीं. वर किंवा खालीं (ह्मणजे बाहेर किंवा आंत) अशा तऱ्हेचा संबंध आहे, कीं, ज्यांनां उंच वाढावयाची इच्छा आहे (उन्नत व्हावयाचें आहे), जगामध्यें यशस्वी व्हावयाचें आहे, त्यांनीं खालीं ह्मणजे आंत—आपल्या आत्म्यामध्यें आपलीं पाळेंमुळें खोल पसरलीं पाहिजेत.

आंत पाळेंमुळें जर चांगलीं पसरलीं नाहींत तर वर वृक्षाला फळ येणार नाहीं. मुरलीमध्यें वारा जितका खोल जाईल तितका आवाज चढेल येतो.

[1]मन्सूरला कोणीं विचारिलें, कीं, प्रियकराच्या राहत्या आळीची वाट कोणती ? त्यानें सुळाकडे बोट दाखवून हृदय भग्न करून घेणें हीच वाट ह्मणून सांगितलें.

"जपमाळेंतील दोऱ्याप्रमाणें मीं माझें डोकें अनेक मण्यांमधून (संकटांमधून) नेलें आहे, आणि शेवटीं माझी माझ्याशींच—आत्म्याशीं गांठ पडली आणि मी तेथेंच स्वस्थ राहिलों."

आत्मकृपा ह्मणून 'राम' जें सांगत आहे त्याचा अर्थ कोणताहि अहंकार, आत्मश्लाघा, किंवा स्वार्थ नव्हे. त्याचा अर्थ आध्यात्मिक शिक्षण आणि अंतःकरणाचें औदार्य. हा आत्मकृपेचा मोठा भाग आहे. ह्मणजे चित्ताची शुद्धि इतकी करावयाची, कीं, आपला आत्मा देशाचा आत्मा झाला पाहिजे. सर्व जगाला प्रतिबिंबित करणारा आरसाच आपण झालें पाहिजे. सर्व देशाच्या गरजा आपल्याच गरजा आहेत असें वाटूं लागलें पाहिजे. आणि ज्यावेळीं लोकांच्या दृष्टीनें आपण सर्व हिंदुस्थानचें किंवा जगाचें काम करीत आहों असें दिसतें, तेव्हां स्वतःच्या दृष्टीला आपण फक्त आपलेंच काम करीत आहों, असें वाटलें पाहिजे. आणि आपल्या मनाला अशा रीतीनें उदार आणि विकसित (विस्तृत) केलें पाहिजे, कीं, आपलें मन सर्व लोकांचें मन झालें पाहिजे. आत्मोन्नति ही हळुहळू वाढणारी आहे. वाढ ही शिडीप्रमाणें आहे. लैलीची (प्रियेची) शिर तोडली असतां मजनूनच्या (प्रियकराच्या) शिरेंतून ज्याप्रमाणें रक्त वाहूं लागलें, त्याप्रमाणें सर्वांशीं आपलें तादात्म्य झालें पाहिजे.

"फुलाच्या पाकळीला थंड हवा झोंबली आणि तुझ्या डोळ्यामध्यें हिमबिंदु दिसूं लागले."

'राम' आत्मबल ह्मणून जें सांगतो तें दुसऱ्या शब्दांनीं सांगितलें असतां ईश्वरी बलहि आहे. आमचें जें खरें स्वरूप आहे तेंच सर्वांचें स्वरूप आहे, आणि वस्तुतः ईश्वराचें स्वरूपहि तेंच आहे.

---

१ अनहलक (अहं ब्रह्मास्मि) ह्मटल्याबद्दल या सुफी तत्वज्ञाला सुळावर चढविलें होतें.

"आह्मी या संसारामध्यें पडलेलें ईश्वरी तेज आहों किंवा या संसाररूपी ओढ्यामध्यें वहात असणारें अमृत आहों."

नामरूपें वस्तुतः क्षणिक छायेप्रमाणें आहेत. आपण नामरूपें आहों असें समजून जें काम केलें जातें तें अहंकार आणि स्वार्थ यांनीं प्रेरित होतें, आणि त्याचें पर्यवसान दुःख आणि निराशा यांत होतें. पण जें काम खऱ्या आत्मज्ञानानें किंवा विश्वात्मबुद्धीनें केलें जातें, तें अहंकारानें नव्हे तर ईश्वरी भावनेनें प्रेरित असल्यामुळें त्याचें पर्यवसान चिरकाल आनंद आणि यश यांत होतें. सर्व व्याख्यानांचें सार हें आहे, कीं, अहंकाराच्या ऐवजीं ईश्वरी दृष्टीनें सर्व संबंध तुह्मी पहा, आणि नामरूपामध्यें रुतून राहण्यापेक्षां ईश्वरी स्वरूपामध्यें घर करा.

"या पृथ्वीवरील घरापेक्षां पलीकडचें (ईश्वराचें) घर अधिक मजबूत आहे. तेव्हां आपली दौलत येथून उचल आणि तेथें नेऊन ठेव."

जो मनुष्य नामरूपाच्या पायावर आपले सर्व कारभार चालवितो, तो वाऱ्यावर किल्ला बांधण्याचाच प्रयत्न करतो. जिवंत मनुष्य तोच, कीं, जो संसारांतील भरभराट, ऐश्वर्य, दारिद्र्य, अपेश इत्यादिकांनां समुद्राच्या फेंसाप्रमाणें काल्पनिक मानतो आणि त्यांवर विश्वास ठेवीत नाहीं.

"छाया पर्वताची जरी असली, तरी ती हलकीच आहे."

डोळस तोच कीं, ज्याची दृष्टि या दृश्य जगाला भेदून नित्य व अनित्य वस्तूंचा निवाडा करून, लोकांच्या निंदास्तुतीला न जुमानतां एका तत्वावरच एकसारखी लागून राहते. ईश्वराव्यतिरिक्त कांहींहि नाहीं, ब्रह्म सत्य आहे व जगत् मिथ्या आहे. सुजाण तोच, कीं, जो दर घडीला पूर्ण सौंदर्य, आणि पूर्ण ऐश्वर्य ह्मणजे ईश्वरी तत्व पाहत राहून आश्चर्याचा नखशिखांत पुतळा बनून जातो.

"जर तुझ्या मनामध्यें मला पहावयाचें असेल तर आश्चर्यरूप होऊन मला पहा. ज्याच्या मनामध्यें माझें सौंदर्य भरलें, तो आश्चर्यानें दंग होऊन गेलाच."

झोंपेमध्यें खजिना मिळाला असतां त्या भरंवशावर जो अमीर होऊं पहातो, तो मूर्ख होय. त्याप्रमाणेंच या मायिक जगांतील वस्तूंवर विश्वास

ठेवून जो जगतो, तो नर जीवंत असूनहि मेला. श्रेष्ठ कर्तव्य, धर्म किंवा आत्मकृपा याचें सार हेंच आहे, कीं, "तूं इतका गोड आहेस, कीं, तूं असा राहतच नाहींस. आणि तुझ्यामध्यें द्वैताचा वास देखील रहात नाहीं."

हा क्षुद्र अहंकार इतका नाहींसा झाला पाहिजे, कीं, त्याची यत्किंचित् खूण देखील राहूं नये.

(१) 'तूंपणा राहूं नये हेंच पूर्णत्व होय.'

(२) 'हे मना! तूं आपला पडदा आपणच आहेस, तूं मधून उठून जा.'

(३) 'इहलोक किंवा परलोक याची मी पर्वा करित नाहीं. तुझ्या प्रेमाकरितां **मन्सूर**प्रमाणें सुळाशींच माझें काम आहे.'

अहंकार कायम ठेवून जे मोठे होतात ते [१]**फेरऊन** व [२]**नमरूद** या बादशहांसारखे होत.

अहंकाराला नाहींसा करणारा स्वतः 'अहंब्रह्मास्मि' ह्मणणारा ईश्वरच आहे.

कोणा एकाला दोरीच्या ठिकाणीं सापाचा भास झाला. त्याला साप आहे तर दोरी नाहीं, दोरी आहे तर साप नाहीं, एकच काय तें राहील. अहंकार आहे तर ईश्वर नाहीं आणि ईश्वर आहे तर अहंकार नाहीं.

"ईश्वरी कृपेचा तीर लागतांच जीवात्म्यानें आपलें घर (अहंकार) सोडलें. पाहुण्याची तब्बेत राखतां येईना ह्मणून पाहुण्याकरितां घरच सोडून दिलें."

"जोंपर्यंत डोकें फणीप्रमाणें करवताखालीं दिलें नाहीं, तोंपर्यंत प्रियेच्या[३] कचकलापापर्यंत पोहोंचतां येणार नाहीं."

जोंपर्यंत सुरम्याप्रमाणें दगडाखालीं आपलें चूर्ण झालें नाहीं तोंपर्यंत **प्रियेच्या** (ईश्वराच्या) नेत्रांपर्यंत आपणास पोहोंचतां येणार नाहीं. जर

---

१-२ यांपैकीं पहिला सदेह स्वर्गास जाण्याकरितां एक उंच राजवाडा बांधीत होता, आणि दुसऱ्यानें मरण टाळावें म्हणून एक कांचेचा राजवाडा बांधला होता; परंतु एक माशी त्याचे नाकांत गेली आणि एवढ्यानेंच तो मरण पावला.

३ प्रिया आणि प्रियकर–देव आणि भक्त यांच्या अशा उपमा सुफी ग्रंथांत विशेष आढळतात, त्यांपैकींच ह्या असाव्या.

ह्मणाल, कीं, डोळ्यांपर्यंत नाहीं तर नाहीं, कानांपर्यंत तरी कोणत्याहि रीतीनें जातां येईल, तर जोंपर्यंत स्वार्थ दूर होणार नाहीं, अहंकार मरणार नाहीं, मीपणा सांडणार नाहीं, तोंपर्यंत **प्रियेच्या** कानांपर्यंत पोहोंचतां येणार नाहीं. कारण, कानांत असतें मोतीं, आणि त्याची स्थिति पहा.

" जोंपर्यंत मोत्याप्रमाणें तारेनें विंधलें जात नाहीं तोंपर्यंत प्रियेच्या कानांपर्यंत मुळीं पोहोंचतां यावयाचें नाहीं."

" जोंपर्यंत तुझ्या मातीचें कुंभार भांडें बनवीत नाहीं तोंपर्यंत **प्रियेच्या** लाल ओंठापर्यंत जाणें शक्य नाहीं."

"मेल्यानंतर माझ्या मातीचा प्याला केला जाईल तेव्हां त्या प्याल्याच्या मातींत मिसळून मी **प्रियेच्या** ओंठाचें यथेच्छ चुंबन घेईन."

वरील वेंच्यांमध्यें डोळे, कान, ओंठ वगैरेच्या गोष्टींवरून असें समजूं नये, कीं, परमेश्वराला डोळे, कान, नाक वगैरे अवयव आहेत. याचा मतलब असा आहे, कीं, एका प्रियेला खुष करण्याकरितां कानाला सुस्वर गाणें किंवा राग ऐकवितात, किंवा नेत्रांला सुंदर रूप दाखवितात, किंवा नाकाला सुंदर फुलें सुवासाकरितां देतात. कोणी एका प्रकारच्या कांहीं उपायांनीं आपल्या प्रियेला खुष करूं शकतात, तर दुसरे अन्य उपायांनीं खुष करूं शकतात; परंतु असा कोणताहि उपाय नाहीं, कीं, ज्यामध्यें या बाह्य अहंकाराच्या नाशाशिवाय काम पार पडूं शकेल. कोणी वैष्णव होऊन परमेश्वराला पूजतात, कोणी शैव होऊन परमेश्वराला भजतात, कोणी मुसलमान होऊन त्याचें पूजन करितात, तर कोणी ख्रिस्ती होऊन त्याची उपासना करितात; परंतु वैष्णव, शैव, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे कोणीहि असो, परमेश्वराचें दर्शन तेव्हांच होईल, कीं, जेव्हां सर्व स्वार्थी संपत्तीचा नाश होईल.

जर तुह्मी ह्मणाल, कीं, केश, डोळे, कान, ओंठ यांपर्यंत नाहीं तर नाहीं, निदान परमेश्वराच्या हातापर्यंत तरी आह्मीं पोहोंचूं, तर

"जोंपर्यंत लेखणीप्रमाणें सुरीखालीं आपलें डोकें कलम करून घेतलें नाहीं, तोंपर्यंत तर **प्रियेच्या** अंगुलीच्या अग्रापर्यंत पोहोंचतां यावयाचें नाहीं."

आणि जर ह्मणाल, कीं, सर्वांत नीच जागीं राहणें आपणास पसंत आहे, तर **प्रियेच्या** पायापर्यंत कसें पोहोंचतां येईल?

"जोंपर्यंत मेंदीप्रमाणें दगडाखालीं आपण वांटले जात नाहीं, तोंपर्यंत **प्रियेच्या** तळव्यापर्यंत केव्हांहि पोहोंचतां यावयाचें नाहीं."

"खरोखर, फुलाप्रमाणें झाडाच्या फांदीपासून आपण तोडले गेलों नाहीं तर **प्रियेपर्यंत** कोणत्याहि उपायानें जाऊं शकणार नाहीं."

मुरलीला विचारिलें "हे मुरली! हें काय आश्चर्य आहे, कीं, ज्याच्या भृकुटि–भंगानें मोठमोठे सम्राट् भयभीत होतात, **भीष्म**, **अर्जुन**, दुर्योधन इत्यादि महाराजाधिराज ज्याच्या चरणस्पर्शाची स्पृहा करितात, ज्याचे चरणरज राजे महाराजे मस्तकावर धारण करितात आणि चंद्रवदन गौरांग ललना ज्याचें स्मितवदन पाहण्याकरितां उत्सुक असतात. असा तो मुरलीमनोहर **कृष्ण** मोठ्या प्रेमानें आणि गोडीनें तुझें वारंवार आपण होऊन चुंबन घेतो! एवढीशी वेळूची नळी पण तूं भगवान **कृष्णा**-वर काय मोहनी घातली आहेस! तुझ्यामध्यें ही करामत कोठून आली?"

मुरलीनें उत्तर दिलें "स्वार्थ, अहंकार यांनां नखशिखांत दूर करून मी आंतून खुली, मोकळी झाल्यें आहें. याचा परिणाम असा झाला आहे, कीं, **श्रीकृष्ण** स्वतः होऊन मला चुंबन देत आहे. ज्याच्या चरणाचें चुंबन घेण्याची लोक इच्छा करितात तो मोठ्या आवडीनें माझें चुंबन घेतो. माझ्यांतून मनोहारी संगीत कां निघणार नाहीं? माझ्यामध्यें 'रामा'चा दम ( श्वास ) आहे आणि माझा सुरेल ( गोड ) आवाज त्याचा (रामाचा) स्वर आहे."

"मुरलीप्रमाणें नखशिखांत खुले ( मोकळे, मुक्त ) व्हा. नाहीं तर **प्रियेच्या** आरक्त अधरांचें चुंबन घेणें सुलभ नाहीं."

महात्मे लोक मोह टाकून परलोकीं अमरत्व मिळवितात.

**'धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवंति।'**

---

# CRITICISM & UNIVERSAL LOVE.

## टीका आणि विश्वव्यापी प्रेम.

ज्या ज्या वेळीं एकादी नवीन चळवळ हिंदुस्थानांत सुरू होते त्या त्या वेळीं पक्षाभिमानानें प्रेरित होऊन लोक त्या चळवळीच्या पुरस्कर्त्याच्या स्वभावाची वाईट बाजू तेवढीच लोकांच्या नजरेसमोर आणतात, व अशा योगानें कोणत्याहि उद्यम–कलिकेला उमलूंच देत नाहींत! परंतु अव्यंग व निर्दोष असा कोण आहे? स्वामी विवेकानंद खाद्यपेयासंबंधानें विधिनिषेध बाळगीत नसत. या गोष्टीचें बरेंच स्तोम माजवून कैक लोक त्यांचे उदात्त आणि कल्याणकारक विचार आणि त्यांचीं स्वतंत्र मतें यांकडे दुर्लक्ष्य करितात. त्याचप्रमाणें काशीच्या कृष्णानंद स्वामींवर त्यांचेकडून कधींहि न झालेलें गर्ह्य वर्तन वळेंच लादलें गेल्यामुळें, ते कोणतेंहि महत्त्वाचें कार्य करण्यास असमर्थ झाले. साधारण धर्मसभा व धर्ममहोत्सवाच्या सभा हाणून पाडण्याचे प्रयत्न चालू आहेत. कारण एवढेंच, कीं, या कामीं पुढाकार घेणाराच्या अंगीं ह्मणे बरेच दोष दिसतात. घोड्यावरून स्वारी खालीं आली असतांना मोतद्दारावर रागावणें हें शेंदाड शिपायाचें विचित्र तर्कशास्त्र होय! परवां एक गवळ्याचा पोर हातांतून दुधाच्या चर्व्या घरीं घेऊन जात असतां 'रामा'च्या दृष्टीस पडला. अकस्मात् त्याच्या हातून एक चर्वी निसटून खालीं पडली. त्यामुळें एकदम क्रोधाविष्ट होऊन बाकीच्याहि चर्व्या त्यानें रस्त्यांत भिरकावून दिल्या! परस्परांशीं वागतांना लोकहि असेंच करितात. एकाद्या विवक्षित गोष्टींत आपल्या मित्राचा क्षुद्र दोष पाहतांच त्याच्या चांगल्या गुणांविषयीं सर्व आदर एकदम टाकून देण्याची प्रवृत्ति आपल्यामध्यें केवढी तरी असते!

उदकस्थितिशास्त्रामध्यें ( Hydro-Statics ) आत्यंतिक दाब (शक्ति) व प्रगट दाब (Total and resultant pressure) याविषयीं विवेचन केलें आहे. एकाद्या पदार्थावर आत्यंतिक दाब अगणित असूं शकेल; पण प्रगट दाब कांहींच असूं शकणार नाहीं. हिंदुस्थानामधील अगणित शक्ति परस्परविरुद्ध असल्यामुळें त्यांतून कांहींच प्रगट सामर्थ्य निष्पन्न होत नाहीं. किती शोचनीय स्थिति ही! कारण काय? तर प्रत्येकजण आपल्या देशबंधूच्या–व्यवसायबंधूच्या दोषांकडेच सर्व लक्ष्य देत असतो! यामुळें एकीची तर शक्यता नाहीं, परंतु ह्या संशयोद्भूत दोषैकदृष्टीमुळेंच समाजांतील दौर्जन्य (पिशुनता) वाढण्यास मदत होते. 'चोर चोर' ह्मणून एकाद्याचा पिच्छाच पुरविला तर तो खरोखरीच चोरी करूं लागेल, हें निर्विवाद आहे!

परस्परांस साधारण असा मार्ग नाहीं काय? आपल्या बंधूंमध्यें प्रशंसनीय असे कांहींच गुण नाहींत काय? हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पंथांमध्यें एकी करण्यास समर्थ असा कोणताच स्नेहरज्जु नाहीं काय? पवित्रता अगर अपवित्रता यांच्या नांवाखालीं ईश्वराचे स्वयंनियोजित गुप्त हेर बनून, देशकार्य करणाऱ्या एकाद्या सद्गृहस्थाच्या खासगी वर्तनाची चिकित्सा करण्याचा आह्मांला काय अधिकार आहे? आपल्या खाजगी वर्तनाबद्दल ज्याचा तो परमेश्वरापुढें जाब देईल. मध्यें पंचाईत करणारे आह्मी कोण? दुसऱ्याच्या वर्तनाचा विचार करण्यामध्यें आह्मी आपली जी शक्ति निरर्थक दवडतों, तेवढी शक्ति आपलें स्वतःचें वर्तन उच्चतम बनविण्याकडे खर्च केल्यास किती उत्तम होईल! बाह्य निग्रहानें मनुष्याची नीतिमत्ता यत्किंचित् तरी वाढेल काय? रूढीस अनुसरून असलेली वागणूक व मान्यता मिळविण्याकरितां ठेविलेलं वर्तन, यांनां शुद्ध ह्मणतां येईल काय? हें मनाचें पावित्र्य आहे असें समजूं नका, तो दुबळेपणा आहे! कांटे असतात ह्मणून गुलाबाचें फूल कोणी टाकीत नाहीं! हलवाई कोंडाभाकरी खाऊन रहात असेल, ह्मणून त्याच्या हातची मेवामिठाई खाऊं नये कीं काय? 'ज्याचा आपण स्वीकार (सेवन) करितों त्यानें आपण दूषित होत नाहीं; पण जें बाहेर देतों त्यानें मात्र आपण दूषित होतों?' स्वामी विवेकानंदांनीं कांहीं खाद्य-

पेयाचा स्वीकार केला ह्मणून आमचें काय बिघडलें? जोंपर्यंत त्यांच्यापासून उदात्ततत्वें आपणांस मिळताहेत तोंपर्यंत ते कशाचा स्वीकार करतात हें पाहणें नलगे! उपदेशक-व्यक्तीकडे लक्ष्य न देतां त्याच्या उपदेशाच्या व मतांच्या गुणावगुणांवरूनच त्यांचा स्वीकार केला पाहिजे. भूमितीच्या तत्वांनां युक्लीडच्या व्यक्तीशीं काय करावयाचें आहे? चित्रकार कुरूप आहे ह्मणून त्यानें काढलेल्या सुंदर चित्रांचा आपण अव्हेर करावयाचा काय? सर फ्रान्सिस बेकन हा लांच घेत असे ह्मणून त्याचें अनुमितिशास्त्र त्याज्य आहे काय? ह्या विसाव्या शतकांत तरी, उपदेश व उपदेशक यांच्या साहचर्याचा घोंटाळा न करितां विवेकबुद्धि आपण जागृत ठेविली पाहिजे. कर्दमयुक्त मलिन तळ्यांत उगवलें ह्मणून एकादें सुंदर कमल आपण टाकून देऊं नये.

हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे कचरा फेंकून देणें, मृत प्राण्यांच्या अस्थींनां स्पर्श करण्यास कचरणें, घ्राणेंद्रियानें ठरविलेलें आरोग्यशास्त्र (Nose-hygiene) वाढविणें, एकंदरींत अमंगल व टाकाऊ समजलेल्या वस्तूंची अवहेलना करणें, हें होय. याच गलिच्छ व हलक्या मानलेल्या वस्तूंचा योग्य रीतीनें उपयोग करण्यानेंच यूरोप व इतर सुधारलेले देश मोठे झाले आहेत. घाणेरड्या खतापासूनच उत्तम फुलांच्या बागा तयार होत नाहींत काय? अमेरिका व यूरोप येथील लोखंडाच्या व इतर कारखान्यांत यःकश्चित् कोळसा व धूर यांचा योग्य रीतीनें उपयोग करून त्यापासून प्रचंड शक्ति उत्पन्न करितात.

क्षुद्र मर्कटांची अजिंक्य सेना तयार करण्यांतच रामाचें खरें कौशल्य दिसून येतें. शुद्ध आणि सात्विक जनांशीं कोणाचें पटणार नाहीं? **पण दीन आणि पतित अशांनांसुद्धां खऱ्या कळकळीनें व मातृप्रेमानें जो कोणी समदृष्टीनें जवळ करितो, तोच खरा उदारधी महात्मा होय!**

कायिक, मानसिक व आत्मिक अवनति करणाऱ्या चुलीकडील धर्माच्या (Kitchen religion) क्षुद्र दुर्दिनामध्यें **आत्मरूपी सवित्याला**

ग्रासून टाकण्याच्या खटपटींत आह्मीं आयुष्य व्यर्थ दवडूं नये! ज्या धर्मामध्यें अक्षर, अविनाशी व विभु असा आत्मा यवनाच्या हातच्या अमेध्य अन्नानें भ्रष्ट होतो तो **चुल्लिकाधर्म** खरोखरीच अनुकंपनीय होय! जीर्ण झालेल्या जातिरूपी वस्त्रांच्या आंत काय आहे तें कृपा करून नीट पहा! तुह्मी कोण आहां? अक्षर, अविनाशी, अव्यय असा जो विश्वात्मा तोच तुमचा आत्मा आहे! सर्व आत्म्यांचें तात्विक ऐक्य दृष्टीआड केल्यामुळें या जगांतील सर्व मायिक अनर्थ ओढवतो.

दिशा चुकलेले व उतावळे देशभक्त आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या व बांधवांच्या खाजगी वर्तनांवर तुटून पडण्यामध्यें वरवरचा फेंस मात्र नाहींसा करण्याची खटपट करितात; परंतु या फेंसाचें खरें कारण--मूलभूत असमता, तिच्याकडे कोणीच लक्ष्य देत नाहीं.

पतितांचा उद्धार करणारे तुह्मी कोण? तुह्मी आधीं स्वतः तरलां आहां काय? जीवितांचें साफल्य करून घ्यावयाचें असल्यास आपल्या जीविता-वर पाणी सोडावें लागतें, हें तुह्मांला ठाऊक तरी आहे काय? असें तुह्मीं आपल्या जीवितावर पाणी सोडलें आहे काय? किंवा असें पाणी सोडण्यास तुह्मी तयार तरी आहां काय? तेवढें सामर्थ्य किंवा हिम्मत तुमच्यामध्यें आहे काय? बोला! तेवढी छाती किंवा तयारी असेल तर उठा व दीन-जनोद्धारक व्हा.

भगवान् बुद्ध एका गणिकेचा पाहुणचार नेहमीं घेत असत. बोलूनचालून अकुलीन अशा मेरी मगडेलीन बाईचा सहवास करण्यास येशू ख्रिस्तास कांहींच दिक्कत वाटली नाहीं. अरेरे! हा नीच थोरपणा कधीं नाहींसा होईल? **जोंपर्यंत आह्मी परस्परांचे दोषच पहात आहों तोंपर्यंत देशामध्यें प्रेम व ऐक्य वसणार नाहीं**. लहानथोर अशा सर्व मुलांमध्यें समान सौंदर्य पाहणाऱ्या आईच्या अंतःकरणाप्रमाणें आपलें अंतःकरण बनविणें हेंच जीवितसाफल्याचें सार होय. खरें शिक्षण ह्मणजे अखिल विश्वाकडे देवाच्या--सम--दृष्टीनें पहावयास शिकणें, हें होय.

**वाढ ही क्रमाक्रमानें होते.** ज्याप्रमाणें प्रत्येकाला शैशव, बालपण व यौवन इत्यादि अवस्थांतून गेलेंच पाहिजे, त्याप्रमाणेंच नैतिक, आध्यात्मिक

शैशव, बालपण इत्यादि अवस्थांतून जाणें अवश्य आहे. पतित मानले जाणारे लोक नीतिक्षेत्रांतील शिशु आहेत. प्रत्येक अर्भकामध्यें एक विशिष्ट सौंदर्य नाहीं काय? तुह्मी ज्याला चुकीनें पतित समजतां त्यांचा वास्तविक उदय झालेला नसतो. तुह्मी ज्याप्रमाणें एके काळीं नवशिके होतां त्याप्रमाणें विश्वविद्यालयाचे तेहि नवशिके विद्यार्थी आहेत.

कांहीं लोक विश्वव्यापी प्रेमाविषयीं पुष्कळ वडवड करितात; परंतु आपल्या आश्रितांच्या स्वभावांतील दोषांवरच पूर्ण नजर ठेवितात आणि ही असंबद्धता लपविण्यास 'पापाचा तिरस्कार करूनहि पाप्यांवर प्रेम करितां येतें,' या वाक्याचें घोडें पुढें ढकलतात; परंतु बावांनों! जोंपर्यंत तुह्मांला एकाद्या वस्तूंतील व्यंगें दिसतात तोंपर्यंत त्यावर तुमचें प्रेम कधींहि बसावयाचें नाहीं! **प्रेम याचा अर्थच मुळीं सौंदर्यनिरीक्षण असा आहे!**

अंधाराशीं झगडल्यानें का तो नाहींसा होणार आहे? अंधेऱ्या खोलींत चोहोंबाजूंनीं धोंडे फेंकिले, मारे सोट्याचे तडाखे दिले, तावदानें फोडिलीं, टेबलें हापटलीं, दौत सांडली, व एकसारखें शिव्याशाप देत सुटलें तर अशानें अंधार नाहींसा होईल काय? दिवा आंत आणा, मग अंधार कोठें आहे? त्याचप्रमाणें निषेधात्मक व उत्साहभंग व नाउमेद करणाऱ्या टीकात्मक प्रकारानें इष्टसिद्धि होणार नाहीं. विधेयात्मक, उत्साहवर्धक, आशाजनक, प्रेमळ, उत्तेजक अशी मनाची वृत्ति असणें हेंच अवश्य आहे. मोऱ्यांतील सर्व घाण रस्त्यावर आणली तर त्यापासून कांहीं हित होईल काय? कधींहि नाहीं! तद्वतच, दुसऱ्याच्या दोषांवर करडी नजर ठेवण्यानें कांहीं फायदा होणार नाहीं. शांतता व सदिच्छा यांचा निर्मल प्रवाह त्या मोऱ्यांतून (समाजांतून) वाहूं द्या, ह्मणजे सर्व घाण (दोष) आपोआप धुऊन जाईल. असें सांगतात, कीं, एकदा अकबर बादशहानें एक रेघ काढली व बिरबलास सांगितलें, कीं, ही न कापतां किंवा न पुसतां आंखुड करून दे. बिरबलानें बादशहाच्या रेघेजवळ समांतर अशी व तीहून अंमळ लांब अशी दुसरी रेषा काढिली, त्याबरोबर बादशहाची ओळ आपोआप आंखुड झाली! मोठी रेघ काढण्यांतच खरें शहाणपण आहे! बिरबलानें बादशहास आपली रेघ आंखुड झाल्याचें ज्याप्रमाणें पटवून दिलें,

त्याप्रमाणें लोकांचें वर्तन जसें असावें असें आपणास वाटतें तसें त्यांनां अंतःकरणापासून वाटूं लावणें, हीच उत्तम टीका होय. कुरकुर करणें ह्मणजे तुळस ही पिंपळ अगर वड कां नाहीं, असें ह्मणण्यासारखें आहे! प्रत्येकांतील सौंदर्य आपण ओळखावें. वाईटावर तोंड सोडण्यापेक्षां चांगल्याचे गोडवे गावे. आयुष्यांतील सर्व तऱ्हेच्या द्राक्षांपासून मी मधुर द्राक्षारसच काढतों.

टीकाकार भाई! तुमच्यावर माझें प्रेम आहे, पण तुह्मी ज्यांच्यावर टीका करितां त्यांच्यावरहि माझें तितकेंच प्रेम आहे व त्यांच्याविषयीं आपल्याइतकाच आदर मला वाटतो.

## कलह.

जीवनकलहांत विजयी कोण होतें?

प्रेम!

ज्या समाजांतील व्यक्तींमध्यें अंतःकरणें एकवटतात, विचार जुळतात व हात प्रेमपूर्वक साहाय्य करण्यास पुढें सरसावतात असा समाज अल्पसंख्याक जरी असला तरी जीवनकलहांत तो परस्परांशीं विरुद्ध असलेल्या क्रोडों लोकांवर विजय मिळवितो.

कलह तीन प्रकारचा आहे. (१) विषमाशीं, (२) समाशीं, (३) सृष्टीविरुद्ध.

मत्सर, ईर्ष्या व पक्षाभिमान यांनीं प्रेरित होऊन समानाशीं कलह करण्यांत स्वसामर्थ्याचा अपव्यय करण्यापेक्षां समानाशीं संधि (ऐक्य) केला तर विषमाशीं होणाऱ्या कलहांत विजय हा ठेविलेलाच.

'सर्व तऱ्हेचा जुलूम दयेंतूनच उद्भवतो,' हें ह्मणणें अक्षरशः खरें आहे.

विषमाचें सुद्धां जेव्हां प्रेम वाटूं लागतें तेव्हां सृष्टीविरुद्ध कलहांत जय व सिद्धि मिळतातच; आणि पंचमहाभूतें सहजच हस्तगत होतात. आणि निसर्गाशीं कलह ह्मणजे 'मी सर्वनियामक प्रभु आहे' या तत्वाची जड सृष्टीमध्यें ओळख पटणें होय.

## जगामध्यें गुणदोषविवेचनाची पद्धति इतकी सर्वसाधारण कां आहे?

टीका करण्याची प्रवृत्ति आपण होऊन दुसऱ्याची आगळीक काढण्यासारखी दिसते खरी, परंतु बहुधा ती स्वसंरक्षणार्थ असते. एकादी रीत

अगर चाल टाकावयाची असल्यास, तिचे सर्व दुष्परिणाम व्यक्त करणारी झणझणीत टीका अवश्य आहे. जेव्हां ती खोड आपणास दुसऱ्यांमध्यें आढळते तेव्हां संसर्गभयानें आपण साहजिकपणें त्यांची संगत टाकतों. नवीन संवय लागणें किंवा नवीन दृष्टीनें पहाणें, ह्मणजे जुन्या संवयीचा नाश होणें होय. आणि जोंपर्यंत जगांत सुधारणेस कांहीं वाव आहे तोंपर्यंत तुलना व टीका या गोष्टी राहणारच; त्यांचा त्याग करणें इष्ट नाहीं व शक्यहि नाहीं. **पण टीकेमधून व्यक्तिविषयक गोष्टी आणणें हें विष काढून टाकलें पाहिजे.** स्वतःमध्यें व लोकांमध्यें पाप उत्पन्न करणारा क्षुद्र 'मीपणा' आपण झुगारून देऊं. व अशा रीतीनें दुःखातीत होऊन ज्याप्रमाणें एकादा रसायनशास्त्रवेत्ता अगर वनस्पतिशास्त्रवेत्ता आपण निरीक्षण करीत असलेल्या रासायनिक द्रव्यांमध्यें व वनस्पतींमध्यें गुरफटून जाण्याची यत्किंचित् भीति न बाळगतां सारासारविचारानें, मार्मिकपणानें व सूक्ष्म दृष्टीनें त्यांचें परीक्षण करितो, अथवा ज्याप्रमाणें भगवान **सूर्यनारायण** निवडुंग व फुलझाडें, उकिरडें व उद्यानें, नरनारी, पशुपक्षी, कृमिकीटक व आकाशांतील मेघ या सर्वांवर प्रकाश पाडूनहि आपण साक्षीरूपानें असतो, त्याप्रमाणें सर्व मनुष्यें व घडणाऱ्या गोष्टी यांचेकडे तात्विक शांतीच्या व शास्त्रीय औदासीन्याच्या दृष्टीनें—समदृष्टीनें आपणास पहातां येईल.

प्लेगापासून बचाव करून घेण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे आरोग्य-शास्त्राच्या नियमांप्रमाणें वागणें, हा होय. 'आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं, व बांधवांशीं प्रेमानें वागावें,' हा जो आध्यात्मिक (पारमार्थिक) आरोग्य-शास्त्राचा नियम आहे, त्याप्रमाणें वागणें ह्याच उपायानें परकीय राजकारणा-पासून ( Foreign Politics ) आपला बचाव होणें शक्य आहे.

योग्य त्याग करतां आल्यास भाग्यवान् होणें हें दुर्दैवी होण्याइतकेंच सुलभ आहे. 'यज्ञापासून दुःखनिवृत्ति होते' हें तत्व पुरातनकालीं जितकें सत्य होतें, तितकेंच तें आजहि आहे. **मात्र निरपराधी प्राण्याचा बळी दिल्यानें स्वर्ग मिळणार नसून प्रेमरूपी अग्निकुंडांत पक्षा-भिमान, जात्यभिमान, मत्सर इत्यादिकांचें हवन केल्यानेंच तो ( स्वर्ग ) येथेंच मिळणार आहे!**

## टीकेचा विषय झालेल्या मनुष्यास उद्देशून.

विषमता काढून टाकून समता प्रस्थापित करणें, हा टीकेचा उपयोग आहे. ज्याप्रमाणें बागेंतील रोपझाडें अधिक सुंदर उगवण्यास माळ्यास त्यांची छाटाछाट अवश्य करावी लागते, त्याचप्रमाणें आह्मां मनुष्यांना सर्वांग सुंदर बनविण्यास टीका ही ईश्वरानें योजिलेली छाटाछाट आहे. टीकेच्या कातरीमध्यें सांपडलें असतां आपल्या अंतःकरणांत काय चाललें असतें, तें नीट पहा. अशा वेळीं क्षुद्र मनोवृत्तींनीं वाहून जाण्याचा तुमचा कल असलाच पाहिजे, आणि ह्मणूनच टीका हा इषारा आहे. एकाद्या लहानशा होडींत बसून ठिकठिकाणीं खडक असलेल्या वांकड्यातिकड्या खाडींतून प्रवाहावरोबर एकाद्या अज्ञात समुद्राकडे वहात जाणारा मनुष्य या बिकट परिस्थितीमुळेंच सावध राहतो. त्याचें होडकें खडकावर आपटतांच त्याला धडपड करावी लागते. या धक्क्याचा जर कांहीं उपयोग नसता तर त्यानें तिकडे लक्ष्यहि दिलें नसतें. **ज्याला आपण दुःख समजतों तें वास्तविक भयसूचक निशाण असतें.** सचेतन प्राण्यांनां सन्मार्गावर आणण्यास अशा चोदना अवश्य आहेत.

मित्रानें अगर शत्रूनें केलेली झणझणीत टीका, ही, जागृत होऊन परमात्मरूप—स्वस्वरूप पाहण्यासाठीं तुह्मांला पडलेलें दुष्ट स्वप्न होय. तुह्मी जागे झालां ह्मणजे स्वप्न कोठें आहे? स्वप्न नाहींच! **प्रेमतत्वानुरूप आपण आपलें वर्तन ठेविलें ह्मणजे नाशाचें पर्यवसान तत्काळ खऱ्या लाभांत होतें.** गरीब बिचाऱ्या *सिंड्रेलाचा जोडा हरवला खरा; परंतु तिच्या निष्कपट वर्तनामुळें तिला तो तर परत मिळालाच, पण त्याबरोबर राज्ञीपदहि लाभलें.

विश्वाशीं तादात्म्य पावल्यावर दुर्जन आपल्या वाटेस जाणार नाहींत. घरांत प्रकाश नसेल तेव्हांच चोर घरांत शिरतात. जो पुढारी होण्यास योग्य आहे तो 'आपले मदतनीस मूर्ख आहेत, आपले अनुयायी बेईमानी आहेत, लोक कृतघ्न आहेत, समाजाला खरी पारख नाहीं,' अशा तऱ्हेची

* 'ग्रीम्सच्या अद्भुत गोष्टीं'तील ही एक नायिका आहे.

कुरकुर कधींहि करणार नाहीं. या सर्व गोष्टी आयुष्याच्या खेळांतील डाव आहेत. निराश होऊन हार न जातां त्यावर तोड काढणें यांतच खरें कर्तृत्व व सामर्थ्य दिसून येतें. अनवश्यक तेढ (घांसाघांशी), आणि निष्काळजी-पणानें केलेली मनाची झीज या दोन गोष्टी टाळल्या असतां, जगामध्यें कोणती गोष्ट सुसाध्य होणार नाहीं ?

कैकयुगें मला, फशीं पाडोनियां । सख्या प्रेमराया! ठकवीलें ॥ १ ॥
शत्रु मित्रामागें क्षण तूं लपसी । निंदास्तुतीपाशीं क्षणें गुप्त ॥ २ ॥
सुखामाजी तैसा गर्वांमाजी गुप्त । श्रमीं दुःखीं लुप्त होसी सख्या ॥ ३ ॥
दृष्टीआड होसी निर्वाणींच्या वेळीं । लाभ हानी काळीं विस्मृत तूं ॥ ४ ॥
सख्या प्रेमा मज युगाचीं तीं युगें । झोंके मायायोगें देसी किती ॥ ५ ॥
सुखदुःखामाजी चेंगरुनी जातां । आघात सोशीतां हर्ष खेद ॥ ६ ॥
दैवी रसायन–क्रियाचि हे होय । विद्युच्छक्ति दिव्य तैसी भासे ॥ ७ ॥
शुद्धीकरणाचा प्रयोग अद्भूत । आसक्ति तोडीत पृथक्करण ॥ ८ ॥
प्रेम द्वेष मोह संसक्ति विरक्ति । अशुद्ध हे माती प्रेमाचीच ॥ ९ ॥
यापासोनी निघे हृदयांतूनि मम । दिव्य ‘रेडियम’ वैभवाचा ॥ १० ॥
अहो वदूं काई अद्भुत वर्तलें । नवलचि झालें एकाएकीं ॥ ११ ॥
हृदय ‘रेडियम’ सोडीतसे तूर्ण । दिव्य ‘क्ष’ किरण सर्व भागीं ॥ १२ ॥
सर्व भागीं येई पारदर्शकत्व । पदार्थांसी सर्व अलौकिक ॥ १३ ॥
आत्मसूर्याचे ते किरण अद्भुत । जडाचिया आंत प्रवेशती ॥ १४ ॥
व्याजोक्ति कठीणें आधारा स्खलना । मित्रशत्रुगणा देयघेवी ॥ १५ ॥
तुह्मीं ही जी भिंत लपावया केली । घन न उरली अतःपर ॥ १६ ॥
गुप्त जें ठेविलें रहस्य तें बोला । आपुलें मजला सर्व कांहीं ॥ १७ ॥
आत्मा ‘रेडियम’ मम चिंतामणी । जाळीतसे झणीं आज्यासम ॥ १८ ॥
फोडी पेटी द्वार मंजूषा कपाट । ममत्वाचा हाट तोही लुटे ॥ १९ ॥
शुद्ध सत्यरूप मम ‘रेडियम’ । आत्मा अनुपम सर्वभक्ष ॥ २० ॥

## शुद्ध दृष्टि.

मुलें प्रत्येक वस्तूवर मनुष्यपणाचा आरोप करितात. आकाशांत गडगडूं लागलें ह्मणजे ढगाच्या पलीकडे एकाद्या रागावलेल्या बागुलबोवाचीच ती आरोळी असली पाहिजे, असें तीं मानितात. तसेंच कांहीं 'वयोवृद्ध मुलें' ज्यांच्याज्यांच्याशीं आपला संबंध येईल त्या सर्वांवर वाईट स्वभावाचा आरोप करितात. वास्तविक पहातां, जरा कांहीं बिघडलें असतां, **प्रेमतत्वानुरूप** आपलें वर्तन सुधारण्याच्या ऐवजीं, परिस्थितीलाच दोष देणें ह्मणजे टेलिफोनमधून एकाद्या दूरच्या मित्राकडून दुष्ट वार्ता कानीं आल्याबद्दल टेलिफोनचें यंत्रच फोडून टाकण्यासारखें आहे !

आस्ट्रेलियन रानटी लोकांची अशी एक समजूत आहे, कीं, कांहीं मंत्र जपण्यानें किंवा दुसऱ्या कांहीं अशाच प्रकारानें आपणास पाऊस पाडतां येतो. या पाऊस पाडण्याच्या विधीला 'मेल्का' असें ते लोक ह्मणतात. एक प्रख्यात गृहस्थ लिहितो, कीं, "आह्मी प्रवास करीत असतां, जर भयंकर तुफानानें आह्मांला गांठिलें, तर आमच्याबरोबर असणारे रानटी लोक, तो (तुफानाचा) पाऊस पाडणाऱ्या दुसऱ्या रानटी लोकांवर नेहमीं रागावत असत."

या आस्ट्रेलियन रानटी लोकांमध्यें जें गाढ अज्ञान आढळतें, तेंच आपल्या बांधवांच्या दोषांवर नेहमीं दांतओंठ खाणाऱ्या सुशिक्षित मनुष्यांत आढळतें. पाऊस पडतो याचें कारण सृष्टिक्रमच तसा आहे. फुल फुलतें याचें कारणहि तोच सृष्टिक्रम होय. *जुडासला समजलें नसेल, परंतु दगा होण्यापूर्वीं त्यानें ख्रिस्तास जो प्रणिपात केला त्यामध्यें देखील प्रेमतत्व ओतप्रोत भरलें होतें. त्याच्या त्या वरकरणी प्रणिपातानंतर घडलेला प्रकार जर घडून आला नसता, तर एव्हांना ख्रिस्ताची आठवण तरी राहिली असती काय ? आपली माफी मागणाऱ्या बंधूंनां उदारधी जोसेफ ह्मणतो "तुह्मीं मला विहिरींत टाकलें नाहीं, तर ईजिप्तमध्यें माझा

---

* ख्रिस्ताच्या बारा शिष्यांपैकीं एक. यानें शेवटीं फितूर होऊन ख्रिस्तास दगा दिला.

जयजयकार करण्यास प्रेमसागर ईश्वराला माझ्या बंधूंशिवाय दुसरें अधिक उत्तम साधन मिळालें नाहीं. ''

जें कांहीं हातीं धरावें तें इतकें चंचल, क्षणभंगुर व नाशवंत दिसतें, कीं, मला कशालाहि स्थिरता आणतां येत नाहीं. मग मीं टीका करावी कशावर? वीज चमकली असतां एकादी भरधाव जाणारी आगगाडी, किंवा पळणारा ढग, हीं निश्चल आहेत असा भास होतो; पण विचाराअंतीं वस्तुस्थिति निराळीच आहे, असें समजतें. तद्वतच, लोक सर्व वस्तु मायेच्या चंचल प्रकाशांत पहातात व त्यावरच आपली स्थिरता, ममत्व व व्यक्तित्व इत्यादि कल्पना ठरवितात. यालाच व्यावहारिक ज्ञान असें ह्मणतात. सर्व वस्तूंकडे शाश्वत, सत्य व आत्म्याचें विभुत्व यांच्या दिव्य दृष्टीनें पहा, ह्मणजे तुम्हांला शाश्वत शांति लाधेल.

मानवी वाद–रणें व्यर्थ होत. वाद करून आपले मतभेद नाहींसे करण्याच्या खटपटींत दुही, निराशा व असंतोष मात्र उत्पन्न होतात. कारण काय? तर इमारत बांधण्यापूर्वीं पायाच नीट घातलेला नसतो. **प्रथम लोकांचें अंतःकरण काबीज करा, नंतर त्यांनां बुद्धिवाद सांगा.** जेथें बुद्धि देखील निराशेनें हात टेंकते, तेथें प्रेम यशस्वी होण्याचा संभव असतो. इसापनीतिकथेंतील वाटसरूचें कांबळें वायूला हरण करितां येईना, पण सूर्यानें त्याला तें आपोआप टाकावयास लाविलें !

मतैक्य होण्याची लोकांनां फाजील काळजी लागून राहिली आहे; पण आत्म्यांचें ऐक्य होण्याची ते वाटच पहात नाहींत. सलोखा याचा अर्थच असा आहे, कीं, वरवर दिसणारे भेद व निरनिराळे मनोविकार यांनां न जुमानतां एकत्र होणें. हें प्रेमानेंच साधतें. सर्वांचीं अंतःकरणें उमगल्याशिवाय सर्वांचें यथार्थज्ञान होणार नाहीं. विशाल बुद्धीपेक्षां सहृदयताच आपलीशी करा. प्रेमानें जर निर्बंध मोडला तर तो मोडला असें न होतां उलट तत्वसिद्धीच होते. प्रेमाखेरीज इतरानें निर्बंध (कायदा) मोडला तर मात्र तो वेडेपणा व बंड होतें. **प्रेम हाच काय तो ईश्वरी कायदा आहे.** बाकी इतर कायदे ह्मणजे पद्धतशीर लुटारुपणा होय. प्रेमलाच तेवढा कायदा

मोडण्याचा अधिकार आहे. प्रेमदत्त संपत्ति वाळगणें ईश्वरी न्यायाला अनुसरून आहे; परंतु हक्कानें संपत्ति वाळगणें हें गैर व बेकायदेशीर आहे.

हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनों ! आजपर्यंत तुह्मीं निषेधात्मक टीका व भंडावून सोडणारा गिल्ला केलात; परंतु स्थिति न सुधारतां ती उलट दिवसें-दिवस बिघडत चालली आहे. आतां तरी आपण योग्य मार्गानें जाऊन पाहूं. एकानें गाय मारली ह्मणून दुसऱ्यानें वांसरूं मारल्यास मूळच्या काळ्यावर आणखी एक काळें पुट चढेल, शुभ्रपणा येणार नाहीं ! एक पोक्त गृहस्थ, एका लहान मुलानें आपला अपमान केला ह्मणून त्याच्या श्रीमुखांत भडकवण्यास सरसावले आणि ह्मणतात "मूर्खा ! तूं असा कसा उद्धटपणानें वागतोस ?"

मुलानें उत्तर दिलें "अहो, मीं खोडी केली याचें कारण तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें मी मूर्ख आहें. आतां आपण शहाणे आहांत, तेव्हां शहाण्याप्रमाणें माझ्याशीं वागा, ह्मणजे झालें."

विजेनें भरलेला एकादा पदार्थ दुसऱ्या पदार्थाला न चिकटतां त्याच्या संनिध आला असतां प्रवर्तनक्रियेनें ( Induction ) दुसऱ्या पदार्थांत विषम विद्युत् उत्पन्न करतो. संयोगानें मात्र सम विद्युत् उत्पन्न होते. जात्यभिमान व वर्णाभिमान यांचे कांचेचे पडदे जोंपर्यंत अंतःकरणें एकवटूं देणार नाहींत, तोंपर्यंत बुद्धिवाद आणि तर्कशास्त्र यांच्या साहाय्यानें ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे अपायकारक व भयावह सान्निध्यांत येणें होय. याचा परिणाम आपल्या इष्ट गोष्टींच्या विरुद्ध होतो. **प्रथम प्रेम केल्यावांचून कोणाहि मनुष्याची आपणांस यथार्थ ओळख होणार नाहीं.**

जेथें बुद्धि देखील निराशेनें हात टेंकते तेथें प्रेम यशस्वी होण्याचा संभव असतो.

धर्म, पंथ, सांप्रदाय यांनां लोक एकाद्या मंतरलेल्या ताईताप्रमाणें गळ्यांत धारण करितात; पुष्कळ तऱ्हेचे गुण आणि प्रभाव त्यांमध्यें

आहेत असें ते समजतात; परंतु जें कांहीं थोडें आह्मांला प्राप्त होतें तें या मंत्रानें नव्हे, तर अन्य कारणानें होतें. आपण आपलें मनुष्यत्व अशा धर्मवेडांतून सोडवून मुक्त करूं या. या नामरूपांच्या खेळण्यांशीं किती दिवस तुह्मी खेळत राहणार ?

खरोखर, आपले मनाचे झालेले ग्रह, सर्व वित्त, लोभ आणि मोह हीं सर्व तुह्मांला एकामागून एक टाकून दिलीं पाहिजेत. तुमची सर्व मत्ता ( ममत्त्व—माया—माझेपणा ) तुमच्यावर सत्ता चालविते, व तुह्मांला पूर्णपणें घेरून टाकते. स्वतःस कुंपणांत कोंडून घेतल्याशिवाय तुह्मांला इतरांनां बाहेर वगळतां यावयाचें नाहीं. स्वानंदाचें गुह्य सकृद्दर्शनीं दुःखद वाटणाऱ्या सर्वस्वहरणांत आहे. ईश्वराचें 'हरि' हेंच नांव 'रामा'स आवडतें. 'हरि' याचा मूळ अर्थ 'हरण करणारा' असा आहे. अहाहा ! माझा प्रियसखा हरि ! येथें कोणी अशी शंका काढतील, कीं, जर मी माझ्या शत्रूवर प्रेम करून सर्वस्वी त्याच्या स्वाधीन झालों, तर तो मला खाऊन टाकील. 'राम' विचारतो, कीं हे मूढ धूर्ता ! तूं कधीं तरी तसा प्रयत्न करून पाहिला आहेस काय?

जीविताच्या सर्व दरवाजावर ' ओढा ' असें लिहिलेलें असतें; पण तुह्मी तें बरोबर न वाचतां 'ढकलूं ' लागतां. मग द्वार कसें उघडेल ? 'ढकलणें' ह्मणजे बुद्धिवाद करणें व ' ओढणें ' ह्मणजे प्रेमानें दुसऱ्यांचीं अंतःकरणें आपल्या स्वाधीन करून घेणें होय. **स्फूर्तीच्या मंदिरांत प्रवेश करण्यास अंतःकरण ( हृदय ) हें एकच द्वार आहे व डोकें ( बुद्धि ) हें मंदिरांतून बाहेर पडण्याचें द्वार आहे.** प्रेम स्फूर्ति उत्पन्न करतें, व बुद्धि विवरण करते. ज्याप्रमाणें आधीं देह, नंतर वस्त्रप्रावरणें, त्याचप्रमाणें आधीं मनोवृत्ति व नंतर विचार. **कोणत्याहि व्यक्तीच्या मनोवृत्ति वदला, ह्मणजे त्याच्या विचारपद्धतींत पूर्ण क्रांति होईल.**

जीवित ह्मणजे काय ? तर दुःखाची एक मालिकाच. खरोखर, वरवर पाहणारांनां जीवित दुःखपूर्णच आहे; परंतु खरोखर जे प्रेमासाठीं जगतात,

त्यांचा अनुभव निराळाच आहे. गप्पीदास, बाह्य स्वरूपाला भुलणारे, व बडेजावीचे निर्लज्ज गुलाम यांच्या संगतीइतकें हानिकारक दुसरें कांहीं नाहीं, हें खरें आहे; परंतु जेथें **प्रेमरूप भगवंताचा** वास आहे, तेथें असे भुरटे लोक उभे देखील राहूं शकत नाहींत. त्यांचा सहवास टाळण्याची आपणांस मुळींच गरज नाहीं. तुह्मांला त्यांची गरज असल्या-शिवाय हे आंगतुक जर तुमच्या वाटेस जाऊं शकतील तर कायद्यास कायदा ह्मणतां यावयाचें नाहीं व निसर्गदेवता कःपदार्थ ठरेल.

आपल्या **'नेरंगइष्क'**मध्यें पंजाबच्या गनिमतनें अझीझ नांवाच्या एका पंतोजीची गोष्ट सांगितली आहे. त्या गरीब बिचाऱ्या पंतोजीचें **शाहिद** नांवाच्या विद्यार्थ्यावर अतिशय प्रेम जडलें होतें. विद्यार्थ्यांच्या अक्षरांचें वळण तपासतांना हा मूर्ख बेटा आपल्या या नवशिक्या विद्या-र्थ्याच्या मोडक्यातोडक्या वळणाचा कित्ता पुढें ठेवी. शाबास ! योग्य आहे. प्रेमाच्या अभावानें दूषित झालेल्या दृष्टीलाच दोष दिसतात. दयानिधि परमेश्वरानें आपल्या हृदयामध्यें आपलें ठाण मांडलें, ह्मणजे अंधेराची रात्र नाहींशी होते. जणूं काय आकाशामध्यें दुसरा सूर्य उगवला आहे आणि दिवसामागून रात्र न येतां पुन्हा दिवसच चालू आहे.

## खरेपणा ( VERACITY ).

पावित्र्याच्या नांवाखालीं कित्येक लोक प्रेमावर तुटून पडतात. जणूं काय, प्रेमावांचून पावित्र्याला क्षणभर जगतां येईल. कांहीं लोक प्रेमातिरेकानें मरतात, तर कांहीं द्वेषास बळी पडतात. लोकांनां न आवडणाऱ्या परंतु खऱ्या प्रेमापेक्षां ढोंगीं पावित्र्यानें युक्त असा द्वेष बाळगणें हा अधिक भयंकर गुन्हा होय. जगामध्यें अपवित्रतेचे (पापाचे) बंदे गुलाम पुष्कळ आहेत, परंतु नीतीच्या नांवाखालीं आपली दुर्बलता झांकून टाकणारे पावित्र्याचे दास अधिक भयंकर आहेत. स्वतःशीं सचोटीनें व इमानानें वागा. आपल्या अनुभवाप्रमाणें आचरण ठेवा. **स्वानुभवाहून अधिक योग्य असा दुसरा गुरु नाहीं !**

स्वानुभवानुरूप वागणाऱ्या मनुष्याखेरीज इतर कोणीं शुद्ध अंतःकरणी होऊं शकणार नाहीं. पावित्र्याच्या क्षुद्र बाह्योपचाराला व स्त्रीजा द्वेषाला ( Sex-hatred ) भलतेंच महत्त्व देण्यानें खरी पवित्रता जी आत्मानुभूति तिला आपण मुकतों. वास्तविक अंगीं पौरुष नसतां संगराहित्याचें स्तोम माजविणें, ह्मणजे खरा मार्ग सोडून भलत्याच दिशेनें वहकणें होय.

समाजास कृत्रिम नीतिशास्त्र पढविणारे लोक जर स्वस्थ बसतील, तर लोक जसे हातपाय धुण्याचीं रीत आरोग्यदायक ह्मणून सहजासहजीं शिकतात, तसेंच शारीरिक व मानसिक पावित्र्य राखण्यासहि ते आपोआप शिकतील. विषयासक्तीबद्दल फाजील गिल्ला करणें ह्मणजे ईश्वरनिर्मित मानवी स्वभावांत नसलेली गोष्ट उत्पन्न करणें होय. उच्च विषयांमध्यें तुमचें मन गढून जाऊं द्या, ह्मणजे क्षुद्र विषयासक्तीविषयीं विचार करण्याससुद्धां तुह्मांला फावणार नाहीं.

विद्यार्थ्यांनां स्वतःच विचार करण्यास न शिकवितां त्यांच्यामध्यें मानसिक दारिद्र्य उत्पन्न करण्याच्या कांहीं शाळा असतात. कवाइती नीति शिकविल्यानें नैतिक दारिद्र्य उत्पन्न होतें. गरीब बिचाऱ्या मुलामुलींच्या मनावर विशिष्ट धर्मसमजुती लादल्यानें आध्यात्मिक दारिद्र्य उत्पन्न होतें. आध्यात्मिक दारिद्र्य व परधर्मासहिष्णुता ( धर्मवेड ) या एकाच रोगाच्या निष्क्रिय व कार्यशील ( Passive & active ) अशा दोन बाजू आहेत

सर्व नद्या समुद्रासच जाऊन मिळतात. त्याप्रमाणें प्रेमाचे सर्व प्रवाह त्या एका **प्रेमसागरास** जाऊन मिळतात. ईश्वराच्या हृदयांतून सौंदर्य उत्पन्न होतें. विष्णूच्या नाभीपासून हें सौंदर्यकमल उगवतें. ज्याला सौंदर्याची लालसा आहे, त्यानें तें क्षीरसागरांत शयन करणाऱ्या भगवंता-कडून प्राप्त करून घेतलें पाहिजे. खरोखर, सौंदर्य हें परमात्म्याचें निवासस्थान व आत्म्याचें जीवन आहे. सौंदर्याची अभिरुचि ज्याला नाहीं तो दगडधोंडे व कृष्णकारस्थानें अशालाच योग्य आहे; परंतु हें सौंदर्य कशांत आहे ? सतेज नयनकमलांत, आरक्त कपोलांत, कोकिळस्वरांत, सुंदर देखाव्यांत आणि ललितकलांत सौंदर्य आहे काय ? हो आहे; पण तें यांतच

संपलें, असें मात्र नाहीं ! वसंतमास सुरु होऊन आल्हाद देईपर्यंत ज्याला सबंध हिंवाळा वाट पहात बसावें लागतें, अशा मनुष्याची अभिरुचि शोचनीय होय. एकादा सुस्वर कानीं पडण्यास ज्याचे नाजूक कान वेसूरानें हजारदा विरस होऊन त्रस्त होतात, अशा गानाभिज्ञाची स्थितिहि अनुकंपनीय होय; व ज्यांचें सौख्य रमणीय देखावे, सुंदर उद्यानें, अनुकूल मित्रमंडळी, मधुर वचनें इत्यादि बाह्य वस्तूंवरच अवलंबून असतें, ते तर खरोखरीच दुर्दैवी होत.

खरा मुक्त तोच, कीं, ज्याच्या अंतःप्रकाशानें त्याच्या सभोंवतीं सौंदर्याचें—रमणीयतेचें तेज फांकतें, व ज्याच्यापासून केवळ दिव्य प्रेमाचे किरण सर्वत्र पसरतात. श्री चैतन्य महाप्रभूच्या सान्निध्यांत चोर व दारूबाज लोकांमधीलहि ईश्वरी अंश प्रगट होत असे.

पुराणपुरुष भगवान सूर्यनारायणाला आपल्या परिभ्रमणामध्यें प्रकाशावांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं.

मुक्तांच्या प्रेमसामर्थ्यानें रानटी पशूंचा देखील उद्धार होऊन त्यांच्यामधील प्रेमास पाझर फुटतो असें जें योगदर्शनसूत्रांत सांगितलें आहे, तें खोटें आहे काय ? आपल्या अनुभवास येणारें प्रेम हाच सर्व धर्मांत सांगितलेला स्वर्ग जर नव्हे, तर स्वर्ग ह्मणजे एक स्वप्नच होणार नाहीं काय ?

## पावित्र्य ह्मणजे काय ?

देहात्मभाव, इंद्रियासक्ति, एकदेशित्व याविषयींच्या क्षुद्र व आशामूलक कल्पनांनीं आपला आत्मा दूषित न करणें, यालाच पावित्र्य ह्मणतात. पूर्ण पावित्र्य ह्मणजे बाह्य गोष्टींचा आपल्या मनावर पगडा बसूं न देणें, हेंच होय. स्थितप्रज्ञ व भेदातीत होऊन रागद्वेष, मानापमान, दानोपादान इत्यादि द्वंद्वविरहित होणें, हेंच पावित्र्य व हाच योग होय. पवित्र अंतःकरणांनां मात्र सृष्टिसौंदर्य अनुभवितां येतें. कारण, ज्याप्रमाणें एकादी सुंदर तरुणी आरशांत आपलें सौंदर्य पाहून मुदित होते, त्याप्रमाणें सृष्टिसौंदर्य व रमणीय देखावे पाहून नामरूपात्मक प्रकृतिदर्पणांत आपलेंच स्वानंदसाम्राज्य प्रतिबिंबित झालेलें ओळखून शुद्धसत्व आनंद पावतात.

शुद्ध व पवित्र लोकांनां देखील तें प्रेम करितां येतें; पण तें प्रेम मनुष्याला गुरफटून टाकून खालीं न ओढतां उलट वरच नेतें. प्रेम–उन्नतिकारक प्रेम, अवनतिकारक मोह अगर प्रेमाचा दुबळा आभास नव्हे ! खरें पावित्र्य ह्मणजेच खरें प्रेम, आणि खरें प्रेम ह्मणजेच खरें पावित्र्य ! ज्याप्रमाणें केव्हां केव्हां आसक्तीलाच प्रेम समजतात, त्याप्रमाणें नैतिक दौर्बल्य हें कधीं कधीं पावित्र्याच्या नांवाखालीं मोडलें जातें.

कोणच्याहि वस्तूवर आसक्ति जडली ह्मणजे तिचा खरा उपभोग घेतां येत नाहीं. निसर्गदेवीच्या निष्कामभक्तालाच उद्यानशोभेचा पूर्ण आस्वाद घेतां येतो, आणि ज्याला त्या उद्यानाचा धनी समजतात त्याला आपला फुलबाग ह्मणजे एक कायमचा व्याप व त्रास होऊन बसतो. हें पावित्र्य अथवा प्रेम ( विश्वसंविति ) हेंच आह्मांला पाहिजे आहे. एवढें मिळालें, ह्मणजे इतर सर्व गोष्टी आपोआप चालून आल्याच पाहिजेत.

## हें कसें साध्य होतें ?

सांप्रतच्या स्थितीचा गौरव केल्यानें व वर्तमानकालाचें माहात्म्य जाण व ॥
आत्मसाक्षात्काराचा लाभ अनायासें होईल. तो दूर आहे असें सम
साक्षात्काराच्या मागें धावण्यानें तो मिळणार नाहीं. कोणत्याहि मु
आपले बाळपणाचे खेळ खेळल्यानेंच, पोरपणास साजेसें वर्तन केल्या न्न धा.
प्रौढपण प्राप्त होतें. माकडाप्रमाणें प्रौढांचें अनुकरण आधींच केल तुमच्या
तें ( प्रौढपण ) प्राप्त होणें शक्य नाहीं ! समकरी

## सौंदर्य ह्मणजे काय ?

म असें

तर त्याग, अहंकाराचा त्याग. खरोखर, आकुंचित व्यक्तित्व (मी टाकून दिल्यानें चिरंजीवित्व प्राप्त होतें. आप्पलपोटेपणानें, लो आणि स्वार्थानें सूर्याचे सर्व किरण शोषून घेतल्यानें, कोणताहि प काळवंडतो; पण तेंच उदारपणानें, निस्पृहतेनें, निष्कलंक मनानें तेच किरण शोषून न घेतां बाहेर दुसऱ्यास दिल्यानें पदार्थ शुभ्र व तेजस्वी होतात. सर्व आकर्षणाचें केंद्र असा देदीप्यमान सूर्यनारायण हा चोहोंबाजूंवर अव्याहत प्रकाश आणि उष्णता देतच असतो.

मुलें सर्वांना आवडतात याचें कारण काय? तर त्यांचें मन डबक्यांतील सांठलेल्या पाण्याप्रमाणें 'अहंपणांत'. कोंडलेलें नसतें. जेथें जेथें स्वार्थत्याग व निष्काम (अहेतुक) प्रेम हीं दिसून येतात, तेथें त्याविषयीं आपल्या मनांत आदर व श्रद्धा उत्पन्न होतात. कोणी झालें तरी प्रेमळ मनुष्यांवरच प्रेम करितो. धार्मिकचर्चा व तत्वज्ञान याविषयींच्या वादविवादांनो! तुह्मी सर्व चालते व्हा! तुमचें येथें कांहीं काम नाहीं! मला सर्व ठाऊक आहे. **सौंदर्य ह्मणजे प्रेम** आणि **प्रेम ह्मणजे सौंदर्य** आणि **या दोहोंचा अर्थ संन्यास.** इंग्लंडमधील संन्याशाच्या (**एडवर्ड कारपेंटरच्या**) शब्दांनीं सांगावयाचें असल्यास "स्वतःविषयीं विचार करण्याचें सर्वस्वी सोडून दिल्याशिवाय सौख्य मिळणार नाहीं. मात्र या कामीं कच्चेपणा अगदीं उपयोगी नाहीं. **क्षुद्र मीपणाचा एक खडा जरी उरला, तरी तो सौख्यपयोनिधि नासून टाकील.** हें काम कठीण नाहीं असें मी ह्मणत नाहीं; पण त्यावांचून दुसरा मार्ग नाहीं."

प्राण्या! प्रेमस्वरूपानें जगण्यांतच आयुष्याचें सार्थक आहे. अनेक बुद्ध, ा, संन्यासी इत्यादि पूर्वकालीन विभूतींच्या एकदेशीय उदाहरणांनीं वून वाहून जाऊं नको. मानवी इच्छेच्या—मग ती एकाच व्यक्तीची ासेना—शक्तीपुढें इतिहास पंगू पडतो. देश, काल, नियति यांनीं भिऊन नका. प्रेमस्वरूपानें रहा ह्मणजे सर्व नियम तुमच्याच तंत्रानें चालतील. ात्म्याच्या ऐक्याशीं (Inner harmony) तुमचें स्वैक्य होऊं द्या, काल तुमच्याबरोबर ताल धरील, तुमच्या अनुरोधानें चालेल.

ड्याळाचे कांटे किती तरी लहान; परंतु जगावर त्यांचा केवढा अंमल आहे! ह्या लहानशा कांट्यांच्या अंमलाखालीं रहावयास लावणें ळानें बांधलें जाणें) हें अमर मानवाला केवढें तरी शासन आहे! गति विचित्र खरी! सृष्टींतील ऐक्य व अद्वैत तत्व यांवर विश्वास न ठेविल्यानें लोकांची सर्वत्र त्रेधा उडत आहे. अरे नास्तिकांनो! इतरांच्या शरीरांतील आत्मा भिन्न आहे अशी शंका घेतां होयें? 'राम' कधींहि घड्याळ बाळगित नाहीं; पण त्याची वेळ कधींच चुकत नाहीं.

कालाला प्रेमस्फूर्तींच्या अनुसंधानानेंच वागलें पाहिजे. पवनचक्की योग्य रीतीनें उभारा, ह्मणजे चाऱ्ही दिशेनें येणारा वारा तिला साहाय्यकच होतो. त्याचप्रमाणें प्रकृति आपोआप तुह्मांला वश होईल. प्रेमरूप व्हा ह्मणजे सर्व सिद्धि वोळंगतील.

आमचे शिष्टाचार व आदरसत्कार पाहून देव गालांतल्या गालांत हंसत असतील. आमच्या दूरच्या आप्तइष्टांशीं इमानानें वागण्याच्या खटपटींत, परम आप्त जो स्वतःचा आत्मा त्याशीं बेइमानपणें आह्मी कितीतरी हास्यास्पद फसवेगिरी करितों. एक भिकारीण एका कुलीन स्त्रीच्या द्वारीं भिक्षा मागावयास आली; पण त्या बिचाऱ्या स्त्रीला त्या भिकारणीचेंच स्वातंत्र्य स्पृहणीय वाटलें. भिकारीण निघून गेल्यानंतर तिनें आपल्या नवऱ्याजवळ असा वहाणा केला, कीं, आपली आई मेली असें आतांच पत्र आलें आहे. सासुबाईंनीं कांहींतरी मालमत्ता आपल्याकरितां ठेविली असेल ह्मणून पतिराजानें तिला माहेरीं जाण्यास परवानगी दिली. बाईनें गाडींत बसून शेजारच्या गांवीं प्रयाण केलें. मग काय विचार व पिंजऱ्यांतून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणें ती रानावनांतून उल्हासानें भटकूं ला ॥ सारा दिवस याप्रमाणें तिनें विहार केला. एका शेतकऱ्याकडून जेवण व रात्र होतांच ती गवताच्या एका गंजीशेजारीं निजली. दिवशीं पहांटे उठून ती तशीच परिभ्रमण करूं लागली. इतक्यांत भीति न्न द्या. असा एक शब्द तिनें ऐकिला. पाहते तों काय ! आपलाच नवरा का तुमच्या भिकारणीबरोबर भटकत आला आहे ! तिच्याप्रमाणें त्यालाहि घरीं करम मकरी होऊन कंटाळा आला होता आणि ह्मणून त्यालाहि थोडीशी मोक म असें हवी होती. खोटेपणा ( faithlessness ) पदरीं येईल या भ परस्परांनां आपलें मन मोकळें करून सांगण्याचें धैर्य झालें नाहीं. दुस आणि खूष करण्याच्या सर्व खटपटी याच प्रकारच्या होत. स्वतःशीं इमा खरेपणानें वागा, ह्मणजे दिवसामागून रात्र येते हें जितकें निश्चित तितकेंच तुह्मांला दुसऱ्याला फसवितां येणें शक्य नाहीं, हेंहि निश्चित आहे. **आपले दोष लपवून ठेवण्याची प्रवृत्ति हीच सर्व पापांची जननी होय.** दुसऱ्याच्या सान्निध्याची आपणास अडचण वाटणें ह्मणजे

**खऱ्या देवाचा–अंतरात्म्याचा** द्रोह करणें होय. अंतरात्म्याशीं खरेपणानें वागल्यानेंच तुह्मी जगाला ज्ञानदीप–मार्गदर्शक व्हाल. **पूर्ण व उच्च तऱ्हेचा स्वार्थ ह्मणजे खरा पदार्थ होय.** वास्तविक पहातां ‘ परार्थ ’ हें नांवच चूक आहे. दुसऱ्यांवर आपण उपकार करितों अशी नेहमीं क्षुद्रभावना ठेवणें ह्मणजे आपल्या आत्म्याला विसरणें होय. सर्व जगाचें कल्याण करणारा असा गुरुत्वाकर्षणाचा सृष्टिनियम जेव्हां न्यूटननें शोधून काढला, तेव्हां तो खात्रीनें परार्थाचा विचार करीत नव्हता. खोटी भाषा वापरण्याचें आह्मीं टाकून दिलें पाहिजे. डाक्टर **जॉनसन** ह्मणतो "जर एकाद्या मुलानें एका खिडकींतून पाहून आपण दुसऱ्या खिडकींतून पाहिलें एवढें जरी बदलून सांगितलें, तरी त्या मुलाला चाबकाखालीं खरपूस चोप दिला पाहिजे ! "

## प्रेम अथवा कायदा.

ामा'स अनुमानाचे सिद्धान्त पुढें करावयाचे नाहींत. त्याला तीचें तर्कशास्त्र पाहिजे आहे. जेव्हां कोणी ह्मणतो "कायद्यानें असें ाची सुभा आहे," तेव्हां पक्कें समजा, कीं, त्या लुच्याला कांहीं घोटाळा याचा आहे ! जो प्रेमतत्त्वानुसार वागतो, तो कायद्याच्या आटोक्याबाहेर स्वतःच कायदा होतो. प्रेम हाच कायदेशीर कायदा आहे ! वानुसार वागणें ह्मणजे स्वतःशीं खरेपणानें वागणें होय. हूं जातां, माझा कायदा मीच आहें. दुसऱ्यानें मला कायदा घालून णजे कायद्याची व माझी फारकत करणें आहे. श्वासोच्छ्वास कर, ळ, उड्या मार, जीवंत रहा आणि वाढ, असा एकाद्या मुलाला घालून दिला पाहिजे काय ? त्या मुलाचें जीवनच त्याचा कायदा ाय ? एकाद्या मोकळ्या पक्ष्याप्रमाणें मूल सहज गात, हंसत आणि असतें; तेव्हां मध्येंच दुसरें कोणी येऊन त्याला गा किंवा बोल ह्मणून सांगतात. तें पोर एकदम सर्वच बंद करतें. गा ह्मणून सांगितल्यानें आपण व आपलें गाणें निराळीं आहों, अशी भावना त्या मुलाच्या मनांत येतांच त्याची पूर्वींची साहजिक मुद्रा पालटून जाते, त्याचा उल्हास

मावळून जातो, त्याला कसेंसेंच वाटूं लागतें. ज्याची वृत्ति स्वतंत्र असते, जो स्वतःशीं इमानानें वागतो, आणि जो आत्मसंतुष्ट असतो, त्याची आज्ञा जगांतील सर्व कायदे पाळतात. कारण, ते त्याच्याहून भिन्न नाहींत. तो कोणाचा द्वेष करीत नाहीं, कोणाला नाक मुरडत नाहीं व कोणचीहि गोष्ट टाळण्याचा प्रयत्न करीत नाहीं.

रोग ह्मणजे काय ? प्रेमाच्या अभावामुळें उत्पन्न झालेलें आकुंचन, छायेच्या नाचण्याला घाबरणें, ढवळ्या दिवसा पडलेल्या दुष्ट स्वप्नास घाबरून ओरडणें, हें होय. वस्तुतः घाबरण्याजोगें असें कांहींच नाहीं. सर्व बाजूंस, सर्व काळांत व सर्व देशांत एकच **परम तत्व** भरलेलें आहे. आणि तें तत्व माझाच **आत्मा** आहे. मग मीं भ्यावें तरी कोणाला ? दिवस व रात्र हीं दोन्हीं सारखींच. सूर्यप्रकाश जितका अवश्य, तितका दुर्दिन (storm )हि पण अवश्य आहे. पात्यास पातेंहि न लागतां कैक रात्री जरी काढल्या तरी दुसऱ्या दिवशीं 'रामा' चा चेहरा नेहमींप्रमाणें प्रफुल्लित असतो. कारण, थकवा जो येतो तो निद्रेच्या अभा... फारसा नव्हे, तर निद्रा येत नाहीं ह्मणून लागलेल्या तळमळीमुळेंच... प्राणप्रिय ईश्वराच्या भेटीसाठीं उत्कंठित होऊन केलेलीं जागरणें कि... सौख्यकारक असतात. जेव्हां शरीराला अन्नाची गरज असते... पक्कान्नें गोड लागतात, व जेव्हां अन्नावर वासना नसते तेव्हां उपन्नद्या. भोजनाप्रमाणें सुखदायक होतात. विरहाश्रूंचा पाऊस पडल्यावर आ...च्या पूर आलाच पाहिजे ! कारण, येथें **प्रेम** ही पर्जन्यदेवता आहे. उल्हा...मकरी उकळ्या फुटून त्याचे प्रवाह वाहूं लागतात, आणि यांपासून ... असें आनंद विरहाश्रूंपासून होणाऱ्या आनंदाइतकाच असतो. मग मीं ... कशाचा करावा ? जेथें सर्वच मी आहें, तेथें मीं कशापासून दूर ... आणि अहाहा ! केवढें हें समत्व ! किती हा आनंद !

जेव्हां ज्वर माझ्या भेटीस येतो तेव्हां मी मुळींच कुरकुरत नाहीं... मित्राप्रमाणें मी त्याचें स्वागत करितों, आणि यामुळें. अन्यरीतीनें केव्हांहि न समजणाऱ्या आध्यात्मिक तत्वांचा एकदम अंतःकरणांत प्रकाश पडतो. **ज्ञाननी** आरोग्य आहे, जागृतावस्था ही एक आरोग्याची स्थिति आहे, निद्रा

हा दुसरा प्रकार आहे. शांतीमध्यें एकप्रकारचें सुख आहे, व ज्वरानें अंगाची लाहि होण्यांतहि एक प्रकारची मौज आहे. देव आहे अशी नुसती श्रद्धा ठेवण्यांत खरा धर्म नसून **मांगल्यावर**—जें कांहीं घडतें तें सर्व हितकारक असतें या तत्वावर—श्रद्धा ठेवण्यांतच खरा धर्म आहे. तुफान होऊन केवढाहि जोराचा गडगडाट झाला, तरी तो सात्विक व निरोगी कानांनां गंधर्वगायनाप्रमाणें गोडच वाटतो.

मेघगर्जनेनें सर्वांनां जाहीर करा, कीं, जोंपर्यंत 'तूं अमुक केलेंच पाहिजे, किंवा अमुक करतां कामा नये,' अशा विधिनिषेधात्मक प्रभुसम्मित आज्ञा केल्या जातात, व जोंपर्यंत अशा बाह्य हुकुमावरून आमचें कर्तव्य ठरलें जातें, तोंपर्यंत खरें पावित्र्य अथवा आध्यात्मिक उन्नति यांनां वाव मिळणार नाहीं. आज्ञार्थी द्वितीय पुरुषाचा उपयोग केल्यानें संकुचित व्यक्तित्व नेहमीं आपल्यामध्यें जागृत राहतें, आणि जेथें जेथें आकुंचन आहे तेथें आनंद नाहीं, आवडनावड यांपासून सुटका नाहीं, [illegible] यांपासून मुक्ति नाहीं, चंचलता व मोह यांपासून मोकळीक नाहीं. [illegible] आकाशामध्यें—अवकाशामध्यें दुसऱ्या निरनिराळ्या पदार्थांनीं [illegible] अशा संकुचित देहाची कल्पना मनांत उरलेली आहे, [illegible] आपल्याला गुरुत्वाकर्षणास कसें चुकवितां येईल ? आकर्षण, [illegible]ण यांच्या नियमांच्या डोळ्यांत धूळ कशी टाकितां येईल ? [illegible] कसें फसवितां येईल आणि बाह्य वस्तूंच्या परिणामापासून कसें [illegible] राहतां येईल ? इंद्रियांचे व्यापार जरी निरनिराळे असले, तरी [illegible] मनुष्याची आपल्या देहापुरती ऐक्याची भावना असते. जसें [illegible]ी' पहातों, बोलतों, ऐकतों इत्यादि. त्याचप्रमाणें जो मुक्त असतो, [illegible]या सर्व जगाशीं ऐक्य वाटतें व तो विश्वात्मरूप होऊन रहातो. [illegible]त्याप्रमाणें एका देहामधील अन्नपचन, अवयवांची वाढ इत्यादि भिन्न क्रिया आपोआप चालतात, त्याप्रमाणें 'एहांस [illegible] विश्वदेहांत सर्व भेद आपोआप स्वतःची काळजी [illegible] [illegible]ाऱ्या आत्म्याच्या आनंत्याचा साक्षात्कार झाला असतां नद्या, [illegible]र्वत, सृष्टि, तारे इत्यादि

हे सर्व माझेच आहेत आणि प्रेमरूपानें मीच त्यांचा स्वामी आहें असा अनुभव आला असतां, आपलेवरील सर्व मोहांचा पगडा नाहींसा होतो.

भगवान सूर्यनारायण आकाशांत तळपत असतां, काजव्याला कितीसा प्रकाश पाडतां येईल ? जेव्हां सर्वच गोष्टी मला सुंदर दिसतात आणि जेव्हां तें सर्व सौंदर्य मीच आहें, तेव्हां मीं कशाच्या मागें लागावें ? सर्व मोहक वस्तूंशीं ज्याचें तादात्म्य झालें आहे, त्याला मोह पाडणारी अशी या अखिल जगांत कोणती वस्तु आहे ?

ईश्वराहून आपण भिन्न आहों असें मानणाऱ्या, अंतरात्म्याशीं आत्मघातकीपणानें दगाबाजी करणाऱ्या, स्वयंप्रकाशाला मायाजालामध्यें लपविणाऱ्या कृपण वंचकानें कोणतें पाप केलें नाहीं व तो करणार नाहीं ?

**बरीं वा वाईट कर्मैं शरीराचीं । तैशीं तीं मनाचीं पुण्यापुण्य ॥ १ ॥**
**कीर्ति अपकीर्ति किंवा निंदास्तुति । क्रीडेची आसक्ति कोणत्याही ॥ २ ॥**
**बाधिती न मला आनंदसागरा । नित्यनिर्विकारा सच्चिद्रूपा ॥ ३ ॥**
**कोणाचा मी कैसा मानूं उपकार । आनंदसागर एकला मी ॥ ४ ॥**
**ज्ञानामृतसमरस नभोपम । नित्यनिरूपम असतां मी ॥ ५ ॥**

## श्रम आणि प्रेम.

गरीब बिचाऱ्या मजुराला त्याच्या आत्म्याला पोषक असें कांहीं अन्न द्या. त्याला प्रेम द्या, ह्मणजे तो आपल्या देहाकरितां अन्नहि न मागतां तुमच्याकरितां श्रम करील. तुह्मी कामकऱ्यावर प्रेम करा, ह्मणजे कामकरी तुमच्या कामावर प्रेम करील. प्रेमानें प्रेरित झालेल्या कामाला श्रम असें ह्मणतां येईल काय ? नाहीं, ती एक करमणूकच आहे.

कला ह्मणजे काय ? अंगीकृत वस्तूंमधील सौंदर्य खुलविणें. या जगामध्यें कोठेंहि सौंदर्य खुलतें तें कशानें ? केवळ प्रेमानेंच.

श्रमावर प्रेमाची प्रभा पडली असतां उद्योग अभियुक्त होतो, आणि ललितकला उत्पन्न होतात. सांप्रतकाळीं हिंदुस्थानांत नांव घेण्याजोगी

अ.— उत्तरचा हा चरण अवधूतगीतेपैकीं आहे.

कल्पकता, कळाकुसरीचें काम, अथवा ललितकला कां आढळत नाहींत ? कारण एवढेंच, कीं, कारागिरांवर कोणी प्रेम करीत नाहीं. गरीब बिचाऱ्या कामकरी लोकांनां कोणाची सहानुभूति तर नाहींच; परंतु उलट त्यांनां त्यांच्या स्वतःच्या झोंपड्यांतूनहि हांकून लावण्यांत येत आहे.

**जेथें उद्योगाची अप्रतिष्ठा होते, तेथें अवनति आणि नाश हीं ठेविलेलींच,** आणि कलासुद्धां एक प्रकारचें जोखड काम होऊन बसतें; पण जेथें उद्योगाची मानमान्यता होते, तेथें जीवंतपणा ( चैतन्य ) आणि ज्ञान वास करितात, आणि कौशल्य वाढतें. हे **ईश्वरा!** आज अशी स्थिति यावी काय, कीं, 'प्रेम' शब्द उच्चारतांच त्या दिव्य ज्योतीची कल्पना न येतां आमच्या लोकांच्या मनांत मूढ विषयलालसेची कल्पना उभी रहावी ! प्रेमाविषयीं इतकी गैरसमजूत ! हाय हाय ! हे लोक भक्ति व उपासना यांबद्दल बऱ्याच वल्गना करितात; परंतु आचरणांत त्याचा अर्थ एवढाच होतो, कीं, मोठमोठ्यानें कांहीं संस्कृत स्तोत्रें व मंत्र ह्मणावयाचे; पण त्यांतील प्रेमभाव अनुभविण्याचें बाजूसच राहूं द्या, अर्थसुद्धां समजण्याची मारामार ! बंदुकीची दारूच नाहीं, मग या नुसत्या गोळ्या काय कामाच्या ? भक्तिरसानें ओथंबलेल्या **श्रीचैतन्यप्रभूच्या** अंतःकरणाच्या या केवळ खोट्या नकला होत.

देवळामध्यें उत्तम तालसुरांवर देशी भाषेंत ह्मटलेलीं पदें ऐकूं येतात. परंतु अरेरे ! त्यांत पावन करणारा प्रेमाश्रु एक तरी असावयाचा होता !

बिचाऱ्या हिंदवासियांनों ! 'मी पापी आहें, मी पतित आहें' असें नेहमीं स्वतःला ह्मणून घेऊन देवास ठकवून त्याची कृपा संपादितां येणार नाहीं ! **'यो यच्छ्रद्धः स एव सः**–जशी तुमची मति तशी तुमची गति !' कर्माची गति अमोघ आहे, आणि जर तुह्मी आपण पापी, पतित आहों अशीच प्रार्थना करीत राहाल, तर कर्म तुह्मांला खरोखरच तसें बनवील. ही कांहीं भक्ति नव्हे !

माझ्या गरीब बिचाऱ्या धनिकांनों ! उंच उंच संगमरवरी देवालयें आणि देवाच्या संगमरवरी दगडाच्या मूर्ति उभारल्यानें तुमच्या अंतःकर-

णाची तळमळ शमणार नाहीं. तुह्माला दुःख होत आहे हें मला पक्कें माहीत आहे. मानीपणामुळें तुह्मी हें कदाचित् कबूल करणार नाहीं. **देशांतील उपासमार काढणाऱ्या नारायणांची व काबाडकष्ट करणाऱ्या विष्णूंची पूजा करा !** गरीब हिंदी विद्यार्थ्यांनां उपयुक्त धंदे शिकण्याकरितां अमेरिकेस पाठवा, ह्मणजे ते शिकून हिंदुस्थानांत परत आल्यावर लोकांनां आपल्या पायावर उभें राहण्यास शिकवितील, व तेणेंकरून शेंकडों नव्हे हजारों उपाशी लोकांचे प्राण वांचतील.

***निझॅमीचें** ‘ लैली व मजनून ’ हें पुस्तक एका मनुष्यानें वाचल्यावर त्यांतील लैलीचें चित्र काढून घेऊन त्या चित्राचें तों चुंबन घेऊं लागला, व मोठ्या प्रेमानें त्या चित्राला आलिंगन देऊं लागला. कां ? तर ह्मणे लैलीवर माझें प्रेम जडलें आहे ! मूर्खा, मजनूनची प्रिया घेणें बरोबर नाहीं. मजनूनचें गाढ प्रेम तुझ्यामध्यें असेल ! परंतु तूं आपली स्वतःची निराळी जिवंत प्रिया पहा.

हिंदुस्थानांतील भक्तांनों ! **गोपी** आणि **चैतन्य** यांचा **प्रियकर** ( **श्रीकृष्ण** ) तुह्मी बळकाविण्यास तयार आहांत; परंतु **गोपी** व **गौरंग** ( चैतन्य ) यांचें शुद्ध व उत्कट प्रेम तुह्मांपैकीं कितीजणांमध्यें आहे ? **श्रीकृष्णास** दगडाच्या मूर्तींत न कोंडतां, आपल्या दिव्य प्रेमानें चांडाल, चोर, पतित व परकी या सर्वांमध्यें तुह्मी **त्यालाच** पहाल तेव्हां त्या प्रियकर **गोपालाचे** तुह्मी प्रियकर व्हाल.

भक्ति ह्मणजे रडणें, याचना करणें, अथवा दीनवृत्ति नव्हे ! ती एक प्रकारची अनिर्वचनीय समता, अप्रतिम लावण्य, कडकडीत वैराग्य होय. सर्व दृश्य पदार्थांमध्यें त्या **सर्वेश्वराला** पाहणें, ही भक्ति होय. जेथें जेथें दृष्टी पडेल तेथें तेथें आपला **आत्मा** पाहिला पाहिजे. सर्व वस्तुजात सौंदर्यघन आहे, आणि तें सौंदर्य मीच आहें, हें ओळखलें पाहिजे. **‘तत्त्वमसि तेंच तूं आहेस’** हीच भक्ति.

---

* एक सुफी कवि व ग्रंथकार.

## नमोऽस्तु.

आक्रोशाचे शब्द किंवा तनुक्लेश । पूर्वीं हृदयास झोंबति जे ॥ १ ॥
वाटती मजसि आतां ते मधुर । स्तुतीचें उत्तर जेवीं लागे ॥ २ ॥
वीणेच्या मंजुळ नादासम तेही । रमवीती पाहीं मज आतां ॥ ३ ॥
निंदका तूं येई, तस्करा तूं येईं । वाटमाऱ्या येईं झडकरि ॥ ४ ॥
भिऊं नको माझा आत्मा तोचि तूझा । तूझा तोचि माझा निःसंदेह ॥ ५ ॥
माझें ऐसें वाटे तूजलागीं जें जें । तें तें त्वां घेईंजे इष्ट जरी ॥ ६ ॥
एक्याचि घायें हें शरीर तूं मारीं । तुकडे वा करीं सावकाश ॥ ७ ॥
घेईं हें शरीर किंवा इच्छिसी तें । नामातें कीर्तीतें घेऊनी जा ॥ ८ ॥
घेऊनी जा त्वरें, निघें येथुनियां । परि फिरुनियां विलोकीसी ॥ ९ ॥
तरी मी अखंड आहें तैसा आहें । सख्या लवलाहें नमोऽस्तु ते ॥ १० ॥

महम्मदीयांनों ! तुह्मी वाटल्यास मला ठार करा; पण माझ्या हृदयांत तुमच्याविषयीं प्रेमाची ज्योत जळत आहे. ख्रिस्त्यांनों ! माझ्याविषयीं तुमचा गैरसमज असूं द्या, पण मी तुह्मांवर प्रेमच करीत राहणार. अंत्यजांनों व मातंगांनों ! तुमच्या त्या अमंगल रोगट झोंपड्यांत जरी कोणी पाय ठेवणार नाहीं, तरी 'रामा'ला तुह्मी आपल्याबरोबर असलेला पहाल.

दिखाऊ प्रेम, खोटी कळकळ आणि दांभिक प्रेमळपणा ही ईश्वराची एक अवहेलनाच आहे. प्रेमाची खरी ज्योत पाहिजे आहे; वासनारूपी धूमानें जरी ती आच्छादित असली तरी चालेल.

एकाद्या तरुणाच्या हृदयामध्यें पेटत असलेल्या **सत्यज्योती**वर शिष्टाचार, चाली, रीतिभाति, आपलें नांव होण्याची हांव, आणि लोकापवादाची भीति या सर्वांचें भुशाकोळशाप्रमाणें दडपण बसून ती ज्योत कोंडली जाऊन नाहींशी होऊं लागते. कारण, या सर्व दिखाऊपणाचें अंतःकरणावर मोठें ओझें पडतें. **सत्या !** तूंच मजजवळ ये. तूंच माझा सखा, माझा बांधव, माझा प्रियकर, माझा धनी, माझा स्वामी, तूंच मी.

नराधिप हो! कायद्यांनों व समाजांनों! देव तुमचें भलें करो. 'रामा'ला **सत्या**पासून ढळविण्याचें तुमच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. आपल्या धमक्या, लालुच व कोप हीं सर्व गुंडाळून ठेवा. आमचे राजाधिराज **सत्यदेव** महाराज हे तुमचे हजारों बादशहा, हजारों जुलमी राजे आणि लाखों स्वेच्छाचारी पृथ्वीपति या सर्वांहून प्रतापी आहेत.

पनामा रेल्वेविषयीं असें सांगतात, कीं, ती रेल्वे बांधतांना प्रत्येक सांध्यास एकेक मनुष्य प्राणास मुकला आहे. गोष्ट खरी असो वा खोटी असो, परंतु मानवी शिरांनीं अंथरलेल्या मार्गावरून **सत्येश्वराची** स्वारी गेलेली आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. **सत्यदेवाच्या** पदकमलाचा स्पर्श ज्या मानवी शिरांनां झाला, तीं खरोखर धन्य होत.

जेथें **सत्य** नाहीं तेथें **प्रेम** असूं शकणार नाहीं! **सत्यमहाराजाचा** मुख्य प्रधान **अमात्य प्रेम** आहे; किंवा हें नातें उलट असूं शकेल, (ह्मणजे **प्रेम** हा राजा व **सत्य** हा प्रधान). कदाचित् दोन्ही (**सत्य** व **प्रेम**) एकच आहेत.

*देव ह्मणतोः—

**अग्निज्वाला सुंदर। परि तीमध्यें वसे धूर।**
**ह्मणोनियां उज्वलतर। वर उदार देईन मी ॥ १ ॥**
**गंभीर खोल सुंदर। प्रेमपूर्ण असती नेत्र।**
**तेथील अश्रु मनोहर। परिमल उग्र पसरती ॥ २ ॥**
**भेटे जेथ तयांचें वीक्षण। तें स्थान होय नंदनवन।**
**विकास पावे दर्शन। देश काल भेदोनी ॥ ३ ॥**
**जेथें भेटती विमलाक्ष। मिळती जेथें प्रेमकटाक्ष।**
**तें स्थान होई दिव्य अक्ष। जयाभोंवतीं विश्व फिरे ॥ ४ ॥**

पर्वतावरील जलप्रवाहांनों! तुमची गर्जना चालूं द्या. सागरा! तूंहि गर्जना कर. मृत्यो! तूं आपला भयंकर जबडा पसर. अंधकारा! सर्व व्योम

---

* इमर्सनच्या इंग्रजी कवितेचें रूपांतर.

व्यापून टाक. परंतु माझ्या **प्रेमरूपा हृदयेश्वरा!** घनदाट अरण्यामध्यें, प्रचंड पर्वतांमध्यें, खोल सागरांमध्यें, भयानक विवरांमध्यें, सर्वांमध्यें तुझा संचार आहे. **सत्यमहाराज!** तुफान वारे आणि प्रचंड लाटा हे आपले शिकारीचे कुत्रे आहेत, आपण सनातन व्याध आहां.

संध्याकाळीं गॅलीलीच्या सरोवरांत **येशू** ख्रिस्तानें आपल्या शिष्यांना तुफानांमध्यें वल्हवीत धडपड करीत असतांना पाहिलें. कारण, वारा फार जोरानें व उलट वहात होता. परंतु प्रभु **येशूला** कांहींच खटपट करावी लागली नाहीं. ज्याला पाण्यावरून चालतां येत होतें त्यानें असल्या तुफानांत स्वस्थपणें कां निजूं नये? अहाहा! माझ्या **प्रेमसख्याचा** ताबा लाटा व वायु यांवर देखील आहे!

जपानमध्यें तीनशें वर्षांचे देवदार आणि गंधतरु वृक्ष यांची वाढ खुंटवून त्यांना कांद्याच्या पातींइतकीं ठेंगणीं करून ठेवितात. ते बाहेरची वाढ मारीत नाहींत तर आंतील मुळेंच कापून काढून जमिनीमध्यें त्यांना खोल जाऊं देत नाहींत. मुळें खोल न गेल्यामुळें वृक्षहि उंच वाढत नाहींत. कृत्रिम शिक्षकांनीं मनुष्यांची वाढ देखील अशीच खुजी केलेली आहे.

वेड्या नीतिशास्त्रविशारदांनों! धर्मवेड्या सैतानांनों! दूर व्हा! नवीन पिढीला आज्ञा करण्याला तुह्मांला कांहीं हक्क नाहीं! जर कोणाला कांहीं हक्क असेल तर तो सेवा करण्याचा आहे. प्रकृतीची गति जर अनिरुद्ध ठेवूं दिली, तर तिच्या हातून कधींहि चूक होणार नाहीं. ज्या निसर्गानें, ज्या ईश्वरानें अतिशय सूक्ष्म अशा जीवजंतूपासून दिव्य नरदेहापर्यंत जीवाची उत्क्रांति केली, त्याच्यावर विश्वास ठेवण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

मनुष्यापेक्षां गुरें व इतर प्राणी अधिक स्वच्छ असतात आणि ज्याला आपण मत्सरानें पशुवृत्ति ह्मणतों त्या विषयवासनेमध्येंहि अधिक नेमस्त असतात. याचें कारण काय? कारण उघड आहे, व तें हें कीं, 'अमुक कर' व 'अमुक करूं नको' यांची ब्याद त्यांच्यामागें नसते. वाढीचें पोषक वातावरण हुकूम व शक्ति नसून **प्रेम** आणि **सेवा** हेंच आहे.

फुलांची वाढ तुह्मांला कशी करतां येईल ? प्रेमानें एका बाईनें फुलांनां न मानणाऱ्या हवेमध्यें सुंदर फुलें तयार केलीं. "तुह्मांला असें कसें करतां आलें ?" असें तिला विचारतां "मी फक्त त्यांच्यावर प्रेम करूं लागलें तेव्हां साधनें आपोआप सुचलीं," असें तिनें उत्तर दिलें.

**प्रेमजलाचें सुखावह सिंचन हेंच खरें जीवन होय.** प्रेमाच्या योगानें कला अभियुक्त होतात आणि आमच्या श्रमांमध्यें सौंदर्य उद्भूत होतें.

प्रेमाचा आणि मोहाचा घोंटाळा करूं नका! तुमचीं बायकामुलें हीं तुमच्या प्रेमास कोंडणारीं कुंपणें न होतां तुमचें प्रेम सर्व विश्वावर पसरण्याचें केंद्र झालीं पाहिजेत. **जीन पाल रिचरनें** ह्मटलें आहे "माझें स्वतःपेक्षां कुटुंबावर अधिक प्रेम आहे; कुटुंबापेक्षां देशावर अधिक आहे; देशापेक्षां अखिल जगावर त्याहून अधिक आहे !"

**ल्युकॅस्टर** युद्धास जात असतां **लव्हलेसनें** काढलेले उद्गार ( थोडे बदलले असतां ) किती उदात्त होतात! "ज्या राष्ट्राकरितां तूं युद्धास जात आहेस त्या राष्ट्रावर माझें इतकें प्रेम नसतें तर तुजवर माझी एवढी प्रीति जडलीच नसती !"

सूर्य ज्याप्रमाणें प्रत्येक वस्तूचें विवर्धन करितो, त्याप्रमाणें शुद्ध प्रेम हें आत्म्याचा विकास करितें. मोह मात्र कडक थंडीप्रमाणें आत्म्याचा संकोच करून त्याला गोठून टाकितो.

**मोझेसच्या** पहिल्या आज्ञेचा अर्थ, "**प्रेमा**खेरीज इतर कोणताहि देव तुला असतां कामा नये," असाच आहे. प्रेमदेवाला लोभ किंवा मोह यांच्या मूर्तींनीं आपलें सिंहासन बळकाविलेलें खपत नाहीं.

आपलें एकुलतें एक मूल वारलें ह्मणून एक बाई फार शोक करूं लागली. 'रामा'नें विचारलें "एखाद्या शिद्याच्या मुलाला मांडीवर घेऊन आपल्या मुलाप्रमाणें त्याचे तुह्मी मुके घ्याल काय ? आहे का इतकी तयारी ?"

ती ह्मणाली "नाहीं."

"ह्मणूनच तर तुमचें मूल गमावलें !"

स्वर्गाचें द्वार उघडण्याची किल्ली सर्वांचा समावेश करणारें प्रेम हीच आहे; इतरांनां वगळणारा मोह नव्हे !

दुसऱ्याच्या कृतघ्नपणाबद्दल लोक नेहमीं कुरकुर करितात. पण खरें पहातां आपण जो कांहीं थोडा दुसऱ्यावर उपकार करितों तो सव्याज परत मिळण्याची हे मारवाडी धडपड करीत असतात. हे तक्रारी लोकांनों! जरा दमानें घ्या. ईश्वराला कांहीं एकच हात नाहीं. सर्व हस्त त्याचेच आहेत, सर्व नेत्र त्याचेच आहेत, व सर्व मनें हीं त्याचींच आहेत. तुमच्या व्यवहारामध्यें ज्या हातानें एकाद्यानें कांहीं घेतलें असेल त्याच हातानें तें तो परत देतो कीं नाहीं याकडे तुह्मी लक्ष्य देतां काय? तो एकादे वेळीं तुह्मांला दुसऱ्या हातानें देईल. त्यांत काय विघडलें? तुमचें गिऱ्हाईक हात नसून त्या हाताचा धनी हें आहे.

त्याचप्रमाणें वस्तुतः तुमचा व्यवहार ईश्वराशीं आहे; मित्र किंवा शत्रु भासणाऱ्या स्वरूपाशीं नाहीं. ईश्वर आपलें देणें देण्यांत कधींहि चुकत नाहीं. कोणचेंहि निष्काम कृत्य केलें असतां, त्याचें देवावर ऋण होतें. ज्या हातानें त्यानें तें घेतलें त्याच हातानें तो परत देईल असें मात्र नाहीं. पण दुसऱ्याच एकाद्याच्या हातून तुह्मांला तें सव्याज परत मिळेल.

चंचल नास्तिका! तूं व्यर्थ कां शिणतोस? या जगावर तुझ्या आत्म्याखेरीज दुसऱ्या कोणाचीहि सत्ता नाहीं.

मूर्तिपूजा ह्मणजे काय? मित्र शत्रु या नुसत्या भासमान स्वरूपांवर व्यक्तित्वाचा व अस्तित्वाचा इतका आरोप करावयाचा, कीं, त्यांतील अद्वैतरूपानें असणारा **परमात्मा** किंवा **चैतन्य** याचा पूर्ण विसर पडणें.

अरण्यें, चांगले देखावे, नद्या, सरोवरें, आणि हिरव्यागार टेंकड्या हीं पाहिलीं असतां आपल्यामध्यें स्फूर्ति उत्पन्न होते, मन प्रसन्न व पवित्र होतें, व आत्मा तल्लीन होऊन जातो. याचें कारण काय? तर या गोष्टींनीं आपल्या संकुचित व्यक्तित्वाचा विसर पडतो, व शहरांत आपण धारण केलेल्या बंधनांचें दडपण येथें नाहींसें होतें. पवित्रवृक्ष आणि प्रसन्न उदक आपल्या अकृत्रिम सौहार्दानें आणि माधुर्यानें आमच्या मनामध्यें क्षुद्र कल्पनाच येऊं देत नाहींत.

आम्रवृक्षाच्या उपवनांमध्यें आणि गुलाबाच्या बगीचांमध्यें जें अमानुष दिव्य **तत्त्व** वास करीत असतें तेंच **तत्त्व** विश्वोद्यानामधील नरनारीसमूहामध्यें जो पहातो, आणि हें सर्व जग नंदनवनच करून सोडतो, तो धन्य होय!

## *THE SECRET OF SUCCESS.

## उत्कर्षाचें रहस्य.

एकदा एका गृहस्थानें तिघां छोकऱ्यांनां आपापसांत वांटून घेण्याकरितां एक चवली दिली. त्या तिघांनीं या पैशाचें कांहींतरी विकत घ्यावें,असें ठरविलें. एक मुलगा इंग्रज, दुसरा हिंदी व तिसरा इराणी होता. त्यांपैकीं एकालाहि दुसऱ्याची भाषा नीटशी येत नव्हती. ह्मणून काय विकत घ्यावें, यासंबंधीं ते घोटाळ्यांत पडले. इंग्रज मुलगा " वाटरमेलन–water-melon–विकत घ्यावें," असें ह्मणाला. हिंदी मुलगा ह्मणतो "छे छे, मला हिंदवानाच पाहिजे!" इराणी लडका ह्मणतो "नै नै, आपण टरबुजच घेऊं!"

अशा रीतीनें काय विकत घ्यावें, हें कांहींच ठरेना! दुसऱ्याची आवड बाजूला ठेवून स्वतःला हवें असलेलें विकत घ्यावें, असा प्रत्येकाचा हट्ट पडला, व त्यांचें एक भांडणच जुंपलें. आणि भांडत भांडत ते रस्त्यांत हिंडत असतां, इंग्रजी, फारशी आणि हिंदी अशा तिन्ही भाषा जाणणारा एक इसम त्यांनां भेटला. त्यांचें तें भांडण पाहून या मनुष्याला मोठी मौज वाटली. तो ह्मणाला " मुलांनों! तुमचा तंटा मी मिटवितों. "

तिघांनीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. त्यांच्याकडून त्या इसमानें चवली घेतली आणि त्यांनां रस्त्याच्या एका कोंपऱ्यावर उभें राहण्यास सांगितलें, व स्वतः एका फळविक्याकडे जाऊन चवलीचें एक भलें मोठें कलिंगड आणून व तें त्या मुलांपासून लपवून ठेवून त्यानें एकेकास बोलाविलें. पहिल्यानें त्यानें त्या इंग्रज छोकऱ्याला बोलाविलें आणि त्याला नकळत त्या कलिंगडाचे तीन सारखे तुकडे करून त्यांपैकीं एक भाग त्याचे हातीं दिला आणि विचारलें " हेंच ना तुला हवें होतें? " तो मुलगा

---

* सॅनफ्रान्सिस्को, गोल्डन हॉल येथें झालेलें व्याख्यान.

खुष झाला. मोठ्या आनंदानें तें घेऊन तो उड्या मारीत चालला आणि ह्मणाला, कीं, " मला हेंच पाहिजे होतें ! "

नंतर त्या इसमानें त्या इराणी मुलाला जवळ बोलाविलें आणि दुसरा भाग त्याला देऊन "तुला हेंच हवें होतेंना ? " असें विचारिलें. तो इराणी मुलगाहि अतिशय खुष झाला, व "हेंच माझें टरबूज, हेंच मला हवें होतें !" असें ह्मणून आनंदानें निघून गेला.

नंतर त्यानें हिंदी मुलाला बोलावून तिसरा तुकडा त्याला दिला, आणि " हेंच तुला हवें होतें ना?" असें विचारिलें. तो मुलगाहि संतुष्ट झाला आणि "मला पाहिजे होतें तें हेंच, हाच माझा हिंदवाना ! " असें ह्मणाला.

आतां हें भांडण कां उपस्थित झालें होतें ? त्या मुलांमध्यें हा बेबनाव कशानें उत्पन्न झाला ? फक्त नांवांनीं, फक्त नामभेदानें, दुसऱ्या कशानें नाहीं ! नामभेद नाहींसा करा ! नामपटलाच्या मागें पहा, ह्मणजे तेथें तुह्मांला वाटरमेलन, टरबुज आणि हिंदवाना या परस्पर विरोधी नांवांनीं व्यक्त होणारी वस्तु एकच आहे, असें आढळेल. एकच वस्तु या तिन्ही नांवांच्या मुळाशीं आहे. आतां इराणांतील किंवा हिंदुस्थानांतील कलिंगड इंग्लंडांतील कलिंगडाहून जरा निराळें असेल, पण फळ एकच आहे, एकच वस्तु आहे. क्षुल्लक भेदांची विशेष मातब्बरी नाहीं.

निरनिराळ्या धर्मांतील वाद, भांडणें व बेबनाव पाहून 'रामा'ला अशीच मोठी मौज वाटते. ख्रिस्तीलोक ज्यू लोकांशीं भांडताहेत, ज्यू लोक मुसलमानांशीं तंटा करिताहेत, मुसलमानांचें ब्राह्मणांशीं जुंपलें आहे, ब्राह्मण बौद्धलोकांनां दूषण देत आहेत आणि बौद्धहि त्यांचें उसनें फेडीत आहेत. अशा तऱ्हेचीं भांडणें फार मजेशीर असतात. या भांडणांचें मुख्य कारण बहुधा नामभेदच. केवळ नामांचें आवरण दूर करा, नामांचें पटल फाडून टाका आणि त्यांचा अर्थ मात्र काय आहे तो पहा, ह्मणजे तेथें तुह्मांला विशेषसा फरक दिसणार नाहीं.

'राम' पुष्कळदा 'वेदान्त' हा शब्द वापरतो. वेदान्त हें एक नुसतें नांव आहे; परंतु फक्त हें नांव ऐकूनच पुष्कळ लोक 'रामा'चें कांहींहि

ह्मणणें ऐकण्यास कंटाळतात. एक मनुष्य येतो आणि बुद्धाच्या नांवाखालीं उपदेश करतो, परंतु आपल्या कानांला गोड न लागणारें नांव तो घेतो एवढ्यावरूनच पुष्कळ लोक त्याचें ह्मणणें ऐकून घेत नाहींत. कृपा करून अधिक विचारी व्हा ! या विसाव्या शतकांत नामभेदाच्या पलीकडे पहाण्याचा काल येऊन ठेपला आहे. 'राम' जें कांहीं तुमच्यापुढें ठेवीत आहे, अथवा दुसरा कोणीहि जें कांहीं ठेवीत असेल, त्याचें, त्याच्या अंतर्गत योग्यते-प्रमाणें ग्रहण करा. नुसत्या नांवानें गोंधळून किंवा फसून जाऊं नका. कोणत्याहि वस्तूची तिच्या स्वतःच्या गुणावरून परीक्षा करा. ती उपयुक्त आहे कीं नाहीं हें पहा. एकादा धर्म अतिशय प्राचीन आहे, एवढ्यावरच त्याचा स्वीकार करूं नका. त्याच्या प्राचीनत्वावरून त्याचें खरेपण सिद्ध होत नाहीं. पुष्कळदा जुनीं घरेंच पाडावीं लागतात आणि जीर्ण वस्त्रेंच बदलावीं लागतात. अत्यंत नूतन सुधारणा अगर फेरफार जर युक्तीस धरून असेल, तर प्रभातहिमबिंदूंनीं सुस्नात अशा नूतन गुलाबा-प्रमाणेंच ती ग्राह्य आहे. तसेंच, एकादा धर्म तो नवीन आहे एवढ्यावरच त्याचा स्वीकार करूं नका ! नूतन वस्तु नेहमींच उत्तम असतात, असें नाहीं. कारण, त्यांनां कालांतरानें येणाऱ्या अनुभवाची कसोटी लागलेली नसते. कोणत्याहि धर्माचा, बहुतेक मनुष्यजात त्यावर विश्वास ठेवते एवढ्यावरच स्वीकार करूं नका. कारण, बहुजनसमाजाचा वस्तुतः सैतानाच्या धर्मावर—अज्ञानाच्या धर्मावर—विश्वास असतो. एका कालीं बहुतेक सर्व लोकांनां गुलामगिरी सम्मत होती. यावरून गुलामगिरी ही न्याय्य संस्था आहे, असें ठरत नाहीं. पण एकाद्या धर्मावर, कांहीं शेलक्या लोकांचा त्यावर विश्वास असतो, एवढ्यावरच विश्वास ठेवूं नका. कधीं कधीं एकाद्या धर्माचा स्वीकार करणारे मूठभर लोक अंधेरांत वाट चुकलेले असतात. एकाद्या धर्माचा, तो एकाद्या सर्वसंगपरित्याग केलेल्या महान् यतिवर्यानें प्रतिपादन केलेला आहे, ह्मणूनच स्वीकार करूं नका. कारण, आह्मी पुष्कळदा पाहतों, कीं, सर्वसंगपरित्याग केलेल्या पुष्कळ यतींनां कांहींहि ज्ञान नसतें, ते खरेखुरे धर्मवेडे असतात. एकाद्या धर्माचा तो राजाकडून आला आहे एवढ्यावरच स्वीकार करूं नका, कारण, बरेचदा

राजे धार्मिक संपत्तीच्या दृष्टीनें पाहतां अकिंचन असतात. एकाद्या धर्माचा तो श्रेष्ठ नीतिमत्तेच्या मनुष्याकडून आलेला आहे ह्मणूनहि त्याचा स्वीकार करूं नका. कारण, पुष्कळदा अत्यंत सदाचरणी लोक देखील सत्य प्रतिपादन करतांना चुकलेले आहेत. एकाद्या मनुष्याची पचनशक्ति विशेष उत्तम असेल; परंतु त्याला अन्नरसाच्या परिपाकक्रियेविषयीं कांहींच माहिती नसण्याचा संभव आहे. समजा, एक चितारी आहे. तो तुह्मांला अतिशय सुंदर, सुबक, मोहक चित्र काढून देतो; पण तो स्वतः मात्र अत्यंत कुरूप आहे. कांहीं लोक अत्यंत कुरूप असतात, पण ते मोठीं सुंदर तत्वें प्रतिपादितात. साक्रेटीस अशा तऱ्हेचा मनुष्य होता. सर फ्रान्सिस बेकन घ्या. तो कांहीं फारसा नीतिमान् नव्हता; किंवा विशेष सदाचरणी होता, असेंहि पण नाहीं; तरी त्याला सर्व जगाला **'नवकरण'**– Novum organon–( तर्क शास्त्राचा एक अत्युत्तम ग्रंथ ) देतां आलें. युरोपांतील लोकांनां त्यानेंच प्रथम अनुमितिशास्त्र शिकविलें, आणि त्याचें तत्वज्ञानहि उदात्त होतें. एकाद्या धर्मावर, तो एकाद्या सुप्रसिद्ध मनुष्याकडून आलेला आहे ह्मणून विश्वास ठेवूं नका. सर ऐझाक न्यूटन हा जगद्विख्यात पुरुष होय, परंतु त्याची प्रकाशाची परिमाणुरूपी उपपत्ति आतां चुकीची ठरली आहे व त्याची तात्कालिकगतिसंबंधीं रीति ( Method of fluxion ) लायबनिझच्या रीतीच्या ( Differential system ) योग्यतेची नाहीं. अंगच्या गुणावगुणावरूनच कोणत्याहि वस्तूचा स्वीकार करा, अथवा कोणत्याहि धर्मावर श्रद्धा ठेवा. तुह्मी स्वतः त्याची पारख करा, स्वतः निवडानिवड करा. बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद अथवा कृष्ण यांनां आपलें स्वातंत्र्य विकूं नका. बुद्धानें त्या तऱ्हेनें शिकविलें आणि ख्रिस्तानें या तऱ्हेनें शिकविलें आणि महंमदानें निराळ्याच तऱ्हेनें शिकविलें, तर तें सर्व त्यांनां योग्यच होतें. ते निराळ्या काळीं होऊन गेले. त्यांनीं त्यांच्यापुढें असलेले प्रश्न सोडविले. त्यांनीं स्वतःच्या बुद्धीप्रमाणें निरीक्षण केलें. त्यांची कामगिरी मोठी प्रचंड होती; परंतु तुह्मी सांप्रतच्या काळांत आहां. तुह्मांला स्वतःच आपल्या गोष्टीचा विचार करून कोणतीहि गोष्ट ठरविली पाहिजे. स्वतंत्र व्हा, स्वतःच्या

दृष्टीनें प्रत्येक गोष्टीचें निरीक्षण करण्यास शिका, परप्रत्ययनेय बुद्धि टाका. जर तुमच्या पूर्वजांची एकाद्या धर्मावर श्रद्धा होती तर तें त्यांनां योग्य होतें; परंतु आज स्वतःचा मोक्ष मिळविणें हें तुमचें स्वतःचें काम आहे. तुमचा उद्धार करणें हें तुमच्या पूर्वजांचें काम नव्हे ! त्यांची एका विशिष्ट धर्मावर श्रद्धा होती, त्यानें ते तरले असतील किंवा नसतील; परंतु तुह्मांला स्वतःचें स्वातंत्र्य स्वतःच मिळविलें पाहिजे. जें जें तुमच्यासमोर येईल, त्याची आहे तशीच शहानिशा करा, आणि ती स्वतः करा, आपलें स्वातंत्र्य गमावूं नका ! कदाचित् तुमच्या पूर्वजांनां एकच धर्म दाखविला गेला असेल. तुह्मांपुढें सर्व तऱ्हेचीं सत्यें, सर्व प्रकारचे धर्म, सर्व प्रकारचें तत्वज्ञान व सर्व प्रकारचीं शास्त्रें सप्रयोग सिद्ध करून दाखविलीं जात आहेत. तुमच्या पूर्वजांचा धर्म, तो तुह्मांपुढें मांडिला आहे एवढ्याचसाठीं जर तुमचा होऊं शकतो, तर त्याच तत्वानुसार बौद्धधर्महि तुमचाच होऊं शकेल, आणि वेदान्तधम तर तुमचाच आहे.

**सत्य** हें कोणास वांटून दिलें नाहीं. सत्य ही कांहीं येशूची मिळकत नव्हे. ह्मणून आपण तें येशूच्या नांवावर देऊं नये. त्याचप्रमाणें सत्य ही बुद्धाची जिंदगी नव्हे; आणि ह्मणून तें बुद्धाच्या नांवानें शिकवावयास नको. त्याचप्रमाणें तें कांहीं महंमदाचें वडिलोपार्जित धन नव्हे. कृष्णाचें पण नव्हे. कोणाचेंच नव्हे. तें सर्वांचें आहे. त्यावर प्रत्येकाची सारखीच सत्ता आहे. दुसरा कोणी उन्हांत पूर्वीं शेकत बसला असला तरी तुह्मांला बसतां येतें. वाहत्या झऱ्याचें स्वच्छ पाणी एकादा प्याला तरी तुह्मांला आज त्या झऱ्याचें पाणी पिण्यास कोणतीच अडचण नाहीं. सर्व धर्मां-विषयीं तुमची वृत्ति अशीच असली पाहिजे. आपल्या शेजाऱ्याची ऐहिक मालमत्ता लुबाडून घेण्यास कोणी निदान मनांतून तरी अनमान करणार नाहीं; पण तेंच, ऐहिक संपत्तीहून निःसंशय श्रेष्ठ अशी आत्मिक अथवा धार्मिक संपत्ति आपले शेजारी आपणास मोठ्या आनंदानें देत असतां त्याचा मोठ्या आनंदानें स्वीकार करण्याच सोडून देऊन आपण त्याच्या-विरुद्ध उठतां, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? ‘ राम ’ तुह्मांला वेदान्त सांगतो तें कांहीं तुह्मांला ‘ वेदान्ती ’ हें टोपण नांव मिळावें,

ह्मणून नव्हे. नाहीं, हें सर्व ज्ञान घ्या, तें पचवा, आपलेंसें करा आणि वाटल्यास त्याला ख्रिस्तीधर्म असें ह्मणा. नांवाशीं आह्मांला कांहींच कर्तव्य नाहीं. 'रामा'नें तुह्मांकरितां असा एक धर्म आणिला आहे, कीं, तो **बायबल** व इतर प्राचीन धर्मग्रंथ यांमध्यें सांपडतो; इतकेंच नव्हे, तर आधुनिक तत्वज्ञान आणि शास्त्रें यांवरील ग्रंथांमध्येंहि सांपडतो. 'रामा'नें तुह्मांकरितां आणलेला धर्म रस्त्यामध्येंहि सांपडतो, तो झाडाच्या पानांवर लिहिलेला आहे, तो ओढ्याकडून ह्मटला जात आहे, वाऱ्याकडून गुणगुणला जात आहे, व तो तुमच्या शिरांमध्यें आणि नाड्यांमध्यें स्फुरण पावत आहे. त्याचा तुमच्या अंतःकरणाशीं व व्यवहाराशीं संबंध आहे. तो धर्म तुह्मांला एकाद्या विशिष्ट देवळांत जाऊन आचरावयाचा नाहीं. हा धर्म तुह्मांला तुमच्या सर्व व्यवहारांमध्यें, घरींदारीं, भोजनसमयीं, सर्व ठिकाणीं सदोदित पाळला पाहिजे. हवें तर आपण त्याला वेदान्त ह्मणण्याचें सोडून देऊं. आपण त्याला कांहीं दुसरेंच नांव ठेवूं या. वेदान्ताचा अर्थ फक्त '**मूलभूत सत्य**' असाच आहे. **सत्य** हें तुमचें आहे. तें जितकें 'रामा'चें आहे, तितकेंच तें तुमचेंहि आहे. हिंदूंचा त्यावर तुह्मांहून अधिक हक्क नाहीं. तें कोणाचेंच नाहीं. उलट सर्वजण व सर्व वस्तु त्याच्या आहेत.

आतां आपण हा वेदान्त आपला मार्ग कसा सुगम करतो आणि आपलीं कर्तव्यें कशीं सुखकारक करतो, हें पाहूं. आज आपण 'व्यावहारिक वेदान्त' अथवा निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास 'उत्कर्षाचें रहस्य' हा विषय घेऊं. उत्कर्षाचें रहस्य ह्मणजे आचरणांत आणलेला वेदान्त होय. व्यावहारिक वेदान्त हीच उत्कर्षाची गुरुकिल्ली होय. प्रत्येक शास्त्राची, त्या शास्त्रानुसार एकेक कला असते. आज आपण वेदान्ताचा एक भाग —ज्याला शास्त्रापेक्षां कला ह्मणणें अधिक योग्य होईल—ह्मणजे व्यावहारिक वेदान्त हा विषय घेऊं.

कांहीं लोक ह्मणतात, कीं, वेदान्त नैराश्यवाद शिकवितो; निराशा, सुस्तपणा आणि अनुद्योग वाढवितो. आपलें तर्कशास्त्र आपलेजवळ ठेवा व आपली बुद्धि दुसऱ्यास विकूं नका, अशी 'रामा'ची या लोकांनां विनंति आहे. त्यांनां स्वतःची बुद्धि स्वतःजवळ ठेवूं द्या, आणि वेदान्ताचीं तत्वें

चैतन्य, शक्ति, सामर्थ्य व यश यांकडे नेतात, का दुसरीकडेच नेतात हें पाहूं द्या. हिंदी मनुष्यें त्याप्रमाणें वागतात कीं नाहीं हें विचारूं नका. 'राम' तुह्मांला स्पष्टपणें सांगतो, कीं, ही कांहीं फक्त हिंदूंचीच मिळकत नाहीं, ती प्रत्येकाची मिळकत आहे. तो तुमचा जन्मसिद्ध हक्कच आहे. व्यवहारामध्यें अमेरिकन लोक त्याप्रमाणें अधिक वागतात आणि ह्मणून ते त्या बाबतींत अधिक यशस्वी आहेत. हिंदी लोक अमेरिकन लोकांइतकें तें ज्ञान व्यवहारांत आणीत नाहींत ह्मणून आधिभौतिक बाबतींमध्यें ते मागसलेले आहेत.

'राम' कांहीं तुह्मांला विपरीत वेदान्त देत नाहीं. तो निसर्गाच्या उगमापासून आणलेला वेदान्त देत आहे. तुह्मी आपलें तर्कशास्त्र लढवा आणि बुद्धीच्या दृष्टीनें या विषयाचा विचार करा, ह्मणजे वेदान्त किती अद्भुत आहे, प्रत्येक बाबतीमध्यें तो कसें यश देतो, आणि प्रत्येकाला आपली इच्छा नसतांहि वेदान्ताच्या मार्गानेंच चालण्यास लावून त्याकडून आपले हुकूम कसे पाळवितो, या सर्व गोष्टी कळून येतील.

उत्कर्षाचें रहस्य बहुविध आहे. या रहस्याचीं निरनिराळीं अंगें आहेत. आपण हीं तत्वें एकामागून एक घेऊं आणि हिंदुधर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें त्यांचा वेदान्ताशीं काय संबंध आहे, हें पाहूं.

## उत्कर्षाचें पहिलें साधन–उद्योग.

काम करणें, त्याच्या पाठीस लागणें, व त्याचा पिच्छा पुरविणें, हेंच यशःप्राप्तीचें वर्म आहे, हें आतां कोणाला ठाऊक नाहीं असें नाहीं. 'घावावर घाव मारा' हेंच उत्कर्षाचें प्रथम तत्व आहे. उद्योगावांचून तुह्मी कधींहि यशस्वी होणार नाहीं ! जीवनकलहांत आळशी मनुष्य मरतोच मरतो. तो जगणार नाहीं, मेलाच पाहिजे ! येथें वेदान्ताविरुद्ध नेहमीं विचारण्यांत येणारा प्रश्न उद्भवतो,–वेदान्तानें ठरविलेल्या निष्क्रिय, निर्गुण व अलिप्त अशा आत्म्याशीं सतत उद्योगाची ( क्रियेची ) एकवाक्यता कशी करणार ? परमात्मस्वरूपाच्या निष्क्रियतेचा व शांतीचा अनुभव यांचा वेदान्तामध्यें अंतर्भाव केल्यानें आणि त्यागाचा उपदेश केल्यानें वेदान्त

आळस आणि निरुद्योगीपणा उत्पन्न करीत नाहीं काय? कर्म आणि त्याग याविषयींच्या भयंकर गैरसमजुतीमुळें हा आक्षेप उत्पन्न होतो.

कर्म ह्मणजे काय? वेदान्ताप्रमाणें मन लावून केलेलें काम ह्मणजेच शांति होय. 'काम ह्मणजे विश्रांति' हा एक चकित करून सोडणारा विरोधाभास आहे खरा. सर्व खरें कर्म ह्मणजे शांति असेंच वेदान्त शिकवितो. एकादा दीर्घोद्योगी मनुष्य आपल्या कामाच्या पूर्ण भरांत-रंगांत आला ह्मणजे त्याकडे नीट पहा. इतरांच्या दृष्टीनें तो अविश्रांत श्रम करीत आहे असें दिसतें; परंतु त्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां तो मुळीं कर्ताच नाहीं! दुरून पाहणाराच्या दृष्टीस इंद्रधनुष्यामध्यें कैक सुंदर रंग आहेतसे दिसतात; पण जवळ जाऊन पहाल तर त्यामध्यें कसलेच रंग नाहींत, असें कळून येईल. समरांगणावरील एकादा शूर वीर—नेपोलियन, वाशिंग्टन किंवा कोणीहि घ्या, ज्या वेळीं आपली पराकाष्ठा करून लढत असतो, त्यावेळीं त्याकडे पहा. शरीर जणूं काय आपोआपच काम करीत आहे, आणि मन त्या कामामध्यें इतकें गढून गेलें आहे, कीं, 'मी काम करीत आहें' ही भावनाच तेथें नाहीं. कर्माचा उपभोग घेणारा सूक्ष्म अहंकार नाहींसा झालेला असतो. श्रेयाकांक्षी क्षुद्र मीपणाचा तेथें अभाव असतो. हें सतत केलें जाणारें काम न कळत तुह्मांला उच्चतम योगाप्रत नेतें.

मन लावून केलेल्या खऱ्या कर्माच्या योगानें तुह्मीं आपल्या क्षुद्र अहं-पणाच्या पलीकडे जावें, असें वेदान्त ह्मणतो. शरीर व मन हीं एकसारखीं इतकीं कामांत गढून गेलीं असलीं पाहिजेत, कीं, त्याचे श्रमच वाटूं नयेत. कवीला, जेव्हां तो क्षुद्र अहंभावाच्या पलीकडे जातो, अथवा मी ही कविता लिहीत आहें ही त्याला भावना नसते, तेव्हांच खरी स्फूर्ति उत्पन्न होते. गणितांतील बिकट प्रश्न सोडविण्याचा ज्याला अनुभव आहे अशा कोणालाहि विचारा, ह्मणजे तो तुह्मांला असें सांगेल, कीं, हें मी करीत आहें ही कल्पना जेव्हां पूर्ण नाहींशी होते, तेव्हांच प्रश्न सुटतात व शंका नाहींशा होतात. जितकें जितकें क्षुद्र अहंकाराच्या पलीकडे जावें, तितकें तितकें माणसाच्या हातून काम उत्तम वठतें.

याप्रमाणें मन लावून केलेल्या खऱ्या कामाच्या जोरावरच क्षुद्र अहंकाराच्या पलीकडे जाण्यास व वेदान्तशास्त्रामध्यें ज्याला आत्मा अगर देव असें ह्मणतात त्या सत्य आणि अनिर्वचनीय तत्वामध्यें सर्वस्वी लीन होण्यास, वेदान्त शिकवितो. जेव्हां एकादा विचारवान्, तत्वज्ञानी, कवि, शास्त्रज्ञ अगर कोणीहि कर्तृत्ववान् मनुष्य या कर्मसमाधीशीं आपला पूर्ण मिलाफ करून घेतो, आणि त्यागाच्या अशा स्थितीस जाऊन पोहोंचतो, कीं, तेथें त्याच्या व्यक्तित्वाचा लेशहि उरत नाहीं, आणि अशा रीतीनें वेदान्त आचरणांत आणतो, तेव्हांच **गंधर्वराज**—Master musician—**ईश्वर** त्याचें मन आणि देहरूपी वाद्य आपल्या हातीं घेतो आणि त्यांतून गंभीर ध्वनि, श्रुतिमधुर रागरागिण्या आणि अप्रतिम संगीत काढतो. लोक ह्मणतात, याला स्फूर्ति उत्पन्न झाली आहे; परंतु वास्तविक त्याच्यामध्यें मी तूं भानच उरत नाहीं, आणि त्याच्या दृष्टीनें करणें आणि अनुभवणें ही दोन्हींहि आढळत नाहींत. व्यवहारामध्यें वेदान्त आणणें तेंच होय. अशा रीतीनें नकळत वेदान्त आचरणांत आणल्यानेंच जय प्राप्त होतो.

वेदान्तिक योग साध्य करून घेण्यास अरण्यवास पतकरून विचित्र विधि आचरण्याची जरूरी नाहीं. जेव्हां तुह्मी उद्योगांत पूर्ण मग्न असतां, आणि कर्मांत गढून जातां, तेव्हां तुह्मी प्रत्यक्ष योगप्रणेता शिवच होतां. वेदान्तदृष्ट्या तुमचा देह ह्मणजे तुह्मी नव्हे, आणि जेव्हां कर्मामध्यें पूर्ण गढून गेल्यानें देह आणि मन हीं वस्तुतः नाहींशीं होतात, तेव्हांच तुह्मी आपल्या ऐश्वर्याच्या शिखरास पोंचलेले असतां, हें तुह्मांला नाहीं का कळत ?

कर्म ह्मणजे काय हें दिव्याच्या उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितां येईल. एकादी चिमणी अगर समई घ्या. तिचा प्रकाश किती चकचकीत, डोळे दिपवून सोडणारा, देदीप्यमान, असतो. दिव्याला हें तेज कशानें प्राप्त होतें ? सतत कर्माचरणानें, अहंकाराचा लोप करण्यानेंच ! परंतु तो दिवा वात व तेल वांचविण्याचा प्रयत्न करूं द्या, ह्मणजे तो अंधारमय होईल, सर्व कांहीं फसेल, यश यावयाचें नाहीं. दिव्याला कांहीं यश यावयाचें असल्यास त्यानें जळलेंच पाहिजे, त्यानें आपली तेल वात राखून ठेवतां कामा नये ! वेदान्त सांगतो, तें हेंच. तुह्मांला कांहीं यश

मिळवावयाचें असल्यास किंवा तुह्मांला तुमचा अभ्युदय करून घेण्याचें असल्यास तुह्मीं आपल्या कर्मानें, आपल्या दररोजच्या दिनचर्येनें, आपलें शरीर व स्नायु यांनां जाळलें पाहिजे. कर्मरूपी अग्नीमध्यें तुह्मीं त्यांचें दहन केलें पाहिजे, तुह्मीं त्यांचा उपयोग केला पाहिजे. शरीर आणि मन खपविलें पाहिजे, त्यांनां जळत ठेविलें पाहिजे. आपल्या शरीराला आणि मनाला क्रुसावर चढवा, काम करा, श्रम करा, उद्योग करा, ह्मणजे तुमच्यांतून प्रकाश झळकूं लागेल, ज्ञानाचा उदय होईल. सर्व कर्में ह्मणजे आपली तेलवात जाळणें होय. किंवा निराळ्या भाषेंत सांगावयाचें असल्यास, सर्व कर्में ह्मणजे जाणीवेच्या दृष्टीनें आपला देह व आपलें मन हीं मायिक केलीं पाहिजेत, वस्तुतः शून्य झालीं पाहिजेत. त्यांच्या ( देह आणि मन ) पलीकडे तुह्मी जा, ह्मणजे तेंच कर्म.

कर्मातीत झाल्यानेंच खरें कर्म सफल होतें. अकबर बादशहाच्या दरबारीं एके वेळीं दोन शूर हिंदी बंधु आले. बादशहाकडे आपणांला आश्रय मिळावा ह्मणून त्यांनीं विनंति केली. बादशहानें "तुमच्या अंगांत काय कसब आहे?" ह्मणून विचारिलें. ते ह्मणाले "आह्मी वीर आहों." बादशहानें त्यांनां आपल्या शौर्याचा प्रत्यय दाखविण्यास सांगितलें. भर दरबारांत ते समोरासमोर उभे राहिले. त्यांच्या तीक्ष्ण व झगझगीत कट्यारी एकदम चमकल्या. प्रत्येकानें आपल्या बंधूच्या उराशीं आपल्या तरवारीचें तीक्ष्ण टोंक धरिलें आणि ते मोठ्या आनंदानें व प्रसन्न मुद्रेनें एकमेकांशीं भिडले. त्यांचे हात स्थिर होते, व त्यांच्या कट्यारी एकमेकांच्या शरीरांतून भेदून जात होत्या; परंतु यत्किंचितहि न डगमगतां शांतपणें त्यांनीं एकमेकांशीं लगट केली. तसूभरहि ते ढळले नाहींत किंवा त्यांनीं जराहि कांकूं केलें नाहीं. स्वर्गामध्यें त्यांचे आत्मे एकमेकांस भेटले, या पृथ्वीवर त्यांचीं शरीरें एकमेकांस भेटलीं आणि रक्तस्राव होऊन तीं जमिनीवर पडलीं. बादशहाला आपल्या शौर्याचा हा विलक्षण प्रत्यय त्यांनीं आणून दिला खरा ! **जेव्हां अहंकाररूपी कर्ता बळी दिला जातो तेव्हांच कर्म खऱ्या ह्मणजे पूर्ण सिद्धीस जातें**, याचें हें एक उदाहरण आहे. मधमाशांनां आपल्या चाव्यांमध्यें आपला सर्व प्राण घालावा लागतो. प्लेटो ह्मणतो "जो मनुष्य

आपलें देहभान विसरत नाहीं तो कवितादेवीचें द्वार व्यर्थ ठोठावीत असतो. ''

याप्रमाणें वेदान्त हा आचरणांत उतरविल्यानें यश व अभ्युदय प्राप्त होतात. प्रापंचिक मनुष्याला अखंड कर्माचरण हाच मोठा योग आहे. कामामध्यें पूर्ण गढून गेल्यामुळें 'मी काम करितों' हें जेव्हां तुह्मी विसरतां, तेव्हां तुमच्या हातून उत्तम काम होतें असें जगाच्या निदर्शनास येतें.

तसेंच कोणत्या मनःस्थितीमध्यें आणि कोणत्या तऱ्हेनें काम केलें असतां यशस्वी काम आपणास स्वाभाविक असें होतें, हें समजलें पाहिजे. कर्म करा, कर्म करा असें ह्मणणें फार सोपें आहे; परंतु तें करणें फार कठीण आहे. प्रत्येकाला आपण मोठा चितारी अथवा मोठा गवयी व्हावें असें वाटतें; परंतु आपण जसें किंवा जें व्हावेंसें वाटतें तसा प्रत्येकजण होत नाहीं. अकर्माकडे आसक्ति कशानें होते? त्याचप्रमाणें तुह्मांला श्रम कशानें गोड वाटतात? आपली इच्छा असतांहि आपल्या हातून काम होत नाहीं असा तुह्मांला पुष्कळदा अनुभव आला नाहीं काय? आणि तुह्मांला असेंहि दिसून आलें नाहीं काय, कीं, कैकदा काम करण्याचें मनांत नसूनहि काम उत्तम वठतें. तुमच्या कर्तृत्वावर अधिकार चालविणारें एक महत् तत्व असतें, हें तुमच्या लक्ष्यांत आलें नाहीं काय? एकादा मनुष्य सकाळीं उठतो आणि एका अनिर्वचनीय व उल्लसित स्थितींत असतो, आणि निसर्गाशीं त्याचें तादात्म्य किंवा एकतानता झालेली असते. तो आपल्या हातीं लेखणी घेतो आणि तींतून दिव्य प्रासादिक कविता अथवा तत्वज्ञान बाहेर पडतें, असें कितीदा तरी झालें आहे! एकादा चितारी उत्तम चित्र काढण्याची खटपट करितो परंतु सर्व धडपड करूनहि त्याला तें साधत नाहीं. एके दिवशीं सकाळीं तो उठतो आणि स्वतःला स्फूर्ति झाल्याप्रमाणें त्याला वाटून लगेच तो सुंदर चित्रें काढतो, असें होत नाहीं काय?

एवंच, आपल्याला असें दिसून येतें, कीं, आपल्या सर्व शक्तींचा उत्कर्ष करणारी एक दिव्य शक्ति आहे. जर तुह्मीं या दिव्य स्थितीचा फायदा करून घेतलात, तर तुह्मी आपली पराकाष्ठा करूं शकाल, आणि तुमच्या हातचें काम निर्दोष आणि सर्वांगसुंदर असें होईल. ही उच्च

स्थिति किंवा हा परम गुह्य वेदान्त तुह्मांपुढें ठेवितों. आणि तें गुह्य ह्मणजे विश्वाशीं एकरूप होणें, ईश्वरतत्त्वाशीं एकतानता पावणें, आपल्या अंतरांतील शुद्ध आत्म्यांत ह्मणजे परमेश्वरांत वास करणें, अहंकार किंवा क्षुद्र वासना यांच्यापलीकडे जाणें, याव्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं. अशा रीतीनें सर्व प्रकाश व सर्व शक्ति यांचा, आपल्यामध्यें असलेल्या गुप्त झऱ्याचा फायदा घेतला असतां तुमचें कर्म अलौकिक होईल.

एकादा शिल्पी अथवा चित्रकार रस्त्यांमधून हिंडत असतांना तेथें अनेक चेहरे त्याच्या दृष्टीस पडतात. एकाद्या मनुष्याचे डोळेच त्याला आवडतात आणि न कळत ते डोळे त्याच्या डोक्यामध्यें सांठवून ठेविले जातात. त्याला आणखी कोणी भेटतो, त्याची हनुवटीच याच्या मनांत भरते, आणि ती हनुवटी आपल्या डोक्यामध्यें तो सांठवून ठेवितो. एकाकडून डोळे आणि दुसऱ्याकडून चोरून आणलेली हनुवटी. आणखी तिसरा मनुष्य एकादें चित्र विकत घेण्याकरितां त्याच्या दुकानीं येतो. चित्रकार तें चित्र त्याला विकतो, गिऱ्हाईक तें घेऊन जातें. परंतु त्या चित्रकाराच्या मनामध्यें आपले केंस आपण मागें ठेवून जातों हें त्याला ठाऊक नसतें. नंतर आणखी एकादा मनुष्य कांहीं कामासाठीं त्या चित्रकाराकडे येतो. त्याचें काम तो करतो व त्याचे सुंदर कान उपटून घेतो. आणि अशा रीतीनें त्या चिताऱ्याचें मन त्याला नकळत आपलें काम करीत असतें. जेव्हां तो चितारी निरनिराळ्या लोकांचे नाक, कान, डोळे इत्यादि आपलेसे करतो, तेव्हां आपण हें घेत आहों ही भावना त्याच्यामध्यें नसते. पण त्याला न कळत आपोआप हें कार्य होत असतें. कांहीं दिवसांनंतर तो चितारी चित्रपट समोर ठेवून चित्र काढण्यास वसतो. मग एकाचे पाणीदार डोळे, दुसऱ्याचें सुंदर नाक, तिसऱ्याचे सुबक केंस, हीं सर्व एका चित्रांत एकवटतात आणि तो चितारी सर्वोत्कृष्ट चित्र तयार करतो आणि हें चित्र दुसऱ्या सर्व मूळच्या चित्रांनां मागें टाकतें. हें सर्वोत्कृष्ट काम कसें झालें? हें कार्य एकाद्या कर्त्याच्या हातून झालें काय? नाहीं. तें अकर्तृक होतें.

हें मी करीत आहें या कल्पनेच्यापलीकडे, अहंभाव आणि स्वार्थाचा संपर्क नसलेल्या स्थितीमध्यें सतत राहून हें सर्व कार्य केलें गेलें आहे; परंतु त्या चितान्यास द्वेष किंवा मोह–जें पुष्कळदां प्रेम असें चुकून समजलें जातें–याची बाधा झाली, तर त्याच्या मनाचें घटियंत्र बिघडतें, पुढें काम करण्यास तें नालायक होतें, त्याची घडी बिघडून तो गोंधळून जातो. त्याच्या मनाचा अकर्तृकभाव नाहींसा होतो, आप्पलपोटेपणाच्या मायेमध्यें तो गुरफटून जातो, त्याचें स्थैर्य नाहींसें होतें आणि सर्वात्म्याशीं एकजीव करणाऱ्या वेदान्तिक दृष्टीच्या जागीं राग आणि द्वेष यांचीं बंधनें येतात. आणि नंतर त्या चित्रकाराला निरनिराळ्या मनुष्याच्या चेहऱ्यांतील सौंदर्य काढून घेण्याचें अकर्तृक काम करितां येत नाहीं. व्यावहारिक वेदान्त नाहींसा झाला आणि त्याबरोबरच अप्रतिम सुंदर चित्रें काढण्याचें प्रावीण्यहि नाहींसें झालें.

यावरून तुह्मांला असें दिसून येईल, कीं, ज्या मानानें तुमचें कर्म अकर्तृक होत जाईल, ज्या मानानें हें मी करीत आहें ही तुमची भावना सुटेल, ज्या मानानें 'सर्व हक्क स्वाधीन' ठेवण्याचा व मालकी गाजविण्याचा बाणा तुह्मी टाकून द्याल, ज्या मानानें तुह्मी हांजी हांजी करण्याचें लोभमूलक वर्तन सोडून द्याल, ज्या मानानें तुह्मी आपला मायिक भासमान आत्मा (अहंकार) नाहींसा कराल, त्या मानानें तुमचें कार्य चांगलें वठेल. तुह्मीं कर्माकरितां कर्म करावें असें वेदान्त सांगतो. तुमचें कर्म सफल व्हावयाचें असल्यास, तुह्मीं कर्माच्या परिणामाकडे लक्ष्य देतां कामा नये व फलाशा धरितां कामा नये. साध्य आणि साधन यांनां एकत्र आणा आणि तें कर्मच तुमचें साध्य होऊं द्या. वेदान्त सांगतो, कीं, तुह्मी आपल्या अंतरात्म्यांत स्थिर व्हा. अंतरात्मा स्थिर ठेवा व शरीर एकसारखें कर्मरत असूं द्या. शरीर गतिशास्त्राच्या आधीन असल्यामुळें कर्मरत असूं द्या, अंतरात्मा मात्र स्थितिरूप शांतीमध्यें अखंड असूं द्या. आमच्या सर्व कामांचा बिघाड होतो तो आमच्या एका स्वार्थमूलक खळबळीनेंच. कोणतेंहि कर्म त्याशीं संलग्न असलेल्या शांतीकरितां किंवा निर्वाणाकरितां आचरा.

## उत्कर्षाचें दुसरें साधन—निष्काम स्वार्थत्याग.

" ये केचिद्दुःखिता लोके सर्वे ते स्वसुखेच्छया।
ये केचित्सुखिता लोके ते सर्वेऽन्यसुखेच्छया॥"

—एक बौद्ध शास्त्रकार.

एकदां एक तळें व एक नदी यांचें भांडण लागलें. तळें नदीला ह्मणालें "वये, तूं आपलें सर्व पाणी व आपलें सर्व वैभव समुद्राला अर्पण करितेस हा अगदीं मूर्खपणा आहे. आपलें जीवन व आपली संपत्ति समुद्राला देऊन उधळून टाकूं नको. सागर कृतघ्न आहे. त्याला त्यांची जरूरी नाहीं. तूं जरी आपला पाण्याचा सर्व सांठा सागरामध्यें ओतून राहिलीस, तरी आज आहे तसा समुद्र खारट व कडवटच राहणार, त्याचें खारें पाणी गोड होणार नाहीं! **'किंमिष्टमन्नं खरसूकराणाम्.'** आपला सर्व निधि आपल्याजवळ ठेव."

हें व्यवहारी ज्ञान होय. येथें त्या नदीला परिणामाकडे लक्ष्य देण्यास व फलाशा धरण्यास सांगितलें होतें. नदी वेदान्ती होती. हें व्यवहारी ज्ञान ऐकून तिनें उत्तर दिलें "नाहीं, नाहीं, परिणामाची किंवा फळाची मी पर्वा करीत नाहीं. जयापजय मला सारखे आहेत. मी कर्म करितें, कारण मला तें आवडतें. मला कर्माकरितांच कर्म केलें पाहिजे. कर्म करणें हाच माझा उद्देश आहे. व्यवसायांत गढून जावें हेंच माझें जीवन होय. शक्ति हाच माझा आत्मा होय. मला कर्म केलेंच पाहिजे."

नदी काम करीत राहिली, आणि समुद्रांत लाखों गॅलन पाणी ओतीत राहिली. तें दरिद्री, कृपण तळें तीनचार महिन्यांत वाळून गेलें, त्यांतील पाणी सांठून त्याला दुर्गंधि येऊं लागली, गलिच्छ गाळ त्यांत बराच सांठला; परंतु ती नदी स्वच्छ व निर्मल राहिली. तिचे कायमचे झरे आटले नाहींत. नदीच्या उगमांची भरती करण्याकरितां समुद्राच्या पृष्ठभागापासून हळुहळू आणि नकळत पाणी वाफेच्या रूपानें वर नेलें गेलें; बरसातीचे वारे आणि दक्षिणसमुद्रांतील वारे यांनीं समुद्राचें पाणी हळुहळू अदृश्य रूपानें वर नेऊन, नदीचा उगम सदोदित वहाता ठेविला.

तत्व्याच्या तर्कशास्त्राप्रमाणें वागूं नका, असें वेदान्त तुह्मांला सांगतो. माझें आणि माझ्या कार्याचें काय होईल ह्मणून क्षुद्र आप्पलपोटें तळेंच काळजी करितें. तुमचें कर्म फक्त कर्माकरितांच असूं द्या. तुह्मीं कर्म केलेंच पाहिजे, तुमचें साध्य कर्मातच असलें पाहिजे, ह्मणजे वेदान्त तुह्मांला क्षुब्ध करणाऱ्या व गांजणाऱ्या वासनांपासून मुक्त करितो. वेदान्तांत सांगितलेल्या 'वासनांपासून मुक्ती'चा अर्थ हाच आहे. परिणामाविषयीं फिकीर करूं नका, लोकांकडून कशाची अपेक्षा करूं नका, आणि आपल्या कर्मावरील अनुकूल किंवा प्रतिकूल टीकेनें त्रास करून घेऊं नका. आपल्या कर्मापासून फलनिष्पत्ति होईल किंवा नाहीं याची काळजी करूं नका. त्याची कल्पनाहि मनांत आणूं नका. अशा रीतीनें तुह्मांला वासनेपासून मुक्त झालें पाहिजे. तुह्मांला कर्मापासून मुक्त व्हावयाचें नसून त्याच्या दगदगीपासून मुक्त झालें पाहिजे. अशा रीतीनें तुमचें काम किती उत्तम होतें!

मूढ करणाऱ्या वासना आणि मोह यांवर उत्तम उपाय ह्मणजे उद्योग करीत राहणें, हा होय; परंतु ही नुसती मिळमिळीत शिफारस झाली. खऱ्या कर्मापासून उद्भवणारा आनंद, मोक्षाचा एक स्फुलिंगच किंवा अज्ञात आत्मसाक्षात्कारच आहे. तो तुह्मांला शुद्ध, निर्मल आणि परमात्मस्वरूपांत ठेवितो. हा आनंद ह्मणजे कर्माचें उत्तम व निश्चित फल आहे. कर्माच्या क्षुद्र स्वार्थी हेतूंवर वासना ठेवून हा आरोग्यदायक स्वर्गीय ठेवा दूषित करूं नका. नीच महत्त्वाकांक्षा आणि क्षुद्र हांव आपल्या प्रगतीला मदत करण्याच्या ऐवजीं तिला मागेंच ओढतात. बाह्य आणि मूर्त आमिष आपल्या कर्तृत्वशक्तीला पोषक होण्याऐवजीं मारकच होतें. खऱ्या कळकळीनें केलेल्या कामापासून होणाऱ्या आनंदापेक्षां कोणतेंहि पारितोषिक व प्रशंसा अधिक हितावह असूं शकणार नाहीं. त्यागरूपी धर्म आणि तदंतर्गत अर्चा साध्य करण्याकरितां कर्माचें आचरण करा. कर्मानें दिलेल्या पोरकट आश्वासनाकरितां कर्माचें आचरण करूं नका. डोईवर कांहीं मोठीशी जोखीम किंवा उपाधी आहे असें मानूं नका. कांहीं बक्षिसाची आशा करूं नका. **'जाते घडि ही अपुली साधा, करा काय तें अतां करा!'**

लोक ह्मणतात प्रथम योग्यता मिळवा, आणि नंतर इच्छा करा. वेदान्त ह्मणतो, फक्त योग्यता मिळवा, इच्छा करण्याची गरज नाहीं. भिंतीच्या उपयोगाचा दगड कधीं रस्त्यांत सांपडावयाचा नाहीं ! जर तुमच्या अंगीं पात्रता येईल, तर अनिवार्य ईश्वरी नियमाप्रमाणें हरएक वस्तु तुह्मांपाशीं येईल. दिव्यानें फक्त जळत राहावें, पतंगांनां आमंत्रण देण्याची त्याला जरूरी नाहीं. पतंग आपण होऊनच दिव्याभोंवतीं जमतील. जेथें एकादा जीवंत झरा आहे तेथें लोक आपण होऊनच जमतात, झऱ्याला त्यांची कसपटाएवढीहि काळजी करावी लागत नाहीं. जेव्हां चंद्रोदय होतो तेव्हां लोक चांदण्याचें सौख्य अनुभविण्यास बाहेर येतात. ठोका, धोशा लावा, इतका उद्योग करा, कीं, देहाचें मिथ्यात्व आणि आत्म्याचें सत्यत्व हीं अनुभवितां येतील. अशा रीतीनें दृश्य व्यवसायाची पराकाष्ठा केली असतां, तुह्मांला निर्वाण अगर कैवल्य-पदाचा स्वाद चाखावयास मिळेल, आणि जेव्हां अशा रीतीनें तुह्मी आपलें व्यक्तित्व आणि अहंकार कर्माच्या क्रुसावर चढवाल, तेव्हां यश तुह्मांला शोधीत येईल आणि तुमची योग्यता जाणणाऱ्या लोकांचीहि वाण पडणार नाहीं. जोपर्यंत ख्रिस्त जीवंत होता, तोंपर्यंत लोकांनीं त्याला मानलें नाहीं. पूजला जाण्यापूर्वीं त्याला क्रुसावर चढावें लागलें. सत्य जरी चिरडून जमीनदोस्त केलें तरी तें पुनः उठेलच. कोणतेंहि बीज, त्याचें रूप व आकार यांचा नाश झाल्याविना, उगवून वाढणार नाहीं. ह्मणून उत्कर्षाची दुसरी आवश्यक गोष्ट स्वार्थ-त्याग-अहंकारास क्रुसावर चढविणें-किंवा त्याग होय. ‘ त्याग ’ शब्दाच्या अर्थाचा घोंटाळा करूं नका. ‘ त्याग ’ ह्मणजे देहदंडन नव्हे !

प्रत्येकाला, शुभ्र, चकचकीत, कांतिमान् आणि तेजःपुंज व्हावेंसें वाटतें. तुह्मी प्रभावशाली कसे व्हाल ? पदार्थ पांढरे कां दिसतात ? पांढऱ्या वस्तूंकडे जरा पहा. त्यांनां हा पांढरेपणा कशानें येतो ? आधिभौतिक शास्त्रें तुह्मांला असें सांगतात, कीं **त्याग** हेंच शुभ्रतेचें गुह्य आहे, त्याशिवाय कांहीं नाहीं. सूर्यकिरणाचे सातहि रंग निरनिराळ्या पदार्थांवर येऊन

आदळतात. कांहीं पदार्थ ते रंग शोषून घेतात आणि बहुतेक रंग आपल्याशींच ठेवून एकच परत टाकून देतात. हे पदार्थ जो रंग ते आपल्याला न ठेवितां परत देतात, त्यानेंच ते ओळखले जातात. या झग्याला तुह्मी गुलाबी ह्मणतां, परंतु हाच रंग त्या झग्यांत नाहीं. त्यानें जे इतर शोषून घेतले आहेत, जे खरोखर त्यामध्यें आहेत, ते त्याचे आहेत असें तुह्मी ह्मणत नाहीं. किती विलक्षण हें ! काळे पदार्थ सूर्यकिरणांतील सर्व रंग शोषून घेतात, कोणताच रंग परत देत नाहींत, ते कशाचाहि त्याग करीत नाहींत, ते कांहींहि टाकून देत नाहींत ह्मणून ते काळे कुळकुळीत असतात. पांढरे पदार्थ कांहींहि शोषून घेत नाहींत, ते कशावरहि हक्क ठेवीत नाहींत, ते सर्वांचा त्याग करितात, स्वार्थानें ते कांहीं बाळगून ठेवीत नाहींत, धनीपणाचा बाणा त्यांच्यामध्यें नसतो आणि ह्मणून ते शुभ्र, चकचकीत, कांतिमान् आणि तेजःपुंज दिसतात.

त्याचप्रमाणें जर तुह्मांला यशस्वी आणि प्रभावशाली व्हावयाचें असेल, तर तुह्मांला आपल्या अंतःकरणांतील स्वार्थी धनीपणाची वृत्ति टाकून दिली पाहिजे. तेवढें एक तुह्मीं सोडून दिलें पाहिजे. नेहमीं देणारे व्हा, निरपेक्ष सेवा करणारे व्हा, याचनेची आशाळभूत वृत्ति मनामध्यें येऊं देऊं नका. कोणत्याहि गोष्टीचा मक्ता आपल्याकडेच घेण्याची हांव सोडून द्या. आपल्या फुप्फुसांत असणाऱ्या हवेवर तुह्मीं आपलीच मालकी काय ह्मणून सांगावी ? ती हवा सर्वांच्याच मालकीची आहे. उलटपक्षीं, जेव्हां तुह्मी आपल्या फुप्फुसांतील थोड्याशा हवेवरील आपला हक्क सोडतां, तेव्हां सर्व वातावरणाचे धनी होतां, व तुमचीं साधनें ( Resources ) असंख्य होतात. आंत श्वास घ्या, सर्व विश्वांतील प्राण शोषून घ्या. गर्विष्ठ होऊं नका, अहंमन्य होऊं नका. तुमच्या क्षुद्र व्यक्तित्वाच्या मालकीचें कांहीं आहे असें मानूं नका. सर्व कांहीं **ईश्वराचें—आत्म्याचें** आहे. सर आयझॅक न्यूटनचें उदाहरण घ्या. सर्व जगाच्या दृष्टीनें तो इतका हुषार, विद्वान् आणि कुशाग्रबुद्धीचा कसा झाला ? ज्या भावनेनें त्यानें जन्मभर काम केलें होतें, ती त्याच्या अंतकालीं सर्वांनां कळून आली. तूं सर्व जगांत मोठा मनुष्य आहेस ह्मणून जेव्हां त्याची कोणीं स्तुति केली,

तेव्हां तो ह्मणाला " छे, छे, माझी बुद्धि अथवा माझें क्षुद्र व्यक्तित्व ह्मणजे अगाध ज्ञानोदधीच्या किनाऱ्यावरील गारगोट्या वेंचणारें यःकश्चित् लहान पोरच होय !" अद्याप तो गारगोट्या वेंचीत किनाऱ्यावरच होता. यावरून आह्मांला असें दिसून येतें, कीं, निरभिमानपणाची वृत्ति, जी कशावर आपला हक्क सांगत नाहीं व जी आपल्या क्षुद्र व्यक्तित्वाचें स्तोम माजवीत नाहीं, तीच वृत्ति तुमची कर्तृत्वशक्ति आणि सामर्थ्य उत्तम रीतीनें वाढविते, आणि हेंच वेदान्ताचें मुख्य लक्षण होय.

तुह्मांला वासना असतात, सर्व तऱ्हेच्या वासना असतात, आणि त्या सर्व तृप्त व्हाव्या अशी तुमची इच्छा असते; परंतु सर्व वासना तृप्त करून घेण्याचें गुह्य अवगत करून घ्या. खिडकीची झडप आह्मी कशी वर उचलतों ? ती झडप आह्मांला वर करावयाची असते, परंतु आपणास ती खालीं ओढून सोडून द्यावी लागते; मग तेव्हांच ती झडप वर जाते. सर्व वासनांच्या तृप्तीचें गुह्य यांमध्यें दाखविलें जातें. **जेव्हां तुह्मी वासना सोडून देतां, तेव्हांच ती फलद्रूप होते.** बाण कसे मारतात ? आपण धनुष्य हातीं घेतों आणि तें वांकवितों. जोपर्यंत आह्मीं धनुष्याची दोरी ताणलेली असते, तोंपर्यंत बाण शत्रूला लागावयाचा नाहीं. दोरी आह्मीं कितीहि ताणून धरिली, तरी बाण आपल्याजवळच राहणार. जेव्हां आपण ती सोडून देतों तेव्हांच बाण सूं करीत जातो आणि शत्रूचें हृदय भेदतो. त्याप्रमाणें जोंपर्यंत तुह्मी आपली वासना ताणून ठेवतां, जोंपर्यंत इच्छा बाळगतां, कामना धरितां आणि वासनांकरितां झुरतां, तोंपर्यंत ती इतराच्या हृदयांत प्रवेश करणार नाहीं. जेव्हां तुह्मी ती सोडून देतां, तेव्हांच ती दुसऱ्याच्या आत्म्याशीं जाऊन भिडते. "जेव्हां तुह्मी मला सोडून देतां व गमावितां, तेव्हांच मी तुह्मांला तुमच्या शेजारीं आढळेन." जेव्हां तुह्मी आपल्याला आपणा उभयतांहून भिन्न अशा अनिर्वचनीय स्थितींत ( मनोवृत्तींत ) ठेवितां, तेव्हांच तुह्मी मला मिळवूं शकाल. आणि, वेदान्त तुह्मांला हेंच सांगतो.

दोन यति मिळून प्रवास करीत होते. त्यांपैकीं एक आपल्या आचरणांत परिग्रहाचें तत्व पाळीत असे. दुसरा त्यागी होता. परिग्रह

आणि त्याग या विषयांवर वादविवाद करीत ते एका नदीच्या किनाऱ्यापाशीं आले, तोंच, बरीच संध्याकाळ झाली. जो मनुष्य त्यागाची महती गात होता, त्याच्याजवळ पैसे नव्हते; परंतु दुसऱ्याजवळ होते. त्यागी ह्मणाला "आह्माला शरीराची काय पर्वा ? नावाड्यास द्यावयास आमच्याजवळ पैसे नाहींत. देवाचें नामस्मरण करीत ही रात्र या तीरावरच काढूं या."

पैसेवाला यति ह्मणाला "आह्मी जर नदीच्या या तीरावर राहिलों, तर येथें गांव नाहीं, वाडी नाहीं, झोंपडी नाहीं व कोणाची सोवत नाहीं; लांडगे आह्मांला फाडून खातील, सर्प दंश करतील, अथवा थंडीनें आह्मी कुडकुडून जाऊं; यास्तव आपण पैलथडीला गेलेलें चांगलें. पैलथडीला आह्मां दोघांनां नेण्याकरितां लागणारा पैसा मजपाशीं आहे. पलीकडच्या बाजूला एक खेडेगांव आहे, तेथें आपण सुखानें राहूं."

इतक्यांत होडीवाला तेथें आला व त्यानें त्या दोघांनां पैलतीरास नेलें. रात्रीच्या वेळीं भाडें चुकतें करणारा यति त्यागी संन्याशाची कानउघाडणी करूं लागला, कीं "पैसा जवळ बाळगल्यानें होणारा फायदा तुला आतां तरी कळून आला कीं नाहीं ? पैसा जवळ बाळगला ह्मणून दोन जीव वांचले. याउपर त्यागाचा उपदेश तूं करूं नको. तुझ्यासारखाच मीहि जर त्यागी असतों, तर आपण दोघेहि नदीच्या त्या तीरावर उपाशीं पडलों असतों, थंडीनें कुडकुडून गेलों असतों, किंवा मारले गेलों असतों."

यावर त्यागी यति ह्मणाला "तूं तो पैसा तुजजवळच ठेविला असतास, त्याला तूं अंतरला नसतास, त्या नावाड्याला देऊन टाकला नसतास, तर आह्मी त्या दुसऱ्या तीरावर मेलों असतों. याप्रमाणें पैसा देऊन टाकण्यानेंच अथवा त्यागानेंच आह्मी सुरक्षित राहिलों. जरी मीं माझ्या खिशांत पैसा ठेविला नाहीं, तरी तुझा खिसा हा माझाच खिसा झाला. माझ्या श्रद्धेनें त्याच ( तुझ्याच ) खिशांत मजकरितां पैसे ठेविले. मला कधींहि कांहीं कमी पडत नाहीं. जेव्हां कधीं मला कोणत्याहि वस्तूची गरज लागते तेव्हां ती मला पुरविली जाते."

या गोष्टीवरून असें दिसून येतें, कीं, जोंपर्यंत तुह्मी आपल्या वासना अथवा इच्छा आपल्या खिशांत बाळगतां, तोंपर्यंत तुह्मांला निर्भयता(सुख)

व शांति प्राप्त होत नाहीं. तुमच्या इच्छा सोडून द्या. त्यांच्यापलीकडे तुह्मी चला, ह्मणजे तुह्मांला दुप्पट शांति—तत्कालिक विश्रांति आणि अंतीं सर्व कामनांची पूर्ति लाभेल. वासना सोडून देऊन जेव्हां तुह्मी तुमच्या **सत्य ( ब्रह्म ) स्वरूपांत** रहाल, तेव्हां तुमच्या कामना पूर्ण होतील. लक्ष्यांत ठेवा, कीं, ज्या वेळीं तुह्मी **परमात्मस्वरूपांत**, कळत किंवा नकळत लीन व्हाल, तेव्हांच तुमची कामना सफल होण्याची वेळ येऊन ठेपेल.*

## उत्कर्षाचें तिसरें तत्त्व—प्रेम.

उत्कर्षाचें तिसरें तत्व प्रेम—विश्वाशीं ऐक्यभाव व परिस्थितीशीं अनुरूप होणें, हें होय. प्रेम याचा अर्थ काय? प्रेम याचा अर्थ आपले शेजारी व ज्यांशीं ज्यांशीं आपला संबंध येतो, त्या सर्वांशीं आपलें ऐक्य आहे, हें आपल्या आचरणांत अनुभविणें होय. जर तुह्मी दुकानदार असलां, तर तुमच्या गिऱ्हाइकांचें हित तेंच तुमचें हित आहे हें जोंपर्यंत तुह्मांला पटत नाहीं, तोंपर्यंत तुह्मांला व्यापारांत बरकत यावयाची नाहीं, आणि तुमचा धंदा खराब होऊन जाईल. हात जर आप्पलपोटेपणानें शरीराच्या इतर अवयवांहून आपणांस भिन्न मानून असें तर्कशास्त्र लढवील, कीं ‘असें पहा, मी उजवा हात आहें, सर्व तऱ्हेचे श्रम मी करितों, मग मीं जें काबाडकष्ट करून निढळाच्या घामानें मिळविलेलें आहे तें सर्व शरीराला काय ह्मणून मिळावें? मीं श्रम करून मिळविलेलें अन्न प्रथम पोटाकडे जाऊन तेथून नंतर इतर इंद्रियांस कां मिळावें? छे, छे, तें मी मजकडेच ठेवीन!’ तर तें अन्न कातड्यामध्यें टोंचून भरल्याशिवाय किंवा इनाक्युलेट करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं; परंतु असें करणें त्या हाताला हितावह होईल काय? या मार्गानें हाताला इष्ट सिद्धि प्राप्त होईल काय? अशक्य—

* ज्याची आशा निःशेष जाये। तोचि परम सुख लाहे। ब्रह्मादिक वंदिती पाये। अष्टमा सिद्धि राहे दासीत्वें॥ निराशेपाशीं न ये आधि। निराशेपाशीं सकळ विधि। सच्चिदानंदपदीं। मिरवे त्रिशुद्धीं निराशू॥

एकनाथी भागवत, अध्याय ८.

“**आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम्**॥” या श्लोकावरील वरील दोनच ओंव्या नमुन्यासाठीं दिल्या आहेत. जिज्ञासूंनीं हें सर्व प्रकरण वाचावें.

केव्हांच मिळणार नाहीं! एका तऱ्हेनें मात्र तो हात बराच लठ्ठ होऊं शकेल. तो एकटाच इतका लठ्ठ होईल, कीं, शरीराच्या इतर भागांना त्याचा हेवा वाटूं लागेल. त्या हातानें एकादा डांस, एकादी मधमाशी अथवा एकादा सर्प घेऊन त्याकडून स्वतःस डसवून घ्यावें. या युक्तीनें हात बराचसा मोठा लठ्ठ होईल. याच रीतीनें मात्र हाताचा अप्पलपोटेपणा तडीस जाईल, व ह्याचप्रमाणें हाताचें स्वार्थी तत्त्वज्ञान सिद्धीस जाईल; परंतु हें किती अनिष्ट आहे. अशा तऱ्हेची तृप्ति किंवा अशा तऱ्हेचें यश आह्मांला नको आहे. 'सुजलियाचें मोठेपण' हा रोग होय. तद्वत्च हें लक्ष्यांत असूं द्या, कीं, हें सर्व जग एक शरीर आहे. तुमचें शरीर दांताप्रमाणें किंवा बोटाप्रमाणें किंवा त्याच्या नखाप्रमाणें एक अवयव आहे. यासाठीं आपला उत्कर्ष होण्याची इच्छा असेल, तर आपला आत्मा विश्वाच्या आत्म्याहून अलग आणि भिन्न आहे असें तुह्मीं समजतां नये. हाताचा उत्कर्ष व्हावयाचा असेल तर त्यानें आपले व शरीराचे हितसंबंध अभिन्न आहेत असें अनुभविलें पाहिजे. निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास, हाताला आपला आत्मा मनगटाच्या पलीकडील प्रदेशांतच नसून शरीराच्या सर्व भागांशीं आपलें ऐक्य आहे, असें उमगलें पाहिजे. सर्व शरीराच्या आत्म्याला पोसणें ह्मणजे हातांतील आत्म्याला पोसण्यासारखें आहे. विश्वाशीं आपलें ऐक्य आहे, देव व आपण एकच आहों, हें तत्त्व पूर्णपणें समजल्याशिवाय व आचरणांत आल्याशिवाय तुमचा उत्कर्ष होणार नाहीं. भिन्नत्व आणि द्वैत यांच्या कातीमध्यें सांठवले जाल, तर तुह्मी स्वास्थ्यरहित, व्याधिग्रस्त व्हाल. जेव्हां तुह्मी सर्व आणि समष्टिरूप व्हाल, तेव्हांच पूर्णता पावाल. हें एकत्व अनुभविल्यानें वेदान्त आचरणांत येतो. या उच्च आणि उदात्त तत्वाचें जर का अतिक्रमण कराल, हा पवित्र कायदा आचरणांत मोडाल, तर त्या मूर्ख आप्पलपोट्या हाताप्रमाणें तुह्मांला या पापकर्माबद्दल शिक्षा भोगावी लागेल. कोलरिज्जनें आपल्या 'एन्शंट म्यारिनर' मध्यें व बायरननें आपल्या 'प्रिझनर आफ चिलॉन' मध्यें तें तत्त्व उत्तम रीतीनें प्रतिपादिलें आहे. या कवितांमध्यें त्यांनीं असें सिद्ध

केलें आहे, कीं, जेव्हां मनुष्य निसर्गाच्या ऐक्याच्या तंत्राबाहेर जातो, तेव्हां त्याला दुःख भोगावें लागतें. जेव्हां तुह्मी आपल्या बांधवांशीं आपलें ऐक्य अनुभवितां, तेव्हांच तुमचा अभ्युदय खात्रीनें होतो.

**नरावरि करी प्रेम पक्ष्यावरि पशूवरी ।**
**तोचि तो भक्ति देवाची शुद्धभावें करी खरी ॥ १ ॥**
**थोर सान नसे ज्याला समप्रीती तयांवरी ।**
**तोचि तो भक्ति देवाची शुद्धभावें करी खरी ॥ २ ॥**

एकदां एक राजा मृगयेकरितां वनांत गेला. तेथें सावजांचा पाठलाग करतां करतां त्याची व त्याच्या मंडळीची ताटातूट झाली. सूर्याच्या प्रखर किरणांमुळें तो तृषाक्रांत झाला. त्या अरण्यामध्यें त्याला एक लहानसें उपवन दिसलें, त्यांत तो शिरला; राजा शिकारीच्या पोषाखांत असल्यामुळें व माळ्यानें राजाला पूर्वीं कधीं पाहिलें नसल्यामुळें राजाची त्या माळ्याला ओळख पटली नाहीं. "आपण तृषाक्रांत आहों, कांहीं प्यावयास आण," असें राजानें त्याला सांगितलें. माळी एकदम बागेंत गेला आणि कांहीं डाळिंबें काढून तीं पिळून त्यांचा एक प्यालाभर रस राजाकडे घेऊन आला. राजा तें घटाघट प्याला, परंतु त्यानें त्याची सर्व तहान भागली नाहीं. डाळिंबाचा आणखी थोडा रस आणावयास राजानें त्याला सांगितलें. माळी रस आणण्याकरितां निघून गेला. माळी गेल्यानंतर राजा आपल्या मनांत विचार करतो 'ही बाग मोठी समृद्ध दिसते. एका क्षणांत डाळिंबाचा प्यालाभर रस त्याला आणितां आला. या बागेच्या मालकावर जबर कर बसविला पाहिजे,' इत्यादि इत्यादि. तिकडे त्या माळ्याला फार उशीर लागला. तास झाला तरी तो परत येईना. राजाला आश्चर्य वाटलें, कीं, प्रथम मीं जेव्हां त्याच्यापाशीं कांहीं प्यावयास मागितलें तेव्हां त्याला एका क्षणांत प्यालाभर रस आणितां आला, आणि आतां जवळ जवळ एक तास तो रस काढीत आहे तरी प्याला कांहीं भरत नाहीं, हें कसें ? तासाभरानें माळ्यानें राजाजवळ प्याला आणला, पण तो पुरा भरलेला नव्हता. पहिल्यानें प्याला इतक्या लवकर भरला, परंतु आतां तो थोडा रिकामा आहे, याचें कारण राजानें विचारलें. माळी

मोठा ज्ञानी होता. त्यानें उत्तर केलें, कीं, "जेव्हां पहिल्यानें मी आपल्या-करितां डाळिंबाचा रस आणावयास गेलों, तेव्हां राजाची बुद्धि चांगली होती; परंतु जेव्हां मी दुसरा प्याला आणावयास गेलों, तेव्हां राजाचा कृपाळु आणि प्रजावत्सल स्वभाव बदलला असला पाहिजे. माझ्या रसभरित डाळिंबांमध्यें इतका एकाएकीं फरक कां व्हावा, याचें दुसरें कारण मला देतां येत नाहीं!"

राजानें आपल्या मनांत विचार केला, तों, त्याचें ह्मणणें अक्षरशः खरें ठरलें. जेव्हां राजानें प्रथम त्या बागेंत पाऊल ठेविलें, तेव्हां तेथील लोक गरीब असल्यामुळें त्यांनां मदत हवी आहे, असे दयेचे आणि प्रेमाचे विचार त्याच्या मनामध्यें होते; परंतु जेव्हां त्या ह्मातान्या माळ्यानें एवढ्या थोड्या अवधींत इतका रस आणिला, तेव्हां राजाचें मन बदललें व दृष्टि पालटली. राजाचें विश्वाशीं असलेलें ऐक्य नाहींसें होतांच त्याचा बागेंतील डाळिंबांवर परिणाम झाला. प्रेमतत्त्वाचा राजानें भंग करितांक्षणींच डाळिंबाच्या वृक्षांनीं आपला रस या राजापासून आखडून धरिला.

गोष्ट खरी असेल किंवा खोटी असेल, आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं; परंतु हें तत्त्व निर्विवाद आहे, कीं, जोंपर्यंत निसर्गाशीं तुमचें पूर्ण सख्य आहे, जोंपर्यंत विश्वाशीं तुमचें ऐक्य आहे, जोंपर्यंत तुह्मी स्वतःचें, प्रत्येकाशीं आणि सर्वांशीं आपलें अभिन्नत्व पाहतां, तोंपर्यंत सर्व उपाधि व परिस्थिति, लाटा आणि वायु देखील तुह्मांला अनुकूल होतील. आणि ज्याक्षणीं सर्वांशीं तुमचें पटेनासें होईल, त्याक्षणींच तुमचे सुहृद्बांधव तुमच्या उलट होतील आणि त्याक्षणींच तुह्मी सर्व जगाला आपल्यावर शस्त्र धरावयास लावाल. प्रेमाचें हें दिव्य तत्त्व समजून घ्या व त्याप्रमाणें आचरण करा. प्रेम उत्कर्षाची जीवनकला आहे!

## उत्कर्षाचें चवथें तत्त्व—उल्हास अगर प्रसन्नता.

उत्कर्षाचें चवथें तत्त्व उमेद किंवा उल्हास हें होय. उमेद किंवा उल्हास कसा टिकतो? आनंदी रहा, चित्तवृत्ति शांत ठेवा, प्रसंगावधान असूं द्या, असें ह्मणणें सोपें आहे; परंतु सर्व परिस्थितीमध्यें आनंदी, उल्लसित आणि सावधान असणें किती तरी कठिण आहे. फक्त

नियम घालून दिल्यानें तुह्मी आनंदी होऊं शकत नाहीं. कृत्रिम उपायांनीं तुह्मांला कांहींहि करतां यावयाचें नाहीं. मग आह्मीं स्वतःस आनंदी कसें ठेवावयाचें ? तुमची मनःस्थिति कशावर अवलंबून असते ? वेदान्त सांगतो, कीं, जेव्हां आपण सच्चिदानंदस्वरूपाच्या शिखरावरून देहात्मत्व, अहंकार, वासना यांपर्यंत खालीं उतरतों, तेव्हां आपली चित्तवृत्ति चंचल होते. आपण खिन्न आणि उदास होतों. अशा वेळींच आपल्या मनाची समता विघडते. पोटांत बिघडलें ह्मणजेच आपल्याला पोट आहे असें लक्ष्यांत येतें. पडसें झालें असतां आपणास नाक आहे असें वाटूं लागतें. हात दुखावला असतां तो आहे अशी आठवण होते. त्याचप्रमाणें जेव्हां आपलें आध्यात्मिक आरोग्य विघडतें, तेव्हांच आपल्याला आपल्या व्यक्तित्वाची, क्षुद्र अहंकाराची आणि देहाची शुद्धि येते. गुरफटून टाकणारी आपल्या देहावरील आसक्ति, व व्याप वाढविणारी आपल्या क्षुद्र व्यक्तीविषयीं जोपासना, यामुळेंच दुःखकारक आध्यात्मिक अस्वास्थ्य प्राप्त होतें. शारीरिक दौर्बल्य आपणास भासूं लागतांच आपण नंदनवनापासून च्युत होतों. द्वैत आणि भेद यांच्या वृक्षाचें फळ चाखतांच स्वर्गांतून आपणांला खालीं लोटून दिलें जातें, परंतु जडदेहास ( देहात्मबुद्धीस ) क्रुसावर चढविल्यानें गेलेलें नंदनवन आपणास परत मिळवितां येतें. देहात्मत्व आणि अल्प, क्षुद्र, नीच, कोत्या, अधम वासना यांच्यापलीकडे गेल्याबरोबर तुह्मांला आपली समता आणि उल्लसित वृत्ति परत मिळते.

एवंच, तुह्मांला जर उल्हास आणि उमेद हीं मिळवावयाचीं असलीं, तर तुह्मांला वेदान्ताचें प्रधान तत्त्व–तुमचा आत्मा हेंच काय तें एक घनदाट सत्य आहे हें त्रिकालाबाधित तत्त्व–आचरणांत आणिलें पाहिजे.

तुमच्या आत्म्यामध्यें तुह्मी मुरून गेलां ह्मणजे दृश्य जगाचा सर्व पसारा विरळ होईल, तुह्मांला वाटेल तो आकार त्याला देतां येईल, किंवा ( कापराप्रमाणें ) तो उडून जाईल. मी देह नव्हें, सर्व दैहिक व्याप, संबंध आणि बंधनें हीं नुसतीं खेळणीं होत. हीं सर्व रंगभूमीवरील पात्रांचीं कामें होत. रंगभूमीवरील एक पात्र या दृष्टीनें एकादा मनुष्य माझा शत्रु असतो, दुसरा एकादा माझा मित्र होतो, कोणी माझा पिता होतो, तर कोणी माझा पुत्र होतो; परंतु वस्तुतः मी पुत्रहि नाहीं व पिताहि नाहीं.

ते शत्रुमित्र खरोखर शत्रुमित्र नाहींत. मी केवळ ब्रह्म आहें. सांसारिक संबंध आणि बंधनें मला बाधूं शकत नाहींत. सर्व संबंध मायिक आहेत. रंगभूमीवरील प्रत्येक पात्रानें आपली भूमिका चोख वठविली पाहिजे; परंतु जो नाटकांतील प्रेम आणि द्वेष खरा समजून आपल्या स्वतःला लावून घेतो तो शुद्ध वेडाच होय. त्याचप्रमाणें सर्व जग जर नाटकांतील देखावा आहे, तर कर्तव्याच्या बाह्य स्वरूपाला मीं फाजील महत्त्व कां द्यावें? एकादा राजा असला तर त्याचा हेवा कां करावा? दुसरा जर रंक असला तर त्याचा तिरस्कार तरी काय ह्मणून करावा?

**उच्च नीच स्थिती माजी। नसे मानापमानही।**
**स्वकर्तव्य करा नीट। सर्व मान तिथें असे ॥ १ ॥**

वेदान्त तुह्मांला असें शिकवितो, कीं, तुमच्या परिस्थितीची तुह्मीं फारशी पर्वा करितां कामा नये. तत्त्व ( कायदा ) समजून घ्या आणि सर्व भय टाकून द्या. समजा, एक न्यायाधीश आहे. तो न्यायमंदिरांत येतो व आपल्या स्थानावर आरूढ होतो. पक्षकार, कारकून, वकील, नोकरचाकर आणि इतर लोक पूर्वींच त्याची तेथें वाट पहात असलेले त्याला आढळतात. न्यायाधिशाला साक्षीदारांस बोलावणें पाठवायास नको, वकीलांनां निमंत्रण द्यावयास नको, किंवा वादीप्रतिवादींनां जाऊन बोलावून आणण्यास नको. माजिस्ट्रेटला खोल्या झाडणें, साफ करणें, बैठक घालणें इत्यादि गोष्टी कराव्या लागत नाहींत. न्यायाधिशाच्या आगमनानेंच सर्व कांहीं सुरळीत चालतें. जसें सूर्याच्या उगवण्यानेंच सर्व सृष्टि जागृत होते, नद्या, वनस्पति, पशुपक्षी व मनुष्यें यांनां आल्हाद होतो, त्याचप्रमाणें जेव्हां तुह्मी सत्यस्वरूपामध्यें आपलें ठाणें मांडाल, तेव्हां तुह्मी निःपक्षपाती वरिष्ठ न्यायाधिशाच्या–आपल्या आत्म्याच्या जागीं स्वतःस अधिष्ठित कराल. जेव्हां तुमचा दिव्य आत्मा आपल्या सर्व ऐश्वर्यानें प्रकाशूं लागेल, तेव्हां सर्व परिस्थिति आपोआप स्वतःची तजवीज पाहील, आणि तुमच्या सान्निध्याच्या सुखावह प्रकाशानें सर्व वस्तु उल्लसित आणि सुव्यवस्थित होतील.

श्रीरामचंद्राविषयीं असें सांगतात, कीं, जेव्हां तो सीता ( आत्मविद्या ) परत मिळविण्याकरितां निघाला, तेव्हां सर्व सृष्टि त्याच्या सेवेस तत्पर झाली.

त्याच्या पक्षाला मिळावें ह्मणून माकडें, हंस, खारी आणि दगड, हवा, पाणी वगैरे देखील एकमेकांशीं स्पर्धा करीत होतीं. विषयपंकांत मग्न करणारी आसक्ति, आणि अधोगतीस नेणारा द्वेष, यांनां टाकून देऊन आपल्या आत्म्याच्या वैभवानें व ऐश्वर्यानें विलसंत रहा, आणि मग जर देव व यक्षकिन्नरादि बंद्या गुलामाप्रमाणें तुमची सेवा करणार नाहींत, तर त्यांची धडगत लागणार नाहीं. प्रत्येक मनुष्य बालकाचा इतका खिजमतगार कां बनतो? हा आमचा चिमुकला जुलमी राजा बलिष्ठांच्या खांद्यावर आरूढ होतो, व सन्मान्यांचेहि डोईचे केंश उपटतो, हें कसें? याचें कारण, लहान मूल हें परिस्थितीपासून अलिप्त व नकळत ब्राह्मी स्थितींत रहात असतें.

जर तुह्मीं आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावीत रहाल, जर तुह्मी आपल्या कार्याशीं इमानानें वागाल, तर मग बाह्य मदत व साहाय्य याविषयीं चिंता वाहण्याचें कारण नाहीं. मदत तुह्मांला मिळालीच पाहिजे, ती तुह्मांला शोधित आलीच पाहिजे. जेव्हां तुह्मी एकादें भाषण कराल, आणि त्यामध्यें संग्रहीं ठेवण्याजोगा कांहीं भाग असेल, तेव्हां तें कोण उतरून घेईल, कोण प्रसिद्ध करील, वगैरे काळजी वाहूं नका. न्यायाधिशाची वृत्ति धारण करा. आपल्या मूळच्या मोठेपणामध्यें—प्रभावामध्यें—स्थिर व्हा. बाह्य गोष्टी आणि परकीयांची मदत यांविषयींच्या हुरहुरीमुळें आपली उल्लसित वृत्ति बिघडूं देऊं नका.

जर शरीराच्या कोणत्याहि भागास खाज सुटली, तर खाजविण्यासाठीं हात आपोआप तिकडे जातो. हातामध्यें वास करणारी शक्ति किंवा आत्मा खाज उठलेल्या जागीं वास करणाऱ्या शक्तीहून किंवा आत्म्याहून भिन्न नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि पण लक्ष्यांत असूं द्या, कीं, तुमच्यामधील आत्मा व सभोंवतालच्या सर्व पदार्थांमधील आत्मा एकच आहे; आणि जेव्हां तुमच्यामधील आत्मा हा सर्वव्यापी आत्म्याशीं ( परमात्म्याशीं ) सख्यानें स्फुरण पावतो, आणि जेव्हां हें जग तुह्मांला तुमचें शरीरच वाटतें, तेव्हा ज्याप्रमाणें खाज उठलेल्या जागीं हात आपोआप जातो, त्याप्रमाणें सर्व बाह्य मदती आणि साहाय्यें तुमच्याकडे आपोआप धावत येतील.

जेव्हां आपण आपली छाया धरावयास तिच्या मागें धावतों, तेव्हां ती कधीं सांपडत नाहीं. ती आमच्यापुढेंच नेहमीं पळत राहते; परंतु जेव्हां आपण छायेकडे पाठ करून सूर्याकडे धांवतों, तेव्हां ती कुत्र्यासारखी आपल्या मागून येते. तद्वत्च या बाह्य पदार्थांच्यामागें तुह्मी लागतांक्षणींच आणि त्यांनां धरून आपणाकडे ठेवण्याचा प्रयत्न करतांक्षणींच ते तुमच्या तावडींतून निसटतात आणि दूर पळतात; परंतु ज्याक्षणीं तुह्मी त्यांच्याकडे पाठमोरे होऊन सर्व प्रकाशाचा प्रकाश जो अंतरात्मा, त्याकडे सन्मुख व्हाल, त्याक्षणींच सुस्थिति तुह्मांला शोधीत येईल, असा सृष्टीचा कायदाच आहे.

पुष्कळ लोक 'कर्तव्यकर्म' हा शब्द ऐकतांच फिके पडतात व गर्भगळित होतात. कर्तव्यकर्म एकाद्या बागुलबोवाप्रमाणें त्यांनां पछाडतें, त्यांनां झोडीत सुटतें, व त्यांनां क्षणभरहि फुरसत किंवा विसावा मिळं शकत नाहीं. सदोदित तें त्यांच्यामागें लागलेलें असतें. असे घाई करणारे दास, नव्हे कर्तव्यकर्मांचीं यंत्रें, गतीमध्यें (घाई करण्यामध्यें) जें मिळवितात, तें शक्तीमध्यें घालवितात. कर्तव्यकर्माच्या भावनेनें आपली समता बिघडवून घेऊं नका, किंवा आपला उत्साह मावळूं देऊं नका. हें लक्ष्यांत ठेवा, कीं, कोणतेंहि कर्तव्यकर्म झालें तरी तुह्मींच तें स्वतःवर लादून घेतलें आहे. वास्तविक पहातां तुमचे धनी तुह्मीच आहां. तुह्मीं होऊनच आपली जागा पसंत केली, तुह्मीं होऊनच चाकरी करण्याचें कबूल केलें, आणि तुह्मीं होऊनच वरिष्ठ तयार केले. तसेंच तुह्मांला जर त्यांच्या द्रव्याची जरूर आहे, तर त्यांनांहि पण तुमच्या चाकरीची-श्रमांची तितकीच आवश्यकता आहे. दोघांचें नातें बरोबरीचें आहे. कारण, आघात आणि प्रत्याघात हे सारखेच असतात. तुह्मी आपल्या इच्छेचीच सेवा करितां, इतर कोणाचीहि करीत नाहीं. तुमची सांप्रतची परिस्थिति तुह्मींच घडवून आणिली आहे, तुमच्या नात्यागोत्याचा गोत्रा तुमच्याच हातून उत्पन्न झाला आहे, आणि तुमचा भविष्यत्काल देखील तुह्मी कराल तसा होईल. तुमच्या नशीबाचे धनी तुह्मीच आहांत हें समजून घ्या. आनंदी व उल्हासी व्हा आणि समाधान माना.

कल्पनेवरी कल्पना । करूनियां स्वयें नाना ।
निजभविष्याची रचना । स्वयेंचि करितों ॥ १ ॥
तेणें येईल सुदशा । किंवा ग्रासील कुदशा ।
हें नेणवेचि अनात्मवशा । आपणातें ॥ २ ॥
कल्पनेचा उपक्रम । तें प्राक्तनाचें दुसरें नाम ।
निवडा निज प्राक्तन । परिणाम पहात बैसा ॥ ३ ॥
मनःकल्पित जगता- । वरी चाले मनाची सत्ता ।
व्हा शांत दांत धीर तत्वतां । सत्यनिष्ठ ॥ ४ ॥
भयाचें कारण भय । असेंचि तें कल्पनामय ।
तुमच्या हृदयींचा देव उदय । पावो झणीं ॥ ५ ॥
आणि ह्मणो तो दुःस्थितीतें । ऐक ऐक मदाज्ञेतें ।
तैंचि उज्ज्वल हेतु फलातें । पावेल कीं ॥ ६ ॥

एकाद्या रावणाऱ्या मजुराप्रमाणें कामाला न लागतां, एकाद्या राजकुमाराप्रमाणें मजेखातरची क्रीडा किंवा हितावह व्यायाम, अथवा गमतीचा खेळ ह्मणून काम हातीं घ्या. भयभीत वृत्तीनें कोणतेंहि काम हातीं घेऊ नका. आत्मविश्वास धरा. भूपति आणि सभापति ( President ) हे आपले केवळ नोकर आहेत, अशा धोरणानें वागा. तारकांप्रमाणें काम करा.

आकाशीं अनंत वस्तु सभोंवतीं । परि न तक्षिति तारकांसी ॥ १ ॥
पाहुनी तयांसी भय नच यांसी । कांहीं दुज्यापाशीं याचिती न ॥ २ ॥
ह्मणती न द्यावें प्रेम वा रंजन । दया वा दाक्षिण्य न मागती ॥ ३ ॥
गायनचि पारि–तोषिक गानाचें । रोमांचहि साचे आनंदाचे ॥ ४ ॥
अर्धोन्मीलित जी सुमनाची कळी । किंवा त्या कोकिळीं जाणिजे जें ॥५॥

जबाबदारी वाटूं देऊं नको. पारितोषिकाचीहि इच्छा धरूं नका. सर्व सत्ता तुमच्याहून गौण असली पाहिजे. तुमचें प्रमाण तुह्मीच. कर्तव्यबुद्धि आणि बाह्य अधिकार या मेघांनीं आच्छादिले जाऊं नका. बाह्य अधिकारानें घडवून आणलेली व्यवस्था फार झाली तर आकारशुद्ध आणि चारुरूप ( Geometrical ) होईल; परंतु जी व्यवस्था आपण स्वतः होऊन निर्माण करितों, ती सजीव व सचेतन होईल.

## उत्कर्षाचें पांचवें तत्त्व—निर्भयता.

निर्भयता या पांचव्या तत्त्वाकडे आतां आपण वळूं. निर्भयता ह्मणजे काय ? मायेवर अविश्वास, परंतु आपल्या आत्म्याविषयीं सानुभव ज्ञान व दृढ श्रद्धा. भीतीचें स्थान ह्मणजे शरीर तेंच आपण आहों अशी कल्पना केली, ह्मणजे आपणास भीति वाटते. आपला देह सदैव चिंतारूपी कीटकांनीं खाण्यास पात्र आहे. तो सर्व तऱ्हेच्या आधिव्याधींनां भेद्य आणि विध्य आहे. ज्या क्षणीं आपण देहाभिमान सोडून देतों, त्या क्षणींच भयापासून मुक्त होतों. ईश्वर होऊन रहा, वेदान्त आचरणांत आणा, मग तुह्मांला दुखविण्याची किंवा इजा करण्याची कोणाची छाती आहे ? निर्भयता आणि वेदान्त हे अभिन्न आहेत.

उत्कर्षाला निर्भयतेची काय आवश्यकता आहे याविषयीं स्वानुभवाच्या गोष्टीचें उदाहरण देतां येईल. एके वेळीं हिमाचलाच्या निबिड अरण्यांत एकाएकीं पांच रीस 'रामा'च्या अगदीं समोर आले; परंतु त्यांचा 'रामा'ला कांहीं उपसर्ग झाला नाहीं. याचें कारण काय ? तर फक्त निर्भयता. 'मी देह नाहीं, मी मन नाहीं, मी सर्वेश्वर आहें. परब्रह्म आहें. अग्नि मला जाळूं शकत नाहीं व शस्त्र मला छेदूं शकत नाहीं !' इत्यादि भावनांमध्यें 'राम' पूर्ण गढून गेला होता. ह्मणून त्या रीसांकडे टक लावून पहातांच ते पळून गेले. एके वेळीं तर एक हिंस्र लांडगा नुसत्या डोळे वटारण्यानें पिटाळून लाविला. दुसऱ्या एका वेळीं एक वाघ देखील असाच पळाला. जेव्हां एकादें मांजर येतें, तेव्हां खबूतरें आपले डोळे मिटतात. त्यांनां वाटतें, कीं, आपणास मांजर दिसत नाहीं, ह्मणून मांजरास देखील आपण दिसत नसूं. पण मांजर त्यांनां खाऊन सोडितेंच. भ्यालांत तर मांजरहि तुह्मांला खाऊन टाकील. पुष्कळदां तुह्मीं असें पाहिलें नाहीं काय, कीं, खेड्यांतून हिंडतांना भ्याल्याचें यत्किंचित्‌हि चिन्ह दाखवितांच कुत्रीं आपल्या अंगावर धावून येतात आणि आपणास त्रास देतात. आपण घाबरलों तर कुत्रीं देखील आपणास फाडून खातील. तेच आपण जर निर्भय असलों,

तर वाघसिंहावर देखील आपली सरशी होऊन आपण त्यांनां माणसाळून टाकूं. एका भांड्यांतून दुसऱ्या भांड्यामध्यें कोणताहि पातळ पदार्थ ओततांना आमचे हात जर यत्किंचित् कांपूं लागले, तर तो प्रवाही पदार्थ सांडतोच. कांहीं अनमान न करितां सहज निर्भयपणें दुसऱ्या भांड्यांत तो प्रवाही पदार्थ ओता, ह्मणजे एक बिंदुहि सांडणार नाहीं.

धरसोडीनें आणि भीतीनें तुह्मी आपणांवर दुःखद स्थिति ओढून आणितां. कोणत्याहि प्रसंगानें तुमचें स्वास्थ्य बिघडतां नये, किंवा तुह्मी चकित होतां कामा नये. सर्व कांहीं तुह्मीच आहां. देहावरील भयोत्पादक आसक्ति दूर करा. लोकरीच्या कपड्यामध्यें गुंडाळलेल्या चांगल्या दीडशें रत्तल मांसपिंडानें—मनुष्यानें एकाद्या क्षुल्लक फटाकडीच्या आवाजाला, लहानशा उंदराला, एकाद्या फडफडणाऱ्या पानाला, एवढेंच नव्हे तर एकाद्या चंचल छायेला देखील दचकावें, हें शोचनीय नव्हे काय ? **कोणतेंहि संकट संकटाच्या भीतीहून अधिक भयप्रद नसतें !** मरणाची भीति बाळगण्यापेक्षां मला मरण पत्करलें.

कोणी एक ह्मणतो "आपल्या मनामध्यें चालणारें नेच्याचें (walking fern) झुडूप असल्याशिवाय आपणांस तें बाहेर दिसणार नाहीं." तुमच्या मनांत जर प्रेम वसत असेल, तर तें तुह्मांला आढळेल. मनांत द्वेष बाळगल्यास तुह्मांला द्वेषच प्राप्त होईल. वंचकांची आणि हेरांची तुह्मांला भीति वाटल्यास त्यांचीहि तुह्मांला तूट पडणार नाहीं. जर आप्पलपोटेपणा आणि लबाडीच आपणास आढळेल अशा दृष्टीनें पाहूं लागलां, तर त्यांतहि तुमची निराशा होणार नाहीं. आप्पलपोटेपणा आणि लबाडी सर्व बाजूंनीं तुह्मांला घेरतील. ह्मणून भिऊं नका. स्वतःमध्यें शुद्धता आणि पावित्र्य आणा, ह्मणजे तुह्मांला कांहींहि अमंगल, अशुद्ध भेटणार नाहीं. **प्रापंचिक उत्कर्ष आणि पारमार्थिक उत्कर्ष ह्मणजे अभ्युदय व निःश्रेयस हीं जोडीनें चाललीं पाहिजेत.** यांची जे ताटातूट करतात, ते मूढ होत !

एकाद्या घरावर पहारा नसला ह्मणजे तें फोडून चोर आंत शिरतात. घरांत जर सर्वकाळ प्रकाश ठेविला, तर त्यांनां लपूनछपून आंत येण्याचें

धैर्य होत नाहीं. तुह्मीं आपल्या हृन्मंदिरांत सत्यदीपिका प्रज्वलित ठेवा, ह्मणजे भीति किंवा मोह यांचें पिशाच तुमच्या सन्निध येण्यास धजणार नाहीं. ईश्वरी कायद्यावर पूर्ण विश्वास ठेवा. व्यावहारिक ज्ञानावर अवलंबून राहून आपलें आयुष्य कष्टप्रद करून घेऊं नका. भ्याड दूरदार्शिपणा तुह्मांला पक्का नास्तिक बनवितो. परिस्थितीच्या धुक्यांनीं तुह्मी स्वतःस व्याप्त कां होऊं देतां ? तुह्मी सूर्याचेहि सूर्य आणि या सर्व विश्वाचे अधिपति नाहीं आहां काय ? परिस्थितीच्या अशा कोणत्या लहरि आहेत, कीं, ज्या तुह्मांला निरस्त करतां यावयाच्या नाहींत, टाकून देतां येणार नाहींत, सुकवून टाकतां येणार नाहींत ? कोणतीहि भयप्रद परिस्थिति अंशतः देखील खरी आहे असें मनांत देखील आणूं नका. तुह्मी निर्भय, निर्भय, निर्भय आहां !

## उत्कर्षाचें सहावें तत्त्व–स्वावलंबन.

उत्कर्षाचें सहावें तत्त्व स्वावलंबन होय. तुह्मांला ठाऊक आहे, कीं, हत्ती हा सिंहापेक्षां बराच मोठा प्राणी आहे. आणि हत्तीचें शरीर देखील सिंहाच्या शरीराहून अधिक बळकट दिसतें. तथापि एकच सिंह हत्तीच्या सबंध कळपाला पिटाळून लावतो ! सिंहाच्या या सामर्थ्यांतील इंगित काय आहे ? गुह्य एवढेंच आहे, कीं, सिंह आचरणामध्यें वेदान्ती आहे व हत्ती भेदवादी आहेत. हत्तींचा विश्वास आपल्या शरीरावर आहे, सिंहाचा तसा नाहीं. वस्तुतः आपल्या देहाहून उच्चतर अशा चैतन्यावर त्याचा विश्वास असतो. सिंहाचें शरीर हत्तीच्या मानानें पाहतां जरी लहान आहे, तरी आपलें सामर्थ्य अनंत आहे आणि आपली अंतःशक्ति अमर्याद आहे, असा त्याचा पूर्ण विश्वास असतो. हत्ती चाळीसपन्नासांचे किंवा केव्हां केव्हां शेंदोनशांचे देखील कळप करून राहतात. आणि जेव्हां हत्ती झोंपीं जातात, तेव्हां आपल्यापैकीं एक सामर्थ्यवान् हत्ती ते पाहऱ्यावर ठेवितात; तरी पण आपले शत्रु आपल्यावर हल्ला करून आपणास खाऊन टाकतील अशी त्यांनां भीति वाटतेच. त्यांनां हें ठाऊक नाहीं, कीं, जर आत्मविश्वास असेल, तर त्यांच्यापैकीं एकटा देखील हजारों सिंहांचा

संहार करूं शकेल. परंतु त्या बिचाऱ्या दंतींचा आपल्या अंतरात्म्यावर विश्वास नसतो, आणि ह्मणून त्यांनां धैर्यहि पण नसतें.

एवंच, आत्मविश्वास हें आनंदाचें किंवा सौख्याचें मूल तत्त्व आहे. स्वतःस हीन, दीन, दुर्दैवी, पतित, पापी समजूं नका, असें वेदान्त तुह्मांला बजावतो. तुह्मी **अनंत** आहां, सर्वशक्तिमान् **ईश्वर** तुह्मी आहां, अनाद्यनंत **परमेश्वर** तुह्मीच आहां, यावर विश्वास ठेवा. केवढें स्फूर्तिदायक तत्त्व हें ! बाह्य जगतावर विश्वास ठेविलात, कीं, तुमचा नाश झालाच. कायदाच असा आहे.

एका कज्ज्यामध्यें गुंतलेले दोघे बंधु एका न्याधाधीशासमोर आले होते. त्यांपैकीं एक लक्षाधीश होता, दुसरा गरीब होता. न्यायाधीशानें लक्षाधीशास पुसिलें "तूं इतका श्रीमंत कसा झालास व तुझा भाऊ इतका गरीब कां आहे?" त्यानें उत्तर दिलें "पांच वर्षांपूर्वीं आह्मां दोघांनां वडिलांपासून सारखीच मिळकत मिळाली; प्रत्येकाच्या वांट्यास दीड दीड लाख रुपये आले. माझ्या भावास आपण मोठे श्रीमंत आहों असें वाटूं लागलें, आणि आपल्याला हें ठाऊकच आहे, कीं, कांहीं श्रीमंत लोकांनां काम करणें कमीपणाचें वाटतें. त्याप्रमाणें तोहि आळशी बनला, आणि आपलें सर्व काम आपल्या नोकरचाकरांवर सोंपवूं लागला. त्याला एकादें पत्र आल्यास, तें आपल्या चाकराच्या हातीं देऊन तो ह्मणे, 'जा, हें काय आहे पहा, आणि याची व्यवस्था लाव.' जें जें कांहीं करावयाचें होतें तें सर्व तो आपल्या नोकरांसच करावयास सांगे. आणि मोठ्या ऐषआरामांत त्यानें आपला सर्व काळ दवडला. खावें, प्यावें, आणि चैन करावी, असा त्याचा क्रम चालला होता. तो आपल्या चाकराला नेहमीं सांगत असे, कीं, जा, जा, हें काम पहा, तें काम पहा !"

नंतर स्वतःविषयीं सांगतांना तो धनाढ्य भाऊ ह्मणाला "जेव्हां मला माझ्या दीड लाखाचा वांटा मिळाला, तेव्हां मीं माझें काम दुसऱ्या कोणावरहि सोंपविलें नाहीं. जेव्हां जेव्हां एकादी गोष्ट करावयाची असे, तेव्हां मीं ती स्वतः करण्यास पुढें जावें, आणि माझ्या नोकरांस नेहमीं 'या, या, मजबरोबर या,' असें सांगावें. माझ्या तोंडांत नेहमीं 'या या' हेच शब्द असत, आणि माझ्या बंधूच्या तोंडांत 'जा जा' हे शब्द असत.

त्याच्या सर्व वित्तानें त्याचेंच तत्त्व पाळलें. त्याचे नोकर, त्याचे मित्र, त्याची मालमत्ता, त्याची संपत्ति, हीं सर्व कांहीं त्याला सोडून गेलीं. माझें तत्त्व 'या' असें होतें, तेव्हां मजजवळ मित्र आले, माझी मिळकत वाढली, आणि सर्व कांहीं वृद्धिंगत झालें."

जेव्हां आपण दुसऱ्यावर अवलंबून असतों, तेव्हां आपण जा जा असें ह्मणतों, आणि तदनुरूप सर्व कांहीं जातें; परंतु जेव्हां आपण स्वतःवर विसंबून असतों, आणि आत्म्याव्यतिरिक्त कशावरहि विश्वास ठेवीत नाहीं, तेव्हां सर्व कांहीं आपल्याभोंवतीं गोळा होतें. जर तुह्मी आपल्याला गरीब, तुच्छ, कीटक, अथवा जंतु समजाल, तर तुह्मी तसेच व्हाल. आणि जर तुह्मी स्वतःला मान देऊन स्वावलंबी व्हाल, तर ऐश्वर्य तुह्मांला वरील. जशी तुमची भावना असते, तसेच तुह्मी होतांच होतां—

**यो यच्छ्रद्धः स एव सः ।**

हिंदुस्थानामध्यें एकदां एका शाळेंत इन्स्पेक्टरसाहेब आले. एका शिक्षकानें एका मुलाकडे बोट दाखवून सांगितलें, कीं, "हा इतका हुशार आहे, कीं, याला अमकें अमकें काव्य, समजा 'रघुवंश' मुखोद्गत आहे. त्यापैकीं त्याला कोणताहि भाग ह्मणतां येतो."

त्या विद्यार्थ्यास इन्स्पेक्टरसाहेबांसमोर आणिलें; परंतु त्या मुलामध्यें वेदान्त नव्हता. तो एकदम लाजला, आणि "तुला तो ग्रंथ तोंडपाठ येतो काय?" असें विचारतांच तो ह्मणाला "नाहीं महाराज, मी कांहींच नाहीं, मला कांहीं येत नाहीं!"

या शब्दानें आपला विनय व नम्रता व्यक्त होते, असें त्याला वाटलें. "नाहीं महाराज, मला कांहीं येत नाहीं, मी तें शिकलों नाहीं!"

इन्स्पेक्टरनें पुनः विचारलें, तरी मुलाचें आपलें तेंच उत्तर! बिचाऱ्या मास्तराला कसेंसेंच झालें. तेथेंच एक दुसरा मुलगा होता, त्याला तें काव्य समग्र येत नव्हतें; परंतु तो ह्मणाला "मला येत आहे. मला वाटतें, तुह्मी सांगाल तो त्यांतील भाग मी पाठ ह्मणून दाखवीन."

इन्स्पेक्टरनें त्याला कांहीं प्रश्न विचारिले. मुलानें त्यांचीं उत्तरें भराभर दिलीं, आणि श्लोकामागून श्लोक ह्मणून दाखवून त्यानें बक्षीस पटकाविलें.

# उत्कर्षाचें रहस्य.

तुह्मी आपली स्वतःची जी किंमत ठरवितां, त्याहून तुमची अधिक किंमत कोणीहि करीत नाहीं.

कृपा करून स्वतःला लांगूलचालन करणारे व दुसऱ्याची हांजी हांजी करणारे असे क्षुद्र प्राणी बनवूं नका ! 'जशी तुमची मति तशी तुमची स्थिति.' तुह्मी स्वतःला ईश्वर माना, ह्मणजे तुह्मी ईश्वरच आहां. आपण मुक्त आहों असें माना ह्मणजे तुह्मी या क्षणीं मुक्त आहां.

एकदां एक मनुष्य एका वेदान्त्याच्या घरीं गेला आणि यजमान घरीं नसतांना तेथील रिकाम्या उच्चासनावर जाऊन बसला. यजमान जेव्हां त्या खोलीकडे परत आला, तेव्हां तो आगंतुक विचारितो "भो वेदान्तिन् ! ईश्वर ह्मणजे काय व मनुष्य ह्मणजे कोण, हें मला समजून सांग."

त्या वेदान्त्यानें त्याला सरळ उत्तर दिलेंच नाहीं. त्यानें आपल्या नोकरांस हांक मारिली आणि मोठमोठ्यानें शिव्या देऊन त्या गृहस्थाला घराबाहेर हांकून लावण्यास सांगितलें. त्या खऱ्या ज्ञानी मनुष्यानें हीच विलक्षण भाषा वापरली.

अशी अनपेक्षित भाषा ऐकून तो आगंतुक घाबरला, आणि गोंधळून जाऊन उच्चासनावरून उठला. आमचा साधु त्या आसनावर जाऊन बसला, आणि मोठ्या शांत व गंभीरपणानें ह्मणाला "हा येथें (स्वतःकडे बोट दाखवून) ईश्वर आहे, आणि तो (आगंतुकाकडे बोट दाखवून) मनुष्य आहे. तूं जर घाबरला नसतास व स्थान सोडलें नसतेंस, तूं जर आपल्या मनाची समता ( Balance ) राखिली असतीस, तूं जर गोंधळून गेला नसतास, तर तूं देखील ईश्वरच होतास. परंतु आपल्या भीतीनें, आपल्या कंपानें आणि आपल्या स्वतःच्या ईश्वरत्वविषयक अश्रद्धेनें तूं क्षुद्र कीटक बनला आहेस."

आपण ईश्वरच आहों, अशी भावना धरा. आपल्या ईश्वरत्वाविषयीं पूर्ण श्रद्धा बाळगा. ह्मणजे तुह्मांला कोणीहि कांहीं इजा करणार नाहीं व दुखविणार नाहीं.

जोंपर्यंत तुह्मी बाह्यशक्तीवर अवलंबून रहाल, तोंपर्यंत तुमच्या वांट्याला अपयश हें ठेवलेलेंच. आपल्या हृदयांतील ईश्वरावर विश्वास ठेवा व शरीर

कार्यतत्पर ठेवा, ह्मणजे 'विजय सहज ठेला!' पर्वत जर महंमदापाशीं येत नाहीं, तर महंमदानें पर्वतापाशीं गेलें पाहिजे. एक मनुष्य भुकेलेला होता. क्षुधेची शांति करावी ह्मणून तो एका जागीं बसला आणि डोळे मिटून काल्पनिक कढीभात खाऊं लागला. कांहीं वेळानें तो आपली पोळलेली जीभ गार करण्याकरितां तोंड उघडून बसलेला दिसला. "तुला काय झालें आहे?" असें एकानें त्याला विचारिलें. त्यानें उत्तर दिलें "माझ्या अन्नांत मगभगीत मिर्ची होती." त्यावर जवळ उभा असलेला एक गृहस्थ ह्मणाला "गरीब बापड्या! जर तुला काल्पनिक अन्नावरच रहावयाचें होतें, तर तिखट मिर्चीहून एकादा मधुर पदार्थच कां पसंत केला नाहींस? ज्याअर्थीं ती तुझीच मनःसृष्टि होती, तुझेंच मनोराज्य होतें, त्याअर्थीं एकादी चांगलीच निवड कां नाहीं केलीस?"

वेदान्ताप्रमाणें सर्व जग तुमचीच कल्पना आहे; मग तुह्मी आपणास दुर्दैवी व पापी कां समजतां? स्वतःला निर्भय व स्वावलंबी ईश्वरी अवतार कां मानीत नाहीं?

सत्यावर पूर्ण निष्ठा ठेवा. तुमच्या भोंवतालच्या वस्तुजाताचें यथार्थ ज्ञान मिळवा. सर्व गोष्टींचा त्यांच्या योग्यतेप्रमाणें स्वीकार करा, आणि ही वृत्ति तुमच्यामध्यें इतकी बाणूं द्या, कीं, हें जग तुह्मांला मायिकच व्हावें. तुह्मांला हें ठाऊक नाहीं काय, कीं, ज्योतिषशास्त्रामध्यें स्थिर नक्षत्रांचीं अंतरें काढतांना, त्या नक्षत्रांच्या आणि ग्रहांच्या मानानें ही पृथ्वी कांहींच नाहीं, फक्त एक शून्य आहे, गणितशास्त्रांतील एक बिंदु आहे, असें धरतात. आणि असें जर आहे, तर अनंत शक्ति–आत्म्याशीं तुलना करून पहातां पृथ्वी कांहीं तरी आहे काय? याचा विचार करा. याचा अनुभव घ्या. तुह्मी प्रकाशांचे प्रकाश आहां. सर्व वैभव तुमचें आहे. हें अनुभवा आणि हें तुह्मांमध्यें इतकें बाणूं द्या, कीं, ही पृथ्वी, नांवलौकिक, ऐहिक संबंध, मानापमान, प्रतिष्ठा व अप्रतिष्ठा, शत्रूंची टीका आणि मित्रांची स्तुति, इत्यादि सर्व द्वंद्वें तुह्मांला अर्थविहीन झालीं पाहिजेत. आणि हेंच उत्कर्षाचें यशःप्राप्तीचें गुह्य होय.

# उत्कर्षाचें रहस्य.

नायगारा धबधब्याच्या जोराच्या प्रवाहामध्यें दोन मनुष्य वाहून जात होते. त्यांपैकीं एकाला एक मोठासा ओंडका सांपडला आणि आपल्या बचावासाठीं त्यानें तो धरला. दुसऱ्याला, त्यांना वांचवावें ह्मणून किनाऱ्यावरील लोकांनीं टाकलेली एक लहानशी दोरी सुदैवानें मिळाली. ती दोरी लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें जड नव्हती. जरी तो दोर दिसावयास लहान व डळमळीत होता, तरी त्याचे प्राण वांचले. परंतु ज्या मनुष्यानें तो मोठा ओंडका धरला होता, तो त्या ओंडक्याबरोबरच प्रवाहाच्या जोरानें धबधब्याखालील प्रचंड लाटा येणाऱ्या पाण्याच्या विदीर्ण मुखामध्यें नाहींसा झाला.

त्याचप्रमाणें हे संसारी जनहो ! बाह्य नांवलौकिक, वित्त, संपत्ति, जमीनजुमला आणि ऐश्वर्य यांवर तुमचा भरंवसा आहे. त्या लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें हे मोठे वाटतात; परंतु हे सर्व तारक नाहींत. तारक तत्त्व त्या सूक्ष्म धाग्याप्रमाणें आहे. तें जड नाहीं, तें इंद्रियगोचर नाहीं. तें तुह्मांला हातीं घेऊन पाहतां येणार नाहीं, त्याचा तुह्मांला स्पर्श होत नाहीं. हें सूक्ष्म तत्त्व, हें सूक्ष्म सत्य, अणुरूप आहे; परंतु तुह्मांला तारणारा हाच सूक्ष्म तंतु आहे. ज्यावर तुह्मी विश्वासून आहां त्या या सर्व ऐहिक वस्तु तुमचा खरोखर नाश करितील, आणि तुह्मांला निराशा, चिंता आणि दुःख यांच्या खोल गर्तेमध्यें लोटून देतील. सांभाळा, सांभाळा, सत्यास बळकट धरून रहा. बाह्यवस्तूपेक्षां सत्यावरच अधिक निष्ठा ठेवा. जेव्हां जेव्हां मनुष्य बाह्यवस्तु आणि संपत्ति यांवर पूर्ण विश्वास ठेवितो, तेव्हां त्याला खात्रीनें अपयश येतेंच. नियम तर असा आहे. ईश्वरावर निष्ठा ठेवा, ह्मणजे तुह्मी सुरक्षित रहाल. इंद्रियांच्या फशीं पडूं नका.

आपल्या सभोंवतालच्या लोकांच्या जादूला व भारण्याला वश होऊं नका. सर्व ऐहिक संबंध व बंधनें आपल्या जादूनें तुह्मांला दुःखी व कष्टी करतात. त्यांच्या तावडींतून सुटा. सत्यावर विश्वास ठेवा, ईश्वराशीं आपलें तादात्म्य ओळखा—अनुभवा, ह्मणजे तुह्मी मुक्त आहां, नव्हे तुह्मी प्रत्यक्ष मुक्तिच आहां!

आपल्या आत्म्याहून जग अधिक महत्त्वाचें आहे, असें तुमच्या मनांत कधीं न येवो. स्वतःस इंद्रियाधीन असा शोचनीय, क्षुद्र अहंकार करून बसवूं नका. तुह्मी कशानेंहि चिडून जाऊं नका. ज्याप्रमाणें डाक्टरलोक, रोग आपणास जडवून न घेतां रोग्याशीं वागतात, त्याप्रमाणें अनासक्तीनें कर्माशीं तुह्मी आपला व्यवहार ठेवा. अनासक्त साक्षीप्रमाणें कार्य करा. मुक्त रहा.

## उत्कर्षाचें सातवें तत्त्व–पावित्र्य अथवा सदाचार.

शेवटचें आणि खात्रीनें यश देणारें तत्त्व ह्मणजे पावित्र्य होय. ही गोष्ट खरी आहे, कीं, कल्पना हें प्राक्तनाचें दुसरें नांव आहे. जशी ज्याची मति तशी त्याची स्थिति. परंतु जर तुह्मी अपवित्र कल्पना मनांत आणूं लागाल आणि अधोगतीस नेणाऱ्या अनीतीस आपल्या मनांत थारा द्याल, तर या तुमच्या स्वार्थी वासनांच्या इष्टसिद्धीबरोबर हृदय विदीर्ण करणाऱ्या वेदना, तीव्र पीडा, चित्तक्षोभ करणारें दुःख, हींहि पण प्राप्त होतील. शोक तुमच्या आत्म्यास ग्रासून टाकील. विषयांचा आपण उपभोग घेतों असें मूर्खास वाटतें; परंतु त्याला हें कळत नाहीं, कीं, अपवित्र विचार किंवा आचार यानें त्याच्या सामर्थ्याचा व्यय होऊन तें क्षय पावतें. आप्पलपोटेपणानें जेव्हां तुह्मी त्याचा दुरुपयोग करतां, तेव्हां नियति ( कर्मतत्त्व ) तुमचा सूड उगवितें आणि तुह्मांला भंडावून सोडतें. देवाला आपले हुकूम फर्मावूं नका. शारीरिक गरजांच्या बावतींत ईश्वराच्या इच्छेप्रमाणें सर्व होऊं द्या. तुमच्या ऐहिक बाबतींत ईश्वराची इच्छा तीच तुमची इच्छा होऊं द्या. ज्या महाशक्तीच्या इच्छाबलानें परिस्थितीला सांप्रतचें स्वरूप प्राप्त झालें आहे, ती महाशक्ति तुह्मीच आहां. याचा अनुभव घ्या. आपलें दारिद्र्य देखील आपणच निर्माण केलें आहे, हें जाणून त्याचा आनंदानें उपभोग घ्या, परंतु जर का देहवासनांनीं आपणास आडमार्गीं नेलें आहे, आपण कामवासनेच्या पंकांत रुतलों आहों असें तुमच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तर ब्राह्मी स्थिति प्राप्त करून ती कायम ठेवण्यासाठीं तुमची प्रचंड इच्छाशक्ति उपयोगांत आणण्याची

हीच वेळ आहे. या देशामध्यें ( अमेरिकेंत ) कामवासनेला प्रेम या पवित्र नांवाखालीं सजवितात. काय थट्टा ही ? लोक पूर्णनिर्मल रहात नाहींत. असाधारण आसक्ति आणि अनिवार्य विषयवासना यांनीं त्यांच्या आयुष्याच्या चिंधड्या होतात. एकादा पूर्ण निर्मल ब्रह्मचारी युवा क्वचित्‌च आढळतो. लोकांमध्यें दिसणारा मनुष्य बहुधा खराब झालेला ' अपूर्णांश 'च असतो. त्याचा एक भाग त्याच्या प्रियपात्राकडे असतो, दुसरा भाग दुसऱ्याच विषयावर असतो. तुमच्या उद्योगावरच प्रेम करा. जेथें तुमचे हात काम करितात तेथें तुमचें हृदय असूं द्या. **हातपाय काम करण्यानें उबदार असूं द्यात, डोकें मात्र थंड आणि स्वस्थ असूं द्या.** तुमचे विचार तुमच्या स्वाधीन असूं द्यात, ते आपल्या आत्म्याच्या ठायीं रत असूं द्यात, आणि परिस्थितीविषयीं बेफिकीर असा. मानवजातीचें हित करण्याच्या विचारानें तुह्मी त्रास करून घेऊं नका. तुमच्या काळजीची नेहमीं अपेक्षा करण्याइतकें जग तरी दरिद्री कां असावें ? तुमच्या स्वतःच्याच मुक्तीकरितां तुमचें शरीर खटपट करीत राहूं द्या. अज्ञानी लोक ज्ञानप्रकाशाची व्यर्थ आशा करीत असतात आणि त्याकरितां प्रार्थना करीत असतात. त्याची तरी तुह्मीं इच्छा कां करावी ? नेहमीं प्रकाशाची हांव बाळगल्यानें तुह्मी अंधारांतच राहतां. एक क्षणभर तरी सर्व इच्छा पार टाकून द्या; प्रणवाचा दीर्घ उच्चार करा; ना आसक्ति, ना द्वेष, पूर्ण समता असूंद्या, ह्मणजे तुह्मी प्रकाशाचें मूर्त स्वरूपच व्हाल.* कर्माचे सर्व ऐहिक हेतु टाकून द्या. वासनारूपी पिशाचांना गाडून टाका. आपलें सर्व कर्म पवित्र करा. मोह आणि आसक्तिरूपी आपला रोग काढून टाका. एका वस्तूवर आसक्ति ठेविल्यानें तुह्मी सर्वात्म्यापासून वेगळे होतां. स्वार्थी आणि निंद्य हेतूंनीं तुमचे सर्व व्यवहार आणि जीवित धर्मबाह्य होतें. कर्मामध्यें गुप्त असलेल्या जगाचा अनुभव घेण्यास, आपलें कर्म करूं लागा. आणि कर्म तुह्मांला ईश्वराच्या सन्निध पोंचवितें ह्मणून देह किंवा अहंकार यांपासून स्वतःस अलिप्त ठेवून कर्म आचरा.

---

* 'अनुभव कांहीं नये तरी क्षणभरी इच्छारहित बसा रे'—अमृतराय.
'न कल्पित उगीच रहा'—श्रीकृष्ण बांदकर.

इच्छारहित कर्म हें सर्वोत्तम त्याग अथवा भक्ति यांचेंच दुसरें नांव आहे. कर्म करावयास तुह्मांला हेतु तरी कशास पाहिजे? अज्ञ लोक असें समजतात, कीं, कर्माहून कर्माच्या फलसिद्धीनें अधिक सुख मिळतें. या अंधांनां हें समजत नाहीं, कीं, फल कर्माहून अधिक सुखदायी होत नाहीं. **सौख्य हें कर्मरूपी वस्त्रांत आच्छादिलेलें असतें.** हें जाणल्यानें तुह्मांला यश नेहमीं आपल्याजवळ बाळगितां येईल, हें विशाल विश्व तुमचें पवित्र मंदिर बनेल, व तुमचें अखिल जीवित हें एक अखंड स्तोत्रच होईल. परिणामाची तुह्मांला काय पर्वा. पगार अगर वेतन यांविषयीं त्रास घेण्याचें तुमच्या मनांत देखील येणें नको. जर तुह्मांला महत्पद मिळालें नाहीं, तर रस्ते झाडण्यासारखें क्षुल्लक काम करण्यामध्यें, पोकळ डौल तुमच्या आड येऊं देऊं नका. प्राप्त कर्तव्य करावयास अनमान करूं नका. शिष्टाचारास संमत नसलेलें काम टाळणें हा कांहीं स्वाभिमानाचा प्रकार नव्हे. खरा स्वाभिमान ह्मणजे यथार्थ–स्व, अंतरात्मा याविषयींचा अभिमान होय. देहाविषयींचा अभिमान–सद्गुणाचें विषम टोंक –नरकाचा अत्यंत जवळचा मार्ग आहे. कोणत्याहि कार्याला हातभार लावण्यास तुह्मी तयार असतां, तेव्हां महत्तम कार्यें, सन्माननीय व मान–मान्यतेचे धंदे तुमचें स्वागत करण्यास मोठ्या आदरानें अंतःकरणपूर्वक आपला हात देतील. तत्त्व असें आहे. कर्मामध्यें अधिष्ठित असलेल्या ईश्वरा-पासून तुह्मी विमुख झालां नाहीं, तर ईश्वर देखील तुमचा परामर्ष घेण्यामध्यें हार जाणार नाहीं. आणि तुमच्या इच्छेविरुद्ध तुह्मांमधून प्रकाश झळकूं लागेल. मानवाच्या निंदास्तुतीवर भरंवसा ठेवूं नका. ती सर्व निंदास्तुति तुह्मांला भुलवून आडमार्गास मात्र नेते. तुमचा स्वर्ग तुह्मांमध्येंच आहे. सुखोपभोगाच्या ह्मणून गणले गेलेल्या विषयांचें सेवन करण्याइतके जेव्हां तुह्मी आपणांस नीचस्थितीला आणितां, तेव्हां तुह्मी अपवित्र भग्नव्रत व्यभिचाऱ्याप्रमाणें वागतां. बाह्य विषयोपभोगांनां सांगा, कीं, "हे चांडाळ कुले! मागें हो. तुझ्या हातचें मी कांहीं घेणार नाहीं." तुह्मी स्वतःच आनंदाचा उगम नाहीं आहांत काय?

# उत्कर्षाचें रहस्य.

**अंतरिं वसंत ज्याच्या अखंड वसतो तयासि शिणवाया ।**
**तदितर मत्सरमय ऋतु कष्टविती श्रमुनि आपणां वायां ॥ १ ॥**

बुलबुल पक्ष्याला अथवा कोकिळेला आम्रवृक्षावर वसवा ह्मणजे त्यांच्यापासून श्रवणरुचिर संगीतामृतप्रवाह आपोआप वाहूं लागेल. तुमचें मन स्वस्थ किंवा अंतर्निष्ठ असूं द्या. ह्मणजे त्यांतून सहज स्फूर्तीनें आपोआप अनायासें अत्यंत मधुर आलाप निघतील.

तुमचें ईश्वरत्व ही कांहीं 'साध्य' करून घेण्याची वस्तु नव्हे. आत्मसाक्षात्कार ही कांहीं प्राप्त करून घेण्याची वस्तु नव्हे. ईश्वराचें दर्शन घेण्याकरितां तुह्मांला कांहीं करावयास नको. फक्त वासनारूपी जे अंधकारमय कोश तुह्मीं आपल्याभोंवतीं तयार केले आहेत, ते नाहींसे केले पाहिजेत. भिऊं नका, ह्मणजे तुह्मी मुक्त आहां. हें मायिक बंधन देखील तुमच्याच स्वातंत्र्यानें तुह्मांवर लादलें आहे. तुह्मीं बोलावून आणल्याखेरीज कोणतेंहि संकट तुह्मांवर ओढवणार नाहीं. कोणत्याहि तरवारीमध्यें कापण्याची शक्ति आहे असें तुह्मीं मानल्याखेरीज तुह्मांला ती कापूं शकणार नाहीं. दास्यशृंखलांनां अलंकार समजून त्यांवर प्रेम करणें युक्त नाहीं. लटक्या कल्पना झाडून टाका. सर्व कुटिलता दग्ध करा, आणि मग तुमच्या पायांतील पादुका उचलून धरण्याचा लाभ मिळाला ह्मणून कृतज्ञता न वाटणारी अशी जगांत कोणती शक्ति आहे? आपल्या ईश्वराचें प्रस्थापन करा आणि आपला क्षुद्र अहंकार जणूं काय, तो नव्हताच असें समजून पार विसरून टाका. जेव्हां बुद्बुद फुटतो तेव्हां तो सागरच होऊन जातो. तुह्मी पूर्ण आहां, तुह्मी अनंत आहां, तुह्मी सर्व आहां. तुह्मी आपल्या मूल तेजानें प्रकाशित व्हा. जीवन्मुक्तांनों! तुह्मांला जगांत कोणतेंहि कर्तव्य नाहीं, कोणतेंहि कर्म नाहीं, कोणतेंहि कार्य नाहीं. सर्व सृष्टि मोठ्या उत्सुकतेनें तुमच्या सेवेस तत्पर राहील; तुह्मांला वंदन करण्याची, तुमची पूजा करण्याची सुसंधि मिळाली ह्मणून सर्व सृष्टि आपणास सुदैवी समजेल. तुह्मांपुढें बद्धांजलि उभे असलेल्या सिद्धींकडे तुह्मी लक्ष्य देणार काय?

विश्वास तो दृढ धरा । परमात्मरूपींच कीं खरा ।
वारूनियां दृश्य पसारा । सर्वथैव ॥ १ ॥
दृश्य जें कां अतिचंचळ । तप्तलोहावरी जैसें जळ ।
तेथें विश्वासितां तळमळ । जीवा बहु ॥ २ ॥
जरी तुह्मां नित्य नवा । अंतरीं सदुल्हास व्हावा ।
किंवा मिळावा निजआत्मठेवा । गुप्त जो कां ॥ ३ ॥
तरी संपादा आत्मस्थिति । जी कां त्रिकालाबाधित निश्चिती ।
आणि मोहसंपदेची गुंती । पडों न द्यावी ॥ ४ ॥
कर्तव्य तों तुज कांहीं । सर्वात्मका अद्वया नाहीं ।
कर्मावरी त्रासावें पाहीं । काय ह्मणूनी ॥ ५ ॥
निजात्मस्वरूप तत्त्वतां । समजूनि उमजे सर्वथा ।
कर्मँ तीं संघाचीं असतां । त्रासणें कां ॥ ६ ॥
कधीं जन स्तुति करिती । भले भले ऐसें म्हणती ।
भुलों नेदावी चित्तवृत्ति । तयागुणें ॥ ७ ॥
कर्मँ करोनियां स्तुति । नुपजे निंदा ही कीं निगुती ।
दैहिक कर्मांची कृति । मीं न केली ॥ ८ ॥
मी तो विदेही प्रभु ईश्वर । सच्चिदानंदस्वरूप निर्धार ।
इंद्रियें वंचित जे किंकर । नेणती मातें ॥ ९ ॥
व्यर्थचि वल्गना करिती । गर्वें परस्पर भांडती ।
मी तों सर्वाधार निश्चितीं । प्रणवरूप ॥ १० ॥

आनंदनिधाना, रामा सौख्यघना । शुद्धशांतिपूर्णा निर्विकल्पा ॥ १ ॥
आनंदास नाहीं भंग कशानेंहि । अवरोध तोहि मद्गतीसी ॥ २ ॥
दास माझे, पक्षी नर सुरवृंद । माझा ब्रह्मानंद शब्दातीत ॥ ३ ॥
येथें तेथें सर्व स्थळीं परिपूर्ण । 'कोठें' या शब्दा न थारा जेथें ॥ ४ ॥

# उत्कर्षाचें रहस्य.

आतां नंतर मी सदा परिपूर्ण । 'कदा' या शब्दा न थारा जेथें ॥ ५ ॥
हें, तें, आणि जें काय, म्यांचि व्यापियलीं । तें काय शब्दा पली-कडे तें मी६॥
आदि मध्य अंत ऊर्ध्व मीच व्याप्त । 'कैसा' शब्दातीत एकचि मी ॥ ७ ॥
एक पांच आणि शत सर्व अंक । संख्यातीत एक आणि सर्व ॥ ८ ॥
प्रमेय प्रमाता प्रमाण ही दृष्टि । न लाभेचि पुष्टि सत्यत्वाची ॥ ९ ॥
होतों आहें आणि सर्वदां असेन । अस्तिपणासी न सांपडे मी ॥ १० ॥
आनंदघन मी सत्यस्वरूप मी । जेथें नाहीं तो मी तूंहि नाहीं ॥ ११ ॥

"ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ॥
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः"

—ईशावास्योपनिषत् ।

# PRESFNT NEEDS OF INDIA.

## हिंदुस्थानच्या सांप्रतच्या गरजा.*

कांहीं नवीन शक्कल शोधून काढावी आणि प्रतिष्ठा किंवा लोकप्रियता मिळवावी, या इच्छेनें लोक पुष्कळदां खऱ्या मार्गापासून परावृत्त होतात. ही इच्छा बाजूस ठेवून दुःखानें निराश न होतां किंवा आत्मप्रौढीनें फुगारून न जातां जर शांतपणें आपण हिंदुस्थानच्या सांप्रतच्या गरजांचा विचार केला, तर आपणांस अशी शोचनीय स्थिति दिसून येईल, कीं, एकाच पवित्र देशामध्यें राहिल्यानें उत्पन्न होणारे संबंध किंवा बंधनें यांची लोक मुळींच पर्वा करित नाहींत; ह्मणजे लोकांमध्यें बंधुप्रीतीचा पूर्ण अभाव दृष्टीस पडतो. धार्मिक पंथभेदांमुळें लोकांमधील माणुसपणा नाहींसा होत चालला आहे, आणि एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लुप्तप्राय झाली आहे.

अमेरिकेमध्यें देखील हिंदुस्थानाइतकेच अथवा कदाचित् त्याहून अधिक पंथ व मार्ग आहेत; परंतु आपल्या पंथांच्या मतांवरच उपजीविका करणाऱ्या थोड्या लोकांखेरीज बाकी इतर लोकांमध्यें "हा क्याथोलिक आहे, हा मेथॉडिस्ट आहे, अथवा हा प्रेस्बेटेरियन आहे" इत्यादि कल्पनांच्या पुढें देशबंधुत्वाची कल्पना मावळत नाहीं. निःपक्ष-

---

* शास्ता स्प्रिंग, कॅलीफोर्निया—अमेरिका, येथून पाठविलेलें पत्र.

बर्फाचे कापसासारखे शुभ्र निर्मळ तुकडे मोठ्या जोरानें परंतु डौलानें 'रामा'च्या आश्रमाच्या खिडकीवर बाहेरील बाजूनें पडत आहेत, आणि पर्वत हा पूर्णपणें 'शास्ता' (फ्रेंच भाषेमध्यें शास्ता Shasta=पवित्र) शुद्ध मनोहर झाला आहे. उत्क्रांतितत्त्वावरील नवीनच लिहिलेलें एक पुस्तक वाचून 'रामा'नें नुकतेंच बाजूस ठेविलें आहे.

पातानें खरें बोलावयाचें ह्मटल्यास हिंदुस्थानाप्रमाणें अमेरिकेमध्यें धर्माभिमानानें लोकांतील नैसर्गिक माणुसपणा किंवा भूतदया नाहींशी होत नाहीं. हिंदुस्थानामध्यें मुसलमान लोक कैक पिढ्या हिंदु लोकांबरोबर एकाच जागीं रहात आले आहेत; परंतु त्यांचें अंतःकरण आपल्या शेजारच्या हिंदुलोकांपेक्षां दक्षिण युरोपांतील तुर्कांकडेसच अधिक ओढतें. हिंदु आईबापांच्या हाडामासाचें पोर ख्रिस्ती झाल्याबरोबर त्यांनां ( हिंदूंनां ) तें रस्त्यांतील कुत्र्याहून देखील अधिक परकी वाटूं लागतें ! मथुरेमधील एकादा कर्मठ द्वैतवादी वैष्णव, दक्षिण हिंदुस्थानांतील एकाद्या दुसऱ्या वैष्णवाचा फायदा करण्याकरितां आणि आपल्याच गांवांतील एकाद्या अद्वैतवादी वेदान्त्याच पाणउतारा करण्याकरितां काय करणार नाहीं ? याचा दोष कोणाकडे ? सर्व पंथांमधील सारखें उथळ असलेलें ज्ञान आणि कोत्या वेडगळ समजुती, यांचाच हा दोष आहे !

‘ एकाच जागीं राहणारे शत्रु ’ असें या लोकांच्या स्थितीचें वर्णन केल्यास तें वस्तुस्थितीला फारसें सोडून होणार नाहीं. एकराष्ट्रीयत्वाची कल्पना ह्मणजे एक अर्थशून्य शब्दच झाला आहे. याचें कारण काय ? अर्थात्, याचें कारण ह्मटलें ह्मणजे भूतकालीन निर्जीव विधींशीं अंधपणानें आपलें ऐक्य करून धर्माच्या पवित्र नांवाखालीं शिकविल्या जाणाऱ्या विचित्र आणि वेडगळ समजुतींचा पूर्ण दास बनणें, हें होय; ह्मणजे ‘ **तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते** ’ या सुंदर तत्त्वाच्या नांवाखालीं ‘ आध्यात्मिक आतमघात ’ करणें हें होय.

उदार शिक्षण, यथार्थ ज्ञान, सप्रयोग परीक्षण किंवा शास्त्रीय विचारांचा पद्धतशीर अभ्यास, यांच्या शुद्धीकरणावांचून या आगंतुक कल्पना गाळून काढून टाकतां यावयाच्या नाहींत. आधुनिक शास्त्रीय शोधांमुळें येणारा जोमदार व इष्ट माणुसपणा ज्याच्या अंगीं आला नाहीं, अशा कोणत्याहि पंथाला किंवा धर्माला आपल्या वेडगळ भक्तांवर उपजीविका करण्याचा हक्क नाहीं. ‘रामा’च्या मतें धर्मांतील बरींच जुनीं तत्त्वें आणि विधि त्यावेळीं अवगत असलेल्या शास्त्राचे नियम किंवा सिद्धान्त होते; परंतु

दुर्दैवामुळें पहिल्यानें या तत्त्वांनां बराच विरोध करण्यांत आला, आणि नंतर इतक्या मोठ्या औत्सुक्यानें त्यांचा स्वीकार करण्यांत आला, कीं, या सिद्धान्तांनां जन्म देणाऱ्या मातेची—स्वतंत्र विचार आणि निदिध्यास, ( Independent thought and meditation ) यांची—अवहेलना करून, मुलाला (तत्त्वें किंवा सिद्धांत यांनां) गोंजारण्यांत लोकांनीं मातेचा प्राण घेतला. हळुहळू या तत्त्वांचा अंधश्रद्धेनें स्वीकार होऊं लागला. आपण मनुष्य आहों हें देखील समजण्यापूर्वीं एकादें मूल ख्रिस्ती, मुसलमान किंवा हिंदु होऊं लागलें. नांवाच्या धर्मसंस्थापकांनीं आधिभौतिक किंवा आध्यात्मिक सृष्टिनियमांचा कितपत व केवढ्या दक्षतेनें अभ्यास केला होता व नवीन शोध लाविले होते यांकडे न पाहतां, आळसामुळें लोकांचीं नुसतीं मतें ऐकून आणि त्यांच्या ग्रंथांचा विस्तार पाहून अनुयायी लोक धार्मिक तत्त्वांचा व विधींचा स्वीकार करूं लागले, तेव्हां सृष्टिनियमांप्रमाणें धार्मिक अवनति सुरू झाली. हळुहळू ' ख्रिस्ताचें पर्वतावरील कीर्तन ' ( Christ's Sermon on the mount) अथवा वैदिक यज्ञ यांच्या उद्देशाच्या दृष्टीनें पाहतां मुळचीं तत्त्वें सुटूं लागलीं, व त्यांकडे दुर्लक्ष्य होऊन त्यांच्या जागीं पोकळ नामारूपांवरच लोकांची अधिक निष्ठा बसली. धार्मिक विधींच्या निर्जीव कलेवराची पूजा चांगली करतां यावी ह्मणून त्यांतील **आत्म्यास** पिटाळून लावण्यांत आलें, आणि अशा रीतीनें **ख्रिस्त महम्मद, व्यास** किंवा **शंकराचार्य** यांच्यासारख्या सत्यनिष्ठ महात्म्यांनां 'ईश्वराचे प्रेषित ' (ह्मणजे ईश्वरी तेजाचें हरण करणारे) हें नांव देण्यांत आलें; आणि मूळ सृष्टिरूपी ग्रंथाच्या नुसत्या अस्पष्ट आणि एकदेशीय नकला असलेल्या अशा यांच्या ग्रंथांनां मूळ सृष्टिग्रंथाहून प्रमाण मानल्यानें त्यांची ( ग्रंथांची ) योग्यता मात्र कमी केली गेली.

लोकसंग्रहाच्या कामीं या विधींचा कांहीं उपयोग नव्हता, असें 'रामा'च ह्मणणें नाहीं. एके काळीं त्यांचा उपयोग होता. बीजाच्या कांहीं विवक्षित वाढीपर्यंत ज्याप्रमाणें त्यावरील तूस अत्यावश्यक असतें, त्याप्रमाणें ते विधि आवश्यक होते; परंतु त्या विवक्षित वाढीनंतर बीजाच्या विकासानें जर तें तूस काढून टाकलें गेलें नाहीं, तर तें तूस बीजाला

गुदमरून टाकणारा एक तुरुंगच होऊन बसतें. आणि बीज तर तुसापेक्षां अत्यंत महत्त्वाचें आहे.

दुसऱ्यांनीं ठरविलेल्या सृष्टीच्या उपपत्तीवर भिस्त ठेवण्याची आवश्यकता नाहींशी करण्यास—गुदमरून टाकणारें तूस काढून टाकण्यास—प्रत्येकानें हें मनांत बाळगिलें पाहिजे, कीं, **पैगंबराची** शक्ति आपल्याला देखील मिळणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, व यांत कांहींहि अलौकिक नाहीं.

कांहीं लोकांनां आपल्या डोळ्यांसमोर एकादें घर प्रत्यक्ष बांधलेलें पाहिल्याशिवाय त्याच्या रचनेची कल्पनाच येत नाहीं; त्याचप्रमाणें असे कांहीं लोक आहेत, कीं, त्यांनां भूतकालीन किंवा सांप्रतच्या समाजव्यवस्थेच्या पुढें एकादें पाऊल टाकण्याची कल्पनाच होत नाहीं. अशा लोकांची संख्या हिंदुस्थानामध्यें कमी होत चालल्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. लोकांच्या मनांतील विकल्प किंवा धरसोड नाहींशी करून, सर्व दृश्य पदार्थांशीं असलेलें आपलें ऐक्य आणि आपलें नैसर्गिक महत्त्व त्यांच्या अनुभवास आणून देणें, आणि स्वाभाविक इष्ट विविधतेपासून चिरस्थायि, संघटित ऐक्य साधणें हा 'रामा'च्या कर्मपर ( Dynamic ) वेदान्ताचा उद्देश आहे. हा वेदान्त कोठें नको आहे ? परंतु हिंदुस्थानाला याची अत्यंत उणीव भासत आहे.

प्रेम आणि प्रकाश (ज्ञान) यांचा प्रसार करून हिंदुस्थानांतील सांप्रतच्या उणीवा भरून काढण्याकरितां एक संस्था—जीवनसंस्था—काढण्याचें 'रामा'च्या मनांत आहे.

## मुख्य गोष्टीचें दिग्दर्शन.

**धार्मिक तत्त्वज्ञान**—या संस्थेमध्यें मुख्यतः तुलनात्मक धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास प्रथम करण्यांत येईल. संस्थेंतील उमेदवारांनां परस्परविरोधी प्राचीन व अर्वाचीन धर्म व दर्शनें यांचा निःपक्षपातानें, निर्विकार मनानें, शांतपणें एकाद्या सरळ न्यायाधीशाप्रमाणें, शुद्ध साक्षित्वानें अभ्यास करण्यास मदत केली जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या

योग्यतेप्रमाणें धार्मिक आणि तात्त्विक ग्रंथ स्वतःला वाचावे लागतील (अर्थात्, जरूर लागेल तेव्हां आचार्यांची, प्रोफेसरांची मदत मिळेल); आणि संध्याकाळीं सभेच्या सार्वजनिक बैठकीपुढें आपण जें वाचलें असेल अथवा वाचतांना आपल्याला जें सुचलें असेल त्याचा गोषवारा द्यावा लागेल. हे गोषवारे ऐकून घेतल्यानंतर, प्रत्येक रात्रीं चर्चात्मक परंतु पद्धतशीर संभाषणें होतील, आणि संस्थेंतील निरनिराळ्या सभासदांनीं काढलेल्या निरनिराळ्या विषयांची एकवाक्यता 'रामा'च्या अध्यक्षतेखालीं केली जाईल. आणि अशा रीतीनें प्रत्येकानें आपल्या मानसिक उद्योगाचा सर्वांस फायदा देऊन, सर्वांच्या मानसिक श्रमांचा वांटेकरी झाल्यानें, शुद्धभावना, एकोपा आणि प्रेम हीं वृद्धिंगत होतील.

सध्यांच्या काळाला योग्य असलेल्या या बौद्धिक व सामाजिक परस्परसाहाय्याच्या योगानें मानसिक कार्यक्षमता आणि खरी संस्कृति दुणावलीच पाहिजे.

**भौतिकशास्त्र**—धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या द्वारा हिंदुस्थानामध्यें अत्यंत आवश्यक असलेल्या शिक्षणाच्या परस्परसाहाय्यक पद्धतीची, नवीन आलेल्या विद्यार्थ्यांमध्यें आवड उत्पन्न केल्यानंतर, अभ्यासक्रमामध्यें वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, विद्युच्छास्त्र, भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र आणि ज्योतिःशास्त्र इत्यादि शास्त्रांचीं निरनिराळीं अंगें सुरू करण्यांत येतील. निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन सुरू केल्यावरोबर एक ग्रंथसंग्रहालय, प्रयोगशाला, वेधशाला इत्यादि अवश्यमेव स्थापिलींच पाहिजेत.

या संस्थेमार्फत शास्त्रांचा प्रसार करण्याचा उद्देश, लोकांमधील भयंकर धार्मिक गैरसमजुती नाहींशा करून लोकशक्तीला अधिक सयुक्तिक आणि उपयुक्त दिशेनें वळण लावणें हा आहे. या संस्थेमध्यें शास्त्रांचा अभ्यास अत्यंत धार्मिक बुद्धीनें करावयाचा आहे. शास्त्र, कला आणि बाह्यतः प्रापंचिक दिसणारे उद्योग यांचें अध्ययन, वेदान्ताचीं तत्त्वें व्यवहारामध्यें लागू करण्यास शिकण्याकरितां ह्मणजे व्यावहारिक वेदान्त शिकण्याकरितां केलें पाहिजे. अगाझिज नांवाच्या एका मोठ्या सृष्टिशास्त्रवेत्त्याविषयीं

असें सांगतात, कीं, त्याला आपली प्रयोगशाला देवाइतकीच पवित्र वाटत असे, आणि एकादें भौतिक तत्त्व नीतितत्त्वाइतकेंच महत्त्वाचें वाटत होतें. सृष्टींतील निरनिराळ्या कोटींमध्यें साम्य अथवा साधर्म्य शोधून काढणें हें, ईश्वराच्या कल्पना आपण पुनः आपल्या मनांत आणण्यासारखें आहे, असें त्याचें मत होतें.

**औद्योगिक कला**—योग्य समयीं संस्थेचें तिसरें कार्य सुरू करण्यांत येईल, आणि तें ह्मणजे 'औद्योगिक कला' हें होय. हिंदुस्थानाला औद्योगिक कलांची केवढी वाण आहे, हें सांगण्याची आज कांहीं जरूरी उरली नाहीं.

यूरोप व अमेरिका येथील मोठ्या विश्वविद्यालयांपैकीं कांहीं (उदाहरणार्थ **येल, हारवर्ड, स्टॅनफर्ड, शिकागो** येथील विश्वविद्यालयें ) पूर्णपणें खासगी संस्था आहेत. हिंदुस्थानांतील लोक अद्याप स्वतःच्या गरजांकडे न पहातां स्वतःच्या शिक्षणाच्या बाबतींत सरकारी पद्धतीलाच चिकटून राहिले आहेत, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे.

'रामा'नें सुचविलेल्या जीवनमठामध्यें कर्मठ मतांच्या ग्रंथांनां आणि पाखंडी मतांच्या ग्रंथांनां शास्त्रीय निःपक्षपातबुद्धीनें सारखेंच स्थान मिळेल. **'सत्य, पूर्ण सत्य, अव्यवच्छिन्न सत्य '** हेंच या मठाचें ब्रीद राहील.

**'नास्ति सत्यात्परो धर्मः'.**

## *FUTURE OF INDIA.

# हिंदुस्थानचा भविष्यत्काल.

या जगांत प्रत्येक वस्तूची गति नियमबद्ध आहे आणि सर्व गोष्टींनां चक्रनेमिक्रम ( The law of periodicity ) आहे. वैभवसूर्यहि याच नियमाप्रमाणें चालला पाहिजे. एका काळीं ज्ञान आणि धन यांचा सूर्य हिंदुस्थानच्या गगनाच्या मध्यभागीं तळपत होता. ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां अंतरिक्षांतील इतर ताऱ्यांप्रमाणें हा सूर्य हळुहळू पश्चिमेकडे चाललेला दिसतो. तो इराण, असीरिया या देशांवरून पुढें पश्चिमेकडे गेला. मिसर देशाला त्याचे माध्यान्ह किरण लाभले. नंतर ग्रीसची पाळी आली. त्यानंतर त्याचें मध्यान्हकालीन तेज रोमनें अनुभविलें. पुढें त्या प्रकाशानें योग्य वेळीं जर्मनी, फ्रान्स आणि स्पेन हे देश जागृत केले.

सरतेशेवटीं या वैभवसूर्याचा उज्वल प्रकाश इंग्लंडला लाभला. पुनः पश्चिमेकडे तो सूर्य निघाला आणि त्यानें अमेरिकेला वैभवलहरीच्या शिखरावर नेऊन बसविलें. अमेरिकेंत देखील हा सूर्य ( प्रकाश ) आपल्या नियमाप्रमाणें पूर्व किनाऱ्यावरील न्यूयार्कपासून पश्चिमेकडे जात जात कॅलिफोर्नियाला जाऊन पोहोंचला. जेव्हां हिंदुस्थानांत दिवस होता तेव्हां अमेरिका कोणाला ठाऊक देखील नव्हती. सध्यां अमेरिकेंत दिवस आहे. पण थांबा, वैभवसूर्य आतां पासिफिक महासागर ओलांडावयासहि लागला आहे, आणि जपान लवकरच जगांतील एक बलाढ्य राष्ट्र होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आणि निसर्गनियम जर खरे असतील, तर हा,

* हा भाग रायबहादुर लाला वैजनाथ यांच्या 'Hinduism ancient and modern' या ग्रंथाच्या प्रस्तावनेदाखल स्वामींनीं लिहिला आहे.

ज्ञान आणि धन यांचा सूर्य एक प्रदक्षिणा संपवून पुनः हिंदुस्थानावर द्विगुणित तेजानें प्रकाशलाच पाहिजे ! तथास्तु ! !

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पाहतां, हिंदुस्थानावर रात्र येण्याचें खरें अंतर्गत कारण इतर देशांप्रमाणें येथें एकलकोंडेपणा ( Exclusivism ) माजला हें होय. या खोलीमधील ( हिंदुस्थानांतील ) स्वच्छ, शुभ्र उजेड किती तरी उत्तम आहे ! तो माझा आहे ! माझा आहे ! तो मलाच एकट्याला मिळाला पाहिजे ! असें ह्मणून आपण खरोखर दरवाजे व खिडक्या बंद केल्या आणि हिंदुस्थानांतील ज्ञानाचा प्रकाश आपणा एकट्यालाच ठेवण्याच्या प्रयत्नांत आपण अंधकार उत्पन्न केला. देवाच्या घरीं कोणाचा वशिला चालत नाहीं, आणि वैभवलक्ष्मी एकाच स्थळाला कधींहि चिकटून रहात नाहीं. 'तत्त्वमसि'चें ऐक्यरूपी ईश्वरी तत्त्व आपण आचरण्याचें सोडलें. आपल्यामध्यें द्वैत येऊन फूट पडली, आणि त्यामुळें आपण शक्तिहीन व दुर्बल बनलों. राष्ट्रांतील वर्णगुरूंनीं मोठें पाप केलें; तें हें, कीं, अपत्यसमान खालच्या वर्णांतील लोकांशीं आपलें (स्वार्थत्यागाचें) **कर्तव्य** विसरून जाऊन आपल्या स्वार्थी **हक्कांवर** त्यांनीं विशेष लक्ष्य दिलें. आतां तें कसेंहि असो, सध्यां प्रसंगाच्या ओघानेंच ही स्थिति सुधारत चालली आहे. ज्यांनां गाढ निद्रा लागते त्यांची जागृतिहि उत्साहदायक असते. हिंदुस्थान बराच काळ निद्रित होतें; हळूहळू परंतु निश्चयानें तें आलस्य नाहींसें होत चाललें आहे, आणि त्याप्रमाणेंच पुराणप्रियता ( Conservatism ) बदललेल्या परिस्थितीशीं जुळवून घेण्यास उदार-मतवादी होऊं लागली आहे.

प्रगतीचें हें एक तत्त्व आहे, कीं, स्वरूप आणि कार्य यांची भिन्नता असावी; पण तत्त्व आणि हेतु यांचें ऐक्य असावें. हिंदूंची वर्णव्यवस्था ह्मणजे राष्ट्रीय प्रगतीमध्यें श्रमाची आणि उद्योगाची सुव्यवस्थित विभागणी आणि अंतःकरणाचें ऐक्य यांचाच परिपाक होती; परंतु कालेंकरून आंतील तत्त्वापेक्षां बाह्यांगाचेंच स्तोम माजलें गेल्यामुळें, हा स्वाभाविक क्रम उलटा झाला, उत्क्रांतीच्या जागीं अवक्रांति ( पृथक्करण, लय) आली, आणि सरतेशेवटीं प्रेमतत्त्वाचा भेद, आणि उद्योग आणि कामधंद्याचें मात्र

मिश्रण हीं आलीं. एका वर्णाचे लोक दुसऱ्या वर्णांच्या लोकांचे धंदे पुष्कळदां करूं लागले, तरी जुन्या जातिभेदानें लोकांच्या अंतःकरणांत अधिक वितुष्ट आलें. देहाभिमान ( जातिभेद ) वाढल्यामुळें ईश्वर–आत्मा निरनिराळ्या क्षणभंगुर नामरूपांच्या उपाधींमध्यें पुरून गेला. श्रुति ( वेदांतील आत्मज्ञान ) जवळ जवळ रद्द झाली, आणि स्मृति ( प्राचीन आचरण, रूढि यांविषयीं नियम ) जुलमी लोकांच्या हातांतील एक आयुधच झालें. भावार्थाच्या जागीं शब्दार्थ आला. कोणीं एकानें ह्मटलें आहे, व्याकरण हें भाषेचें थडगेंच ( मरण ) होय. ( Grammar is the grave of language. ) व्याकरण अबाधित व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करा, कीं, भाषा मेलीच ! त्याचप्रमाणें कडक कायदे व रूढि आणि कर्मकांड यांनीं राष्ट्रांतील सत्व नाहींसें होतें. कांहीं काळपर्यंत दाण्याच्या संरक्षणाकरितां तूस उपयोगी असतें, तसे नियम आणि कायदे कांहीं काळपर्यंत उपयोगी असतात; परंतु त्यानंतर ते जर बदलले नाहींत तर ते वाढ खुंटविणारे बंदिखानेच बनतात. बाबांनों ! हें लक्ष्यांत ठेवा, कीं, स्मृति आणि कायदे तुह्मांकरितां आहेत, तुह्मी त्यांच्याकरितां नाहीं आहां ! सनातन श्रुतींमधील सनातन तत्त्वांचा सर्व ठिकाणीं प्रसार करा, परंतु आजच्या परिस्थितीप्रमाणें स्मृतीमध्यें फेरबदल करा. स्मृतीवर तुमचा वारसहक्क असूं द्या, तुह्मांवर स्मृतीचा वारसहक्क नको आहे ! हिंदुस्थानांत आज नद्यांचीं पात्रें बदललीं आहेत, बर्फ पडण्याच्या जागा बदलल्या, जंगलांच्या जागीं शेतें झालीं, देशाचें स्वरूप पालटलें, राज्यपद्धति बदलली, येथील रहिवाशांचा वर्ण देखील बदलला; तरी या अस्थिर जगामध्यें मृत गतकालचे आचार व नियम कायम ठेवण्याचा प्रयत्न तुह्मी करीत आहां ! सदोदित मागें पहात पुढें चालणाऱ्याची स्थिति खरोखर अनुकंपनीय होय ! असा मनुष्य पावलोपावलीं ठेंचाळणारच !

आनुवंशकत्व (Heredity) आणि योग्य ते फेरफार करणें (Adaptation ) या दोन तत्वांनीं जीविताची उत्क्रांति किंवा वाढ होते. तिर्यक् योनीमध्यें सर्व ठिकाणीं आनुवंशकत्वाचा नियम लागू पडतो. योग्य ते फेरफार करणें, अथवा शिक्षण, या तत्त्वाच्या उत्कर्षावरून मनुष्याला इतर प्राणी आणि

वनस्पति यांपासून विशिष्टत्व येतें. एकादें तान्हें बाळ कुत्र्याच्या पेल्या (पोर) इतकेंच मूढ किंवा अजाण असतें. एवढेंच नव्हे, तर पुष्कळदां या चिमुकल्या मानवापेक्षां तें कुत्र्याचें अगर पोपटाचें पोर अधिक शहाणें असतें; परंतु या दोहोंत फरक हा आहे, कीं, कुत्रा किंवा राघू यांनां आवश्यक असलेलें सर्व ज्ञान जन्मतःच आनुवंशिक संस्कारानें प्राप्त होतें. परंतु त्या मुलाला शिक्षणाच्या योगानें सर्व विश्व पादक्रांत करतां येतें !

माझ्या हिंदु बांधवांनों ! योग्य ते फेरफार करावयाला कंटाळून, जुन्या-पुराण्या चाली आणि आनुवंशिक संस्कार यांनां फाजील महत्त्व देऊन मनुष्यकोटीहून हीन बनूं नका ! देशाप्रमाणें कालानेंहि तुह्मी मर्यादित आहां. तुह्मी हिंदुस्थानांतील प्राचीन ऋषींचे वंशज आहां हें खरें, परंतु त्यांच्या कालांत आज तुह्मी रहात नाहीं आहां ! वाफेचीं यंत्रें, आगबोटी, तारायंत्रें इत्यादि तुह्मांभोंवतीं आहेत. तुह्मांला अतःपर सध्यांच्या जगापासून अलग राहतां येणार नाहीं. तुमचा झगडा, यूरोप आणि अमेरिका येथील विसाव्या शतकांतील शास्त्रज्ञ, शिल्पज्ञ, मजूरदार यांच्यांशीं आहे. **तुह्मांला हा झगडा टाळतां यावयाचा नाहीं** ! आणि जर तुह्मीं सूक्ष्म निरीक्षण केलें, तर तुह्मांला दिसून येईल, कीं, सध्यांच्या बदललेल्या परिस्थितींत राहण्यास तुह्मीं आपणांस लायक केलें नाहीं तर तुह्मी नामशेष व्हाल ! जर तुह्मांला या नव्या ज्ञानाचें ( आणि तें तुमच्या वाडवडिलांच्या जुन्या ज्ञानाहून भिन्न नाहीं ) ग्रहण करून तें आपलेंसें करावयाचें नसेल, तर आपल्या पूर्वजांबरोबर पितृलोकांत जाऊन रहा ! उगेंच येथें राहून विलंब कां लावतां ? चलाच ! यावें आतां. नमस्कार !

तुमचें राष्ट्रीयत्व नाहींसें व्हावें असें ‘ राम ’ ह्मणत नाहीं. एकादें झाडाचें रोपटें, बाहेरील हवा, पाणी, खत आणि माती हीं शोषून घेतें ह्मणून तें कधीं हवा, पाणी किंवा जमीन झालें आहे काय ? कधींहि नाहीं ! याचप्रमाणें तुह्मीं देखील बाह्य वस्तु ग्रहण करून, त्या पचनीं पाडून आपली उन्नति करून घेतली पाहिजे; मात्र श्रुतिरूपी तुमचा प्राण तुह्मीं आपल्या हृदयामध्यें सतत जागृत ठेविला पाहिजे.

सर्व शिक्षणाचा उद्देश हा असावा, कीं, देशांतील सर्व साधनांचा ( Resources ) आपणास उपयोग करून घेतां आला पाहिजे. खऱ्या शिक्षणानें लोकांनां आपली भूमि अधिक सुपीक करतां आली पाहिजे, आपल्या खाणी अधिक धनोत्पादक करतां आल्या पाहिजेत, व्यापार अधिक भरभराटीस आणतां आला पाहिजे, देह अधिक कार्यक्षम व तरतरीत झाले पाहिजेत, मनें ( बुद्धि ) अधिक कल्पक झालीं पाहिजेत, अंतःकरणें अधिक शुद्ध झालीं पाहिजेत, कारखाने अधिक विस्तृत झाले पाहिजेत, आणि राष्ट्र अधिक संघटित झालें पाहिजे. आपलें पांडित्य मिरविण्याकरितां भलीं मोठमोठालीं शास्त्रवचनें पाठ ह्मणून दाखवितां येणें, धर्मग्रंथांतील वचनांचा अर्थ भलभलता करण्याकरितां शुष्क शब्दच्छल माजविणें, आणि ज्यांचा साऱ्या जन्मांत आपणांस कधीं उपयोग होणार नाहीं अशा विषयांचा अभ्यास करणें, हें सर्व शिक्षण नव्हे! जें ज्ञान व्यवहारांत आपणांस बाहेर आणतां येत नाहीं, तें डोक्यामध्यें कोंबणें ह्मणजे आध्यात्मिक बद्धकोष्ठ, अथवा मानसिक अग्निमांद्यच जडवून घेणें होय!

वरवर जरी थोडी नाउमेद झाली, आणि अतिशय कडू पण निर्जीव प्रतिकार जरी होत असला, तरी हिंदु लोक धिम्मेपणानें आणि निश्चयानें योग्य शिक्षण मिळवीत आहेत, आणि त्यांच्यामध्यें आज अवश्य ते फेरफार दिसत आहेत. मागच्या युगांतील सामाजिक बंधनें शिथिल होत चाललीं आहेत, आणि वर्णव्यवस्था आपल्या मुळच्या स्वाभाविक स्थितीला येत चालली आहे, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. पाश्चिमात्य शास्त्रानें बुजून न जातां आज हिंदुलोक पाश्चिमात्य शास्त्रें आपल्या ब्रह्मविद्येला ही एक मोठी जोड झाली ह्मणून मोठ्या आनंदानें त्यांचा स्वीकार करित आहेत.

हिंदूंमधील लग्नासंबंधानें देखील निरनिराळ्या जातींमध्यें कर्मठ आणि विद्वान् पंडितांनीं पुढाकार घेऊन लग्नाचें वय वाढविण्याचे जातिनिर्बंध केले आहेत, आणि मधून मधून होणाऱ्या जातीजातींमधील अनुरूप विवाहांनां देखील कोणी फारसे अडथळे आणीत नाहींत.

हिंदुलोकांमध्यें अन्नव्यवहारासंबंधीं एवढें फाजील महत्त्व आलें आहे, कीं, लोकांनीं आमच्या धर्माला 'चुल्हिकाधर्म' असें टोपणनांव ठेविलें आहे. इतका खटाटोप करून देखील आमचा याविषयींचा उद्योग भलत्याच दिशेनें जाऊन त्या सर्व श्रमांचा अपव्यय होत आहे. काय खावें आणि कसें खावें, याविषयींची आपण कधीं शास्त्रीय रीत्या चर्चाच केली नाहीं. ज्या तऱ्हेचें अन्न, त्या तऱ्हेचे तुमचे आचारविचार. कोणत्याहि यंत्रांतून जें त्यांत घातलें नसेल तें, बाहेर कसें येईल ? ज्यांनीं मेंदु व स्नायु यांनां लागणारें अन्न खाल्लें नसेल, त्यांच्याकडून मेंदूचें व स्नायूचें काम करण्याची अपेक्षा करणें, हा निवळ वेडेपणा आहे. भाजीपाला, धान्यें आणि फळें यांमधून मानसिक आणि शारीरिक व्यवसाय उत्तम रीतीनें चालण्यास आवश्यक तितके नायट्रेट्स् आणि फासफेट्स् यांचा पुरवठा होण्याजोगी निवड करतां येईल. ज्यामध्यें मेंदु किंवा स्नायु यांनां पोषक असा एक अंशहि नाहीं, अशा तुपाचें आम्हांला इतकें महत्त्व वाटतें, आणि विद्यार्थ्यांचें उत्तम अन्न जो सातु ( यव ) त्याला आम्ही कमी गणतों, ही मोठी शोचनीय गोष्ट नाहीं काय ? तिखट मसाला आणि औषधें हीं शरीरयंत्रास बिघडवून टाकतात, आमच्या स्वाभाविक रुचीला नासवितात, आणि सर्व तऱ्हेचें दौर्बल्य, व्याधि आणि मृत्यु यांनां बोलावून आणतात. लोणी, साखर आणि पिष्ट पदार्थ यांच्यासारखे कार्बोनेट्स् म्हणजे फुप्फुसाचें नुसतें जळण होय; स्नायु किंवा मेंदु यांचें त्यापासून कांहीं पोषण होत नाहीं. तरी पण त्यांनां अवास्तव महत्त्व दिलें जातें. आणि याचा परिणाम असा होतो, कीं, आळस, झोंपाळूपणा आणि थकवा हीं हटकून ठेविलेलींच. ज्ञानाला ( जीवनशास्त्राला ) अनुसरून तुमचें अन्न ठरवा.

हिंदुस्थानांतील साधूसारखे 'साधु' लोक हिंदुस्थानांतच ! ज्याप्रमाणें डबक्यांतील पाण्यावर हिरवेंचार तवंग किंवा शेवाळ सांठतें, त्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानभर ' साधु ' पसरले आहेत, आणि आजकाल त्यांची संख्या चांगली ५२ लाख झाली आहे ! कांहीं साधु मात्र सरोवराला शोभा आणणारीं शेवाळामधील कमळें आहेत.

परंतु त्यांपैकीं बरेच जण रोगोत्पादक तवंगच होत. पाणी वाहूं लागूं द्या, राष्ट्रांमध्यें प्रगति चालूं होऊं द्या, ह्मणजे सांख ( तवंग ) सहज आपोआप वाहून जाईल. साधुलोक ह्मणजे हिंदुस्थानच्या इतिहासांतील अवनत युगाचा स्वाभाविक परिणाम होय; परंतु हल्लीं सर्व साधारण सुधारणेचें तत्त्व सर्व गृहस्थाश्रमी लोकांमध्यें शिरून ज्याप्रमाणें त्यांच्या रुचि व त्यांचीं मनें बदलीत आहे त्याप्रमाणें त्यांचा साधूंवरहि परिणाम होत आहे. सध्यां असे कांहीं साधु निघत आहेत, कीं, राष्ट्रवृक्षावर परोपजीवी बांडगूळ होण्याऐवजीं अधिक कांहीं करितां आलें नाहीं, तरी आपल्या काया-वाचा-मनाचें राष्ट्रवृक्षाला निदान खत घालावें, असा प्रयत्न करीत आहेत.

उद्योगाची महती आणि निष्काम कर्माचा धर्म, जीं आजपर्यंत गीतेचे लाखों भक्त नुसत्या तोंडानें ह्मणत असत, तींच सरतेशेवटीं कमी अधिक प्रमाणानें श्रीकृष्णाच्या या जन्मभूमींत आज आचरणांत येत आहेत.

**योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥**

—भ. गी. अ. २. ४८.

उत्कट भक्ति आणि तीव्र विवेक हीं साधु आणि गृहस्थाश्रमी या दोघांमध्येंहि दिसून येत आहेत; आणि ज्याला ज्याला हिंदुस्थानची आंतील व बाहेरील, प्राचीन व अर्वाचीन स्थिति चांगली माहीत आहे, त्याला हें सहज दिसून येईल, कीं, सुशिक्षित हिंदुस्थानचा भावी धर्म ह्मणजे व्यावहारिक वेदान्त अथवा भक्तीनें कर्मयुक्त संन्यास हा होय.

खऱ्या कर्माची, खरी भक्ति आणि खरें ज्ञान यांपासून फाळणी करितां यावयाची नाहीं. श्रुतिधर्माच्या योगानें ( व्यावहारिक वेदान्तानें ) आमची प्रत्येक वासना, विचार व कृति हा एक देवाप्रीत्यर्थ केलेला यज्ञच होतो.

'देव' याचा वेदान्तिक भाषेमध्यें दीप्ति आणि आयुष्य देणारी शक्ति असा अर्थ होतो. त्याचप्रमाणें (देव) देवता याचा अर्थ त्या ईश्वरी शक्तीचीं निरनिराळीं स्वरूपें—मग त्या बाह्यशक्ति असोत अथवा अंतर्गत इंद्रियशक्ति असोत—असा होतो. आधिदैवत शब्दाशीं आध्यात्मिक शब्दाची तुलना

करून पाहतां, देवता हा शब्द समष्टिरूप शक्तिवाचक आहे असें दिसून येतें. चक्षुर्देवता ह्मणजे सर्व प्राण्यांमधील पाहण्याची आदित्य नांवाची शक्ति होय. आणि या विश्वाचा नेत्र जो सूर्य तो या शक्तीचें चिन्ह ( Symbol ) होय. हस्तेंद्रियाची देवता ह्मणजे सर्व हातांची शक्ति आणि या देवतेला 'इंद्र' असें ह्मणतात. पददेवता ह्मणजे सर्व पायांतील शक्ति आणि या देवतेला 'विष्णु' असें ह्मणतात. त्याचप्रमाणें इतर देवतांविषयीं समजावें. आतां देवाप्रीत्यर्थ खरा यज्ञ करणें ह्मणजे आपल्या व्यक्तिविषयक इंद्रियशक्ति त्याच्या त्याच्या समष्टिरूप शक्तिदेवतांनां अर्पण करणें, हें होय. इंद्राला बलिदान ह्मणजे देशांतील सर्व हातांच्या हिताकरितां काम करणें, आदित्याला बलिदान ह्मणजे सर्व नेत्रांत असलेलें ईश्वराचें अस्तित्व जाणणें, सर्व नेत्रांनां मान देणें, आपल्या गैरवर्तनानें कोणाच्याहि दृष्टीला त्रास न होऊं देणें, आपल्याकडे पहाणाऱ्या सर्वांनां प्रेमस्मित, आशीर्वाद देणें, आपले नेत्र विश्वचक्षूला इतक्या अनन्य भक्तीनें अर्पण करणें, कीं, आपला सर्व अहंकार नाहींसा झाल्यामुळें आपल्या नेत्रांतून तो विश्वचक्षु परमात्मा प्रकाशत रहावा, हें होय. बृहस्पतीला बलिदान ह्मणजे देशांतील सर्व डोक्यांनां आपलें डोकें ( बुद्धि, विचार ) अर्पण करणें, अगर आपल्या देशबांधवांच्या हितसंबंधांत आपले हितसंबंध लीन करून व त्यांच्या सुस्थितींत आनंद मानून, ते ( देशबांधव ) व आपण भिन्न नाहींत अशा विचारानें देशाचें हित साधणें हें होय.

सारांश, यज्ञ ह्मणजे सर्व देशबांधव एकच आहेत असें मानून, क्षुद्र मीपणा नाहींसा केल्यानें सर्वांचा आत्माच होऊन, माझे शेजारीपाजारी व बांधव हे मीच आहेत हें तत्त्व आचरणांत अनुभविणें होय. हा यज्ञ ह्मणजे क्रुसावर चढविल्यानंतर ज्याप्रमाणें ख्रिस्ताचें दिव्यस्वरूपांत पुनरुत्थान झालें, त्याप्रमाणें देहात्मत्वाचा ( मीपणाचा ) वध केल्यानंतर आपलेंहि विश्वात्मरूपांत पुनरुत्थान होणें होय. याच्याच एका अंगाला भक्ति व दुसऱ्या अंगाला ज्ञान असें ह्मणतात.

## प्रेमार्पण ( सर्व सर्वार्पण. )

स्वीकारीं मम सर्वस्वा । सर्वा तें तुज अर्पण ।
स्वीकारीं मम हस्तांतें । तव सेवा घडो तयां ॥ १ ॥
स्वीकारीं हृदया माझ्या । भरो त्वन्मूर्ति त्यामधें ।
स्वीकारीं नेत्र हे माझे । धुंद होवोत भक्तिनें ॥ २ ॥
स्वीकारीं मम चित्तातें । होवो तें तव मंदिर ।
माझें ऐसें नुरो कांहीं । सर्व सर्वीं सदा स्फुरो ॥ ३ ॥

हें प्रेमार्पण पूर्णपणें साध्य झालें, ह्मणजे '**तत्त्वमसि**' ( तें तूं आहेस ) या तत्त्वाचा आनंदकारक अनुभव येतो.

देशाभिमानी, देशभक्त व्हावें, अशी तुमची इच्छा आहे काय? असल्यास तुमचा देश व तुमचे देशबांधव यांच्यावर प्रेम करा. तुमचा व त्यांचा एकजीव (तादात्म्य) होऊं द्या. तुह्मांमध्यें व तुमच्या देशबांधवांमध्यें तुमच्या स्वतःचा 'मीपणा'चा यत्किंचित्‌हि पातळ पडदा येऊं देऊं नका. **क्षुद्र अहंपणा टाकून देऊन देशाशीं तादात्म्य पावल्यानंतर तुमच्या मनांत कोणताहि विचार येवो, तो विचार सर्व देशाचा होईल.** तुह्मी पुढें व्हा, सर्व देश तुमच्या मागोमाग येईल. आयुरारोग्याचा विचार तुमच्या मनांत येतांच तुमचे देशबांधव सशक्त व निरोगी होतील. तुमची शक्ति त्यांच्या शिरांतून, नाड्यांतून वाहूं लागेल. 'मी हिंदुस्थान—सर्व हिंदुस्थान आहें' असें वाटूं द्या. हिंदुस्थानची भूमि हेंच माझें शरीर, कामोरीन हें माझीं पावलें होय, हिमालय माझें शिर होय, माझ्या डोईच्या केंसांमधून गंगानदी वाहते, माझ्या मस्तकापासून ब्रह्मपुत्रा व सिंधु या नद्या उगम पावतात, विंध्याचल हा माझ्या कमरेभोंवतीं बांधलेला कमरपट्टा होय, कारोमांडेल हा माझा उजवा व मलबार हा माझा डावा पाय होय, मी सर्व हिंदुस्थान आहें! हिंदुस्थानची पूर्व व पश्चिम हे माझे बाहु होत,

आणि हे माझे बाहु अखिल मानवजातीला कवटाळून धरण्याकरितां मी समोर परसतों. माझें प्रेम विश्वाला व्यापून टाकणारें आहे. अहाहा! माझ्या देहाची ठेवणच या प्रकारची आहे! उभा राहून अनंत दिक्कालाकडे माझी नजर मी फेंकीत आहें; परंतु माझा अंतरात्मा सर्वांचा–विश्वाचा आत्मा आहे. मी जेव्हां चालतों तेव्हां हिंदुस्थान देश चालतो, मी बोलतों तेव्हां हिंदुस्थान देश बोलतो, मी श्वासोच्छ्वास करतों तेव्हां हिंदुस्थान देश श्वासोच्छ्वास करतो, असें मला वाटतें. मी **हिंदुस्थान** आहें, मी **शंकर** आहें, मी **शिव** आहें याप्रमाणें वाटणें, हाच उच्च तऱ्हेचा स्वदेशाभिमान होय, आणि व्यावहारिक वेदान्त तो हाच!

# *रोखधर्म.

**' सत्यमेव जयते नानृतम्. '**

वेदांमध्यें लिहिलें आहे, कीं, जय सत्याचाच होतो, असत्याचा केव्हांहि होत नाहीं. **सत्याला मरण नाहीं. असत्याला मान नाहीं.** जगामध्यें जेथें जेथें संपत्ति व ऐश्वर्य आहे, तेथे तेथें त्याचें खरें कारण धर्मच आहे. आपण हिंदु असें ह्मणतों, कीं, लक्ष्मी ही विष्णूची पत्नी आहे व ती पतिव्रता आहे. जेथें विष्णु ( सत्य किंवा खरेपणा ) आहे, तेथें लक्ष्मी असलीच पाहिजे; तिला इतर कोणत्याहि पुरुषाची पर्वा नाहीं. अभ्युदय हा एकाद्या देशाला वांटून दिलेला आहे, असें नाहीं. किंवा तो एकाच ठिकाणाला चिकटून राहिलेला नाहीं. जे लोक यूरोप, अमेरिका इत्यादि देशांच्या उन्नतीला तेथील थंड आणि शक्तिदायक हवा कारण आहे असें समजतात, आणि इतर कांहीं देशाच्या अवनतीचा तेथील भूमीशीं संबंध जोडतात, ते सपशेल चुकतात. दोन हजार वर्षें देखील झालीं नसतील, इंग्लंडचे रहिवासी रोम वगैरे देशांमध्यें कैदी व गुलाम ह्मणून विकले जात असत. आज इंग्लंड एवढ्या मोठ्या प्रदेशावर राज्य करीत आहे. मग इंग्लंड काय आपली पूर्वींची चतुःसीमा सोडून पुढें धावून आलें आहे ? पांचशें वर्षांपूर्वीं अमेरिका आज जेथें आहे त्याच स्थानीं होती; परंतु इतक्या कालामध्यें तेथील रहिवाशांच्या स्थितीमध्यें केवढा फरक पडला आहे, याचा अंदाज करा. रोम, ग्रीस, मिसर आणि आमचा हिंदुस्थान, हे देश प्राचीनकाळीं जेथें होते तेथेंच आज आहेत. त्या काळीं त्यांची सर्व जगामध्यें ज्ञानाबद्दल व दानाबद्दल प्रख्याति होती. ऐश्वर्य, देशांची किंवा मनुष्यांची पर्वा करित नाहीं. **जे लोक सन्मार्गानें चालतात त्यांचाच जय होतो,** आणि **जोंपर्यंत ते सत्यधर्मानें वागतात तोंपर्यंत त्यांची सद्दी असते.** बांधवहो ! मला क्षमा करा.

---

* स्वामींनीं हें व्याख्यान गाजीपुर येथें दिलें होतें.

# रोख धर्म.

'राम' आपला आहे व आपण 'रामा'चे आहांत. पूर्ण प्रेमानें मजजवळ या. जें कांहीं मी सांगणार आहें तें प्रेमानेंच सांगणार आहें; परंतु तुमची खुशामत मात्र करणार नाहीं. **प्रेमाला खुशामत केलेली आवडत नाहीं.** 'राम' जपानमध्यें होता, अमेरिकेमध्यें होता, यूरोपमधील कांहीं देश त्यानें पाहिले; परंतु जेथें जेथें जय दिसून आला, तेथें तेथें **तो सत्याचाच** होता. अमेरिकेनें जी उन्नति साधली आहे ती धर्माप्रमाणें चालल्यानेंच. **धर्माचा मक्ता कोणाला दिलेला नाहीं. पाहिजे त्या जागीं धर्म आचरतां येतो.**

धर्म दोन प्रकारचा आहे. एक रोख व दुसरा उधार. पुढील उदाहरणानें हें स्पष्ट होईल. एका गृहस्थानें कांहीं ऐवज जमिनीमध्यें पुरून ठेविला होता. त्याच्या मुलाला तें समजलें. मुलानें ती जमीन खणून रुपये बाहेर काढले व ते खर्च करून टाकले, आणि तितक्याच वजनाचे दगड तेथें ठेवून दिले. थोड्या दिवसांनीं बापानें जेव्हां ती जमीन खणून पाहिली आणि तेथें रुपये दिसेनात, तेव्हां तो रडूं लागला. "हाय रे हाय! माझी दौलत कोठें गेली?" मुलगा ह्मणाला "बाबा आपण रडतां कां? आपणाला ते उपयोगांत आणावयाचे नव्हतेच; व ठेवून देण्याकरितां ह्मणाल, तर पहा तेथें तेवढ्याच वजनाचे दगड आहेत."

**'राखूनच ठेवावयाचें असेल तर दगड व सोनें सारखेंच!'**

धर्माधर्मांमधील युद्ध आणि धर्मसंबंधीं छळ जो होतो, तो सर्व रोख धर्मामुळें नव्हे, तर उधार धर्मामुळें. **रोकड अथवा रोख धर्म तो, कीं, जो मरणानंतर नव्हे, तर या प्रस्तुत जन्माविषयींच काळजी घेतो.** उधार धर्म हा अंधश्रद्धेचा आहे, आणि रोख धर्म खात्रीचा आहे. उधार धर्म सांगण्यासाठीं आहे आणि रोख धर्म साधण्याकरितां आहे. धर्माचा जो रोकड भाग आहे त्याविषयीं सर्व धर्मांचें एकमत आहे. **खरें बोलणें, शास्त्राध्ययन करणें आणि त्याप्रमाणें वागणें, अहंकारापासून व आप्पलपोटेपणापासून मुक्त होणें, परधन व परदारा पाहून वाईट वासना मनांत येऊं न देणें, जगाच्या लालुचीच्या आणि धमकीच्या [illegible] आपल्या मूळ तत्त्वाला—सत्य**

**स्वरूपाला न विसरणें, खंबीर मन आणि स्वतंत्र बाण्याची वृत्ति असणें, या रोख धर्माविषयीं दोन मतें असणें शक्य नाहीं !**

उधारीच्या गोष्टी भांडणाऱ्या लोकांकडे सोंपवून देऊन, रोकड धर्मानें जे चालतात, त्यांची उन्नति व उत्कर्ष होतो. हें व्यावहारिक सत्य परदेशांत गेल्यानंतर चांगलें निदर्शनाला आलें. हिंदुस्थान व अमेरिका यांमध्यें काय फरक आहे ? येथें दिवस असतो तेव्हां तेथें रात्र असते, व जेव्हां तेथें दिवस असतो तेव्हां येथें रात्र असते. जेव्हां हिंदुस्थानचे ग्रह उच्चीचे होते तेव्हां अमेरिका कोणाला ठाऊकहि नव्हती. आज अमेरिका वैभव-चक्राच्या शिखरावर आहे, तर हिंदुस्थानाला कोणी विचारीत देखील नाहीं. पूजेच्या किंवा सत्काराच्या वेळीं येथें जोडा काढितात, तेथें टोपी काढितात. येथें घरांत पुरुषांचें राज्य असतें, तेथें स्त्रियांचें असतें. येथें विधवांची संख्या अधिक आहे अशी कुरकूर आहे, तेथें कुमारिकांची संख्या अधिक असल्याबद्दल कुरकूर आहे. हिंदुस्थानांत गाढव आणि घुबड हीं मूर्खपणाचीं द्योतक समजतात, अमेरिकेंत ते प्राणी विश्वास आणि हुशारी यांचें द्योतक मानतात. या देशांत जे ग्रंथ लिहिले जातात, त्यांतील सुमारें अर्धा भाग प्राचीन वैभवाच्या गोष्टींनीं भरला नसेल तर त्या ग्रंथांनां कोणीच विचारीत नाहीं; त्या देशामध्यें पुस्तकांतील सर्व गोष्टी नव्या नसल्या, तर त्यांनां कोणी विचारीत नाहीं. येथें जर कांहीं धंद्यांविषयीं उपयुक्त माहिती समजली तर ती छपवून ठेवितात, तेथें ती छापून प्रसिद्ध करितात. येथें औपचारिक धर्म यथेच्छ आहे, तेथें रोख धर्म पुष्कळ आहे. येथें, दुसऱ्याशीं मिळूनमिसळून न वागणें, दुसऱ्याच्या हातचें न खाणें, आणि सर्वांपासून अलग राहणें यांत मोठेपण आहे; तेथें लोकांत जितकें मिळूनमिसळून वागाल, तेवढा मान अधिक. येथें दुसऱ्या देशाची भाषा शिकणें हें गैर समजलें जातें; [ न पठेत् यावनीं भाषाम् ]* तेथें ज्या मानानें परकीय भाषा अवगत करून घ्याल त्या मानानें तुमची मान्यता वाढेल. 'राम' जपानला जात असतां, आगबोटीवर अमेरिकेच्या एका वृद्ध प्रोफेसराची व त्याची ओळख झाली. तो रशियन भाषा शिकत होता.

* पथ्य दिलें आहे.

चौकशीअंतीं समजलें, कीं, त्याला पूर्वींच अकरा भाषा येत होत्या. त्याला विचारलें, कीं, " या वयामध्यें ही नवीन भाषा आपण कां शिकतां?" त्यानें उत्तर दिलें " मी भूगर्भशास्त्राचा प्रोफेसर आहें. रशियन भाषेमध्यें भूगर्भशास्त्रावर एक अद्भुत ग्रंथ लिहिला गेला आहे, त्याचें भाषांतर जर मला करितां येईल, तर माझ्या देशबांधवांचा पुष्कळ फायदा होईल, ह्मणून मी रशियन भाषा शिकत आहें. "

'रामा'नें ह्मटलें " आतां तर तुह्मी मृत्यूच्या समीप येऊन पोहोंचलां आहांत; आतां शिकतां कशाला? आतां ईश्वराची आराधना करा. 'डुकृञ् करणे' सारखे व्याकरणनियम कां धरून बसलां आहां ? "

त्यानें उत्तर दिलें " **लोकसेवा ह्मणजेच ईशाराधना होय ! मी ईश्वराला न मानणारा आहें. जनता हाच माझा ईश्वर !** तसेंच हें कठिण कर्तव्य करीत असतां, मीं नरकाला गेलों तर गेलों, मला त्याची पर्वा नाहीं. माझ्या देशबांधवांनां जर सुखलाभ होईल, तर हजारदां नरकवास मला प्राप्त झाला तरी चालेल. या जन्मांत लोकसेवेचा आस्वाद घेण्याचा हक्क बजावीत असतां मृत्यूसंबंधीं अज्ञात भीतीला बळी पडून मी तें काम सोडणार नाहीं !

भूतकाल स्वप्नवत् आहे आणि भविष्यकाल नुसतें अनुमान आहे. वर्तमानकालच काय तो खरी संपत्ति आहे, असें समजलें पाहिजे. "

रोख धर्म तो हाच, भगवद्गीतेमध्यें अशी उत्कृष्ट आज्ञा आहे, कीं, ' **कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन.** '

कर्म तर करीतच रहा, परंतु फलावर दृष्टि ठेवूं नको.

लार्ड मेकालेची अशी प्रार्थना होती, कीं, आपण मेलों, तर पुस्तकालयांतच मरावें. मेलों तर **प्रियकराच्या** आळींतच मरेन.

" **प्रियेच्या** गल्लींतच मला पुरावें. फुलबागेमध्येंच बुलबुलाची कबर असली पाहिजे. "

मेलों तर कर्तव्य बजावीत असतां मरेन. घनघोर युद्धामध्येंच सशस्त्र देह ठेवीन. हिंमत, आनंद आणि उत्साह यांसह प्राण देईन.

एक मनुष्य बाग लावीत होता. त्याला कोणीं विचारिलें, कीं, "ह्मातारेबुवा, तुह्मी हें काय करीत आहां? तुह्मी का याचें फळ खाणार ? तुमच्या

गोवऱ्या तर स्मशानावर गेल्यासारख्याच आहेत. तुम्हाला त्या फकीराचें वचन आठवत नाहीं काय ? कीं, 'हे उपदेशक ! या जगांत माझें घर तयार करून उपयोग काय ? जेव्हां मजूर येतात तेव्हां माझें थडगें खोदणारांची मला आठवण होते. "

बागवानानें उत्तर दिलें " दुसऱ्यानें पेरिलें होतें तें मीं खाल्लें, मी पेरतों तें दुसरे खातील. "

याप्रमाणेंच जगाचें काम चाललें आहे. येशू, महम्मद वगैरे जे महात्मे होऊन गेले, त्यांनीं स्वतः लाविलेल्या वृक्षांचीं फळें स्वतःच खाल्लीं काय ? केव्हांहि नाहीं ! या महात्म्यांनीं आपल्या शरीरांचें खत बनविलें होतें, मग ते स्वतः फळ कोठून खाणार ? आज शेंकडों वर्षें लोक ज्या वृक्षांचीं फळें चाखत आहेत, ते वृक्ष प्राचीन ऋषींच्या रक्षेपासून उत्पन्न झाले आहेत. हा सिद्धांत धर्माचा प्राण आहे, व हाच रशियन भाषा शिकणाऱ्या त्या प्रोफेसरानें अमलांत आणला होता.

ज्यावेळीं 'राम' जपानहून अमेरिकेस चालला होता, त्यावेळीं जहाजावर सुमारें दीडशें जपानी तरुण होते. त्यांपैकीं कांहीं थोर घराण्यांतील होते; परंतु त्या सर्वांमध्यें आपल्या घरून रुपये आणलेला असा क्वचित्‌च होता. पुष्कळ तर असे होते, कीं, त्यांनीं आगबोटीचें भाडें देखील घरून आणलें नव्हतें. त्यांपैकीं कांहीं, श्रीमंत उतारूंचे बूट साफ करण्याच्या कामावर राहिले. कांहीं आगबोटीची तक्तपोशी धुण्याच्या कामावर होते, व कांहीं अशाच कांहीं हलक्या कामावर नोकर राहून आगबोटीचें भाडें चुकतें करीत होते. चौकशीअंतीं असें समजलें, कीं, 'आपल्या देशचा पैसा परदेशीं जाऊन कां खर्च करावा ? आगबोटीचें भाडें देखील मेहनत करून चुकतें करावें' असा त्यांचा मानस होता. अमेरिकेंत गेल्यावर त्यांपैकीं कांहीं विद्यार्थी श्रीमंत लोकांच्या घरीं दिवसभर मजूरी करीत असत, आणि रात्रीं रात्रीच्या शाळांमध्यें शिकत असत. कांहीं रेल्वेच्या कामावर, कांहीं खडी फोडण्याच्या कामावर, कांहीं इतर कामावर लागले. हे लोक उन्हाळ्यांत मजूरी करीत आणि हिंवाळ्यांत विद्यालयांत शिकत असत.

**“ज्ञानप्राप्तीसाठीं मेणवत्तीप्रमाणें वितळलें पाहिजे.”**

याप्रमाणें सातआठ वर्षें आपला निर्वाह करून आपलीं डोकीं अमेरिकेंतील ज्ञान व कला यांनीं, आणि आपले खिसे अमेरिकेंतील पैशांनीं भरून हे जपानी लोक स्वदेशीं परत येतात. प्रत्येक आगबोटींतून वीस पंचवीस आणि केव्हां केव्हां शेंकडों जपानी लोक अमेरिका वगैरे देशांना जात असतात. हजारों किंवा लाखों जपानी लोक दरसाल अमेरिका व जर्मनी वगैरे देशांत जाऊन तेथून ज्ञान घेऊन परत येतात. याचा परिणाम आपण पहातच आहां. पन्नास वर्षांपूर्वीं जपान हिंदुस्थानापेक्षांहि खालीं होतें, आज यूरोपाच्याहि वर गेलें आहे.

तुमचा हात गोरा पान आहे, त्यांतील रक्त अगदीं शुद्ध आहे; परंतु जर मनगटावर गच्च पट्टी बांधली तर हातांतील रक्त हातांतच राहील; शरीराच्या इतर भागांत तें खेळावयाचें नाहीं व तें लवकरच नासून जाईल आणि हात सुकून जाईल. त्याचप्रमाणें जो देश “आह्मीच मोठे आहोंत, आह्मी चांगले आहोंत, आह्मी थोर आहोंत, आह्मांला म्लेंच्छांशीं व काफीरांशीं संबंध ठेवण्याची काय जरूरी आहे?” असें ह्मणून स्वतःला इतरांपासून अलग ठेवितो, तो स्वतःवर पट्टी बांधून घेतो व स्वतःला आपण होऊन कृश करून घेतो. ‘वाहतें पाणी स्वच्छ असतें, सांठलेलें पाणी गलिच्छ असतें,’ ही ह्मण प्रसिद्धच आहे.

**“पाणी समुद्राकडे वाहतें राहील तरच तें चांगलें.”**

**“मनुष्य देशाटन करील तरच तो चांगला.”**

विचार करून पाहतां असें दिसून येईल, कीं, कोणत्याहि देशानें आपली जी उन्नति करून घेतली आहे ती प्रवासानेंच. यासंबंधीं अमेरिकन लोकांची गोष्ट पहा. साधारणपणें पंचेचाळीस हजार अमेरिकन लोक पॅरिस शहरांत रोज असतात. त्यांच्या झुंडींच्या झुंडी येत जात असतात. व फ्रान्समध्यें जरा कांहीं नवीन शोध व कला निघाली, कीं, चट्दिशीं ते आपल्या देशाला पोहोंचवितात. जुन्या कला शिकण्यासहि ते कमी करितात असें नाहीं. प्रत्येक मोसमांत सुमारें ऐशीं हजार अमेरिकन लोक मिसर देशांत जातात व तेथील मनोरे पाहून घेतात. शेंकडा चाळीस

अमेरिकन लोक सर्व पृथ्वी फिरून आले आहेत. या रीतीनें हे लोक जेथें ज्ञान मिळेल तेथून तें आणून आपल्या देशाला पोहोंचवितात. जर्मन लोकांची गोष्टहि अशीच आहे. अमेरिकेहून येतांना 'राम' जर्मन जहाजांत बसला होता. पहिल्या वर्गाचे उतारू सुमारें तीनशें होते; त्यांमध्यें प्रोफेसर, ड्यूक, बॅरन, व्यापारी वगैरे लोक होते. दिवसां 'राम' जहाजाच्या सर्वांत वरच्या मजल्यावर जाऊन बसत असे, व तेथें एकांतामध्यें बसून लिहीतवाचीत असे, अथवा ध्यानामध्यें मग्न असे; परंतु जर्मन लोक वरच्या मजल्यावर येऊन 'रामा'ला खालीं घेऊन येत व त्याला व्याख्यान द्यावयास लावीत. 'रामा'ला परदेशचा ह्मणून काफीर किंवा म्लेंच्छ याप्रमाणें वागवीत नसत. त्यांचा विचार हा, कीं, या परदेशच्या मनुष्याकडून जितकें ज्ञान मिळेल तेवढें घ्यावें. अमेरिकेच्या स्वतंत्र संयुक्त संस्थानांमध्यें जें सर्वांत पहिलें शहर 'रामा'नें पाहिलें, तें वाशिंगटन होय. तेथील वाशिंगटन युनिव्हर्सिटीनें 'रामा'ला हिंदु तत्त्वज्ञानावर व्याख्यान द्यावयास निमंत्रण केलें. व्याख्यानानंतर एका तरुण प्रोफेसराची मुलाखत झाली. तो नुकताच जर्मनीहून परत आला होता. "जर्मनीला कां गेलां होतां ?" असें 'रामानें' त्याला विचारिलें. तो ह्मणाला "वनस्पतिशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांमध्यें आमची युनिव्हर्सिटी व जर्मन युनिव्हर्सिट्या यांची तुलना करावयास गेलों होतों." त्यानें आपलें मत उघडपणें असें सांगितलें, कीं, "दहा वर्षांपूर्वीं जर्मनी आमच्या पुढें होती; परंतु आज आह्मी जर्मनीहून कांहीं कमी नाहीं."

**" मरे तोंवरी शिकत रहा !"**

मोठ्या मेहनतीनें इतरांकडून शिकशिकून त्यांनीं विद्या संपादन केली आहे, व ती वाढविली आहे.

अमेरिकन लोक*डालरचे दास आहेत असें ह्मणतात, तें खरें नाहीं. उलट **डॉलर विद्येच्या मागून आपोआप येतात.** जे लोक अमेरिकन

---

* डालर=तीन रुपये दोन आणे किंमतीचें अमेरिकन नाणें.

लोकांनां हा दोष लावितात त्यांचा धर्म रोख नाहीं, पण पैसा हाच त्यांचा धर्म आहे; किंवा अमेरिकेची वस्तुस्थिति त्यांनां माहीत नाहीं. खरें पाहतां ‘ द्राक्षें आंबट आहेत ’ या कोटींतलाच तो दोष आहे. कॅलीफोरनिया-मधील एका बाईनें अठरा कोट रुपये देऊन एक विश्वविद्यालय स्थापन केलें आहे. याचप्रमाणें ज्ञानाची वृद्धि व प्रसार करण्याकरितां दरवर्षी क्रोडो रुपये तेथें दान केले जात आहेत. हिंदुस्थानच्या ब्रह्मविद्येची तेथें इतकी मान्यता आहे, कीं, व्यावहारिक वेदान्त तेथें जसा आहे तसा आज-काल येथें नाहीं. परंतु जरी त्या लोकांनीं आमच्या वेदान्ताचें अध्ययन करून तो आपलासा करून टाकिला आहे, तरी ते हिंदु झाले नाहींत. त्याचप्रमाणें आपणहि त्यांचीं शास्त्रें व कला पचवून देखील आपलें राष्ट्रीयत्व कायम राखूं शकूं. वृक्ष बाहेरून आपलें खाद्य घेतो, परंतु स्वतः तें खाद्य होत नाहीं. बाहेरील गोडें पाणी, हवा व प्रकाश हीं तो ( वृक्ष ) खातो व पचवितो, परंतु गोडें पाणी किंवा हवा होऊन जात नाहीं. जपानी लोकांनीं अमेरिका व यूरोप येथील शास्त्रकला पचविल्या, परंतु स्वतः ते जपानीच राहिले. देवांनीं आपल्या **कचाला** राक्षसांकडे पाठवून त्यांची संजीवनी विद्या शिकवून घेतली, पण त्यायोगें ते स्वतः राक्षस बनले नाहींत. त्याचप्रमाणें तुह्मी यूरोप व अमेरिका येथें जाऊन त्यांचें ज्ञान शिकल्यानें हिंदुत्वाला मुकतां, असें नाहीं. जे लोक ज्ञानाला एकाद्या विवक्षित देशांत अडकवूं पहातात आणि ह्मणतात, कीं, “हें आमचें ज्ञान आहे, तें दुसऱ्यांचें ज्ञान आहे; दुसऱ्यांचें ज्ञान आमच्या येथें येईल तर तो गुन्हा होईल; त्याचप्रमाणें आमचें ज्ञान दुसऱ्यांनीं काय ह्मणून न्यावें?” ते आपल्या ज्ञानाचें शुद्ध अज्ञान बनवितात. या खोलीमध्यें चक्क उजेड आहे. हा प्रकाश अत्यंत मनोहारी व सुखकर आहे. पण जर आह्मी ह्मणालों “हा प्रकाश आमचा आहे, आमचा आहे, छे, बाहेरच्या प्रकाशाशीं मिसळून तो अपवित्र होतां कामा नये!” आणि अशा या विचारानें आपल्या प्रकाशाचें संरक्षण करण्याकरितां जर आपण पडदे सोडले, दरवाजे झांकले, खिडक्या लावून टाकल्या, आणि गवाक्षें बंद केलीं, तर प्रकाश एकदम नाहींसा होईल.

नव्हे, तो काजळाप्रमाणें काळा होईल. ह्मणजे अर्थात् जिकडे तिकडे अंधार पसरेल. अरेरे! हिंदुस्थानांत आह्मीं ही चुकीची पॉलिसी–नीति आचरणांत आणिली आहे!

"सुलैमानच्या देशापेक्षां माझा देश मला अधिक आवडतो. *संबुल किंवा *रैहापेक्षां माझ्या देशांतील कांटाच अधिक चांगला आहे, ‡" असें ह्मणून स्वतः कांटा व्हावयाचें, आणि आपल्या देशाला देखील कंटकवन बनवायाचें, ही खरी देशप्रीति नव्हे! साधारणपणें एकाच तऱ्हेचीं झाडें एकाच ठिकाणीं गर्दी करून लाविलीं, तर तीं सर्व कमजोर होतात. त्यांपैकीं कांहीं जरा दूरदूर लावा, ह्मणजे तीं मोठीं आणि मजबूत अशीं होतात. राष्ट्रांनां हीच गोष्ट लागू पडते. काश्मीरविषयीं ह्मणतात, कीं, "पृथ्वीवर वैकुंठ असेल तर तें हेंच होय, निःसंशय हेंच होय."

परंतु काश्मिरी लोक आपलें आनंदवन सोडून बाहेर जाणें हा गुन्हा समजतात; ह्मणून ते कमजोर, दरिद्री आणि नादान असल्याबद्दल त्यांची ख्याति आहे. पण त्यांच्यापैकीं जो काश्मिरी पंडित आपलें पर्वतशिखरावरील भूवैकुंठ सोडून बाहेर निघाला, त्यालाच खरोखरी वैकुंठ प्राप्त झालें. तो जेथें जेथें गेला, तेथें तेथें इतर हिंदुस्थानी लोकांवर त्यानें आपला पगडा बसविला, आणि त्यांच्यामधील मोठमोठ्या जागा त्यानें सुशोभित केल्या. जोंपर्यंत जपानी लोकांनीं आपणाला जपानमध्यें कोंडून घेतलें होतें, तोंपर्यंत ते निर्बल आणि खालावलेले होते; जेव्हां ते परदेशीं जाऊं लागले व त्यांनां बाहेरची हवा लागली, तेव्हां ते धट्टेकट्टे बनले. यूरोपमधील गरीब, दरिद्री, साधारण लोक जहाजांत बसून अमेरिकेंत जाऊन राहिले, व आज ते सगळ्या जगांत सामर्थ्यवान् झाले आहेत. त्याचप्रमाणें ज्यांनां स्वदेशीं कोणी विचारीत नव्हतें, असे कांहीं हिंदी लोक परदेशीं जातांच तेथील सुधारलेल्या लोकांच्या उच्च उच्च दर्जामध्यें मोडूं लागले आणि त्यांनीं तेथें मोठें नांव मिळविलें आहे.

* या दोन सुवासिक वनस्पति आहेत.

‡ तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषाः पिबंति.

"पाणी वाहिलें नाहीं तर त्याला घाण येते; खंजीर चालला नाहीं तर तो गंज खातो; फिरण्यानेंच सूर्याला मोठेपणा आलेला आहे; चंद्रालाहि त्यामुळेंच महत्त्व आलें आहे; आणि नभोमंडळ * देखील फिरण्यानेंच उच्च स्थितीला पोहोंचलें आहे."

ज्याप्रमाणें वृक्ष सर्व अडथळ्यांनां न जुमानतां जेथें पाणी असेल तेथपर्यंत आपलीं मुळें पाठवितात, त्याप्रमाणें अमेरिका, जर्मनी, जपान, इंग्लंड येथील लोक, समुद्राला चिरून, पर्वत पोंखरून, पैसा खर्च करून व अनेक तऱ्हेचीं संकटें सोसून, जेथें जेथें कोणत्याहि तऱ्हेचें ज्ञान मिळणें शक्य आहे तेथें तेथें जाऊन पोहोंचले आहेत. त्या देशांच्या उन्नतीचें हें एक कारण आहे. आतां दुसरें ऐका.

## स्वार्थत्याग.

कांहीं हिंदुस्थानी तरुण एका जपानी जहाजामध्यें बसून चालले होते. त्यांच्या वर्गातील उतारूंनां जें जेवण मिळत असे, तें कांहीं कारणांमुळें त्यांनीं घेतलें नाहीं. एका गरीब जपानी तरुणानें पाहिलें, कीं, हे सर्व हिंदी तरुण भुकेलेले आहेत, म्हणून त्यानें त्या सर्वांसाठीं दूध, फळें वगैरे विकत आणून त्यांच्यासमोर ठेविलीं. त्यांनीं प्रथम नेहमींच्या चालीप्रमाणें त्यांचा स्वीकार केला नाहीं; पण नंतर त्यांनीं तीं घेऊन खाऊन टाकिलीं. जहाजावरून उतरण्याच्या वेळीं, त्या जपानी मुलाचे आभार मानून ते त्या वस्तूंची किंमत देऊं लागले. त्यानें ती घेतली नाहीं. उलट हात जोडून तो प्रार्थना करूं लागला, कीं, "जेव्हां आपण हिंदुस्थानांत जाल, तेव्हां कोणाला असें सांगूं नका, कीं, जपानी लोक इतके नालायक आहेत, कीं, त्यांच्या जहाजावर खालच्या दर्जाच्या उतारूंची खाण्यापिण्याची मनाजोगी सोय नसते."

जरा विचार करा, कीं, एक गरीब तरुण प्रवासी, त्या जहाजाशीं स्वतःचा कांहीं संबंध नसूनहि आपला पैसा खर्च करतो आहे; कशाकरितां ? तर कोणींहि आपल्या देशाच्या जहाजाला नांवें ठेवूं नयेत. हा तरुण

---

* आकाश जात्यासारखें फिरत असतें, असें फारशी कवि समजतात.

स्वदेशाहून स्वतःला निराळें अस्तित्व आहे, असें मानीत नव्हता. सगळ्या देशाचें जीवन तेंच आपलें जीवन, अशी त्याची पूर्ण भावना झाली होती. केवढें हें प्रेम ! केवढा हा स्वार्थत्याग ! याचें नांव शुद्ध ऐक्य, रोख धर्म ! या व्यावहारिक वेदान्तावांचून ऐश्वर्य आणि कल्याण प्राप्त होणें असंभवनीय आहे.

**"जो स्वतःकरितांच जगतो त्यानें मरणें हेंच बरें ! मानवजातीकरितां जो मरतो तोच खरा जीवंत होय !"**

आपल्या लक्ष्यांत असेल, कीं, रशियन लोकांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याची जेव्हां जपानला जरूरी पडली, आणि त्याकरितां कांहीं बोटी समुद्रामध्यें बुडवावयाच्या होत्या, तेव्हां **मिकाडो** बादशहा ह्मणाला "माझ्या प्रजेपैकीं कोणालाहि या कामीं मी सक्ति करीत नाहीं; परंतु ज्यांची या जहाजांबरोबर बुडण्याची खुषी असेल, त्यांनीं स्वयंसेवक ह्मणून अर्ज करावे." तेव्हां जरूर होते त्यांपेक्षां हजारों अर्ज अधिक आले. त्यांमध्यें निवडानिवड करण्याची पंचाईत पडली. तेव्हां कांहीं जपानी तरुणांनीं आपल्या अंगांतून रक्त काढून रक्तानें लिहिलेले अर्ज दाखल केले ! उद्देश हा, कीं, आपले अर्ज लवकर मंजूर व्हावे. शेवटीं रक्ताच्या अर्जांनां अधिक मान देण्यांत आला. जेव्हां हे लोक जहाजावरोबर बुडूं लागले, तेव्हां त्यांपैकीं दोन एक कप्तानांनां, वाटल्यास आपला जीव बचावतां आला असता. कोणींसें त्यांनां ह्मटलें "कप्तानसाहेब, आपण काम तर करून चुकलांच, आतां जीव वांचवून जपानला चला !"

तेव्हां मृत्यूची जणूं चेष्टा करणाऱ्या त्या कप्तानसाहेबानें तिरस्कारानें उत्तर दिलें "काय ! मी परत जाण्याकरितां येथें येण्याचा अर्ज दिला होता ?"

**'यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम'**

परत जाणें हें कांहीं पौरुषाचें लक्षण नव्हे.

" येथें ज़ीव देण्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. वाघ नदीपार जातांना पाण्यामध्यें अगदीं सरळ जातो."

## रोख धर्म.

रोख धर्म आणि शुद्ध वेदान्त तो हाच.

***नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः**

" मीच मृत्युरूप आहें; मला मृत्यु कसा नेईल? "

शास्त्रीय प्रयोगाकरितां एकदां जीवंत मानवी शरीर कापण्याची जरूरी पडली. अमेरिकेंतील कांहीं तरुण आपली छाती उघडी करून उभे राहिले आणि ह्मणाले " आह्मांला चिरा, आह्मांला फाडा. तसूतसूनें आमचा प्राण जाऊंद्या. जर याच्या योगानें शास्त्राची प्रगति होते आणि दुसऱ्यांचें कल्याण होतें, तर आमचें व्हिव्हिसेक्शन (जीवंत देह शास्त्रीय प्रयोगाकरितां कापणें) आह्मांला हजारपटीनें शुभ आहे."

याला प्रेम ह्मणावें, कीं, शौर्य ह्मणावें? हा आहे रोख धर्म, व्यावहारिक वेदान्त !

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानचा प्रेसिडेंट **आब्राहाम लिंकन** याची अशी गोष्ट सांगतात, कीं, तो एकदां आपल्या घराहून कचेरीला येत होता. रस्त्यामध्यें त्यानें चिखलांत रुतून अर्धमेला झालेला असा एक डुकर पाहिला. तो डुकर पुष्कळ जोर करीत होता, परंतु त्याला बाहेर येतां येईना ह्मणून तो दुःखानें विव्हळत होता. त्याला पाहतांक्षणींच प्रेसिडेंट खालीं उतरले व त्यांनीं त्या डुकराला बाहेर काढून त्याचे प्राण वांचविले. अंगावरील सर्व कपड्यांवर चिखलाचे डाग उडाले, परंतु त्यांनीं त्याची पर्वा न करितां तसेच ते कचेरीला आले. लोकांनीं जेव्हां त्यांनां विचारिलें व जेव्हां त्यांनां ही गोष्ट समजली, तेव्हां त्यांनीं त्यांची फार तारीफ केली, आणि ते ह्मणाले, कीं, आपण पापभीरु आणि दयाळु आहांत. प्रेसिडेंट ह्मणाले "पुरे, व्यर्थ स्तुति करूं नका ! मीं दयामाया कांहीं केली नाहीं. त्या डुकराच्या दुःखानें सांसर्गिक व्याधीप्रमाणें मला त्रास झाला, तो स्वतःचा त्रास दूर करण्याकरितां मीं त्या डुकराला बाहेर काढलें. "

वाहवारे विश्वव्यापि प्रेम ! किती प्रेमळ विश्वात्म्यैक्य हें !

---

* याला न तोडिती शस्त्रें, याला अग्नि न जाळितो,
न पाणी भिजवी याला, न करी शुष्क वायुहि.

"लैलीची ( प्रियेची ) शिर तोडली असतां मजनूनच्या (प्रियकराच्या) शिरेंतून रक्त वाहूं लागलें !" केवढा व्यावहारिक वेदान्त हा !

**" थंड हवा झोंवतां फुलाला हिमबिंदु तव नयनीं ! "**

रोख धर्माचें रहस्य हें आहे, कीं, **साऱ्या राष्ट्राचा आत्मा आपलाच आत्मा आहे, असें जाणलें पाहिजे.** या धर्माचें हें रहस्य ज्या राष्ट्रांमध्यें जाणून अमलांत आणलें आहे त्यांची उन्नति झाली आहे; ज्या राष्ट्रांमध्यें हें रहस्य नाहीं, तीं अवनत दशेला गेलीं आहेत. आमच्या देशासंबंधीं एक गोष्ट मोठ्या दुःखानें सांगितली पाहिजे. सध्यां हांगकांग येथें शीख लोकांची पलटण आहे. त्यापूर्वीं तेथें पठाणांची फौज होती. हांगकांगमध्यें शीख शिपायांनां प्रत्येकीं अदमासें एक पौंड ( १५ रुपये ) पगार मिळतो, व दुसऱ्या शिपायांनां त्याहून कमी ह्मणजे महिना अजमासें दहा रुपये मिळतात. पण हांगकांगमध्यें पठाणांनां गोऱ्यांबरोबर प्रत्येकीं दोन तीन पौंड ( नक्की लक्ष्यांत नाहीं ) मिळत असत. चिनी युद्धाच्या वेळीं जेव्हां शीख लोक येथें गेले, तेव्हां पठाणांनां आपल्याहून तिप्पट पगार मिळतो हें त्यांनां खपलें नाहीं, व त्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटला अर्ज पाठविला, कीं, पठाणांनां जे तीन तीन पौंड मिळतात, ते त्यांच्या जागीं आमचा $\frac{2}{3}$ पौंड पगार एक पौंड करून आमच्या लोकांची भरती काय ह्मणून करीत नाहीं ! हा अर्ज होम आणि फॉरिन गव्हर्नमेंटमध्यें विचाराकरितां फिरत असतां पठाणांनां विचारण्यांत आलें, कीं, तीन पौंडांच्या जागीं एक पौंड पगार घेणें तुह्मांला पसंत आहे काय ? एका देखील पठाणानें हें कबूल केलें नाहीं ! आणि पठाणांची सर्व फौजची फौज कमी करण्यांत आली. सर्व पठाण बेरोजगार झाले. भोळया शिखांनीं हें पाहिलें नाहीं, कीं, कांहीं झालें तरी हे पठाण आपल्याच देशचे आहेत. यांच्या पोटावर आपण पाय आणिले याबद्दल त्या शिखांनां कांहींच दुःख वाटलें नाहीं! आपल्या बंधूंचा गळा कापतांना त्यांनां कांहीं दया आली नाहीं. अरेरे ! कोण हा मत्सर आणि काय ही देशांतील फूट ! ते भुकेनें मरणारे पठाण रोजगार शोधीत शोधीत आफ्रिकेंत गेले आणि सोमाली लॅन्डमधील मुल्लाच्या नोकरींत राहून याच शिखांशीं ते लढले. या लढाईमध्यें लढण्या-

वांचूनच हवापाण्याच्या त्रासामुळें वगैरे शीख लोकांचे इतके हाल झाले, कीं, शिव शिव! त्यांचीं तोंडें वांकडीं झालीं, माना मोडल्या, शरीरें सुकून गेलीं, तापानें वगैरे ते अर्धमेले झाले. 'दुसऱ्याच्या मरणाचा जो उपाय करितो तो त्याच उपायानें आपण स्वतः मरतो,' असें जें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे.

"आपली करणी आपणास भोंवते. जो मनुष्य दुसऱ्याकरितां खंदक खणतो तो स्वतःच त्यांत पडतो."

एक हिंदुस्थानी तरुण जपानमध्यें शिकत असतां त्यानें तेथील लायब्ररींतून एक यंत्रशास्त्राचा ( Mechanics ) ग्रंथ मागून आणला. त्यांतील मजकूर अथवा त्याचा सारांश त्यानें उतरून काढला, परंतु त्यांतील यंत्रांच्या चित्रांची नक्कल त्याला काढतां येईना. या पुस्तकाचा इतरांनां देखील फायदा घ्यावयाचा आहे, याचा त्यानें विचार देखील न करतां चट्दिशीं त्यानें पुस्तकांतून तीं चित्रांचीं पानें फाडून घेतलीं व पुस्तक परत केलें. त्यानें असा विचार केला नाहीं, कीं, या आपल्या कृत्यानें आपल्या साऱ्या देशाचें बदनाम होईल. तें पुस्तक मोठें होतें त्यामुळें त्याची लबाडी एकदम बाहेर पडली नाहीं; परंतु ती लपणार कशी? **खरें कधीं लपून राहिलें आहे?** एके दिवशीं त्याच्या खोलीमध्यें एक जपानी विद्यार्थी आला व टेबलावर असलेलीं तीं फाडलेलीं पानें पाहून त्यानें ती गोष्ट तेथील व्यवस्थापकांनां कळविली. आणि तेव्हांपासून तेथें असा नियम करण्यांत आला, कीं, "यापुढें कोणत्याहि हिंदी विद्यार्थ्याला कोणतेंहि पुस्तक दिलें जाऊं नये!" विनाशकाले विपरीतबुद्धिः ती हीच! जहाजावर हिंदी लोकांनां खाण्याचे पदार्थ आणून देणाऱ्या जपानी तरुणाची गोष्ट आपण ऐकिलीच आहे, आणि या हिंदुस्थानी तरुणाची गोष्ट आपण ऐकतां आहां. जपानी तरुण आपल्या देशावर ठपका येऊं नये ह्मणून आपलें सर्व कांहीं देण्यास तयार आहे, आणि हिंदी तरुण आपल्या साऱ्या देशाचें बदनाम झालें तरी हरकत नाहीं, आपलेंच हित पहातो! ह्याताला असें ह्मणतां यावयाचें नाहीं, कीं, मी एकटा निराळा आहें. माझें रक्त निराळें आणि साऱ्या शरीराचें रक्त निराळें. या अयोग्य भेदभावानें त्याला

जर वाटूं लागेल, कीं, 'मिळवितों मी आणि खातो सारा देह !' आणि या आप्पलपोटेपणाप्रमाणें वागावयाचें असल्यास हाताला एकच मार्ग शक्य आहे. तो हा, कीं, आपण जी भाकरी मिळविली असेल ती साऱ्या देहाकरितां तोंडांत घालण्याऐवजीं हातानें ती आपल्या तळहातावर बांधावी, किंवा आपल्या नखांत कोंबावी. पण ही आप्पलपोटेपणाची नीति फायदेशीर होईल काय ? हो, आणखी एक मार्ग आहे खरा. मधमाशा हाताच्या बोटांनां लावून डसवून घ्याव्या. या रीतीनें सर्व शरीराहून एकटा हातच स्वतः लठ्ठ होईल खरा. पण हा मोठेपणा, सूज किंवा रोग होय ! याचप्रमाणें जे लोक आपल्या राष्ट्राचें हित तेंच आपलें हित असें समजत नाहींत, आपला आत्मा राष्ट्राच्या आत्म्याहून भिन्न आहे असें मानतात, त्या आप्पलपोट्या लोकांच्या हातीं सूज किंवा रोग यांखेरीज दुसरें कांहीं येत नाहीं. हात जेव्हां, कान, नाक, डोळे वगैरे साऱ्या शरीराचा आत्मा तोच आपला आत्मा असें मानून वागतो, तेव्हांच तो बळकट आणि मजबूत होतो. आणि जो मनुष्य आपल्या राष्ट्राचा आत्मा तोच आपला आत्मा असें मानतो, त्यालाच फलप्राप्ति होते.

## अमेरिकेची जरा विस्तृत माहिती.

अमेरिकेमध्यें पहिली आश्चर्याची गोष्ट ही पाहिली, कीं, एके ठिकाणीं घरचा यजमान प्रॉटेस्टंट धर्माचा होता व घरधनीण रोमन क्याथोलिक पंथाची होती. मनांत असा विचार आला, कीं, आमच्या हिंदुस्थानांत भिन्न धर्माचे लोक ( उदाहरणार्थ आर्यसमाजी व सनातनधर्मी ) एका आळीमध्यें मोठ्या मुष्किलीनें एकत्र दिवस काढतात, आणि या जोडप्याचें एका घरांत कसें चालत असेल ? चौकशीअंतीं समजलें कीं, तें जोडपें मोठ्या आनंदानें नांदत आहे. रविवारीं पतिराज पहिल्यानें त्या आपल्या प्रिय पत्नीला तिच्या रोमन क्याथोलिक देवळापर्यंत नेऊन सोडतात, व नंतर स्वतः आपल्या दुसऱ्या देवळांत जातात. त्या गृहस्थाशीं 'रामा'चें बोलणेंचालणें झालें, त्यांत तो ह्मणाला "माझ्या पत्नीचा धर्माविषयीं प्रश्न तिच्यामध्यें आणि ईश्वरामध्यें आहे. मध्यें तोंड घालणारा मी कोण ?

माझ्याशीं तिचें वर्तन चोख आहे. ईश्वराशीं तिचा कसा व्यवहार आहे हें तिचें तिला ठाऊक." काय मौज आहे !

अमेरिकेमध्यें राष्ट्रैक्यापुढें धर्मभेदांची विशेष मातब्बरी नाहीं. हिंदुस्थानांतील आर्यसमाजी, शीख, मुसलमान, ख्रिस्ती या सर्वांनां अमेरिकेंत हिंदुच ह्मणतात. त्यांच्या अंतःकरणांत एकराष्ट्रीयत्व इतकें बाणलें आहे, कीं, आपल्या इकडील धर्मभेदांहून अधिक मोठ्या धर्मभेदांकडे दुर्लक्ष्य करण्यास त्यांनां कांहीं कठिण जात नाहीं. हिंदुस्थानांतील कांहीं जातींनां जर हें कळेल, कीं, सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें आपल्याला हिंदुच ह्मणतात, तर 'हिंदु' या शब्दावर इतकीं रणें माजलीं नसतीं, आणि 'हिंदु' या नांवाची त्यांनां लाजहि पण वाटली नसती.

अमेरिका बलाढ्य होण्याचें एक कारण असें आहे,कीं, तेथें ब्रह्मचर्य आहे. तेथें शारीरिक शक्ति कमी होऊं देत नाहींत. साधारणपणें वीस वर्षांपर्यंत लग्न ह्मणजे काय चीज आहे, ही कल्पना देखील मुलांमुलींच्या मनांत येत नाहीं. सूक्ष्म विचाराअंतीं याचें एक कारण असें दिसून आलें, कीं, तेथें मुलगे आणि मुली लहानपणापासून एकाच ठिकाणीं खेळतात,बागडतात, एकाच घरांत लिहितात वाचतात, आणि एकत्र राहतात फिरतात, व पुढें देखील एकाच कॉलेजमध्यें जवळ जवळ बसून अभ्यास करितात. यामुळें त्यांच्यामध्यें बहीणभावाचें नातें उत्पन्न होतें आणि मन शुद्ध आणि पवित्र रहातें. तेथें मुली मुलांच्याइतक्याच सशक्त असतात, यामुळें मोठेपणीं त्यांची प्रजाहि बळकट होते. जर नवरा सशक्त असला आणि बायको मात्र अशक्त असली, तर त्याचा परिणाम असा होतो, कीं, त्यांची संतति शरीरसामर्थ्यानें मध्यमच होते. एकदां 'राम' जिनेवा सरोवराच्या कांठीं रहात होता. तेथें एक तेरा वर्षांची मुलगी तीन मैल पोहत गेली. ती कदाचित् बुडूं लागल्यास मदत असावी ह्मणून एक होडी तिच्या मागून मागून चाललीच होती, परंतु मदतीची कांहीं जरूर पडली नाहीं. मुलीची स्थिति जर इतकी उत्तम, तर त्यांची प्रजा सशक्त कां होणार नाहीं ? आणि शरीर जर निरोगी आहे, तर मन देखील निरोगी ( शुद्ध ) कां

होणार नाहीं? हें देखील त्यांच्या ब्रह्मचर्याचें एक कारण आहे. अशक्ततेपासून पाप उत्पन्न होतें. अपचनापासून—अशक्ततेपासून अशुद्धता उत्पन्न होते. आपलें जठर सुस्थितींत नसलें तर चिंता आणि काळजी निःसंशय येऊन गांठतील. प्रकृति चांगली नसली, तर क्षणोक्षणीं राग येतो. वेदांमध्यें लिहिलें आहे, कीं, दुर्बळ जीव आत्म्याला जाणूं शकत नाहीं. **नायमात्मा बलहीनेन लभ्यः.** ईश्वराच्या घरीं दुर्बळाची डाळ शिजत नाहीं. ज्या मनुष्यामध्यें आत्मिक आणि शारीरिक बल नाहीं, तो ब्रह्मचर्य कसें कायम राखणार? आणि हेंहि मह्शूर आहे, कीं, ब्रह्मचर्याच्या अभावीं आत्मिक आणि शारीरिक शक्तींचा अभाव असतो.

तेथील कॉलेजांची स्थिति कशी आहे पहा. बी. ए., एम्. ए., डाक्टर ऑफ फिलासफी, इत्यादि डिग्रीपर्यंत इतर अभ्यासावरोबर शारीरिक शिक्षण दिलें जातें. उत्तम शिक्षणाबरोबर, शेतकी, लोहार, सुतार आणि गवंडी यांचें काम देखील शिकविलें जातें. मनुष्यामध्यें मुख्य तीन भाग आहेत. कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें आणि तिसरें अंतःकरण. यांनां इंग्रजीमध्यें हँड, हेड् आणि हार्ट ( Hand, Head and Heart ) असें ह्मणतात. ज्ञानेंद्रियांच्या योगानें बाहेरील ज्ञान आंत जातें आणि बाह्य वस्तूंचा मनावर परिणाम होतो. हात पाय इत्यादि कर्मेंद्रियांनीं अंतःशक्तीचा बाह्य वस्तूंवर परिणाम होतो. कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें यांची योग्य वाढ व उन्नति झाली तरच चांगलें. परंतु जर आपण बाहेरचें ज्ञान आंत कोंबत चाललों, व आंतील ज्ञान व शक्ति बाहेर जाऊं दिली नाहीं, तर मनुष्य खात राहतो, पण त्याचा कोठा मात्र रिकामा होत नाहीं, यासारखी स्थिति होते; व याचा परिणाम बौद्धिक बद्धकोष्ठ आणि आध्यात्मिक अग्निमांद्य हा होतो. हें शिक्षण नव्हे, हा रोग आहे. अमेरिकेंतील सर्वसाधारण विश्वविद्यालयांच्या शिक्षणक्रमाचा उद्देश हा आहे, कीं, देशांतील वस्तूंचा उपयोग करतां यावा; व जमीन, खाणींतील पदार्थ, वनस्पति वगैरे वस्तूंचा योग्य उपयोग करणें, आणि त्यांची किंमत वाढविणें यांचें ज्ञान व्हावें. जेवढ्या कला शिकविल्या जातात त्या सर्वांचा उद्देश **उपयुक्तता** हा असतो.

रसायनशास्त्र व्यवहारांत आणण्याची केमिकल इंजीनियरिंगसारखी कला न शिकतां नुसतें रसायनशास्त्र कोणी मुलगा व्यर्थ शिकणार नाहीं.

एका धार्मिक कॉलेजमध्यें 'रामा'चें व्याख्यान झालें. व्याख्यानाच्या शेवटीं कॉलेजच्या लोकांनीं आपली जंगी कवाईत दाखविली आणि जयघोषांनीं व्याख्यात्याला सलामी दिली. 'रामा'नें विचारिलें "धार्मिक कॉलेजांत जंगी कवाईत! हें काय!" प्रिन्सिपालनें उत्तर दिलें, कीं, "धर्माचा अर्थ असा आहे, कीं, देह आणि देहभाव यांनां येशूप्रमाणें सुळावर चढविलें पाहिजे. अहंकार नाहींसा केला पाहिजे व देशाकरितां आपलें शिर हातांत घेऊन फिरलें पाहिजे. आणि हा स्वार्थत्याग आणि हें खरें शौर्य उत्तम कवाइतीपासून प्राप्त होतें."

आतां अंतःकरणाची कोमलता आणि शुद्धता यांचें शिक्षण कसें असतें तें पहा.

विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या कमाईवरच चाललेल्या एका विश्व-विद्यालयांत 'राम' गेला होता. येथें विद्यार्थी फी वगैरे कांहीं देत नाहींत. सामान्य शिक्षणाखेरीज शिक्षकांच्या देखरेखीखालीं विद्यार्थी कॉलेजच्या जमिनीवर व यंत्रांवर काम करितात. प्रोफेसर नवीन नवीन शोध लावितात व लावण्यास शिकवितात. सर्व खर्च, शेतकीच्या नवीन तऱ्हा, निरनिराळीं पिकें, आणि नवीन कारागिरी यांमुळें जें उत्पन्न येईल त्यांतून चालतो. एका खोलींतील कांहीं विद्यार्थ्यांमध्यें 'रामा' देखत भांडण लागलें. प्रेसिडेंटपर्यंत ही तक्रार गेली. प्रेसिडेंटनें त्या खोलींतील सर्व काम बंद करविलें आणि बाजाची पेटी सुरू केली. पंधरा मिनिटांत भांडण मिटलें व आपो-आप सलोखा झाला. वाहवा! ज्यांच्या मनामध्यें इतका शांतिरस भरलेला आहे, कीं, तो जागृत करण्यास बाह्य गायनासारखें लहानसें निमित्त बस्स होतें, त्यांची धन्य होय! कशी नामी युक्ति आहे! **हवेमध्यें सत्त्वगुण भरून दिला आणि मनाची खळबळ आपोआप शांत झाली.**

शिकागो विश्वविद्यालयांतील एका अंडरग्रॅज्युएटनें 'रामा'च्या तत्त्वज्ञानावरील कांहीं व्याख्यानांचें टांचण करून घेतलें, आणि थोड्याच दिवसांत आपल्या पदरचें कांहीं घालून त्यानें त्याचें एक नवीन पुस्तक बनविलें व तें विश्वविद्यालयांत सादर केलें. लागलेंच त्या विद्यार्थ्याला पुढच्या वर्गांत घालण्यांत आलें. या विद्यार्थ्यानें मिल्ल आणि हॅमिल्टन यांचीं पुस्तकें आपल्या डोक्यांत कोंबलीं आहेत कीं नाहींत, हें कांहीं तेथें पहाण्यांत आलें नाहीं. **खऱ्या शिक्षणाची कसोटी, आपणाला कोणत्या योग्यतेचें ज्ञान आंतून बाहेर काढतां येतें, ही आहे. किती योग्यतेचें ज्ञान डोक्यांत कोंबलें आहे, ही नव्हे.**

'राम' एके वेळीं तेथें पहाडावर शास्ता नांवाच्या जंगलांत रहात होता. कांहीं लोक भेटावयास आले, त्यांच्याबरोबर एक बारा वर्षांची मुलगी होती. सर्वजण 'रामा'चा उपदेश लक्ष्यपूर्वक ऐकत होते, परंतु कांहीं वेळानें ती मुलगी जरा दूर जाऊन बसली, व जेव्हां ती परत आली तेव्हां तिनें एक कागद पुढें केला. त्यावर काय होतें ? 'रामा'चा सर्व उपदेश तिनें कविताबद्ध करून आणला होता. नंतर ती कविता तेथील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. मुलांची ही तरतरी आणि तीव्र बुद्धि, त्यांचें स्वातंत्र्य कायम ठेवल्याचा परिणाम आहे. मनुष्य लहान असो, मोठा असो, त्याला बुद्धिमान् पशु असें ह्मणतात. त्याच्या या दोन भागांमध्यें बुद्धि हा स्वार आहे आणि पशुवृत्ति हा घोडा आहे. जेव्हां आपण मुलांच्या बुद्धीला समजावून तिजकडून काम घेण्याच्याऐवजीं, रागें भरून धाकदपटशा दाखवून हुकूम लादावयास पाहतों, तेव्हां आपण पशुवृत्तिरूपी घोड्याला छडीच्या तडाक्यानें जणूं काय बुद्धिरूपी स्वाराच्या मांडीखालून पिटाळून लावतों. असें झाल्यानें मुलांच्या अंतर्यामीं वास करणाऱ्याला राग कां येणार नाहीं? मुलांनां धाकदपटशा दाखविणें ह्मणजे शुद्ध पशुवृत्तींकडून काम करून घेणें होय, व यामध्यें ज्याच्यायोगें मनुष्य श्रेष्ठ गणला जातो त्या तत्त्वाचा—बुद्धीचा—अपमान केल्यासारखें होतें. सक्ती करणें आणि रागें भरणें ह्मणजे मुलांच्या हृदयांत वास करणाऱ्याची अप्रतिष्ठा करणेंच होय. समजून सांगितल्यावांचून किंवा

कारण दाखविल्यावांचून 'अमुक करूं नको; तमुक करूं नको' अशी निषेधात्मक आज्ञा करणें, ह्मणजे तें काम करण्याची निष्कारण अप्रत्यक्ष सूचना देण्यासारखें आहे. ईश्वरानें जेव्हां आदमला हुकूम केला, कीं, 'फलाण्या ज्ञानवृक्षाचें फळ खाऊं नको,' तेव्हां या निषेधाच्या योगानेंच तो ( फळ खाण्याचा ) कुविचार आदमच्या मनांत आला. त्या नंदन-वनामध्यें हजारों वृक्ष होते, परंतु जेव्हां 'हें खाऊं नको' ह्मणून निरोध केला गेला, तेव्हां इच्छा नसतांनां देखील तें खाण्याचा त्याला मोह उत्पन्न झाला. वर्तमानपत्रांतील अत्यंत महत्त्वाच्या जाहिरातीवर "हें वाचूं नका" असें लिहिलेलें असतें. कोणीं एकानें एका फकीराजवळ मंत्र मागितला. त्या महात्म्यानें मंत्र दिला आणि सांगितलें, कीं, "तीनदां माळ जपल्यानें मंत्र सिद्ध होईल, मात्र माळ जपत असतां माकडांचा विचार मनांत आणतां कामा नये." थोडासा प्रयत्न केल्यानंतर तो बिचारा फकीराजवळ येऊन सांगूं लागला "गुरुमहाराज ! माकड माझ्या स्वप्नांत देखील नव्हता; परंतु आपण बजाविल्यामुळें आतां तो माकड मला अगदीं सोडित नाहीं. !"

असली उलट्या शिक्षणाची तऱ्हा अमेरिकेंत नाहीं.

मुलांचें शिक्षण तेथें किंडरगार्डन पद्धतीवर होतें. शिक्षक मुलांशीं हंसत खेळत,गातनाचत शिकवीत असतात आणि मुलें स्वखुषीनें पूर्णत्व मिळवितात. समजा, मुलांनां जहाजाचा धडा द्यावयाचा आहे. लांकडाचें एकेक जहाज प्रत्येक मुलासमोर ठेविलें आहे, आणि ज्यांचें एक नवीन जहाज बनवितां येईल अशा कामट्या वगैरे जवळ ठेविल्या आहेत. शिक्षक किंवा शिक्षकिणी मुलांमध्यें मिसळून ह्मणताहेत 'आह्मी आतां जहाज बांधणार, आह्मी आतां जहाज बांधणार.' मुलें देखील एकदम ह्मणूं लागतात 'आह्मीहि जहाज बांधणार.' हें पहा सर्व मुलें बसलीं. एकानें जहाज तयार केलें. दुसऱ्याला देखील तें साधलें. नंतर तिसऱ्याला जरा वेळ लागला, तेव्हां शिक्षकांनीं आणि इतर मुलांनीं त्याला मदत केली, आणि त्याचेंहि जहाज तयार झालें. नंतर मुलें मोठ्या हौसेनें शिक्षकाला आपण होऊन विचारूं लागलीं, कीं, 'या भागाचें नांव काय ? त्या भागाला काय ह्मणतात ?

हें काय ? तें काय ?' शिक्षक डोलकाठी वगैरे सर्वांचीं नांवें सांगत चालला आणि मुलांनां जहाजासंबंधीं सर्व गोष्टी सहज समजल्या.

आमच्याइकडे मुलें पाठ करितात, 'Keel कील ह्मणजे जहाजाचा कणा, कील ह्मणजे जहाजाचा कणा.' असें करितां करितां डोक्यामध्यें कील(खिळा) ठोकला गेला, पण कील ह्मणजे काय चीज आहे, आणि जहाज कसें बांधतात, याचा त्यांनां गंधहि नाहीं. तेथें पहिल्यानें पदार्थांची ओळख करून दिली जाते व नंतर पदाची (नांवाची). येथें प्रथम नांव पाठ केलें जातें आणि पदार्थाचा पत्ता साऱ्या जन्मभर लागत नाहीं! तेथें मुलांच्या स्वभावाला अनुसरून मुलें प्रश्न करीत असतात व शिक्षकांचें काम त्यांनां सविस्तर उत्तरें देणें हें असतें. येथें एवढ्या मोठ्या शिक्षकांनां, लहान लहान मुलांनां प्रश्न विचारून विचारून हैराण करून सोडतांना कांहींच लाज वाटत नाहीं! **ज्यांत ज्ञानाभिरुचि उत्पन्न होत नाहीं तें शिक्षण कसलें?** येथें मास्तरांनां पाहून मुलांचा भीतीनें जीव जातो, तेथें मुलांचें शिक्षकांवर जेवढें प्रेम असतें तेवढें आईबापांवरहि नसतें, व शाळेमध्यें जेवढा त्यांनां आनंद वाटतो तेवढा घरीं देखील वाटत नाहीं. तेथें शाळेमध्यें फी घेत नाहींत आणि पुस्तकें फुकट दिलीं जातात.

तेथील दुकानांची स्थिति पहा. शिकागोमध्यें एका दुकानांत 'रामा'ला निमंत्रण केलें होतें. या दुकानाच्या फरसबंदीचें क्षेत्रफळ गाजीपूरच्या तिसऱ्या हिश्शाहून कमी होणार नाहीं. त्या दुकानाला एकंदर पंचवीस मजले होते. ज्या मजल्यावर जावयाचें असेल तेथें जाणाऱ्याला यांत्रिक पाळणा (Elevator) चटकन् घेऊन जातो. प्रत्येक मजल्यावर नवीन तऱ्हेचा माल ठेविलेला होता. क्रोडों ग्राहक रोज येतात परंतु दुकानदाराचें वर्तन सर्वांशीं सारखें. मग तो ग्राहक लाखों रुपयांचा माल घेणारा असो किंवा पांच पैशांचा माल घेणार असो. प्रत्येक वस्तूची किंमत तिच्यावर लिहिल्याप्रमाणें एकच असावयाची. एक छदामहि कमीजास्त व्हावयाची नाहीं. व्यवस्थापक सर्वांशीं इतका हंसतमुख असतो, कीं, जो दहा दहा वस्तूंची किंमत विचारून कांहींच खरेदी न करितां चालता होतो, त्याला देखील दरवाजापर्यंत पोंचावावयास तो येतो, व शिरस्त्याप्रमाणें लवून सलाम

करितो. ही रीत मोठ्या दुकानांत आहे. एवढेंच नव्हे, तर ती सर्वसाधारण दुकानांमध्येंहि आढळून येते.

अमेरिका, जपान, इंग्लंड, जर्मनी येथील पोलीस अतिशय सभ्य आणि प्रजेचे सेवक आहेत. येथें जमलेले कांहीं सद्गृहस्थ मनांत ह्मणत असतील, कीं, 'बस्स पुरे करा, अमेरिकन लोकांची पुष्कळ स्तुति केलीत. कुठपर्यंत त्यांचें गीत गाणार? आह्मीं अमेरिकन व्हावें अशी तुमची इच्छा आहे काय?' अशी शंका मनांत बाळगणारांनां 'राम' सांगतो 'काय! हिंदी लोकांनीं अमेरिकन व्हावयाचें!' हर! हर! एकाद्याच्या मनांत ही कल्पना आली असेल तर ती नष्ट होऊंदे. जर एकाद्यानें ही उमेद मनांत बाळगिली असेल तर ती गाडली जाऊं दे. 'रामा'च्या मनांत असला विचार कधीं आला नाहीं व कधीं येणारहि नाहीं. एवढी गोष्ट खरी आहे, कीं, कांहीं गोष्टी आपण त्यांच्यापासून घेणें जरूर आहे. जर क्षयाच्या तावडींतून आपणाला सुटावयाचें आहे आणि जर आह्मांला हिंदु रहावयाचें आहे, तर त्यांचीं शास्त्रें आणि कला आपणाला घेतलीं पाहिजेत; मग त्यांनां वाटेल ती किंमत पडो. 'राम' अमेरिकेंत असतांना त्याच्या डोक्यावर हिंदी पगडी होती, परंतु रस्त्यांत बर्फ पडत असल्यामुळें पायांत त्या देशचा जोडा होता. लोकांनीं विचारिलें "जोडा देखील हिंदीच कां वापरीत नाहीं?" 'रामा'नें उत्तर दिलें "डोकें हिंदुस्थानी ठेवणार पण पाय घेऊं तुमचे." 'रामा'ची इच्छा अशी आहे, कीं, आपण हिंदीच राहून अमेरिकन वगैरे लोकांपेक्षां मोठें व्हावें, आणि हें, त्या राष्ट्रांपासून दूर पळण्यानें साध्य होणार नाहीं. आज विद्युत्, गॅस, रेलवे, तारायंत्रें वगैरेंनीं दिक्कालांनां नाहींसें करून टाकिलें आहे. पृथ्वी एक छोटेंसें बेट झाली आहे. समुद्र, प्रतिबंध होण्याऐवजीं राजमार्ग बनला आहे. पूर्वींचे निरनिराळे देश आतां शहरें झाले आहेत. आणि पूर्वींचीं शहरें आतां रस्ते झालीं आहेत. आज जर आपण स्वतःला अलग ठेवण्याची इच्छा केली, आणि इतर राष्ट्रांनां निराळें समजून आपली पांच आण्याची खिचडी खात राहिलों (जुन्या चालींनां चिकटून बसलों), आज विसाव्या शतकामध्यें जर आह्मीं इसवी सनापूर्वींच्या विसाव्या

शतकांतील चाली रीती आचरणांत ठेविल्या, पाश्चिमात्य कलांचां उपयोग करावयास न शिकलों, 'उधार धर्मा'ची लढाई सोडून 'रोख धर्मा'प्रमाणें न वागलों, तर ज्याप्रमाणें गॅस आणि विद्युत् यांपुढें दिक्काल उडून गेले आहेत, त्याप्रमाणें आपणहि उडून जाऊं. आपली स्थिति लक्ष्यांत आणा.

**कंचन होवे कीच में, विषमें अमृत होय।**
**विद्या नारी नीच में, तीनों लीजे सोय ॥***

हिंदुस्थानची जेव्हां समृद्धि होती, तेव्हां तो कूपमंडूकाप्रमाणें राहिला नव्हता.

जेव्हां पुष्कर तीर्थाच्या ठायीं यज्ञ झाला, तेव्हां हबशी, चिनी आणि इराणी राष्ट्रांतील लोकांनां आमंत्रण दिलेलें होतें. राजसूय यज्ञाच्यापूर्वी भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे पांडव दूरदूरच्या परकीय देशांनां गेलेले होते. **खुद्द श्रीरामचंद्रासारख्या ईश्वरी अवतारानें समुद्र ओलांड-ण्याची वहिवाट घालून दिली आहे.**

जेव्हां "कालरात्रीं आपले गुरुवर्य मशीदींतून दारूच्या गुत्त्यांत आले (औप-चारिक धर्म सोडून देऊन मुक्त झाले); धर्माभिमान्यांनों ! आतां यावर काय उपाय ?"

त्याकाळीं हिंदुस्थानाला इतर देशांतून कांहीं मिळवावयाचें नव्हतें; परंतु आज परदेशांतील कला शिकण्याची इतकी जरूरी आहे, कीं, त्यांच्या अभावीं प्राण जातो आहे. जर आज हिंदुस्थानला जगावयाचें असेल, तर अमेरिका, यूरोप, जपान इत्यादि बाहेरच्या जगापासून त्यानें आपण होऊन स्वतःला वगळतां कामा नये. बाहेरची हवा लागल्यानें जिवांत जीव येईल. हिंदु बाहेर जातील तर ते खरे हिंदु बनतील. बाहेर गेल्यानें आपल्या शास्त्राचें महत्त्व कळून येईल आणि शास्त्र व्यवहारांत येईल; तुह्मांला स्वतःला जगापासून अलग राहतां यावयाचें नाहीं. **म्लेंच्छांपासून जितके दूर पळालां, तितके तुह्मांला त्यांचे गुलाम होऊन रहावें लागलें.**

---

*विषादप्यमृतं ग्राह्यममेध्यादपि कांचनम्। नीचादप्युत्तमा विद्या स्त्रीरत्नं दुष्कुलादपि॥

## इच्छाशक्ति.

पुराणान्तरीं आपण असें वाचतों व ऐकतों, कीं, कांहीं ऋषींच्या वरानें किंवा शापानें कांहीं लोकांची स्थिति बदलून गेली. योगवासिष्ठामध्यें शिळेमध्यें सृष्टि दिसण्याचा उल्लेख आलेला आहे; परंतु अमेरिकेमध्यें या तऱ्हेच्या गोष्टी प्रत्यक्ष नजरेला पडल्या आहेत. कॉलेजामध्यें किंवा दवाखान्यामध्यें अशा तऱ्हेचे प्रयोग केले जातात, कीं, हजारों रोग फक्त इच्छाशक्तीच्या जोरावर बरे केले जातात. प्रोफेसराच्या इच्छेप्रमाणें मेजाची घोडी दिसणें, जेम्ससाहेबाचा डाक्टर पाल होणें ( मनुष्यपण बदलणें ) आणि मूळचा जेम्सपणा नाहींसा होणें, या गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्या आहेत. संस्कृतामध्यें वेदान्तपर उत्कृष्ट ग्रंथ असंख्य आहेत. उदाहरणार्थ, दत्तात्रेयाची अवधूतगीता, अष्टावक्रगीता, शंकराचार्यांचें स्तोत्र, योगवासिष्ठाचा कांहीं भाग. फारसी भाषेमध्यें वेदान्तपर ग्रंथातील सर्वोत्तम ग्रंथ शम्स तब्रेजचा आहे. त्याच्या खालोखाल मसनवी शरीफ, शेख अत्तार, मगरबी वगैरे. परंतु अमेरिकेतील वाल्ट विटमनचा 'तृणपर्ण' ( Leaves of the Grass ) हा ग्रंथ, अवधूतगीता, अष्टावक्रगीता, शंकराचार्यांचें स्तोत्र, शम्स तबरेज आणि बुल्लाशाह यांच्या ग्रंथांइतकी किंवा त्यांहून थोडी अधिक वेदांती पूर्णता आणि स्वतंत्रता प्राप्त करून देतो.

**"ठाकलों मी जगामध्यें भय मातें नसे कधीं,**<br>
**पूर्ण शांति मनामध्यें माझिया भरली असे.** १<br>
**दिक्काल माझियामागें श्वानाचेपरि धावती,**<br>
**नामरूपाचिया बंधीं, कैसा मी सांपडेन हा ?"** २

नीग्रो गुलामांनां स्वातंत्र्य देण्याकरितां अमेरिकेमध्यें जें मोठें युद्ध झालें, त्यावेळीं प्रत्येक लढाईत हा विटमन सर्वांत पुढें हजर असे आणि उभय पक्षांकडील घायाळ झालेल्या लोकांनां मलमपट्टी करणें, तहानेल्यांनां पाणी पाजणें, मरणारांनां आपल्या स्मितवदनानें धीर देणें, आणि आपल्या बिनमोल 'तृणपर्ण' पुस्तकापैकीं या प्रसंगाला अनुसरून अशीं गीतें गात हिंडणें, हें त्याचें आवडतें काम होतें. या गर्दीमध्यें, आणि

या आरडण्याओरडण्यामध्यें, रणभूमीवरील तुंबळ युद्धामध्यें लढाईच्या ऐन धोक्याच्या जागीं, विटमन इतका प्रसन्न व निर्भय अंतःकरणानें हिंडत होता, कीं, जणूं काय भूतप्रेतांच्या समूहांमध्यें शिवशंकर, अथवा कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर भगवान् श्रीकृष्ण संचार करीत आहेत. या अविरत घनघोर युद्धामधील अर्धमेल्या लोकांनीं या महात्म्याचें दर्शन घेऊन आनंदानें प्राण सोडले.

"रात्र असो, दिवस असो, वारा असो, किंवा तुफानाचा त्रास असो, अरण्यांतील वृक्ष कधीं तरी तें लक्ष्यांत आणतात काय? यातायातीच्या कामानें ज्या मनुष्याचें मन चलबिचल होतें, तो मनुष्य असूनहि वृक्षापेक्षां कमी योग्यतेचा."

अमेरिकेमध्यें हेनरी थोरो नांवाचा याच दर्जाचा, दुसरा एक ब्रह्मनिष्ठ होऊन गेला. तो निर्जन अरण्यामध्यें पूर्ण ब्रह्मचर्याच्या संन्यस्त वृत्तीनें आपलें आयुष्य कंठीत होता. अर्थात्, तो आळशी कर्मकांडी साधु नव्हता. अमेरिकेंतील सर्वांत मोठा ग्रंथकार इमरसन या थोरोसंबंधीं असें लिहितो, कीं, मधमाशा त्याच्याबरोबर त्याच्या खाटेवर निजत असत; परंतु त्याचें निर्भय प्रेम इतकें होतें, कीं, त्या माशा त्याला कधीं चावत नसत. रानांतील साप त्याच्या हातापायाला वेटाळें घालीत असत, परंतु हातांतील कडीं किंवा पायांतील वाळे यांप्रमाणें त्यांची तो पर्वा करीत नसे. केवढा दयालुभूषण! रस्त्यानें चालतां चालतां इमरसननें विचारिलें, कीं, "येथील मूळ रहिवाशांचे तीर कुठें मिळतात?" थोरोनें नेहमींच्या पद्धतीला अनुसरून उत्तर दिलें, कीं, "हवे तेथें." आणि इतक्यांत जरासें वळून त्यानें मागितलेला तीर चटकन काढून दिला. दृष्टसृष्टीवर केवढा हा अधिकार!

ज्याच्या ग्रंथांनीं नूतन खंडांत ( अमेरिकेंत ) नवीन चैतन्य उत्पन्न केलें, त्या खुद्द इमरसननें भगवद्गीता आणि उपनिषदें यांचें अध्ययन केलें होतें; एवढेंच नव्हे, तर बऱ्याच अंशीं त्यानें तीं आचरणांतहि आणलीं होतीं. त्यानें आपल्या ग्रंथांमध्यें उपनिषदें आणि गीता यांचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख केला आहे, आणि त्याच्या जिवलग मित्रांच्या सांगण्यावरून असें समजलें आहे, कीं, त्याच्या मनावर खात्रीनें गीता आणि

उपनिषदें यांचा परिणाम झाला होता. महात्मा **थोरो** आपल्या 'वाल्डन'-मध्यें लिहितो, कीं, 'मी रोज प्रातःकाळीं आपली बुद्धि व अंतःकरण यांनां भगवद्गीतेच्या पवित्र गंगाजलामध्यें स्नान घालतों. भगवद्गीतेमध्यें एवढें उत्तम व सर्वव्यापी तत्त्वज्ञान आहे, कीं, हा ग्रंथ लिहिणारी देवता होऊन अगणित वर्षें झालीं, तरी याच्या योग्यतेचा दुसरा ग्रंथ अद्याप झाला नाहीं. गीतेशीं तुलना करितां, जगांतील वर्तमानकाळचें सर्व ज्ञान तुच्छ आणि कःपदार्थ वाटतें. विचार करितां करितां या ग्रंथाचें महत्त्व मला इतकें वाटत आहे, कीं, केव्हां केव्हां हें तत्त्वज्ञान बहुशः निराळ्याच युगामध्यें लिहिलें गेलें असलें पाहिजे, असा विचार माझ्या मनांत येतो.' दुसऱ्या एका प्रसंगीं मिसर देशांतील भव्य मनोऱ्यांविषयीं उल्लेख करतांना **थोरो** लिहितो, कीं, 'प्राचीन युगांतील सर्व संस्मरणीय वस्तूंमध्यें भगवद्गीतेहून अधिक श्रेष्ठ असें कांहीं नाहीं. गीता आणि उपनिषदें यांतील शिक्षण--तत्त्वज्ञान--प्रचारांत आणणें, ह्मणजे व्यावहारिक वेदान्त अथवा रोख धर्म प्रचारांत आणणें होय.'

हें तत्त्वज्ञान व्यवहारांत आणून त्या लोकांनीं आपली उन्नति साधली आहे. आपल्याइकडे या किंमतीची हुंडी आहे खरी; परंतु कागदी हुंडीनें--मग ती केवळ्याहि किंमतीची असो--भूक शमत नाहीं, तहान भागत नाहीं, शरीराची थंडी नाहींशी होत नाहीं. ही हुंडी पटवून तिचें रोख धर्मांत रूपांतर करणें अवश्य आहे. आज ते लोक या हुंडीची किंमत देण्यास समर्थ आहेत. तेथें ही हुंडी पटते. तेथें जाऊन पटवा.

जेव्हां **सीता**देवी अयोध्येहून वनवासाला गेली, तेव्हां तिच्या पाठीमागें वैभव लयाला जाऊन त्या जागीं दुःख आणि संकटें आलीं. प्रजा दुःखी झाली. दशरथराजाचें देहावसान झालें. राण्यांनां आक्रोश करावा लागला. सिंहासन चौदा वर्षें रिकामें राहिलें. परंतु जेव्हां समुद्रा-पलीकडून **सीता**देवीला परत आणावयास **श्रीरामचंद्र** सिद्ध झाले, तेव्हां गरुड आणि जटायूसारखे पक्षी मदत करावयास तयार झाले; वानर, रीस यांसारखे जंगली प्राणी देखील लढावयास सज्ज झाले. असें सांगतात, कीं, खारी देखील आपल्या अल्पशक्तीप्रमाणें तोंडांतून वाळूचे कण आणून

आणून पूल बांधण्याकरितां समुद्रांत टाकूं लागल्या. हवापाणी देखील अनुकूल झालीं. शिळा देखील समुद्रांत सोडल्या असतां **सीते**करितां स्वतःचा स्वभाव विसरून बुडण्याऐवजीं पाण्यावर तरंगूं लागल्या.

"**सीते**च्या चरणीं शंभर मस्तकें मी वाहीन, मग माझें मस्तक एका किंवा दहा किंवा तीस डोक्यांचें असो."

अध्यात्मरामायणांत '**सीता**' याचा अर्थ 'ब्रह्मविद्या' असा आहे. मी ह्मणतों, कीं, व्यावहारिक वेदान्त किंवा रोख धर्म याला निरोप दिल्यामुळें हिंदुस्थानामध्यें सर्व तऱ्हेचीं संकटें ओढवलीं. आह्मांवर कोणचीं संकटें आलीं नाहींत ? कोणत्या दुःखाच्या आणि रोगाच्या तावडींत आह्मी सांपडलों नाहीं ? हाय हाय ! **सीता** समुद्राच्या पार निघून गेली ! या व्यावहारिक ब्रह्मविद्येला समुद्रापलीकडून परत आणण्याकरितां कंबर तरी बांधा आणि मग पहा, जगांतील सर्व शक्ति, अहमहमिकेनें तुमची सेवा करण्याकरितां तुमच्यापुढें हात जोडून कशा उभ्या राहतात, आणि एकूणएक देवदेवता शिर वांकवून आपला स्वीकार व्हावा ह्मणून तुमची कशी विनंति करितात, आणि ईश्वराचे कायदे शपथ वाहून तुमच्या सेवेला कंबर कसून कसे तयार होतात ! आपल्यामधील चैतन्य जागृत करा आणि पहा, हें सर्व असें घडून येतें कीं नाहीं तें !

" सर्व जगांतील देशांमध्यें अमुचा हिंदुस्थान बरा,
बुलबुल पक्षी आह्मि असों, तो पुष्पवाटिका होय खरा."

# RELIGION.

## ‘ धर्म.* ’

[ ध्रियते अनेन इति धर्मः ]

इंग्रजीमध्यें धर्म या शब्दाचा धात्वर्थ ( ‘Religion’–re, back & ligare, to bind ) ‘परत बांधणें’ असा होतो. अर्थात्, धर्म ह्मणजे जो आपणाला आपल्या मूलस्थानाशीं किंवा उगमाशीं परत नेऊन बांधतो, तो.

प्रश्न—हा उगम अथवा हें मूलस्थान कोणतें आहे? असें काय आहे, कीं, ज्याच्या आज्ञेनें मन विचार करतें, डोळे पहातात आणि निसर्गाला अस्तित्व येतें?

उत्तर—जें मनानें, नेत्रांनीं किंवा इतर इंद्रियांनीं जाणलें जात नाहीं, परंतु जें, मन चक्षु इत्यादिकांना व्यापार करावयास लावतें, तें ब्रह्म. ब्रह्म हें बुद्धीचा किंवा मनाचा विषय होऊं शकत नाहीं. मन आणि वाचा निराशेनें तेथून परततात.

चिमट्याला आपल्या चिमटींत वाटेल तो पदार्थ धरितां येतो; परंतु उलट वळून चिमटा धरणारीं बोटें त्याला कशीं धरितां येतील? त्याचप्रमाणें मनाला अथवा बुद्धीला आपलें उगमस्थान, जें अज्ञेय ब्रह्म, तें जाणणें अशक्य आहे.

नुसत्या धर्मसंबंधीं कल्पना ( Theology ) आणि त्याचप्रमाणें हटवादीपणानें धरून ठेवलेले दुराग्रह, हे वगळले असतां, धर्म ह्मणजे मन आणि बुद्धि हीं ज्याच्यायोगानें आपल्या अनिर्वचनीय मूलस्थानाकडे—परब्रह्माकडे वळून त्यांत मुरून जातात, असा एक गूढ व्यापार ( Process पद्धति ) होय.

---

* मथुरा येथें १५ व्या धर्ममहोत्सवप्रसंगीं परमहंस स्वामी रामतीर्थजींनी शांति-आश्रमांत अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण.

एकादा भाविक ख्रिस्ती किंवा धार्मिक मुसलमान जेव्हां ईश्वराची प्रार्थना करितो, तेव्हां तो आपले हात वर आकाशाकडे करतो. नकळत तो असें दर्शवितो, कीं, जें मिळविण्याची आपण खटपट करीत आहों, तें **पर** आहे, तें **अचिंत्य** आहे. आणि एकादा हिंदु जेव्हां भक्तींत मग्न होतो, किंवा समाधींत गढून जातो, तेव्हां त्याचे डोळे आपोआप झांकतात, आणि यावरून हें स्पष्ट दिसतें, कीं, त्याचें मन व त्याची बुद्धि जेथें लीन झालीं आहेत, तें **आंत, अदृश्य** आणि **पर** आहे.

धर्म—एकादा विशिष्ट धर्म नव्हे--तर एकच खरा धर्म. तो हा, कीं, जो इस्लाम, हिंदुधर्म आणि ख्रिस्तीधर्म यांचा केवळ आत्माच आहे; तो धर्म ह्मणजे खरें पाहतां जेथें जाति, वर्ण, पंथ यांचे भेद, सर्व दुराग्रही मतें आणि सर्व वाद, देह आणि मन, दिक्काल आणि कार्यकारणभाव व त्यांमध्यें अंतर्भूत होणारें सर्व विश्व आणि कल्पनासृष्टींतील सर्व विश्वें, हीं सर्व पार धुऊन जाऊन, जेथें शब्द देखील पोहोंचत नाहींत अशा त्या अज्ञेय परब्रह्माचा साक्षात्कार घेणें, हा होय. काय हें गौड बंगाल आहे ? मुळींच नाहीं.

ज्याला कांहीं आध्यात्मिक अनुभव आला आहे, त्याला, समाधि-स्थितींत स्वतःची व जगाची तर राहोच, परंतु ईश्वराची तरी कल्पना असते काय, हें सांगूंद्या. खऱ्या साक्षात्कारामध्यें 'मी तूं' भावच रहात नाहीं, आणि त्रिपुटीचा–द्रष्टा, दृश्य आणि दर्शन यांचा–लय होतो.

वर दाखविलेल्या ध्येयाकडे नेणारा कोणताहि सुव्यवस्थित प्रयत्न धार्मिक ह्मटला पाहिजे.

असलें गुह्य साध्य मिळविण्याची खटपट करण्याची काय गरज आहे, असा प्रश्न विचारण्यांत येईल. या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं मनुष्याचे नेहमींचे आवडते विषय किंवा त्याचें उद्दिष्ट–ज्ञान, शौर्य, प्रेम आणि सुख–हीं कशीं मिळविलीं जातात, हें आपण पाहूं.

(१) सर्वसाधारण समजूत अशी आहे, कीं, ज्ञान ह्मणजे बाह्यद्वारांनीं पुस्तकें आणि शिक्षक यांकडून मिळविलेल्या माहितीचा संग्रह आणि जो मनुष्य, एका काळीं प्रख्यातीला आलेले अभियुक्त ग्रंथ ( classics )

आपल्या मेंदूमध्यें कोंबून भरतो, तो मोठा विद्वान् गणला जातो. ही गोष्ट खरी आहे, कीं, पूर्वजांनीं मिळविलेलें ज्ञान टाकून देतां येत नाहीं. त्याचा चांगला अभ्यास केला पाहिजे; **परंतु जेव्हां एकादा मनुष्य बाह्य साधनांपासून परावृत्त होऊन अंतर्गत अनंताकडे वळतो, आणि जेव्हां तो स्वतःच खऱ्या ज्ञानाचा उगम आणि प्रचंड नूतन कल्पनांचा झरा बनतो, तेव्हांच खरें शिक्षण सुरू झालें, असें ह्मणतां येईल. न्यूटन** आणि इतर सत्यान्वेषी महात्मे उपयुक्त शोधांचा नुसता वर्षाव करितात. त्यांनां कोणीं शिकविलें ? मागील सर्व शोधांनां रद्द करणारें त्यांचें सर्वज्ञान त्यांनीं कोणत्या पुस्तकांतून मिळविलें ? खरोखर जगाच्या कल्याणाकरितां अवतरलेल्या संतांच्या विभूतींचें शिक्षण ह्मणजे जेथें अश्रुत गोष्टी ऐकावयास मिळतात, अज्ञात गोष्टी ज्ञात होतात, आणि अकल्पित गोष्टींची कल्पना येते, त्या **आत्म्यासमीप** नकळत **जाणें** हेंच असतें. जेव्हां मनुष्य आपला अहंकार विसरून जातो, आणि जेव्हां आपला देह, आपलें मन इत्यादि सर्व जणूं काय नाहींसें होतें, आणि जेव्हां अशी स्थिति प्राप्त होते, कीं, जेथें विश्व, आपला अहंकार आणि सर्व कांहीं त्या अगोचर **परमात्म्या**मध्यें नाहींसें होतें, ह्मणजे जेव्हां मनाची एकाग्रतेनें समाधि लागते, तेव्हां आपोआप प्रकाश पडतो; आणि अशी समाधि लागल्यावरच सत्याचा नुसता वर्षाव होतो, शोधांचें मोठें पीक येतें, ज्ञानाचा प्रवाह वाहूं लागतो, आणि विश्वांतील सर्व गुह्यें उकलतात. एवंच, सर्व सत्यें, शोध, युक्त्या, कल्पना इत्यादि सर्व वर सांगितलेला एक प्रकारचा इंद्रियातीत **योग** अथवा **धर्म** यांचें स्वाभाविक फल होय. कवि एकदां त्या अतींद्रिय स्थितींत पोहोंचला, कीं, त्याच्यामधून दिव्य कल्पना आणि उदात्त विचार निघालेच पाहिजेत. एकाद्या गणितशास्त्र-वेत्त्यानें अथवा तत्त्वज्ञानें आपला फक्त अहंकार टाकून दिला ह्मणजे पुरे; मग अतिशय विकट प्रश्न देखील त्याला मोठ्या आश्चर्यकारक रीतीनें सुटतात. कोडें सुटलें किंवा नवीन शोध लागला, ह्मणजे अहंकार त्याचें श्रेय बळकावूं पहातो; परंतु वस्तुतः श्रेय घेऊं पाहणारा अहंकार जोंपर्यंत अस्तित्वांत होता, तोंपर्यंत कोणताहि शोध लागत नव्हता. जेव्हां त्या

अहंकाराचा त्याग केला आणि वर सांगितल्याप्रमाणें धर्माचा साक्षात्कार झाला, तेव्हांच ज्ञान आणि यश हीं उदय पावलीं.

(२) समरांगणावरील एकाद्या वीराची वृत्ति आपण पाहूं. वलातिरेकानें तो धुंद झालेला असतो. हजारों लोक त्याच्या खिसगणतींत नसतात. त्यांची तो पर्वा करीत नाहीं. स्वतःच्या देहाचें देखील त्याला भान नसतें. अतःपर तो देह किंवा मन खात्रीनें नाहीं. त्याला जगाचें देखील अस्तित्व नाहींसें होतें. त्याचें सर्व चैतन्य जागृत होतें, आणि देह, मन आणि सर्व विश्व यांमध्यें असणाऱ्या परब्रह्माशीं आपला लय झाल्याचें त्याच्या शरीरावरील प्रत्येक रोम गर्जून सांगतो. ह्मणून प्रेक्षकांनां अमोघ शौर्य आणि अलौकिक पौरुष हीं या दृश्य जगामध्यें त्या परमात्मशक्तीच्या जणूं विद्युल्लेखाच भासतात. परंतु स्वतः त्या मनुष्याला हें शौर्य आणि पौरुष ह्मणजे नकळत एक धर्मच—ह्मणजे दृश्य जगाच्या आंत (पाठीमागें) असलेल्या शक्तींत लीन होणें—झालेला असतो.

(३) प्रेम हा शब्द किती गोड आहे. 'प्रत्येकाला कोणी तरी आपल्यावर प्रेम करणारें असतेंच' अशी एक ह्मण आहे. अंतःकरण शुद्ध असलेल्या हिंदूला बहुधा भक्तीचीच इच्छा असते. कांहीं महात्मे असे असतात, कीं, ईश्वरी प्रेमाकरितां ( भक्तीकरितां ) वाटेल त्या पदार्थांचा त्याग करावयास ते राजी असतात. तेव्हां प्रेमाचा उगम कोठें आहे हें शोधून काढण्याचा आपण प्रयत्न करूं.

चैतन्य महाप्रभु किंवा बनियन ( एक ख्रिस्ती साधु ) यांच्यासारखे परमभक्त हे त्यांच्या अपूर्व समाधिसुखानें आणि भजनानंदानें ओळखिले जातात. आणि ही गोष्ट निर्विवाद आहे, कीं, ईश्वरी प्रेम ( भक्ति ) एवढ्या योग्यतेला आणून पोंचविणें, ह्मणजे लज्जा, लोकच्छंदानुवर्तन (शिष्टसंमत आचरण), अहंकाराच्या बंधनापासून मुक्तता इत्यादि कल्पनांपलीकडे जाणें, हें होय. ज्यांनां ऐहिक वस्तूवर केलेल्या प्रेमाचा देखील किंचित् अनुभव आला असेल, ते सुद्धां 'उच्च प्रेमामध्यें प्रियकर आणि प्रेमविषय हीं भेदरूप कल्पनाच नसते' हें सकृद्दर्शनीं विचित्र दिसणारें विधान

कबूल करितील. एवंच, वरील अर्थीं प्रेम आणि धर्म हीं निर्विवाद एकच आहेत.

इंग्रजींतील "Ecstasy" ( e, out & sto, I stand ) ह्मणजे 'आनंद' या शब्दाच्या धात्वर्थावरून पहातां, कोणत्याहि स्थितीमध्यें अनुभविलेला आनंद, ह्मणजे आपला देह, आपलें मन, आणि आपलें विश्व यांपासून अलिप्त राहणें होय, असें सिद्ध होतें. स्वतःच्या अनुभवाशीं ताडून पहातां प्रत्येकाची खात्री होईल, कीं,—क्षणभर कां होईना—द्वैतभावनेपासून मुक्ति, याहून सुख निराळें नाहीं. **इच्छित वस्तु आणि इच्छिणारा ( कर्ता ) हीं एकत्र झालीं असतां, आनंद उत्पन्न होतो.** यावरून आनंदाचें स्वरूप व्यक्त करणें ह्मणजेच धर्म होय, असें दिसतें. या सर्व विवेचनावरून असें पूर्णपणें सिद्ध होतें, कीं, जेव्हां बुद्धि आणि तिजबरोबर सर्व दृश्य जग परब्रह्मामध्यें लीन होतें, तेव्हांच आयुष्यांतील उच्च आणि इष्ट हेतु तडीला जातात. परंतु असें करणें हें, ज्याप्रमाणें एकादा मनुष्य कोशामध्यें एकादा शब्द पाहतो अथवा ज्याप्रमाणें एकादा पाणबुड्या समुद्रांत बुडी मारून कांहीं मोतीं घेऊन चटदिशीं बाहेर येतो, त्याप्रमाणें नुसतें विश्वतत्त्वामध्यें एक बुडी मारण्यासारखें होय.

इंद्रियजन्य सुखें देखील तत्त्वतः धार्मिकच आहेत; परंतु इंद्रियद्वारा धर्मसुखाचा अनुभव घेणें हें एकाद्या दरबारांत मोरींतून शिरण्यासारखें आहे.

तीं ( इंद्रियजन्य सुखें ) विजेच्या क्षणिक प्रकाशासारखीं आहेत. कारण, वीज जरी वस्तुतः दिवसाच्या प्रकाशाहून भिन्न नाहीं, तरी ती उपायापेक्षां अपायच अधिक करिते.

योग्यद्वारानें या आनंदमंदिरांत प्रवेश करणें शक्य नाहीं काय? मध्यरात्रीं चमकणाऱ्या विजेचा प्रकाश सतत पाडून कायमचा दिवस करणें शक्य नाहीं काय? अशा तऱ्हेची मनुष्याची स्वाभाविक इच्छा असणें यांतच सर्वसाधारण धर्माची आवश्यकता दिसून येते आणि हें साधण्याकरितां अविश्रांत खटपट करणें अगदीं उचित आहे; पण

जे धर्माच्या महत्त्वाची चेष्टा करितात, ते आपल्या इच्छेविरुद्ध आपला आत्मघातच करून घेतात.

शास्त्रें आणि तत्त्वज्ञान यांचे त्या अनिर्वचनीय परब्रह्माचें स्वरूप ओळखण्यासाठीं चाललेले प्रयत्न व्यर्थ होत आहेत. विश्वाच्या किंवा आत्म्याच्या दृष्टीनें पहातां, दिक्, काल आणि कार्यकारणभाव यांचे गुणधर्म शोधून काढण्याची सर्व खटपट वृथा होत आहे. चौकस बुद्धीला ( मनाला ) जडद्रव्य, गति आणि शक्ति यांचें खरें स्वरूप समजण्यास मोठे प्रयास पडतात. पाश्चिमात्य परमाणुवादामध्यें विरोध आहेत. बोरोविचच्या 'शक्तीच्या मध्यबिंदू'च्या कल्पनेची तीच गति आहे. जगांतील सर्व धर्ममतांवर कमी अधिक प्रमाणानें धर्मभोळेपणाचा ठसा उमटलेला दिसतो. तत्त्वज्ञानांतील एक वाद दुसऱ्याला जिंकितो आणि दुसरा वाद उसनें फेडण्यास मागेंपुढें पहात नाहीं. यावरून हें स्पष्ट होतें, कीं, सृष्टींतील अंतर्गत **तत्त्व** हें मनाला सर्वकाळ एक मोठें गूढच होऊन राहील, आणि मनुष्याच्या बुद्धीला तर विश्वांतील गुह्य उकलण्याची शक्ति दिलेली नाहीं.

तर मग आपण या विश्वाच्या मुळाशीं असलेल्या **तत्त्वाचा** शोध निराशेनें टाकून द्यावा कीं काय ? आगगाडी, तारायंत्र व बंदुकीची दारू इत्यादि व्यावहारिक शोधांमध्येंच आह्मीं आमची सर्व शक्ति खर्च करावयाची काय ! असलीं खेळणीं देखील आपल्याला शांति देऊं शकत नाहींत. कोणतीहि वस्तु प्राप्त झाल्याबरोबर आणखी अधिक मिळविण्याची तृष्णा वाढते. या गोष्टीवरूनच हें सिद्ध होतें, कीं, ऐहिक वासना व्यर्थ अथवा फोल आहेत.

हे विचार आपणाला पूर्ण निराशावादी बनवितात. पण उपनिषदें सांगतात- 'नाभयेत्' निराश व भयभीत होऊं नका. शांतीची तीव्र आकांक्षा (इच्छा) निरर्थक किंवा निष्फल होणार नाहीं.

किती जरी बळजबरीनें आह्मीं **तत्त्वा**कडे डोळेझांक केली, तरी सुदैवानें केव्हां केव्हां असें घडतें, कीं, मन जगापासून निवृत्त, अर्थात् अंतर्मुख होतें, आणि असे प्रश्न आंत उठतात, कीं, हें दृश्य जगत् कशापासून उत्पन्न झालें आहे ? मी कशाकरितां निर्माण झालों ? पृथ्वी आणि आकाश यांचा हेतु तरी काय ?

वेदांमध्यें सांगितलें आहे, कीं, तत्त्वज्ञान, शास्त्र अथवा ऐहिक प्रेम यांनां जरी यांचें उत्तर देतां आलें नाहीं, तरी या आमच्या हाडींमासीं खिळलेल्या प्रश्नांचें उत्तर आह्मांला मिळालेंच पाहिजे. हे प्रश्न अनिर्वचनीय मायेमध्यें अंतर्भूत होत असल्यामुळें ते आह्मांला उकलावयाच्या कोड्याचा एक भाग होतात. ज्याप्रमाणें गरुडपक्ष्याला आपण तरंगत असलेल्या हवेहून उंच प्रदेशांत उडतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच विचाराला देखील उपाधींच्या पलीकडे जातां येत नाहीं. जोंपर्यंत प्रश्न करणारा आणि प्रश्नाचा विषय हे भिन्न राहतात, तोंपर्यंत मायेचें बंधन असणारच, आणि दृश्यापलीकडे जाणें अशक्यच होणार. विशेष अभ्यासानेंच हें उद्दिष्ट साध्य होण्याजोगें आहे; आणि तें एकदां साध्य झालें ह्मणजे प्रश्न आणि उत्तर हीं दोन्ही नाहींशीं झालींच पाहिजेत. ऐहिक सुख, आनंद, प्रेम इत्यादि बंधनांपासून अलिप्त राहून हें उद्दिष्ट साधण्याचा वेदान्त प्रयत्न करितो. समाधीमध्यें मग्न झाल्यानंतर मन आणि बुद्धि यांनां अगोचर अशा ब्रह्माशीं आपण एकरूप होतों. हा साक्षात्कार किंचित् जरी लाभला तरी चिंता आणि भय यांपासून मनुष्य मुक्त होतो, आणि धर्माच्या या साक्षात्कारापासून अचल मनोनिग्रह आणि करारीपणा वाढून त्याच्या स्वभावांत तेजस्विता येते.

यावरून धर्माची आवश्यकता सिद्ध होते.

**"तुका ह्मणे सर्व धर्म हरिचे पाय । येर ते अपाय दुःखमूळ ॥"**

# PROPOSED PRINCIPLES
# FOR
# SADHARAN DHARMA SABHA.

## 'साधारण धर्मसभे'करितां सुचविलेलीं तत्त्वें.

( १ ) 'साधारण धर्म' याचा अर्थ शास्त्राचे सिद्धान्त, वेदान्ताची आज्ञा आणि सांप्रतच्या गरजा यांनां अनुरूप जीवनक्रम, असा आहे. प्रागतिक शास्त्रांबरोबर याची गति असल्यामुळें आणि हा मार्ग नेहमीं वर्तमानकाळाला धरून असल्यामुळें तो स्थित्यात्मक नसून प्रगमनशील आहे.

(२) 'साधारण धर्म' कोणत्याहि पंथाच्या किंवा पंथहीन मनुष्याला मोकळा आहे. अन्यधर्मीयांनां 'साधारण धर्मांत' आल्यामुळें आपला धर्म सोडण्याची गरज नाहीं.

( ३ ) 'साधारण धर्मा'चा उद्देश हिंदुस्थानांतील आणि हळुहळू सर्व जगांतील निरनिराळ्या पंथांमध्यें, एकंकार न करतां, त्यांतील वैचित्र्यामध्यें ऐक्य घडवून आणणें, हा आहे. प्रत्येक वर्गांतील निरनिराळ्या व्यक्तींमध्यें ऐक्य वाढवून, निरनिराळ्या वर्गांचा एकमेकांशीं सलोखा करणें, आणि प्रत्येक व्यक्ति, वर्ग अथवा राष्ट्र यांनां आपापल्या विशिष्ट कामगिरीमध्यें प्रावीण्य मिळवावयास लावून व्यक्तिविषयक मत्सर कमी करणें, हाहि त्याचा एक उद्देश आहे.

( ४ ) 'साधारण धर्म' सभेच्या उपदेशकांच्या मार्फत हिंदुस्थान आणि इतर देश यांमध्यें परस्पर दळणवळण वाढवून बंधुत्व आणि प्रेमभाव उत्पन्न करणें, हा 'साधारण धर्माचा' एक उद्देश आहे.

(५) 'साधारण धर्मा'च्या प्रत्येक अनुयायानें शारीरिक उन्नतीला अध्ययन किंवा ध्यान, भजन यांच्या इतकेंच महत्त्व दिलें पाहिजे.

(६) सरकारी विश्वविद्यालयाचें बरेंच काम आपल्या हातीं घेऊन विद्यार्थ्यांचें शील उत्तम बनण्याजोगें शिक्षण देण्याचा 'साधारण धर्माचा' विचार आहे. प्राचीन आणि अर्वाचीन तत्त्वज्ञानांवर पद्धतशीर व्याख्यानें देण्याची तजवीज करून, शिवाय प्राणिशास्त्र आणि इतर प्रयोगात्मक शास्त्रें (experimental sciences) यांमध्यें नवीन शोध करण्यास उत्तेजन देण्यांत येईल. शास्त्रीय ज्ञानाचा लोकांमध्यें प्रसार करण्यामध्यें आणि कल्पकता वाढविण्यामध्यें यत्किंचित्‌हि कसूर केली जाणार नाहीं.

# FOREST TALKS.

## *बृहदारण्यकम्.

" मोठ्या कल्पना एकदां अस्तित्वांत येऊन त्यांनां व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें, ह्मणजे मग त्यांविषयीं गैरसमज होवो, त्यांनां अडथळा येवो, किंवा त्यांचा पाडाव होऊन कांहीं कालपर्यंत त्यांनां कोपऱ्यांत पडावें लागो, त्यांचा नाश ह्मणून कधींहि व्हावयाचा नाहीं ! त्या आपल्यापरी जीवंतच असतात, व कालेंकरून जेव्हां मानवी विचार आणि नीतिमत्ता प्रगल्भ होऊन परिपक्व होतात तेव्हां त्या कल्पनांचा सामाजिक व्यवस्थेशीं एकजीव होतो."

"कोणत्याहि अल्प बीजाला, पेरल्यापासून उगवेपर्यंत स्वस्थ पडूनच राहिलें पाहिजे. आणि त्याचें रोपटें होण्यापूर्वीं त्यानें बरेच उन्हाळे व पावसाळे पाहिले पाहिजेत. कांहीं कालानें पुनः येऊन पहा, ह्मणजे त्या रोपट्याचा, झंझावाताला देखील दाद न देणारा असा प्रचंड वृक्ष झालेला तुह्मांला तेथें दिसेल."

या विचारांनां वाटल्यास मनोराज्य ह्मणा, परंतु ते सत्यरूप आहेत!

Truth crushed to Earth shall rise again,
The eternal years of God are hers.

**सत्या चिरडूनी टाकिलें धुळींत । पुनः उसळत निजबळें ॥ १ ॥**
**क्षणभरी जरी दृष्टीआड झालें । तरी तें नाशिलें नव जाय ॥ २ ॥**
**सनातन काळ जो कां ईश्वराचा । सत्याचा तो साचा असे पाहीं ॥ ३ ॥**

मानवी हृदयरूपी ज्वालामुखींच्या विवरांतून बाहेर उसळून येणारा तप्त धातूंचा हा रस आहे.

" पुत्रपौत्रांनां पोसणारे निर्झर ज्यांमधून निघतात अशा गगनचुंबित शिखरांचें हें स्फुरण आहे. "

---

* 'आरण्यकम्=Forest Talks, हा विषय बराच मोठा असल्यामुळें याला बृहदारण्यकम्' असें नांव दिलें आहे.

## CIVILIZATION.

## ( १ ) सुधारणा.

एक शीतल शिला उशाला घेऊन, मृदु वालुकेचा बिछाना करून, एक पाय दुसऱ्या पायावर कसा तरी टाकून, मोठ्या प्रेमानें शुद्ध हवेचें सेवन करीत, दिव्य प्रकाशाचें चुंबन घेत, आणि आनंदातिशयानें प्रणवाचें गान करीत, झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याला ताल धरावयास लावून 'राम' देवदारु आणि भूर्ज वृक्षांच्या खालीं विश्रांतीस्तव पहुडला असतां, सुधारणा नव्यानेंच प्राप्त झाल्यामुळें चढून गेलेल्या एका गृहस्थानें विनोदानें 'रामा'ला प्रश्न केला "आशियामधील लोकांचा आळशी स्वभाव आपण अमेरिकेंत काय ह्मणून आणतां ? उठा, कांहीं चांगलें काम करा."

राम म्हणाला "माझ्या लाडक्या आत्मस्वरूपा जिवलगा! कांहीं चांगलें काम करण्याविषयीं ह्मणशील तर त्या धंद्यांत अगोदरच अतिशय गर्दी झाली नाहीं काय ? मला आणि माझ्या 'रामा'ला एकटेंच राहूं दे कसें!"

काय, 'आळस' ह्मणतां ? पौर्वात्य आळस ? पण आळस ह्मणजे तरी काय ?

शिष्टाचाराच्या पंकामध्यें धडपड करीत राहणें, रूढीच्या प्रवाहाबरोबर वाहत जाणें, दृश्याच्या कूपामध्यें मृत्पिंडाप्रमाणें मग्न होणें, मालमत्तेच्या डबक्यांत बुडून जाणें, आणि जो काळ वस्तुतः ईश्वरचिंतनामध्यें घालविला पाहिजे तो द्रव्यार्जनाकडे खर्च करणें, आणि या सर्वांला 'कांहीं चांगलें काम' असें ह्मणणें, हा आळस नव्हे काय ? खरोखर, आपल्या जीवितक्रमाप्रमाणें दुसऱ्यांनां रहावयास लावणें, आणि पोषाख, खाणेंपिणें, चालणें, निजणें, हंसणें आणि रडणें—मग बोलण्याची गोष्ट सोडाच—यांत स्वतंत्रता नसणें, हा सर्व आळस नव्हे काय ? आपलें देवपण हरवणें हा आळस नव्हे काय ? ही घाई, हा गोंधळ, जीव धोक्यांत घालणारी ही पळापळ, ही संतापजनक धांवपळ, हा सर्व प्रकार कशाकरितां ? इतरांप्रमाणेंच सर्वशक्तिमान् धनाचा संग्रह करण्याकरितां ? आणि मग पुढें काय ?

इतरांप्रमाणें उपभोग घ्यावयाचा? छे! **सुखाच्या मागें लागण्यांत खरें सुख नाहीं.** लोकमताला फशीं पडलेल्या गरीब बापड्यांनों! सुखाचा उपभोग घेण्यास विलंब कां लावितां? या सुरम्य गिरिनिर्झराच्या तटाकीं असलेल्या या सृष्ट्युद्यानांत येऊन कां बसत नाहीं, आणि तुमचे *सख्खे बांधव—शुद्ध हवा, देदीप्यमान प्रकाश, लीलानृत्य करणारें पाणी, हिरवीगार जमीन—ज्या बांधवांपासून खरोखरच तुमचें रक्त बनलें आहे त्यांचें सहवास-सौख्य तुह्मी कां अनुभवीत नाहीं? सुधारलेलीं राष्ट्रें जातिरूपी चर्मानें बद्ध होऊन गेलीं आहेत. तेथील लोक स्वतःला आपल्या इतर बांधवांपासून वेगळे करितात आणि स्वतंत्र सृष्टि आणि सृष्टिक्रमानुरूप जीवन यांच्या अमर्यादित प्रदेशापासून वळेंच विभक्त होऊन आकुंचित व अरुंद दिवाणखाने—साक्षात् गुहा आणि अंधारकोठड्याच यांत स्वतःला कोंडून घेतात. विस्तीर्ण सृष्टींतून ते स्वतःला हांकून लावितात, सर्व चराचर सृष्टींतून स्वतःला बहिष्कृत करितात, वनस्पति आणि प्राणी यांपासून विभक्त होतात; श्रेष्ठता, इभ्रत, शिष्टता आणि मानमान्यता यांचा स्वतः मोठा आव आणून ते दुसऱ्यांपासून अलग होतात आणि सांठलेल्या पाण्याप्रमाणें कुजत राहतात. **थोडी दया करा, बाबांनों! स्वतःवर थोडी दया करा!**

पद्धतशीर युक्तीनें गरीब गरजू लोकांकडून लुबाडलेल्या संपत्तीनें तुह्मांला केवळ वीट आणणारीं मिष्टान्नें झोडावयास मिळतील; फिक्के चेहरे व शिष्टाचाराच्या मुद्रा तुह्मांला प्राप्त होतील; कृत्रिमपणाच्या दर्पानें भरून गेलेल्या 'खोली' नांवाच्या पेट्यांत तुह्मी कोंडले जाल; सर्व प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक अस्वाभाविक मादक पदार्थांनीं उत्पन्न झालेल्या मनाच्या अस्वस्थतेमध्यें सदैव रहाल. स्वतःची निव्वळ फसवणूक करण्याकरितां एवढा खटाटोप कशाला हवा? अशा काल्पनिक सुखाच्या नांवाखालीं आपल्या हातचें खरें सौख्य सोडून देऊं नका. व्यर्थ भलतीकडे श्रम करण्याची गरज नाहीं.

चल, ये, हा चालता क्षण आणि हा येथील प्रदेश यांचा उपभोग घे. ये, मजबरोबर या गवतावर आडवा हो.

---

* 'सख्खे बांधव' ही या पुस्तकाच्या शेवटीं दिलेली कविता पहा.

आपल्या आयुष्याचा विमा उतरण्याकरितां सोन्यारुप्याची मर्जी संपादन करण्यांत 'नका करूं नाश आयुष्याचा.' धनसंपन्न झाल्यानें आणि वेळेवर हप्त्याचा भरणा केल्यानें तुमच्या आयुष्याची हमी तुह्मांला मिळते काय ? हे मूढ अमरा ! त्याच्यावर विश्वास ठेवूं नको. क्षुल्लक बाबीकरितां, भयंकर मारामारी होत असलेल्या या जगांत जगण्याकरितां सबबी कशाला शोधून काढतां ?

गेलों अह्मी सकळ गुंतुनि या भवांत,
सत्तत्त्व[1] तें विरल[2] जाणति मानवांत;
द्रव्यार्जनार्थ करितों बहुसाल कष्ट,
विश्रांति[3] ते विषयचिंतनिं होय नष्ट. 1

संपत्ति मेळवुनि भोगसुखीं रमावें
यामाजि नित्य अमुचें बल नाश पावे;
ही सृष्टि आपुलि असून दिसे परावी[4],
तत्त्वार्थ[5] हा समजण्या सुमती वरावी. 2

स्वांन्तें[6] दिलीं क्षणसुखां, उरलें न भान,
हें आमुचें अति विगर्ह्य घडे प्रदान[7];
चंद्रास पाहुनि सुखें जलधी उठावे,
आह्मां न भूतगत[8] आंतर हेतु ठावे. 3

हे नित्य गर्जुनि समीर निवांत होती,
दिव्य प्रफुल्ल सुमनें मिटती जशीं तीं;

---

१. खरें तत्त्व. २. विरळा, क्वचित्. ३. दिवसभर कष्ट करून श्रमल्यानंतर मनुष्यांना झोंप ही देवानें विश्रांति दिली आहे; परंतु विषयलुब्ध मनुष्याला विषयचिंतनामुळें रात्रीची झोंप देखील बरोबर मिळत नाहीं, हा भावार्थ. ४. परकी. ५. ती वस्तुतः आपली असून परकी दिसते हें तत्त्व समजण्यास. ६. अंतःकरणें. ७. देणें, दान. ८. जड भूतांत असणारा परस्पर प्रेमभाव.

यांमाजि वा तदितरीं[2] कधिं भूतजाती
नाहीं हृदैक्य[3] ह्मणुनी न विकर्षिती[4] तीं. ४

बोलो सुखें जन मला बहुदेववादी,
अश्रद्धधान, अतिमूढ, पुराणवादी;
लोकापवाद मज हे बहु मान्य देवा !
मैत्री चराचरिं घडो, मज हाचि मेवा ! ५

निवांत अब्धितटिं मी असतां मनासी
देवा ! दिसो सजिव मित्रचि वारिराशी;
तेणें उदासपण जाइल या मनाचें,
भोगींच जें[5] धरुनि उत्कट काम नाचे. ६

कुक्षींतुनी[6] जलधिच्या मज दिव्यकांती[7]
येतां दिसे जरि वरी जलदेवता ती;
कानीं पडे वरुणपुत्रविपाणजन्य[8]—
सन्नाद, होइन तरी त्रिजगांत धन्य ! ७

येई प्रतीति जरि ही मज सर्व भूतीं,
त्यागीन मी स्वकिय धर्म, विभो ! ऋतार्थी[9];
जो कां जुना अबुधभाविकलोकधर्म
तो स्वीकरीन; मज त्यांतचि फार शर्म[10] !* ८

---

यूरोप आणि अमेरिका येथील सुधारलेलीं अशीं समजलीं जाणारीं राष्ट्रें विनाशपंथांत वरींच पुढें गेलीं आहेत. प्रगति ह्मणजे मानासिक

---

१. वारे गर्जून निवांत होतात यांत. २. किंवा इतर सृष्टपदार्थांत. ३. आमचें हृदय ऐक्य पावत नाहीं. ४. भूतें आह्मांला आपणांकडे ओढीत नाहींत. ५. मन. ६. पोटांतून. ७. हें जलदेवतेचें विशेषण. ८. वरुणपुत्राच्या (proteus) शिंगाचा नाद. ९. सत्याचीच केवळ चाड आहे ज्याला असा मी १०. सुख, कल्याण.

* The world is much with us; late and soon. या वर्डस्वर्थ कवीच्या कवितेचें मराठींत रूपांतर.

**किंवा आध्यात्मिक उन्नति होय.** खऱ्या प्रगतीनें मनुष्याच्या सत्स्वरूपाला हालविलें पाहिजे, त्याच्या नुसत्या छायेला जागें करण्यांत तिनें व्यर्थ खपूं नये. प्रगतीला ऐहिक संपत्तीशीं कांहींहि करावयाचें नाहीं, आणि अनवश्यक गरजा वाढविण्याचेंहि तिला कारण नाहीं. दिव्य ग्रंथ लिहिणाऱ्या आणि अगदीं साधेपणानें राहणाऱ्या आकिंचन प्राचीन आर्यांच्या जीवनक्रमाचा योग्य तो फेरबदल करून इतिहास पुनरुद्धार करणार आहे. आधुनिक संस्कृति मुख्य उद्दिष्टापासून ढळली आहे. सध्यां मनुष्यें, भाजीपाला व धान्य यांसारखीं गणलीं जात आहेत. त्यांचा भाव उतरतो व चढतो. भ्रामक कल्पना टाकून द्या. कशाच्यानेंहि तुमची किंमत ठरविली जाणार नाहीं.

भपक्याच्या लाडक्या भक्तांनों ! तुह्मांला आर्यांचें संन्यास अथवा त्याग हें ध्येय जणूं काय स्वप्नसृष्टींतील एक कल्पना वाटते ! सावध असा. तुह्मांला हालवून जागे करण्याची व तुह्मी कोणत्या भयंकर भ्रमांत ( nightmare ) आहां हें तुह्मांला जाणवून देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ज्या मनुष्यामध्यें भक्तियुक्त त्याग नाहीं, तो अनुभविक, हुशार रानटी प्राणिच ह्मटला पाहिजे.

सुधारलेल्या जगाची झकपक, त्याचा कृत्रिमपणा, शिष्टाचार, द्रव्यतृष्णा यांनां भुलून जाऊं नका. हीं सर्व फोल ठरलीं आहेत. अग्नीमध्यें घालून यांची पारख केली गेली, आणि लांकडांगवताप्रमाणें तीं कसाला उतरलीं नाहींत. निम्मे लोक अन्नावांचून उपाशीं मरत आहेत आणि उरलेले निम्मे लोक यथेच्छ उधळपट्टी, खुर्च्या टेबलें इत्यादि फाजील सामान, अत्तराच्या कुप्या, ढोंग आणि पैठणी ( वरपांगी ) आदर, यांमध्यें बुडून गेले आहेत. सर्व तऱ्हेचे मौल्यवान् कःपदार्थ, गचाळ संपत्ति आणि रोगट दिखाऊपणा हींच सर्वत्र भरलीं आहेत.

एकाची हानि करून दुसऱ्याकडे अधिक लक्ष्य देणें टाळल्यास शारीरिक अथवा मानसिक श्रम हे आरोग्य व दीर्घायुष्य यांच्याशीं विसंगत नाहींत; परंतु सद्यःकालीं कांहीं लोक शारीरिक श्रमावर उपजीविका करीत आहेत, श्रमानें झिजून मरत आहेत, आणि कांहीं दुसरे लोक मानसिक

शक्तीच्या उधळपट्टीनें मरत आहेत. कुटुंबांतील कांहीं व्यक्तींनां नुसती कोरडी भाकर, आणि कांहींनां नुसतें लोणी किंवा तोंडीं लावण्याचे पदार्थ देण्यासारखेंच हें आहे.

ज्यांच्याजवळ कांहीं मालमत्ता आहे, ते या विश्वांतील स्वतःला नीच ठरविणारे गचाळ लोक होत. कोणत्याहि वस्तूंवर हक्क सांगणारे तेच खरे शूद्र होत. ज्याच्या मालकीचें ह्मणून कांहीं आहे ते अंधारकोठडींत काळ कंठणारे आणि स्वतःला दोषी ठरविणारे कैदी होत. जे संग्रह करतात ते अनुकंपनीय कीटक होत. हे आत्मघातकी लोक स्वतःला राजा किंवा सभापति ( President ) ह्मणवून घेऊन संपत्तीच्या गलिच्छ धुळीमध्यें आपणांला गुदमरून घेतात. कांहीं लोक स्वतःला विद्वान् व तत्त्वज्ञानी ह्मणवून घेऊन अंधकारामध्यें स्वतःला बुडवून घेतात. कांहीं लोक दुर्बलता आणि भित्रेपणा यांनांच शक्ति ह्मणून त्यांच्या पंकामध्यें रुतून बसतात. कोरड्या जमिनीवर मासे धरण्याचा प्रयत्न करण्याइतके दूधखुळे झालेले हे लोक आपल्या ह्रासास्पद स्थितींत श्रेष्ठतेचा आव आणितात. मालमिळकत, जमीनजिंदगी यांच्या श्रमानें हे व्यर्थच शिणताहेत. स्वतःचा छळ करणाऱ्या या विचित्र यतींनां जागृत करून मुक्त केलें पाहिजे. संपत्ति, ज्ञान, पदव्या आणि अधिकार यांचे हक्क व मान गुंडाळून ठेवा. **‘ समता, समता’ हेंच सुखाचें तत्त्व आहे.** रानटी हांव, मिळेल तें आपल्या हातांत गच्च धरण्याची पशुतुल्य प्रकृति, आणि या पशुतुल्य प्रवृत्तीहून अधिक वाईट अशी संग्रह करून तो वाढविण्याची प्रवृत्ति, या सर्व गोष्टी लोकांनां त्रस्त, अस्वस्थ आणि संभ्रांत करतात. उद्दामवृत्ति आणि नीच महत्त्वाकांक्षा यांचा विषमज्वर शमूंद्या. **“ ज्याअर्थी तूं कांहीं मत्ता बाळगिली आहेस त्याअर्थी ती तुझ्यावर सत्ता चालविते व तुला पूर्णपणें घेरून टाकिते, ” हें कठोर तत्त्व प्रत्येकाच्या हृदयांत बिंबविलें पाहिजे, प्रत्येकाच्या कानांत ओतलें पाहिजे.**

हे सत्यान्वेषी मनुष्या ! तुझ्या सभोंवतालच्या लोकांच्या रीतीभाती आणि सुधारणेचें दडपण यांनीं त्रस्त होऊं नको. प्रगमनशील ह्मणून

समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांच्या डामडौलानें गोंधळून जाऊं नको. त्याचें 'वस्तुस्थिति आणि आंकडेशास्त्र' हें डोळ्यांत धूळ टाकणारी निव्वळ लबाडी, कल्पित गोष्ट आहे. त्यांची ' रोकड संपत्ति आणि भ्यासुर सत्य ' हे नुसते कल्पनेचे खेळ आहेत. या विसाव्या शतकांत प्रगमनशील राष्ट्रांनीं आपली शासनपद्धति व वर्तनक्रम बदलून स्वातंत्र्य आणि वेदान्त यांच्या तत्त्वांवर तीं नेऊन ठेवण्याची वेळ फारशी लांब नाहीं. **ममत्वाच्या कल्पनेचा त्याग करण्यामध्यें, आणि वेदान्ताच्या त्यागवृत्तीचा स्वीकार करण्यामध्यें व्यक्तीचें व तसेंच राष्ट्रांचें कल्याण आहे.** दुसरा मार्ग नाहीं.

द्रव्यतृष्णेच्या ज्वरानें पीडित झालेल्या सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें, अंतर्गत शक्तींचा व्यापार चालू आहे, आणि त्या शक्ति ममत्वाच्या भ्रांतीमध्यें स्वतःला गुदमरून टाकणाऱ्या सर्व क्षुद्र लोकांनां जागें करितील. त्यागाचें साम्राज्य, स्वातंत्र्याचें राज्य, हीं येऊन जगाला धन्य करणार आहेत.

**प्रश्न**–एकादा नवीन पंथ स्थापण्याचें तुमच्या मनांत आहे काय ?

**उत्तर**–'राम' कोणत्याच कल्पनेचा पुरस्कर्ता नाहीं. सत्य आपोआप प्रस्थापित होतें. 'राम' नुसता **प्रभूच्या** आड येत नाहीं, तो स्वतःला निर्मळ ठेवितो, आणि तेजाला पूर्णपणें प्रकाशूं देतो. सत्य कोणत्याहि रूपानें प्रकाशो. त्याच्या ज्योतीमध्यें शरीर, मन आणि सर्व कांहीं भस्म होवो. संदेश सांगितल्यानंतर पाहिजे तर संदेशहारी व्यक्तीला मारून टाका. याहून अधिक भाग्य कोणतें ?

**प्रश्न**–एकादा धर्मसंस्थापक अथवा पैगंबर आपण आहां काय ?

**उत्तर**–नाहीं. तें मला कमीपणा आणणारें आहे. मी साक्षात् ईश्वरच आहें आणि तूंहि तसाच आहेस. देह हें **माझें** साधन आहे.

**प्रश्न**–तुमच्या संदेशाला यश येणार नाहीं. त्यांचें ग्रहण करण्यास लोक तयार नाहींत.

**उत्तर**–नसोत बापडे ! त्याचें मला काय ? मी सत्यरूप आहें. दमडी दमडी करून पैसा मिळविण्याचा क्षुद्र कल्पनेनें मी चालत नसतों. सर्व युगें माझींच

आहेत. अनंतकाल माझाच आहे. **ख्रिस्ताचा** त्याच्याच लोकांनीं अव्हेर केला पण सर्व जगानें त्याला उचलून धरिलें. त्याच्या कालांनें त्याचा अव्हेर केला, तरी पुढील युगें त्याचींच झालीं.

**प्रश्न**–इतिहासावरून तुमच्या ह्मणण्याची साक्ष पटत नाहीं.

**उत्तर**–तुमचा इतिहास अपूर्ण आहे. हें सत्य इतिहासामध्यें जो भाग लिहिणार आहे तो भाग अद्याप आपण वाचला नाहीं. **प्रचंड इच्छाशक्तीपुढें, मग ती एका व्यक्तीची कां असेना, इतिहास फिका पडतो.** वास्तविक कारण सोडून देऊन बाह्य चिन्हांच्या अभ्यासामध्यें इतिहास गुंग होतो.

**प्रश्न**–इमरसनच्या ह्मणण्याप्रमाणें, 'खरें प्रेमाचें बंधन, सारख्या भावना असणें यांत आहे.' आणि तुमचें मत तर कोणाशींच पटत नाहींसें दिसतें. केवढें प्रेमरहित आयुष्य आपणाला कंठावें लागत असेल!

**उत्तर**–विश्वरूपी माझीं चित्रें निरनिराळ्या बाजूनें पाहण्याची मला मोठी मजा वाटते. येथें एकाद्या पुराणप्रिय मनुष्याप्रमाणें मी त्यांना मागून पहातों; तेथें प्रगमनशील उदारमतवाद्याप्रमाणें त्यांना पुढून पाहतों. 'राम' ( किंवा 'पूरण'[1] ) या रूपानें मी उजवीकडून पहातों, एकाद्या टीकाकाराप्रमाणें मी डावीकडून पहातों. ह्या सर्व ठेवणी आणि बाजू पूर्णपणें माझ्याच आहेत. गौळण ताक घुसळीत असतां उजव्या हातांतील दोरी तीच ओढते, आणि डाव्या हातांतीलहि तीच ओढते. सर्वच बाजू माझ्या स्वतःच्या असल्यामुळें कोणाशीं माझा मतभेद कसा असूं शकेल? याप्रमाणें निरनिराळ्या लहरींमध्यें उचंबळणारा मी प्रेमोदधि आहें. सर्वांपासून भिन्न असण्यामध्येंच माझें ऐक्य आहे. चला, या मजबरोबर, विरोधांमधील ऐक्याचा अनुभव हवा असल्यास घ्या.

**प्रश्न**–हें काय गौडबंगाल आहे? दुसऱ्याहून पूर्णपणें भिन्न असलेल्या मनुष्याचें त्याच्याशीं ऐक्य कसें होईल?

---

१ हे स्वामींचे पट्टशिष्य आहेत.

**उत्तर**–बरें तें असूंद्या. मला देखील हेंच आश्चर्य वाटतें, कीं, दिसण्यामध्यें आपण एक असत नाहीं तरी पण आपण एक आहोंत. लंगड्या तत्त्वज्ञानाला हें सिद्ध करितां येत नसेल, इंद्रियांनां तें दाखवितां येत नसेल, परंतु तें तसें आहे. जेव्हां तत्त्वाचा अनुभव येतो तेव्हां माया नाहींशी होते. **प्रेम हें सिद्ध करून देतें.** तत्त्वमसि (तें तूं आहेस). तूं स्वतः **ईश्वरच** आहेस.

**प्रश्न**–ईश्वराला 'तें' कां ह्मणतां ?

**उत्तर**–कोणी ईश्वराला आकाशांतील बाप समजून भजतात आणि त्याला 'तो' ह्मणतात. कोणी ईश्वराला दैवी माता ह्मणून भजतात आणि त्यांनीं ईश्वराला 'ती' असें ह्मणावें. दुसरे लोक फारशी कवीप्रमाणें देवाला आपली प्रिया समजून त्याची भक्ति करतात. तेव्हां ईश्वरासंबंधानें कोणतेंहि पुरुषवाचक सर्वनाम वापरण्यापूर्वीं ईश्वर पुरुष आहे कीं स्त्री आहे हें आपण ठरविलें पाहिजे.

**प्रश्न**–तर मग ईश्वर कोण आहे ?

**उत्तर**–ईश्वर पुरुष नाहीं व स्त्रीहि पण नाहीं. तें **एक गुह्य** आहे.

---

## VEDANTA AND PROPERTY.

## ( २ ) वेदान्त आणि मालमत्ता.

मार्ग भिन्न व्हावयाच्या वेळीं विचारलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरादाखल खालीलपैकीं बहुतेक भाग लिहिला होता.

* * * * * * * *

संपत्ति आणि मालमत्ता यांवरून लोकांचा दर्जा ठरविणें हें पायांतील निरनिराळ्या जोड्यांवरून मनुष्याचें वर्गीकरण करण्याइतकेंच अस्वाभाविक आहे.

यावरून 'राम' असें जाहीर करतो, कीं, मालमत्तेची कल्पना, गांठोडी, पिशव्यांचा हक्क, हींच आत्मसाक्षात्काराच्या आड येतात. एकाद्या

वस्तूवर आपली सत्ता असावी असें वाटतांक्षणींच आत्मवंचनरूपी पिशाच आपणांस पछाडतें. **'संन्यास, किंवा वाटल्यास त्याला सर्वस्वामित्व ह्मणा—याचें सत्याशीं 'ऐक्य करणें हाच शुद्ध वेदान्त होय.'** पूर्ण प्रजासत्तात्मकता, समता, बाह्य अधिकाराचें ओझें झुगारून देणें, द्रव्यसंग्रहाची वृत्ति टाकून देणें, सर्व विशेष हक्क समुद्रांत पार बुडवून टाकणें, आढ्यतेचा तिरस्कार करणें, आणि आपण क्षुद्र आहों अशा भावनेपासून होणारी मनाची चलबिचल झाडून टाकणें, हा सर्व स्थूल देहांतील वेदान्त होय. आणि वेदान्त हा मानसिक आणि आध्यात्मिक क्षेत्रांत हीच वृत्ति आणतो. देह, बुद्धि, लेख, वचनें, गृह, दारा, मानमरातब, इभ्रत इत्यादि सर्व गोष्टींवरील ममत्व सोडणें, हा वेदान्त होय. निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास सर्व तऱ्हेचीं बंधनें आणि कुंपणें नाहींशीं करणें, इतरांनां वगळण्याकरितां स्वतःला कोंडून घेण्याची रीत सोडून देणें, आणि ईश्वराप्रमाणें जगांतील प्रत्येक शक्ति, प्रत्येक परमाणु, नक्षत्र आणि वृक्ष यांवर सार्वभौमत्व मिळविणें, हा वेदान्त होय. सर्व जगाकडून वेदान्ताच्या अनुभवाचा मार्ग खुला करण्याचे व्यवस्थित प्रयत्न बरेचदां न कळत केले जात आहेत. सरतेशेवटीं संन्यासाची ध्वजा सर्व जगावर फडकत राहिली पाहिजे.

कांहीं वेदान्ती भक्तीच्या शासनाबरहुकूम सध्यांच वागत आहेत आणि कोठें कोठें पुरातन कालापासून ती ज्योत पेटत ठेविलेली आहे.

कल्पना करा, कीं, एक साधु गंगातटाकीं बसला आहे आणि त्याच्या प्रेमळ स्वभावामुळें निर्भय होऊन पशु, पक्षी, गुरें, ढोरें व मासे देखील त्याच्याजवळ निःशंकपणें येऊन त्याच्या हातांतून भाकरीचे तुकडे खातात. याच तत्त्वाचा कळस झालेलें एक उदाहरण मी सांगतों.

माझ्या माहितींतील एका स्वामीला एक जबर जखम झाली होती. वरील कातडें कृमि खात होते. कृमि मारण्याकरितां तो मलम लावीत नसे, आणि जेव्हां जेव्हां जखमेंतील लसेमधून तृप्त होऊन ते कृमि खालीं पडत तेव्हां तेव्हां तो त्यांनां हंसत हंसत जखमेवर पुनः ठेवी. हा क्षुद्र देह जगांतील प्रत्येक कीटकाचा आहे आणि हें विस्तीर्ण विश्व माझें आहे. हें विश्व

माझें शरीर आहे. हवा आणि जमीन हीं माझा पोषाख आणि पादत्राण आहेत.

**स्वामी याचा अर्थच नित्यदाता असा आहे.सत्याला धरून रहा, बाकी सर्व कांहीं जाऊंद्या.** खरा संन्यासी भिक्षा मागून आणलेलें अन्न देखील अधिक गरजू लोकांनां देऊन टाकतो, आणि खावयास कांहींच उरलें नाहीं ह्मणजे मोठ्या आनंदानें तो आपला देह कीडमुंगी, कृमि, माशा, सर्प इत्यादिकांनां देऊन टाकितो, आणि सर्वात्मरूपानें प्रतिगृहीत्याप्रमाणें त्यांचा तो उपभोगहि घेतो. मांसाची मेजवानी खात असतां, माशा आणि किडे या रूपानें तो सुख भोगीत असतो, व आपल्या शरीरांतील हाडें वाळत असतां, हवा आणि उष्णता या रूपानें तो सुख अनुभवीत असतो.

**साधारण दानधर्मः**—समाजाच्या एका भागाला पूर्णपणें पिळून काढून, त्याला दरिद्री करून, त्याला निकृष्ट स्थिति आणून मिळविलेल्या पैशांपैकीं एकादा क्षुल्लक अंश दानधर्मामध्यें परत देणें याला मोठें औदार्य असें नांव देण्याइतकी मिळकतीसंबंधीं समाजाची कल्पना दृढ होऊन बसली आहे. जणूं काय मरणाऱ्या मनुष्याच्या तोंडामध्यें पाण्याचे दोन थेंब घालून त्याच्या वेदना वाढविणें, हें एक सर्वोत्कृष्ट धर्मकृत्यच आहे! कांहींहि व्याज न घेणें हा मोठा उपकार समजला जातो. कारण व्याज ( संस्कृतामध्यें व्याज= लबाडी, ठकबाजी किंवा फसवेगिरी ) सर्वत्र प्रचलित आहे.

यूरोपांतील व अमेरिकेंतील दानधर्माची ही स्थिति आहे. हिंदुस्थानांतील धर्मबुद्धि उपासमार काढणाऱ्या गरीब बिचाऱ्यांची कांहींच काळजी घेत नाहीं; परंतु तीच धर्मबुद्धि आकंठ पोट भरलेल्या निरुद्योगी आळशी वेदमूर्तींनां भोजन दिल्यानें दात्यांनां एकदम स्वर्गाला नेऊन पोहोंचविते !

साधेपणालाच मी डौल आणीन. तुह्मांला सौंदर्य कशानें प्राप्त होतें? तुह्मांला संवृत करणाऱ्या ( झांकून टाकणाऱ्या ) वस्त्रांनीं, कीं, तुह्मांला विवृत करणाऱ्या लावण्यानें ? कपडे अगर कोणतेहि पदार्थ यांपासून सौंदर्य उसनें आणण्याची जरूरी नाहीं. **नैसर्गिक स्मित, आरोग्य आणि उल्हास धारण करा.**

वाटेल त्याला येऊन चोरी करूंद्या. तुमचें काय बिघडलें? तुह्मी आपला भाग सोडूं नका. तुह्मी सत्यरूप आहां, सत्य आहां. तुह्मी जड ऐश्वर्याकरितां झगडत नसून सत्याकरितां झगडत आहां. विश्वविद्यालयाच्या पदव्यांची आपणांला कांहीं गरज आहे काय? छे! **अंतिम पदवी** स्वतः स्वतःलाच अर्पण केली पाहिजे.

स्वप्नांतील वाघ मारण्यास स्वप्नांतील तरवार हवी आहे, हें खरें आहे; परंतु जागृत अवस्थेच्या दृष्टीनें पाहतां स्वप्नांतील वाघ व तरवार या दोन्हींमध्यें कांहीं अर्थ नसतो. अनुभविक शास्त्रें व कला यांची स्थिति हीच आहे. लौकिक ज्ञान या नात्यानें त्यांची कितीहि आवश्यकता असली, तरी ब्रह्मज्ञानामध्यें ( तुर्यावस्थेमध्यें ) त्यांची कांहींच मातब्बरी नसते. आत्मसाक्षात्कारामध्यें जो एक मोठा अडथळा येतो तो हा, कीं, विश्वविद्यालयाच्या पदव्या, सरटिफिकिटें, किताब, मान आणि इतर मानसिक संपत्ति, या बौद्धिक भांडवलाला लोक फाजील महत्त्व देतात. आत्मानुभूति झालेल्या मनुष्याला हें जग ह्मणजे लोकांनीं आपल्या मायिक कल्पनेनें उत्पन्न केलेली सृष्टिच, असें वाटतें. लोक स्वतः उत्पन्न केलेल्या वेड्याच्या इस्पितळांत राहून एकमेकांनां होस हो देऊन आपला भ्रम कायम ठेवितात. एखाद्या भारलेल्या मनुष्यानें कोरड्या जमिनीवर मनानें निर्माण केलेल्या सरोवराप्रमाणें जगांतील सर्व पदार्थ आहेत, आणि ते असे मायिक असल्यामुळें त्यांविषयींचें ज्ञानहि, ज्याविषयीं मोठमोठे विद्वान् लोक प्रतिष्ठा मिरवत असतात ते नुसती मायाच आहे. सर्व विश्व क्षणभंगुर असल्यामुळें त्याविषयींचें त्याचें ज्ञानहि तसेंच आहे. या दृश्य पसाऱ्याच्या मुळाशीं जाऊन पोहोंचलेल्या आत्मानुभवी पुरुषाला मोठमोठे अंतरालांतील गोल, नद्या, पर्वत, सूर्य, तारे हे कांहीं आश्चर्यकारक वाटत नाहींत; आणि ज्योतिषी, गणिती, वनस्पतिशास्त्रवेत्ते, भूगोलशास्त्रवेत्ते, प्राणिशास्त्रवेत्ते यांचें ज्ञान पोरखेळ, मजा, करमणूक याहून अधिक किंमतीचें आहे असेंहि त्याला वाटत नाहीं. व्यावहारिक पदार्थ बाळगणारे ( धनिक ) आणि व्यावहारिक पदार्थांविषयीं ज्ञान असणारे ( शास्त्रज्ञ ) हे त्या पदार्थांच्या

किंमतीइतकेच मायिक होत. आत्मसाक्षात्कार झालेल्या मनुष्यापुढें विद्वान्, तत्त्वज्ञानी किंवा प्रोफेसर यांनीं दाखविलेला राग किंवा अनुग्रह, टीका किंवा सूचना, यांचें कांहीं चालत नाहीं. साधारणतः विश्वविद्यालयें, प्रदर्शनें आणि जत्रा, हीं, तो मायिक भ्रम तसाच कायम ठेवण्याचीं साधनें आहेत. चर्चें, देवालयें, संमेलनें व सभा हीं सर्व जगाची मायिक निद्रा वाढविण्याचीं साधनें आहेत, असें बहुशः दिसून येतें. सूर्य जरी गोठून जाण्याइतका थंड झाला, अथवा चंद्र अतिशय तप्त झाला, दिव्याची ज्वाळा वर न जातां खालीं जाऊं लागली, किंवा सर्व दिशा कागदाच्या सुरळीप्रमाणें जरी गुंडाळतां आल्या, तरी जीवन्मुक्ताला त्याचें कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं.

एके काळीं ब्राह्मणांनीं जगावर राज्य चालविलें. क्षत्रियांच्या राज्यांचें देखील युग होऊन गेलें. सध्यां वैश्यांचें राज्य चालू आहे. यानंतर शूद्रांच्या श्रमांचें, अर्थात् सेवेचें महत्त्व वाढण्याचे दिवस येणार आहेत. मात्र संन्यस्तवृत्तीनें पावन झालेल्या शूद्रांच्या हातून हें होणार आहे.

यूरोप आणि अमेरिका येथील मजूरदार ( शूद्र ) लोक धार्मिक प्रतिबंध व वंशपरंपरा यांनीं जखडले गेलेले नाहींत, तरी त्यांची स्थिति चांगली नाहीं. हिंदुस्थानामध्यें जातिभेदानें सर्व लोकांच्या आत्मवंचनाला मदत केल्यानें हा दुष्परिणाम आणि हा अन्याय दुप्पट वाढला आहे. यानें संप होत नाहींत खरे, पण यानें सर्व राष्ट्र दुर्बळ, आणि मुक्या मेंढराहून अधिक भित्रें होतें.

आजपर्यंत किंवा हा कालपावेतों वेदान्त हा कांहीं शेलक्या लोकांची मालमत्ता होऊन राहिला होता. बहुशः तो बुद्धीच्या भूमिकेवरच राहिला होता. इतके दिवस गर्भरूपानें असलेलें हें मूल ( वेदान्त ) पृथ्वीच्या उदरांत ( हिमालयांत ) होतें; परंतु सरतेशेवटीं तें आतां पवित्र गंगाजीच्या रूपानें ब्राह्मण आणि शूद्र यांचा मळ सारखाच धुऊन काढीत, देवाला आणि मानवाला सारखेंच पावन करीत, सर्व अस्वाभाविक भेद पार नाहींसे करीत, खालीं खुल्या मैदानावर आलें आहे. विराटस्वरूपी मानवसमाज एकरूप असला पाहिजे हें क्वचित्‌च कळत आहे. ज्याप्रमाणें अन्नाचें सेवन दररोज आपण जाणूनबुजून स्वेच्छेनें करतों, परंतु त्या अन्नाचें पचन होणें व शरीराच्या निरनिराळ्या भागांना तें पोहोंचणें या क्रिया आपोआप

न कळत होतात, त्याचप्रमाणें ऐक्य आणि पूर्णता ( भक्ति आणि ईश्वरत्व ) यांमध्यें आपलें चित्त गढून गेलें असतां, सर्व भेद आणि अवश्य असलेले फेरबदल यांची व्यवस्था आपोआप लागेल.

हिंदुस्थानांतील राजेरजवाडे, धर्मगुरु, शूद्र आणि राज्यकर्ते लोक हो ! आणखी कांहीं वर्षांनीं काय स्थिति होईल याची तुह्मांला कल्पना तरी करतां येते काय ? तुह्मी वाटल्यास मला विचित्र ह्मणून हंसा, परंतु मला माझ्यासमोर असें दिसतें, कीं, हें सर्व जग स्वामींनीं ( संन्याशांनीं ) भरून गेलें आहे; पृथ्वीच्या पाठीवर ( जणूं काय ) देव संचार करीत आहेत; मनुष्यांतील, देहावरून ठरवलेले ( जाति ) भेद पार नाहींसे झाले आहेत; हिंदुस्थान, चीन, अमेरिका व इंग्लंड या देशांमधील भेदभाव पार नाहींसा झाला आहे; नवीन संघ तयार होत आहेत आणि पुनः ते देखील विरघळून जाऊन त्या जागीं नवीन उत्पन्न होणार आहेत !

हे स्वप्नशील लाडक्यांनों ! तुमच्या नेत्रांवरील पटल दूर सारा, ह्मणजे अत्युच्च संन्यासी अति नीच शूद्रांशीं मिळून काम करीत आहेत, असें दिसेल. पहा ! पहा ! ! त्या भिक्षापात्राचें एकदम खोरें आणि कुदळ झालें आहे ! संन्याशांचा आळस झडून गेला आहे, शूद्रकर्माला संन्यासाची उच्च पदवी प्राप्त झाली आहे, सर्वांमध्यें त्यागवृत्ति बाणली आहे, गणिकेची लज्जाविहीन धिटाई आणि ' रामा'चें पावित्र्य यांचा मिलाफ झाला आहे ! कोंकराचा कोमलपणा आणि सिंहाचें अचल धैर्य हीं संलग्न झालीं आहेत ! विरुद्ध स्थितींचें ऐक्य झालें आहे. आत्यंतिक विरोध गळाला आहे. विश्व एक कुटुंब बनलें आहे. पहा हें सर्व—दृष्टि फेंका आणि पहा !

आह्मांला अग्नि किंवा शस्त्रें यांची गरज लागणार काय ? नाहीं. पोलिसांची ? नाहीं. हें मनोराज्य आहे काय ? नव्हे. हा नुसता कल्पनाभ्रम ? नव्हे. हा काय समाजवाद आणि जातिवाद ( Socialism or communism.)आहे ? असेल. परंतु तो हिंदुस्थानांत मूळचाच आहे; नवीन नाहीं. वेदान्ताचा हा एक स्वाभाविक उपसिद्धान्त आहे. हिंदवासीयांनों ! जर तुह्मी

स्वतःला जाणाल आणि त्यागाचा अंगीकार कराल, तर तुमचा रोग कोठें राहील ? **आधि नष्ट झाली असतां व्याधि पळालीच पाहिजे !** लबाडीची जरूरी नाहीं, शंका किंवा भीति बाळगण्याचेंहि कारण नाहीं. भ्याड देवद्रोही लोकांनां वाटल्यास त्या मार्गाचा स्वीकार करूंद्या.

मी **'राम बादशहा'** आहें, आणि तुमचें हृदय माझें सिंहासन आहे. वेदांमधून जेव्हां मीं उपदेश केला, **कुरुक्षेत्र, येरुशलेम** आणि **मक्का** येथें जेव्हां मीं उपदेश केला, तेव्हां लोकांनीं त्याचा भलताच अर्थ केला. ह्मणून मी पुनः तोंड उघडीत आहें. माझा शब्द तोच तुमचा शब्द. तत्त्वमसि. जें जें कांहीं तुला दिसतें तें तूं आहेस !

तुमच्यापैकीं कांहीं लोक कपाळाला आठ्या घालीत आहेत, कांहींनं गरुडाच्या चोंचीप्रमाणें नाक मुरडलें आहे. तुह्मांला वाटेल तें करा, परंतु ईश्वरेच्छा घडून येणारच. कोणाचीहि शक्ति तिला थांबवूं शकणार नाहीं. कोणत्याहि राजाला, देवाला, दानवाला, तिच्या वाटेंत अडथळा आणतां येणार नाहीं. सत्याची प्रगति अपरिहार्य आहे. निराश होऊं नका. माझें डोकें तें तुमचें डोकें; वाटल्यास हें डोकें छाटून टाका. त्याच्या जागीं दुसरीं हजारों उद्भवतील.

**शम्स तब्रीझ** ( सुफी तत्त्वज्ञ ) हाच राग गातो होय ? पंजाबचे प्रेमळ **भोला** आणि पराक्रमी **गोपाळसिंग** यांनींहि तेंच गायन केलें आहे काय ? **येशूनें** आपल्या बोबड्या शब्दांनीं तेंच सत्य सांगितलें काय? **महंमदाला** तोच चंद्र दिसला काय ? मला त्याचें काय होय ? मला जेव्हां चंद्रदर्शन होतें, तेव्हां माझा ईद सण येतो. **पुरातन सत्य नेहमीं नूतन असतें.** तुह्मांला साक्षात्कार झाला ह्मणजे, तुमचा ईद सण आला. जेव्हां तुह्मांला आत्मज्ञान होतें, सत्यस्वरूप ईश्वराचें ज्ञान होतें, तेव्हां अज्ञानामुळें तुह्मांला मोठे वीर किंवा थोर पुरुष वाटत असलेले सर्व साधुसंत तत्क्षणीं तुमच्यांत लीन होतात.

---

## REFORMERS.

## ३ सुधारक.

**त्यजुनियां अवनी उडसी वरी,**
**दिससि अंबरिं अग्निशिखेपरी;**
**गगनमार्गेहि आक्रमिसी जवें,**
**करिसि गानविहार नवे नवे.**

:—आंग्लकवि शेले.

### पवित्र छाया.

अतिशय प्राचीन काळीं एक साधु होऊन गेला. तो इतका पवित्र होता, पाकीं, मानवी प्राणी इतका शुद्ध कसा असूं शकतो हें पहाण्याकरितां देवदूत स्वर्गांतून खालीं आले. तो नेहमीं आपलें नित्यकर्म करीत असे, आणि ज्याप्रमाणें तारे व पुष्पें नकळत प्रकाश व सुगंध पसरतात, त्याप्रमाणें सद्गुणाचा प्रसार करी.

दोनच शब्दांनीं त्याची दिनचर्या सांगतां येईल. **तो देई व साही. तो दान करी व क्षमा करी!** परंतु हे शब्द त्याच्या तोंडावाटे कधींहि बाहेर आले नाहींत, ते (शब्द) त्याचें औत्सुक्यपूर्ण स्मित, दया, क्षमा आणि दान यांमध्यें व्यक्त होत असत.

देवदूत ईश्वराला ह्मणाले "प्रभो, याला कांहीं सिद्धि दे."

ईश्वरानें सांगितलें "ठीक आहे, त्याला काय हवें आहे तें विचारा."

देवदूतांनीं साधूला पुसलें "तुझ्या हस्तस्पर्शानें रोगी बरे व्हावे अशी सिद्धि तुला हवी आहे काय ?"

साधु ह्मणाला "नको, ती गोष्ट ईश्वरालाच करूंद्या."

"पाप्यांचा उद्धार करण्याची आणि कुमार्गगामी लोकांनां सन्मार्गावर आणण्याची शक्ति हवी का ?"

"नको, तें काम देवदूतांचें आहे. मला भक्ति करावयाची आहे, मला कोणाचा उद्धार करावयाचा नाहीं."

" शांतीचा पुतळा होऊन आपल्याला सद्गुणांच्या प्रभावानें सर्व लोकांनां आकर्षून ईश्वराचें महत्त्व वाढविणें हें हवें आहे काय ?"

"नको, लोकांनां जर मीं आकर्षून घेतलें तर ते देवाला पारखे होतील. स्वतःचें महत्त्व वाढविण्याचीं ईश्वराजवळ अन्य साधनें आहेत."

" मग तुझी इच्छा तरी काय आहे ?"

साधु स्मितवदन करून ह्मणाला "माझी इच्छा काय असणार ? **ईश्वराची माझ्यावर पूर्ण कृपा असूंद्या. त्यांत सर्व कांहीं आलें नाहीं काय?"**

पण देवदूतांनीं आग्रह केला, कीं, "तरी तूं वर मागितलाच पाहिजेस. नाहीं तर एकादी सिद्धि तुजवर बळेंच लादण्यांत येईल."

साधु ह्मणाला "बरें आहे. **मला नकळत माझ्या हातून पुष्कळ सत्कृत्यें व्हावींत."**

देवदूत बरेच घोटाळ्यांत पडले. सर्वांनीं विचार [illegible] व पुढील युक्ति योजिली. जेव्हां जेव्हां त्या साधूची छाया त्याच्या पाठीमागें किंवा बाजूला त्याला न दिसेशी पडेल, तेव्हां तेव्हां तीमध्यें रोग बरे करण्याचा, पीडा हरण करण्याचा, आणि दुःखें नाहींशीं करण्याचा गुण असावा, असें त्यांनीं ठरविलें.

आणि त्याप्रमाणेंच घडून आलें. जेव्हां जेव्हां [illegible] आपल्या वाटेनें जाई, तेव्हां तेव्हां त्याच्या पाठीमागें अगर [illegible]जूला पडलेल्या त्या छायेनें रुक्ष मार्ग हिरवेगार होत, वठलेल्या झाडांनां पालवी फुटे, आटून गेलेल्या झऱ्यांनां पुनः स्वच्छ पाणी येई, निस्तेज मुलांच्या तोंडावर टवटवी दिसे आणि दुर्दैवी आयांनां आनंद होई.

परंतु तारे व पुष्पें ज्याप्रमाणें न कळत प्रकाश व सुगंध पसरतात, त्याप्रमाणें तो साधु सद्गुणांचा प्रसार करीत आप[illegible] नित्यकर्में करीत असे. त्याच्या विनयाला मान देऊन लोक निमूटपणें [illegible]च्या मागोमाग जात आणि त्याच्या या शक्तीबद्दल कधींहि त्याच्यापाशीं [illegible]लत नसत. हळुहळू लोकांनीं त्याचें नांव देखील विसरले आणि '**पवित्र छा**[illegible]' असेंच त्याचें नांव पडलेलें [illegible]

———— पण [illegible]पत्ति,

सत्य तुह्मांमध्यें इतकें बाणूंद्या, कीं, त्यकें [illegible] महत्त्वापुढें वित्त ही जड व्यक्ति यांचा दिखाऊपणा पार उडून गेला [illegible]हिजे. जेव्हां सत्याशीं

तादात्म्य यथार्थ व पूर्ण होईल, तेव्हां मत्सराचे बाण तुह्मांला विद्ध करूं शकणार नाहींत. गेंड्याला आपलें शिंग कोठें खुपसावें हें समजणार नाहीं, व्याघ्राला आपलीं तीक्ष्ण नखें रोंत्रावयास कोठेंच वाव सांपडणार नाहीं; खड्गाला घुसण्यास कोठेंच जागा राहणार नाहीं, आणि तुमच्या देहावर तोफांच्या गोळ्यांचा पाऊस पडत असला तरी ' तुह्मांला ' त्याचा स्पर्शहि होणार नाहीं !

सत्याचाच स्नेह संपादा. जरी एकटें राहणें भाग पडलें, तरी सत्याला चिकटून रहा; सत्याच्या बाजूनें लढत मरा. सत्यरूपी जीवनाच्या स्वर्गामध्यें जर तुह्मी एकाकी झालां, तर सत्यनिष्ठारूपी सूर्य तुह्मांला पुरून उरेसा सोबती आहे. तुमचे जीवंत विचार ग्रहण करून पुष्कळ सोबती तुह्मांभोंवतीं जमतील, आणि अशा रीतीनें आलेला संघ स्वाभाविक होईल. आपलें तत्त्व सोडून संघ करण्याच्या भरीस पडूं नका. मला लोकांचीं मतें बदलावयाचीं नाहींत व अनुयायी मिळवावयाचे नाहींत. मला सत्याला अनुसरून वर्तावयाचें आहे. सत्याला संरक्षण आणि रक्षक यांची अपेक्षा नाहीं. सूर्यप्रकाशाला कधीं पुरस्कर्ते किंवा दूत यांची गरज पडते काय ? मी सत्याचा प्रसार करीत नाहीं, सत्यच माझा व स्वतःचा प्रसार करीत आहे.

उत्क्रांतितत्त्ववादी ' जुळवून घेणें ' ( Adaptation ) या मुद्यावर ह्मणतात, कीं, जर एकाद्याला योग्य ती तडजोड करण्याची खुबी साधली, तर त्याला या जगांत दिवस काढणें कांहीं कठिण नाहीं. असंख्य प्राणी, वनस्पति आणि मनुष्यें यांना ही खुबी साधली आहे, आणि ह्मणूनच ते आणि त्यांचे वंशज यांची जीवनकलहामध्यें सरशीच होत आहे. [illegible]रें आहे. ज्याला जगण्याची कला अवगत आहे तो ऋषिच होय. त्याचें आणि जगाशीं सख्य असतें त्यामुळें सर्व जगाचें त्याच्याशीं पटलेंच पाहिजे. वासनामय क्षुद्र अहंकाराचा त्याग करून पूर्णाशीं ज्याचें ऐक्य कोणाचें आहे, अशा मनुष्याच्या ठिकाणीं संकटें टिकतील तरी कशीं ? 'परार्थवादी' " जो जीवनकलहामध्यें [illegible] होतो, या शास्त्रीय तत्त्वाचा लोकांकडून आकर्षून [illegible] होण्याचा बराच संभव आहे.

परार्थवाद ह्मणजे काय? लोक कशाची अपेक्षा करितात, त्यांना काय आवडतें, त्यांची इच्छा काय आहे, त्यांनां काय पसंत आहे, हें नेहमीं शोधीत राहणें असा याचा अर्थ आहे काय? 'योग्य ती तडजोड करण्याची खुबी,' याचा अर्थ लोकच्छंदानुवर्तन असा होतो काय? किंवा 'कर्म करण्याचा हव्यास' हाच सेवाधर्म आहे काय?

नव्हे. **खरा स्वार्थ ह्मणजे खरा परार्थ (परमार्थ) होय.** उल्हास आणि प्रेम यांच्याशीं ज्याची एकतानता झाली आहे, आणि जो स्वतःमध्यें प्रगट झालेलें सत्य तडजोड किंवा ऐकमत्य यांच्या नांवाखालीं वेडेंवांकडें न करितां स्पष्टपणें जाहीर करतो, तोच सरतेशेवटीं विजय मिळवितो.

ज्याप्रमाणें शेतामध्यें एक कलिंगड पिकावयास आलें असतां त्याच ऋतूच्या परिणामामुळें उगवणारीं दुसरीं हजारों कलिंगडें पिकावयास आलेलीं असतात, त्याचप्रमाणें जेव्हां एकादी सकृद्दर्शनीं नूतन आणि विचित्र दिसणारी कल्पना तुमच्या मनामध्यें येतें तेव्हां पक्कें समजा, कीं, जरी तीच कल्पना स्पष्टपणें दुसऱ्याच्या मनांत आली नसली, तरी हजारों लोकांचे विचार त्याच दिशेनें वाहत असले पाहिजेत. जेव्हां वसंतऋतूमध्यें एका झाडावर एकादें पान, एकादी पाकळी, अथवा एकादा अंकुर फुटूं लागतो, जेव्हां एकादें रोपटें भूमींतून वर येतें, तेव्हां त्याच्यासारखींच हजारों तयार होत असतात. धार्मिक, नैतिक किंवा बौद्धिक नूतन जन्म, मातेच्या उदरांतील अर्भकाप्रमाणें पवित्र होय. तो छपवून ठेवणें ह्मणजे परमात्म्याशीं द्रोह करणें होय.

तुह्मांला आश्चर्य वाटेल, पण स्वतःशीं इमानानें वागण्यांत तुह्मी सर्वांशीं इमानानें वागतां. केवळ सत्याकरितां केलेली तडजोड, केलेला त्याग, केलेलें ऐकमत्य निष्पाप आहे. व्यक्ति, दिखाऊपणा, भपका, पदव्या, संपत्ति, विद्वत्ता आणि आचार, यांविषयीं आदर किंवा पूज्यभाव बाळगणें ही जड मूर्तिपूजा होय. व्यवहारज्ञान ह्मणजे अज्ञानाचें दुसरें नांव होय.

नक्षत्रें करिती आत्मप्रकाशन। निजानंदें जाण सर्वकाळ ॥ १ ॥
निजानंदें सिंधु उठवी लहरी। चंद्रिकेमाझारी क्रीडती ज्या ॥ २ ॥
क्रीडतात योगारूढ होऊनीयां। झुरती न वायां कशानेंही ॥ ३ ॥
अवीट लाधली न ज्या आत्मतृप्ति। तळमळ अति तया होई ॥ ४ ॥
आत्मसत्तेनें ते वर्तती सुखेंची। स्थिति इतरांची न पाहती ॥ ५ ॥
निजकार्यीं सर्व स्वशक्ति वेंचिती। तेंचि ते पावती मोठेपण ॥ ६ ॥
आत्मरूप व्हाया करीं बा निश्चय। 'तत्त्वमसि' ध्येय घ्यावें सदा ॥७॥
शोकसागरासी तरे आत्मविद। तत्त्वाची या याद राखीं बापा ॥८॥
*देह जावो अथवा राहो। सत्या ठायीं माझा भावो ॥ १ ॥
असो पाप अनिवार। येवो त्यांत दुःख फार ॥ २ ॥
मनोदेवतेची ग्वाही। परि न सोडीं मी कदाही ॥ ३ ॥

हे सत्या, तुजवर माझें प्रेम आहे. प्रेमा, मी नेहमीं तुजशीं खरेपणानें वागतों. कार्यकारी लोकांनां आपल्या हातून कांहीं 'घडावें', आपण कांहीं 'दृश्य' कार्य साधावें, आपल्या मतानुयायी व भगत लोकांची संख्या अधिक दिसावी, अशी ही लागलेली तळमळ ह्मणजे एक प्रचंड विघातक शक्ति होय. दृश्य फल आणि आंकड्यांचा पुरावा याविषयींच्या काळजीनेंच सगळा घोंटाळा होतो. एकाद्या प्रे मध्यें सर्व राष्ट्राला बाधण्याइतकें विष असूं शकेल, पण या गोष्टीनें त्या शयाचें महत्त्व ठरतें काय? पुष्कळदां कांहीं पंथांचा प्रसार यामुळेंच हो तो.

आपण लाविलेलीं झाडें आपण खावीं अशी पुष्कळ आपल्या देखत फळाला येऊन त्यांचीं फळें अभाव आणि आप्पलपोटेप लोकांची आतुरता दिसते. यावरून श्रद्धेचा साधुसंतांनीं आपल्या देहाचा व्यक्त होतो. येशू ख्रिस्त, नानक इत्यादि कैक पिढ्यानंतर फळें आलीं ज्या झाडांकरितां खत केलें, त्या झाडांनां

---

*सत्यापरता नाहीं धर्म। सत्य ते परब्रह्म। सत्यापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्ठत॥१॥
सत्य सन्मार्गीं वर्तता नर। त्याचा कैवारी जगदीश्वर। त्याचें कार्य शारंगधर। आपण अंगें संपादी ॥ ३ ॥

—मुक्तेश्वर.

कांहीं वक्त्यांनां धूमकेतूप्रमाणें आपल्या पाठीमागें एक भपकेदार शेंपूट असावें, अशी हांव असते; परंतु हें अस्पष्ट शेंपूट प्रचंड व विस्तीर्ण असून देखील त्याला वजन कांहींच नसतें.

आतषबाजीचा प्रकाश पाहण्यास लोकांच्या झुंडींच्या झुंडी येतात; परंतु ती मौज संपली ह्मणजे कशाचाहि मागमूस मागें रहात नाहीं, आणि या दारूकामाच्या उजेडानें कधीं गडबड्या मनुष्याला सुधारतां आलें आहे काय? स्थिर व निरंतरचा प्रकाश—मग तो लहानशा मेणबत्तीचा कां असेना —ह्याच नेहमीं उपयोगीं पडतो.

स्वतःचा गुरुत्वमध्य स्वतःबाहेर टाकूं नका. **शुद्ध प्रेम आणि स्वार्थ-त्याग हीं शीलाचीं प्रधान अंगें होत.** परहित ही नुसती आगंतुक गोष्ट आहे.

**अंतरिक्षीं फिरे पृथ्वी निरंतर। दृष्टि सूर्यावर ठेवूनीयां ॥ १ ॥**
**नीलनभामाजी दिव्य प्रकाशित। रवीविहित किंवा राही ॥ २ ॥**
**वादळांनीं ग्रस्त झाली तरी चाले। गति न बदले अणुमात्र ॥ ३ ॥**
**सूर्याच्या प्रकाशीं किंवा झंझावातीं। पृथ्वी समगति क्रमी मार्ग ॥४॥**
**पार्थिवा मानवा तुज असे काल। ध्येय, गति, बल, जाई पुढें ॥५॥**

एकाद्या कार्य करणाऱ्या मनुष्यामध्यें एका बाबतींत कांहीं दोष आहे, ह्मणून दुसऱ्या बाबतींत त्याची सेवा घ्यावयाची नाहीं, अशी हिंदुस्थानांत प्रवृत्ति दिसून येते. उदाहरणार्थ, एकाद्या उपदेशकाचे खाद्यपेयादिकां-विषयींचे व्यवहार मान्य नाहींत ह्मणून त्याच्या उपदेशाचें ग्रहण करावयाचें नाहीं. अशा योगानें देशामध्यें जुटीनें काम करणें जवळ जवळ अशक्य झालें आहे. ही प्रवृत्ति ह्मणजे, घोड्याप्रमाणें बसून जावयास उपयोगी नाहीं ह्मणून गाय व तिचें दूध टाकून देणें, व दूध देत नाहीं ह्मणुन घोडीवर बसावयाचें सोडून देणें यासारखें होय!

सृष्टिशास्त्रवेत्त्यांच्या असें स्पष्ट अनुभवाला आलें आहे, कीं, जलद धावणारांनां आयुष्यरूपी शर्यत जिंकतां येत नाहीं. त्याचप्रमाणें बलिष्ठांनां लढाईत जय मिळतोच असें नाहीं. तर ज्यांनां एकजुटीनें काम करितां येतें, त्यांनांच यश येतें. आधीं एकजूट—मग चढाओढ. मनुष्यामध्यें एकजूट कशी साधतां येईल हें पाहिलें पाहिजे. नुसती जूट करण्याकरितां केलेली जूट खात्रीनें फसणार. शरीरासारखे सेंद्रिय पदार्थ ( organisms ) आपोआप बनतात. परस्परसाहाय्य, जुटीनें काम करण्याची प्रवृत्ति आणि समान कार्य, यांच्यापासून सर्व शास्त्रें निष्पन्न होतात; परंतु कोणत्याहि दोन शास्त्रज्ञांनां एकीकडे राहण्याची जरूरी नाहीं. एकाच सत्याशीं प्रामाणिकपणानें वागण्यांतच शास्त्रज्ञांची एक जूट होते. प्रेम, क्रीडा, सरलता हा लहान मुलांचा साधारण धर्म, सर्व जगभर आहे. हें ऐक्य प्रत्येक मूल स्वभावतः स्वतःशीं प्रामाणिकपणें वागतें ह्मणून प्राप्त होतें. बरेचदां दुसऱ्याकडून बरें ह्मणवून घेण्याच्या इच्छेनें आपलें शील बिघडत असतें; आपल्या कृत्रिम व दांभिक समाजाचा तर हा पायाच आहे. ज्यांची रुचि विचित्र व बिघडलेली आहे, अशांनां खूष करण्याच्या इच्छेमुळें, मनुष्य एरवीं ज्या गोष्टी करणार नाहीं, त्या त्याला कराव्या लागतात. मद्यपानाचें व्यसन बहुधा संगदोषानें आणि मद्यपी मित्रांच्या भिडेमुळें जडतें.

सत्यव्रत हेंच काय तें खरें हित आहे. सत्याचरण करणें हें एकच सत्कर्म होय. सत्य तुह्मांला बल देतें, सत्य तुह्मांला स्वतंत्र करितें. हाच मान होय. शक्ति ह्मणजे कांहीं सत्य नव्हे, तर जें न्याय्य आहे तें चिरकाल टिकून योग्य ठरतें; आणि चिरकाल टिकणें ही शक्ति होय. जें दुर्बल असतें तें नाश पावतें. ईश्वर ज्या गोष्टी आह्मांला करूं देतो त्यांवरून आपणांला ईश्वराची इच्छा समजून येते. सृष्टिरूपी ग्रंथामध्यें ईश्वरानें स्वहस्तानें स्पष्ट लिहिलें आहे, कीं, **दौर्बल्याव्यतिरिक्त दुसरें पाप नाहीं आणि दौर्बल्य अज्ञानापासून उत्पन्न होतें.**

जें चिरकाल टिकतें व वाढतें तें ईश्वराच्या इच्छेप्रमाणें असलेंच पाहिजे. नियम ह्मणजे वस्तुस्थितीपासून काढलेला सर्वसाधारण सिद्धान्त. सृष्टिरूपी धर्मग्रंथ आपणांला खालील नियम सांगतो: "जें कांहीं सत्य आहे तें आज नाहीं उद्यां बलाढ्य होऊन योग्य ठरणारच." सत्य अति चिवट असतें. स्पर्श झाल्याबरोबर पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें तें फुटून जाणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर सारा दिवस फूटबॉलप्रमाणें तुह्मी त्याला लाथाळा, तरी पण तें संध्याकाळीं चांगलें, वाटोळें व शाबूत राहील. ईश्वर सर्व जगावर राज्य करीत आहे, आणि शक्तिमान्–नव्हे सर्वशक्तिमान् सत्य हेंच सर्वांनां जिंकणार आहे. सत्यानें विस्मित होऊं नका किंवा त्याला भिऊं नका. 'अहं ब्रह्मास्मि' (मी परमात्मा आहें) असें अंतःकरणापासून ह्मणा.

जो पक्ष अधिक सत्यनिष्ठा दाखवितो, अनंत शक्तीशीं एक होऊन काम करितो, व सर्वशक्तिमान् परमेश्वराचें स्वरूप व्यक्त करितो, त्याच पक्षाला यश आणि वर्चस्व प्राप्त होतें. त्याच्या भावनेनें (ज्ञानानें) सामर्थ्य आणि यश मिळतें. देहाभिमानानें, मग तो मी ब्राह्मण आहें असा अभिमान असो, किंवा मी संन्यासी आहें असा अभिमान असो, तुह्मी चर्मकार किंवा चांभार (शूद्र) बनतां. कातड्यांमध्यें व्यवहार करणारी ही चांडाळवृत्ति टाकून देण्यासंबंधीं श्रुतीनें तुह्मांला पुनः पुनः बजावून सांगितलें आहे.

सत्यनिष्ठ, स्वार्थत्यागी मनुष्य चांभाराच्या धंद्यामध्यें देखील संन्यासवृत्ति आणूं शकतो. त्या धंद्यामुळेंच, किंबहुना कोणत्याहि नुसत्या धंद्यामुळें तुह्मी शूद्र होत नाहीं. बायका, मुलें आणि शूद्रलोक हीं राष्ट्रवृक्षाचीं मुळें आहेत. या सर्वांचें शिक्षण आणि संगोपन यांकडे हिंदुस्थानामध्यें कोणीच पहात नाहीं. उच्च ह्मटले जाणारे वर्ग फार तर या राष्ट्रवृक्षांचीं फळें ह्मणतां येतील.

फळें वृक्षावर राहण्याकरितां आह्मीं आमचा सर्व वेळ दवडतां नये. **मुळांकडे लक्ष्य द्या. त्यांनां योग्य खत व पाणी यांचा पुरवठा करा.**

लाडक्या सुधारकांनो ! श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें वागल्यानें तुह्मांला तात्पुरतें महत्त्व प्राप्त होईल; परंतु गरीब लोक, स्त्रिया व मुलें यांच्याच हातून सत्याची प्रगति होणार आहे; इतरांच्या हातून नाहीं. इतिहास तर असेंच सांगतो. उपदेशकांची अशी प्रवृत्ति दिसून येते, कीं, सरकारी अंमलदार वगैरे बडेबडे लोक आपल्या व्याख्यानाला आले असतां ते आपणाला धन्य मानून घेतात. ही गोष्ट खरी आहे, कीं, सध्यांच्या काळीं सरकारी नोकर इतर लोकांहून अधिक हुशार असतात व ह्मणून त्यांचा कांहीं थोडा उपयोग होईल; परंतु राष्टोन्नतीचें कार्य त्यांच्या हातून होण्याची आशा बाळगूं नये. ज्यांच्यामधील जोम नित्याच्या खरडेघाशीनें पार पिळून निघाला आहे, आणि अतिश्रमानें ज्यांची शक्ति क्षीण झालेली आहे, अशा या मंडळीला त्यांचा मानमान्यतेचा तुरुंग आणि त्यांची उच्च अगतिक स्थिति यांच्या श्रेष्ठ पदावर बसूं द्या ! स्वतःच्या निढळाच्या घामानें मिळविलेलीं श्रवणमधुर स्तुतिस्तोत्रें, गारुं करून टाकणारीं अंगाई गीतें आणि आपल्या अनुचरांकडून मिळणारा मान यांचा त्यांनां यथेच्छ उपभोग घेऊं द्या, परंतु **खरा राष्ट्रोद्धार राष्ट्राच्या गरीब मूळांपासून होणार आहे.**

हिंदुस्थानांतील अनेक चळवळी यशस्वी न होण्याचें मुख्य कारण ह्मणजे कार्यकारी लोकांनीं आपली सर्व शक्ति फळांनां आणि पानांनां ( वड्या शिष्ट लोकांनां ) पाणी घालण्यांत खर्च केली आहे. बिचाऱ्या शूद्रांनां प्रकाश व चैतन्य हवें आहे. गोरगरीबांची–ज्यांनां शून्यवत् गणलें जातें अशांची काळजी घेतल्याबद्दल लोक तुह्मांला दूषण देतील; परंतु हें लक्ष्यांत ठेवा, कीं, शून्याच्या अंगीं देखील, तें एक या संख्यावाचक आंकड्याच्या उजव्या बाजूकडे ठेविलें असतां, त्याची किंमत दसपटीनें वाढविण्याची शक्ति आहे. तुमचें एकत्व ( ममत्व 'I' ) याचा आंकडे किंवा शून्यें यांच्याशीं योग्य मिलाफ होऊं द्या. 'तत्त्वमसि' तें तूं आहेस.

कांहीं ह्मणतात, बायका, मुलें व शूद्र हीं ब्रह्मविद्येचीं अधिकारी नाहींत. या मतामुळेंच वेदान्त हा एक मोठा पण संदिग्ध विधि ( formula ) होऊन बसला आहे. नुसता एक अनुभवशून्य कोरडा विधि.

जर प्रत्येक मूल सूर्याचा प्रकाश आणि हवा ही घेण्यास योग्य आहे, तर आध्यात्मिक प्रकाश व हवा हीं घेण्यास कां योग्य असूं नये ? ही ब्रह्मविद्या कोणापासून झांकून कां ठेवा ? अज्ञान आणि दौर्बल्य यांचीं तळघरें आणि बंद केलेल्या कोठड्या जमीनदोस्त करा. ईश्वरी प्रकाश आणि ईश्वरी हवा हीं सर्वांनां मिळून ते धन्य होऊंद्या.

विधिनिषेधाच्या गोणी लोकांवर सक्तीनें लादल्यामुळें आध्यात्मिक दारिद्य उत्पन्न झालें आहे. उतावळे नीत्युपदेशक स्वतःकरितां व इतरांकरितां तत्त्वाचें ( सत्याचें ) ज्ञान मिळविण्याचें सोडून देऊन सद्गुणांचे बाह्य नियम लोकांवर लादून आपल्या उद्दिष्टाची हानि करून घेत आहेत. प्रत्येक जण आपल्या अनुभवानुरूप वागतो. डोळ्यांसमोर विहीर पाहून कोणीहि तींत उडी मारणार नाहीं. आपल्या सर्व विधिनिषेधात्मक आज्ञा मनुष्यांतील पशुवृत्तींनां लागू पडतात. जेव्हां आपण एका मुलाला किंवा मुलीला तूं हें काम करूं नको असें सांगतों, तेव्हां त्याची किंवा तिची बुद्धि उलट खाते ( बंड करिते ). कारण, या आज्ञेनें बुद्धीचा अपमान व अवहेलना केल्यासारखें होतें. आपल्या आज्ञा ह्मणजे स्वाराखालून ( बुद्धीच्या ताब्यांतून ) घोड्याला ( पशुवृत्तींला ) बुजवून लावणेंच होय. मुलांवर हक्क गाजविण्याचा प्रयत्न करण्यानें अथवा त्यांच्या स्वतःच्या बुद्धिव्यतिरिक्त इतर गोष्टींचा त्यांच्यावर ताबा बसविण्याचा प्रयत्न करण्यानें, मुलांनां आपण बंडखोर बनवितों. बळजबरीच्या अंमलानें जेथें बंडखोरपणा उत्पन्न होत नाहीं, तेथें क्षय आणि मरण हीं येतात. मानसशास्त्राचा असा एक नियम आहे, कीं, **साधारण मनुष्याला एकादी सूचना जितकी मोघम द्यावी, तितका तिचा परिणाम अधिक होतो.** दुसऱ्यावर नीतिपर उपदेश बळेंच लादला असतां साधारण मनुष्याची प्रवृत्ति विरुद्ध वागण्याकडेच होते. कोणत्याहि गोष्टीला प्रतिबंध आल्यानें अथवा दोष दिल्यानें त्याविषयींची जिज्ञासा अधिकच वाढते. उ

चाल अशी पडून गेली आहे, कीं, लोक देवाला देखील रिकामें सोडीत नाहींत. त्यानें आपल्याला आपली दररोजची किंवा महिन्याची भाकर देऊन आपली सेवा करावी, असें त्यांनां वाटत असतें. सिद्धीच्या मागें लागलेला एक इसम सिद्धींची देवघेव करणाऱ्या एका फकिराजवळ गेला आणि त्यानें त्या पिराजवळ आपली इष्ट कामना सिद्ध करून देणारा एक ‘ दिव्य ’ मंत्र सांगावा अशी विनंति केली. फकिरानें त्याला मंत्र सांगितला पण त्याची फलप्राप्ति होण्याकरितां एक विचित्र अट घातली. ती ही, कीं, “ सांगितलेल्या मुदतीपर्यंत तो मंत्र ह्मणत असतां माकडाची कल्पना डोक्यांत येतां कामा नये. ” गरीब बिचारा दुसरे दिवशीं गुरूकडे कुरकुरत येऊन ह्मणाला “ महाराज, जर तुह्मीं मला मुद्दाम बजावलें नसतें, तर माकडाची कल्पना माझ्या डोक्यांत आली देखील नसती; परंतु आतां ही माकडाची कल्पना माकडाच्या पकडीप्रमाणें मला चिकटून राहिली आहे, आणि ती कांहींकेल्या जात नाहीं !” अशा रीतीनें जर आमच्या सभाग्य उपदेशकांनीं वरचे[illegible]र पाप व दुराचार यांचा प्रत्यक्ष निषेध करून तीं लोकांच्या चित्तांत जा[illegible] ठेविलीं नसतीं, तर तीं या जगांतून केव्हांच नाहींशीं झालीं असतीं. भव्य नंदनवनांतील विचाऱ्या ॲडमला, जर बायबलांतील परमेश्वरानें अमुक एक ‘निषिद्ध’ झाडाचें फळ खावयाचें नाहीं असें सांगितलें नसतें, तर एका कोपऱ्यांत असलेल्या त्या झाडाचें फळ मुद्दाम चाखून पाहण्याची कल्पनाहि त्याच्या मनांत आली नसती.

सुधारणेच्या नांवाखालीं आपण आपले हुकूम विकोपाला नेऊन पोहोंचवितों. “ तुझें नांव काय ?” असें एका मुलाला विचारतां तें ह्मणालें “आई नेहमीं मला ह्मणते ‘करूं नको’ खबरदार ( don’t ). तेव्हां ‘करूं नको’ हेंच माझें नांव असलें पाहिजे.” त्याचप्रमाणें नेमनिष्ठांच्या भाराखालीं लोकांनीं आपला आत्मा गमाविला आहे, आणि आपण नुसतें नामरूप आहों अशी ते कल्पना करितात.

हिंदुस्थानामध्यें व्यावहारिक वेदान्त, पुस्तकांच्या मार्फत नव्हे तर आचरणांत सुरू केला पाहिजे. वेदान्त ह्मणजे शारीरिक, मानसिक आणि

**आध्यात्मिक आरोग्य होय.** अन्नाशयांनां निरोगी केलें असतां, पडसें, खोकला, ताप, मधुमेह इत्यादि शारीरिक व्याधि, एवढेंच नव्हे, तर मत्सर आळस, तापटपणा, घाणेरडे विचार, दौर्बल्य इत्यादि अपवित्रतेचे प्रकारहि नाहींसे होतात.

नियतीचें यथार्थ ज्ञान ह्मणजेच खरें स्वातंत्र्य होय. मीच ती नियति आहें आणि यामुळेंच मी मुक्त आहें. मला जाणल्यानेंच खरें ज्ञान प्राप्त होतें. तुमच्यामध्यें मी नसलों तर तुमचें आरोग्य ह्मणजे गलिच्छ रोगाचें स्वच्छ आवरण होय. **ऐक्य बाणणें ह्मणजेच आरोग्य होय.** ऐक्यरूप व्हा, जगांतील कोणत्याहि वस्तूंच्या महत्त्वानें दडपून जाऊं नका. तुह्मांला जें कांहीं सांगावयाचें असेल ते सांगा. जें कांहीं सांगणें योग्य वाटत असेल तेवढेंच सांगू नका. आयुष्यांतील कोडीं सुटल्याशिवाय राहणार नाहींत; कारण आयुष्य ह्मणजे कोड्यांचा उलगडा होय. आरोग्याला पूर्ण वाव असूंद्या. कोणताहि हेतु मनांत बाळगूं नका. एकदम त्याग करावयास योग्य अशी अयोग्य मालमत्ता ह्मणजे आपले हेतु होत. सरळ पहा, ज्याप्रमाणें तुह्मी वृक्ष, नद्या यांकडे लहानमुलां-सारखे निर्भयपणें पहातां, त्याप्रमाणें कोणाहि मनुष्याकडे पहा, व त्यामध्यें परकीयपणाची भावना न धरतां तेथें स्वतःलाच पहा. अनुभवानेंच ठेंच खाऊन शहाणे होणारे जे आह्मी थोर, जाणते, प्रौढ लोक, त्या आह्मांला जीविताचे खरे नियम जितके कळतात, त्यापेक्षां मुलांनां ते अधिक कळतात. खाजकुली देखील जर तुह्मीं न डगमगतां एकदम हातांत गच्च धरली, तर ती तुह्मांला कांहीं इजा करित नाहीं; परंतु तेंच तुह्मीं तिला नुसता स्पर्श मात्र केला, तर तुमच्या कातड्याची आग आग होते. असे कांहीं कर्तृत्ववान् लोक आहेत, कीं, त्यांच्या खासगी संभाषणांमध्यें गुप्त हेरांची आणि डिटेक्टिव्हांची पोक्त भीति दिसून येते. मी असें ह्मणण्याचें धार्ष्ट्य करितों, कीं, हे सन्माननीय सुधारक स्वतःच चोर आहेत! लाडक्या गुप्त हेरांनों आणि प्रिय डिटेक्टिव्हांनों! या, या, तुमचें पूर्ण स्वागत असो. मला तुह्मी पाहिजे आहां. मी तुह्मांला पूर्वीच्या पगाराहून (पूर्वी कांहीं मिळत असल्यास) अनंतपटीनें देईन. कृपा करून

मला शोधून काढा. कृपा करून माझ्या रहस्याचा तपास काढा. ह्मणजे मी मोठ्या आनंदानें माझें सर्वस्व देईन. मोठ्या अपूर्व रीतीनें मी तुमच्या मनःकामना तृप्त करीन. तुमच्या सर्व गरजा नाहींशा करीन. अतःपर तुह्मांला दुःख भोगावें लागणार नाहीं. तुमचें दारिद्र्य धुडकावून लाविलें जाईल, आणि सर्व राज्यें तुमच्या चरणाप्रत येतील. गुप्तशोधन करणारें तुमचें हृदय धन्य होय. चला या !

आरोग्याच्या नियमाप्रमाणें प्रत्येक निरोगी मनुष्यानें श्रम केले पाहिजेत. अर्भकांचा कांहींहि हेतु नसतां तीं अतिशय उद्योगी असतात. तुह्मीं अतिशय श्रम करावे, मोठ्या पराक्रमानें आपला खेळ खेळावा, परंतु या क्रीडेवर तुह्मीं आपला आनंद अवलंबून ठेवूं नये, असें वेदान्त शिकवितो. **प्रत्येक ठोका अथवा आघात आनंदानें प्रेरित असूंद्या. आनंद नेहमीं व्यर्थ धुंडण्यांत तो नसावा.**

सत्पक्षाकडे एकाकी उपसलेले जन हो ! बहुमत तुह्मांविरुद्ध आहे ह्मणून भिऊं नका. पुराणप्रिय अज्ञानांचें हें भासमान बहुमत ह्मणजे हिरवींगार पानें आणि हिरवें गवत यांवरील दाट हिमबिंदूंच्या समूहाप्रमाणें होय. हे भास्वान् सूर्या ! वितळून जाणारें हें बहुमत तुझें स्वागत करण्याकरितांच चकाकत आहे. सत्पक्षाला चिकटून रहा. शेंपांचशें लक्ष लोक तुमच्या विरुद्ध असले ह्मणून काय झालें ? बहुमत तुमच्याच बाजूला आहे. पाषाण, वृक्ष, नद्या, वायु, सूर्य आणि तारे हे तुमच्या बाजूला आहेत. काळ हा तुमच्या पक्षाला आहे, दिवस तुमचाच आहे, शतकें तुमचींच आहेत, अनंतकाल तुमचाच आहे. सर्वव्यापी प्रकृति तुह्मांमध्येंच आहे. तुमच्या प्रतिस्पर्ध्यांनां तुह्मीं व्यापिलें आहे, परंतु त्यांच्याकडून तुह्मीं व्यापिले गेलां नाहीं. दैवाला घेरून तुह्मीं त्याला कावीज करितां !

ईश्वर तुमच्यामार्फत कार्य करूंद्या ह्मणजे तुह्मांला कर्तव्य ह्मणून कांहीं उरणार नाहीं. ईश्वराला प्रकाशूंद्या. ईश्वराला स्वतःचें आविष्करण करूंद्या. ईश्वररूपानें रहा, ईश्वररूपानें खा, प्या, ईश्वररूपानें श्वसन करा. सत्याचा—आत्मतत्त्वाचा अनुभव घ्या, ह्मणजे इतर गोष्टी आपोआप जुळून

येतील. तुह्मांमध्यें असलेल्या या ईश्वरी साम्राज्यानुरूप ( तें साम्राज्य तुह्मीच आहां ) वागा, ह्मणजे सर्व कांहीं तुह्मांला प्राप्त होईल.

× × × × ×

## पाहिजेत !

**सुधारक**

दुसऱ्यांचे नव्हेत

तर **स्वतः**

आणि **संपन्न**

विश्वविद्यालयाच्या पदव्यांनीं नव्हेत

तर **मनोजयानें.**

वय—दिव्यानंदभरित तारुण्य.

वेतन—सरूपता.

सत्वर अर्ज पाठवा !

भिक्षां देहि नको,

निश्चयानें मागा!

कोणाकडे ?

जगदीशाकडे—

ह्मणजे आपल्या आत्मारामाकडे.

ॐ ! ॐ ! ॐ !

---

STORIES.

## ( ४ ) गोष्टी.

**लॉर्ड बायरन** (एक प्रसिद्ध इंग्रज कवि ).

या पुरुषानें आपल्या अंतःकरणांत आत्मीय स्वातंत्र्यतेज झळकूं दिलें होतें. तो विश्वविद्यालयांत विद्यार्थी असतांना एकदां परीक्षेमध्यें 'लग्नाच्या मेजवानीच्या वेळीं **येशूख्रिस्तानें** पाण्याचें मद्य करून दाखविण्याचा चमत्कार केला,' या प्रसंगावर वर्णनात्मक निबंध लिहावयास त्याच्या वर्गाला सांगितलें होतें. कांहीं विद्यार्थ्यांनीं किती तरी खटपट केली. दिलेल्या वेळामध्यें कांहीं विद्यार्थ्यांनीं लांबलांब गोष्टी लिहावयास सुरुवात केली. पाहुणे मंडळीचा

पोषाक कसा होता, पात्रें कशीं मांडलीं होतीं, येशूनें आपली दृष्टि कशी फेंकिली, इत्यादि मारे पाल्हाळ लाविला होता. एवढा सारा वेळ बायरन छताकडे पहा, इतर विद्यार्थ्यांचे चेहरे न्याहाळून पहा, आणि तोंडानें बारीक शीळ घाल, असें करीत आपल्या जागीं बसला होता. वेळ संपल्यावर निबंधाच्या वह्या गोळा करण्यास प्रोफेसर आले, व बायरन-कडे येतांच चेष्टेनें त्याला ह्मणाले "इतका वेळ एकसारखें लिहून लिहून आपण दमलां असाल!" त्यांनां वाटलें, कीं, बायरन कोरीच वही देईल; पण बायरन ह्मणाला "जरा थांबा," आणि त्यानें तेव्हांच एक ओळ खरडली आणि वही प्रोफेसराजवळ दिली. सुमारें तीन आठवडे झाल्यानंतर परीक्षेचा निकाल लागला आणि कांहीं निबंधांची वरीच वाखाणणी झाली; परंतु सर्वांनां आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट ही, कीं, बायरननें पहिलें बक्षीस पटकाविलें! बायरनच्या निबंधाच्या योग्यतेची विद्यार्थ्यांनां साक्ष पटवून देण्याकरितां वर्गांत त्याचा निबंध वाचला गेला. त्याचा सर्व निबंध ह्मणजे खालील एक ओळ होती:—

" The water saw its lord and blushed."

" पाहुनि निजप्रभूसी लज्जेनें सलिल जाहलें लाल. "

त्यानें ओढूनताणून कांहीं आणलें नाहीं. ही ओळ सहजस्फूर्तीनें लिहिली गेली, आणि सहज केलेल्या कोणत्याहि कामाप्रमाणें ती निर्दोष, स्वतंत्र, सुबक, रसभरित, सरस्वतीचीच वाणी (the work of the Self) अशी झाली.

"डोळयांतें बघणें अवश्यक असे, ते सांडिती न स्वयें,
'तूं राहें स्थिर, ऐकणें न किमपी! कानासि सांगू नये;
स्पर्शा जाणतसे शरीर अमुचें तें नित्य कोठें वसो,
त्या स्पर्शा उपभोगणें स्वमनिंची इच्छा असो वा नसो. १
'होई सर्व असें स्वयेंच' कथिती वस्तू समस्तांसि या,
ही वस्तुस्थिति पाहुनीहि मनुजा शंका मनीं कां तुझ्या?
वाटे कीं तुंजला मनोरथ तुझे होती न पूर्ण स्वयें,
तत्प्राप्त्यर्थ तुझे प्रयत्न घडल्यावांचून कांहीं न ये?"* २

---

*वर्डस्वर्थच्या एका कवितेचें रूपांतर.

## MASTER MUSICIAN.
## गंधर्वराज.

एका चर्चमध्यें एक उत्तम वाजाची पेटी होती. ती पेटी इतकी उत्तम होती, कीं, तिजवर देखरेख ठेवणारा मनुष्य कोणाहि नवख्याला तिला हात लावूं देत नसे. एके दिवशीं चर्चमध्यें प्रार्थना चालली असतां, अगदीं साधा पोषाक केलेला एक अनोळखी इसम तेथें आला, आणि आपण पेटी वाजवितों असें ह्मणूं लागला; परंतु त्याला त्या पेटीच्या जवळ देखील कोणी जाऊं देईनात. तेथील उपदेशकाला त्याची ओळख नव्हती, आणि पेटी तर फार नामी असल्यामुळें त्याला कोणी ती वाजवूं देईना. परंतु प्रार्थना संपल्यानंतर, आणि पेटी वाजविणारे लोक तेथून उठून गेल्यावर हा मनुष्य गुपचुप त्या पेटीजवळ गेला. त्यानें पेटीच्या पडद्यांवर हात ठेविल्याबरोबर त्या वाद्यानें आपला धनी ओळखला आणि त्यांतून सर्वोत्कृष्ट गायन बाहेर निघूं लागलें. श्रोतृवृंद जावयास उभा राहिला होता, तथापि हे दिव्य स्वर कानीं पडतांच तो जादूनें भारल्याप्रमाणें मोहित होऊन जागच्याजागीं स्तब्ध राहिला. एवढा हा अद्भुत स्वरसंयोग उत्पन्न करणारा मनुष्य तेथील गंधर्वराज, त्या वाद्याचा उत्पादकच होता.

आत्म्याला, ईश्वराला, प्रेमाला, आपणाकरितां काम करण्याची आपण संधिच देत नाहीं. या शरीराची काळजी आपणच घेतों, आणि हें उघड आहे, कीं, यामुळें आपल्यामधून मध्यम प्रतीचे स्वर ( Notes ) बाहेर पडतात. प्रभूला हें वाद्य वाजवूंद्या; प्रेमाचे हात तारांनां लागल्याबरोबर त्यांतून संगीतामृताचा प्रवाह वाहूं लागेल; तुह्मांला पूर्वी कल्पना देखील नसलेलें संगीत, अद्भुत प्रभाव, स्वरैक्य आणि दिव्य आलाप हीं त्यांतून वाहूं लागतील.

---

## DODGING DEATH.
## मृत्यूच्या हातावर तुरी.

एकदां एका मनुष्यानें आपल्या कौशल्यानें स्वतःची इतकी उत्तम प्रतिमा बनविली, कीं, नक्कल कोणती व अस्सल कोणती हें कांहीं कोणाला ओळ-

खितां येईना. त्याला जेव्हां समजलें, कीं, यमदूत आपणाला नेण्यास येत आहे, तेव्हां मरणाला कसें चुकवावें हें कांहीं त्याला समजेना. ह्मणून त्यानें पुढील अजब युक्ति योजिली: त्यानें आपले दहाबारा पुतळे तयार केले. यमदूत येऊन पहातो, तों, यांतील खरा मनुष्य कोणता हें त्याला कांहींच उमगेना. ह्मणून त्यानें कोणालाच नेलें नाहीं. यमदूत यमाजवळ गेला आणि आतां काय करावें ह्मणून त्यानें देवाला विचारलें व यमराजाचा सल्ला घेऊन त्या मनुष्याला नेण्याकरितां तो पृथ्वीवर पुनः आला आणि ह्मणतो "अरे वाः, तूं बराच हुषार दिसतोस. हे पुतळे कितीतरी उत्तम केले आहेस; परंतु एके ठिकाणींच तूं चुकला आहेस. यांत एकच दोष राहिला आहे."

खरा मनुष्य एकदम पुढें सरसावून ह्मणाला "कोठें, कोठें मी चुकलों आहें?"

यमदूत ह्मणाला "यांतच!" आणि त्यानें त्या पुतळ्यांमधून त्याला नेमकें उचलून नेलें.

तात्पर्य 'मी बरोबर आहें काय' ह्मणून विचारणें हीच कायती भयंकर चूक आहे. "बाबा, सत्याव्यतिरिक्त तूं दुसरें काय असणार! अहंकाराचें कारटेंच मृत्यूला पकडावयाचें आहे."

"एकाचि मीपणें नागविलें घर। नातरी संसार ब्रह्मरूप॥"

—श्रीज्ञानेश्वर.

---

THIS IS MY CARROT.

## माझें हें गाजर.

एकदां एक गरीब बाई दुष्काळामध्यें मृत्यु पावली. चित्रगुप्तानें तिच्या मरणानंतर तिच्या पापपुण्याचा आढावा काढला. परंतु त्याला, एका उपासमार काढणाऱ्या भिकाऱ्याला तिनें एकदां एक गाजर दिलें होतें, याखेरीज तिचें कोणतेंहि पुण्यकर्म सांपडेना. चित्रगुप्ताच्या आज्ञेनें तें गाजर तेथें आणविलें. या गाजरानें ती बाई स्वर्गाला जावयाची होती. तिनें तें गाजर हातांत धरिलें व तें तिला घेऊन वर वर चाललें.

इतक्यांत तेथें तो भिकारी आला. त्यानें तिच्या फाटक्या लुगड्याचा पदर धरिला आणि तोहि तिच्यावरोबर वर जाऊं लागला. तिसरा एक स्वर्गकामी उमेदवार त्या भिकाऱ्याचा पाय धरून तसाच वर जाऊं लागला, आणि अशा रीतीनें त्या एका गाजराच्या जोरावर मनुष्यांची एक लांबची लांब माळ वर जाऊं लागली; आणि आश्चर्य हें, कीं, आपल्याला लटकून असलेल्या या लोकांचें त्या वाईला कांहींच वजन वाटलें नाहीं. ( असल्या गोष्टी स्वप्नांत कधीं घडत नाहींत काय ? )

अशा रीतीनें ते मुक्त झालेले लोक वर वर जात जात एकदांचे स्वर्गद्वारापर्यंत येऊन पोहोंचले. येथें त्या बाईनें खालीं वळून पाहिलें, आणि तिला काय वाटलें कोण जाणे, आपल्या मागून येणाऱ्या सर्व लोकांनां ती ह्मणाली " चालते व्हा मेल्यांनों ! हें माझें गाजर आहे. " आणि न कळत तिनें त्यांनां झिडकारण्याकरितां आपला हात हालविला. त्याबरोबर हातांतील गाजर सुटून त्या सर्व लोकांच्या मालिकेसकट ती बिचारी बाई खालीं पडली. गोष्ट आहे तशी दिली आहे. तात्पर्य तुमचें तुह्मी काढा. पहा–

**मुक्त होता, परी बळें झाला बद्ध ।**
**घेऊनियां छंद ' माझें माझें ' ॥**

**—तुकाराम.**

---

EQUALITY.

समता.

( चाल–चर्पटपंजरीसारखी. )

**गिरि खारीचा वाद जुंपला; खारीतें गिरि बोलुं लागलाः–**
**"क्षुद्र तूं परी डौल किती गे !" उत्तर देई तीही वेगेंः–**
**"प्रचंड होसी खरोखरी तूं, वर्षा व्हावे परि साही ऋतु;**
**मत्स्थानाची क्षिति मज नाहीं, सगळें शोभे अपुलया ठायीं;**
**ठावें तव गौरव मज नाहीं, मम लाघव परि नच तवं देहीं;**
**चपलताहि तुज अणुभर नाहीं, गुणभेदाचा प्रभाव पाहीं;**
**मान्य असे मज कीं तूं होशी, व्यूह विकटसा बहु आह्मांसी;**
**अटविभार तूं पृष्ठिं वहासी, फोडवे न परि कवची तुजसी !"**

**—इमर्सन.**

"स्वामीजी, आपण ह्मणतां, कीं, आपला आत्मा ह्मणजे सर्व ज्ञान आहे. तेव्हां येत्या कायद्याच्या परीक्षेमध्यें मला आपलीं पुस्तकें वाचल्याशिवाय पहिलें बक्षीस मिळावें अशी एकादी वेदान्ती सूक्ष्म दृष्टि मिळविण्याची युक्ति कृपा करून सांगाल काय?"

एकदां एक राजकुमार, लहानपणीं आपल्या सरदारांच्या मुलांबरोबर लपंडावाचा खेळ खेळत होता. त्याला मुलें कांहीं केल्या सांपडेनात. हा खेळ पहात तेथें उभा असलेला एक गृहस्थ ह्मणाला "आपल्या संवगड्यांनां शोधण्याचा इतका खटाटोप कशाला? आपण राजे आहां, त्यांनां बाहेर येण्याचा आपण हुकूम सोडा, कीं, ते एकदम जमतील." राजकुमार ह्मणाला "तसें केलें असतां खेळांतील मजा जाईल. खेळांत कांहीं बहार राहणार नाहीं."

त्याचप्रमाणें वस्तुतः तुह्मी या सर्व दृश्यजाताचे स्वामी आहां, सर्वज्ञ ईश्वर आहां, परंतु ज्याअर्थी तुह्मीं मजेखातर या जगाच्या चक्रव्यूहांत लपंडावाचा खेळ मांडून तुमच्याच प्रजेला ( सर्व तऱ्हेचे विषय आणि व्यासंग यांनां ) शोधीत आहां, त्याअर्थी आपला अंमल गाजवून सर्व खेळाची घाण करून टाकणें बरोबर होणार नाहीं. ज्या स्थितीमध्यें भूत, भविष्य आणि वर्तमान, आणि हजारों सूर्य आणि तारे सर्व तुह्मीच बनतां, एवढेंच नव्हे, तर तुमच्या ज्ञानोदधीमध्यें हे सर्व पदार्थ ह्मणजे केवळ लहान लहान तरंग किंवा आवर्त होत, तेथें ती कायद्याची परीक्षा किंवा सांसारिक भरभराट यांची तुह्मी कोठें काळजी कराल? जर तुह्मांला, सूक्ष्म दिव्यदृष्टि हवी असेल, तर ज्याकरितां तुह्मी ही सूक्ष्मदृष्टि मागत आहां, तें इंद्रियजन्य दृश्य ( जगत् ) तुह्मीं टाकून दिलें पाहिजे.

एकदां मासे धरण्याकरितां एक जाळें पसरलें होतें. त्यांत मासे सांपडल्याबरोबर माशांनीं आपल्या प्रचंड ओझ्यानेंच तें जाळें पाण्यांत ओढून नेलें. ही नूतन वेदान्ती दिव्यदृष्टि, वासनांचें जाळेंचेंजाळें घेऊन जाणारा 'विचित्र मासा' आहे. त्याचप्रमाणें ज्ञान मिळविण्याचा नेहमींचा मार्ग हा देखील वेदान्ती सूक्ष्मदृष्टीचा एक प्रकार आहे. कारण, त्यामध्यें अभ्यासाच्या वेळेपुरता तरी मनुष्य अहंकार आणि द्वैतभाव यांपासून मुक्त होतो.

इमाम गिझाली नांवाच्या एका मुसलमान साधूविषयीं असें सांगतात, कीं, तो विद्यार्थिदशेंत असतांना एके रात्रीं बराच अभ्यास करून आपल्या अभ्यासाच्या खोलींत झोंपीं गेला. ज्ञानाची देवता (खवाजा खिजार) त्याच्या स्वप्नामध्यें आली, आणि त्याच्या कानांत व नाकांत नुसता फुंकर घालून त्याला जगांतील सर्व ज्ञान देण्याचें तिनें कबूल केलें. मानी इमाम गिझालीनें तें नाकारिलें आणि त्याऐवजीं रात्रभर वाचण्याकरितां आपणाला तेल मिळावें असा त्यानें तिजपाशीं वर मागितला. जवळच्या मार्गापेक्षां त्याला लांबचा मार्गच बरा वाटला. कारण, स्वर्गामध्यें चोरून मागल्या द्वारानें जाण्याची त्याची इच्छा नव्हती.

कशा रीतीनें वागावें याचा तुह्मी देवाला उपदेश करूं नका. आपली इच्छा त्याच्यावर लादूं नका. सर्व कांहीं त्याच्यावर सोंपवा. अहंकार टाकून द्या. खोट्या कल्पनांचा त्याग करा. अशा रीतीनेंच तुह्मी आपलें शरीर व मन प्रकाशमय कराल. **सर्व खरें खरें ज्ञान आणि शिक्षण आंतूनच येतें.** पुस्तकांपासून किंवा दुसऱ्याच्या मनापासून येत नाहीं. मोठमोठ्या सर्व विभूतींनां, नवीन नवीन शोध करणाऱ्या कल्पक लोकांनां, ते केवळ विचारांतच मग्न झाले असतांना सर्व शोध लागले. त्यांच्या मनांमध्यें कोणत्याहि तऱ्हेची वासना, गडबड किंवा घोटाळा नव्हता; त्यांनीं आपलें मन आणि आपलें व्यक्तित्व, आप्पलपोटेपणाच्या वृत्तीपासून अलिप्त ठेविलें होतें. त्यांनीं स्वतःला स्फटिकाप्रमाणें शुद्ध निर्मळ केलें, ह्मणून त्यांच्यामध्यें ज्ञानाचा प्रकाश पडला व पुस्तकें आणि पुस्तकालयें त्यामुळें प्रकाशित झालीं. यांचें नांव कर्म (उद्योग). उद्योग ह्मणजे काबाडकष्ट असें 'राम' कधींहि ह्मणत नाहीं. **वेदान्तामध्यें कर्म ह्मणजे आत्म्याशीं तादात्म्यानें स्फुरण पावणें आणि सर्व विश्वाशीं एकतानतेनें असणें, असाच अर्थ आहे.** तत्त्वाशीं (सत्याशीं) हें निःस्वार्थ-बुद्धीनें केलेलें ऐक्य हेंच खरें कर्म आहे; पण त्याला पुष्कळदां अकर्म किंवा आळस असें ह्मणण्यांत येतें. वेदान्ती बाण्यानें केलेलें एकादें अतिशय श्रमाचें महत्कृत्य देखील कांहीं ओझें न वाटतां सौख्यकारक क्रीडाच वाटते. **कांहींहि करावयाचें नसून, सर्वदा कर्म करीत रहा,** यामध्यें

वेदान्ताचा सर्व उपदेश आला. धन्य असा तो कर्मयोगी. **यशाच्या मागें धांवण्याचें तुह्मी जेव्हां सोडून द्याल, तेव्हांच यश स्वतः तुमच्यामागें धांवत येईल.**

---

## वायु.

अमूर्त[1] वायो ! द्रुमजात कांहीं
न हालवीसी, परि नाद पाहीं—
'स्वूऊ' असा मंजुळ फार कानीं
येई; तुझा मानससौख्यदानी. १
राहें जरा, ये इकडे असा रे !
कानांत माझ्या कथि वृत्त सारें;
जासी कुठें तूं? वद मित्रराया !
अलक्ष्य तूझी गति मानवां या. २
गड्या ! तृणाग्रें कधिं वांकवीसी,
कधीं समोरून पळून जासी;
दडोनियां राहसि पाठिमागें,
जासी कुठें ? हें मज शीघ्र सांगें ! ३
स्पर्शून कर्णा कधिं धावतोसी,
घांसून गालासि तसाचि जासी;
भूतापरी तूं निसटून [2]तोकें,
जासी क्षणें क्रंदसि दुःखशोकें. ४
राहें जरा, ये इकडे असा रे !
कानांत माझ्या कथि वृत्त सारें;
जासी कुठें ? तूं वद मित्रराया !
अलक्ष्य तूझी गति मानवां या. ५

---

## ( ५ ) प्रेम.

अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥
मत्तः परतरं नाऽन्यत्किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

---

१ देहरहित. २ कौतुकानें.

रसोऽहमप्सु कौंतेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥
पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चाऽस्मि विभावसौ ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चाऽस्मि तपस्विषु ॥ ९ ॥
बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥
बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

—गीता, अ. ७.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

—गीता, अ. १२.

ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः ॥
केनेषितां वाचमिमां वदंति चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥ १ ॥
श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः ॥
चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २ ॥

—केनोपनिषत् ।

हें प्रेम निरनिराळ्या स्थितींतून, रासायनिक आकर्षणशक्ति, संसक्त्याकर्षणशक्ति, गुरुत्वाकर्षणशक्ति, लोभ, वासना, हांव, महत्त्वाकांक्षा इत्यादि रूपानें क्रमाक्रमानें व्यक्त होतें. निरनिराळ्या तऱ्हेनें आणि निरनिराळ्या प्रमाणानें प्रेमाचीं आंदोलनें झालीं असतां, तीं चुंबनधर्म, विद्युच्छक्ति, प्रकाश, उष्णता आणि ध्वनि इत्यादि नांवानें ओळखिलीं जातात. जड परमाणूंची यथार्थ कल्पना ह्मणजे ते शक्तीचे उगमबिंदु आहेत, ही होय. ह्मणून मूळाशीं पाहूं जातां जड द्रव्य घनीभूत प्रेमच आहे. कायदा आणि नियम ह्मणजे अनेकत्वामधील ऐक्य असल्यामुळें विविधतेमधील एकविधता, वैचित्र्यामधील साम्य, हीं सर्व प्रेमाचीं निराळीं रूपें आहेत. चौकस गुप्त पोलिस, कपटी हेर, दिखाऊ मित्र, प्रबल शत्रु, दगा देणारे सोबती, यांमध्यें देखील प्रेमाचीच शक्ति कार्य करीत असते. प्रेमाखेरीज इतर कोणत्याहि सरकारचें राज्य चालत नाहीं. कार्लाइलनें ह्मटलें आहे,

'द्वेष ह्मणजे विकृत प्रेम.' भीति ह्मणजे संकुचित प्रेम. असें नसतें तर प्रेमाचा भयावर पगडा कसा बसला असता? रुपयांची थैली बरोबर असलेल्या मनुष्याला रानामध्यें त्या आवडत्या वित्तामुळें भीति वाटते. स्वतंत्र मनुष्य भेटेल त्याचें स्वागत करितो. मुक्त मनुष्याला समान प्रेमाचा अनुभव घ्यावयास मिळतो. वस्तुतः प्रेम ही एकच शक्ति या जगांत असल्यामुळें, प्रेमाशीं ऐक्य अनुभवणें ह्मणजेच उद्धार किंवा मुक्ति होय; आणि बुद्ध्या किंवा न कळत या केवळ प्रेमसाक्षात्काराचा अनुभव घेण्याची खटपट करणें ह्मणजे जीवन होय. हें ध्येय साधण्यास अगदीं जवळच्या मार्गानें जाण्यास तयार असणें हेंच शहाणपण होय, आणि तें उद्दिष्ट साधण्याकरितां निरनिराळ्या प्रेमशक्तींची नीट व्यवस्था लावणें याचेंच नांव सद्गुण.

प्रेमामध्यें दगा ह्मणून कांहींच नसतो व कोणी दगलबाजहि नसतो. कोणाचाच स्वभाव बेइमानी नसतो. एकादा मनुष्य यहुदी, महंमदी, शूद्र किंवा ब्राह्मण आहे, ह्मणून त्याची शक्ति किंवा योग्यता आकुंचित करण्यास आह्मांला कोणताहि अधिकार नाहीं. दुराग्रही मतांच्या दासांनां देखील मुक्ति मिळालीच पाहिजे. ज्याप्रमाणें **कृष्णानें गोपिकांनां** शिष्टाचार आणि रूढि यांच्या कचाट्यांतून त्यांच्या मानलेल्या नवऱ्यांच्या घरांतून बाहेर काढलें, त्याप्रमाणें सत्यरूप ईश्वरानें तुह्मांला बाहेर ओढलें पाहिजे.

मनुष्याचा खरा आत्मा ह्मणजे या भेदातीत प्रेमाव्यतिरिक्त कांहीं नाहीं. तुह्मी प्रेम आहां. अहाहा! तुह्मी विश्वात्मा आहां. **लैलीच्या** आरक्त कपोलावरील गुलाबी नखरा तुह्मीच आहां, आणि **मजनूनचें** रागविद्ध अंतःकरणहि तुह्मीच आहां. हें सत्य व्यवहारामध्यें अनुभविणें यालाच पावित्र्य ह्मणतात. परंतु जो वस्तूंचा अभिलाष करितो आणि त्यांपासून आपण भिन्न आहों असें समजून त्यांच्या मागें लागतो, तो आपल्या ईश्वरी स्वत्वाचा भंग करितो, आणि त्यायोगें अपवित्र होतो. चुकविणें किंवा तोंड फिरविणें ह्मणजे पावित्र्य नव्हे. सौंदर्याचा प्रतिकार करणें किंवा तें टाळणें ह्मणजे शुद्धता नव्हे. खरें पावित्र्य तेंच, कीं, जेथें सर्व सौंदर्य

माझ्यामध्येंच मुरून असतें आणि जेथें मला माझें सर्वांशीं इतकें आध्यात्मिक ऐक्य वाटतें, कीं, एकाद्याला भेटण्यासंबंधीं बोलणें किंवा विचार करणें ह्मणजे विरहाच्या दुःखद सूचनेसारखें वाटतें.

बोल त्याच्याशीं तूं ऐकतो ह्मणूनी । आत्म्याशीं मिळणीं आत्मयाची ॥
हस्तपाद किंवा प्राणाहिपरीस । समीप तो वास करीतसे ॥ १ ॥
सूर्य चंद्र तारे पर्वत मैदानें । सृष्टींचीं उद्यानें मनोहर ॥
सृष्टिकर्त्याचींच रूपें हीं प्रत्यक्ष । येत का न साक्ष जीवा तुज ? ॥ २ ॥*

प्रभंजनरवामधें ध्वनि तुझा सदा राहतो,
तसा सलिलस्रोतसीं श्रवणिं येत आराव तो;
प्रभातिं अथवा दिनांतसमयीं दिसे भास्कर,
तिथें खचित तूं विलास करिशी कसा सुंदर. १
सुदूर असती तसा वससि माझियां अंतिके,
निनाद तव ऐकुनी हृदय हृष्ट होई निकें;
तवध्वनिनिवेष्टनें विभव प्राप्त होई मला;
जरी मरण ये मला तरिहि मी न सांडीं तुला. २

---

'जें जें असे तेंचि यथार्थ आहे.' यथार्थ ह्मणजे योग्य, अनुरूप आणि युक्त. जगांतील घडामोड ह्मणजे परिस्थित्यनुरूप होणारें नेहमींचें रूपांतर, आणि ह्मणून जग ह्मणजे चांगल्याचा प्रवाहच होय. जेव्हां जेव्हां मनुष्यांच्या भूतकालच्या अनुसंधानाचा वर्तमानकाळाच्या जुळणीशीं खटका उडतो, तेव्हां तेव्हां दुर्निवार पुनर्घटना, थोडा आवाज आणि डोळे दिपविणारा प्रकाश यांनीं युक्त होते, आणि यालाच क्रांति असें ह्मणतात.

एका गोष्टीच्या जागीं दुसरी कांहीं गोष्ट आल्याशिवाय आपण पहिली टाकावयास तयार नसतों. ह्मणून प्रगति सावकाश होते. प्रेम किंवा आसक्ति, एका दृष्टीनें पहातां एक तऱ्हेचें कवटाळणें अथवा चाचपडणें आहे; आणि दुसऱ्या दृष्टीनें पहातां तें त्यागाव्यतिरिक्त कांहीं नाहीं. प्रेम एका वस्तूवरून दुसऱ्या वस्तूकडे धावतें. प्रेमाचे विषय एकसारखे बदलत असतात, आणि जेव्हां जेव्हां प्रेमाचा विकास होतो तेव्हां तेव्हां तें प्रेम अनेक

---

१ टेनिसनच्या कवितेचें रूपांतर.

जुन्या आसक्तींचा त्याग करितें. क्रमाक्रमानें शेवटीं अशी वेळ येते, कीं, मनुष्याचें प्रेमावरच प्रेम जडतें आणि प्रेमाचा विषय सर्वांचा अंतरात्मा होतो, आणि प्रेम करणाऱ्या मनुष्याचें या परमात्म्याशीं लग्नच होऊन जातें. या लग्नानंतर या कामुकाच्या बाहुपाशांत सर्व विश्व आणि सर्व पदार्थ येतात. अशा मनुष्याची काय इच्छा उरणार ? आपल्या बाहूंनीं आलिंगिलेल्या प्रियेची आपण आणखी इच्छा ह्मणून काय करावयाची ?

जेव्हां एकाद्याला आपला आत्मा तोच सर्वांचा आत्मा असा अनुभव येतो, तेव्हां तो कशाचीहि इच्छा करीत नाहीं; सर्व कांहीं आपलेंच आहे असें मानून तो त्याचा उपभोग घेतो. तो या आपल्याच सृष्टीकडे पहातो, आणि ती त्याला उत्तम वाटते. प्रत्येक पदार्थापासून त्याला अनिर्वचनीय आनंद प्राप्त होतो. प्रत्येक सृष्ट पदार्थ त्याला आपला करभार देतो; मातीच्या ढेकळापासून आकाशांतील ढगापर्यंत, सूक्ष्म अणूपासून सर्वशक्तिमान् सूर्यापर्यंत, सरपटणाऱ्या क्षुद्र कीटकापासून चमकणाऱ्या सुदूरवर्ति तारकांपर्यंत सर्व कांहीं त्याच्या वैभवाचें गायन करितात आणि त्याचीं स्वस्तिगीतें गातात. अशा मनुष्याहून भिन्न असें कांहीं नाहीं.

---

## संसाराची इतकी प्रतिष्ठा बाळगूं नका.

मजसमोर दोन पदार्थ आहेत. वाटाण्याचें एक फूल आणि एक कुमारिका. फूल कापून पाहिलें तों त्यांत निरनिराळे परमाणु एकत्र ठेवणारी संसक्त्याकर्षणशक्ति, उष्णता, गुरुत्वाकर्षण, चुंबनधर्म इत्यादि इतर शक्ति दिसून आल्या; आणि त्या कुमारिकेमध्यें सर्व तऱ्हेचीं आश्चर्यें लपून राहिलीं आहेत, तिच्या डोळ्यांमध्यें तर तीं विशेषतः आहेत. येथें सबंध विश्वाचें आकलन करणारे दिशा व काल मला दिसून येतात. डोळे नांवाच्या एका चेंडूमध्यें सबंध विश्व भरलें आहे. हें विश्व डोक्यामध्यें भाववाचक जातिरूपानें आहे. सबंध विश्व ह्मणजे डोक्यांतील एक निवळ कल्पना आहे. चेंडू एकाकडून दुसऱ्याकडे टाकल्याप्रमाणें ही जर जगाविषयींची कल्पना एका डोक्यांतून दुसऱ्या डोक्यांत गेली नसती, तर हें जग झालेंच

नसतें. ही मायिक निद्रा किंवा जगाविषयीं कल्पना आपण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे देतों, एका देशांतून दुसऱ्या देशाला पाठवितों, आणि यालाच सर्व विश्व असें ह्मणतों. वस्तुतः तें तुमचेंच विश्व, तुमचीच कल्पना, तुमचेंच कार्य असतें. या चेंडूची इतकी मातव्वरी वाटूं देऊं नका. हा तुमच्याच डोक्यांतील चेंडू आहे, किंवा पायानें मारावयाचा चेंडू (फूटबॉल) आहे.*

**'त्यागादमृतमश्नुते'** त्यागापासून अमरत्व मिळतें. खरा त्याग ह्मणजे दृष्टीसमोर हें विश्व ह्मणजे कल्पनेचा चेंडू आहे, आणि स्वतःचा आत्मा विभु आहे हें ठेवून, सर्व भय, चिंता, उद्वेग, संभ्रम, मानसिक व्यथा या सर्वांनां पार झुगारून देणें होय. तुह्मांला कोणतेंहि कर्म करावयाचें नाहीं. तुह्मी कोणाचे बांधले गेलां नाहीं. तुह्मी कोणाला जबाबदार नाहीं. तुह्मी कोणाचें देणें लागत नाहीं. सर्व समाज, सर्व राष्ट्रें आणि सर्व कांहीं एका बाजूला ठेवून आपलें (आत्म्याचें) व्यक्तित्व प्रस्थापित करा. याला ह्मणतात वेदान्त. समाज, रीतिभाति, शिष्टसांप्रदाय, कायदे, नियम, टीका, समालोचन या सर्वांनां तुमच्या अंतरात्म्याला स्पर्श देखील करतां यावयाचा नाहीं. पाण्याचा एक लहानसा चिंचोळा भाग देखील सबंध समुद्राच्या पाण्याच्या दाबाला तोलून धरितो, असा उदकस्थितिशास्त्राचा सिद्धान्त आहे. हे व्यक्तिरूप अनंता! स्वतःच्या पायावर उभें राहण्याचें धाडस कर, ह्मणजे सबंध विश्वाचा भार देखील तुला आवरून धरितां येईल. हें लक्ष्यांत आण, याचा अनुभव घे, भय टाकून देऊन चिंतेचा त्याग कर, एकदेशीय अहंकार नाहींसा कर. आणि प्रणवाचा असा अर्थ करून, प्रणवोच्चार कर. ॐ ॐ.

---

* पहा. जेथ हें संसारचित्र उमटे। तो मनोरूप पट फाटे। जैसें सरोवर आटे। मग प्रतिभा नाहीं॥ तैसें मन एथ मुदल जाय। मग अहंभावादिक कें आहे। ह्मणोनि शरीरेंचि ब्रह्म होये। अनुभवी तो॥ —ज्ञानेश्वर.

## REST.

## (६). विश्रांति.

आनंद चिद्धन अनंत अपार तो तूं,
आहेस व्यापुनि जगीं पटिं जेंवि तंतु ;
हा विश्वमेघ वळखे मृगतोय सारा,
चित्सूर्य तूंचि तुज जो दिसतो पसारा. १
तूं आनंदसमुद्र पूर्ण लहरी विश्वात्मिका या तुझ्या,
आहे व्यापक तूं अखंड निरखीं नाहीं कदा हेतु ज्या;
होतो जो व्यवहार तो तुजविणें नाहीं पहा आपणा,
जो आहे सहजें सुखस्वरुप हें लक्षीत राहे खुणा. २

—श्रीकृष्ण जगन्नाथ बांदकर.

आयुष्यांतील विविध व्यवसाय आणि शारीरिक व मानसिक शक्तींचा निरनिराळ्या रीतीनें होणारा खर्च, यांच्या योगानें सर्वकाळ तुह्मांला ताण बसण्याचा संभव आहे. या बाह्य उपाधींनीं जर तुह्मीं नेहमीं आपली ओढाताण होऊं दिली, तर तुह्मी मृत्यूला जवळ बोलावीत आहां, असें ह्मटलें पाहिजे.

हें टाळावें कसें ? काम चुकवावें किंवा नित्यकर्मे टाकून द्यावीं असें 'राम' तुह्मांला सांगत नाहीं; परंतु अविश्रांत, कष्टमय आणि कसोटीचें काम करून देखील तुह्मांला नेहमीं स्वास्थ्य (विसावा) मिळेल अशी संवय लावून घ्या, अशी तुह्मांला 'रामा'ची शिफारस आहे; आणि हा उपदेश वेदान्तांतील त्यागाहून भिन्न नाहीं. त्यागाच्या स्थिर भूमीवर सर्वकाल अधिष्ठित व्हा, आणि या अनुकूल भूमिकेवर स्थिर राहिल्यानें येईल त्या कामाला जरी तुह्मी स्वतःला पूर्णपणें वाहून घेतलें, तरी तुह्मांला थकवा येणार नाहीं. कोणतेंहि कर्तव्यकर्म करण्यास तुह्मी समर्थ व्हाल.

अधिक स्पष्ट सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे काम करीत असतां मधून मधून रिकाम्या क्षणीं 'ईश्वर किंवा स्वतःचा आत्मा हें एकच सत्य आहे, आणि देहादिकांविषयीं ह्मणाल तर त्यांच्याशीं आपला कांहींच संबंध नाहीं,' अशा विचाराला थोडासा वेळ द्या. तुह्मी केवळ साक्षी आहां. परिणामाशीं

किंवा फलाशीं तुह्मांला कांहींहि कर्तव्य नाहीं. याप्रमाणें विचार करून तुह्मीं डोळे झांकावे, सर्व स्नायु शिथिल करावे. आपल्या देहयष्टीला स्वस्थ व शांत टाकून द्या, मनांतील सर्व विचारांचा भार नाहींसा करा. ज्या मानानें तुह्मांला विचारांचें ओझें हलकें करितां येईल, त्या मानानें तुह्मांला अधिक शक्ति वाटेल.

मज्जातंतु आपल्या शरीरांतील जोम कायम ठेवितात, आणि विचार देखील मज्जातंतूंवरच अवलंबून असतात. पचनक्रिया, रुधिराभिसरण, केसांची वाढ, इत्यादि क्रिया वस्तुतः मज्जातंतूंच्या व्यापारांवर अवलंबून असतात. जर तुमच्या विचारांत घोंटाळा झाला आणि अनेक तऱ्हेच्या कल्पनांनीं तुह्मी जर गोंधळून व गांगरून गेलां, तर यावरून हें व्यक्त होतें, कीं, तुमच्या मज्जातंतूंवर फारच ओझें पडलें आहे. मानसिक सायास हा मज्जातंतूंचा व्यापार एका दृष्टीनें फायद्याचा असेल; परंतु दुसऱ्या दृष्टीनें हा निःसंशय तोटा आहे. अविश्रांत विचार आणि मनाचा काच यांच्या योगानें शरीरांतील जोमाचा व्यय होतो. जर तुह्मांला आपला जोम कायम राखावयाचा असेल, आपलें आरोग्य राखावयाचें असेल आणि जीविताचा भार मज्जातंतुरूपी अश्वानें अनायासें न्यावा अशी तुमची इच्छा असेल, तर अहंतेच्या विचाराचें ओझें तुह्मीं [illegible]ी केलें पाहिजे. चिंता आणि काळजी यांच्या विचारांनां तुमच्या आयुष्यांतील सत्त्व शोषूं देऊं नका. **पूर्ण निरोगी प्रकृति आणि जोमदार कार्यशक्ति यांचें गुह्य, आपलें मन नेहमीं उल्हासित आणि आनंदी ठेवणें, कधींहि कंटाळून न जाणें, कधींहि न गोंधळणें, आणि भीति, विचार किंवा चिंता यांनीं दडपून न जाणें, यांमध्यें आहे.**

खऱ्या शिक्षणाचा सर्व उद्देश, लोकांनीं योग्य गोष्टी कराव्या, एवढेंच नव्हे, तर त्यांनां योग्य गोष्टींची आवड लागावी, त्यांनीं उद्योगी व्हावें, एवढेंच नव्हे, तर त्यांनां उद्योगाची गोडी लागावी, हा आहे.

---

## अतिशय महत्त्वाचा उपदेश.

गगनाचा अर्ध वर्तुल हाच माझा प्याला आहे, आणि चकाकणारा प्रकाश हें माझें पेय आहे. शरीराच्छादन मिळविणें, एकाद्याचें प्रेम संपादणें,

एकाद्याला संतुष्ट करणें, किंवा एकादें प्रापंचिक उद्दिष्ट साधणें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजूं नका. सर्व हेतु व हीं सर्व उद्दिष्टें टाकून द्या; आणि आपला आत्मा सतत शांत, संतुष्ट, सर्व उपाधींनीं अलिप्त, लाभालाभविरहित असा ठेवणें हाच तुमचा धंदा, हेंच तुमचें काम, हाच तुमचा व्यापार, हाच तुमचा व्यवसाय, हाच तुमचा उद्योग, हेंच तुमचें प्राप्तव्य आणि हीच तुमच्या आयुष्यांतील इतिकर्तव्यता होऊंद्या. ईश्वरानें तुह्मांवर लादलेलें तुमचें सर्वांत मोठें कर्तव्य, तुमचा धर्म हा आहे, कीं, तुह्मीं स्वतःला आनंदित ( संतुष्ट ) ठेवावें. तुमचें सामाजिक कर्तव्य,तुमच्या बांधवांची इच्छा, अशी आहे, कीं तुह्मीं स्वतःला संतुष्ट व शांत ठेवावें. प्रापंचिक संबंधामुळें उत्पन्न होणारें, तुह्मांवर येऊन पडलेलें अति महत्त्वाचें कर्तव्य हें आहे, कीं, तुह्मीं स्वतःला नेहमीं उल्हसित ठेवावें; आणि तुमचें स्वतःशीं असलेलें कर्तव्य देखील असेंच सांगतें, कीं, तुह्मीं सर्व स्थितीमध्यें स्वतःला सुखी ठेवावें. स्वतःशीं इमानानें वागा, आणि मग जगांतील इतर गोष्टी मनांत देखील आणूं नका. इतर सर्व वस्तु तुह्मांपुढें लीन झाल्या पाहिजेत, आणि त्या तुह्मांपुढें लीन झाल्या किंवा न झाल्या, त्याचें तुह्मांला काय होय ? कारण, तुह्मी आपणाशींच संतुष्ट आहां ! दुर्मुख किंवा उदासीन होणें हा एक धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि प्रापंचिक गुन्हा आहे, आणि हा एकच गुन्हा तुह्मांला करितां येण्यासारिखा आहे; इतर सर्व गुन्हे, अवनति आणि पापें यांच्या मुळांशीं हा एकच गुन्हा असतो. पूर्ण प्रसन्नचित्त व्हा, आणि वैराग्ययुक्त शांति बाळगा, ह्मणजे तुह्मांला दिसून येईल, कीं, तुमच्या सभोंवतालच्या सर्व वस्तु, सर्व परिस्थिति आपोआप ओढून आणल्याप्रमाणें योग्य रीतीनें जुळतील. कोणत्याहि कामासंबंधानें स्वतःला कष्टी करून घेणें हें तुमचें काम नव्हे. तुमचा धंदा किंवा तुमचें कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे तुह्मी स्वतःला आत्मतुष्ट, स्थिरधी, आत्मरत ठेवणें, हें होय. आह्मांला कांहींहि कर्तव्यकर्म नाहीं, आमच्यावर कसलाच भार नाहीं, स्वतःखेरीज इतर कोणालाहि आह्मी जबाबदार नाहीं. हा आनंद आणि शांति यांचा पवित्रतम कायदा तुह्मीं मोडला, तर तुह्मीच स्वतःचे भयंकर गुन्हेगार व्हाल. इतर सामान्य लोक

पहांटे जागे झाल्याबरोबर खोली झाडणें, सारवणें, कचेरीला जाणें, धुणें, स्वयंपाक करणें अथवा लिहिणें आणि वाचणें इत्यादि आपल्याला कर्तव्यें आहेत असें समजूंदेत; परंतु तुह्मी जेव्हां पहांटे उठतां, तेव्हां सौख्यपूर्ण होऊन स्वतःशींच रममाण व्हा. हेंच तुमचें कर्तव्यकर्म. तुह्मीं इतर काम चुकवावें, किंवा इतर घरगुती कामांची हेळसांड करावी, असा याचा अर्थ नव्हे. या सर्व गोष्टी तुह्मी कमी महत्त्वाच्या किंवा खेळणीं आहेत असें वाटल्यास माना. या गोष्टी तुह्मांला कराव्या लागतात याचें कारण, तुमच्या आध्यात्मिक आरोग्याला कांहीं व्यायाम हवा आहे; परंतु कोणतीहि गोष्ट करतांना हें लक्ष्यांत ठेवा, कीं, जें कांहीं खरेंखुरें व महत्त्वाचें काम असें लोक समजतात, तें वास्तविक अगदीं क्षुल्लक असतें. **तुमचें वास्तविक आद्य कर्तव्य ह्मणजे स्वतःला स्वतःमध्यें संतुष्ट ठेवणें हें होय.** विद्यार्थ्यांनों ! लक्ष्य द्या. जर तुह्मी परीक्षांच्या भावी निकालावर आपला आनंद अवलंबून ठेवून, सांप्रतकाळीं अनिश्चित वृत्तीमध्यें त्रिशंकूप्रमाणें राहणार असाल, तर तुह्मी कधींहि सुखी होणार नाहीं. तुह्मांला नेहमीं सुखाची आकांक्षाच करीत बसावें लागेल. **समानापाशीं समान जातें.** याक्षणीं ईश्वरी आनंद बाळगा, ह्मणजे सिद्धीचा आनंद तुह्मांकडे आपोआप वाहून येईल, असा नियम आहे.

**स्वयें नित्य आनंदवृत्ती असें रे !**
**तुझ्यासंगतीं विश्व हर्षेल सारें;**
**विपायें जरी खिन्नता ती जडेल,**
**सुहृद्वर्ग पाहून तूतें रडेल. १**

**मही दुःखशोकें परीपूर्ण सारी,**
**मिळे येथ आनंद, तो अल्प भारी;**
**ह्मणोनी सुखा युक्तिनें सांठवावें,**
**बुधें दुःख कल्पांतिंही नाठवावें. २**

**सुखें गीत गातां प्रतिध्वान येतो,**
**असोनी मुका शैलही साद देतो;**

परी टाकितां दुःखनिःश्वास, जाई—
विरोनी नभीं, त्यास कोणी न पाही. ३

नभ स्पष्ट आनंदनादेंचि गाजे,
बहू ऐकतां खेदनिःश्वास लाजे;
सुखात्म्या स्वयें लोक शोधीत येती,
विटोनी बळें खेदखिन्नास जाती. ४

जगीं पाहिजे मोद तो मात्र लोकां,
विभागी तुझ्या ते कदापी न शोका;
धरीं नित्य उल्हासवृत्ती, मिळेल—
सुहृत्संघ; तो खिन्न होतां पळेल ! ५

त्यजीना चवी लोक हर्षामृताची,
तुझें सेवणें दुःखकाढा तुलाचि !
समाराधने आदरें लोक येती,
निरन्नांतरीं कासया कोण जाती ? ६

सुखी होउनी सौख्य देई जगासी,
तुझ्या जीवना ही असे युक्ति खाशी;
सुखें राहतां सर्वही साह्यकारी,
परी अंतकालीं तुला कोण तारी ? ७

सभास्थान विस्तीर्णसें सौख्य पाहें,
कुमार्गापरी साच हें दुःख आहे;
सभास्थानिं सन्मित्रसंदोह दाटे,
पडे चालणें एकट्यासी अव्हांटे. ८

सुखाला मिळे थोर पाळा जनांचा,
परी एकला क्लेश कंठी मनाचा;
ह्मणोनी मनोवृत्ति जिंकून साधा
निजानंद, जेणें तुटे दुःखबाधा."* ९

*एला व्हीलर विलकाक्स नामक अमेरिकन कवयित्रीच्या पदाचें रूपांतर.

" लोकीं या ' सुख ' हेंचि सार्थक खरें त्यावांचुनी ना दुजें,
दिक्कालाद्यविभिन्न वास्तव असे सुप्राप्य आतांहि जें;
तें या भूवरि, याच जन्मि, बहु कां येथेंचि हो लाभतें,
ती युक्ती परिसा; 'सुखी जन करा,' तेव्हां मिळे आयतें!" १

---

## SUMMING UP.

## निष्कर्ष.

'राम' आपल्यापुढें दोन महत्त्वाचे मुद्दे विचाराकरितां ठेवितो आहे. १ क्षुद्र अहंकाराचा त्याग; २ खऱ्या आत्म्याचें प्रस्थापन.

१. वेदान्तामध्यें त्याग ह्मणजे पूर्ण विश्रांति, शांति, संन्यास होय. जेव्हांजेव्हां तुह्मांला सवड मिळेल, तेव्हांतेव्हां एकाद्या खुर्चीवर अगर बिछान्यावर आपला देह स्वस्थपणें टाकून द्या. जणूंकाय हा देहाचा भार तुह्मीं कधींच वाहिला नाहीं, त्याचा तुमचा कांहींहि संबंध नाहीं, आणि एकादा धोंडा तुह्मांला जितका परका असतो तितकाच हा देहहि तुह्मांला परका आहे! एकाद्या निर्जीव प्रेताप्रमाणें थोडा वेळ साफ आडवे पडा. जाणूनबुजून कोणतीहि कल्पना अगर इच्छा मनांत आणूं नका. देह किंवा इतर कोणतीहि गोष्ट यांची काळजी किंवा चिंता यांपासून मनाला पूर्ण मोकळीक मिळूंद्या. सर्व वासना, सर्व आकांक्षा, सर्व महत्त्वाकांक्षा टाकून द्या; त्यांचा त्याग करा. याचें नांव त्याग किंवा विश्रांति. तुमची सर्व मालमत्ता जमिनीवर ठेवा, अंतःकरणावर त्याचें ओझें घालूं नका.

२. **ब्रह्मात्मत्व.** ईश्वराची इच्छा तीच तुमची इच्छा असें होऊंद्या. ईश्वरेच्छा–हेतु सौख्यद असो वा दुःखद असो, तो आपलाच असें मानून त्याचें मंडन करा. देह आणि त्याच्या उपाधि, मन आणि त्याच्या वृत्ति, जग आणि लोकमत यांच्या पलीकडे (अलिप्त) आपण आहों, असें अनुभवा. आपण सर्वव्यापी विष्णु आहों, सूर्याचा सूर्य आहों, कार्यकारण व दृश्यजात यांहून भिन्न, एकमेवाद्वितीय, असा आनंदपूर्ण, मुक्त '**रामच**' आहों, असा अनुभव घ्या. प्रणवोच्चार करा आणि सहज-स्फूर्तीनें आपोआप येईल त्या धाटीवर प्रणवाचें गान करा. ह्मणजे सर्व

आधिव्याधि आपोआप तुमच्यापासून निघून जातील. **हें जग आणि ही सर्व परिस्थिति तुह्मी जशी मानाल तशी होते.** या जगाच्या कल्पनेचें तुमच्या छातीवर दडपण पडूं देऊं नका. जगांतील मतें व संघ ही तुमचीच कल्पना आहे, खरी शक्ति तुह्मीच आहां, आणि हें सर्व विश्व तिचा नुसता निःश्वास किंवा छाया होय. या सत्याचें (तत्त्वाचें) अहोरात्र चिंतन करा. तुह्मी आरोग्याच्या शिखराला पोहोंचत नाहीं याचें कारण, तुमचा परम आप्त जो अंतरात्मा त्याला सोडून देऊन, इतरांच्या चंचल, अनिश्चित व संदिग्ध वचनांला तुह्मी अधिक मान देतां, हें होय. **तुह्मी स्वतःकरितां जगा, दुसऱ्यांच्या मतांकरितां नको!** मुक्त व्हा. त्या एका ईश्वराला, त्या एकमेवाद्वितीय आत्म्याला, त्या खऱ्या पतीला, त्या खऱ्या स्वामीला, त्या धन्याला, तुमच्या अंतरात्म्याला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करा. कांहीं केलें तरी अनेकांना, लोकसमूहाला, खूष करणें तुह्मांला शक्य नाहीं! सहस्रमुख जनतेची आराधना करण्याची तुह्मांवर जबाबदारी नाहीं. तुमचा स्वतःचा विश्वकर्मा तुह्मीच आहां. स्वतःशींच गात रहा. जणूं काय अखिल जगांत तुह्मी एकटेच आहां, जवळपास ऐकणारे कोणी नाहींत. जेव्हां तुमचा आत्मा संतुष्ट होतो तेव्हां जनतेचें रंजन झालेंच पाहिजे! कायदा असा आहे!

जो कोणी नेहमीं विचारांतच वास्तव्य करितो, तो श्रम आणि व्याधि यांमध्येंच रहातो. आणि जरी तो हुषार आणि विद्वान् असला, तरी वाळवीनें खाऊन टाकलेल्या लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें त्याची विद्वत्ता व ज्ञान हीं पोकळ होत. ह्मणून जरी तुह्मांभोंवतीं विचाराचा कोट असला पाहिजे, तरी तुह्मी त्यानें बांधिले जाण्याची आवश्यकता नाहीं. ऊष्मा होत असला ह्मणजे ज्याप्रमाणें एकादा मनुष्य आपला कोट काढून टाकतो, किंवा एकादा चतुर कारागीर आपलें काम संपलें ह्मणजे आपलें हत्यार खालीं ठेवितो, त्याप्रमाणें तुह्मीं केलें पाहिजे.

काम करीत असतां तुमचें लक्ष्य त्यांत पूर्णपणें वेधलें पाहिजे आणि अप्रस्तुत गोष्टींचा मध्यें व्यत्यय येऊं देऊं नये. एकाच कालीं भिन्न शक्तींच्या

योगानें उत्पन्न होणारी झीज किंवा घर्षण किंवा मोडतोड ही सर्व नाहींशी होऊन, शक्तीचा अपव्यय न होऊं देणाऱ्या एकाद्या प्रचंड शक्तीच्या एंजिनप्रमाणें सर्व कांहीं सुरळीत चाललें पाहिजे.

आणि जेव्हां काम संपतें व यंत्राचा कांहीं उपयोग नसतो, तेव्हां तें पूर्णपणें थांबलें पाहिजे; मग धडपड उपयोगाची नाहीं. एंजिन आपल्या घरांत गेल्याबरोबर पोरांच्या एका टोळीला त्याच्याशीं वाटेल ती खोडी करण्याची पूर्ण मोकळीक देण्याइतकें तें स्तब्ध झालें पाहिजे; आणि मग मनुष्यानें जेथें आपला आत्मा वास करितो त्या ज्ञानप्रदेशांत जाऊन विश्रांति घेतली पाहिजे.

ऐका मत्पुत्रांनों ! वचनें माझीं बरीं करून तुह्मी,
उत्तरही द्या त्यांचें मनिं विवरोनी; करीत आज्ञा मी. १

आराधिलें तुम्हीं बहु देवांनां होउनी बहिर्मुखचि,
सत्यस्वरूप माझें ज्यांत नसे; बुद्धिही नव्हे साची. २

जीवितसत्तारूपी वृक्ष जणूं मायबाप तुमचा हो,
मीच स्वयंभु आहें; फोडितसां कां इथेंतिथें टाहो ? ३

पाळेंमुळें असंख्यचि मजला असती, अतीव उंच जसा,
गगना चुंबित जणुं मी, प्रसवें आरक्तशीं फळेंहि तसा. ४

सुख, सौंदर्य, उणें कां गमलें माझ्यांत हो तुम्हां सांगा ?
मुक्ति मिळविणें दुर्लभ गमलें कैंवी तुह्मांस निःसंगा ? ५

जपतपपूजनभजनादिक मार्गांनीं स्वसत्त्वशुद्धि बरी
होते तुमची, परि मज त्यांची अल्पहि नसेचि चाड खरी. ६

करुणा, स्तवनें, मजला नकोतहि प्रार्थना सुदीर्घ बऱ्या;
मुक्त असावें तुह्मीं हीच अपेक्षा मदीय निर्धारा. ७

बालक माझे तुह्मीं नित्य असावें स्वतंत्र आनंदी,
संगत्यागें सुखमय मजसम तुमची असो सदा बुद्धि. ८

उत्कंठा एक मला हीच असे हो त्रिसत्य वदतों मी,
मी देह ह्मणा न कधीं 'सोऽहं सोऽहं' जपा स्मरा तो 'मी.' ९

न कधिं अविद्यातिमिरीं पथ क्रमा हो निजात्मभुवनाचा,
छाया पुरुषाची जणुं देव तसा अन्य अज्ञलोकांचा. १०

अन्यत्वें तुह्मि ईशा पहाल जरि तो मिळे न कल्पांतीं,
आत्मत्वें ऐक्यत्वें भजा भजा त्या त्यजूनियां भ्रांति. ११

शापानुग्रह करिती रोषेंतोषेंहि अल्प जे देव,
देव न ते, समजा हो कीटक वृक्षावरील; कां भेव? १२

देवाधिदेव एकचि विश्वव्यापक असें वदति वेद,
तो प्रेमरूप अंतरिं आत्मा; त्यासीं तुह्मां नसे भेद. १३

द्वैतप्रतीति निवटा प्रथम, तुह्मां पाहिजे 'हरी'हि जरी;
प्रेमें कर्तव्य करा, फलभोगाशा करून दूर तरी! १४

कर्में करि चिच्छक्ति प्रबोध हा चित्तिं नित्य ठेवावा,
साक्षिस्वरूप आपण भोग सुखाचा अखंड सेवावा. १५

ब्रह्मप्रतीति कर्मीं श्रीगुरुकरुणाबळें सदा येई,
ब्रह्मस्वरूप कर्मेंहि अनुभव ऐसा अखंड गुरु देई. १६

विश्वात्मा, भूतात्मा, अपुला आत्माहि एक हें कळतां,
आनंद होइ अनुपम मनुजा प्रत्येक कर्म आचरतां. १७

शुद्ध प्रेमचि उत्कट सर्वांविषयीं धरूनियां चित्तीं,
'वांचावें जगिं केवळ परार्थ'ही सत्य रामतीर्थोक्ति. १८

---

BURNING REST.

# चैतन्ययुक्त शांति.

उधळपट्टी करणाऱ्या निसर्गाकडून लाखों खनिज द्रव्यें, लाखों वनस्पति आणि प्राणी यांचा अपव्यय केला जात आहे, असें वाटतें. हरकत नाहीं! दरएक प्रहराला लाखों जीव आणि धनदौलत सढळ हातानें खर्च करण्याची निसर्गाला आणि 'रामा'ला ऐपत आहे. वस्तु नाश पावणार तरी कोठें? कोठें जरी गेली तरी ती माझ्यामध्यें आहे. प्राचीन हिंदुस्थानांतील अपार संपत्ति जोंपर्यंत येथें होती तेव्हां ती माझ्या डाव्या खिशांत होती. आतां ती इंग्लंडकडे गेली आहे, तेव्हां ती माझ्या उजव्या खिशांत आहे. मी सागर आहें. भरती आणि ओहटी या दोन्ही माझ्याच आहेत. द्वेषभाव आणि 'जशास तसें' हीं तत्त्वें वाढविल्यानें कांहीं कल्याण व्हावयाचें नसून आपण आपलें कर्तव्य ह्मणजे प्रेम केल्यानेंच हित साधणार आहे. 'प्रेम सर्वांनां जिंकतें' असें ह्मणतात तो कांहीं नुसता अर्थवाद नाहीं. मर मर मरून धन सांठवून ठेविलें असतां खरी मालकी प्राप्त होत नाहीं. 'कापरा, कापरा, येथेंच रहा, मी तुझा मालक आहें,' असें ह्मणून कापराच्या एका लहान तुकड्याचा देखील तुह्मांला संग्रह करतां यावयाचा नाहीं. परंतु प्रेमाच्यायोगें हें सर्व जग आपलें स्वतःचें आहे असें अनुभवितां येईल. कायदेशीर मालकी प्रेमामुळेंच मिळते. इतर सर्व मालकी हक्क—जरी मनुष्याच्या आप्पलपोट्या स्वभावानें त्यांनां कायदेशीर ह्मटलें तरी तें ईश्वरी कायद्याविरुद्ध असल्यामुळें—चोरी, अथवा लूटच होय. ज्यानें नव्वद हजार मानवी मस्तकांचा मनोरा करून इराण जिंकल्याचा जयोत्सव केला,

त्या जुलमी तैमुरलंगानें हाफीस नांवाच्या कवीला ‘ तुर्कि–शिराझी लुटुनी नेई जरि मम हृदयातें ’ या कवितेंत, ‘मानिनीमुखकमलावरील तिळा-करितां समरकंद आणि बुखरा हीं दोन शहरें बक्षीस देऊन टाकीन ’ अशा अर्थाचा मजकूर घातल्याबद्दल आपणासमोर आणून उभें केलें, आणि त्याला विचारिलें “आपल्या प्रियेकरितां माझीं दोन मोठीं शहरें देऊन टाकण्याचा हिय्या करणारा इसम तूंच काय?” कवीनें यत्किंचित्‌हि न डरतां जाब दिला, कीं, “हां खाविंद, अशीच खैरात करून मी अगदीं गरीब झालों आहें ! ”

येथें कवि खरें बोलला नाहीं. कवीनें असें ह्मणावयास पाहिजे होतें, कीं, “ सर्व चीजवस्त प्रेमाला देऊन टाकल्यानें मला एवढें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे, कीं, मला दोन्ही लोक सहज देऊन टाकतां येतील; परंतु हे जुलमी बादशहा ! संग्रह करण्याच्या अनिवार ज्वरानें, तुझा एक पाय तर गेलाच, तुझी शांत वृत्ति तर गेलीच, आणि पुनः स्वतःला पुरून घेण्याकरितां जागाहि तुजजवळ शिल्लक नाहीं ! ”

**एकाद्या मनुष्याला ज्या मानानें वस्तूंची गरज कमी, त्या मानानें तो अधिक श्रीमंत होय.**

सर्व धर्मसंस्थापक, कवि, शास्त्र–कलांचे कल्पक व शोधक, आणि तत्त्व-ज्ञानी या सर्वांच्या स्फूर्तीचा उगम प्रेमामध्येंच आहे. कांहींमध्यें इतरांपेक्षां तो अधिक व्यक्त होतो, एवढेंच. श्रीकृष्ण, चैतन्य, तुळसीदास, शेक्स-पीयर, ख्रिस्त, रामकृष्ण हे सर्व प्रेमानें वेडे होऊन गेले होते, ह्मणूनच त्यांनां स्फूर्ति उत्पन्न झाली. प्रेमामधून विषयासक्ति काढून टाकली ह्मणजे तें प्रेमच परमात्मसाक्षात्कार होय. अरेरे, कांहीं भित्र्या धर्मसंस्थापकांनां आपल्या स्फूर्तीचें गुह्य जें प्रेम अथवा तत्त्वमसि ( जेथें जेथें दृष्टि जाते तेथें तेथें तूं आहेस )–तें सर्व लोकांनां उघड करून सांगण्याचें धैर्य अथवा ज्ञान नेहमीं नव्हतें !

लोक आकाशांतील ग्रहांप्रमाणें मोठ्या वेगानें सूर्याकडे(सत्याकडे) धांवतात; प्रेमाच्या या आविर्भावामध्यें ते स्फूर्तीनें प्रेरित अशा विभूतिच बनतात; परंतु

कांहीं काळानंतर केंद्रपरावर्ति आध्यात्मिक जाड्य त्यांनां परिभ्रमण करावयास लाविते, आणि सूर्यापासून दूर करून त्यांनां धर्मवेडे बनविते, व निरनिराळ्या पंथांच्या कक्षेंत अडकवून टाकितें. कांहींची कक्षा सत्यरूपी केंद्रापासून फार दूर असते, आणि कांहींची बरीच जवळ असते. 'राम' हें धार्मिक ग्रहमंडळ मोठ्या मौजेनें पहात असतो; परंतु पतंगाप्रमाणें ज्योतीकडे इतक्या जवळ (उप) जावयाचें, कीं, निश्चयेंकरून (नि)मी तूं, माझें तुझें इत्यादि ममत्वाचे सर्व भाव नाहींसे होऊन (षद्) तत्त्वमसि, सर्व तेजाच्या तेजामध्यें—परमात्म्यामध्यें आपला जीव अथवा अहंकार जाळून टाकावयाचा—उपनिषद्—असें असिव्रत साधणारे कोण आहेत?

सुधारणेनें शेफारलेल्या कालच्या पोरांनों! आह्मी तुमच्या शास्त्रांनां व कलांनां जागा देतों, परंतु त्यांचें घोडें फार पुढें ढकलूं नका. जगांतील सर्व शास्त्रांनीं ग्रहोपग्रहाप्रमाणें प्रेमरूपी सूर्याभोंवतीं फिरलेंच पाहिजे!

भूगर्भशास्त्रांत, मनुष्यापासून अत्यंत दूर असलेले दगड आणि खनिज द्रव्यें यांविषयीं विवेचन आहे. वनस्पतिशास्त्रामध्यें खनिजद्रव्याहून जरा अधिक पदार्थांविषयीं लिहिलें आहे. ज्योतिषशास्त्रामध्यें अत्यंत दूर असलेल्या तारकांविषयीं सांगितलें आहे. शरीरशास्त्रामध्यें मनुष्याच्या अस्थि ह्मणजे बाह्य सांगाडा याविषयीं विवेचन केलें आहे. मानसशास्त्रामध्यें नुसत्या मनाचे निरनिराळे व्यापार अथवा धर्म सांगितले आहेत. परंतु प्रेमामध्यें मनुष्य आणि निसर्ग यांमधील खरें परम तत्त्व याचें विवेचन होतें. तें (प्रेम) शास्त्र आहे व कलाहि आहे. शास्त्रीय शोध ह्मणजे या मोठ्या सूर्याच्या—प्रेमरूपी अग्नीच्या—अथवा 'एकमेवाद्वितीयं' तत्त्वाच्या ठिणग्या अथवा स्फुलिंग होत.

बेंजामिन फ्रांकलिनचा मुलगा पतंग उडवीत असतां, बेंजामिन त्या पतंगाच्या दोरीनें हालत असलेल्या त्या लोहचुंबकाच्या सुईकडे नीट पहात आहे. त्याचें शरीर किती स्तब्ध आणि श्वासोच्छ्वासरहित झालें आहे पहा! आपण उभे असलेल्या जमिनीहून आपलें शरीर भिन्न आहे, अशी त्याला कल्पना तरी आहे काय? सभोंवतालच्या सर्व वस्तूंशीं त्याचें ऐक्य झालें नाहीं काय? तो जणूंकाय नुसता एक दगडच होऊन राहिला आहे!

**निसर्गाच्या हृदयानुरूप त्याचें हृदय स्फुरण पावत आहे, आणि ह्मणून निसर्गाचीं सर्व हृद्गतें त्याला कळत आहेत.** पृथ्वीवरील (प्रयोगशाळेंतील) विजेच्या ठिणगीहून आपण भिन्न नाहीं असें आकाशांतील विद्युत् त्याला आपण होऊन सांगते. बाह्य प्रकाशाचें अंतःप्रकाशाशीं ऐक्य आहे असें सहज दिसून आलें.

दोन मनुष्यांमध्यें प्रेम अथवा ऐक्याची कल्पना उत्पन्न होते तेव्हां भेदरूपी मायेचा निरास होतो. एकाचे विचार तेच दुसऱ्याचे होतात. एकाचें हृद्गत दुसऱ्याला कळतें. आणि परोक्षदर्शन ( Clairvoyance ) सप्रमाण सिद्ध होतें.

' मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव

भक्ती ज्याची तेंची होसी
देवा पूजी देवचि होसी ॥ १ ॥

जरि तुज आवड मृत्पिंडाची
मृत्तिकाच तूं होशी साची ॥ २ ॥

आपलेंच अंतःकरण (आसक्ति) भक्षण करून टाकणें हें कितीतरी सुग्रास अन्न आहे. याच्याहून अधिक गोड कांहीं नाहीं. राम कधीं कधीं याच अन्नावरोबर थोडें दूध घेतो.

गगनीं हा यामिनीकांत बहु शांत उगवला पहा,
बघति जन आंतरसंतापहा.[1] ॥ ध्रु० ॥
तवमुखपंकजसुधासेवनीं नित्य कुमुदबांधवा[2] !
मन्मती रमते विसरुनि भवा;
तवदर्शनलालस सुजनांचा मिळेल आतां थवा,
हर्षतिल बघुनि तुज निशाधवा !
तुज मी स्थिर दृष्टिनें पाहतों मृदुतेजःसंभवा,
सुखाला अंकुर उठविसि नवा;

१ मानसिक संताप नाहींसा करणारा. २ चंद्र.

## चैतन्ययुक्त शांति.

मज वैद्य विकर्तक कुणिच आणवूं नका,
हें दुःख शरीरीं समान गमतें सुखा,
कुणि नको, करूं नका खटपट तुह्मी फुका !
नगरवासि हो ! येतों आतां ! प्रणति तुह्मां हे महा. ॥ १ ॥

स्वागत तुमचें गगनचुंबिगिरि-शिखरांनों ! बहु असो,
अंतरीं प्रेमभाव हा वसो;

रीतीभाती ! थाटमाट हो ! सद्गुणदुर्गुण ! नसो—
रोष मनिं, शुद्ध भक्ति ते ठसो;
विग्रहसंधी ! शत्रुसुहृद ! अन्यायनीति हो ! बसो,
भेद हा, विषयीं मानस रुसो;

ही भावें सकळांलागीं करितों नति,
दिक्काला जगता तशि दिनरात्रींप्रति.
मत्प्रीतिसुमें हीं गानद्युति निश्चितीं,
दिवसरात्र मद्भक्तिमात्र, सिद्धान्त अनिर्भिन्न हा. ॥ २ ॥

गेलें विरुनी मजमाजीं बघ कांति—तिमिर आघवें !
केवढी शांति पसरली सर्वें !
घडि घडि मजला आनंदाचें भरतें येतें नवें,
मुखें या सुख तें नच वानवे !
अडवुं नका, मज सुखें राहुंद्या जिवलगभक्तीसवें,
संगिं या शुद्ध मुक्ति संभवे;

---

१. शस्त्रक्रिया करणारा ( सर्जन. ) २. दिवस आणि रात्र हीं माझ्या प्रेमाचींच बनलेलीं, प्रेमस्वरूप आहेत. ३. लागलीच, तत्काल. ४. या ह्मणजे प्रेमाच्या व माझ्या संगानें मुक्ति संभवते.

जशि तरुणि नवोढा लज्जायुक्ता अति,
परि नेत्रकटाक्षें देइ पतिस संमति,
निजकर दे सत्कारीं सद्भावें ती सती,
केलें पालन त्या निजपितरां विसरुनि जाते, अहा ! ॥ ३ ॥

प्रेमासंगें झाली माझी प्रस्तुत तशी स्थिति,
अंगीं हर्षरोम दाटती !
मातापितरांनों ! बंधूनों ! भगिनींनों ! संमति
असो, हे तुह्मां सकळां नति;
कंठ दाटला, नयनीं अविरल अश्रुपूर लोटती,
वाणिची कुंठित झाली गति;

द्या शेवटचा तुह्मि निरोप सर्वेहि मला,
सद्भाव असो एकत्वें जगिं आपुला,
घडो भगवद्दर्शन नित्य लाभ तो भला,
हे शेवटचे शब्द आमुचे स्मरण अंतरीं वहा. ॥ ४ ॥

---

प्रेम करणाऱ्या मनुष्याला मोठ्या, लहान, सुंदर, कुरूप, विद्रूप आणि मोहक इत्यादि सर्व वस्तु, या, एकाच प्रेमाचें निदर्शन करणारीं गुह्य रूपें, आपल्याच आत्म्याचा अर्थ व्यक्त करणारीं सुंदर अक्षरें, एकाच प्राणजीवन ईश्वराचें रूप दाखविणारीं सुंदर चित्रें, आणि त्याच हृदयनिवासी परमात्म्याला शृंगारणारे निरनिराळे पोषाख, अशा भासतात.

अहाहा ! सौंदर्याचा केवढा तरी हा सागर ! प्रेमाचा केवढा मोठा हा उदधि ! प्रियकराळा आपल्या प्रियेचें धवल मुख आणि काळे भोर केश हीं दोन्ही सारखींच मोहक वाटतात. त्याचप्रमाणें 'रामा'ला दिवस आणि रात्र हीं सारखींच आवडतात. जीवित आणि मृत्यु सारखेच प्रिय आहेत. ताप आणि आरोग्य सम वाटतात. मित्र आणि शत्रु सारखेच प्रियकर आहेत.

ज्याचें वित्त हरण झालें आहे तो मनुष्य कितीतरी धन्य आहे. ज्याची गृहिणी पळून गेलेली आहे तो अनेकपटीनें धन्य आहे! मात्र यायोगें प्रेमरूपी परमेश्वराशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध जडला पाहिजे. मुसलमानी पुराणांत अशी गोष्ट सांगितली आहे, कीं, आब्राहामला एकदां समुद्र-पर्यटण करावयाचें होतें. खिजरा अथवा वरुण देवानें आपण जहाजाचा तांडेल होतों असें आब्राहामला सांगितलें. आब्राहामनें प्रथम भोळेपणानें त्याची विनंति मान्य केली. परंतु थोडासा विचार केल्यानंतर त्यानें खिजराची क्षमा मागितली आणि ह्मटलें "हे उदार बंधो! मला क्षमा कर. तांडेलापेक्षां प्रेमरूपी ईश्वरानेंच माझें जहाज चालविलेलें मला अधिक प्रिय आहे. सर्व उदधींचा तूं स्वामी आहेस. तुझ्या हातीं वल्हीं दिलीं, तर जहाज सुरक्षित जाईल, परंतु मला इतकी सुरक्षितता नको आहे. त्याच्यायोगें मी पूर्णपणें तुजवर विसंबून राहीन. तसें झालें ह्मणजे मला ईश्वरावर पूर्णपणें भरंवसा ठेवून राहतां यावयाचें नाहीं. कृपा करून माझ्या आणि ईश्वराच्या मध्यें आड येऊं नको. माझ्या प्रत्यक्ष खिजरा भावावर अवलंबून राहण्यापेक्षां ईश्वरावरच सर्व भरिभार टाकणें यांतच मला अधिक सौख्य आहे."

वियोगानें बेहोष होऊन गेलेला प्रेमी जन ह्मणतो "विद्युल्लते! तूं चमकत रहा. घनगर्जिता! तुझा निनाद चालूंदे. तुफाना! तूं भडकून जा. वाऱ्यांनों! तुह्मी सोसाट्यानें वाहूं लागा. मी तुह्मां सर्वांचा ऋणी आहें. हे धन्य घनगर्जिता! सुकुमार प्रियेला भयभीत करून क्षणभर तरी मला घट्ट मिठी मारावयास तूं लावतोस. आयुष्यांतील कटुप्रसंग (आपत्ति, संकटें) कितीतरी गोड आहेत! मात्र आयुष्याच्या, या सर्व द्राक्षांमधून ईश्वर-प्रेमविरहरूपी मधुर मदिरा आपणाला काढतां आली पाहिजे.

**अनन्य मी तुज शरण सर्वथा। सर्वहृदयस्था रक्षीं मज ॥ १ ॥**
**सर्वस्वें हा जीव ठेवियला पायीं। उरलें तें काई सांग आतां ॥ २ ॥**
**छंद एक तुझा लागो माझ्या चित्ता। दृष्टिहि अनंता तुझ्या रूपीं ॥ ३ ॥**
**करचरणाचा सर्वहि व्यापार। घडो निरंतर तुझ्यासाठीं ॥ ४ ॥**

प्रिय वाचकहो! तुह्मांला कधीं शुद्ध, निष्काम प्रेम करण्याचा, सर्वस्व अर्पण करणाऱ्या प्रेमानें बद्ध होण्याचा—नव्हे मुक्त होण्याचा, अनुभव आला आहे काय? जर आला असेल, तरच खालीलसारख्या विचारांचें स्वारस्य तुह्मांला कळेल.

**करीं वाहणा या त्वचेच्या दयाळा**
**प्रभो! स्नायु हे बंद योजीं तयाला;**
**तुझे चित्सुखा! या मुखा पाय लागो,**
**तनू हे तुझ्या दास्यकर्मीं न भागो!**

"माझ्या देहाच्या कातडीचे तुझ्या पायांतील जोडे होऊंदेत, आणि हृदयांतील शिरा त्याचे बंद होऊंदेत. तुझ्या चरणकमलाचा स्पर्श होण्यास उत्सुक असलेल्या या माझ्या ओठांनां आपला चरणस्पर्श कर. प्रभूजी! मी चरणाची दासी आहें."

असें कोणतें काम आहे, कीं, जें प्रेमाच्या योगानें शोभिवंत व सुंदर होत नाहीं? जेथें प्रेम आहे, तेथें लहान मोठे, उच्च नीच असें कांहीं राहात नाहीं. जेव्हां कोणतीहि गोष्ट आपण प्रेमानें प्रेरित होऊन करितों, तेव्हां अतिशय दुष्कर कार्य देखील आपणाला स्वर्गीय वाटतें. आणि तेंच स्वार्थबुद्धीनें, अतिशय मोठी उच्च स्थिति देखील त्रासदायक आणि कंटाळवाणी वाटते. तुह्मी कोणत्याहि स्थितींत असा, प्रेमानें ती गोडच होते. सर्व दुःखें, आयुष्यांतील वादळें, सर्व हालअपेष्टा, काळजी, हीं सर्व स्वार्थबुद्धीपासून-आप्पलपोटेपणापासून उत्पन्न होतात. अतिशय दुःखद स्थितीवर (Hell) प्रेम केल्यावर तिचें दुःख राहणार कोठें? आपलीं दुःखें, त्रास ह्मणजे, आपण जागें होऊन प्रेमाला आलिंगन द्यावें ह्मणून प्रेमानें केलेलें सतावणें होय. हें हालविणें, जागें करणें, थोपटणें हें सर्व त्या प्रेमाचेंच आहे. प्रत्यक्ष श्रीहरि ईश्वर आपल्या प्रेमानें आह्मांला जागे करीत आहे. तेव्हां उठा, जागे व्हा!

## दे भेट मज प्रियकान्ता!*

त्यजिं निद्रा ही सखया ! उठिं का आतां,
दे दर्शन मजसी कांता;
अतिमोदभरें वचनामृत ऐकावें,
तव कमलनेत्र पाहावे;
या आशेनें तालवृक्षमिष करुनी
निःश्वास दीर्घ सोडित मी;
तव अधराच्या समीप आलें ही मी !
मज ठाव हृदयीं देईं;
अतिशीतलसें हिम वसतें कैलासीं,
करि थंड सर्व वस्तूंसी;
परि शक्त न तें शमवाया विरहासी,
तव ठायिं मम रति ऐसी.
अति विमलजला भागिरथी
वाहते नित्य, सुभगा ती
परि प्रेमजलाच्या स्रोतीं
गांभीर्य वसे तदधिक ह्मणुनी आतां,
दे भेट सत्वरी कांता !

---

* चाल–अजि अक्रुर हा०

## हास्यास्पद भीति.

वदति लोक अकिंचन पोर हा,
जवळि त्या न कपर्दिकही पहा;
परि तयास कुणीं कथिलें ' मुला !
फिरति चोर सदा लुटण्या तुला. ' १

भिउनि पोर फिरे घन काननीं,
गिरिगुहांतरिं, भीति धरी मनीं;
इकडुनी तिकडे भिउनी दडे,
वपुसि तेंवि मना श्रम तैं वडे. २

भवनिमग्न-नरा, सदृशी मता
तव दशा, भय, गाढ अजाणता;
स्वकिय रूप पहा, त्यजीं भी; सुधी,
हृदयिं आणिं न चोरभया कधीं. ३

उठ झणीं, विवरीं मनिं कोण मी,
किमपि भीति न; मग्न न हो भ्रमीं;
तुज अपाय न कोणि करूं शके,
मनचि पीडि तुला बघ हें निकें. ४

# PRACTICAL WISDOM
## OR
# BALANCED RECKLESSNESS.

## व्यावहारिक ज्ञान अथवा योग.

" जो कोणी भूतदयाविरहित अंतःकरणानें एक हांकभर चालतो, तो प्रेतवसन धारण करून आपल्या थडग्याकडे चालला आहे असें ह्मटलें पाहिजे. "

शहाणपण आणि विद्वत्ता हीं एकच नाहींत, आणि नेहमींच त्यांचें सख्य नसतें. विद्वत्ता भूतकालाकडे पाहते, शहाणपण भविष्यकालाकडे पाहतें.

पुढें काय करावयाचें हें जाणणें ह्मणजे शहाणपण, अशी कोणी शहाणपणाची व्याख्या करितात. आणि तें जाणल्यानंतर त्याप्रमाणें करणें ह्मणजे सद्गुण होय.

सद्गुणावांचून शहाणपण ह्मणजे नुसता शीण होय. परंतु ज्याप्रमाणें इच्छाशक्तीपासून क्रिया होते, शास्त्रापासून कला निपजते, ज्ञानापासून सामर्थ्य येतें, त्याप्रमाणें शहाणपणापासून( wisdom )सद्गुण निर्माण होतात. आणि जेथें विचाराला क्रियेचें रूप येत नाहीं, आणि जेथें उपदेशाप्रमाणें आचरण घडत नाहीं, तेथें मानसिक अथवा आध्यात्मिक बद्धकोष्ठ हीं उद्भवतात. एक अमेरिकन विनोदी ग्रंथकार ह्मणतोः—

"विवंचिलें म्यां जनरीतीतें, काका ऐसें बोलत होते,
आळविती हे जैसे देवा, उद्यम तैसा क्रमशः व्हावा. १

न घडे ऐसें जरि मनुजातें, प्रभुप्रार्थना व्यर्थचि होते,
मनिं इच्छा परि कर्म करीना, फळे न त्याची शुभहि वासना. २

हेतु भले परि उद्यमाविना, जगीं कुणा कधीं कांहिं मिळेना;
अश्रुरोदनासहित याचना, साह्य न करि कधिं उद्यमहीना. ३

उठ वेगें करिं उद्यम कांहीं, काका ऐसें वदती पाहीं;
मनुजा ठेवीं मनिं हे नीति, मिळेल तुजला सत्य सद्गति." ४

बाह्य परिस्थितीशीं सुरक्षितपणें तंतोतंत जुळवून घेण्याची शक्ति असणें, हें शहाणपणाचें एक प्रधान अंग होय. आपल्या गरजेप्रमाणें आपलें आचरण न ठेवणें, हें वेडेपणाचें लक्षण होय. 'परिस्थितीप्रमाणें बदला;नाहींतर मरून जा' ( Change or Perish ) असें सृष्टिदेवी बजावून सांगत आहे. प्रगमनशील कालाबरोबर चालूं लागा, तरच तुह्मांला जीवनकलहांत जीवंत राहतां येईल. बा हिंदुस्थाना ! इकडे लक्ष्य दे !

मनुष्यावर ज्या मानानें संकटें अधिक, त्या मानानें त्याचा मनोनिग्रह व सत्त्व हींहि अधिक.

ज्यायोगें संसारीं प्रसंग येती कठीण मनुजातें
भंगे सुखशांतीही ऐसें संकट सदा हवें मातें. १

'बसुं नको, स्थिर राहुं नको कदा,
करिं करीं प्रगती पुढती सदा;'
वदत नित्य असें वच जो पहा,
खचित इष्ट असे मज दंश हा. २

बहुत अंशीं सुखदुःख पूर्ण होवो,
यत्न करितां श्रम विस्मृतीच पावो;
ज्ञान मिळवा, तत्कष्ट मनिं न आणा,
'श्रमा विटणें' हा न हो कदा बाणा. ३

भासें विचित्र परि दे शांति मना फार जीवितक्रम हा,
जेथें अपजय वाटे संसारीं तोचि होय विजय महा. ४

## साधुवृत्ति.

शिष्टाचार बाजूला ठेवून आणि वरपांगी बोलणें टाकून देऊन, जर आपण आपला खरा खरा अनुभव ताडून पाहिला, तर आपणाला असें दिसून येतें, कीं, सर्व नीतिपाठ, अधिकारयुक्त विधिवचनें, 'अमूक कर' किंवा 'अमूक करूं नको' अशा शास्त्राच्या आज्ञा, या सर्व ईश्वरी तत्त्वाची ओळख न पटलेल्या मनुष्यामध्यें चैतन्य उत्पन्न करण्याकरितां केलेले, जाणूनबुजून अथवा न कळत केलेले निष्फळ प्रयत्न होत. हे प्रयत्न ह्मणजे मृतशरीराच्या एकाद्या दुसऱ्या स्नायूला नुसतें चलन देऊं शकणारे विद्युत्प्रवाह होत. त्यांनां कृत्रिम जीवनाहून अधिक चैतन्य उत्पन्न करितां येत नाहीं.

"जें बळजबरीनें आणलेलें असतें त्याच्यामध्यें बळ नसतें." प्रेमानें घराची उभारणी झाली नसल्यास, घर बांधणाराचे श्रम व्यर्थ होत.

हें खरें आहे, कीं, असामान्य बुद्धीच्या लोकांमध्यें कार्यकर्तृत्वहि असामान्य असतें; परंतु जे दुसऱ्याच्या दृष्टीनें कष्टदायक श्रम वाटतात ते या अलौकिक पुरुषांनां एक मोठें सुखाचें स्थान वाटतें. अहंकारानें प्रेरित होऊन कसेंबसें करावयाचें निर्जीव काम आपण न केलेलें बरें. आत्म्याचा प्रवाह ह्मणून जर एकादें कार्य आपोआप तुमच्या द्वारा होत नसेल, तर तें ओढूनताणून करण्यानें थोडाच फायदा होणार आहे! कीर्तीची हांव बाळगणाऱ्या क्षुद्र अहंकारबुद्धीनें रडतखडत केलेल्या नीरस कर्माला श्रीशंकराचार्य 'बंधन' ह्मणतात.

एक मुलगा रस्त्यांतून मजेनें शीळ घालीत चालला होता. एका शिपायानें त्याला त्याबद्दल हटकलें. त्याबरोबर मुलानें उत्तर दिलें "काय मी शीळ वाजवितों? नाहीं बुवा! ती आपोआप वाजते."

बुलबुल अथवा कोकिळ एकाद्या उंच वृक्षाच्या शिखरावर बसूंद्या, कीं, एकदम त्यांच्या कंठांतून सुस्वर आलाप आपोआप निघूं लागतात. **क्षुद्र अहंकाराला अनंतामध्यें झुगारून द्या.** चैतन्य, तेज आणि प्रेम या सच्चिदानंदाशीं असलेलें आपलें ऐक्य तुह्मांला कळूंद्या, ह्मणजे सुखदायक

पराक्रम, तसेंच चातुर्य आणि सद्गुण इत्यादि रूपानें असलेला मूलभूत आनंद तुमच्यामधून एकदम वाहूं लागेल. यालाच ईश्वरप्रेरित चैतन्य किंवा जीवन ह्मणतात, आणि हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे.

**देहापासून वेगळा झाला । सूर्यलोकीं जाऊन ठाकला ।**
**विलोकी सर्व जगाला । अनिमेष लोचनें संपूर्ण ॥ १ ॥**
**अखिल सृष्टि पाहिली । चित्तास ती बहु आवडली ।**
**साधु साधु ही शोभली । ह्मणून आशी दे तीतें ॥ २ ॥**

**शो**पेनहार नांवाचा जर्मन वेदान्ती ह्मणतो "स्वतःमध्यें आनंद सांपडणें फार कठिण आहे खरें, परंतु तो इतर ठिकाणीं सांपडणें अगदीं अशक्यच आहे ! "

मोठमोठीं सर्व कार्यें निर्व्यक्तित्वानें( Impersonally ) झालेलीं आहेत. तीं अहंकारानें झालीं नसून अहंकाराचा अडथळा असूनहि त्याला न जुमानतां झालीं आहेत.

सूर्य निष्काम साक्षित्वानें प्रकाशतो, पण चमत्कार काय होतो पहा ! बर्फाच्छादित पर्वतशिखरावरील आपल्या उगमापासून नद्या मुक्त होतात, वायु आनंदानें नाचूं लागतात, सर्व सृष्टि चैतन्यमय होते, प्राणिमात्र जागृत होतात, वनस्पति वाढूं लागतात, फुलें आणि कमळें फुलतात, आणि सूर्य-नारायणाच्या दिव्य प्रकाशाच्या दर्शनासरशीं सर्व नरनारी आणि अर्भकें यांचीं सुंदर नेत्रकमलें देखील उघडतात !

'आपण सर्व विश्वाचा आत्मा आहों, सर्व तेजाचें मूळ आहों आणि आनंदाचें उगमस्थान आहों, ही भावना प्रज्वलित ठेव, ह्मणजे हे धन्य प्राण्या ! उत्साह, चैतन्य आणि जीवन हीं तुझ्यामधून आपोआप प्रगट होतील. फूल उमलतें आणि त्यापासून सुगंध आपोआप पसरूं लागतो.

पोहतां न येणारा एकादा इसम जर अकस्मात् तळ्यांत पडला, तर पाण्याच्या योगानें तो आपोआप वर तरंगत राहील; परंतु मनाची शांति नष्ट

झाल्यामुळें आणि हातापायानें भयंकर धडपड चालविल्यामुळें तो आपोआप बुडूं लागतो. त्याचप्रमाणें काळजी व चिंता वाहणाऱ्या अहंकाराच्या ओझ्यानेंच मनुष्य बुडून जातो. जलालै–रूमी म्हणतो.

" ईशकृपें जरि अमृत लाभत काननिं त्या यहुद्यास सदा,
मोझस–शिष्य परी वदला 'मज एक पलांडुहि द्याच तदा;'
शब्द असे मतिमंद अधार्मिक उच्चरितां बहु अद्भुत झालें,
आटुनि जाय तदा झणिं अमृत दुःख बहू मग त्यास जहालें." १

डोकें दुखणें, पाठ वांकणें, छाती भरून येणें, हें सर्व कशानें होतें? पायानें न चालतां डोक्यानें चालल्यामुळें. तुमचे पाय पृथ्वीवर असूंद्या, आणि मस्तक उच्च हवेंत (ब्रह्मानंदानें परिपूर्ण) असूंदे; ही ईश्वरी अवस्था उलटी करूं नका. डोक्यावर माती घेऊन, असें करणेंच योग्य आहे असें म्हणूं नका. परमात्मतत्त्वापेक्षां दृश्याला अधिक महत्त्व देऊं नका.

असें सांगतात, कीं, एक मनुष्य आळंबाच्या शोधार्थ जंगलांत हिंडत असतां त्याच्याकडून ओकवृक्षाचीं रोपटीं तुडविलीं गेलीं. गड्यांनों! क्षुद्र लाभहानीमध्यें पूर्णपणें गढून जाऊन अखंड आनंदरूपी आत्म्याला कां विसरतां? चिंता वाहणारा, कर्तव्यानें पछाडलेला आणि मानाच्या योगानें दबून गेलेला अहंकार कोणतेंहि कृत्य खरोखर करतो काय? घोड्याच्या पाठीवर बसलेल्या घुंगुरट्यानें देखील म्हणावें, कीं, 'मीच घोड्याला पळावयास लावतों आणि गाडी ओढतों.'

दिव्य सत्याच्या प्रभावशाली विकासाच्या मार्गांत आपल्या अहंकाराचें घोडें घुसडूं नका. त्या दिव्य शक्तीवर श्रद्धा ठेवा. लहानशा क्षुद्र कीटकाची आपोआप उत्क्रांति करून त्याला मनुष्यदेहापर्यंत आणणारा परमात्मा —ती दिव्य शक्ति—अद्याप विद्यमान आहे; आणि ज्याअर्थीं तो परमात्मा निजला नाहीं किंवा मेला नाहीं, त्याअर्थीं तुम्हांला अधःपाताची भीति नको.

# स्वामी रामतीर्थ.

स्रोत वाहो जलनिधीचा कुठेंहि,
नाहीं चिंता परि विहंगमां पाहीं;
उदधिक्रोडावरि गाढ झोंप घेती
स्वस्थचित्तें, मनिं कांहिं नसे भीति. १

तेविं विश्वा व्यापुनी जें रहातें,
ईश्वराचें आनंत्य दिव्य, तेथें–
आह्मि घेतों विश्रांति चिर अमूप,
जया सौख्यातें नाहिं कदा लोप! २

आपणाला त्रास अथवा दुःख होतें असें ह्मणणें ह्मणजे उपाधि किंवा परिस्थिति यांचे आपण दास आहों असें कबूल करण्यासारखें आहे. परमात्म्याहून आपण भिन्न आहों, हा नास्तिक मोह टाकून द्या. विश्वाचा नियंता जो परमात्मा, त्याहून तुमचा अंतरात्मा जर भिन्न असेल, तर तुह्मीं खालीं मान घालून स्वतःचा धिक्कारच केला पाहिजे. परंतु खरी गोष्ट अशी आहे, कीं, तुह्मी एका बाजूनें परिस्थितीनें बद्ध झालेले दिसतां, आणि दुसऱ्या बाजूनें पहातां बद्ध करणारी परिस्थिति ही तुह्मीच आहां. आरसा माझ्या हातांत आहे आणि मी आरशांत आहें.

ठोठावी द्वार वाटे कुणिं तरि निकरें नाद जो कानीं आला,
बोले मी ‘ कोणरे तें ’ परि न मज कुणीं दीधलें उत्तराला;
पाहें मी अंतरीं जों निरखुनि तंव तें प्रेम हांसून बोले,
तें तूंची, ना दुजें; ज्या इतर गणुनियां चित्त उद्विग्न झालें! १

मुसलमानी धर्मग्रंथाच्या खऱ्या अर्थानें पहातां असें दिसून येतें, कीं, सर्व देवदूतांचा मुख्य, मनुष्यामधील ईश्वरी तत्त्व कबूल करीना ह्मणून त्याला रसातलामध्यें लोटून देण्यांत आलें. अत्यंत पापी मनुष्य देखील जर मनुष्यामध्यें ईश्वर पाहील, तर तो स्वर्गाचा अधिकारी होईल.

माझा आत्मा हाच सर्व विश्वाचा आत्मा आहे हें पूर्णपणें जाणणें, हीच खरी तारक श्रद्धा (इस्लाम) आहे. ही मनाची नुसती एक समजूत आहे असें याला ह्मणणें, ह्मणजे श्रद्धेचा अन्याय करणें आहे. हेंच सत्य वेदान्तज्ञान आहे. हेंच सर्व कलांची कला, सर्व नियमांचा नियम आहे.

सत्याचें अंतिम प्रमाण काय? तें हेंच, कीं, आपण आपलें जीवित त्याच्या हवालीं करूं.आह्मी खात्रीनें सांगतों, कीं, तुह्मांला आपलें जीवित सर्व दृश्यांच्या मुळाशीं असलेल्या "मी आणि माझा पिता एक आहों!"(तत्त्वमसि)या तत्त्वाच्या हवालीं निःशंकपणें करितां येईल.

**गुरुत्वाकर्षणाचा नियम देखील एक वेळ तुमचा विश्वासघात करील; परंतु आध्यात्मिक अद्वैताचें तत्त्व तुह्मांला कधींहि फसविणार नाहीं.** हें अद्वैत एकदां अंगीं बाणूंद्या, ह्मणजे सर्व सृष्टि तुमचा देह होईल. हे मूढ अमर मानवा ! सोन्यारुप्यानें तुझ्या आयुष्याचा विमा उतरतां यावयाचा नाहीं. प्राणाला चैतन्य देणारा, सूर्य आणि तारे यांनां प्रकाश देणारा तूंच आहेस.

लोकांची त्वरित प्रगति होत नाहीं, याचें कारण, लोकमत, शिष्टाचार इत्यादि गोष्टींचें ओझें प्रचंड हिमालयपर्वताप्रमाणें त्यांच्या पाठीवर—नव्हे छातीवर बसून त्यांनां एक पाऊल देखील पुढें टाकूं देत नाहींसें झालें आहे. कुपथ्य, अंधविश्वास आणि एकदेशीयपणा यांपासून मुक्त व्हा. तुमच्या मनामध्यें असा तेजाब असला पाहिजे, कीं, त्यांत विश्व जरी आणून घातलें तरी तें वितळून गेलें पाहिजे. आत्मज्ञानरूपी सर्वद्रावक, सर्व विश्वाला द्रवरूपानें आपल्यामध्यें मिसळून घेऊन पुनः पारदर्शक (translucent) राहील तो राहीलच. तुह्मी जर योग्य विचार केला, तर आकाश कोसळून पडलें अथवा धरणी विदीर्ण झाली, तरी त्यांचा अवाज तुह्मांला एक नौबतच वाटेल. शत्रूला तुह्मी दिसणार नाहीं, किंवा तुह्मांला शत्रु दिसणार नाहीं. त्याविषयींचा विचारहि तुमच्या मनांत यावयाचा नाहीं.

गाण्यामध्यें निरनिराळे स्वर एकामागून एक नियमानें येतात; तथापि त्यांतील माधुर्य त्या स्वरांचें निरीक्षण अथवा तुलना करून कळावयाचें

नाहीं. परंतु ज्या गूढ भावनांनीं त्या पद्याची स्फूर्ति झाली, ज्या भावनांनीं तें पद्य हृदयंगम झालें, आणि ज्या भावना त्या पद्याचें मूळ कारण होत, त्या भावनांशीं त्या स्वरांचा असलेला संबंध आणि त्या पद्याच्या गायनानें होणारा परिणाम, ह्मणजे त्याचा आदि आणि त्याचा अंत यांच्या अनुभवानेंच त्याचें स्वारस्य उमजणार आहे.

त्याप्रमाणें वर वर पाहण्यानें, ह्मणजे, सृष्टीचे नियम आणि त्यांतील बाह्य कार्यकारणभाव एवढें पाहिल्यानें विश्वाची उपपत्ति लागत नाहीं; तें विश्व आपलें शरीर बनल्यानें तें कार्य साधतें. सर्वांशीं तुमचें तादात्म्य झाल्याखेरीज तुह्मांला सर्वांचें ज्ञान होणार नाहीं. तत्त्वामध्यें बुडी मारणें, नामरूपाचा ठाव पाहणें, पर्वत, कुरणें आणि रानें यांमध्यें मोकळेपणें हिंडणें, दिवस, रात्र, मेघ आणि तारे यांमध्यें स्वैर संचार करणें, नर, नारी, यक्ष आणि किन्नर या सर्वांमध्यें सर्वांचा आत्मा आपण आहों या भावनेनें स्वच्छंदेंकरून विहार करणें, हेंच जीवन होय. यालाच व्यावहारिक ज्ञान ह्मणावें.

**ज्याचें अखिल विश्वाशीं तादात्म्य झालें आहे, त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व जग चाललेंच पाहिजे.**

‘ तत्त्वमसि ’ हें ज्ञानकारण देहांत अनुभविलें असतां, अंतःकरणांत बिंबून गेलें असतां, त्याचें, अनिवार प्रेम, सर्वात्मता, अखंड आणि अनुपम आनंद यांत रूपांतर होतें; आणि लिंगदेहामध्यें पूर्णत्यागरूपानें तें असल्यामुळें देदीप्यमान सूर्यनारायणासारखेंच जरी तें कांहीं मागत नाहीं, कशाची याचना करीत नाहीं, अथवा फलाची वासना धरीत नाहीं, तरी स्थूलदेहामध्यें स्वयंस्फूर्तीनें, अद्भुत शक्ति आणि अमोघ क्रिया या रूपानें तें प्रगट झालेंच पाहिजे.

ह्मणून अनुभव ( साक्षात्कार ) ह्मणजे, भक्ति, ज्ञान आणि कर्म यांचा संयोग होय.

## POEMS.

## कविता.

### IN ME.

### मुझमें.

शोभतसे जलधी मजमाजिच, वाहति त्या सरिता मजमाजी,
हांसति हीं सुमनें मजमाजि, सुमंदसमीरविहारगती जी;
यान्त्रिकसंघ मिळे मजमाजि, घडे रणकंदन मद्रुपिं, तैसे
पर्वतवृद्धि, निसर्गविकास, अशेषहि हें मजमाजि अपैसें[1] ! १

धावति ते धुमकेतु[2] विरे नभिं निर्गतहेति अशी मजमाजी,
शीतमरुत्कृत अस्फुट नादहि, मद्रुपिं त्या घनगर्जितराजि[3];
शत्रुंत होय परस्पर जो कलि, रक्षण मित्र करी सुहृदांचें,
सर्वहि तें मजमाजि वसे, मम रूप असे निजधाम सुखाचें ! २

---

### BLOOD RELATIONS.

### सख्खे बंधु.

न साच जगतीं स्वसा तनुज बंधु हे आपणा,
सुखार्थ जन कार्यमात्र मिळती जसे आपणीं[4];
असे विषम फार आप्तरुप ही महा सांखळी,
करून सकळांस बद्ध भविं या जना आकळी. १

तरे न बुध यांसवें, नसति हे खरे सोयरे,
बरी विवरुनी धरीं निजहितार्थ तूं सोय रे!

---

१. आपैसें, सहज. २. उल्का. ३. पंक्ति. ४. बाजाराला.

मज स्फुरति सूक्ष्मही धमनिमाजि ते आप्त[1] गा,
तदंतरगुणें[2] सुहृत् तरु, मरुत्, प्रभा, आपगा[3]! २

नगोदरिं[4] चुना, समानगुणधर्म अस्थीहि या
तनूंत, म्हणुनी खरे नगहि बंधु हे आत्मया[5];
असे रुधिर देहिं तें जलगुणी, नदी यास्तव[6]
ममस्वरुप; सूर्य मेघ रुचिवार्[7]गुणें वास्तवें[8]! ३

मुदें मुदित माझिया कुसुमवाटिका हांसती,
महोदधि, समीर, भू मजमधें सुखें नाचती;
पुरांत[9] पथजालसें[10] स्वरुपिं माझिया विस्तरे
समस्त जग; हें बरें समज, आप्त[11]-भी निस्तरे! ४

अखंड मम सौख्य तें, त्रिदिवगानिं[12] जें उद्भवे,
तसेंच उडुसंघभा प्रतिगतांबुधारांसवें
दिसे हृदयखेदहारि नव तेज तें मी असे,
उठे कलनिनाद शांगजालिं, रूप माझें तसें! ५

मरुच्चलितदारुचा[13] मधुरनाद, क्षुब्धाब्धिचा
प्रचंड रव, शब्द शाद्वलिं[14] मनोज्ञ[15] जो धेनुंचा;
सुचारुनवमौक्तिकाभ[16]हिमबिंदु, धाराधर[17],
असें सकल मीचि हे सुखनिधान विश्वंभर! ६

---

१. आप्त, सोयरे; माझ्या सूक्ष्म नाड्यांतहि माझे खरे नातलग (रक्तरूपानें) स्फुरतात. २. तत् म्हणजे त्या आप्तांच्या (धमन्यांत स्फुरणाऱ्या रक्तरूपी आप्तांच्या); अंतरगुण म्हणजे उपादानकारण. तरु, मरुत्, प्रभा आणि नदी यांच्या ठिकाणीं रक्तांत असलेले गुणधर्म असल्यामुळें तेहि माझे खरे सुहृद् होत. ३. नदी. ४. पर्वताच्या पोटांतील चुन्याचे व माझ्या देहांतील हाडांचे गुणधर्म समान असल्यामुळें पर्वतहि माझे सुहृद् आहेत. ५. आपणाला. ६. रुधिर जलगुणी म्हणून नदीहि माझें स्वरूप. ७. सूर्य व मेघ यांचे रुचि (प्रभा) व वार् (जल) हे दोन्ही गुण माझ्यामध्यें आहेत. ८. खरें. ९. नगरांत. १०. रस्त्यांचें जाळें. ११. आप्तांचें भय. आप्त आपणाला मोहशृंखलाबद्ध करून संसारांत टाकतात हें भय. १२. स्वर्गीय. १३. वाऱ्यानें हालणाऱ्या दारूचा म्हणजे देवदारूचा. १४. कुरणांत. १५. सुंदर. १६. सुंदर मोत्यांसारखे दिसणारे दवाचे थेंब. १७. मेघ.

ध्वनी उठत गोड जो दुडदुडा शिशू धावतां
समुच्चय महाहस; द्युमणिहेमभा तत्वतां;
लसद्[1]गणकांति, कौमुदि इतस्ततः[2]श्वेतेशी,
असें सकल मीचि हें चमक खड्गिंची ही तशी! ७

दिसे अनलवि[3]स्फुलिंगसम कांति जी रत्निची,
प्रभा निशि[4]भयप्रसूचनकृतालयीं दीपिंची;
महा विभव ना[5]किंचें, तशिच चारुपृष्ठा मही,
ध्वनि श्रुतिअगोचरू, समज मीच हे सर्वहि! ८

शि[6]खारहित तेज मी, तिमिरहीन अंधार मी,
अपक्ष गति, उन्मनिस्थितिहि लक्षिती जे य[7]मीं;
निरीक्षण अनेत्र मी, अमुख वादही मी तसा,
दृढग्रहण मी करेंविण, जगास मी कोवसा! २६

---

"THE WORLD, THE WORLD IS NAUGHT TO ME"

'विश्वाची मज नसे मुळीं परवा!'

मम आत्मा परमात्मा! माझें सर्वस्व [9]तेंचि हा का[10]यं;
कोठेंहि पडो, राहो त्याची परवा मला असे काय! १

टाकुनि दिला कुठेंही, जरि दैवें मृत्यु पावला देह;
मी मुक्तात्मा सागरलहरितनु, तिचा नसे मला स्नेह. २

उडती पडती लहरी जाती सोडून सिंधुपात्र वरी
'तनु वर्ततां' कशीही आत्मा न क्षोभ बिंदुमात्र व[11]री. ३

दुःखें सुखें मला सम; येउत तीं आवडे तदा; मातें–
काय तयाचें? जरि मी नश्वर देहिं न धरींच कामातें. ४

---

१. चकाकणाऱ्या ताऱ्यांचा प्रकाश. २. शुभ्र, रुप्यासारखी. ३. अग्नीची ठिणगी. ४. रात्रीचें खडक वगैरेचें भय आहे ह्मणून सुचविण्याकरितां केलेलें दीपगृह. ५. स्वर्गाचें. ६. ज्योति. ७. योगी. ८. आधार. ९. माझा आत्मा हेंचु माझें सर्वस्व. १०. देह. ११. धरी.

# स्वामी रामतीर्थ.

उद्यान उकिरडा सम तेजोदानीं[1] जसा रविमनातें,
प्रारब्धप्राप्तीं सुखदुःखीं तेंवि न मला विषम नातें. ५

विस्तीर्ण अंबरोदरिं फिरती विरती अनंत मेघतति,
निश्चल गगन न लेशहि विकृति वरी जें समस्तभूतगति. ६

तैसें जननमरण हें, स्फुरती आरोग्य रोग मजमाजी,
परि पावेना तेणें वास्तवतनु[2] विक्रिया[3] समज माझी. ७

निर्मल पुस्तकेंपृष्ठीं[4] रेखामात्राव्रजाक्षरें[5] दिसती,
यौवनवार्द्धक्यादिक मजवरि[6], परि निर्विकार मन्मूर्ति. ८

अपजयजयलाभानें मजमाजीं विषमता घडेना कीं;
मी मुक्त ! मुक्त अमर न नित्य सुधेचे पितां घडे[7] नाकीं[8]. ९

मुक्तीची ही वावडि निर्गुणें[9] परि गगनिं जाय सायकशी,
टाकुनि मागें ग्रहरवि भगणां[10]; ती कल्पवेल काय कशी ? १०

मत्पूर्णहृदय आहे मुक्तिसुखाच्या करीत मी गाना;
मी मुक्त ! मुक्त ! युक्तचि हें मधु अमृत प्रपंचमुग्धांना. ११

मज तुच्छ जगपसारा; याची थोडिच असे मला परवा !
मी नातळें[11] जगाच्या हर्षोद्रेका तसा विलापरवा. १२

---

१. तेज देण्यांत, प्रकाश पाडण्यांत. २. खरें स्वरूप. ३. विकार. ४. कोऱ्या पुस्तकाच्या पानावर. ५. रेखा, मात्रा यांचा व्रज म्हणजे समुदाय, त्यायोगें बनलेलीं अक्षरें. ६. येथें 'दिसती' हें अध्याहृत समजावें. ७. घट. ८. स्वर्गी. ९. दोरी नसलेली, पक्षीं त्रिगुणरहित. १०. तारागणांस. ११. न स्पर्शें.

# आरती.

श्रीस्वामी रामतीर्था । जीवन्मुक्ता समर्था ।
आरती ओंवाळीतों । पुरवीं जीवींच्या अर्था ॥ ध्रु० ॥

तुलसीदास तूं बा । रामभक्ति करूनी ।
रामचि मूर्तिमंत । जाहलासी या जन्मीं ॥ १ ॥

पाताळीं[1] जाऊनियां । ज्ञानामृत त्या देसी ।
तेथींच्या गौरवानें । मोहुनियां न जासी ॥ २ ॥

वरुण[2]देशिं करिसी । ज्ञानजीवनवृष्टि ।
तेथिंच्या जडैश्वर्या । आणुनियां न दृष्टीं ॥ ३ ॥

इंद्रदिग्भागीं[3] रम्य । बालीरवीसी[4] खेंव ।
देउनी येसी तूं बा । ज्ञानरवि स्वयमेव ॥ ४ ॥

क्रूर तीं श्वापदेंही । तुज नमूनी जाती ।
विचरसी आत्मभावें । शुद्ध निर्वैरस्थिति ॥ ५ ॥

समचि सर्वभूतां । सुखचि त्यां इच्छिसी ।
परमदयालुत्वें । बोधामृत पाजिसी ॥ ६ ॥

जडतनु एकदेशी । त्यागुनियां आतां तूं ।
जहालासी जगद्रूप । विश्वपटीं चित्तंतु ॥ ७ ॥

निजरूप तुझें अमुच्या । हृदिं भरोनि राहूं ।
पात्र करीं आर्यबाळां । मोक्षसुखासि लाहूं ॥ ८ ॥

ॐ राम ॐ.

---

१. अमेरिकेंत. २. पश्चिमदेश ( इग्लंड वगैरे ) ३. पूर्वेकडील. ४. जपान.

# गोसावीरामायण

किंवा

# 'स्वामीराम'नवमी.

दशरथनृपदारा आर्यभूरूपिणी जी
तदिय तनुज जो श्री'राम' तो गाउं आजी;
इहपरसुख सत्य ज्ञानबोधें मिळाया
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. १

यदिय गुरु वसिष्ठ ज्ञानदाताहि धन्ना,
रजतम रिपुंचा जो शैशवीं पाडि फन्ना;
भवविपिनिं अविद्याताटिकेसी वधाया
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. २

यदिय पदसरोजस्पर्शनें सत्य साचें
जडपणहि विरालें हूणभू गौतमींचें;
गुरुवचनबळानें जिंकिली आदिमाया,
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. ३

स्वजनक जणुं आर्यावर्त जो देश मानी
च्युत किमपि न हो तो स्वीय सत्त्वा ढळोनी;
ह्मणुनि विपिनभागीं उग्र केली तपस्या,
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. ४

निज तनुपुरि लंकेमाजिं जाणीव सीता
मनपवन सहाय्यें शोधिली स्वीय कांता;

१ मटीरीयालिझममध्येंच रममाण झालेले पाश्चिमात्यदेशरूपी शिलादेहधारिणी गौतमपत्नी अहल्या.

विभिषण वश होई धीर येथें ह्मणूंया,
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. ५

भवनिधिवरि विश्वव्यापक प्रेम सेतु.
रचवि, बहुत यत्नें सोडुनी स्वार्थहेतु;
प्रबळ रिपु अहंकारादि मारून माया,
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. ६

निजसुख–अनुभूतिस्त्रीसर्वे स्वामि योगी
सकलजनसुहृत्स्वानंद साम्राज्य भोगी;
कलियुगिंच अतां हो सत्ययुगा पहाया,
हृदयिं निशिदिनिं श्रीरामतीर्था धरूंया. ७

असतिल बहु झाले संत साधूहि मोठे,
परि कुणिच असा हो देखिला नाहिं कोठें!
परिसुनि मनिं वाटे बोध ज्यांचा "वहावा"
"क्षणिं करूं अजि भूमि स्वर्ग, वैकुंठ किंवा!" ८

स्मितचि बघुनि यांचें चित्त होतें पिसें हो!
मनिंचि सकल शंका ती स्वयें वीरसे हो;
नवल खचित हें कीं मौनरूपेंच बोधी,
कधिं कधिंहि कुणा दे दर्शनेंची समाधि. ९

देवदेवा जगन्नाथा! साधुसंगति दे अशी;
मागणी हीच विश्वेशा त्रैलोक्यमंगला तुशीं.

# छापत आहे !

# स्वामी रामतीर्थ—भाग २ रा.

स्वामींचीं व्याख्यानें किती जोरदार, अर्थपूर्ण, आत्मप्रत्यय पटविणारीं आणि अधिकारयुक्त असतात, हें महाराष्ट्र वाचकांनां नव्यानें सांगावयाला नको ! रामतीर्थांच्या उपदेशांत नित्यनवीनता असून आबालवृद्धांनां मोहून टाकण्याची अजब जादू भरली आहे. वेदांताला काव्यमय व्यवहाराचें स्वरूप स्वामी रामतीर्थांनींच दिलें ! स्वामींच्या व्याख्यानांच्या पहिल्या भागाचे लेखक श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एलएल्. बी., या सुप्रसिद्ध लेखकांनीं श्रद्धायुक्त अंतःकरणानें आणि आदरपूर्ण भावनेनें या दुसऱ्या भागाचेंहि रूपांतर केलें असल्यामुळें, तें पहिल्या भागाप्रमाणेंच वाचकांच्या आदराला पात्र होईल, असा आह्माला भरंवसा आहे. पहिल्या भागाप्रमाणेंच दुसरा भागहि भारी किंमतीच्या अँटिक कागदावर छापण्यांत येत असून त्याची पृष्ठ-संख्याहि जवळ जवळ तेवढीच होईल. किंमत १। रुपयाहून जास्त पडणार नाहीं.

या दुसऱ्या भागांत पुढील प्रकरणें येतील:—

१ गृहसौख्य कसें साधावें ?
२ वैवाहिक स्थिति.
३ गृहस्थ आणि मोक्ष.
४ हिंदी स्त्रिया.
५ पत्नी.
६ पापाचा आत्म्याशीं संबंध.
७ पापाचें निदान.
८ सुखाचें निवासस्थान.
९ सान्तामधील अनन्त.
१० मनःपटावरील आत्मरवि.
११ खरें आत्मदर्शन.
१२ स्फुर्तीचें राज तत्व.
१३ सकलकाम होण्याचा उपाय.
१४ विजयी भावनेची शक्ति.
१५ मोझेसचा दं ______
१६ वेदांतदृष्ट्या मांसाशन.
१७ पद्धतरहित संभाषण.
१८ समतोल मन.
१९ दुःखांतून निजानंदांत.
२० सनातन जीविताचा कायदा.
२१ बृहदारण्यकः—
  १ वैवाहिक स्थिति.
  २ स्तुतीचें जाळें.
  ३ आयुष्याचें महत्त्व.
  ४ ईश्वरविषयक प्रश्नोत्तरें.
  ५ श्रीसेल्देची गोष्ट.
  ६ राम आनंदमग्न.
२२ हिंदुस्थानची दिव्यदृष्टि.
२३ हिंदुस्थानचें आध्यात्मिक ऋण.

मनोरंजक रममाण ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव—मुंबई.

REFBK-0000851

तोडून टाकणें, आपल्या आकुंचित मर्यादा झुगारून देणें ही वेदान्ताची नीति होय. सर्व सद्गुणांची ही एकच जननी होय.

वस्तूंच्या मुळाशीं जाऊन पहा. ज्याला तुम्ही अनीतिकर म्हणतां त्याची उत्पत्ति क्षुद्र देहावरील आसक्तींत आहे. क्षुद्र आकुंचित वृत्तीनें आयुष्य कंठणें याहून अधिक अनीतिकर कांहीं नाहीं. संकुचित वृत्ति ही पाप, रक्तपात आणि नीतिबाह्य अप्पलपोटेपणा यांस कारण होते. देशाभिमानासारखी स्पृहणीय वृत्ति किंवा सद्गुण देखील जेव्हां तो, इंग्लंड, रशिया इत्यादि देशांप्रमाणें फक्त आपल्याच देशावर प्रीति करण्याइतका संकुचित होतो, तेव्हां तो नीतिविरुद्ध होतो. भूतदया देखील जर ती नुसती मानवी कोटीपुरतीच लागू केली तर ती क्रूर होईल. आपल्या प्रेमाच्या मनुष्याचें हित साधण्याकरितां जर एकादा परोपकारी मनुष्य तिर्यक् योनींतील ...याचें ... करूं लागला, तर भूतदया त्याला सोडून जाईल आणि ...ईल. परंतु जेव्हां त्याचें प्रेम आपली नेहमींची मर्यादा ...नावरें आणि झाडें यांनां देखील मदत करण्यास धावेल, ... होईल. म्हणून पुन्हां मी सांगतों, कीं, वेदान्तामध्यें ...कुंचित होणें आणि नीति म्हणजे विकास होण्याची उत्कट ... योगानें आपणास वेष्टून टाकणारा बुडबुडा फुटून ... नौका जाणिवेच्या अनंत सागरामध्यें म्हणजे ईश्वरी ...ते. वेदान्ताचें हें तत्व नीतिनियमरूपी शब्दावडंबराच्या ...त असें आहे.

...ला नीतीचा उपदेश करण्याची काळजी वाटत नाहीं; ...च्छ व पवित्र असलेलें बर्फ नीतीविषयीं कांहींच ...ांचीं प्रशांत शिखरें कांहींहि बोलत नाहींत; मंजुल ...रे कांहीं सांगत नाहींत आणि वायु देखील कांहीं ...ं इतस्ततः भ्रमण करितात; परंतु त्यांच्या गतीमध्यें ...नियम दिसून येतात. कवीला दगडामध्यें सदुपदेश ...णाऱ्या ओढ्यामध्यें मोठमोठे ग्रंथ दिसतात. निसर्ग-...त्यापुढें आहे. पहा ती किती शुद्ध, निष्पाप आणि

तोडून टाकणें, आपल्या आकुंचित मर्यादा झुगारून देणें ही वेदान्ताची नीति होय. सर्व सद्गुणांची ही एकच जननी होय.

वस्तूंच्या मुळाशीं जाऊन पहा. ज्याला तुह्मी अनीतिकर ह्मणतां त्याची उत्पत्ति क्षुद्र देहावरील आसक्तींत आहे. क्षुद्र आकुंचित वृत्तीनें आयुष्य कंठणें याहून अधिक अनीतिकर कांहीं नाहीं. संकुचित वृत्ति ही पाप, रक्तपात आणि नीतिबाह्य अप्पलपोटेपणा यांस कारण होते. देशाभिमानासारखी स्पृहणीय वृत्ति किंवा सद्गुण देखील जेव्हां तो, इंग्लंड, रशिया इत्यादि देशांप्रमाणें फक्त आपल्याच देशावर प्रीति करण्याइतका संकुचित होतो, तेव्हां तो नीतिविरुद्ध होतो. भूतदया देखील जर ती नुसती मानवी कोटीपुरतीच लागू केली तर ती क्रूर होईल. आपल्या प्रेमाच्या मनुष्याचें हित साधण्याकरितां जर एकादा परोपकारी मनुष्य तिर्यक् योनींतील ...याचें ... करूं लागला, तर भूतदया त्याला सोडून जाईल आणि ...ईल. परंतु जेव्हां त्याचें प्रेम आपली नेहमींची मर्याद... ...नावरें आणि झाडें यांनां देखील मदत करण्यास धावे... ... होईल. ह्मणून पुन्हां मी सांगतों, कीं, वेदान्तामध्यें ...कुंचित होणें आणि नीति ह्मणजे विकास होण्याची उत्कट ... योगानें आपणास वेष्टून टाकणारा बुडबुडा फुटून ... नौका जाणिवेच्या अनंत सागरामध्यें ह्मणजे ईश्वरी ...ते. वेदान्ताचें हें तत्व नीतिनियमरूपी शब्दावडंबराच्या ...त असें आहे.

...ला नीतीचा उपदेश करण्याची काळजी वाटत नाहीं; ...च्छ व पवित्र असलेलें वर्फ नीतीविषयीं कांहींच ...ांचीं प्रशांत शिखरें कांहींहि बोलत नाहींत; मंजुल ...रे कांहीं सांगत नाहींत आणि वायु देखील कांहीं ...ां इतस्ततः भ्रमण करितात; परंतु त्यांच्या गतीमध्यें ... नियम दिसून येतात. कवीला दगडामध्यें सदुपदेश ...णाऱ्या ओढ्यामध्यें मोठमोठे ग्रंथ दिसतात. निसर्ग- ...च्यापुढें आहे. पहा ती किती शुद्ध, निष्पाप आणि

पवित्र आहे! सर्व वस्तूंचा आत्मा रमणीय आहे. नीतीचा उगम तेथूनच आहे. चंद्रिकेच्या प्रकाशामध्यें एकाद्या नदीतटाकीं उभे रहा आणि तो आश्चर्यकारक आणि अद्भुत देखावा पहात रहा, ह्मणजे तुमचें मन किती उदात्त होतें तें पहा. त्याच्या योगानें तुह्मांमध्यें उत्तम चैतन्य भरतें. सृष्टीच्या प्रशांत देखाव्यांचा मनावर व अंतःकरणावर होणारा उत्तम परिणाम कोणाहि विचारी नीत्युपदेशकाला नाकबूल करितां यावयाचा नाहीं.
तुह्मांला अतिशय दुःख झालें, काळजीनें तुमचें मन अस्वस्थ झालें, तर
काळ चंद्राकडे पहात रहा, ह्मणजे तुह्मांला आल्हाद...
होईल. गंगेंत स्नान करा, ह्मणजे तुह्मांला सूर्यकिर... राविषयीं उत्कट
चढविल्यासारखें वाटूं लागेल. मध्यरात्रीं आ... आहे?
आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागा, ह्मणजे तुम... आणि दुसऱ्यास प्रका-
अद्भुत कल्पना उद्भवेल. यावरून असें दिस... कार्य आहे. सद्गुण
आर्जव, शांति, उत्साहयुक्त उद्योग, मनमिळा... रण नव्हे. कारणा-
दयालुता, पराक्रम, गांभीर्य, भलेपणा, सुसंगतता, ...ल वस्तुजाताच्या
करितां वाहिलेलें जीवित इत्यादि सर्व सद्गुण आणि ...हज वर्तुळ काढितां
मनुष्यामध्यें येणारे इतर अज्ञात आणि अनिर्दिष्ट
सूचित होतात. पर्वतांचें ऐश्वर्य, नद्यांची निर्मलता,
मूढता, सूर्याचें तेज, चंद्राची शांति, पक्ष्यांचीं गीतें ...शा रीतीनें वागा,
हीं सर्व निसर्गाचीं रूपें तिच्याशीं एकतान अस... सज्ञान प्राण्यांनां
होतात. वेदान्त हा तुह्मांला प्राणमय सूक्ष्म निसर्ग... the immediate
पाहण्यापेक्षां तुह्मांला पाहणें अधिक महत्त्वाचें होतें. ...rsal Rule for
**निसर्गदेवतेशीं तुमचें ऐक्य झालें ह्मणजे** ...व्यावहारिक वेदांत
**उत्पादक होतां यांत तिळमात्र संदेह बाळ...** तुमच्या कल्पना
सिद्ध करण्याकरितां प्रमाणाकडे भीक मागत हिंडं... ...नशा वर्तुळापासून
दोन ओळी ह्मणा. **त्यांमध्यें अनुमिति प्रम...** आपलीं बंधनें
**अंतर्भूत होतात. इमरसन** ह्मणतो 'विश्वांतून
सांपडतात.' आपण धनी आहों या भावनेनें प्रत्येक
शांति, ऐश्वर्य आणि गौरव यांच्या अधिपतीप्रमाणें